# आशा बगे व सानिया यांच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास (१९८० ते २०१२)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या
मराठी विषयातील
विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरिता सादर
केलेला संशोधन प्रबंध


संशोधिकाः
विनया शरद केसकर

मार्गदर्शिकाः
डॉ. आरती अरुण दातार



फेब्रुवारी २०१७

# प्रतिज्ञापत्र

मी, विनया शरद केसकर, प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व ललितकला अभ्यासमंडळांतर्गत मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी) पदवीसाठी **'आशा बगे व सानिया यांच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास'** या विषयावर डॉ. सौ. आरती अरूण दातार यांच्या मार्गदर्शनाखाली शोधप्रबंध लिहिला आहे. सदर प्रबंधातील माहिती व लेखन पूर्णपणे स्वतंत्र आहे. शोध प्रबंधासाठी ज्या संदर्भग्रंथातील माहिती घेतली आहे ती माहिती त्या त्या ठिकाणी कृतज्ञतापूर्वक संदर्भ म्हणून नमूद केली आहे.

हा संशोधन प्रबंध मी यापूर्वी कोणत्याही पदवी अथवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

संशोधकाची स्वाक्षरी

स्थळः पुणे

दिनांक :

(**विनया शरद केसकर** )

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, विनया शरद केसकर यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या कला व ललितकला अभ्यासमंडळांतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी) पदवीसाठी सादर केलेला '**आशा बगे व सानिया यांच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास**' या विषयावरील प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे. त्यांचे हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून कोणत्याही विद्यापीठाच्या पदविका व परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

सदर प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

मार्गदर्शक स्वाक्षरी

स्थळः पुणे

दिनांक :

**डॉ. सौ. आरती अरुण दातार**

# मनोगत

संवेदनशीलता आणि स्त्री म्हणजे जणू एका नाण्याच्या दोन बाजू. त्यामुळेच स्त्रियांच्या प्रत्येक अभिव्यक्तिमध्ये आणि कलाकृतीमध्ये तिची संवेदनशीलता ठळकपणे दिसून येते. साहित्याच्या संदर्भात विचार केल्यास स्त्रियांनी केलेले लिखाण तिच्या अनुभवविश्वाचा एक भाग आहे असे वाटते. स्त्रियांनी साहित्याचे सर्व प्रकार हाताळले आहेत. कथा, कादंबरी, कविता, ललितलेखन, आत्मकथन तर काही प्रमाणात नाट्यलेखन या सर्वच प्रकारांमध्ये त्यांच्या परीघातले अनुभवविश्व मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

एका छोट्याश्या खिडकीतून आकाशाचा मोठा विस्तृत आवाका बघता येतो. तेच आकाश मोकळ्या माळरानावरूनदेखील पहाता येते. मात्र खिडकीतून दिसणारे आकाश चौकटीच्या मर्यादा सांभाळूनदेखील एक विस्तृत असा पट पहाण्याचा आनंद देते असे वाटते. कथा या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास केला तर छोट्या कथेतून मोठा आशय समजल्याची जाणीव होते. म्हणूनच कथा हा वाङ्मय प्रकार महत्त्वाचा वाटतो. मराठी साहित्यविश्वात स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण करणाऱ्या कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, अंबिका सरकार या लेखिकांबरोबरच आशा बगे आणि सानिया (सुनंदा कुलकर्णी - बालरामन) या दोन्ही लेखिकांचा मोलाचा वाटा आहे. कसदार, आशयघन व थेट मनाला भिडणाऱ्या त्यांच्या साहित्यात आपण अक्षरशः हरवून जातो. अन्य वाङ्मय प्रकारांबरोबरच कथा या वाङ्मयप्रकारात त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे. म्हणूनच या दोन लेखिकांच्या साहित्यविश्वातील कथांचा अभ्यास करावा असे वाटते. आशा बगे व सानिया यांच्या फक्त कथांचा अभ्यास करण्याची चौकट पक्की केल्याने त्यांच्या कादंबऱ्या व अन्य साहित्य उपलब्ध असूनही त्यांचा विचार केलेला नाही. तसेच अभ्यास करताना २०१२ पर्यंतच्या कथांचा कालावधी ठरविलेला होता. तरीही २०१५ पर्यंतच्या कथासंग्रहांमघल्या कथांचा अभ्यास केला आहे. २०१२ नंतरच्या दर्जेदार कथांचा समावेश करून प्रबंध खऱ्या अर्थाने परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मार्च २०१६ मध्ये प्रकाशित झालेल्या आशाताई बगे यांच्या 'अनुवाद'

या कथासंग्रहातील कथांचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कारण मार्च २०१६ पर्यंत प्रबंधातील कथाविश्वाचे काम पूर्ण झाले होते.

मानवी नातेसंबंध, भावभावना, आनंद व दुःखाच्या शोधांचे चित्रण त्यांच्या साहित्यात अनुभवायला मिळते. या दोन्ही लेखिकांच्या साहित्यात आपल्या सभोवती असणाऱ्या जगाचे प्रतिबिंब दिसते. त्यामुळे ते साहित्य अधिक जवळचे वाटते. त्यांच्या साहित्यातील स्त्रिया चारचौघींसारख्या असल्या तरी स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या आहेत. जगरहाटीपेक्षा वेगळ्या वागणाऱ्या आणि प्रसंगी समाजाने ठरविलेल्या पारंपारिक व्यवस्थेला धुडकावणाऱ्या आहेत.

चांगली कथा म्हणजे आयुष्याच्या आकलनाचे दर्शन असते. आशा बगे व सानिया यांच्या कथादेखील आयुष्याचा साकल्याने विचार मांडणाऱ्या आहेत. म्हणूनच त्यांच्या कथांच्या या विश्वात जावेसे वाटते. मराठी साहित्यातील कथा या साहित्य प्रकाराची ओळख व्हावी म्हणून उपलब्ध साहित्य, संदर्भग्रंथ, कथासंग्रहांवर आलेले समीक्षा ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, माहितीजाल (इंटरनेट), प्रत्यक्ष भेटी यामधून प्रबंधासाठी आवश्यक साहित्य मिळविले. मुख्य म्हणजे आशा बगे आणि सानिया यांचे सर्व कथासंग्रह हे प्रबंधसामग्रीचा मुख्य घटक आहेत.

आशा बगे व सानिया या दोन्ही लेखिकांचे लिखाण दर्जेदार आहे. विषय निवडीच्या वेळी अनेकांशी बोलल्यानंतर हे लक्षात आले की त्या आत्ताच्या पिढीला फारशा परिचित नाहीत. त्यामुळे त्यांच्या साहित्याची ओळख होणे गरजेचे वाटले. या दोघींनीही स्वत्वसंपन्न अशा कथा लिहिल्या आहेत. त्यांनी त्यांच्या कथांमध्ये बुद्धिनिष्ठ, आत्मनिर्भर व कर्तबगार स्त्री रंगविली. स्त्रीला घरीदारी अनेक प्रकारचे ताण सहन करावे लागतात. अशी शहरी-स्त्री सानिया यांच्या कथांमध्ये भेटते. स्त्री-मनाच्या ठराविक कक्षा ओलांडणाऱ्या, आपल्याला हवे ते करणाऱ्या, बंडखोर नायिका सानिया यांनी चित्रित केल्या आहेत. तर आशा बगे यांच्या साहित्यात मध्यमवर्गीय कुटुंबव्यवस्थेचे प्रत्ययकारी दर्शन घडते. परंपरा जपणारी तरीही स्वत्व सांभाळणारी स्त्री आशा बगे यांच्या साहित्यात सापडते. या दोन्ही लेखिकांच्या कथांचा अभ्यास करून जगण्याच्या जाणीवा समृद्ध करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता

वाटली. यापूर्वी दोन्ही लेखिकांच्या कथांमधील साम्य व विरोध शोधण्याचा प्रयत्न केला गेलेला नाही म्हणून संशोधनासाठी 'आशा बगे व सानिया यांच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास' हा विषय निवडला आहे.

या दोन्ही लेखिका समकालीन आहेत. फार जुन्या किंवा फार अलीकडच्या नाहीत. अगदी जुने साहित्य किंवा अलीकडच्या काळातले साहित्य अभ्यासण्यापेक्षा नव्या व जुन्या साहित्याच्या समांतर रेषांमधले साहित्य जास्त प्रभावी वाटते. कारण स्त्रीवर झालेल्या अन्यायाचे चित्रण किंवा स्त्री-स्वातंत्र्याचा अतिरेक मांडणाऱ्या साहित्याने आपल्या समाजाच्या विचारसरणीत आदर्श निर्माण होईल असे नाही. या दोन्ही लेखिकांनी संयमीपणे लिखाण केले आहे. त्यांच्या साहित्यातील स्त्री रोजच्या जगण्याच्या अधिक जवळची वाटते. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार आणि स्त्री म्हणजे चूल आणि मूल या दोन्ही टोकाच्या विचारांना छेद देणारे साहित्य या दोघींच्या लिखाणात आहे. बंडखोरी हे साधन आहे साध्य नाही असे त्यांचे साहित्य सांगते. मनातले हिंदोळे शब्दबद्ध करण्याची शैली संयमी आहे. ''नव्या जुन्या सीमेवर माझे मला गाव दिसे, स्त्री माझे नाव असे.'' हेच त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

**– विनया केसकर**

## ऋणनिर्देश

पीएच. डी. चे माझे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ज्यांनी मोलाची मदत केली अशा सगळ्यांचे ऋण मानण्याची संधी मला मिळते आहे. या सगळ्यांचे आभार मानून त्यांना मला परके करायचे नाही, कारण त्यांच्या ऋणात रहाणेच मला आवडेल. त्यांच्याप्रती असणारी कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य समजते.

माझ्या मार्गदर्शिका डॉ. आरती अरूण दातार मॅडम यांच्यामुळेच या विषयावरचे लिखाण करणे शक्य झाले आहे. त्यांना पहाताक्षणीच मला माझ्या गुरू मिळाल्याची खूण पटली होती. त्यांच्याविषयी असणारी आदरयुक्त भीती प्रबंधाचे काम अचूक करण्यासाठी उपयुक्त ठरली. डॉ. अरूण दातार सर यांनी वेळोवेळी दिलेला सकारात्मक दृष्टिकोन लेखन करताना प्रेरणादायी ठरला. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. श्रीपाद भट यांनी वेळोवेळी केलेली मदत मोलाची ठरली. आशा बगे व सानिया या दोघींनी दाखवलेला स्नेह मी जन्मभर विसरू शकत नाही. सगळ्याच बाबतीत कितीतरी पट मोठ्या असणाऱ्या या दोन्ही लेखिकांच्या प्रेमाने मी भारावून गेले आहे. मुलाखतीला दिलेली उत्तरे, शुभेच्छापत्रे या सगळ्यातून त्यांचा स्नेह जाणवला.

प्रबंधाचे टंकलेखन ही मोठी जबाबदारी विनायक लिमये यांनी घेतल्याने माझे काम निम्म्याहून अधिक हलके झाले. प्रा. शिरीष अवधानी तसेच प्रा. जयंत जोर्वेकर यांनी प्रबंध पूर्ण करण्यासाठी आवश्यक असणारा आत्मविश्वास दिला.

तळेगाव दाभाडे येथील इंद्रायणी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय बाळसराफ, उपप्राचार्य डॉ. संभाजी मलघे यांनी दिलेले प्रोत्साहन मोलाचे ठरले. तळेगाव येथील सावित्रीबाई फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कृष्णराव मोहिते, माझे सगळे सहकारी व माझ्या विद्यार्थिनींचा उल्लेख आवर्जून करायला हवा. तसेच माझ्या गुरूभगिनी डॉ. लता पाडेकर व गुरूबंधू डॉ. ज्ञानेश्वर जोशी यांनीदेखील मदतीचा हात दिला. पुणे विद्यापीठातील मराठी विभागातील डॉ. अविनाश आवलगावकर सर यांनी दिलेल्या पत्रामुळेच विद्यापीठातील जयकर वाचनालयात जाऊन संदर्भग्रंथ अभ्यासता आले. तसेच समिंदर घोक्षे यांनीदेखील विद्यापीठाच्या वाचनालयात पुस्तके मिळवून देण्यासाठी मदत केली. डॉ. संदीप सांगळे यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वाचनालयातून आशाताईंचा एक दुर्मिळ कथासंग्रह मिळवून दिला. पुण्यातील संजय भास्कर जोशी यांनी सानिया यांचा दुर्मिळ कथासंग्रह दिला. डॉ. संदीप कांबळे, मुंबईचे अनंत भाटे यांनी संदर्भ मिळवून देण्यासाठी मदत केली. एस. एन. डी. टी. विद्यापीठ, पुणे यांचे ग्रंथालय, तळेगाव दाभाडे येथील श्री गणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय तसेच सेवाधाम वाचनालय या संस्थांचेदेखील मनापासून आभार.

माझे पती शरद केसकर, सासुबाई मंदा केसकर व मुलगा प्रणव यांच्या मदतीनेच हा प्रबंध पूर्ण झाला आहे. माझ्या सासरच्या व माहेरच्या सगळ्यांनीच मला खूप प्रोत्साहन दिले. मित्र–मैत्रीणींनी दिलेले प्रोत्साहन तर शब्दातीत आहे. उल्लेख करण्यासारखी बरीच नावे आहेत. प्रबंधासाठी मदत केलेल्या सगळ्यांचेच आभार. माझ्यावर असलेला स्नेह व विश्वास असाच ठेवावा ही विनंती.

**विनया केसकर**

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **क.** | **उपक्रम** | १ ते २ |
| **ख.** | **प्रकरण योजना** | |
| | १. कथा या साहित्यप्रकाराचा अभ्यास (मराठी साहित्यातील इतर साहित्यप्रकार त्यात कथेचे वेगळेपण, कथेचे प्रकार) | ३ ते ३३ |
| | २. आशा बगे यांचे कथाविश्व (परिचय, त्यांचे अन्य साहित्य, पार्श्वभूमी, कालखंड ) | ३४ ते १८३ |
| | ३. सानिया यांचे कथाविश्व (परिचय, त्यांचे अन्य साहित्य, पार्श्वभूमी, कालखंड ) | १८४ ते ३१४ |
| | ४. आशा बगे आणि सानिया यांच्या कथांमधील साम्य आणि विरोध | ३१५ ते ३७२ |
| | ५. समकालीन लेखिकांमध्ये आशा बगे आणि सानिया यांचे वेगळेपण | ३७३ ते ३९६ |
| | ६. उपसंहार<br>**अ.** प्रास्ताविक<br>**ब.** सारांश<br>**क.** पुढील संशोधनासाठी उपस्थित विषय<br>**ड.** प्रबंधाची आधुनिक काळातील उपयुक्तता | ३९७ ते ४३६ |
| **ग.** | **परिशिष्टे**<br>आशा बगे व सानिया यांच्या मुलाखती | ४३७ ते ४५० |
| **घ.** | **संदर्भ सूची, ग्रंथसूची** | ४५१ ते ४६० |

# उपक्रम

## प्रबंधाचा परिचय

मराठी साहित्यविश्वात स्त्रीच्या भावविश्वाचे चित्रण करणाऱ्या लेखिकांमध्ये आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दोघींनीही कसदार, आशयघन व थेट मनाला भिडणारे लेखन केले आहे. अन्य वाङ्मय प्रकारांबरोबरच कथा या वाङ्मयप्रकारात त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे. म्हणूनच या दोन लेखिकांच्या साहित्यविश्वातील कथांचा अभ्यास करावा असे वाटले. मानवी नातेसंबंध, भावभावना, आनंद व दुःखाच्या शोधांचे चित्रण त्यांच्या साहित्यात अनुभवायला मिळते. या दोन्ही लेखिकांच्या साहित्यात आपल्या सभोवती असणाऱ्या जगाचे प्रतिबिंब दिसते. त्यामुळे ते साहित्य अधिक जवळचे वाटते. त्यांच्या साहित्यातील स्त्रिया चारचौघींसारख्या असल्या तरी स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या आहेत. जगरहाटीपेक्षा वेगळ्या वागणाऱ्या आणि प्रसंगी समाजाने ठरविलेल्या पारंपरिक व्यवस्थेला धुडकावणाऱ्या आहेत. आशा बगे व सानिया यांच्या कथा आयुष्याचा साकल्याने विचार मांडणाऱ्या आहेत. म्हणूनच त्यांच्या कथांचा अभ्यास करावा असे वाटले.

## प्रबंधाची सामग्री

मराठी साहित्यातील कथा या साहित्यप्रकाराची ओळख व्हावी म्हणून उपलब्ध साहित्य, संदर्भग्रंथ, कथासंग्रहांवर आलेले समीक्षा ग्रंथ तसेच वृत्तपत्रे, नियतकालिके, इंटरनेट, प्रत्यक्ष भेटी यामधून प्रबंधासाठी आवश्यक साहित्य मिळविले. मुख्य म्हणजे आशा बगे आणि सानिया यांचे सर्व कथासंग्रह हे सामग्रीचा मुख्य घटक होते.

## प्रबंधाची गरज

आशा बगे व सानिया या दोन्ही लेखिकांचे लिखाण मोजकेच पण दर्जेदार आहे. तरीदेखील त्या आत्ताच्या पिढीला फारशा परिचित नाहीत, असे जाणवले. त्यामुळे त्यांच्या साहित्याची ओळख होणे गरजेचे आहे, असे वाटले. या दोघींनीही स्वत्वसंपन्न अशा कथा लिहिल्या आहेत. या दोन्ही लेखिकांच्या कथांचा अभ्यास करून जगण्याच्या जाणीवा समृद्ध करण्यासाठी संशोधनाची आवश्यकता वाटली. म्हणूनच या दोघींच्या कथांमधील साम्य व विरोध शोधण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला आहे.

## प्रबंधाचा आवाका

आशा बगे आणि सानिया यांच्या साहित्यविश्वातील 'कथा' हा साहित्यप्रकार अभ्यासाच्या नेमकेपणासाठी निश्चित केला आहे. या दोन्ही लेखिकांच्या कथांमधील साम्य व विरोध शोधण्याचा प्रयत्न केला गेलेला नाही असे वाटले. म्हणून कथा हा साहित्यप्रकार निवडला.

## प्रबंधाची मर्यादा

आशा बगे आणि सानिया यांच्या कथांच्या अभ्यासाच्या सोयीसाठी १९८० ते २०१२ हा कालखंड ठरविला. त्यामुळे या प्रबंधात या कालखंडातल्या कथांचाच समावेश आहे. प्रबंधाच्या परिपूर्णतेसाठी २०१५ पर्यंतच्या कथासंग्रहांचा समावेश केला आहे. पण त्यानंतर लिहिले गेलेले कथासंग्रह या प्रबंधात समाविष्ट केलेले नाहीत. तसेच त्यांच्या साहित्यातील कथा हा साहित्यप्रकार अभ्यासासाठी निश्चित केल्याने त्या दोघींच्या अन्य साहित्यप्रकारांचा अभ्यास या प्रबंधात समाविष्ट केलेला नाही.

## प्रबंधाचा विशेष

या दोन्ही लेखिका समकालीन आहेत. फार जुन्या किंवा फार अलीकडच्या नाहीत. अगदी जुने साहित्य किंवा अलीकडच्या काळातले साहित्य अभ्यासण्यापेक्षा नव्या व जुन्या साहित्याच्या समांतर रेषांमधले साहित्य जास्त प्रभावी वाटते. कारण स्त्रीवर झालेल्या अन्यायाचे चित्रण किंवा स्त्री-स्वातंत्र्याचा अतिरेक मांडणाऱ्या साहित्याने आपल्या समाजाच्या विचारसरणीत आदर्श निर्माण होईल असे नाही. या दोन्ही लेखिकांनी संयमीपणे लिखाण केले आहे. त्यांच्या साहित्यातील स्त्री रोजच्या जगण्याच्या अधिक जवळची वाटते. त्यामुळे या दोन्ही लेखिकांच्या कथांचा अभ्यास केल्यानंतर जाणीवा प्रगल्भ झाल्या.

| **प्रकरण १ कथा या साहित्यप्रकाराचा अभ्यास**<br>(मराठी साहित्यातील इतर साहित्यप्रकार त्यात कथेचे निराळेपण, कथेचे प्रकार) | **पृष्ठ क्र.**<br>३ ते ३३ |
|---|---|
| **१.१ प्रस्तावना**<br>**१.२ कथा या साहित्यप्रकाराचा इतिहास**<br>**१.३ लघुकथा**<br>**१.४ कथेचे घटक**<br>**१.५ कथेचे प्रकार**<br>**१.६ अन्य साहित्यप्रकारांचा अभ्यास**<br>**१.७ कथेचे निराळेपण**<br>**१.८ समारोप**<br>**१.९ संदर्भसूची / ग्रंथसूची** | |

## १.१ प्रस्तावना

कथा सांगणे ही मानवी मूलभूत प्रवृत्ती आहे. जीवनात स्वतःच्या वाट्याला आलेले रोमहर्षक प्रसंग दुसऱ्याला सांगण्यात आणि दुसऱ्याचे अनुभव ऐकण्यात माणसाला मनस्वी सुख वाटते. म्हणूनच भाषेचे ज्ञान अवगत होताच माणसाने गोष्ट सांगण्यास सुरुवात केली असावी.

बालपणापासूनच कथा आपल्यावर संस्कार करीत असते. अगदी लहानपणी ऐकलेल्या काऊचिऊच्या गोष्टी म्हणूनच महत्त्वाच्या वाटतात. कथा आपल्यावर चांगले संस्कार करते. उत्तम पद्धतीने जीवन जगण्याची कला, हजरजबाबीपणा, चातुर्य, माणुसकी, संवेदनशीलता या व अशा अनेक गोष्टी आपल्याला कथांमधून मिळतात. थोडेसे मोठे झाल्यानंतर आजी आजोबांनी सांगितलेल्या पशुपक्षांच्या कथा, पऱ्या, राक्षस आणि देवादिकांच्या कथा आपली मनोभूमिका पक्की करण्यासाठी व मनाची उत्तम मशागत करण्यासाठी उपयुक्त ठरतात. या कथांमुळे आपले कल्पनाविश्व समृद्ध होते. पुढे पुढे या अद्भूत कथांमधून बाहेर येऊन वास्तवाच्या थोडे जवळ नेणाऱ्या कथा आवडू लागतात. शूरवीरांच्या साहसकथा, ऐतिहासिक कथा, गूढरम्य कथांमध्ये मन रमू लागते. तारुण्यात प्रेमकथांचे आकर्षण वाढते. मनाची प्रगल्भ अवस्था प्राप्त झाल्यानंतर सामाजिक परिस्थिती, वास्तव, माणसांची सुख-दुःख यांचे दर्शन घडविणाऱ्या कथा आपल्याकडून वाचल्या जातात. एकूणच आयुष्यात प्रत्येक वळणावर कथा आपल्याला साथ देते. आपल्या सर्व अवस्थांमध्ये आपल्या मनोवृत्तीला खाद्य पुरविते. असे म्हणता येईल की, "काऊचिऊच्या बाळबोध भाषेपासून तत्वज्ञानाची भाषा सारख्याच मनोरंजकतेने बोलण्याचे सामर्थ्य कथेजवळ आहे."[१]

कथेविषयी दोन गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे कथा हा सर्वात जुना वाङ्मय प्रकार आहे. दोन म्हणजे कथा हा सर्वात नवीन वाङ्मयप्रकार देखील आहे. एकीकडे कथेचा उगम मानवाच्या आदिस्थितीत काव्याच्या पुढेमागे झालेला आहे. तर दुसरीकडे सर्व वाङ्मयप्रकारात सर्वात शेवटी झालेला आहे. या दोन्ही गोष्टींना विशेष अर्थ आहे.

कथा आदिकाळापासून कुठल्या ना कुठल्या स्वरूपात आढळते. जगातले भिन्नभाषीय वाङ्मय तपासले तर त्याचा पाया कथनात्मक दिसेल. याचा अर्थ कथा हा कृत्रिम वाङ्मय प्रकार नसून मानवाच्या उपजत प्रवृत्तींशी निगडीत आहे.

माणसाला कथनाची आवड उपजतच होती. आपले विचार प्रकट करण्यासाठी भाषेचे साधन प्राप्त झाल्यानंतर मानव गोष्टी सांगू लागला. स्वानुभव व कल्पना सांगण्यासाठी त्याने

---

१. भाषा व साहित्यः संशोधन (खंड १), संपादकः डॉ. वसंत जोशी, प्रकाशकः म. श्री. दीक्षित, नोव्हें. १९८१, पृष्ठ - १

कथेसारखा सुटसुटीत, लघुआकारी व लवचिक असा साहित्यप्रकार निवडला.

कथा विविध प्रकारांनी व विविध हेतूंसाठी वापरली गेली. कथेचे पुरणकाळापासूनचे वैशिष्ट्य म्हणजे तिची बहुविश्वता व बहुप्रायोजिकता हे गुण. यामध्येच तिच्या लोकप्रियतेचे बीज आहे. म्हणूनच इतर सर्व साहित्यप्रकारांमध्ये कथेने आपले अस्तित्व अबाधित राखले आहे.[२]

हजारो वर्षांच्या प्रवासात कथा प्रमुख तीन अवस्थांमधून विकसित होत गेली.

१) आदिम अवस्थेपासून प्रचलित असलेली मौखिक कथा म्हणजे मिथकथा, परिकथा, नीतीकथा, लोककथा व कहाण्या. "कालानुक्रमे जोडलेल्या घटनांची सैल बांधणी" ही तिची या टप्प्यावर व्याख्या करता येईल.

२) दुसऱ्या टप्प्यात कथा लिखितावस्थेत आली. अर्वाचीन लघुकथेपूर्वी ललित वाङ्मयाचा घाट देण्याचा प्रयत्न करणारी गोष्ट या टप्प्यात विकसित झाली. तिची व्याख्या अशी करता येईल, "कार्यकारण संबंधाने जोडलेल्या घटनांच्या व पात्रांच्या साहाय्याने बांधलेली हकीकत."

३) तिसऱ्या टप्प्यात लघुकथा अस्तित्वात आली. लघुकथा म्हणजे एकच एक संस्कार करणारी व एकात्म असा कथात्मक अनुभव सांगणारी परिपूर्ण संघटना.

## १.२ कथा या साहित्यप्रकाराचा इतिहास

कोणत्याही वाङ्मयप्रकाराचा इतिहास पाहिला तर त्याचे काही टप्पे असतात. त्याच्या इतिहासाची वेगवेगळ्या कालखंडात विभागणी करणे शक्य असते. प्रत्येक कालखंडातील साहित्याने स्वतःचे असे काही निकष निर्माण केलेले असतात. ते निकष पत्करण्याची बांधिलकी त्या कालखंडात अपेक्षित असते.

साहित्यातील प्रवाह आणि वाङ्मय प्रकार सामाजिक परिवर्तनांमुळे व वाङ्मयीन कारणांमुळे बदलतात. वाङ्मयाचा इतिहास मांडण्यासाठी किंवा साहित्यातील प्रवृत्ती आणि प्रेरणा शोधण्यासाठी प्रत्येक कालखंडातील प्रचलित वाङ्मयीन निकष विचारात घ्यावे लागतात.

मराठी कथेच्या बाबतीत तिचे अव्वल इंग्रजीतील कथा, लघुकथा, नवकथा, नवकथोत्तर कथा असे ठळक कालखंड पडतात. हे कालखंड कालवाचक, गुणवाचक आहेत. मराठी कथेतील बदलाचे चित्र यातून स्पष्ट होते. कथाकार हा समाजाचा घटक असल्याने आणि समाजातील नानाविध प्रश्न त्याच्या कथांना प्रेरणा पुरवित असल्याने, समाजवास्तवाचे पडसाद कथेच्या प्रवासात

---

२. भाषा व साहित्यः संशोधन (खंड १), संपादकः डॉ. वसंत जोशी, प्रकाशकः म. श्री. दीक्षित, नोव्हें. १९८१, पृष्ठ – २.

उभरताना दिसतात.

**प्राचीन भारतीय कथासाहित्यः-**

भारत हे प्राचीन कथापीठ आहे. भारतीय कथेची परंपरा अखंड राहिली आहे. जगातील कोणत्याही देशाच्या आधी भारताने प्राणीकथा, नीतीकथा, अद्भूत कथा ग्रंथबद्ध केल्या आहेत. भारत हा एक कथाप्रिय देश म्हणून नावाजला आहे. भारतीय माणूस कथेकडे भाविकतेच्या दृष्टीने बघतो. कहाणी सांगितली तर पुण्य मिळते, कुशलाचा लाभ होतो. अशी भारतीयांची भावना आहे. म्हणूनच पूर्वीदेखील श्रोत्याची गोष्ट ऐकण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आवडीने कथा सांगितल्या जात. माझ्या लहानपणी माझी आजी चातुर्मासात कुठलातरी धार्मिक ग्रंथ गोष्टीरूपात सांगण्याचा संकल्प करीत असे. त्यामुळे ज्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यांनादेखील ग्रंथ वाचल्याचा आनंद मिळत असे. तसेच एकत्र आल्याने एकमेकींच्या सुखदुःखाची देवाण-घेवाण होत असे.

**मराठी कथेची गंगोत्रीः-**

वस्तुतः संस्कृत साहित्य प्रादेशिक भाषांमधील लोककथा भांडारावर समृद्ध झाले. या लोककथा परंपरेने तोंडातोंडी चालत आलेल्या आहेत. वेदकाळी सूतांनी वेदाबाहेरील लोककथा गोळा करून वेदांमध्ये समाविष्ट केल्या. इतिहासग्रंथकाळात सूतांप्रमाणेच मागध चरण, बंदी यांचा वर्ग होता. या सर्व वर्गांनी पुराणकथा संग्रहित करून त्यांची वाढ केली. पुढे या प्रवाहात अभिजात संस्कृत आले ते देखील मूळचे लोकभाषेतलेच. कथावाङ्मय व बृहत्कथा मूळ पैशाचीतली. याच लोकसाहित्याचा वारसा पुढे प्रादेशिक भाषांना मिळाला. याप्रमाणे मराठी कथा ग्रंथरुपात येण्यापूर्वी मौखिक रूपाने व लोककथेंच्या रूपाने अस्तित्वात होती. "म्हणजे लोककथा हीच मराठी कथेची गंगोत्री म्हणता येईल."[३]

**अर्वाचीन मराठी कथेचे कालखंडः-**

अव्वल इंग्रजी काळात पाश्चात्य कथेच्या संपर्काने मराठी कथा नवे रूप घेऊन अवतरली. या काळात तिने जुन्या संस्कृत कथांचा किंवा लोककथेचा वारसा घेतला नाही. अव्वल इंग्रजी काळात मराठी गद्याचा विकास होऊन त्याला स्वतंत्र निर्मिती करण्याची कुवत येईपर्यंत मराठी कथेला भाषांतराच्या पांगुळगाड्याचा आधार घ्यावा लागला. इंग्रजी, पर्शियन व संस्कृत कथांचा

---

३. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ - ४.

तिने आधार घेतला.  हरिभाऊंपासून कथेची पुढची वाटचाल पाश्चात्य कथेच्या प्रभावानुरूप झाली.

### अव्वल इंग्रजी कालखंड (१८०० ते १८८५):-

काही अभ्यासक कथेचा जन्म १८८० पूर्वी असल्याचे दाखवतात.  हरिभाऊंच्या स्फुट गोष्टींपूर्वी जे लिहिले जात होते ते वाङ्मय कथात्म स्वरूपाचे होते.  आधुनिक कथेशी त्याचे नाते नव्हते.  संस्कृतमधील हितोपदेशप्रधान कथात्म वाङ्मय आणि अरबी, फारसीतील शृंगारिक, मनोरंजनप्रधान कथासाहित्य या दोहोंचा प्रभाव हरिभाऊपूर्वकालीन कथात्म वाङ्मयावर होता.

मराठी साहित्याच्या प्रत्येक कालखंडात पाश्चात्य विचारांचे पडसाद उमटत गेले.  कथातंत्र व कलेसाठी कला हा विचार ना. सी. फडके यांनी मराठीत आणला.  वि. स. खांडेकरांवर रशियन लेखकांचा विशेषतः चेकॉव्हचा परिणाम झाला.  १९४५ नंतर नवकथा आली.  युद्धोत्तर युरोपातील साहित्याचे व अनेक नव्या प्रवृत्तीचे संस्कार या कथेवर झाले.  मर्ढेकर, गाडगीळ इत्यादींच्या नवसाहित्यानंतर आलेल्या अस्तित्ववादी व अनुभववादी प्रणालींचे परिणाम जी. ए. कुलकर्णी, चित्रे, कमल देसाई, चिं. त्र्यं. खानोलकर आदी लेखकांवर झालेले दिसतात.  म्हणजे, मराठी कथेचा विकास पाश्चात्य कथेच्या प्रभावातून झालेला आहे.  याचा अर्थ मराठीत स्वतंत्रकथानिर्मिती झाली नाही असा नव्हे.  पण पाश्चात्य कथेनुसार तिची प्रकृती बदलत गेली.

अर्वाचीन वाङ्मयाच्या या अवस्थेत कथेचा सर्वाधिक वापर झाला.  या दृष्टीने या काळाला कथेचा कालखंड म्हणता येईल.  मुद्रणकलेची सुरूवात, मराठी गद्याची अविकसित अवस्था, लेखकांचा अभाव, अनुवादासाठी असलेल्या साहित्याचा तोकडेपणा या सगळ्याचा विचार करता त्यामानाने या काळात विपुल ग्रंथनिर्मिती झाली.  यामधील बरेचसे वाङ्मय आज उपलब्ध नाही.  मात्र त्या काळातील लोकांची वाचनाची हौस या ग्रंथांनी भागवली.

### मनोरंजन, निबंधचंद्रिका व करमणूक कालखंड (१८८६ ते १९१५)

करमणूक, मनोरंजन, रत्नाकर, यशवंत, किर्लोस्कर, अभिरुची, सत्यकथा, अस्मितादर्श ही मासिके म्हणजे मराठी कथेच्या विकासाचा आलेख आहेत.  मराठी कथेला वळण लावणाऱ्या लेखकांची नावे या मासिकांशी निगडीत आहेत.

या कालखंडात अर्वाचीन मराठी कथेतील स्वतंत्र निर्मितीला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. या कथेची सुरुवात हरिभाऊ आपट्यांच्या करमणुकीतील स्फुट गोष्टींनी झाली.  म्हणून हा कालखंड करमणूक कालखंड मानला जातो.  परंतु हरिभाऊंनी आपल्या कथालेखनाची सुरुवात

त्यापूर्वीच कानिटकर आणि मंडळींच्या मनोरंजनातून केली होती. म्हणून पहिली कथा अवतरली ती मनोरंजन, निबंधचंद्रिकेतून. संथपणे व ऐसपैसपणे कथानुभवाचे चित्रण करणारी हरिभाऊंची कथा बाह्यतः कादंबरीशी जवळीक साधणारी होती. तसेच तिचे अंतरंग बोधवादाने प्रभावित झाले होते. हरिभाऊंनी ज्या काळात लेखन केले तो काळ सामाजिक प्रबोधनाचा असल्याने विधवाविवाह, बालविवाह, जरठबालविवाह, केशवपनाची चाल, सासुरवास इत्यादी तत्कालीन समाजाला ग्रासणारे प्रश्न हरिभाऊंच्या कथांमध्ये या ना त्या स्वरुपात आलेले दिसतात.

याच काळात वि. स. गुर्जर, गो. शि. जोगळेकर, श्री. बा. रानडे, ना. के. बेहरे, कृ. के. गोखले, सहकारी कृष्ण आदी लेखकांनी कथाविश्वात आपल्या लेखनाने भर घातली. मराठीतील पहिल्या कथालेखिका काशीताई कानिटकर या हरिभाऊंच्या समकालीन होत्या.

१९१६ साली वा. म. जोशींचा नवपुष्पकरंडक हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. या संग्रहातील कथेचे स्वरूप करमणुकीतील स्फुट गोष्टींपेक्षा बरेच वेगळे आहे. या काळात स्त्रियांविषयी बदललेला उदारमतवादी दृष्टीकोन, सुशिक्षित स्त्रीचे चित्रण, राष्ट्रीय चळवळीचे वाढते बळ, आंतरप्रांतीय दळणवळण इत्यादी गोष्टी कथांमध्ये आलेल्या आहेत म्हणून कथाविकासाच्या टप्प्यांचा विचार करताना १९१५ हे साल या खंडाच्या उत्तर सीमेचे साल म्हणून निश्चित करावे लागेल.[४]

## मनोरंजन कालखंड (१९१५ ते १९२५)

या काळातील कथेचे स्वरुप तिच्यातील आशय, अभिव्यक्तीची पद्धत, तंत्रविषयक ज्ञान यांचा विचार करता हा कालखंड करमणूक कालखंडाचा उपकालखंड म्हणावा लागेल. या काळात स्त्रीविषयक दृष्टिकोनात बदल झाले. "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता" हे मनोरंजन मासिकाचे ब्रीदवाक्य होते. तेच या खंडाचे घोषवाक्य होते. या काळातील स्त्रीविषयक दृष्टी अधिक विशाल व उदारमतवादी झाली.[५] या कालखंडातील दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मराठी वाचकवर्गाची झपाट्याने वाढ होऊ लागली. तिसरी गोष्ट म्हणजे, वाढत्या वाचकवर्गाची भूक भागविण्याकरीता त्या काळच्या लेखकांनी परदेशीय व परप्रांतीय भाषांतून भाषांतरित वाङ्मय आणले. भाषांतरामुळे मराठी कथा वाङ्मयात बरीच भर पडून ते पुष्ट झाले. कथेचे स्वरूप हळूहळू बदलले. ती अधिक नीटसपणे लिहिली जाऊ लागली. कथेत विविधता आली. कौटुंबिक कथेतील माजघरापलीकडे तिचे लक्ष जाऊ लागले व ती वाढीस लागली. विधवांची दुःस्थिती, सुनांचा छळ, विजोड विवाह, प्रेमविवाह, स्त्रियांचे पारतंत्र्य, हुंडा, केशवपन या सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या

४. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – २९.
५. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – ६०.

कथा लिहिल्या जाऊ लागल्या. ना. ह. आपटे, वा. ना. देशपांडे, आनंदीबाई शिर्के, गिरीजाबाई केळकर हे या प्रकारच्या कथेचे प्रतिनिधित्व करणारे प्रमुख कथाकार आहेत.

करमणूक काळात रूढ नसलेला एक नवा प्रवाह या काळात मराठी कथेस मिळाला. कॅ. गो. गं. लिमये, दिवाकर कृष्ण यांच्या विनोदी कथा, श्री. कृ. कोल्हटकर यांच्या रहस्यकथा, शि. म. परांजपे व न. चिं. केळकर यांच्या राजकीय कथा याच कालखंडात लिहिल्या गेल्या.

**यशवंत - किर्लोस्कर कालखंड (१९२६ ते १९४५)**

१९२६ पासून मराठी लघुकथेचे दुसरे आवर्तन सुरु होते. त्या साली "रत्नाकर" मासिक सुरु झाले. त्यानंतर यशवंत हे लघुकथेला वाहिलेले मासिक निघाले. त्यानंतर किर्लोस्कर मंडळींची किर्लोस्कर, स्त्री, मनोहर ही मासिके निघाली. या काळात उत्तम कथाकारांची मालिका तयार झाली. या खंडात कथेचा सर्वांगीण विकास झाला. कथेला इतर वाङ्मय प्रकारांच्या वरचे स्थान मिळाले.

या काळात इतर साहित्यप्रकारांबरोबर कथाही बदलली. तिचे आधुनिकीकरण झाले. कथेच्या विषयांमध्ये विविधता आली. मध्यमवर्गाबाहेर तिची दृष्टी जाऊ लागली. नव्या आशयापेक्षाही कथेचे स्वरूप या काळात बदलले. त्याचे मुख्य कारण कथेच्या शरीरशास्त्राकडे लेखकांची दृष्टी वळली. केवळ हौस म्हणून नाही तर आत्मप्रकटीकरणाचे साधन म्हणून लेखकांनी कथा लिहिल्या. कथेची विपुल निर्मिती, बदलता आशय, तंत्रविचार, नव्या जाणीवा या सर्व दृष्टींनी कथेत नवे आवर्तन सुरु झाले. "लघुकथेचा झालेला तांत्रिक विकास, तिला आलेला बहर, वाढती लोकप्रियता हे सारे लक्षात घेतल्यास या काळाला "लघुकथा कालखंड" म्हटल्यास वावगे होणार नाही."[६]

या काळात मराठी कथेच्या प्रांतात वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करणारे कथाकार म्हणजे ना. सी. फडके. त्यांनी कलेकरीता कला या मताचा पुरस्कार केला. कथा तंत्रशुध्द असली पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. फडके यांच्या मते लघुकथा म्हणजे, शक्य तितक्या परिणामकारक रितीने आणि शक्य तितक्या कमी पात्रांच्या साहाय्याने सांगितलेली एकच गोष्ट म्हणजे लघुकथा. अनेक सुंदर पुष्पे धारण करणाऱ्या वृक्षाची उपमा कादंबरीला साजेल पण कुठल्याशा बेटावर असे एक झाड आहे, असे म्हणतात की त्याला एकदाच एकच फूल व फळ येते. ते आले की झाडाची आयुर्मयादा संपते. त्याची उपमा लघुकथेला द्यावी लागेल.

उत्कंठा व विस्मय यांचे अनन्यसाधारण महत्त्व कथेत आहे. ही उत्कंठा अखेरपर्यंत कायम

---

६. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ - ११५.

राहाण्यासाठी कथानकाची गुंतागुंत, निरगाठ, उकल अशा क्रमाने रचना हवी. कथेचा आरंभ व शेवट महत्त्वाचे. कथेची सुरुवात आकर्षक व शेवट परिणामकारक हवा. वाचक व लेखक एका बैठकीत चांदण्यात बसले आहेत, लेखक त्यांना मौजमजेने गोष्ट सांगतो आहे असा भास उत्पन्न करणारी भाषाशैली लघुकथेला शोभते. या काळात वि. स. खांडेकर, य. गो. जोशी, वि. वि. बोकील, अनंत काणेकर, द. र. कवठेकर, श्री. म. माटे, भा. वि. वरेरकर, ना. ग. गोरे या कथाकारांनी कथालेखन केले. चिं. वि. जोशी, प्र. के. अत्रे यांनी या काळात विनोदी कथा लिहिल्या.

**प्रादेशिक कथाः– (१९३० ते १९३५)** या काळात मराठी कथेचे क्षितीज आणखी एका दिशेने रुंदावले ते म्हणजे प्रादेशिक कथांच्या निमित्ताने. बी. रघुनाथ, लक्ष्मणराव सरदेसाई, वि. स. सुखटणकर यांनी प्रादेशिक कथालेखन केले.

**स्त्रियांचे कथालेखनः–** या काळात लेखिकांच्या कथालेखनाला बहर आला. स्त्री लेखिकांची संख्या वाढली. कथांचे स्वरूप व दर्जा बदलला. उच्च शिक्षण व नवमतवादाने स्त्रीला अंतर्मुख केले. तिला स्वतःची दृष्टी आली. स्त्री कथाकारांच्या कथांमध्ये विवाहसंस्थेवरील अश्रद्धा, लग्नाला आलेले बाजारी स्वरूप, प्रौढ कुमारिकेची कुचंबणा, विवाहबाह्य प्रेम, प्रेमाचे त्रिकोण, प्रेमाच्या छटा हे विषय येऊ लागले. शांताबाई नाशिककर, कुमुदिनी रांगणेकर, कमलाबाई टिळक, पिरोज आनंदकर, आनंदीबाई जयवंत, मालतीबाई दांडेकर, विभावरी शिरुरकर, सुमती क्षेत्रमाडे, कुसुमावती देशपांडे या स्त्रियांनी कथा लिहिल्या.

**सत्यकथा – अभिरुची कालखंड (१९४५ ते १९६०)**

कथेच्या क्षेत्रातील एक नवे युगप्रवर्तन म्हणजे हा कालखंड. या काळात नवसाहित्याची निर्मिती झाली. या कालखंडाने कथेचा चेहरा मोहरा बदलला. या सुमारास मराठी कथेने एक वेगळे वळण स्वीकारले. या कालखंडात दोन जागतिक महायुद्धांचे तडाखे समाजाने अनुभवले होते. महायुद्धाचे प्रत्यक्ष परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागले नसले तरी अप्रत्यक्षपणे महायुद्धाने सर्वांना ढवळून टाकले होते. मध्यमवर्गाला महायुद्धाची झळ विशेषत्वाने जाणवली होती. युद्धजन्य दरिद्र्य, महागाई व बेकारी याने माणसाचे स्वास्थ्य नष्ट झाले होते. मध्यमवर्गाने आजवर बाळगलेली मूल्ये उद्ध्वस्त होत होती. असे असताना तत्कालीन मराठी कथा मात्र प्रेमाच्या व ध्येयवादाच्या कल्पना करण्यात गुंग झाली होती. वर्तमानातल्या स्थितीकडे जे साहित्य कानाडोळा करते ते साहित्य

फार टिकू शकत नाही. याप्रमाणे अशा स्वप्नरंजन करणाऱ्या कथांना वाचकांनी नाकारले. तसेच वर्तमानकाळाचे चित्रण करणारी नवकथा जन्माला आली. जीवनातले वेगवेगळे अनुभव नवकथेतून चित्रित होऊ लागले. कथेला एखाद्या विशिष्ट तंत्राच्या चौकटीत बसवण्यास नवकथाकारांनी नकार दिला. वास्तवता, जीवनानुभव, मानवी मनाचे हिंदोळे, तंत्रविषयक बदललेली कल्पना, कथेची भाषा ही नवकथेची वैशिष्ट्ये सांगता येतील.

गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, शांताराम, सदानंद रेगे, दि. बा. मोकाशी, श्री. ज. जोशी, द. मा. मिरासदार, शंकर पाटील यांनी कथेला एका वेगळ्या ठिकाणी नेले. वसुंधरा पटवर्धन, इंदिरा संत, सरिता पदकी, स्नेहलता दसनूरकर या लेखिकांनी स्त्रीमन हाच कथाचित्रणाचा प्रमुख विषय मानून, कथा लिहिल्या. लेखिकांची दृष्टी सखोल व व्यापक झाली. शांता शेळके, शिरीष पै, योगिनी जोगळेकर, सरोजिनी बाबर यांनी कथांमधून स्त्रीजीवन रेखाटले.

मनोविश्लेषणाला कथेत महत्त्वपूर्ण स्थान मिळवून देऊन मराठी कथेच्या इतिहासात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. परंतु पुढे केवळ मनोविश्लेषण म्हणजे कथा असा एकांगी विचार नवकथेच्या क्षेत्रात रूढ होऊ लागला. नवकथेतील प्रतिमा वाचकांना गोंधळून टाकू लागल्या. "नवकथा म्हणजे दुर्बोध कथा असे समीकरण रूढ होऊ लागले." एकोणीसशे साठनंतर उदयास आलेल्या कथाकारांच्या पिढीने मात्र ही शंका दूर केली.

**१९६० नंतरची कथा व कथाकार:-**

आशय आणि अभिव्यक्ती याबाबत कथा किती विविध व सामर्थ्यशाली रुपे घेऊ शकते हे या कालखंडातील कथाकारांनी दाखवून दिले. मराठीतील खांडेकरप्रणीत रुपककथेला एक पाऊल पुढे नेण्यात जी. ए. कुलकर्णी, दिलीप चित्रे, विद्याधर पुंडलिक, बाबुराव बागुल, आनंद यादव या कथाकारांनी महत्त्वाचा वाटा उचलला. अंधश्रद्धांनी बांधल्या गेलेल्या सामान्य माणसांच्या जीवनाचे चित्रण, माणसाला जीवनात जाणवणारा एकाकीपणा, जीवनातील असंबद्धता, अर्थशून्यता असे अस्तित्ववादी विषय या कथाकारांनी मांडले.

**ग्रामीण - दलित कथा:-**

ग्रामीण कथेचा प्रवाह १९४१ रोजी श्री. म. माटे यांच्या "उपेक्षितांचे अंतरंग" या कथासंग्रहापासून सुरू झाला. व्यंकटेश माडगूळकरांच्या ग्रामीण कथांनी ग्राम्य जीवन दर्शविले. कथा या वाङ्मयप्रकाराची लवचिकता माडगूळकरांच्या ग्रामीण कथालेखनातून वारंवार प्रत्ययाला

येते.  १९६० नंतर शंकर पाटील, द. मा. मिरासदार, आनंद यादव, चारुता सागर यांनी ग्रामीण कथेचा प्रवाह समृद्ध केला.  याच सुमारास दलित कथेचा नवा प्रवाह मराठी कथेला येऊन मिळाला. गावकुसाबाहेरील सामाजाची दुःख या कथांमधून प्रकट होऊ लागली.  दलित लेखनातील जिवंत सल मराठी कथेला आशयगर्भतेचे नवे आयाम देऊन गेला.  बाबुराव बागुल, शंकरराव खरात, केशव मेश्राम, दया पवार या कथाकारांनी विद्रोहाची प्रखर प्रेरणा आपल्या कथांमधून मांडली.

**१९७० ते १९९०:–**

१९७०च्या आसपास उदयास आलेल्या कथांमधून वेगवेगळे अनुभव वेगवेगळ्या वाटांनी व्यक्त करणारे कथाकार निर्माण झाले.  श्याम मनोहर, क. दि. सोनटक्के, ह. मो. मराठे, विलास सारंग आदी कथाकारांनी वाचकांचे लक्ष आकर्षित करून घेतले.  हा कालखंड मराठी कथेच्या दृष्टीने समृद्धीचा ठरला.  या कालखंडात कथेच्या संकल्पनेला कलाटणी देणारे किंवा कथेत क्रांतीकारक बदल करणारे काही घडले नाही.  काही प्रमाणात अभिव्यक्तिविषयक प्रयोग केले गेले.  मराठी कथेच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा असलेले 'सत्यकथा' हे मासिक ऑगस्ट १९८२ रोजी बंद पडले.  कथेच्या संदर्भात ही घटना महत्त्वाची ठरली.  एकूण वाङ्मय प्रकारांच्या दृष्टीने पाहिले तर या दशकात कादंबरी व आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारांना सर्वाधिक महत्त्व मिळाले.  कथा या प्रकारांना समांतर होती.  भारत सासणे, राजेंद्र बनहट्टी, रंगनाथ पाठारे, राजीव नाईक, एस. डी. इनामदार हे या कालखंडातील महत्त्वाचे कथाकार आहेत.

१९८० नंतर ग्रामीण कथेच्या संदर्भात नागनाथ कोतापल्ले, भास्कर चंदनशिव, आनंद पाटील, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे यांनी मोलाचा वाटा उचलला.  दलित कथेच्या संदर्भात योगीराज वाघमारे, अविनाश डोळस, वामन होवाळ इत्यादींनी उल्लेखनीय कामगिरी केली. प्रकाश संत व मिलींद बोकील हे मुख्य प्रवाहातील दोन महत्त्वाचे कथाकार आहेत.

स्त्रीच्या भावजीवनाला व तिला व्यथित करणाऱ्या दुःखाचे वर्णन स्त्री कथाकारांनी आपल्या कथांमधून मांडले.  अनुभवांना मोकळी वाट करून देऊन आपले भावविश्व स्त्री कथाकारांनी या काळात मांडलेले दिसून येते.  स्वतःच्या लेखनाचा मराठी कथेवर ठसा उमटविणाऱ्या स्त्री कथाकार या कालखंडाने दिल्या.  गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, अंबिका सरकार, उर्मिला शिरूर, प्रिया तेंडुलकर ही काही प्रातिनिधिक नावे सांगता येतील.  स्त्रीच्या नव्या जाणीवांचा थेट आणि आक्रमक अविष्कार या कथांमधून दिसून येतो.

## १.३ लघुकथा

लघुकथा म्हणजे काय आणि त्याचे घटक कोणते याविषयीची माहिती या प्रकरणात घेणे आवश्यक आहे. माणसाला व्यक्त होण्याची गरज स्वाभाविकपणे भासते. कारण आपण पाहिलेले, ऐकलेले आणि अनुभवलेले कोणाला तरी सांगावे असे त्याला वाटत असते. किंवा असे म्हणता येईल की आपले अनुभव कोणाशी तरी वाटून घ्यावेत ही त्याची आंतरिक इच्छा असते. आपल्याला समजलेल्या, जाणवलेल्या गोष्टींचा अविष्कार स्वतःसाठी व इतरांसाठी करावा अशी ओढ माणसाला स्वाभाविकपणे असते. मनुष्याला नेहमी समाजात रहायला आवडते. त्यामुळे आपल्या मनातल्या भावनांचा अविष्कार घडविण्यासाठी तो वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग करतो. चित्रे, गायन, हावभाव, शब्द, लेखन याद्वारे मनुष्य व्यक्त होतो. या सगळ्याचा उपयोग करून आपल्या जीवनात इतरांना सहभागी करून घेण्याची इच्छा माणसाला नैसर्गिकपणे असते. एकेका साधनातून एकेक कला निर्माण होते. रंग आणि रेषांच्या माध्यमातून चित्रकला निर्माण झाली. तशीच दुसऱ्याला काही सांगण्याच्या प्रवृत्तीतून लघुकथा निर्माण झाली.

प्रत्येक माणसामध्ये निसर्गतः कोणतीतरी कला असतेच. मात्र कोणत्याही कलेमध्ये पारंगत होण्यासाठी किंवा कला आत्मसात करण्यासाठी अभ्यासाची गरज असते. असेही म्हणता येईल की ती कला जाणून घेण्यासाठी त्यामध्ये समाविष्ट असलेल्या घटकांचा अभ्यास केला पाहिजे. गोष्ट सांगण्याची वृत्ती प्रत्येक माणसामध्ये उपजत असते. तरीदेखील कथा म्हणून अभ्यास करताना तिचे घटक व नियम कोणते असतील याचा विचार करायला हवा.

कथेचा विषय कोणता असावा, तिचा प्रारंभ कसा असावा, कथेचा शेवट काय करावा, स्वभावदर्शन, संवाद याद्वारे कथेची सजावट कशी करावी हे नियम कथेसाठी महत्त्वाचे ठरतात. लघुकथा लिहित असतानाच तिचे तंत्र विकसित होत गेले. श्रोत्याला गोष्टीत गोडी वाटली पाहिजे, त्याचे लक्ष सतत गोष्टीकडे असले पाहिजे, गोष्ट संपली की त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे, आनंदाचे, दुःखाचे, कृतज्ञतेचे भाव असले पाहिजेत. त्यामुळे लघुकथालेखनाची देखील काही तंत्र आहे, नियम आहेत. लघुकथेचा प्रारंभ कसा करावा? त्यात कोणत्या तरी एकाच पात्राला महत्त्व कसे द्यावे? त्या पात्राला पूरक अशी इतर पात्रे कशी निर्माण करावीत? पात्रांचे स्वभावचित्रण कसे करावे? सत्याबरोबर कल्पनेतील देखील कसे सांगावे? या मांडणीवर कथा अवलंबून असते. आपली गोष्ट लोकांनी ऐकावी यासाठी तिच्यात रंजकता आणण्याचे काम कथाकार करत असतात.

या सगळ्याचा विचार करत असतानाच लघुकथा म्हणजे नेमके काय हे पाहिले पाहिजे.

ना. सी. फडके यांनी लघुकथा म्हणजे काय? हे सांगताना म्हटले आहे, "कमीत कमी पात्रे आणि कमीत कमी प्रसंग वापरून, थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटवणारी हकीकत म्हणजे लघुकथा होय." एकसंस्कारित्त्व हे लघुकथेचे व्यवच्छेदक लक्षण या व्याख्येत त्यांनी सांगितले आहे.[७]

नवकथेचा पुरस्कार करणारे गंगाधर गाडगीळ यांनी फडके यांच्या या तंत्रविचाराला विरोध केला आहे. ते म्हणतात, "तंत्राविषयीची यांत्रिक कल्पना चुकीची आहे. प्रत्येक कथेचे तंत्र स्वतंत्र असते. तिच्या विषयाप्रमाणे तिचे स्वरूप ठरते. कथा आणि तंत्र यांचे नाते यांत्रिक नसून, प्रकृती आणि शरीर यांच्या नात्याप्रमाणे आहे." "It is not mechanical but organic."[८]

कथनात्मकता किंवा निवेदनात्मकता हे कथात्म साहित्याचे एक व्यवच्छेदक लक्षण आहे. गोष्टीचे मुख्य घटक, गोष्ट आणि संहिता याचा परस्परसंबंध, कथात्म कार्य, संरचना यांचा समावेश यामध्ये होतो. कथात्म साहित्यात घटनांची विशिष्ट प्रकारे संघटना केली जाते. या संघटनेतूनच कथानक आकार घेत असते. कथात्म साहित्यातील घटना कल्पित विश्वातील देखील असतात. कथेमध्ये काल्पनिक घटनांच्या अनुक्रमाला विशेष महत्त्व असते. त्यामुळे कथाकथन हे वृत्तपत्र, इतिहास, दैनंदिनी, आत्मचरित्रे यामधील वास्तविक सत्य घटनांहून वेगळे असते.

## १.४ कथेचे घटक

कथेचे घटक पुढीलप्रमाणे सांगता येतील -

१) **कथानक (प्लॉट):-**

गोष्ट आणि कथानक यामध्ये फरक आहे. गोष्ट ही सरळ रेषेसारखी असते. तिच्यात एका घटनेनंतर दुसरी घटना असा क्रम असतो. कथानकात काळस्थळासंबंधी असा नियम पाळला जातोच असे नाही. कथानक ही एक रचना असते. तिला सुरुवात, मध्य व शेवट असतो. कथानकाला विविध विभागांमध्ये रचनात्मक ऐक्य असले पाहिजे.

गंगाधर पाटील यांनी यासाठी जे विवेचन केले आहे ते महत्त्वाचे वाटते. याठिकाणी ई. एम. फॉर्स्टरने मांडलेल्या स्टोरी आणि प्लॉट या संकल्पनांचा तुलनात्मक विचार करता येईल. त्याच्या मते "राजा मेला आणि नंतर राणी मेली." ही झाली गोष्ट. परंतु "राजा

---

७. लघुकथालेखन मंत्र व तंत्र, ना. सी. फडके, अंजली प्रकाशन लि., मुंबई, १९५२, पृ. ३७

८. खडक आणि पाणी, गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६, पृ. ५७

मेला आणि त्या दुःखाने राणी मेली" हा झाला प्लॉट.[१] गोष्टीमध्ये घटनांची गुंफण ही केवळ कालक्रमानुसार झालेली दिसते. मात्र प्लॉटमध्ये घटनांची गुंफण ही कालक्रम आणि कार्यकारणभाव या दोन्ही तत्वांनुसार झालेली दिसते. गोष्टीमध्ये घटना एकामागोमाग एक का घडतात? याचे कारण दिलेले नसते. प्लॉटमध्ये याचे कारण दिलेले असते.

२) **कथनरूपः–**

कथन म्हणजे सांगणे. कोणीतरी एक निवेदक शब्दांच्या माध्यमातून कोणत्यातरी श्रोत्याला कोणतीतरी कथा विशिष्ट दृष्टीने सांगत असतो. अशा सांगण्यातून जे आकाराला येते ते कथनरूप.

एकामागून एक या क्रमाने येणाऱ्या कल्पित घटनांच्या अनुक्रमाचे निवेदकाने विशिष्ट कृती, दृष्टी व कृतीने केलेले शब्दरूप निवेदन म्हणजे कथनरूप साहित्य असे म्हणता येईल.

कथेविषयी असे सुद्धा सांगता येईल, काही पात्रे, स्थिती आणि प्रसंग यांचे कथन म्हणजे कथा.

३) **घटनाः–**

घटना आणि पात्रे परस्परांना घडवित कथानकाची उभारणी करतात. पात्रे आपल्या कृतींनी घटना घडवितात. तर घटना पात्रांना घडवितात. घटना व पात्रे परस्पर संबंधित असतात.

माणसांच्या कृतीतून निर्माण झालेल्या घटनांना मानवी घटना म्हणतात. माणसांच्या कृतिरूप घटनांना बाह्यघटना म्हणतात. कृतीतून घडणाऱ्या घटना बाह्यविश्वाशी, समाजाशी संबंधित असतात. आंतरिक संबंधातून उद्भवणाऱ्या मनोव्यापारांना मानसिक घटना म्हणतात. या घटना जाणीव व नेणिवेच्या स्तरावर घडतात. इच्छा, प्रेरणा, स्वप्न, फँटसी, दृष्टांत यांचा यामध्ये अंतर्भाव असतो.

अशा प्रकारच्या घटनांची गुंफण करून कथानकाची रचना होत असते. "कालक्रमाच्या तत्वावर आधारलेल्या घटनांची गुंफण म्हणजे गोष्ट." कालक्रम, कार्यकारणभाव, संभवनीयता या तत्वांनुसार घटनांची गुंफण झाली असेल तर त्याला कथानक म्हणता येईल. कथेमध्ये प्रधान व गौण अशा दोन प्रकारच्या घटना घडतात. प्रधान किंवा मुख्य घटनांमुळे कथानकाला विशिष्ट प्रकारची गती व दिशा दिली जाते. प्रधान घटनेने केलेल्या परिवर्तनात गौण घटना पूरक असा अर्थ भरतात.

---

१. कथनमीमांसा, गंगाधर पाटील, अनुष्टुभ, दिवाळी, १९९१, पृ. ९८

४) **पात्रः–**

नाट्यात्म अथवा निवेदनात्मक साहित्यकृतीतील व्यक्ति म्हणजे पात्र.

कथाकार व्यक्तीच्या वृत्ती, कृती, उक्ती, स्मृती विचार, कल्पना, भावना, संवेदना, विचारप्रणाली, जीवनपद्धती आदींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची एक शब्दरूप प्रतिमा कथेत निर्माण करतो. व्यक्तीच्या या शब्दरूप प्रतिमेला पात्र असे म्हटले जाते.

कथेमध्ये प्रत्येक पात्राला स्वत्व लाभलेले असले तरी पात्र हे प्रत्यक्षातील व्यक्ती नसते. कथेला साकार करणे हे त्याचे कथात्म कार्य असते.

कथालेखक पात्रांच्या वृत्ती, कृती, उक्ती इत्यादी क्रिया या व्यापारांचे चित्रण, वर्णन, निवेदन, संवाद आदी प्रकारांच्या साहाय्याने शब्दांच्या माध्यमातून करतो. तो पात्रांच्या शारीरिक, मानसिक व सामाजिक अंगांचे चित्रण कथेत करतो. त्या पात्राचा स्वभाव ओळखू येण्यासाठी कधी तो सुष्ट, कधी दुष्ट, कधी कामसू तर कधी कामचुकार अशी विशेषणे जोडतो.

सुधा जोशी यांच्या मते, कथा–कादंबरीमध्ये शब्दांतून मूर्त केलेली किंवा व्यक्त केलेली एखाद्या व्यक्तीची प्रतिमा म्हणजे पात्र. व्यक्तीच्या बाह्य व अंतरंगातून पात्राची विशिष्ट प्रतिमा तयार होते. उदा. एखाद्या व्यक्तीचे चालणे, बोलणे, स्वभावविशेष, तिच्या वृत्ती–प्रवृत्ती, तिची जीवनदृष्टी, विचारसरणी या व अशा अन्य बाबींचा यामध्ये समावेश होतो.[१०]

विशिष्ट साहित्यकृतीच्या संदर्भातच पात्राला अस्तित्व प्राप्त होते. त्याची अर्थपूर्णता या संदर्भातच ठरते. साहित्यातील पात्राला प्रत्यक्षातील माणसाप्रमाणे स्वतःचे असे वेगळे व्यक्तिमत्त्व, भावविश्व असते. अर्थातच त्याला प्रत्यक्षातील व्यक्तीप्रमाणे स्वतंत्र अस्तित्व नसते.

६) **वातावरणः–**

कथा–कादंबरीत एक विशिष्ट प्रकारचे कल्पित विश्व उभारले जाते. या विश्वात पात्रे विशिष्ट वातावरणात कृती करतात. या घटना विशिष्ट स्थळी व विशिष्ट काळी घडतात. प्रसंगांच्या गुंफणीमधून विशिष्ट वातावरणात कथा निर्माण होते. वातावरणाला पात्रांच्या व कथेच्या घडणीत अर्थपूर्ण स्थान असते.

कित्येकदा एखादे निसर्गदृष्य, वादळ, रात्र, दिवस, एखादे घर, खोल्या, दिवाणखाना, फर्निचर हे कथेत प्रतिकात्मक अर्थ निर्माण करतात. कथा–कादंबरीतील स्थळ, प्रदेश

---

१०. कथाः संकल्पना आणि समीक्षा, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०००, पृ. ५

कल्पनेतून निर्मिलेले असतात. या वर्णनामध्ये सामाजिक, मानसिक व कल्पकतापूर्ण अर्थाची गुंफण असते. कथेतील जागा, वातावरण कोणत्यातरी विचारप्रणालींनी, जीवनमूल्यांनी युक्त असतात.

७) **निवेदनः-**

कथात्म साहित्यामध्ये घडणाऱ्या घटनांचे, घटनांच्या मालिकेचे कथन वा निवेदन होत असते. निवेदक ही कथाकाराची निर्मिती असते. निवेदनातून कथासंहिता साकारत असते. निवेदकाच्या मार्फत कथालेखक कथा सांगत असतो. निवेदकाचा दृष्टीकोन, त्याचे विचार यांमधून कथा विकसित होते. निवेदक त्रयस्थ बुद्धिने कथेतील पात्र, घटना, स्थळे यांच्याकडे पाहतो. कथेतील प्रत्येक निवेदकाला स्वतःचा असा एक दृष्टीकोन असतो. निवेदक कथेकडे विशिष्ट दृष्टीने पहात असतो. कथेत घडणाऱ्या घटना तो त्याच्या नजरेतून सांगतो. त्याने पाहिलेली कथा तो वाचकाला सांगतो. निवेदकाच्या दृष्टीकोनाचा त्याच्या कथनपद्धतीवर परिणाम होतो.

निवेदक कथेकडे पाहतो त्याचे तीन दृष्टीकोन पुढीलप्रमाणे सांगता येतील -

१) निवेदक विशिष्ट जागी बसून किंवा उभे राहून घटनेकडे पाहतो. निवेदक कथेचा भाग कधी मंद तर कधी द्रुत गतीने सांगतो. त्यामुळे कथानकाची गती कमी जास्त होते. या कालसापेक्ष दृष्टीकोनाला दिक्कालात्म दृष्टीकोन म्हणतात.

२) काही वेळा निवेदक पात्र, प्रसंग, वस्तू यांकडे समरसून पाहतो. अशा वेळी त्याचे निवेदन अंतर्लक्षी होते. निवेदक तटस्थपणे, अलिप्तपणे पाहतो त्यावेळी निवेदन बहिर्मुख होते.

३) निवेदकाला स्वतःची मूल्यदृष्टी, विचारप्रणाली असते. त्याच्या विशिष्ट प्रकारच्या श्रद्धा असतात. एका विशिष्ट विचारप्रणालीनुसार निवेदक कथा पुढे नेतो. अशा प्रकारच्या दृष्टीकोनाला विचारप्रणालीपर दृष्टीकोन म्हणतात.

या तीन प्रकारच्या दृष्टीकोनातून निवेदक वाचकाला किंवा श्रोत्याला सांगत असतो. त्यासाठी विशिष्ट भाषेचा तो उपयोग करतो. कधी बोलीभाषेचा तर कधी प्रमाणभाषेचा उपयोग केला जातो. निवेदकांमध्ये स्त्री आणि पुरुष यांपैकी कोण निवेदन करीत आहे यावर निवेदकाची भाषा अवलंबून असते.

कथा, कादंबऱ्यांमधील निवेदक सर्वसाक्षी असतो. सर्व घटना, प्रसंग, पात्रे त्याला दिसत आहेत अशा पद्धतीचे कथन तो करतो. त्या निवेदकाला पात्रांच्या मनातील भावना, विचार, कल्पना कळतात. अशा निवेदकाला तृतीयपुरुषी निवेदक म्हणतात.

काही निवेदक पात्रांच्या मनातील भावना, विचार यांविषयी थोडे थोडे सांगत असतो. अलिप्तपणे, तटस्थपणे वर्णन करतो.

निवेदकाच्या या अनुभव घेण्याच्या व वाचकाला विशिष्ट पद्धतीने सांगण्याच्या काही पद्धती पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **वर्णनः–**

कथेमध्ये स्थलांचे, प्रदेशांचे, वस्तूंचे चित्रण केले जाते. या चित्रणाला वर्णन असे म्हणतात. उदाहरण द्यायचे झाले तर राजन खान यांच्या 'एका अटीचा संसार' या दीर्घकथेचे देता येईल. यामध्ये निवेदक म्हणतो, "पाऊस सलग लागून राहिला होता. आभाळ निरपायचं नाव घेत नव्हतं. सगळं ओलं ओलं. सर्द, भिजट. आणि कायम घुमत राहाणारा पावसाचा सरसर आवाज. म्हातारा घराच्या मागच्या पडवीत असलेला. त्याच्या मागंच दाराच्या आत म्हातारी बसलेली. नजर एकटक म्हाताऱ्याच्या अंगावरून पडवीच्या मागच्या मोकळ्या रानात लावलेली. पण काहीच पाहत नसल्यागत कोरी."[११]

२) **निवेदनः–**

लेखक आपल्या आशयानुसार त्याला अनुरूप अशी किंवा त्याला हवी तशी निवेदकाची एक जागा निर्माण करतो. कथाबाह्य निवेदक व कथांतर्गत निवेदक हे निवेदकाचे दोन ठळक प्रकार दिसतात. कथाबाह्य निवेदकालाच तृतीयपुरुषी निवेदक असेही संबोधले जाते. जेव्हा निवेदक म्हणून कथेतील एखादी व्यक्तीरेखा काम करीत असते तेव्हा प्रथमपुरुषी निवेदन होते. यालाच पात्रमुखी निवेदन म्हटले जाते.

तृतीयपुरुषी निवेदकासाठी राजन खान यांच्याच 'एका अटीचा संसार' या दीर्घकथेचे उदाहरण सांगता येईल. यामध्ये निवेदक कथा पुढे नेण्यासाठी म्हणतो, "म्हातारा सुन्न झाल्यासारखा बाहेर बघत राहिला. तसाच तगमगत बसून राहिला तो. आपण बायकोला तसं बोलायला नको होतं. असा अपराधी भाव मनात आणत."[१२]

प्रथमपुरुषी निवेदकासाठी अशा बगे यांच्या "मारवा" या कथेचे उदाहरण सांगता येईल. आबा देशपांडे हे मारव्याचे पारंपारिक रूप आहेत. तर त्यांचा मुलगा रघुनाथ ही त्यातील प्रयोगशीलता. परंपरागत वारसा नव्या चौकटीत बसवण्याचा वडील आणि मुलाचा संघर्ष या कथेत अनुभवायला मिळतो. नवीनता आवडत असूनही मनाच्या संस्कारांमुळे आबांचे अस्वस्थ मन या कथेत रेखाटले आहे. या कथेत आबा हे पात्र निवेदकाची

११. एका अटीचा संसार, राजन खान, मनोविकास प्रकाशन, १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ ९

१२. एका अटीचा संसार, राजन खान, मनोविकास प्रकाशन, १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ २२

भूमिका पार पाडते.

३) **संवादः–**

कथाकार निवेदनाद्वारे कथानक पुढे नेत असतो. तो निवेदनातून पात्रनिर्मिती करत असतो. व्यक्तीच्या कृतीतून तिचे व्यक्तित्व दिसून येते. तिचा स्वभाव लक्षात येतो. पात्रांच्या तोंडी लेखकाचे विचार संवादाच्या माध्यमातून उमटतात. या प्रकारात स्वगत, संवाद, भाषण, प्रत्यक्ष भाषण आदींचा समावेश होतो. कथेची संहिता तयार करण्यात संवादांचा खूप मोठा वाटा असतो. संवाद पात्रांचे स्वभावविशेष चित्रित करतात. संवादातून प्रत्यक्ष पद्धतीने पात्राचे चित्रण साधले जाते. उदाहरणार्थ – आशा बगे यांच्या 'महावस्त्र' या कथेतल्या म्हाताऱ्या स्वयंपाक्याच्या तोंडचे संवाद पाहिले तर, त्याची त्या वेळची मनःस्थिती लक्षात येते. घरंदाज, श्रीमंत असे देशपांडे कुटुंब. २५ माणसांना पोसणारे असते. काळाबरोबर वाडा पांगतो. मुले पांगतात. काही आपापले बंगले बांधतात. नवी पिढी येते; पण त्या वाड्याशी सुख–दुःख बांधलेला, स्वतःचा संसार न करणाऱ्या मोरेश्वर स्वयंपाक्याचे मन रिकामे होऊन जाते. तेव्हा तो म्हणतो, "आता आमचे काय उरले? देवघरात ठेव खुंटीवर ठेवलेली धाबळी नी आम्ही सारखेच."[१३] छोट्या छोट्या गोष्टीतून हा मोरेश्वर आपल्या मनात मानवी संबंधांचे वस्त्र विणत जातो.

४) **भाषाशैलीः–**

कुटुंबजीवन आणि समाजजीवन यांच्या अनुषंगाने लेखकाचे अनुभवविश्व बदलते. त्याप्रमाणे कथेची भाषाही बदलते. लेखकाला प्रत्यक्ष जीवनातूनच लेखनाची किंवा कलानिर्मितीची प्रेरणा मिळते. त्यामुळे व्यक्तीच्या भोवतीची परिस्थिती जशी बदलते तशी तिची दृष्टी बदलते. साहजिकच याचा तिच्या लेखनावर परिणाम होतो.

१९७५ नंतर भोवतालची परिस्थिती बदलली. स्त्रीवादाच्या ओळखीमुळे पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांची केलेली कुचंबणा ठळकपणे जाणवू लागली. त्यामुळे पूर्वीपेक्षा धारदार व उपरोधिक भाषेतून लेखन होऊ लागले. स्त्रियांच्या लेखनातून परंपरांचे जोखड कसे जाचक आहेत याचे वर्णन उघडपणे येऊ लागले. पात्रांच्या सांस्कृतिक परिसरानुसार, त्यांच्या व्यवसायानुसार, वयानुसार त्यांची भाषा बदलते. उदाहरणार्थ सानिया यांच्या कथांमधील नायिका हळव्या, आत्ममग्न आणि रोमँटिक आहेत. आधुनिक वळणाच्या उच्चभ्रू स्त्रियांच्या वेदना त्यांनी त्यांच्या कथांमधून मांडल्या आहेत.

१३. महावस्त्र, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृष्ठ १२०

**लघुकथेचे गुणः-**

"कमीत कमी पात्र आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटवणारी हकीकत म्हणजे लघुकथा होय."[१४]

लघुकथेच्या विषयांमध्ये विलक्षण वैचित्र्य आलेले आहे. लघुकथांचे अनेक प्रकार रूढ झाले आहेत. लिहिणाऱ्याच्या मानसिक अवस्थेपासून, वाचकांच्या अपेक्षेपर्यंत बदल होत आहेत. त्यामुळे कथासुद्धा अमुक एका साच्यात बांधता येऊ शकत नाही.

असे असले तरी ना. सी. फडके यांनी 'लघुकथा तंत्र आणि मंत्र' या पुस्तकात कथेविषयी म्हटले आहे, "साफसूफ, नेटकी व आकर्षक लघुकथा लिहिणे सोपे नाही. एकंदर जीवितप्रवाहाशी लघुकथेचा प्रसंग एकरूप झाल्यासारखा भासावा. एका लहानशा कथेमध्ये मानवी जीवनाचे दर्शन घडावे."[१५]

ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणे हा लघुकथेचा महत्त्वाचा गुण आहे असे ना. सी. फडके यांचे म्हणणे आहे. तसेच चित्तवेधकता हा कथेचा महत्त्वपूर्ण गुण आहे. कथा चित्तवेधक असलीच पाहिजे. कथेमध्ये जीवनातला लहानसा खंड, एकच प्रसंग, एकच अनुभव किंवा एकच कल्पना मांडली जाते. कथेची गती घाईची असते. कारण कमीत कमी शब्दात वाचकांपर्यंत जीवनानुभव नेण्यासाठी ते आवश्यक ठरते. लघुकथेत सांगितलेल्या गोष्टींच्या मागे कितीतरी गोष्टी असतात.

लघुकथेच्या संदर्भात प्रा. म. न. अदवंत यांनी म्हटले आहे, "लघुकथेच्या मंदिराची जडणघडण अद्याप चालू आहे. कुणी या मंदिराचा पाया घातला, कुणी भिंती उभारल्या, कुणी तिचा विस्तार केला, कुणी तिची दालने सजवली. तिच्या मंदिराचे काम अद्याप चालू आहे."[१६]

## १.५ कथेचे प्रकार

कमीतकमी पात्रे आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने सांगितलेली हकीकत म्हणजे कथा. अशी कथेची सर्वसामान्य व्याख्या करता येईल.

कथेतील पात्रे, परिसर, व्यक्तिरेखा आणि प्रदेश या बाबींवर ही कथा कोणत्या प्रकारची आहे हे सांगता येते. अशा या कथेचे ढोबळमानाने काही प्रकार पुढीलप्रमाणे

---

१४. लघुकथालेखन तंत्र आणि मंत्र, ना. सी. फडके, अंजली प्रकाशन मुंबई, ऑगस्ट १९५२, पृ. क्र. ४०

१५. लघुकथालेखन तंत्र आणि मंत्र, ना. सी. फडके, अंजली प्रकाशन मुंबई, ऑगस्ट १९५२, पृ. क्र. ३७

१६. प्रदक्षिणा खंड १, म. ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९४१, पृष्ठ २०१

सांगता येतील.

**रूपक कथा:–**

वि. स. खांडेकर यांनी मराठी वाङ्मयात रूपककथेच्या रूपात एक नवी भर घातली. इसापनिती व पंचतंत्र या कथांच्या धर्तीवर पण आधुनिक काळाला अनुरूप अशा आशयाची रूपककथा त्यांनी मराठीत रूढ केली. "कलिका" व "मृगजळातील कमळ" या दोन कथासंग्रहांमध्ये खांडेकरांच्या उत्कृष्ट अशा रूपककथांचा समावेश आहे. या रूपककथांमधून सूचकता व काव्याच्या पद्धतीने तत्वप्रतिपादन व जीवनदर्शन घडविण्याचे कौशल्य दिसून येते. मराठी कथेला दिलेली वैशिष्ट्यपूर्ण देणगी म्हणजे रूपककथा होय.

**पौराणिक कथा:–**

माणसाला देवाच्या किंवा धर्माच्या नावाखाली सदाचरणाचे धडे शिकविण्यासाठी पौराणिक कथांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. चांगली गोष्ट समजावून सांगण्यासाठी देवादिकांची उदाहरणे असलेल्या कथा सांगितल्याने माणसाच्या वर्तनात लगेच बदल घडतो. कारण देव, धर्म या गोष्टींना सामान्य माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण स्थान आहे. रामायण, महाभारतातील कथा आजही समाजाला प्रेरणादायी ठरतात. थोड्या वेगळ्या धाटणीच्या अशा या कथा रोजच्या जीवनात मार्गदर्शक ठरतात. राम, कृष्ण, देवी देवता यांच्या कथा योग्य त्या मार्गाचा अवलंब करावा अशी शिकवण देतात. शिवलिलामृतासारख्या धार्मिक ग्रंथांमध्ये ओवीरूप पौराणिक कथेचे दर्शन घडते. चातुर्मासातल्या कहाण्या, पौराणिक ग्रंथसंपदा यांमधून पौराणिक कथेची झलक पहायला मिळते. उद्‌बोधक, प्रेरक अशा पौराणिक कथा आपले महत्त्व आजही टिकवून आहेत.

**विनोदी कथा:–**

या कथांमध्ये वाचकाचे निखळ मनोरंजन हा मुख्य उद्देश असतो. तसेच हसत हसत काही प्रबोधनात्मक गोष्टी वाचकाच्या गळी उतरविण्याचा प्रयत्नदेखील काही विनोदी कथांमध्ये केला आहे. माणसाचा तऱ्हेवाईकपणा, त्याचे ढोंग, दुटप्पी वृत्ती, समाजजीवनातील विसंगती यावर विनोदी कथांची उभारणी केली जाते. प्रसंगनिष्ठ व स्वभावनिष्ठ विनोद, कोट्या करणे, कल्पनाविलास, अतिशयोक्ती, उपरोधिकता हे विनोदी

कथेचे मुख्य घटक आहेत. विनोदी कथा हलकेच चिमटे घेते. कधी पोट धरून हसायला लावते तर कधी हसवता हसवता अंतर्मुख करते. इतर कथांच्या मानाने विनोदी कथांची निर्मिती फार मोठ्या प्रमाणावर झालेली दिसून येत नाही.

**विज्ञान कथा (अद्‌भूत कथा):-**

मराठी कथेत बऱ्याच कथाप्रकारांच्या प्रयोगामधला हा महत्त्वपूर्ण प्रकार आहे. विज्ञानकथा, गूढकथा, अद्‌भूतकथा किंवा भयकथा या वाचकाला अद्‌भूत दुनियेत घेऊन जातात. विज्ञान कथांमधून विज्ञानाने घेतलेली गरुडझेप दाखवली गेली आहे. तसेच समाजातील अंधश्रद्धा, भ्रामक समजुती व तथाकथित चमत्कारांवर या कथा बेतल्या गेल्या आहेत. समाजामध्ये वैज्ञानिक दृष्टी विकसित करणे हा या कथांमागील मूळ उद्देश आहे. विज्ञानकथा उद्‌बोधक असते. सध्या माहिती असलेल्या विज्ञानावर किंवा स्वतःच्या कल्पनाशक्तीने त्यात भर घालून उद्याच्या विज्ञानाचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला असतो. जयंत नारळीकरांच्या "विज्ञानकथा", नारायण धारपांच्या व पंडित विद्यासागर यांच्या "भयकथा" व रत्नाकर मतकरींच्या "गूढ कथा" साहित्यिक साज चढवून लिहिलेल्या आहेत. पकड घेणारे कथानक, वातावरण निर्मिती, पात्ररचना, कलात्मक भाषाशैली या सर्व निकषांवर या कथा परिपूर्ण आहेत.

**ग्रामीण कथा:-**

ग्रामीण जीवनाचे, निसर्गाचे, रीतीरीवाजांचे, रूढींचे, परंपरांचे दर्शन ग्रामीण कथेमध्ये होते. ग्रामीण जीवनात निसर्गाला एक खास स्थान आहे. या कथांमध्ये निसर्ग हा एखाद्या प्रमुख पात्रासारखा असतो. तो जणू माणसाचे नशीब घडवतो. या कथा निसर्ग व मानवी जीवन अशा दोघांच्या आहेत. व्यंकटेश माडगूळकरांनी "माणदेशी माणसे" या कथासंग्रहातून दर्जेदार ग्रामीण कथेचे चित्रण केले आहे. त्यांनी दाखवून दिलेल्या दिशेने अनेक नवीन लेखकांनी ग्रामीण कथेचा विकास केला. माणदेशी माणसाबरोबरच कोकण, खानदेश, वऱ्हाड, मराठवाडा या प्रदेशातील ग्रामीण जीवन कथांमधून बोलू लागले. एक वेगळाच रंग-ढंग व आपापल्या प्रदेशामधील मातीचे जीवन या कथांमधून प्रकट झाले. ग्रामीण कथा ही ग्रामीण जीवनाशी जिव्हाळा दाखविते. खेड्यातील पारावर, चावडीवर, गावगाड्यात, देवळात, नदीच्या काठांवर, विहिरीजवळ, सणसमारंभात ही कथा आपल्याला घेऊन जाते. भोळी भाबडी, लबाड, गरीब, लोभी, कष्टाळू, कामचोर,

बेरकी, दुष्ट माणसे या कथांमध्ये भेटतात. त्या प्रदेशातील माणसे कथेतील पात्रे आहेत. त्यांच्या जीवनाची भाषा या कथेची भाषा आहे.

**दलित कथाः–**

अस्तित्ववाद व नवअनुभववाद यांच्यामध्येच अभिव्यक्तीवादी व निराशावादी साहित्याची निर्मिती होत होती. सामाजिक बांधिलकीने आणि नवसमाज निर्मितीच्या ईर्षेने पेटलेल्या साहित्याची मुहूर्तमेढ म्हणजे दलित कथा साहित्य. प्रस्थापित समाज, त्याच्या परंपरा, रूढी, त्यांचे साहित्य या सर्वांविरुद्ध नव्या दमाचा विद्रोही तरुण लेखकवर्ग पुढे आला. एक नवी साहित्यिक चळवळ सुरू झाली. बाबासाहेब आंबेडकरांच्या दलित मुक्ती आंदोलनापासून प्रेरित होऊन दलित साहित्याचे नवे पर्व सुरू झाले. या पार्श्वभूमीवर या नव्या जाणिवा व प्रवृत्तींचे दलित कथांमधून दर्शन घडते. नव्या जाणिवेच्या दलित कथेचा उद्रेक म्हणजे बाबुराव बागुलांची कथा. अणाभाऊ साठे, शंकरराव खरात, बंधुमाधव इत्यादी लेखकांचा जुना वारसा दलित कथेला आहे. दलित कथेने मराठी कथाक्षेत्र व्यापक केले आहे. आजवर उपेक्षित असलेल्या जीवनाचे दर्शन घडविले आहे. दलित जीवनाची कवाडे उघडी करून तळागाळातील लोकांचे दाहक, विदारक जीवन समाजाला घडविले आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या मूल्यांवर प्रहार करून समाजजागृती केली. दलित कथेतल्या सर्व लेखकांनी दलितांचे जीवन प्रत्यक्षपणे अनुभवल्यामुळे ते लिखाण जिवंत वाटते. ते कल्पनेवर आधारित नसून वास्तवता दर्शविते. आजवर मराठी कथेने उपेक्षिलेल्या दलितांच्या मांग-महारवाड्या, वस्त्या, शहरांमधील त्यांच्या कॉलन्या, नगर यांचे खरे जीवनदर्शन घडविले आहे. दलित लेखकांनी नव्या जाणिवेने प्रेरित होऊन लेखन केले आहे. आपण भोगलेले दुःख व नवीन समाज स्थापण्यासाठी ईर्षा त्यांच्या कथांची उद्दिष्टे आहेत. दलित कथांमधून माणसाच्या मूलभूत गरजांबाबत दैना, अखंड दारिद्र्य, वतनदारीची गुलामगिरी, स्त्रियांची बेअब्रू, अपमान, अवहेलना हे विषय हाताळलेले दिसून येतात.

**लोककथाः–**

परंपरेने बोलीभाषेत असलेली कथा म्हणजे लोककथा होय. लोकसाहित्याप्रमाणेच लोककथा लोकनिर्मित असते. एखादी प्रमुख घटना किंवा प्रसंग लोकांच्या मनावर, बिंबलेला असतो, तो लोककथेमध्ये प्रचलित होत जातो. या कथांसाठी बहुधा कोणत्याही

प्रकारचे पुरावे नसतात. तसेच या कथा पूर्वी कुठे लिहिलेल्या स्वरूपातही आढळत नाहीत. कथाकार आपल्या माहितीप्रमाणे किंवा आवडीप्रमाणे बदल करत जातो. त्यामुळे मूळ कथेपासून अनेक उपकथा तयार होतात. तत्कालीन समाजातील चालीरीतींचे वर्णन लोककथेमध्ये येते. भौगोलिक स्थानानुसार लोककथांमध्ये निसर्गाचे वर्णन आढळते. या कथा उपदेशात्मक व धार्मिक स्वरूपाच्या असतात.

## १.६ अन्य साहित्यप्रकारांचा अभ्यास

कथेने इतर सर्व साहित्यप्रकारांमध्ये तिचे वेगळेपण सिद्ध केले आहे. साहित्याचे इतर सर्व प्रकार महत्त्वपूर्ण आहेतच. मात्र “कथा” हा साहित्यप्रकार माणसाच्या रोजच्या जगण्याशी निगडीत आहे. कारण कथेचे वाचन, श्रवण, लेखन ही माणसाची स्वाभाविक आवड आहे. कथा हा अत्यंत प्राचीन असा साहित्यप्रकार आहे.

**कादंबरी:–**

एक कथात्मक साहित्याचा प्रकार म्हणून कादंबरी आणि कथा यांचे जवळचे नाते आहे. म्हणूनच कादंबरी या साहित्यप्रकाराविषयी थोडे जाणून घेणे आवश्यक आहे.

अधिक लांबीच्या काल्पनिक कथा असलेल्या गद्यलेखनाला कादंबरी म्हणतात. मराठी साहित्यातील कादंबऱ्यांनी साहित्याचा ठेवा समृद्ध केला आहे. कथेच्या मानाने कादंबरीचा विस्तार मोठा असतो. कादंबरीमध्ये व्यक्तीच्या आयुष्याचा कित्येक वर्षांचा मोठा भाग दाखविला जातो. कादंबरीमध्ये अनेक वर्षे, स्थळे, पात्रे यांचा पसारा घालता येतो. कादंबरीला घवघवीतपणा असतो. जीवनाचा एक विस्तीर्ण पट कादंबरीमध्ये दाखविता येतो.

कादंबरी हा शब्द भारतात सातव्या शतकात होऊन गेलेल्या बाणभट्ट नावाच्या कवीने लिहिलेल्या “कादंबरी” या ग्रंथनामावरून आला. हा ग्रंथ म्हणजे जगातली पहिली कादंबरी. “यमुनापर्यटन” ही बाबा पदमनजी यांनी लिहिलेली कादंबरी आधुनिक भारतीय भाषांमधील पहिली कादंबरी समजली जाते. विनायक कोंडदेव ओक यांनी लिहिलेली “शिरस्तेदार” ही पहिली छोटी कादंबरी आहे. बाबा पदमनजी यांच्या “यमुनापर्यटन” या कादंबरीत व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधातले अनेक प्रश्न मांडले आहेत. तत्कालीन विधवांच्या प्रश्नांवर ही कादंबरी भेदक प्रकाश टाकते. हिंदू विधवांना ज्या दिव्यातून जावे लागत असे त्याचे चित्रण या कादंबरीत करण्यात आले आहे. १८६० ते १९२० या काळात मराठी कादंबऱ्यांची संख्या लक्षणीय वाढली. याच काळात

इंग्रजी वाङ्मयाशी परिचय झाला. त्यामुळे रुपांतरे - भाषांतरे या माध्यमातून इंग्रजी साहित्य मराठीत आणण्याचा प्रयत्न केला गेला. कादंबरीच्या प्रयोजनासंबंधी आणि कादंबरीलेखनाच्या पद्धतीसंबंधी स्वतःचे असे खास व ठाम तत्वज्ञान असलेले ना. सी. फडके हे मराठीतील अतिशय लोकप्रिय कादंबरीकार आहेत. फडके यांचेच समकालीन कादंबरीकार वि. स. खांडेकर यांनीदेखील वेगवेगळ्या विषयांची, हाताळणी केली. १९३० नंतर नवमतवादी विचारांचा पुरस्कार करणाऱ्या कादंबऱ्या व कादंबरीकार निर्माण झाले. स्त्री कादंबरीकारांचा जन्म याच काळातला. काशिताई कानिटकर, कमलाबाई बंबेवाले, इंदिराबाई सहस्रबुद्धे, जानकीबाई देसाई, शांताबाई नाशिककर आदींनी आपल्या कादंबऱ्यांमधून स्त्रीच्या दुःखांना आणि तिच्यावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. या कादंबऱ्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांबाबत प्रगतीशील विचारांचे लोण सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचवले. १९५० नंतर मराठी कादंबरीला प्रादेशिक कादंबरीच्या माध्यमातून नवी दिशा मिळाली. १९५० - ६५ या काळात अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी वेगळेच अनुभवविश्व व सामाजिक प्रश्न घेऊन आली. १९६० नंतरची कादंबरी वास्तवाशी अतूट नाते सांगणारी व जगण्याचा नवा मूल्यविचार मांडणारी आहे. कादंबरीचे विषय समकालीन लौकिक जीवनातून घ्यावे. तसेच शैलीला आशयाचेच परिमाण असावे असे या काळातली कादंबरी मानते. त्यामुळे १९६० नंतर वास्तवाभिमुख कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. १९८० नंतर स्त्री-पुरुष संबंधांचे व बदलत्या स्त्रीजीवनाचे चित्रण केलेले दिसते. थोड्याशा मोकळ्या-ढाकळ्या भाषेमध्ये या कादबऱ्या लिहिल्या गेल्या. स्त्री कादंबरीकारांनी मोकळेपणाने आपले विचार या काळात मांडले. गौरी देशपांडे, मेघना पेठे, कविता महाजन, सानिया या लेखिकांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. मराठी साहित्यप्रेमी रसिकांच्या मनात कादंबरीचे स्थान महत्त्वाचे आहे.

**कविता:-**

मानवी मनाचा हुंकार म्हणजे कविता. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय पोहोचविण्याचे सामर्थ्य कवितेमध्ये असते. वास्तविक मराठी वाङ्मयाचा इतिहास प्राचीन नसून मध्ययुगीन आहे. यामध्ये काव्याचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. मराठी कविता वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीयदेखील आहे. वैयक्तिक अनुभव, सुख-दुःख, मराठी बाणा, देशभक्ती, सामाजिकता या सर्व क्षेत्रांना मराठी कवितेने व्यापले आहे. मुकुंदराज यांना मराठीतील आद्यकवी समजले जाते. त्या काळात शास्त्रीय व ज्ञानात्मक विवेचन संस्कृत भाषेत होते. त्यामुळे संस्कृतभाषेत जे अपरंपार ज्ञानभंडार होते त्यापासून सामान्य माणूस वंचित रहात होता. हे ज्ञानाचे भांडार मराठीत आणण्याची गरज मुकुंदराजांनी ओळखली. बाराव्या शतकाच्या अखेरीस मुकुंदराजांनी जे कार्य केले ते तेराव्या

शतकाच्या उत्तरार्धात महानुभाव पंथाने पुढे नेले. महानुभाव पंथातील महदंबाकृत "धवळे" हे रसाळ काव्य आहे. या काव्यामुळे महदंबेकडे आद्य कवयित्रीचा मान जातो. आद्यकवी मुकुंदराज व ज्ञानेश्वर महाराज यांच्यामध्ये एका शतकाचे अंतर आहे. संस्कृत भाषेचे जसे अंगभूत लावण्य आहे तसे मराठी भाषेचेही आहे हे ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीतून दाखवून दिले. विशुद्ध भावकविता लिहिणारे संतकवी म्हणून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत एकनाथ, संत चोखामेळा, समर्थ रामदास या संतांचा उल्लेख करावा लागेल. मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, सोयराबाई, निर्मळा, भागू आणि कन्होपात्रा या संत कवयित्रींनी आपल्या भावसंपन्न कवितेने मराठी काव्य समृद्ध केले.

शाहिरी काव्य म्हटले की पोवाडे आणि लावण्या हे दोन रचना प्रकार डोळ्यासमोर येतात. यापूर्वीच्या काळात मध्वमुनीश्वर, अमृतराय, महिपती, वामनपंडित, मोरोपंत या कवींनी निवृत्तीपर रचना न करता प्रवृत्ती व निवृत्ती यांचा मिलाफ त्यांच्यामध्ये झालेला दिसून येतो.

केशवसुतांना आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून संबोधले जाते. केशवसुतांच्या आधी काव्याचे विषय देव-देवता, नियती, अनीती, राजे-रजवाड्यांचे पराक्रम यापुरतेच मर्यादित होते. संतकाव्यामागील प्रेरणा अध्यात्मिक होती. पंडिती काव्यानी वैयक्तिक भावभावना वर्ज्य मानल्या. शाहिरी काव्य राजे-रजवाड्यांच्या स्तुतीपलीकडे पोहोचत नव्हते. या पार्श्वभूमिवर भावगीत हेच काव्याचे खरे क्षेत्र आहे हे केशवसुतांनी दाखवून दिले. आशय व अभिव्यक्ती या दोन्ही बाजूंनी केशवसुतांनी मराठी काव्यामध्ये बंडखोरी केली. त्यानंतर ना. वा. टिळक, बालकवी, गोविंदाग्रज ऊर्फ राम गणेश गडकरी, कवी दत्त, माधवानुज, नागेश रहाळकर आदी कवींनी आधुनिक मराठी कवितेच्या जडणघडणीस हातभार लावला. १९३५ ते ४५ या दशकात कुसुमाग्रज व बा. भ. बोरकर महत्त्वाचे आहेत. १९२० ते १९४७ या कालखंडात मराठी कवितेचा प्रवाह आधुनिक आणि गतीमान झाला. यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर, माधव ज्युलियन, कवी गिरीश, यशवंत, केशवकुमार, ना. घ. देशपांडे, कवी अनील आदींचा उल्लेख करावा लागेल.

१९४७ ते १९६० हा कालखंड नवकवितेचा मानला जातो. या नवकाव्याचे प्रवर्तक बा. सी. मर्ढेकर होते. भावनांचे नाटकी उदात्तीकरण टाळून वास्तववेधी काव्य लिहिणे, मुक्तछंदाचा वापर, आशय व अविष्कार यामधली अभिन्नता, यंत्रयुगीन वास्तव, प्रेम ही या नवकवितेची वैशिष्ट्ये होती. वसंत बापट, मंगेश पाडगावकर, विं. दा. करंदीकर यांनी ही वैशिष्ट्ये सर्वात अधिक आत्मसात केली.

मराठी कवयित्रींमध्ये इंदिरा संत, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, शांता शेळके, पद्मा लोकुर, शिरीष पै, मल्लिका अमरशेख, अंजली ठकार, प्रभा गणोरकर, अनुराधा पोतदार यांनी उल्लेखनीय

काव्यलेखन केले.

१९६० पासून मराठी कवितेवर अस्तित्ववादाची छाया पडलेली दिसते. माणसामाणसातील विसंवाद, कंटाळा, एकाकीपणा, अर्थशून्यता ही अस्तित्ववादी जाणीवेची वैशिष्ट्ये या कवींच्या काव्यलेखनातून आढळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन साठोत्तरी दलित कवितेला स्फुरण चढले.

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले होते. स्त्रीवादी जाणिवा या काळात प्रभावी झाल्या. नीरजा, मल्लिका, अमरोड, प्रज्ञा लोखंडे, रजनी परुळेकर, अश्विनी धोंगडे, हिरा बनसोड यांच्या कवितांमधून स्त्रीवादी जाणिवा प्रभावीपणे व्यक्त झाल्या.

२०००नंतरच्या कालखंडामध्येही मराठी कवितेमध्ये नवे-नवे प्रवाह अंतर्भूत होत आहेत. तंत्रविज्ञानाने झालेली क्रांती, त्यामुळे बदललेली जीवनशैली या नव्या कवींच्या माध्यमातून होते आहे. आपली सौंदर्यमूल्ये जपणारी व कालानुरूप आधुनिक होत जाणारी मराठी कविता आपल्या सर्व वैशिष्ट्यांसह आपला ठसा उमटविते आहे.

**आत्मचरित्रः-**

"आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे लेखकाने लेखनरूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय." आत्मचरित्राप्रमाणे इतर अनेक लेखनप्रकारांनी असे दर्शन घडविता येते. त्यामध्ये खाजगी पत्रव्यवहार, मुलाखती, दैनंदिनी, रोजनामे, ख्रिस्ती धर्मकल्पनेनुसार केलेली पापनिवेदने, स्मृतीचित्रे, संस्मरणिका यांसारख्या आत्मचरित्रपर लेखनाचा समावेश होतो.

आत्मविष्काराची मानवी प्रवृत्ती नैसर्गिक व सार्वत्रिक असल्याने आत्मचरित्रपर लेखन सर्वच भाषांमध्ये आढळून येते. आत्मचरित्रामागे आत्मविष्काराची प्रेरणा, स्वतःच्या जीवनाच्या अर्थपूर्णतेची जाणीव, स्वतःच्या अनुभवांच्या निवडीची दृष्टी आणि लेखनशैली या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. ऐतिहासिक साहित्यकृतीप्रमाणे विशिष्टतेतून असामान्यत्वाकडे जाण्याची क्षमता यामध्ये असते. आत्मचरित्र हा ललित गद्यप्रकार मानला जातो.

खाजगी पत्र ह्या प्रकारात व्यक्तिगत संदर्भ व विशिष्ट व्यक्ती आढळतात. संस्मरणिका व स्मृतीचित्रे हे दोनही लेखनप्रकार परस्पर पर्यायी ठरतात. आत्मचरित्राचे केंद्र लेखक स्वतःच असतो.

आधीच्या कालखंडापेक्षा गेल्या पन्नास ते साठ वर्षांमध्ये आत्मचरित्र लिहिण्याकडे कल वाढल्याचे दिसून येते. स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात लिहिलेल्या आत्मचरित्रांमधील काही आत्मचरित्रे

उत्कृष्ट आहेत. गेल्या काही वर्षात स्त्रीजीवनात झालेल्या बदलाची कल्पना या आत्मचरित्रांवरून येते.

प्राचीन मराठीतील त्रोटक, प्रासंगिक व नोंदीवजा आत्मकथन नामदेव-तुकारामादी संतांच्या काव्यात आढळते. वाङ्मयीन व ऐतिहासिक महत्त्व असलेली गद्य आत्मचरित्रे नाना फडणवीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन व बापू कान्हो खांडेकर यांनी उत्तर पेशवाईत लिहिली. अव्वल इंग्रजी कालखंडात नोंदीवजा आत्मकथनामध्ये विष्णुबुवा ब्रह्मचारी, वासुदेव बळवंत, दादोबा पांडुरंग व बाबा पदमनजी यांच्या आत्मचरित्राचा उल्लेख करावा लागेल. विसाव्या शतकाच्या सुरूवातीला वि. दा. सावरकरांनी "माझी जन्मठेप" व "शत्रूच्या शिबिरात" ही आत्मचरित्रे लिहिली. सामाजिक उद्‌बोधनाच्या दृष्टीने धोंडो केशव कर्वे यांचे आत्मवृत्त महत्त्वाचे ठरले.

रंगभूमी, ललितकला व क्रीडा क्षेत्रातील नामवंत व्यक्तींनीही आत्मचरित्रपर लेखन केले आहे. या आत्मचरित्रांमध्ये त्या त्या क्षेत्रांचा इतिहास व त्यातील अन्य महत्त्वाच्या व्यक्तींविषयी उद्‌बोधक माहितीदेखील अंतर्भूत होते. कृ. बा. कुलकर्णी (कृष्णाकाठची माती), ना. म. पटवर्धन (विरंगुळा), कृ. भा. बाबर (एका शिक्षकाची आत्मकथा), धर्मानंद कोसंबी (निवेदन), ल. बा. चितळे (मी दारुड्या कसा झालो), हंसा वाडकर (सांगत्ये ऐका) अशी कितीतरी आत्मचरित्रे त्या त्या व्यक्तीचा जीवनपट उलगडून दाखवतात.

विषय व लेखनतंत्र याबाबतीत मराठी आत्मचरित्र साहित्याचे जग प्रगत झाल्याचे दिसून येते. याचप्रमाणे एखाद्या महान व्यक्तीच्या जीवनाचा दुसऱ्या कोणीतरी वेध घेऊन केलेल्या "चरित्र" या साहित्य प्रकाराचा समावेश करता येईल.

**नाटकः-**

नाटक म्हणजे जिवंत, मृत, पौराणिक, ऐतिहासिक किंवा काल्पनिक व्यक्ती किंवा प्राणी यांच्या भूमिका करणाऱ्या नटांनी रंगमंचावर सादर केलेली बहुधा संवादात्मक, अभिनयमय, नृत्यमय किंवा काव्यमय कलाकृती. नाटकामध्ये शब्दसंहिता, कथानक, संवाद, पदे, वाद्यसंगीत, पार्श्वसंगीत, नृत्य, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा, प्रकाशयोजना, अभिनय आणि कथानक असू शकते. यातली एकही गोष्ट नाटकासाठी अपरिहार्य किंवा अनिवार्य नाही.

भारतीय रंगभूमीचा इतिहास प्राचीन आहे. "भास' हा एक प्राचीन भारतीय नाटककार होता. कालिदास हा कवी-नाटककार होता. मराठी नाटकांना संगीत नाटकांची परंपरा आहे. प्राचीन मराठी साहित्यात नाटकाचा निर्देश नाममात्रही नसला तरी नाटकाशी जवळीक साधू शकतील असे काही लोककलाविशेष त्या काळातही आढळतात. कठपुतळीचा खेळ, बहुरूपी, भारूड, ललित,

गोंधळ, भजन, कीर्तन ही त्याची उदाहरणे सांगता येतील. कीर्तन म्हणजे तर जणू एकपात्री नाटकच होते.

अस्सल मराठी नाटक म्हणून संबोधता येईल अशा नाटकाचे आद्य प्रवर्तक अण्णासाहेब किर्लोस्कर होत. मराठी "शाकुंतल"चा पहिला प्रयोग म्हणजे नंतरच्या काळात लोकप्रिय झालेल्या संगीत नाटकाची गंगोत्री होय.

आजच्या व्यावसायिक रंगमंचावर खाडिलकर, गडकऱ्यांच्या नाटकांचे ऋण मानणारे प्रतिभाशाली नाटककार म्हणजे वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज, वसंत कानेटकर हे आजकालच्या व्यावसायिक नाटककारांमध्ये अग्रगण्य आहेत. त्याकाळी प्रायोगिक नाटक विलक्षण कार्यक्षम होते. अच्युत वझे, गो. पु. देशपांडे, वृंदावन दंडवते, श्याम मनोहर यांच्यासारख्या उदयोन्मुख नाटककारांचा प्रायोगिक रंगभूमीच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. सत्यदेव दुबे, श्रीराम लागू, अरविंद देशपांडे, अमोल पालेकर, दिलीप कोल्हटकर, विजया मेहता, जयदेव हट्टंगडी यांच्यासारख्या तालेवार दिग्दर्शकांनी प्रायोगिक रंगभूमीला व नाटकांना सोनेरी दिवस दिले.

परंपरागत असे जे संगीत नाटक होते, त्यामध्ये संगीत हा अविभाज्य घटक होता. आत्ताचे मराठी नाटक हे सर्व भाषांमध्ये सर्वाधिक प्रगत असे आहे. मराठी नाटकांची सद्यस्थितीदेखील संपन्न आहे. त्यामुळे मराठी माणसाने अभिमान बाळगावा अशी परिस्थिती आहे.

साहित्याच्या सर्व प्रकारांमध्ये कोण श्रेष्ठ? हे सांगणे अवघड आहे. मात्र प्रत्येकाचे स्वतःचे असे अस्तित्व मराठी साहित्यविश्वात असल्याचे दिसून येते. प्रत्येक साहित्यप्रकाराची स्वतःची अशी ताकद आहे, महत्त्व आहे. वाचकाच्या मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न या सर्वच साहित्यप्रकारांमधून उत्कृष्टपणे केला गेला आहे.

## १.७ **कथेचे निराळेपण:-**

गोष्ट सांगण्याची व ऐकण्याची आवड मानवी मनात फार प्राचीन काळापासून रुजली आहे. कथात्म वङ्मयाचा विचार केला तर आपल्या हे लक्षात येते की, कोणत्याही भाषेत सुरुवातीच्या काळात कथात्मक वाङ्मय मोठ्या प्रमाणात निर्माण झाले आहे. धार्मिक, पौराणिक, ऐतिहासिक ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी कथांचा आधार घेण्यात आला आहे. कथांमधून कोणतेही तत्वज्ञान चांगल्या व सोप्या पद्धतीने लोकांपर्यंत पोहचवता येते. कथा आदिकाळापासून कुठल्या ना कुठल्या स्वरुपात आढळते. जगातले भिन्न भाषीय वाङ्मय तपासले तर त्याचा पाया कथनात्मच दिसून येतो. कथा हा कृत्रिम वाङ्मय प्रकार नाही, मानवाची ती नैसर्गिक प्रवृत्ती आहे.

कथे व्यतिरिक्त इतर सगळे वाङ्मय प्रकार अभ्यासल्यावर असे दिसून येते की, इतर सर्व वाङ्मय प्रकारांमध्ये कथा बीजाच्या स्वरूपात कुठे ना कुठे आहे. कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या सगळ्या साहित्यप्रकारांमध्ये कथेचे बीज असल्याशिवाय विस्तार होऊ शकत नाही. मात्र कथेला आपले स्वतःचे अस्तित्व असते.

मनातले विचार व्यक्त करणे ही माणसाची सहज प्रवृत्ती आहे. त्यामुळेच कथा या साहित्यप्रकाराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्याला समजलेल्या, जाणवलेल्या गोष्टींचा अविष्कार स्वतःसाठी व इतरांसाठी करावा अशी ओढ माणसाला नैसर्गिकपणे असते. रंग आणि रेषांच्या माध्यमातून चित्रकला निर्माण झाली तशीच दुसऱ्याला काहीतरी सांगण्याच्या प्रवृत्तीतून कथा निर्माण झाली.

या सर्व साहित्यप्रकारांमध्ये कथेचे निराळेपण अनुभवायला येते. एक म्हणजे कथेचे आबालवृद्धांना आकर्षण असते. सर्व साहित्यप्रकारांच्या मुळाशी सांगणे म्हणजे कथन करणे ही मुख्य भूमिका पहायला मिळते. कथन करणारी कथा म्हणूनच महत्त्वाची वाटते. कथेला प्राचीन काळापासून महत्त्व देण्यात आले आहे. पूर्वीपासून कथा सांगणे व ऐकणे ही अतिशय आवडीची गोष्ट आहे.

स्फुट कथा, संपूर्ण कथा, लघुकथा व नवकथा या चार विकासाच्या टप्प्यांमधून मराठी कथा विकसित झाली आहे. हे टप्पे पहात असताना एक गोष्ट लक्षात येते की, स्थूलातून सूक्ष्माकडे तिचा प्रवास चालला आहे. बाह्य घटनांच्या वर्णनात रमणारी हरिभाऊकालीन कथा आज मानवी मनाच्या अंतरंगात खोलवर शिरून अंतरंगाचे दर्शन घडवू लागली आहे.

आज मानवी जीवन विलक्षण गुंतागुंतीचे झाले आहे. माणसाला वेगवेगळ्या आणि अतर्क्य अशा समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्याच्या जीवनाला एक विलक्षण गती मिळाली आहे. जग झपाट्याने बदलते आहे. माणसालादेखील त्याचबरोबर बदलावे लागत आहे. अशा माणसाचा, त्याच्या मनाचा, आजुबाजुच्या वातावरणाचा, माणसाच्या भावभावनांचा, क्रिया-प्रतिक्रियांचा सूक्ष्म वेध कथा या साहित्यप्रकारात घेतला जातो. कमी वेळात माणसाच्या मनातल्या विचारांचे दर्शन घडविणारा हा साहित्य प्रकार आहे.

## १.८ समारोप

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात कथा या साहित्यप्रकाराविषयी विस्तृत माहिती दिली आहे. तसेच अन्य साहित्यप्रकारांचा अल्प परिचय दिला आहे. या सर्व साहित्यप्रकारांमध्ये कथेचे निराळेपण कसे दिसून येते याचा देखील विचार मांडला आहे.

आशा बगे व सानिया या लेखिकांच्या कथांचा अभ्यास करताना 'कथा' या साहित्यप्रकाराची संपूर्ण ओळख असणे गरजेचे वाटले. कारण कथेचे घटक, कथेचा आकृतीबंध, कथेचे प्रकार, निरनिराळ्या कालखंडात कथेचा झालेला विकास हे सगळे अभ्यासल्यानंतरच कथेचे परीक्षण करणे सोयीचे होईल असे वाटते. या दोन्ही लेखिकांच्या कथा अभ्यासताना या प्राथमिक माहितीचा व ज्ञानाचा निश्चितपणे फायदा झाला आहे.

कथा या साहित्यप्रकाराचे वेगळेपण लक्षात येण्यासाठी अन्य साहित्यप्रकारांची तोंडओळख होणे गरजेचे होते. कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र याविषयीची माहिती या प्रकरणात देण्याचा हाच प्रमुख उद्देश होता. म्हणूनच साहित्याचे इतर सर्व प्रकार जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे.

कथा या साहित्यप्रकाराने इतर सर्व साहित्यप्रकारांमध्ये आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. कथेचे वाचन, श्रवण, लेखन ही माणासाची स्वाभाविक वृत्ती आहे. कथेचे आणि अन्य साहित्यप्रकारांचे नाते समजून घेऊन कथेचा अभ्यास करणे हा या प्रकरणाचा मुख्य उद्देश होता.

## १.९ संदर्भसूची


१. भाषा व साहित्यः संशोधन (खंड १), संपादकः डॉ. वसंत जोशी, प्रकाशकः म. श्री. दीक्षित, नोव्हें. १९८१, पृष्ठ – १.

२. भाषा व साहित्यः संशोधन (खंड १), संपादकः डॉ. वसंत जोशी, प्रकाशकः म. श्री. दीक्षित, नोव्हें. १९८१, पृष्ठ – २.

३. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – ४.

४. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – २९.

५. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – ६०.

६. मराठी कथेची स्थितीगती, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – ११५.

७. लघुकथालेखन मंत्र व तंत्र, ना. सी. फडके, अंजली प्रकाशन लि., मुंबई, १९५२, पृ. ३७

८. खडक आणि पाणी, गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६, पृ. ५७

९. कथनमीमांसा, गंगाधर पाटील, अनुष्टुभ, दिवाळी, १९९१, पृ. ९८

१०. कथाः संकल्पना आणि समीक्षा, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०००, पृ. ५

११. एका अटीचा संसार, राजन खान, मनोविकास प्रकाशन, १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ ९

१२. एका अटीचा संसार, राजन खान, मनोविकास प्रकाशन, १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ २२

१३. महावस्त्र, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृष्ठ १२०

१४. लघुकथालेखन तंत्र आणि मंत्र, ना. सी. फडके, अंजली प्रकाशन मुंबई, ऑगस्ट १९५२, पृ. क्र. ४०

१५. लघुकथालेखन तंत्र आणि मंत्र, ना. सी. फडके, अंजली प्रकाशन मुंबई, ऑगस्ट १९५२, पृ. क्र. ३७

१६. प्रदक्षिणा खंड १, म. ना. अदवंत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९४१, पृष्ठ २०१

## ग्रंथसूची

१. भाषा व साहित्यः संशोधन (खंड १)

२. मराठी कथेची स्थितीगती

३. लघुकथालेखन मंत्र व तंत्र

४. खडक आणि पाणी

५. कथनमीमांसा

६. कथाः संकल्पना आणि समीक्षा

७. एका अटीचा संसार

८. महावस्त्र

९. प्रदक्षिणा खंड १

| प्रकरण २ आशा बगे यांचे कथाविश्व | पृष्ठ क्र.<br>३४ ते १८३ |
|---|---|
| २.१ प्रस्तावना<br>२.२ आशा बगे यांचा परिचय<br>२.३ आशा बगे यांचे कथाविश्व<br>२.४ समारोप | |

## २.१ प्रस्तावना

मराठी साहित्यविश्वात स्त्रीच्या भावभावनांचे चित्रण करणाऱ्या सर्व लेखिकांमध्ये आशा बगे आणि सानिया यांचे निश्चितपणे एक वेगळे स्थान आहे. स्त्रियांच्या साहित्यामध्ये आपल्या कसदार लेखनाने या दोघींनीही मोलाची भर घातली आहे. या दोघींपैकी प्रथम आशा बगे यांच्याविषयी आणि त्यांच्या कथाविश्वाविषयी जाणून घेणे हा या प्रकरणाचा उद्देश आहे.

१९८० ते ९० या दशकातील महत्त्वाच्या कथालेखिकांमध्ये आशा बगे हे नाव अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरले आहे. विस्तीर्ण पटावर माणूस म्हणून स्त्रीबरोबरच पुरुषाचाही शोध घेण्याचे काम त्यांची कथा करते. माणसामाणसातील भावबंध पुन्हा पुन्हा तपासून पहाणे, निखळ नात्याचे लेबल न लावता अलवार नात्यांचा शोध घेणे हे त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीची स्वत्वाची व सत्याची ओढ, वात्सल्यदृष्टी, कुटुंबाशी असणारे नाते, त्यातून तिचा होणारा आत्मशोध या बाबी आशा बगे यांच्या कथांमधून दिसून येतात. साधी, सोपी लेखनशैली आणि माणसामाणसामधील भावबंधांविषयी आश्वासक समज हे या लेखिकेचे सामर्थ्य आहे.

## २.२ आशा बगे यांचा परिचय

मराठी साहित्य वैविध्यपूर्ण कथा कल्पनांनी आणि वास्तव घटनांनी समृद्ध करणाऱ्या लेखिकांच्या मांदियाळीत आशाताई बगे यांचे मानाचे स्थान आहे. विशेषतः स्त्रीच्या मनातल्या भावभावनांचे अत्यंत संयमीपणे तरीही स्वत्व जपणारे असे लेखन त्यांनी केले आहे. नागपूर तसेच विदर्भाची पार्श्वभूमी त्यांच्या साहित्यात दिसून येते. संगीत हा आशाताईंचा आत्मा आहे. त्यांच्या जवळपास सगळ्याच साहित्यात संगीताचे सूर भावनेच्या लयीतून कानावर पडतात. त्या त्या भावनेचा रंग अधिक गडद करण्यासाठी हे सूर मदत करतात.

आशाताई बगे यांचे लेखन अस्तित्ववाद किंवा स्त्रीवाद अशा कोणत्याही वादाचा पुरस्कार करत नाही. प्रयोगशीलतेची हौस त्यांच्या कथांना नाही. माणसामाणसातील नातेसंबंधांचा शोध घेत, व्यक्तीच्या मनातील सूक्ष्म आंदोलनांचा मागोवा घेण्यात त्यांना आत्मियता वाटते.

त्यांच्या साहित्यनिर्मितीचा आरंभ कवितेने झालेला आहे. काव्यात्म वृत्तीचे पडसाद कथालेखनात उमटले आहेत. त्यांचे संगीतविषयक प्रेम आणि शास्त्रीय संगीतात

त्यांनी प्राप्त केलेली पदवी याची साक्ष सर्व कथा देतात.

त्यांच्या कथाविश्वात जाण्यापूर्वी त्यांचा अल्पपरिचय करून घेणे आवश्यक आहे. त्यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व त्यांच्या कथांमधून आपण पहाणार आहोतच.

त्यांचे संपूर्ण नाव - आशा अरविंद बगे (माहेरचे नाव - आशा वामनराव देशपांडे)

जन्मतारीख - २७-७-१९३९

जन्मस्थळ - नागपूर

शिक्षण - एम. ए.

पत्ता - सुगंधा, धरमपेठ, नागपूर ४४००१०

साहित्यप्रकार - कथा, कादंबरी

पुरस्कार - राज्यपुरस्कार

त्यांच्या चार पुस्तकांना राज्य पुरस्कार मिळाला आहे. मारवा (१९८४), झुंबर व अत्तर (१९८६), मांडव (१९९०)

मृण्मयी पुरस्कार - कादंबरी सेतू (२०००)

कोठावळे पुरस्कार - दर्पण (२०००)

मोकाशी पुरस्कार - मारवा

साहित्य अकादमी पुरस्कार - भूमी

**आशाबाई बगे यांची साहित्य संपदा**

| कथासंग्रहाचे नाव | प्रकाशन संस्था | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| मारवा | मौज प्रकाशन | १९८४ |
| अत्तर | पिसारा प्रकाशन | १९८६ |
| पूजा | मॅजेस्टिक प्रकाशन | १९८९ |
| मांडव | सन पब्लिकेशन्स | १९९३ |
| चंदन | ज्ञानदा पब्लिकेशन्स | १९९३ |
| अनंत | ज्ञानदा पब्लिकेशन्स | १९९४ |
| दर्पण | मौज प्रकाशन | १९९७ |
| ऋतुवेगळे | मेहता पब्लिशिंग हाऊस | १९९९ |
| निसटलेले | मेहता पब्लिशिंग हाऊस | १९९९ |
| माझ्या कथा माझी निवड | ज्ञानेश प्रकाशन | २००१ |
| पाणी | नवचैतन्य प्रकाशन | २००३ |
| पाऊलवाटेवरले गाव | मेहता पब्लिशिंग हाऊस | २००५ |
| प्रतिद्वंद्वी | मेहता पब्लिशिंग हाऊस | २००५ |

| कादंबरीचे नाव | प्रकाशन वर्ष |
|---|---|
| मनस्विनी | १९८२ |
| झुंबर | १९८४ |
| त्रिदल | १९९४ |
| सेतू | २००० |
| कुरुक्षेत्रे | १९९६ |
| भूमी | २००४ |
| चक्रवर्ती | २०१४ |
| मुद्रा | २०१५ |

आपल्या जीवनानुभवांना प्रेरणा मानणाऱ्या आशाताई स्वतःच्या लेखनाविषयी म्हणतात, “माझ्या आजवरच्या जीवनाचा परिपाक म्हणजे माझं लेखन असावं असं वाटतं. आपल्या कथाविषयात लेखक स्वतःच्या अविभाज्य अशा जीवनदृष्टीने गुंतलेला असतो. अशा तऱ्हेने माझे आयुष्य प्रवाहित होत गेले. तसे नसते तर माझे कथानुभव वेगळे असते व कदाचित त्या अनुभवांकडे बघण्याची दृष्टीही वेगळी झाली असती.” [१]

साहित्यनिर्मिती अतिशय गंभीरपणे, पवित्रपणे व जबाबदारीने करण्याची कामगिरी आहे असे मानून समृद्ध लेखन करणाऱ्या आशाताईंच्या कथाविश्वाचा आस्वाद आता या प्रकरणात घेऊया.

## संदर्भसूची

१. माझे कथालेखन, आशा बगे, ललित, जुलै १९८८, पृ. ३७.

१. माझे कथालेखन, आशा बगे, ललित, जुलै १९८८, पृ. ३७.

## २.३ आशा बगे यांचे कथाविश्व

कथाविश्वाचा विस्तार करताना प्रत्येक कथासंग्रहातील सर्व कथांचा गाभा सांगता यावा यासाठी त्याचे शीर्षककथा, मला भावलेली कथा आणि अन्य कथा असे वर्गीकरण केले आहे.

### अ. मारवा

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | मारवा | सत्यकथा, दिवाळी ७९ |
| २ | बेईमान | सत्यकथा, दिवाळी ७९ |
| ३ | घरटं | स्त्री, जानेवारी ७७ |
| ४ | जन्म | हंस, जून ८० |
| ५ | पांगळी | वाङ्मयशोभा, दिवाळी ७६ |
| ६ | नातं | स्त्री, दिवाळी ८० |
| ७ | रंग | सत्यकथा, मे ८० |
| ८ | डोळे | स्त्री, ऑक्टोबर ७६ |
| ९ | वर्तुळ | तरुण भारत, दिवाळी ७९ |
| १० | कोवळी उन्हं | हंस, जून ८० |
| ११ | मैत्रीण | राजस, मार्च ८० |
| १२ | वाळवंट | मराठवाडा, दिवाळी ८० |
| १३ | रुक्मिणी | सत्यकथा, दिवाळी ८० |

**अ. १. – शीर्षक कथा**

**अ. २. – मला भावलेल्या कथा**

**अ. ३. – अन्य कथा**

**अ. ४. – समारोप**

**अ. ५. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

आशा बगे यांच्या सर्वोत्तम कथासंग्रहांपैकी एक म्हणजे 'मारवा'. राज्य-पुरस्कारप्राप्त 'मारवा' या कथासंग्रहात १३ कथा आहेत. कथासंग्रहाची प्रथम आवृत्ती

जानेवारी १९८४ मध्ये प्रकाशित झाली तर पाचवी आवृत्ती जून २००२ मध्ये प्रकाशित झाली यावरुनच कथासंग्रहाची प्रचंड लोकप्रियता दिसून येते. मौज प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ पद्मा सहस्रबुद्धे यांचे आहे. कथासंग्रहातील सगळ्या कथा सत्यकथा, स्त्री, हंस, वाङ्मयशोभा, तरुण भारत, राजस, मराठवाडा या अंकांमध्ये अगोदर प्रसिद्ध झाल्या आहेत.

**अ. १. शीर्षक कथा 'मारवा'**

आशाताईंच्या लेखनातला सहजपणा, साधेपणा आणि सच्चेपणा ही वैशिष्ट्ये घेऊन 'मारवा' हा कथासंग्रह सजलेला आहे. त्यातील सर्वच कथा उत्तम आहेत सर्वप्रथम 'मारवा' या शीर्षककथेचे कथाविश्व जाणून घेऊ. ही कथा १९७९ साली सत्यकथा या मासिकाच्या दिवाळी अंकात प्रथम प्रसिद्ध झाली होती.

आबा देशपांडे या पात्राच्या भूमिकेतून वर्तमानकाळ व भूतकाळातील प्रसंगांमधून कथेची बांधणी केली आहे. आबा व रघुनाथ या मुख्य पात्रांभोवती कथेची गुंफण आहे. स्त्री असूनही आशाताईंनी या दोन पिढ्यांमधल्या पुरुषांच्या मनाचा वेध घेतला आहे. काळ कोणताही असो नव्या व जुन्या पिढीतला संघर्ष कायम राहतोच. हाच संघर्ष या कथेतून व्यक्त होतो. संगीत हा आशाताईंचा जिव्हाळ्याचा विषय. या कथेला तर त्यांनी शीर्षकच एका गंभीर स्वरुपाच्या रागाचे दिले आहे. मारव्याचे सूर सुरुवातीपासूनच ऐकू येतात. भजन गायकीच्या माध्यमातून दोन पिढ्यांमधील सूक्ष्म संघर्ष कथेचा गाभा आहे.

मनोविश्लेषणात्मक पद्धतीने आबांच्या मनातला भावनांचा खेळ कथेत मांडला आहे. अध्यात्मिक वातावरणाचा वसा घेतलेल्या आबांनी आपले कुळाचार, परंपरा जपल्या होत्या. त्यांच्या मुलांपैकी रघुनाथ, ही परंपरा जपण्याचा प्रयत्न करत असतो.

या कथेत आबा स्वतः वर्तमान व भूतकाळातल्या घटना सांगतात. मध्ये सूत्रधार तटस्थपणे निवेदन करतो. उदा. 'या नव्या प्रवाहात सहज शिरणे त्यांना जमेना.' [२]

कार्तिकी पौर्णिमेनिमित्त होणारा गोपालकृष्णाचा उत्सव हा आबांच्या घराण्याचा कुळधर्म असतो. वैकुंठचतुर्दशीचे भजन महादेवाच्या देवळात तर त्रिपुरीचे भजन, गोपाळकाला आणि प्रक्षाळपूजेचे भजन गोपालकृष्णासमोर हे ठरलेले असते. या कुळाचाराला रघुनाथ दर वर्षी नित्यनेमाने यायचा. एका वर्षी गोपालकृष्णाचा उत्सव सुरू

२. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ९

होऊनही रघुनाथ आला नाही हे आबांना अतिशय त्रासदायक वाटते. नागपूर जिल्ह्यातल्या उमरेड तालुक्यातील उमरी या गावातल्या गोपालकृष्णाचा उत्सव आबांनी मोठ्या जिद्दीने चालू ठेवलेला असतो. रघुनाथदेखील दरवर्षी या उत्सवासाठी नित्यनेमाने येत होता. पण या वर्षी तो अजून का आला नाही याची आबांना बोच लागली आहे. तो आता येणारच नाही आणि कुलाचार अपूर्ण होणार या विचाराने आबा खिन्न होतात. आबांच्या मनातले भावनांचे हिंदोळे आशाताईंनी समर्पक शब्दांत मांडले आहेत. सगळे नाट्यमय प्रसंग जसेच्या तसे डोळ्यासमोर उभे रहातात.

उदा. 'त्रिपुरी पौर्णिमेचा दिवस मख्खासारखा उभा राहिला. मंदिराचे पांढरे कळस अशक्त वाटायला लागले. वणा नदीच्या खुळखुळत्या पाण्यावर पडलेली सूर्याची कोवळी किरणं कडक होऊन पुन्हा मलुल झाली.' [३]

कुळधर्माच्या कीर्तनाला रघुनाथ येतो. पण त्याच्या नव्या संकल्पनांसह. मग सुरू होतो एक वेगळाच संघर्ष. न दिसणारा पण जाणवणारा. हा संघर्ष जाणवतो आबांना आणि उमजतो त्यांच्या पत्नीला. रघुनाथ मात्र नेहमीसारखा प्रसन्न वावरत असतो. रघुनाथ ठरवतो, उत्सवामध्ये पायपेटीऐवजी दुसरी नवीन पेटी वाजवायची. सगुणभक्तीचे प्रतीक असणारा गोपाळकाला निर्गुणभक्तीच्या रूपात मांडायचा. जुनी पदे नव्या रागांमध्ये बांधायची. हे सगळे बदल स्वीकारणे आबांना जमत नाही. हे बदल अनुभवताना आबांची झालेली अवस्था आशाताईंनी अतिशय चपखल शब्दांमधून व्यक्त केली आहे.

'एरवी त्या सावळ्या विठोबाला डोळ्यात साठवतच आबांची मंत्रपुष्पांजली चढायची. पण आज रस निघून गेलेल्या ऊसासारखे ते चिपाड झाले.' [४]

नेमके काय डाचते आहे हे त्यांचे त्यांनाच कळेना. आपला मुलगा आपल्यापेक्षा सरस ठरतोय याचा त्यांना मनोमन राग येतो. रघुनाथविषयी वाटणारी असूया ते लपवू शकत नाहीत. कथेच्याशेवटी आपल्याच मुलाविषयी मनात आलेल्या मत्सराच्या भावनेची त्यांना शरम वाटते. आपला मुलगा आपल्या घराण्याची परंपरा व्यवस्थित चालू ठेवेल याची त्यांना खात्री वाटते. या कृतार्थतेच्या भावनेतच कथेचा समारोप होतो.

'मंदिरात रघुनाथाचा मारव्यातला षड्ज सुरेल, स्थिर आणि खडा लागला होता.' [५]

या कथेत शास्त्रीय संगीतातील राग आणि त्याचे माणसाच्या संवेदनांशी असणारे नाते आशाताईंनी सांगितले आहे. बिहाग, अडाणा, मुलतानी, मारवा या रागांचे उल्लेख

---

३. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ७

४. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १०

५. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १५

कथेत आहेत. कथेचे शीर्षकच 'मारवा' या रागाचे आहे. संगीत हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे हे यावरून दिसून येते. मारवा हा राग दिवसाच्या अंतिम प्रहरी गायला जातो. या कथेत आबांच्या आयुष्याची संध्याकाळ झाली आहे. या रागात षड्ज सारखा न वापरताही रागाचे स्वरूप दाखवले जाते, पण अंतिमतः लावला जाणारा षड्ज रागाचे सौंदर्य अधिकच खुलवतो. त्यामुळेच 'मारवा' हे शीर्षक कथेला अनुरूप वाटते. कथेत उल्लेख केल्याप्रमाणे, 'गोपाळकृष्णासारख्याच सावळ्या उजेडात नदीचं पात्र आबांना स्पष्ट दिसलं पैलतीरासह'. [६]

मारवा या रागातली हुरहुर, हळवेपणा, आतुरता या कथेत स्पष्टपणे जाणवते. सगळे काही मिळाले असतानाही मनात दाटलेली हुरहुर व्यक्त करणारा मारवा मनाच्या तारा छेडतो.

मारवा ही कथा नव्या आणि जुन्या पिढीतला संघर्ष दाखवते. परंपरा आणि कुळाचार पाळणारे वातावरण डोळ्यासमोर आणते. नागपूरच्या मातीचा गंध या कथेला येतो. सुरेल पारंपारिक रचनांचा कथेत समावेश आहे.

उदा. १) 'सगुण रूप नयनी
नयनी अजि दावा
मग तुम्ही वेदांना गावा' [७]

२) 'सुंदर चिद्घने माझे रंगा येई वो माते
वाजवीसी टाळ सत्वर पावसी दीनानाथे' [८]

मारवा या रागाचा स्वभाव लक्षात आल्यानंतर कथा समजायला अधिक सोपे होते. ही कथा आत्ताच्या काळातही तितकीच सुसंगत वाटते. कारण दोन पिढ्यांमधील सूक्ष्म संघर्ष कायमच अनुभवायला येतो. मुलगा आणि वडील यांच्या नात्यातील हळवेपणा जसा जाणवतो तसाच कथेचा शेवटही मनात एक प्रकारची हुरहुर निर्माण करणारा तरीही समाधान देणारा असा आहे. अंजली सोमण यांच्या मते, "शरच्चंद्र चिरमुल्यांप्रमाणे संगीताची पार्श्वभूमी म्हणून खुबीदार वापर करण्याचे सामर्थ्य आशाबाईंपाशी आहे."[९]

---

६. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, १५
७. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १४
८. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १०
९. मराठीतील कथाविशेष, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृ. १३५.

### अ. २. मला भावलेल्या कथा

आशाताईंच्या 'मारवा' या कथासंग्रहातील सगळ्यात कथा मला भावल्या आहेत असे म्हटले तरी चालेल. पण तरीही, हृदयाला स्पर्श करणाऱ्या अशा काही कथा या मुद्यात मांडता येतील. मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न करणाऱ्या आशाताईंच्या कथा या कथासंग्रहातही आढळतात. मनोविश्लेषणात्मक लेखन हे त्यांचे एक प्रमुख लेखन वैशिष्ट्य आहे. याविषयी आशाताई स्वतः म्हणतात, "गाडगीळ-गोखल्यांच्या कथांमधील अनुभवांची क्षमता आणि लहानशा अनुभवांवर आकाश तोलून धरून माणसाच्या मनाचा तळ शोधण्याचे लक्ष्य हे माझ्यात कायम राहिले. एवढ्यापुरती मी त्यांची वाट स्वीकारली. पूर्णपणे माझा मार्ग स्वतंत्र नाही. या नवकथेने मला वाट दिलेली आहे." [१०]

### १) रुक्मिणी

या कथासंग्रहातील मला भावलेली आणखी एक कथा म्हणजे 'रुक्मिणी'. सत्यकथेच्या दिवाळी अंकात १९८० साली ही कथा सर्वप्रथम प्रसिद्ध झाली. 'रुक्मिणी' या कथेने आशाताईंना कथाकार म्हणून चांगलाच नावलौकिक मिळवून दिला. या कथेत त्यांनी पारंपारिक कौटुंबिक वातावरण उभे केले आहे. पण कथेची मांडणी नव्या वळणाची आणि मनाचे सूक्ष्म पापुद्रे उलगडणारी आहे.

आपल्या आजुबाजुला घडणाऱ्या लहान-सहान गोष्टींचा आपल्या मनातल्या विचारांशी सुख-दुःखाशी घनिष्ट असा संबंध असतो. भोवताली पडणाऱ्या साध्या गोष्टींचे संदर्भ आपण मनाच्या पातळीवरच लावतो. गुलमोहराचे झाड आणि त्यावरील पोपटांचा थवा याचे रेणूच्या मनातल्या विचारांशी असणारे नाते रुपकात्मक पद्धतीने आशाताईंनी उलगडले आहे.

रेणू आणि अनंता यांची ही गोष्ट आहे. अनंता हा इनामदारांचा मुलगा तर रेणू इनामदारांच्याच गोपालकृष्णाच्या देवळातल्या कीर्तनकाराची मुलगी. लहानपणापासून रेणू आणि अनंताचे मैत्रीपूर्ण नाते असते. एकमेकांची चेष्टा-मस्करी करणे, टिंगल करणे, एकत्र खेळणे हे अनंता आणि रेणूसाठी नित्याचेच असते. वाढत्या वयानुसार त्यांच्यातले हे निरागस नाते, मैत्री हरवली आहे की काय? असे रेणूला वाटते. आपण आश्रित आहोत आणि सगळे आपल्याला कमी दर्जाची वागणूक देत आहेत असा तिने ग्रह करून घेतला होता. तिच्या वडिलांच्या निधनानंतरही आजी आणि ती त्याच देवळात

१०. आशा बगे नवे अस्तित्व, सुलभा हेर्लेकर, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ८३.

रहातात.  अनंताची आई रेणूला अनंतासाठी मागणी घालते.  त्यांचे लग्न होते, पण रेणूला अनंता वेगळाच भासतो.  लग्नानंतर तो बदलला आहे अशी तिची समजूत होते. लहानपणापासूनचे अनंताचे परिचित घर तिला एकदम अनोळखी वाटू लागते.  अनंता आपल्याकडे एक भोगण्याची वस्तू म्हणून पाहतोय असे तिला वाटते.  मात्र गोपालकृष्णाचे रूप बदलले तरी गोपालकृष्ण तोच आहे या आजीच्या बोलण्याने ती अंतर्मुख होऊन विचार करते.  आजीचा पाळण्यातला गोपालकृष्णच मोठा होऊन रुक्मिणीला न्यायला आलाय आणि मधल्या वाटेवर गुलमोहराची फुले पडलेली आहेत, अनंताचेही तसेच आहे.  तो आक्रमक, धसमुसळा नाही.  आपल्यावर प्रेम करणारा, आपला जिवलग, सखा तोच हा आहे अशी तिला खात्री पटते.

या कथेत आशा बगे यांनी प्रतिके आणि प्रतिमांचा सुंदर उपयोग केला आहे. गोपालकृष्णाचे मंदिर, गुलमोहर, पोपटांचे थवे अगदी जसेच्या तसे डोळ्यासमोर उभे राहतात.  मधेमधे शास्त्रीय संगीतातील रागांचा व गोपालकृष्णावरील भक्तीरचनांचा उल्लेख डोळ्यासमोरचे चित्र अधिक स्पष्ट करतो.

'आये मोसे होरी
खेलन को सारी
कुंवर ब्रिजराज' [११]

या कथेतील काही वाक्यांमधून अध्यात्माची उच्च पातळी अनुभवायला मिळते. उदा. – "वाळवंट, जिथे स्वतःच्या कर्माची पावले उमटत नाहीत असे निर्विकल्प ठिकाण." "काला म्हणजे स्वतःची कर्म.  आपल्या कर्मांची शिदोरी गोपालकृष्णाला अर्पण करावीत तीही वाळवंटात." [१२]

'मारवा' या कथासंग्रहाची सुरुवात 'मारवा' या कथेने होते.  शेवट रुक्मिणी या कथेने होतो.  दोन्ही कथांमध्ये देऊळ, शास्त्रीय संगीत, परंपरा, पारंपारिक रचना, कीर्तन, प्रवचन या बाबींमध्ये साम्य आढळते.  मानवी मनाचा तळ शोधणे आणि भावनांचे कल्लोळ शब्दबद्ध करणे हे तर आशाताईंच्या कथेचे मुख्य वैशिष्ट्य.  या कथांमध्येही त्यांच्या लेखनाचे हे वैशिष्ट्य आढळते.

### २) नातं

'मारवा' या कथासंग्रहातील मला भावलेली आणखीन एक कथा म्हणजे 'नातं'.

---

११. रुक्मिणी, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १५४.
१२. रुक्मिणी, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १६२.

ही  कथा वेगळ्या धाटणीची आणि आशाताईंचे लेखनसामर्थ्य व्यक्त करणारी आहे.  मानवी नाती नेहमीच अनाकलनीय आणि गुंतागुंतीची असतात.  कारण या मानवी नात्यांमागील मन अनाकलनीय आणि गुंतागुंतीचे असते.  दोन व्यक्तिंमधील नात्याचे नेमके  स्वरूप तिसऱ्याला समजू शकत नाही.  एका मृत्यूच्या  निमित्ताने जाणवलेला नात्यांचा हा विचित्र गुंता नातं या कथेत आशा बगे हळुवारपणे पण ताकदीने मांडतात.  या कथेत नीना या पात्राच्या आधारे आपल्या मनात नात्यांविषयी चाललेला संघर्ष आशाताईंनी दाखविला आहे.

'नातं' या कथेत माणसाच्या नात्यांविषयी असणाऱ्या भावनांचे मनोविश्लेषणात्मक परीक्षण आशाताईंनी नोंदवले आहे.  आपल्या आयुष्यातील नाती विचित्र असतात.  ती नाकारता येत नाहीत आणि तोडताही येत नाहीत.  या नात्यांना जपावे मात्र लागते. नात्यांमधल्या प्रेमाची धार काळाच्या ओघात बोथट होत जाते हे या कथेतून दिसून येते. कथेची सुरुवातच एका विचित्र घटनेने होते.  नीना आणि भास्कर त्यांच्या मुलांसह त्यांच्या दिनक्रमात व्यग्र असतात.  भास्करच्या साख्ख्या मामे भावाच्या म्हणजेच दर्शनच्या बायकोविषयी एक विचित्र घटना भास्करला पत्राने कळते.  दर्शनची बायको जळून मेल्याचे ते पत्र असते.  या पत्रामुळे नीना अस्वस्थ होते.  तिच्या डोळ्यांसमोर वीणाची लहान मुले येतात.  पण भास्कर मात्र अगदी नेहमीप्रमाणेच वागत असतो.  त्या घटनेचे पडसाद त्याच्या मनावर उमटले नसावेत असे नीनाला वाटते.  इतकेच नव्हे तर अशा विचित्र परिस्थितीतदेखील तो नीनाला सिनेमाला येतेस का?  असे विचारतो.  तिच्या मनाला पटत नसतानाही ती जाते.  भास्करकडूनच तिला कळते की दूध गरम करण्यासाठी स्टोव्ह पेटवताना वीणाची साडी पेटली.  दर्शन जवळ येऊन तिला वाचवण्याचा प्रयत्न करेपर्यंत ती नव्वद टक्के भाजली होती.  एका विचित्र मनोवस्थेत नीना या प्रसंगाला सामोरी जाते.

दुसऱ्या दिवशी नीना तिच्या मोलकरणीशी गीताबाईंशी बोलत असताना परत एकदा वीणाबद्दल त्यांना सांगते.  नीनाला दर्शनला भेटायला जायचे असते.  पण मुलांना कुठे ठेवणार हा प्रश्न असतो.  म्हणून ती मुलांना गीताबाईंकडे सोपवून जाईल असे त्या दोघींमध्ये ठरते.  गीताबाई दुसरीकडे कामाला निघूनही जातात.  थोड्या वेळातच शेजारची अरुणा येऊन सांगते की गीताबाईंच्या छातीत कळ येऊन त्या पडल्यात, त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले आहे.  नीना त्यांना बघायला जाते.  इतक्या आजारी असूनही त्या नीनाचीच चौकशी करतात, काळजी करतात.  नीना मात्र तिला जायला मिळणार नाही या कारणामुळे मनातून थोडीशी चिडते.  डॉक्टरांशी बोलताना गीताबाईंना बेवारस

म्हणून परक्यासारखी वागते. नंतर मात्र तिचा तिलाच राग येतो. माणसाच्या सगळ्या भावना एकेकट्या आणि संदर्भहीन असतात असे तिला वाटते. या भावना आणि त्यांचे एकमेकांशी असणारे नाते बेवारस असते असे विचार तिच्या मनात येतात. ती विचार करते, "नाहीतरी कोणी कुणाचं नसतंच. कशावरच तर आपली मालकी नसते. अगदी आपली म्हणून असलेली सुख-दुःखही आपली नसतातच. तरी सारा प्रवाह वाहत असतो. आपल्या नकळत कुणीतरी आपल्याला या प्रवाहाशी विचित्रपणे बांधून ठेवतं. नाकारता येत नाही. सहन मात्र करावी लागतात." [१३]

## ३) घरटं

आशाताईंचे लेखन मनाला भिडणारे व कसदार कसे याचे उत्तर त्यांनी आपल्याला 'वाटा आणि मुक्काम' या पुस्तकात दिले आहे. त्या म्हणतात, "व्यक्ती ही व्यक्ती म्हणूनच जगू पाहते. व्यक्तीचे स्त्री असणे किंवा पुरुष असणे आणि त्याने जीवनाचे आकलन निर्धारित होत जाणे हे बाह्य, लादलेले घटक आहेत. स्वतःचे जगणे जगत असताना ती व्यक्ती त्यात इतकी गुंतलेली असते की त्याकडे नजर वर करून तटस्थपणे बघणे होतेच असे नाही. पण हेच बघणे लेखनापासून केवळ बघणे नसते तर ते जाणणे होते. लेखक म्हणून असे जाणून घेणे व स्वतःला व इतरांना विश्वासात घेत मांडणे हेच लेखन असते." [१४]

आशाताईंचे हेच चिंतन, घरटं या कथेत वाचक म्हणून जाणवते, भावते. सर्वसामान्य, आनंदी जीवन जगू इच्छिणारी व्यक्ती घरट्याची म्हणजे घराची ऊब, अस्तित्व नाकारू शकत नाही हे वास्तव या कथेतून आशाताईंनी मांडले आहे. कथेमध्ये असलेला संघर्ष बाहेरच्या कोणाशीही नसून स्वतःच्याच मनाशी आहे.

मृदुला, श्याम व राजीव या तीन पात्रांभोवती कथा फिरते. राजीव उच्च-मध्यमवर्गीय कुटुंबातला आहे. श्याम राजीवचा अतिशय जवळचा मित्र आहे. श्याम एका साध्या चाळीत रहात असतो. आर्थिक परिस्थिती या दोन मित्रांच्या मैत्रीआड येत नाही. कथेच्या सुरुवातीला 'घर' या संकल्पनेला न मानणारा राजीव शेवटी घरट्याचे अस्तित्व मान्य करतो.

श्याम आणि मृदुला यांच्या सुखी संसाराचे निरीक्षण करताना राजीवला स्वतःच्या मोडून पडलेल्या घरट्याची आठवण होते. चाळीतल्या दोन खोल्यांमधल्या

१३. नातं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ७१

१४. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. २३

घरात श्याम  आणि  मृदुलाने स्वर्ग उभा केला आहे.  मात्र जुहूच्या त्याच्या आलिशान फ्लॅटमध्ये एक विचित्र उदासी त्याला नेहमीच जाणवते.  त्याच्या फ्लॅटमधल्या एकाकी दुमडलेल्या सकाळपेक्षा इथली अंगांगांनी बिलगणारी सकाळ त्याला अधिक भावते. इथल्या सकाळचे सारे स्पर्श त्याला आनंददायी वाटतात.  तिथल्या प्रत्येक क्षणाचा नवा रंग राजीव अनुभवतो.  चिमणीच्या घरट्याचा प्रतिकात्मक वापर कथेत केला आहे.

श्यामची बायको मृदुलाची आणि आपली पत्नी रमोला हीची राजीव  नकळतपणे तुलना करतो.  आपल्या संसारासाठी झटणारी, स्वतःकडे फारसे लक्ष न देणारी मृदुला त्याला जास्त खरी वाटते.  हे सगळे कितीही आवडत असले तरी राजीवला यात गुंतायचे नसते.  कुठे न थांबण्याचा, अडकण्याचा त्याचा स्वभाव असतो.  कुठे पाऊल रेंगाळते आहे असे वाटले की तटकन सारे संदर्भ तोडून तो मोकळा होतो.  पण त्याला या घरट्यापासून बाजूला व्हावे असे वाटत नाही.

श्यामची आर्थिक परिस्थिती बेताची असते.  त्यामुळे अनेक गोष्टी न परवडल्यामुळे तो घेऊ शकत नाही.  याच गोष्टी राजीव सहजपणे विकत घेऊ शकतो. मृदुलाच्या छोट्या छोट्या मागण्या त्याला गमतीदार वाटतात.  राजीव नकळतपणे त्या घरात अडकत जातो कारण त्या घरातले सुखही सुरेख आणि दुःखही.  तिथला घडता, झगडता, वाहता स्पर्श कोवळ्या आणि सुंदर क्षणांना जन्म देतो.  तिथे मिळणाऱ्या दुर्मिळ क्षणांची राजीव किंमत करू शकत नाही.  संसारातल्या ज्या सगळ्या गोष्टींकडे पाठ फिरवून तो उभा होता त्या सगळ्या गोष्टी पुन्हा येऊन ठाकतात.  माळ्यावरचे चिमणीचे घरटे मोडते म्हणून मृदुलाला जसे वाईट वाटते, तसेच राजीवला स्वतःचे घरटे मोडल्याबद्दल वाटते.  चिमणीचे घरटे मोडले तरी ती जिद्दीने दुसरे घरटे बांधते.  त्याचप्रमाणे अट्टाहासाने नाकारलेले घरटे राजीव स्वीकारतो.  तो म्हणतो, “या सुंदर घरट्याभोवती भिरभिरणारे इवले, कोवळे, नाजूक स्पर्श मनुष्य अखेर नाकारू शकत नाही.  निदान आपल्यासारखा सामान्य मनुष्य तरी.” [१५]

### अ. ३. अन्य कथा

कोणती गोष्ट साहित्यिकाला अनिवार्यपणे लिहिते करते?  किंवा लिखाणाचा अंतरिक हेतू कोणता?  या प्रश्नाचे उत्तर आशाताई खूप छान देतात.  त्या म्हणतात, “अशा तऱ्हेचे प्रश्न लेखन सुरू केले तेव्हा पडलेच नाहीत इतकी ती सुरूवात सहज होती.

१५.  घरटं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ३८.

केवळ सुचणे हाच त्या सुचण्याचा आनंद आणि हेतूही होता. माणसांचे कुतूहल, त्याच्या विशिष्ट जगाबद्दलचे कुतूहल ही लेखकपणाची प्रेरणा असू शकेल." [१६]

या प्रेरणेतूनच आशाताईंचे सगळे लेखन झाले आहे. 'मारवा' या कथासंग्रहातील अन्य कथाही सुचण्याच्या आणि जाणून घेण्याच्या आनंदातूनच लिहिल्या गेल्या आहेत. म्हणून 'मारवा'तील अन्य कथांविषयी जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

## १) बेईमान

मानवी मनाचा एक विलक्षण खेळ म्हणजे 'बेईमान' ही कथा. आज प्रचंड दुःख देणारी किंवा सुख देणारी गोष्ट उद्या असेलच असे नाही. सुख-दुःख हा आपल्याच मनाचा खेळ. माणसाच्या मनाच्या चंचलतेचे वर्णन 'माधवी' या पात्राच्या आधारे केले आहे. माधवी आणि प्रमोद या दांपत्याची ही कथा आहे. सर्वसाधारणपणे मध्यमवर्गीय कुटुंबात ज्या घटना घडतात त्याच या कुटुंबातदेखील घडतात. मात्र माधवीच्या घराजवळील टँकमध्ये एक मुलगी आत्महत्या करते. त्या घटनेचा माधवीच्या मनावर खोल परिणाम होतो. इतका की तिचे आणि प्रमोदमधले संवाद तुटक होतात. माधवीची त्या घटनेमुळे होणारी घालमेल तिच्या कुटुंबात कोणाच्याही लक्षात येत नाही असे तिला वाटू लागते. प्रमोद, तिच्या मुली आणि कामवाल्या बाईंची आत्महत्या केलेल्या मुलीबद्दलची अनास्था तिला खटकते. तिची चिडचिड होते. एवढा पोसलेला, नटवलेला देह संपवताना माणसाला कुठल्याच यातना होत नसतील का? हा प्रश्न तिला सतावतो. या घटनेमुळे ती जरा जास्तच उदास होते.

पण आदल्या दिवशी मनावर उमटलेल्या घटनेच्या पुसटशा छटादेखील माधवीच्या मनावर नव्हत्या. ती पूर्णपणे निर्विकार होती. कालचे कुठलेच कढ आज अजिबात जाणवत नव्हते. कालचा दिवस म्हणजे सहज चालता चालता पायाला बोचलेला काटा वाटतो तिला. टँकमधले पाणी शांत होते. कालची इतकी मोठी गोष्ट आज अगदी छोटी होऊन पाण्यात सामावून जाते. तेव्हा माधवी आपल्या मनाला आणि काल उसळलेल्या टँकमधल्या पाण्याला बेईमान म्हणते. पण ते त्या पाण्याला की स्वतःला कुणास ठाऊक? स्वतःच्या मनाशीच चाललेला संघर्ष या वाक्यातून जाणवतो.

आज तीव्रतेने त्रास देणारी गोष्ट उद्या अस्तित्वातच राहू नये इतके मन बेईमान असते या मुद्द्यावरून बेईमान हे शीर्षक समर्पक वाटते.

---

१६. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. १.

२)  **जन्म**

आई होणे ही प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यातली नितांत सुंदर गोष्ट आहे.  या कथेत एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीच्या मातृत्वाचा घेतलेला अनुभव आहे.  या कथेचे हेच वेगळेपण आहे.  दुसऱ्या स्त्रीच्या मातृवेणा समजून घेणे हा एक वेगळा अनुभव या कथेत आहे.

'जन्म' या कथेत एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीच्या मातृत्वाची घेतलेली दखल, काळजी दिसून येते.  आई होणे ही अवस्था तिने स्वतः अनुभवलेली आहे.  गर्भवती स्त्रीच्या भावना समजून घेण्याचा ती प्रयत्न करते.  बाळाला जन्म देणे ही घटना एखाद्या स्त्रीच्या बाबतीत फार वेगळी आहे असे म्हणता येत नाही.  तरीही कथेच्या नायिकेच्या मनात या सगळ्याविषयी प्रचंड कुतूहल आहे.  तिच्या घराच्या एका बाजूला असणारे डॉ. दिघे यांचे मॅटर्निटी होम आणि दुसऱ्या बाजूला रहाणारी चित्रा दीक्षित यांच्याभोवती कथा फिरते.

तिच्या खिडकीतून तिला, मॅटर्निटी होम आणि चित्रा, रोजच दिसत असतात. कथेची नायिका या दोन गोष्टींमध्ये विलक्षण अडकते.  चित्रा दीक्षितशी तिची फारशी ओळख नसताना ती तिच्यात गुंतते.  चित्रा गर्भवती आहे हे कळल्यापासून जरा जास्तच. न बोलताच त्या एकमेकींशी खूप काही बोलतात.  इतर कोणत्याही शेजारणीपेक्षा तिला चित्रा दीक्षितच जास्त जवळची वाटते.

चित्रा तिच्या मनातले प्रश्न घेऊन तिच्याकडे येते.  त्यानंतर त्या दोघींचे एक वेगळेच नाते निर्माण होते.  चित्रा पहिलटकरीण असल्याने तिला नायिकेचा आधार वाटतो. अगदी छोट्या छोट्या गोष्टींमधून आलेला ताण चित्रा नायिकेच्या मदतीने दूर करते. तिच्या छोट्या छोट्या प्रश्नांवर तोडगे सांगताना नायिका सुखावते.  चित्राच्या खाजगी आयुष्यात डोकावण्याइतकी गुंतते.

चित्राच्या बाळंतपणाच्यावेळी तिच्या माहेरचे किंवा सासरचे कोणी येऊ शकत नाही असे समजल्याने चित्रा अस्वस्थ होते.  अशावेळी कथेच्या नायिकेने आपल्या सोबत येण्याची विनंती करते.  चित्राला धीर देण्याची संधी मिळाल्याने ती मनोमन सखावते.  तो जगावेगळा आणि फक्त बाईलाच अनुभवता येणारा जन्मकळांचा सोहळा काठावर बसून अनुभवता येणे ही विलक्षण गोष्ट तिला सुखावते.

डॉ. दिघे यांच्या लेबररूमविषयी असणारी सुप्त ओढ यानिमित्ताने पूर्ण होणार होती.  चित्रा लेबररूमध्ये जाते.  तिच्यासोबत लेबररूममध्ये जाण्यासाठी आलेली नायिका मात्र बाहेरच बसून रहाते.  ज्या क्षणाची ती आतुरतेने वाट पहात होती तो क्षण जवळ येताच ती माघार घेते.  अलिप्तपणे वेदनेचा सोहळा बघण्याचा तिचा ध्यास नाहिसा होतो.

अगदी ऐनवेळी नायिकेच्या मनाने घेतलेली माघार तिला अस्वस्थ करते. एका वेगळ्या अस्वस्थतेला जन्म देते.

### ३) पांगळी

एक प्रसिद्ध लेखक आणि नवोदित लेखिका यांच्याभोवती फिरणारी ही कथा 'पांगळी'. समोरच्याला आधाराची गरज आहे असे वाटून आपणच पांगळे असल्याची जाणीव होते तेव्हा मनाचा मनाशी झालेला संघर्ष या कथेतून आशाताईंनी दाखवला आहे.

'पांगळी' या कथेत आप्पासाहेबांच्या मनातला संघर्ष आहे. कथेची सुरूवात फ्लॅशबॅक पद्धतीने होते. त्यांच्या घरात पुस्तकांचे पार्सल येते. त्यावरील अक्षर पाहून ते भूतकाळात जातात. कल्याणी नावाच्या एका अत्यंत बुद्धिमान, प्रतिभावान मुलीची आणि त्यांची भेट आणि त्या भेटीनंतरचे सगळे दिवस त्यांच्या डोळ्यासमोर येतात. स्वतःला नेमके काय हवे होते हे त्यांना आत्ताही कळत नाही. घडलेल्या सगळ्या घटनांकडे साक्षी म्हणून पहाणे त्यांना जमत नाही.

काही वर्षांपूर्वी कल्याणी नावाची मुलगी आप्पासाहेबांकडे येते. तिच्या कवितासंग्रहाला आप्पासाहेबांनी प्रस्तावना द्यावी अशी तिची इच्छा असते. मात्र आपल्या प्रतिष्ठेच्या अहंकारामुळे ते कल्याणीला विशेष महत्त्व देत नाहीत. कल्याणीची वही त्यांच्याकडे दोन-तीन महिने तशीच पडून रहाते. एके दिवशी ती वही चाळल्यानंतर त्यांना जाणवते की कल्याणीकडे दैवदत्त प्रतिभा आहे. आप्पासाहेबांच्या मार्गदर्शनाची तिला गरजच नाही. ते तिची खूप वाट बघतात, शोधण्याचा प्रयत्न करतात. एकदा रस्त्याने जाताना ती त्यांना दिसते. मात्र त्यांचा अहंकार त्यांना तिची स्तुती करू देत नाही.

कालांतराने कल्याणीचे त्यांच्या घरी जाणे-येणे सुरू होते. कॉफी करून देण्यापासून स्वयंपाक करण्यापर्यंतची सगळी कामे ती करते. कल्याणी त्यांच्या आधाराने लेखन करते ही गोष्ट त्यांना पटत नाही. तिच्या प्रतिभेला अंकुर फुटावेत म्हणून आप्पासाहेब तिला अपमानित करतात आणि स्वतःपासून दूर करतात. आप्पासाहेबांच्या विचित्र वागण्याचा तिला त्रास होतो पण लग्न होऊन ती आपोआपच त्यांच्यापासून दूर जाते. कल्याणीला आधार देणारे आप्पासाहेब स्वतःच तिच्या आधाराशिवाय पांगळे होतात. कल्याणीचा कथासंग्रह तिने आप्पासाहेबांना समर्पित केलेला असतो. त्यांना आपली अगतिकता

लपवता येत नाही.

कथेच्या शीर्षकावरून कल्याणी आप्पांच्या आधाराने उभी आहे असे वाटते. पण कथेच्या शेवटी तिच्या आधाराशिवाय त्यांचीच अवस्था पांगळ्यासारखी झालेली असते. आप्पासाहेबांनाच कल्याणीचे बोट धरावेसे वाटेल असे तिला तरी कुठे वाटले होते? कारण आधार देणारी माणसं पांगळी नसतात.

माणूस कितीही मोठा, प्रसिद्ध झाला तरी त्याला त्याच्या मनापुढे धाव घेता येत नाही. अगदी अहंकारालासुद्धा हरवेल इतकी ताकद मनातल्या विचारांना असते हा विचार आशाताई या कथेतून पोहोचवतात.

**४) रंग**

आपले आयुष्य हे विविधरंगी छटांनी व्यापलेले आहे. प्रत्येक वळणावर एका वेगळ्या रंगाची उधळण होत असते. एखाद्या अकस्मिक संकटाने माणसाचा स्वभाव बदलतो, त्याच्या आयुष्यातले रंग बदलतात. देवेंद्र आणि मानसी यांच्या आयुष्यातदेखील एक विचित्र वळण येते. त्यांनतर बदललेला देवेंद्र, मानसीची उलघाल आणि देवेंद्रच्या रंगात मिसळून जाण्याची तिची धडपड या कथेतून व्यक्त होते. या कथेतही शास्त्रीय संगीतातील रागांचा व त्यावेळच्या भावनांचा सुरेख मेळ घातला आहे. मानसीचा तिच्या मनाशी चाललेला संघर्ष हाच कथेचा गाभा आहे.

देवेंद्रच्या अपघाताने पूर्णपणे कोलमडलेली मानसी कथेच्या सुरुवातीला भेटते. पूर्वीचा आणि आत्ताचा देवेंद्र यांच्यामधला फरक पचवणे तिला जड जाते. पूर्वी नको इतका आग्रही असणारा देवेंद्र अपघातानंतर खूपच ॲडजेस्टेबल होतो. हॉस्पिटलमध्ये सहा महिने काढल्यानंतरही घरी जाण्याबाबत त्याच्या मनात उत्सुकता नाही हे पाहून ती उदास होते. देवेंद्र सतारवादक असतो. मानसी एक सर्वसामान्य गृहिणी तर हा मस्त कलंदर असा कलाकार. राग आणि रंगांशी आपल्या आयुष्याचे संदर्भ जोडणारा देवेंद्र हॉस्पिटलच्या पांढऱ्या फटक रंगात अडकून पडला आहे हे तिला सहन होत नाही.

देवेंद्र आणि ती घरी असतानाचे रंग वेगळे असतात. तो हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर घराला आलेली कळा पाहून मानसी अस्वस्थ होते. अपघातात पाय गमावला असला तरी त्याचे स्वर आणि आयुष्यातले रंग तसेच आहेत हे तिला जाणवते. देवेंद्रशी संवाद साधण्याचा तिचा प्रयत्न कमी पडतोय असे तिला जाणवते. देवेंद्रचे गुरू बुवा यांची मैफिल ऐकायला तिने जावे असा आग्रह तो धरतो. बुवांनी गायलेली भैरवी त्या दिवशी

तिला खोटी वाटली तरी देवेंद्रकडे बघितल्यावर तिला जाणवते की, मरणाचे सावळे रूप प्रत्येकजण आपापल्या परीने पहातो. देवेंद्र रागांच्या रंगरूपात तर मानसी तिच्या संसारात. तिच्या मनात विचार येतो, "या क्षणानंतरचे आयुष्य उपचारापुरतेच उरत असेल. देवेंद्रपर्यंतच आपल्याला पोहोचावं लागेल. नाहीतरी बुवा म्हणालेच होते, भैरवीपर्यंत आलो. आता परत फिरणं नाही. आजच्यापुरती मैफिल संपली आहे." [१७]

## ५) वाळवंट

दोन व्यक्तिंमध्ये असणाऱ्या अनामिक बंधाचे चित्रण आशाताईंनी 'वाळवंट' या कथेत केले आहे. अगदी काहीही संबंध नसताना एखादी व्यक्ती आपल्याला जवळची का वाटते? या प्रश्नाला उत्तर नसते. या कथेत मिसेस देवरस व मिसेस पंडित यांच्या आगळ्या वेगळ्या नात्याचा भावस्पर्शी बंध उलगडला आहे.

मिसेस देवरस गीतांना उत्तम चाली लावतात व गातातही म्हणून मिसेस पंडित त्यांच्या कविता चाल लावायला मिसेस देवरसांकडे देतात. पंडित आजारी असतात. त्यांचे पती न्यायाधीश असतात. त्यामुळे लौकिकार्थाने सगळी सुखं हात जोडून उभी असतात. पण आजारीपणामुळे आलेल्या एकाकीपणाला त्या कंटाळतात. त्यामुळे त्या मिसेस देवरसांना सारखा फोन करून त्यांच्या संपर्कात रहाण्याचा प्रयत्न करतात. सुरुवातीला मिसेस देवरस पंडितबाईंच्या आजारपणामुळे काहीच बोलत नाहीत. पण मिसेस पंडितांचा आग्रहीपणा आणि अधिकार गाजवणे दिवसेंदिवस वाढतच जाते. त्यांना टाळण्याचा प्रयत्न करूनही त्या सतत संपर्कात रहातात.

एक दिवस मिस्टर पंडित मिसेस देवरसांना आणायला त्यांचा घरी जातात. आपले अखेरचे दिवस आलेत हे समजल्याने पैलतीरी जाण्याची भावना मिसेस पंडितांच्या मनात स्पष्ट दिसते. दोन दिवसांनीच मिसेस पंडितांच्या निधनाची बातमी देवरसांना समजते. त्यांच्या घरी त्या भेटायला जातात, तेव्हा न्यायाधीशसाहेब मिसेस देवरसांचे आभार मानतात. मिसेस देवरसांमुळेच आपल्याला खूप काही करायचे आहे या भ्रमात मिसेस पंडित राहिल्या. शेवटपर्यंत हा भ्रम टिकला म्हणून जगण्याचे कारण मिळून मिसेस पंडित आनंदात राहिल्या. नकळतपणे मिसेस देवरस मिसेस पंडितांना बरंच काही देऊन गेल्या हे त्यांनाच कळले नाही. त्या आपल्यावर इतक्या अवलंबून होत्या आणि आपण मात्र त्यांचा राग राग केला याचे त्यांना वाईट वाटते. शेवटी देवरसबाईंच्या मनात विचार येतो,

---

१७. रंग, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ९०.

"जिथे स्वतःच्या कर्माची पावले उमटत नाहीत अशा निर्विकल्प ठिकाणी मिसेस पंडित जातात. मिसेस पंडित शोधत असलेले ते वाळवंट काही फार लांब नव्हते."

## ६) मैत्रीण

मैत्रीच्या नात्याचे वेगळे पदर उलगडून दाखवणारी एक हळवी कथा म्हणजे मैत्रीण. मैत्री समविचारी लोकांमध्येच होते का? काही वेळा अगदी भिन्न परिस्थितीतली, भिन्न स्वभावाची दोन माणसेदेखील एकमेकांच्या सुख-दुःखाचा विचार करतात. अशाच एका वेगळ्या मैत्रीची ही कथा 'मैत्रीण'.

प्रत्येक माणसाचे आयुष्य वेगवेगळे असते. त्यामुळे आपल्याला पटणाऱ्या सगळ्याच गोष्टी योग्य असतीलच असे नाही. आपण स्वतःच्या विचारांवरून इतरांच्या विचारांचे मूल्यमापन करू नये हा विचार या कथेत मांडला आहे. विचारसरणी भिन्न असली तरी एकमेकांना समजून घेऊन मैत्रीचे बंध जपता येतात, हे या कथेतून दिसून येते.

कथेची नायिका आणि मिसेस मिश्रा या शेजारणी असतात. एकमेकींनी केलेले पदार्थ आणि विचार वाटून घेणाऱ्या दोन शेजारणी. कथेची नायिका स्वतंत्र विचारसरणी असलेली आहे. मिसेस मिश्रा आपल्या नवऱ्याच्या चुकीच्या गोष्टीदेखील सहन करणारी आहे. आपल्याला नको असणारी गोष्ट नाकारलीच पाहिजे या विचारांवर कथेची नायिका ठाम आहे. आपल्या मनाप्रमाणे निर्णय घेऊन जगण्यातला आनंद तिला महत्त्वाचा वाटतो. तर दुसरीकडे घरात कोणता पदार्थ करायचा इथपासून मूल होऊ द्यायचे की नाही या कुठल्याच विषयाचे स्वातंत्र्य मिसेस मिश्रांना नसते. किंबहुना याचे त्यांना काहीच वाटत नाही. या अज्ञानामुळे किंवा असहाय्यतेमुळे कथेची नायिका वैतागते. मात्र काही काळानंतर मिसेस मिश्रांच्या नजरेतला आणि निर्णयातला अटळ स्वीकार नायिकेला कळतो. त्यामुळे आपल्या स्वतःच्या आयुष्याचे मापदंड मिसेस मिश्रांच्या आयुष्याशी आपण का जोडले याचे तिला वाईट वाटते आणि स्वतःचाच राग येतो.

## ७) कोवळी उन्हं

माणसाचे मन मोठे विचित्र असते. मनाची अवस्था ज्याप्रमाणे असेल त्यावर सुख किंवा दुःख अवलंबून असते. मन बेचैन, दुःखी असेल तर अगदी छोट्या गोष्टीसुद्धा डोंगराएवढ्या वाटतात. मन आनंदी, प्रसन्न असेल तर मोठमोठी संकटेदेखील सहज पार

करता येतात. 'कोवळी उन्हं'मध्ये मनाचा हाच व्यापार आशाताईंनी मांडला आहे.

मन्नू उर्फ मनोरमा या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून मनच माणसाच्या आनंदाला आणि दुःखाला कारणीभूत असते हे या कथेतून दिसून येते. पहिल्याच वाळंतपणाच्यावेळी मन्नूला खूप मोठे दुःख सहन करावे लागते. तिचा मुलगा त्याच्या जन्माच्या आधीच दगावतो. कोणत्याही आईसाठी हे संकट आभाळाएवढेच असते. मन्नूदेखील या घटनेमुळे कोलमडते. तिला भेटायला येणाऱ्या सगळ्यांचा तिला राग येऊ लागतो. सारखा तोच विषय, सांत्वन, रडणे याचा तिला वीट येतो. तिच्या मैत्रीणी तिला भेटायला येतात, त्या हा विषयच काढत नाहीत. त्याचाही तिला राग येतो. आपली आईदेखील आपल्या दुःखात सहभागी नाही असा ती समज करून घेते. तिचा नवरा शेखर स्वतः न येता पत्र पाठवतो हेदेखील तिला खटकते. संपूर्ण पत्रात सांत्वनाचा एक शब्दही लिहू नये हे तिला पटत नाही. मन्नूच्या मनातल्या विचारांनी ती आजुबाजूचे जग बघते. माणसाची ही सर्वसाधारण मनोवृत्ती आशाताईंनी समर्पक शब्दांमधून व्यक्त केली आहे. माणसाचा असा स्वभाव असतो की, आपल्यासारखेच किंवा आपल्यापेक्षा काकणभर जास्त दुःख असलेल्या माणसाचे दुःख अनुभवले की त्याचे दुःख कमी होते. मन्नूच्या बाबतीतही तेच होते. शेखर जेव्हा तिला सांगतो की, आपल्या आईचीही पाच अपत्ये गेली होती, तेव्हा मन्नूला हायसे वाटते. तिला असा विश्वास वाटू लागतो की, माझे पहिले मूल मेले असले तरी मला पुन्हा नक्की बाळ होईल. मोठा दुःखाचा दाह अचानकपणे कोवळ्या उन्हासारखा भासतो. ती विचार करते, "किती दिवसांचं साचलेलं पाणी शेखरनं एका मिनीटात वाहतं करून टाकलं, नी कोवळ्या उन्हासारखं हे दुःखसुद्धा चक्क अंगावर घेता आलं, कमाल आहे." [१८]

## ८) डोळे

मानवी मन भावभावनांच्या कल्लोळात रममाण असते. बदल हा निसर्गाचा नियम या मनालाही लागू आहे. कित्येकदा आज हवीशी वाटणारी गोष्ट, माणसं, वस्तू उद्या नकोशा वाटतात. तर आज डोळ्यांसमोरही नको असणारी व्यक्ती, वस्तू मनात घर करून बसते. मनाच्या या चंचल वृत्तीला आशाताईंचे डोळे या कथेत बंदिस्त केले आहे. मन चंचल आणि भावुक असते. त्यातही स्त्रीचे मन जरा अधिकच भावुक असते. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर तिच्या मनात भावनांचे वादळ उठते. लग्न, आई होणे,

---

१८. कोवळी उन्हं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृष्ठ १२२.

म्हातारपण या सगळ्या वळणांवर तिच्यात होणारे शारीरिक व मानसिक बदल अचंबित करणारे असतात.

डोळे या कथेची नायिकादेखील स्त्रीत्वाच्या महत्त्वाच्या म्हणजेच मातृत्वाच्या टप्प्यावर आहे. या अवस्थेत तिच्या शरीरात आणि पर्यायाने मनातदेखील खूप बदल होतात. एरवी कधीही न जाणवणाऱ्या गोष्टी तिला या काळात तिला जाणवतात. याआधी आवडणाऱ्या अनेक गोष्टी अचानक तिला नावडत्या वाटतात, किळसवाण्या वाटतात.

माणसाचे डोळे त्याचे अंतरंग दाखवतात असे म्हटले जाते. हाच अर्थ या कथेतली नायिका लावते. नुसते डोळेच नाही तर चष्मासुद्धा तिला त्या व्यक्तिच्या अंतरंगापर्यंत नेतो. दवाखान्यात भेटलेली मुलगी व तिचा नवरा, तपासणाऱ्या डॉक्टरीण बाई, मि. आणि मिसेस सबनीस, नायिकेची वहिनी इतकेच नव्हे खुद्द तिच्या नवऱ्याचे डोळे तिच्याशी बोलतात. ती आई होणार आहे हे समजण्याआधी तिला या कशाची पुसटशी जाणीवही होत नसते. तिच्या नवऱ्याचे चष्म्याआडचे अशक्त डोळे तिला नकोसे वाटतात. मध्येच तिला त्याचा सहवास हवाहवासा वाटतो. मनाच्या या चंचलतेचे तिलाही आश्चर्य वाटते. मात्र बाळाच्या जन्मानंतर डोळे आणि त्या अनुषंगाने येणारे विचार नाहिसे होतात. उलटपक्षी आपल्या आयुष्यात येणारी सगळी माणसं सुटे, संदर्भहीन ठोकळे असतात यालाही काही अर्थ नसतो हे तला जाणवते. मनाने ठरवलेल्या गोष्टींमुळे माणसाचे काही चालत नाही हेच खरे.

## ९) वर्तुळ

प्रत्येक माणूस आपापल्या स्वार्थासाठी नात्यांचा, मैत्रीचा परीघ सोडून दुसऱ्या वर्तुळाचा आधार घेतो. एरवी अगदी प्राणाहून प्रिय असणारी व्यक्ती काही प्रसंगात आपल्या आसपासही नकोशी वाटते. आशा बगे यांनी वर्तुळ या कथेत माणसाच्या या स्वार्थी स्वभावाचे चित्रण केले आहे. प्रत्येकाचे स्वतःचे असे एक जग असते. पण वेळ येताच एखाद्या व्यक्तिला बेमालुमपणे आपल्या जगातून काढून टाकण्याचा स्वार्थीपणा माणूस करतो. नीला आणि दिवाकर या दांपत्याच्या माध्यमातून आपापले वर्तुळ जपणारी मानसिकता मित्र असणारे मि. केळकर, दिवाकरला अचानकपणे नकोसे होतात. त्याचवेळी स्वार्थासाठी मिसेस चारींशी मैत्री वाढवण्याचा सल्ला तो नीलाला देतो. असाच एक प्रसंग, कामगार गंगू आणि तिच्याबरोबर काम करणाऱ्या इतर बायकांच्या बाबतीत

घडतो. गंगूच्या बाजूने उभे रहायचे सोडून काम करणाऱ्या इतर बायका आपल्या सोयीच्या वर्तुळाचा आसरा घेतात.

आश्चर्य म्हणजे नीलासुद्धा आपल्या स्वार्थासाठी मिसेस केळकरांकडे दुर्लक्ष करते. आपल्याला एकेकाळी हवी असणारी माणसं आपल्या वर्तुळातून दूर केली जातात. मनुष्य हा स्वार्थी प्राणी आहे. कोणाचेही कोणावाचून अडत नाही तर पुढे पुढे जावेच लागते हा रोखठोक दुष्टीकोन या कथेत आहे.

मारवा या कथासंग्रहातील १३ कथा मनोविश्लेषणात्मक आहेत, मानवी मनाचा तळ शोधणाऱ्या आहेत. प्रत्येक कथेत मन या घटकाची वेगवेगळी रूपे पहायला मिळतात. आपल्या रोजच्या जगण्याशी निगडीत असणाऱ्या या कथा म्हणूनच खूप जवळच्या वाटतात.

## अ.४ समारोप

आशा बगे यांच्या सर्वोत्तम कथासंग्रहांपैकी एक म्हणजे मारवा. या कथासंग्रहात आशाताईंनी मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आशाताईंच्याच शब्दात सांगायचे तर, "व्यक्ती म्हणून जगतानाचे जे आकलन असते ते लेखनातून व्यक्त होताना त्यात काही प्रक्रिया होते. काही मिश्रणे होतात. साऱ्या आकलनाचे एक वेगळेच रसायन होते. लेखक म्हणून जीवनाच्या आकलनाची आणि ते आकळलेले मांडण्याची सारी प्रक्रिया प्रत्यक्ष जीवन जगण्यापासून वेगळी आहे." [१९]

त्यांना त्यांच्या आजुबाजूला घडलेल्या घटनांना वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी काही प्रक्रिया करावी लागत असेलही. पण यामुळे त्यांच्या कथा अधिक परिपक्व होतात. कारण त्यांच्या सगळ्याच कथांमधून लेखक म्हणून जीवनाचे झालेले आकलन दिसून येते. त्यांचा स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन आधुनिक आहे. पण परंपरेशी असलेले नाते त्यांनी तोडलेले नाही. त्यामुळे त्यांच्या कथांमधून परंपरा आणि नवता यांचा ताण जाणवत राहातो. स्त्रियांचे भावविश्व उलगडणाऱ्या आशा बगे यांच्या कथा म्हणूनच सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनाशी सुसंगत वाटतात.

१९. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृष्ठ २३.

## अ. ५ संदर्भसूची


१. आशा बगे, माझे कथालेखन, ललित, जुलै १९८८, पृ. ३७.

२. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ९

३. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ७

४. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १०

५. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १५

६. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, १५

७. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १४

८. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १०

९. मराठीतील कथाविशेष, अंजली सोमण, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृ. १३५.

१०. आशा बगे नवे अस्तित्व, सुलभा हेर्लेकर, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ८३

११. रुक्मिणी, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १५४.

१२. रुक्मिणी, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १६२..

१३. नातं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ७१

१४. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. २३

१५. घरटं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ३८.

१६. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. १.

१७. रंग, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ९०.

१८. कोवळी उन्हं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृष्ठ १२२.

१९. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृष्ठ २३

## ग्रंथसूची

१. माझे कथालेखन

२. मारवा

३. मराठीतील कथाविशेष

४. आशा बगे नवे अस्तित्व

५. वाटा आणि मुक्काम

**ब. अत्तर**

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १) | अत्तर | सत्यकथा, दिवाळी ८१ |
| २) | बंदिशाळा | स्त्री, दिवाळी ८१ |
| ३) | झोपाळ्यावर अभंग कातर | तरुण भारत, दिवाळी ८१ |
| ४) | निवडुंग | अक्षर, दिवाळी ८१ |
| ५) | पाहुणा | हंस, दिवाळी ८३ |
| ६) | नर्सिंग होम | तरुण भारत, दिवाळी ८० |
| ७) | महावस्त्र | साहित्य, दिवाळी ८३ |

**ब. १. – प्रस्तावना**

**ब. २. – शीर्षक कथा**

**ब. ३. – मला भावलेल्या कथा**

**ब. ४. – अन्य कथा**

**ब. ५. – समारोप**

**ब. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

**ब. १. प्रस्तावना**

'अत्तर' या कथासंग्रहातील कथांचा आशय या प्रकरणात पाहू या. 'अत्तर' हा कथासंग्रह पिसारा प्रकाशनाचे दुसरे प्रकाशित पुस्तक. अकोल्यासारख्या आडगावी ग्रंथ प्रकाशनाचा घाट घालणारी ही एक प्रकाशन संस्था. आशाताईंच्या 'मारवा' या कथासंग्रहाने त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली होती. अशा प्रसिद्ध लेखिकेने या नवोदित प्रकाशन संस्थेसाठी पुस्तक लिहिले. पुस्तकाच्या सुरुवातीला प्रकाशिका अनघा देव यांचे बोलके मनोगत आशाताईंमधल्या माणूसपणाला सलाम करायला लावते. त्या म्हणतात, "आशाताईंनी कोणत्याही अटी न घालता आम्हाला आशीर्वाद देऊन कायमचं ऋणी करून ठेवलं आहे. लेखन हे आनंद देण्यासाठी आणि घेण्यासाठी असते हे आशाताईंच्या कृतीवरून दिसून येते. वैशिष्ट्य म्हणजे या सगळयाचा कुठेही पुसटसा उल्लेखदेखील त्या करत नाहीत." अशा 'अत्तर' या कथासंग्रहातील कथांचा आढावा आता घेऊ या.

**ब. २. शीर्षक कथा**

'अत्तर' या कथासंग्रहात सात कथा आहेत. १९८६च्या जानेवारी महिन्यात या कथासंग्रहाचे प्रकाशन झाले. संजय धोतरकर यांनी मृखपृष्ठाचे रेखाटन केले आहे. पिसारा प्रकाशनच्या अनघा देव यांनी पुस्तकाचे प्रकाशन केले असून मूल्य २५ रुपये आहे. सत्यकथा, स्त्री, तरुण भारत, अक्षर, हंस, साहित्य या दिवाळी अंकांमधून कथांची पूर्वप्रसिद्धी झाली आहे.

शीर्षक कथा 'अत्तर' – कथासंग्रहाची सुरुवातच 'अत्तर' या कथेने होते. पूर्वप्रसिद्धी १९८१च्या सत्यकथेच्या दिवाळी अंकात झाली आहे.

'अत्तर' ही आशाताईंची कथा माणसामाणसातील नातेसंबंधांविषयी भाष्य करते. कितीही काळ लोटला तरी एकमेकांशी जोडलेले बंध तसेच राहतात असेही कथा सांगते. फक्त ती नाती किती खरी आहेत यावर ते अवलंबून असते. अस्सल अत्तराचा सुगंध जसा दरवळत राहतो तसा मैत्रीचा सुगंधही दरवळतो. रंगनाथ आणि रावसाहेब यांच्या मैत्रीची, एका आगळ्या वेगळ्या नात्याची ही कथा आहे. रावसाहेब हे गावातले बडे प्रस्थ असते. रंगनाथ गावातल्याच एका कालेजमध्ये शिकवत असतात. 'संगीत' हा त्यांच्या मैत्रीचा धागा आहे. रावसाहेबांच्या श्रीमंतीपुढे सारे गाव झुकते. रंगनाथ मात्र कधीच त्यांच्या श्रीमंतीला भुलून त्यांच्याशी मैत्री करत नाहीत. रावसाहेबांनादेखील रंगनाथचा

हा गुण आवडत असतो.  संगीताचा जबरदस्त कान असणारे रंगनाथ रावसाहेबांच्या विशेष मर्जीतले असतात.  रावसाहेबांचा निरोप येताच हातातली कामे टाकून ते भेटायला जात.  रंगनाथांचे हे वागणे त्यांच्या घरातल्यांना आवडत  नसे.  एकदा अगदी छोट्या कारणावरून रावसाहेब रंगनाथांचा अपमान करतात.  ही गोष्ट जिव्हारी लागून रंगनाथ रावसाहेबांकडे कधीही न जाण्याचा निर्णय घेतात.  नवीन घर बांधून झाल्यावर रंगनाथ तिकडे राहयला जातात.  पण त्याआधी रावसाहेबांचे बोलावणे येते म्हणून तिकडे जातात. मधल्या काळात संपर्क नसला तरी रंगनाथांचे रावसाहेबांशी असणारे नाते तसेच असते हेच यावरून दिसते.  रावसाहेबांची श्रीमंती लयाला गेलेली असते.  ते रंगनाथांकडे पैसे मागतात.  रंगनाथही परफेडीची अपेक्षा न ठेवता पैसे देतात.  एकदा रंगनाथांच्या नव्या घरी रावसाहेब येतात.  आपल्यामधले नाते अगदी तसेच आहे याची दोघांना जाणीव होते. रावसाहेब रंगनाथांची आवड लक्षात घेऊन खसच्या अत्तराचा फाया रंगनाथांना देतात. रावसाहेब निघून जातात, पण अत्तराचा सुगंध तसाच राहतो, त्यांच्यातल्या मैत्रीसारखा. या कथेचा दुसरा अर्थ वाचक म्हणून असाही लावता येतो की, तात्कालिक दुरावलेली नाती रावसाहेब अत्तराच्य सुगंधाने जवळ आणतात.  आपण एकमेकांपासून दूर गेलनो तरी नात्यातला सुगंध तसाच आहे असेच त्यांना सांगायचे असते.

सरंजामशाहीचे शाही वर्णन, अनवट रागांचा उल्लेख आणि कथेचा शेवट वाचकावर सोडून देणे ही या कथेची काही वैशिष्ट्ये सांगता येतील.

### ब. ३. मला भावलेल्या कथा

'अत्तर' या शीर्षककथेपेक्षाही या कथासंग्रहातील इतर तीन कथा मला जास्त आवडल्या.  कारण या कथांमध्ये वाचक म्हणून आपली विचारांची प्रक्रिया सुरू होते. लेखक लिहितोय आणि वाचक ती कथा वाचतोय असे नाते न राहता आपण नकळतपणे त्या त्या कथेत, प्रसंगात स्वतः उपस्थित आहोत याचा अनुभव घेतो.  अशा तीन कथांपैकी मला भावलेली कथा म्हणजे 'पाहुणा'.

### १) पाहुणा

कथेची लांबी कमी असूनही, वाचक म्हणून श्वास रोखून धरायला लावणारी ही कथा आहे.  प्रसंग जसाच्या तसा उभा करणे हे आशाताईंचे लेखन सामर्थ्य आहे. वाचकाला कथा वाचतानाच प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो.  'पाहुणा' या कथेत तर त्यांनी

कमाल केली आहे. रखरखती दुपार आपण प्रत्यक्ष अनुभवतो आहोत असेच वाटते. आग ओकणारा सूर्य, उन्हाने होणारी लाहीलाही, कोळशाचे ढीग, रेल्वेलाईनजवळचे वातावरण या कथेतून डोळ्यांसमोर उभे राहते. कथेचा नायक नरसप्पा कामाच्या शोधात त्या ठिकाणी जातो. तिथले वातावरण पुढील शब्दांमध्ये आशाताई सांगतात, "नरसप्पा तिथं पोचला तेव्हा मध्यान्ह नुकतीच कलली होती. आग पेटल्यासारखं ऊन होतं. कढतकढत झळा कानाची पाळी भाजून काढत होत्या. वाटळीसारखे मधूनच उष्ण धुळीचे लोट उठत होते. त्यात कोळशाची काही धूळही मिसळली होती. जवळच्या रेल्वेलाईनचे तापलेले लोखंडी रूळ उन्हात काळ्या नागासारखेच गेलेले वाटत होते."[२०]

कथेच्या सुरूवातीला आपला नरसप्पाबरोबरचा प्रवास सुरू होतो. नरसप्पा हा जंगलात लहानाचा मोठा झालेला एक धाडसी तरुण असतो. नरसप्पा काम मिळावे म्हणून वणवण करत असतो. तिथेच त्याला दोन अडीच हात लांबीचा नाग दिसतो. नाग शेपटीने पकडून, आपटून मारणे हा नरसप्पाच्या डाव्या हाताचा मळ असतो. या नागाला पाहिल्यावरही मनातल्या उर्मींना नरसप्पा आवरू शकत नाही. पण तो नाग कोळशाच्या ढीगात नाहीसा होतो. त्या नागाला मारण्यासाठी कोळशाचा ढीग उपसणे गरजेचे असते. नरसप्पा फावडे मिळवण्यासाठी बरेच प्रयत्न करतो. त्या नागाला मारण्यासाठी तो झपाटल्यासारखा होतो. अखेर एका ठिकाणाहून त्याला फावडे मिळते. प्रचंड मेहनत करून, इतक्या तळपत्या उन्हात घाम गाळून तो सगळा ढीग उपसतो. आजुबाजुचे लोक मजा बघण्यासाठीच उभे असतात. नरसप्पा मात्र अंगात वीज संचारल्यासारखा नागाला शोधत असतो. शेवटचा ढीग उपसताना नाग सळसळत बाहेर येतो. झाडावरचे कावळे, पक्षी ओरडतात तसा नरसप्पा भानावर येतो. पण नरसप्पाच्या आधीच नाग पुढे येतो आणि त्याच्या पायाला कडकडून दंश करतो. तरीही नागाची शेपटी हातात धरून धुणे धुतल्यासारखा नरसप्पा नागाला आपटतो. आपल्यासारखाच प्रतिस्पर्धी मिळाल्याने नरसप्पाचे डोळे विचित्र चमकतात. नाग मरतो पण त्याच्या प्रतिस्पर्ध्याला घेऊन. नाग खाली पडल्यावर त्याच्या लक्षात येते की फावड्याने नागाला आधीच वर्मी जखम झालेली असते. शेपटीला हात घातला नसता तरी तो संपलेलाच होता. नरसप्पाच्या डोक्यातला उन्माद संपतो. स्वतःचाच पराभव झाल्यासारखा तो थुंकतो तेव्हा त्याच्या तोंडातून फेस येतो. त्याला समजते की आता थोडाच वेळ राहीलाय. "तापवलेला खिळा पाहिजे" असे तो सांगतो. पण तो खिळा मिळेपर्यंत वेळ जातोच. गरम खिळ्याने दंश झालेली

---

२०. पाहुणा, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ८४

जागा नरसप्पा ताकदीने आणि खोलवर उकरतो. पण नरसप्पाची वेळ संपते. उघड्या, थिजल्या डोळ्यात परभवाचा सल रक्तासारखा गोठतो. भर माध्यान्हीला दुरून आलेले हे पाहुणे वस्तीला सुद्धा थांबत नाहीत.

नरसप्पाच्या धाडसी वृत्तीचे कथेच्या सुरूवातीला कौतुक वाटते. पण हेच धाडस त्याचे प्राण घेते. कथेत वाचक म्हणून आपण गुंततो. नरसप्पाचा मृत्यू मनाला चटका लावतो.

## २) महावस्त्र

'अत्तर' या कथासंग्रहातील 'महावस्त्र' ही कथा भारतीय ज्ञानपीठाने प्रसिद्ध केलेल्या 'भारतीय कहानियाँ' या ग्रंथात समाविष्ट केलेली आहे. आशाताई स्त्रियांचे भावविश्व उलगडणाऱ्या कथालेखिका असल्या तरी एवढ्यापुरतेच त्यांनी आपल्या संवेदनशीलतेला बांधून घेतलेले नाही. आश्रित असण्याचे दुःख त्यांच्या कथांमधून वारंवार येते. हा आश्रितपणा कधी वार्धक्याने विकल झालेल्या पिकल्या पानांची असतो.

मनातील भावनांचा उत्कृष्ट अविष्कार म्हणजे 'महावस्त्र' ही कथा. महावस्त्र म्हणजे सोवळे. पण हे सोवळे धुतले नाही तर त्याला एक प्रकारचा दुर्गंध येतो. मग दुर्गंधी येणारे हे वस्त्र महावस्त्र असले तरी वापरण्यायोग्य राहत नाही. देशपांड्यांच्या वाड्यात स्वयंपाकी म्हणून काम करणारे मारेश्वर एका महावस्त्रासारखेच आहेत. त्यांचे उभे आयुष्य देशपांड्यांची चाकरी करण्यात गेले. कोणी मानाने वागवत नसले तरी देशपांड्यांच्या घरातले पानही त्यांच्यावाचून हालत नव्हते. आपल्या वैयक्तिक आयुष्याचा, उत्कर्षाचा, सुखाचा विचार मोरेश्वरांनी कधी केलाच नाही. त्या वाड्यातले सगळे कालांतराने विभक्त झाले तरी मोरेश्वराने वाड्याशी असलेली बांधिलकी जपली अगदी शेवटपर्यंत. मनाने साधा, भोळा मोरेश्वर सोवळ्या इतकाच महत्त्वाचा होता.

मारेश्वराचे निरागस, निष्पाप मन 'महावस्त्र' मधून व्यक्त होते. वाड्यात पाण्याचा हौद मोरीतच असतो. देशपांड्यांची नानू मोरीत अंघोळ करत असते तेव्हा मोरेश्वर हौद धुवत असतो. पण सरळ मनाच्या मोरेश्वराच्या मनाला वाईट विचार शिवतदेखील नाही. नानू शाळेत चहा, दूध काहीच न पिता जाते तेव्हा मोरेश्वर शाळेत चहाची किटली घेऊन जातो. नानूला हे फार विचित्र वाटते. ती त्याच्यावर कायम चिडचिड करते. पण तो नेहमी आपल्या मालकांची मुलगी या आदरानेच तिच्याशी वागतो. सोवळे म्हणजेच धाबळ अर्थातच महावस्त्र. हे महावस्त्र न धुता वर्षानुवर्षे वापरण्याची पद्धत मोरेश्वराला

माहिती होती. त्याचे आयुष्यही असेच असते, वर्षानुवर्षे वापरलेले.

सासरी जाण्याकरीता नानू निघते, तेव्हा मोरेश्वर तिला रिक्षात बसवून देतात. ती त्यांना म्हणते, "तुम्ही फार थकलात मोरेश्वर, तब्येतीला जपा." त्यावर मोरेश्वर म्हणतात, "आता आमचे काय राहिले नानुबाई! देवघरात गुंडाळून ठेवलेली धाबळ...... तिच्यासारखेच आम्ही."[२१]

कथा वाचून झाल्यानंतर वाचक म्हणून आश्रित असूनही समर्पित जीवन जगणाऱ्या मोरेश्वरबद्दल मनात करुणा दाटते.

## ३) निवडुंग

'अत्तर' या कथासंग्रहातील अक्षर दिवाळी या सर्वोत्कृष्ट साहित्याच्या वार्षिक संकलनात समाविष्ट केलेली कथा म्हणजे 'निवडुंग'.

निवडुंग ही अशी वनस्पती आहे जिला निगराणीची गरज नाही. निवडुंगाला पाणी घातले नाही, त्या रोपाची काळजी घेतली नाही तरी ते निपजते, फोफावते. माणसाच्या मनातल्या भावनाही तशाच असतात. त्यांना खतपाणी नाही घातले तरी त्या उगवतात, वाढतात. पण नीट विचार केला तर लक्षात येते की या भावना आपल्या सवयीचाच एक भाग असतात.

एखादी व्यक्ती, वस्तू, घर, जागा सवयीने आपल्या जीवनाचा भाग बनतात. आपल्याला वाटू लागते यांच्याशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. प्रत्यक्षात हा सगळा सवयीचा परिणाम असतो. निवडुंग या कथेत गायत्री स्वतःचे घरदार नसल्याने देऊस्करांच्या घरात आश्रित म्हणून राहते. सवयीने ती त्या घरात रुळते. घरातल्यांनाही तिची सवय होते. आपण आश्रित आहोत याची पूर्ण जाणीव ठेवूनच ती वागत असते. देऊस्करांची मुलगी सुन्नू तिची चांगली मैत्रिण होते. त्यांचा मुलगा विश्वासला ती नकळतपणे आवडू लागते. गायत्रीच्या हे लक्षात येताच ती घर सोडून परत जाण्याचा निर्णय घेते. घरातले इतर लोक सवयीने, सहवासाने तिला जीव लावतात. विश्वास तिच्यावर प्रेम करू लागतो. त्याच्य वागण्याने घरात व बाहेर तिची बदनामी होते. प्रत्यक्षात तिच्याकडून किंवा त्याच्याकडून वावगे काहीही वागले गेलेले नसते. दहा दिवसांचा गणपती विसर्जन करतानाही आपल्या मनाला चुटपुट लागते. गायत्रीला त्या घराची व त्या घराला गायत्रीची सवय झालेली असते. हा जिव्हाळा, हे प्रेम तिला सवयीचे होते. प्रश्न फक्त सवयीचाच

---

२१. महावस्त्र, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. १२८

असतो. आपल्या घरावले आभाळ आपल्या खूप ओळखीचे असते, पण ओळखीचे का सवयीचे? प्रेम, माया, जिव्हाळा हे सुद्धा सवयीचेच असते का? या विचाराने देऊस्करांच्या घरातून जड अंतःकरणाने गायत्री बाहेर पडते.

एकीकडे आश्रित म्हणून राहिलेली गायत्री खंबीरपणे त्या घराला सोडून जाण्याचा निर्णय घेते. जाताना ती विश्वासच्या खोलीकडे बघून नमस्कार करते. म्हणजे तिच्याही मनात विश्वासबद्दल प्रेम फुललेले असते का? पण ज्या घराने आपल्याला आसरा दिला त्या घराला त्रास होईल असे वागयचे नाही म्हणून ती त्याग करते. तिचा हा त्याग त्या दोघांसाठी नक्कीच चांगला नसतो. पण आपल्या सुखासाठी ती देऊस्कारांची बदनामी होऊन देत नाही. या कथेच्या शीर्षकाचा असाही अन्वय लावता येईल की, निवडुंगासारखी वाढलेली गायत्री देऊस्करांच्या छत्रछायेचा त्याग करते तरी पुन्हा जोमाने उभी राहते.

आशाताईंचे वाचकांवर कथेचा शेवट सोडण्याचे कसब या कथेत आढळते. कथेच्या शीर्षकाशी तादात्म्य पावणारा शेवट ज्याच्या त्याच्या मनातला वेगळा असू शकतो. आशाताई वाचकाला फक्त त्या प्रवाहापर्यंत घेऊन येतात. कथेच्या शेवटी आशाताईंनी गायत्रीच्या मनाची अवस्था सूचकतेने वाचकांपर्यंत पोहचवली आहे. त्या म्हणतात, "रिक्षा हलली. कमलवैनी, सुन्नू सगळ्यांनीच हात हलवला. गायत्रीने वर पाहिलं तर विश्वासच्या खोलीतला दिवा लागला. गायत्रीने नकळतपणे हात जोडले."[२२]

**ब. ४. अन्य कथा**

**१) बंदिशाळा**

'अत्तर' या कथासंग्रहातील सर्वच कथा वाचनीय आहेत. वाचक म्हणून विचारांना प्रेरित करणाऱ्या आहेत. आशाताईंच्या कथांमधून परंपरा आणि नवता यांचा संगम आढळतो. परंपरा आणि नवता यामधील ताण 'बंदिशाळा' या कथेत प्रकर्षाने जाणवतो.

ग. दि. माडगूळकरांचे 'जग हे बंदिशाळा' हे गीत या कथेतून अनुभवायला मिळते. 'ज्याची त्याला प्यार कोठडी, कोठडीतले सखे सवंगडी' हे सत्य या कथेतून लेखिकेने वाचकांपुढे मांडले आहे. आहे त्या परिस्थितीत आपण काहीच बदल करू शकत नाही, या कल्पनेने व्याकुळ होऊन बंदिशाळेत आडकलेल्या अनुपमा, वेणू आत्या आणि शिल्पा या कथेत भेटतात. कितीही व्याकुळता आली तरी या बंदिशाळेतून बाहेर पडण्याचा निर्णय कोणीच घेऊ शकत नाही.

२२. निवडुंग, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ८३

अनेकदा वरवर अगदी छान वाटणाऱ्या गोष्टी तशा नसतात. कोणता तरी सल मनाला पोखरत असतो. पण बाहेरून लोकांना या दुःखाचे काहीच वाटत नाही. इतका बाऊ करण्यासारखे काय आहे त्यात? असा प्रश्न लोकांना पडतो.

अनुपमाचे लग्न एका सुशिक्षित डॉक्टरशी झाले आहे. त्यांना एक मुलगा आहे. असे असतानाही ती आपले घर सोडून माहेरी कायमचे जाण्याचा निर्णय घेते. माहेरी गेल्यावर तिला जाणवते की, चार दिवसांची पाहुणी म्हणून सुरुवातीला तिचे आदरातिथ्य होते, पण प्रत्यक्षात तिची आईसुद्धा तिच्या या निर्णयाला दुजोरा देत नाही. तिची वेणू आत्या आणि शेजारी राहणारी शिल्पा तिला समदुःखी वाटतात, प्रत्येकीची व्यथा वेगळी असते. एखादी व्यक्ती जेव्हा आतून दुखावली जाते तेव्हा त्या व्यक्तीला तिच्या दुःखाची तुलना कशाचीही कराविशी वाटत नाही. स्वतःचा असा वेगळा विचार करावासा वाटतो. स्वतंत्रपणे आपल्या आयुष्याचा विचार करता न येणाऱ्या या तिघी. आहे त्या परिस्थितीत आपण काहीच बदल करू शकत नाही या कल्पनेने बंदिशाळेत अडकतात. कितीही व्याकुळ झाल्या तरी या बंदिशाळेतून, कोठडीतून त्यांची सुटका होत नाही. या बंदिशाळेतून बाहेर येण्याचा धाडसी निर्णय अनुपमा घेऊ इच्छिते, पण तो निर्णय ती घेऊ शकत नाही. नाईलाजाने पुन्हा एकदा तिला त्याच बंदिशाळेत जावे लागते.

धाडसी निर्णय घेणे इतके सोपे नाही, पण या बंदिशाळेत अडकून राहवे लागते. अगतिकता, कोंडमारा, घुसमट या भावनांचे एकत्रीकरण अनुपमा या व्यक्तीरेखेत प्रकर्षाने जाणवते. अनुपमा कथेच्या शेवटी मार्मिक बोलते. "आपलं हे असं परत जाणं फक्त आपलं एकटीचं थोडं आहे? ते वेणूआत्याचं आहे, शिल्पाचं आहे आणि कितीतरी जणींचं आहे."[२३]

## २) झोपाळ्यावर अभंग कातर

'झोपाळ्यावर अभंग कातर' ही कथा आहे, वार्धक्याने विकल झालेल्या अप्पांची. घरामध्ये ज्येष्ठ नागरिकांचे महत्त्व कोणालाही कळत नाही. दोन प्रेमाचे शब्द, जिव्हाळा आणि आपुलकी या व्यतिरिक्त त्यांना काही नको असते. पण नेमक्या या गोष्टींपासूनच ते वंचित राहतात. आपले सगळे आयुष्य, आपले घरदार, मुलेबाळे यांच्यासाठी दिल्यानंतर वार्धक्याने निर्माण झालेली पोकळी त्यांना खायला उठते.

एखादी व्यक्ती जेव्हा आपल्या जवळ असते तेव्हा तिची किंमत कळत नाही.

---

२३. बंदिशाळा, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ४९

ती व्यक्ती दूर गेल्याने तिच्या असण्याने जेवढा त्रास होत नाही तेवढा तिच्या नसण्याचा होतो. घरातल्या ज्येष्ठ व्यक्तींबाबत हे जास्तच प्रकर्षाने जाणवते. माणसाचे वय झाले की तो अधिकाधीक हट्टी बनतो. अगदी लहान मुलासारखे वागतो. म्हातारपण म्हणजे दुसरे बालपण हे बाकीच्यांना अनुभवायला मिळते. या कथेतील अप्पांचेही तसेच झाले आहे. वाढत्या वयामुळे आलेला एकाकीपणा त्यांना खायला उठतो. आपल्याशी कोणीतरी बोलावे अशी त्यांची माफक अपेक्षा असते. उतारवयात पुरुषांची अवस्था स्त्रियांपेक्षा जास्त बिकट होते. कारण स्त्रिया संसारात आपले मन रमवू शकतात. पण पुरुष आपल्या जोडीदाराशिवाय जास्तच एकटे पडतात. पण घरात प्रत्येक जण आपापल्या व्यापात व्यग्र असल्याने त्यांच्याकडे तितकेसे लक्ष दिले जात नाही. घरात कायम असणाऱ्या माणसाला अशा वयस्कर मंडळींचे बदलणारे मूडस् सांभाळावे लागतात. एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगण्याच्या सवयीने समोरचा माणूस पूर्णपणे वैतागतो. पण वयोमानाने आलेल्या विक्षिप्तपणामुळे याची त्यांना जाणीवच नसते. आपण दुसऱ्याला त्रास देतोय हे त्यांचा गावीही नसते. या कथेतही पद्‌माला म्हणजे त्यांच्या सुनेला अप्पा सतत असा त्रास देत असतात. या त्रासाची पद्‌माला सवय होते. अप्पा घरात असले की ते सारखे पद्‌माशी बोलण्याचा प्रयत्न करतात. पद्‌माला शांत राहवेसे वाटले तरी प्रश्नांचा भडिमार करतात. सगळी कामे वेळेतच झाली पाहिजेत असा आग्रह धरतात. पद्‌माला हे जाचक वाटते, पण दुसऱ्या बाजूला तिला त्यांचाच आधार वाटतो. अप्पा चार दिवस गावाला जातात तेव्हा पद्‌माला त्यांच्या असण्याची किंमत कळते. कातरवेळी झोपाळ्यावर बसून अभंग म्हणणारे अप्पा तिला आठवतात. त्यांची तिला खूप आठवण येते. अभंगाची पुढची ओळ कोणती गं? असे ते विचारतायत की काय असा भास होतो. कातरवेळी अप्पांच्या आठवणीने तिच्या मनात हुरहुर दाटते.

### ३) नर्सिंग होम

परंपरा आणि नवतेच्या ताणात सापडलेली कथा 'नर्सिंग होम'. परंपरेशी असलेले नाते तोडता येत नाही आणि आधुनिक विचारांची कास धरता येत नाही. अशा कात्रीत सापडलेली सुचरिता कथेची नायिका आहे. क्षणभंगुर आयुष्य महत्त्वाचे की आपला अहंकार याचे उत्तर तिला कथेच्या शेवटी मिळते.

आपल्या आयुष्याला प्रवासाची उपमा दिली तर ज्याचे स्टेशन येते त्याला उतरून जावेच लागते. कथेची नायिका या कथेत नर्सिंग होमला माणसाचे आयुष्य समजते.

प्रत्येकाला पेशंटप्रमाणे या नर्सिंगहोममध्ये दाखल व्हावे लागते. पुढे काय होणार हे काणालाच कळत नाही. बांधलेले अंदाज चुकतात, जे आहे ते मान्य करावे लागते. सुचरिता डॉक्टर असते. स्वतःचे असे विचार करणारी एक निष्णात डॉक्टर. 'लग्न' या संस्काराविषयी तिच्या मनात विनाकारण अढी आहे. फार जवळ गेल्याने माणसाचे रंग बदलतात. एकमेकांवर चमत्कारिकपणे अधिकार गाजवण्याची वृत्ती वाढते असे तिला वाटते. कोणाच्या जास्त जवळ गेले की, करपत्या उन्हाने रंग उडालेले पोपडे निघतात असे आयुष्य होते असे तिला वाटते. राघवचे तिच्यावर मनापासून प्रेम असते. तिच्याशी लग्न करण्यासाठी तो अनेक वर्षे तिची वाट पहातो आहे. आपण भावनाशील नसून कणखर आहोत असे सुचरिताला वाटत असते. आपल्याला कोणाचीही गरज नाही असे तिला वाटत असते. पण हा सगळा तिचा गैरसमजच ठरतो. नर्सिंगहोममधल्या एक-दोन घटनांमुळे तिच्यातला हळवेपणा तिला प्रकर्षाने जाणवतो. अनेक मुद्द्यांना ती निव्वळ तिचा हट्ट म्हणून धरून बसली आहे याची तिला जाणीव होते. नर्सिंगहोममध्ये हरवलेला तिचा हळवा स्वभाव तिथेच तिला गवसतो. एका पेशंटच्या बाबतीत आलेल्या पराभवामुळे राघवच्या प्रेमाची तीव्रता तिला जाणवते. आपले आयुष्य इतके क्षणभंगुर असेल तर त्यापेक्षा आपला अहंकार (इगो) महत्त्वाचा नाही हे तिला पटते व ती राघवला होकार देते. हा होकार नक्की कशामुळे असा तिला प्रश्न पडतो. ती म्हणते, "राघवनं माझ्या खांद्यावर हात ठेवला तेव्हा मला फक्त एकच वाटलं, राघवचा फोन त्या नेमक्या पराभूत क्षणी आला नसता तर मी काय केलं असतं? त्याला हो म्हणता आलं असतं का मला?" [२४]

**ब. ५. समारोप**

'अत्तर' या कथासंग्रहात सात कथा आहेत. कथांची संख्या 'मारवा' पेक्षा कमी आहे. पण लेखिका म्हणून आशाताईंची उंची अत्तरमध्ये वाढलेली जाणवते. माणसांमाणसांतील नातेसंबंधाविषयी भाष्य करणाऱ्या या सगळ्या कथा वाचक म्हणून अंतर्मुख करतात. प्रत्येक कथा लिहिण्यामागे काहीतरी उद्देश आहे हे जाणवते. कथेत संगीताचा धागा आहेच. परंपरा आणि आधुनिक विचार या कात्रीत सापडलेल्या स्त्रिया, आश्रितांचे दुःख आणि वार्धक्यातले ताणतणाव 'अत्तर' या कथासंग्रहातून आशाताई वाचकांसमोर मांडतात. या कथा वाचताना आपल्या असे लक्षात येते की, या कथांमध्ये

२४. नर्सिंग होम, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ११३

आपणही सामावलेले आहोत.  आपल्या आजुबाजुला चाललेल्या सगळ्या गोष्टी आशाताई लिहित आहेत असे जाणवते.  कथेचा शेवट न करता त्या प्रवाहापर्यंत वाचकाला घेऊन जातात.  वाचकाने आपल्या स्वानुभवाने कथेच्या शेवटाची कल्पना करावी असे त्यांना अभिप्रेत असावे.  कारण वाचकावर आपली मते लादण्यापेक्षा कथेचा शेवट वाचकाने आपल्या मताप्रमाणे करावा असे त्यांना अभिप्रेत असावे.  दर्जेदार अशा या सात कथांचा सुगंध अत्तराप्रमाणे मनात दरवळतो.

## ब. ६  संदर्भसूची

२०. पाहुणा, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ८४

२१. महावस्त्र, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. १२८

२२. निवडुंग, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ८३

२३. बंदिशाळा, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ४९

२४. नर्सिंग होम, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ११३

## ग्रंथसूची

१. अत्तर

**क.    पूजा**

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | चितारओळ | केसरी, दिवाळी १९८४ |
| २ | अरण्य | दीपावली, १९८६ |
| ३ | नवस | किस्त्रिम, दिवाळी १९८६ |
| ४ | सायकल | रसिक, दिवाळी १९८६ |
| ५ | प्रदीर्घ | रसिक, दिवाळी १९८२ |
| ६ | देठ | तरुण भारत, दिवाळी १९८३ |
| ७ | अपूर्ण | अक्षर, दिवाळी १९८५ |
| ८ | खडक | तरुण भारत, १९८५ |
| ९ | पूर | महाराष्ट्र टाईम्स, दिवाळी १९८१ |
| १० | पूजा | दिवाळी १९८४ |

**क. १. –    प्रस्तावना**

**क. २. –    शीर्षक कथा**

**क. ३. –    मला भावलेल्या कथा**

**क. ४. –    अन्या कथा**

**क. ५. –    समारोप**

**क. ६. –    संदर्भसूची / ग्रंथसूची**

**क. १. प्रस्तावना**

मध्यमवर्गीय व उच्च-मध्यमवर्गीय कुटुंबातील व्यक्तींचे नातेसंबंध, त्यांचे रीतीरिवाज आणि त्यांचे दैनंदिन जीवन यांचे सुस्पष्ट प्रतिबिंब आशा बगे यांच्या कथांमधून नेहमीच प्रत्ययाला येते. या कुटुंबातील वृद्ध, तरुण, मुले यांच्या जीवनातल्या छोट्या-मोठ्या घटनांचे चित्रीकरण 'पूजा' या कथासंग्रहातून प्रत्यकारीरित्या आले आहे.

छोट्या शहरांमधले वातावरण पात्रांची मानसिक आंदोलने, संवादांमधून व वर्णनातून डोळ्यांसमोर उभी राहणारी व्यक्तिचित्रे या सगळ्या गोष्टी वाचकाला एका वेगळ्या वातावरणात घेऊन जातात. आशाताईंचा पूजा हा दीर्घकथांचा पहिला संग्रह आहे.

लघुकथा, दीर्घकथा व कादंबरी या तीनही साहित्य प्रकारात आशाताईंना लघुकथा

जवळची वाटते. लघुकथा कठीण परंतु उदात्त साहित्यप्रकार. दीर्घकथेविषयी त्या म्हणतात, "दीर्घकथेमध्ये एकच एक संस्कार अनुभवाच्या अंगाने होतो. तो अनेक पदरांनी, अनेक स्तरांना जातो. जीवनही आता एकरेघी राहिले नाही. त्यामुळे कथा दीर्घकथेच्या वाटेने जाणार आहे." [२५]

लघुकथा कितीही जवळची असली तरी दीर्घकथा अपरिहार्य आहे. या विचाराने लिहिलेल्या सगळ्या दीर्घकथा तितक्याच दर्जेदार आहेत. अर्पणपत्रामध्ये आशाताईंनी, "ती. बाबाला, आयुष्यात तू राखलेला समतोल मलाही साधावा म्हणून....." असा मजकूर लिहिला आहे. यावरून वडिलांशी असलेले मैत्रीपूर्ण नाते दिसून येते. तसेच लिखाणातला समतोल त्यांच्या मनाचा समतोलही दर्शवतो.

अशोक कोठावळे यांच्या मॅजेस्टिक प्रकाशनाने नोव्हेंबर १९८९ मध्ये 'पूजा' या कथासंग्रहाचे प्रकाशन केले आहे. या कथासंग्रहात दहा कथा आहेत. मुखपृष्ठ बुवा शेटे यांनी रेखाटले आहे. केसरी, दीपावली, किस्त्रिम, रसिक, तरुण भारत, अक्षर, महाराष्ट्र टाईम्स या दिवाळी अंकांमध्ये या कथा यापूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेत. या कथासंग्रहातील शीर्षककथेचे कथानक जाणून घेऊ या.

**क. २. पूजा**

मध्यमवर्गीय कुटुंबात पूजा, परंपरा, धार्मिक कार्य याला महत्त्वाचे स्थान असते. देवाची पूजा रोज झालीच पाहिजे असा आग्रह असणाऱ्या दादांच्या घरात 'पूजा' या कथेचे कथानक घडते.

पूजा या धार्मिक संस्काराविषयी असणारे विचार बदलावयाला लावणारी ही कथा आहे. उपचार म्हणून केलेली पूजा वरवर समाधान देते. परंतु आपल्या आंतरमनातील सद्‌गुणांची जोपासना अशा पद्धतीने केलेली पूजा करेलच असे नाही. दादांकडे महादेवकर गुरुजी रोज पूजा करायला येत असतात. त्यांना तीर्थयात्रेला जायचे असते म्हणून त्यांचा बारा, तेरा वर्षांचा मुलगा रोज पूजेला येतो. दादांना मनापासून हे पटत नसते. पण दादा नाईलाजाने बाळकृष्णाच्या हातची पूजा मान्य करतात. सुरुवातीला अजिबात न आवडणारा बाळकृष्ण हळूहळू दादांच्या घरात रुळतो. दादांच्या मुलाला, अनिलला बाळकृष्ण अजिबात आवडत नसतो. पण ललिता मात्र बाळकृष्णासाठी जेवण बनवणे, त्याला चहा करून देणे, पूजेची तयारी करून देणे अशी मदत करत असते. एकदा

२५. आशा बगे नवे अस्तित्व, सुलभा हेर्लेकर, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ८७

बाळकृष्णाला ताप येतो म्हणून दादा त्याला औषध देतात. त्यावेळी घरात कोणीच नसते. त्यानंतर दादांना देवाची चांदीची उपकरणे गायब झाल्याचा संशय येतो. कारण देवघरात ही उपकरणे दिसत नाहीत. दादांच्या मनात लगेच येते की हे काम बाळकृष्णाचेच असणार. पण प्रत्यक्षात बाळकृष्ण तापाने फणफणलेला असतो. त्याला ॲडमिट केले जाते. काही काळानंतर चांदीची उपकरणे घरातच सापडतात. तेव्हा मात्र दादांना स्वतःच्या कोत्या मनोवृत्तीचा राग येतो. आयुष्यभर पूजा व्हावी म्हणून केलेला अट्टाहास त्यांना व्यर्थ वाटू लागतो. कारण पूजेबाबत इतके आग्रही राहूनही त्यांच्या स्वभावात बदल झालेला नसतो हे त्यांच्याच लक्षात येते. म्हणूनच दादा म्हणतात, आयुष्यभर मांडलेली पूजा हातून मोडली होती. कदाचित आपण पाळत आलो तो फक्त पूजेचा उपचारच.

दादांच्या मनातील विचार प्रभावीपणे 'पूजा' या शीर्षककथेत लेखिकेने मांडले आहेत. मध्यमवर्गीय, पूजाअर्चा मानणारे दादा पूजेबाबत आग्रही असतात. आपल्याला नित्यनेमाने पूजा करणे शक्य होत नाही म्हटल्यावर पुजारी ठेऊन पूजा करवून घेतात. पूजा होण्याने त्यांना प्रसन्न वाटत असते. पण कथेमध्ये दादांच्या विचारांचे प्रतिबिंब छान उमटले आहे. पूजा हा धार्मिक उपचार वरवर करण्याने मन शुद्ध होत नाही. तर शुद्ध मनाने केलेले कोणतेही काम मनःशांती मिळवून देते हे या कथेचे सार आहे.

**क. ३. मला भावलेल्या कथा**

'पूजा' या कथासंग्रहात स्त्री व्यक्तिरेखांइतकेच पुरुष व्यक्तिरेखांनाही आशाताईंनी महत्त्व दिले आहे. मला भावलेल्या कथांपैकी २ कथांमध्ये पुरुष व्यक्तिरेखा मुख्य आहेत. भावनांचा कल्लोळ स्त्री-पुरुष असा भेद करत नाही. 'मन' हा मुख्य गाभा. मनात भावनांचे, विचारांचे थैमान चालूच असते. संवेदनशील 'मन' हा त्यांच्या कथांचा गाभा आहे.

**१) अरण्य**

कथेचे शीर्षक बोलके आहे. हे अरण्य आहे कथेचा नायक रघुनाथ याच्या मनातले. अरण्यामध्ये ज्याप्रमाणे अपेक्षित रस्ता, मुक्काम मिळणे कठीण असते, तसेच रघुनाथचे झाले आहे. पण कथेतच या कठीण प्रश्नाचे उत्तर मिळते. रस्ता मिळणे अवघड असले तरी अशक्य नसते. एकदा मनाचा निश्चय केला की अवघड वाटणाऱ्या गोष्टी सोप्या होतात.

या कथेतील रघुनाथ आपल्या भविष्याबाबत निर्णय घेताना संभ्रमावस्थेत पडलेला असतो. मात्र आपल्या आवडीचा विचार करून व आपल्या अंतरमनाचा प्रतिसाद ऐकून तो निर्णय घेतो. सुखवस्तू कुटुंबातील रघुनाथ बी.टेक. होतो. मुळातच त्याला कलेची आवड असते. आपल्या आवडीप्रमाणे कॉलेज करता-करता तो सतार वाजवायला शिकतो. या कलेच्या तो अक्षरशः प्रेमात पडतो. यामुळे बी.टेक. झाल्यावर चांगल्या पगाराची नोकरी न करता किंवा पुढील शिक्षण न घेता, आपल्या मनाप्रमाणे पूर्णवेळ कलेला वाहून घ्यायचा निर्णय घेतो. हा निर्णय त्याच्यासाठी सोपा नसतो. कुटुंबियांचा विशेष पाठिंबा नसताना आपल्या मनाची साद तो ऐकतो. शास्त्रीय संगीतातील रागांचे सुरेख वर्णन या कथेत आहे. उदा. १) भुरभुर पाऊस आणि ऊन पाहिले की 'शुद्ध सारंग' आठवतो. २) निबीड अरण्याचे पेंटिंग आणि त्यात सूर्यप्रकाशाचा झोत पाहिला की 'पूरिया' हा राग स्मरतो. कथेतील काही वाक्ये कथेला एका वेगळ्याच उंचीवर नेतात. उदा. "एकेकाची एकेक वेळ असते. उमलण्याची, झाडापासून सुटून पडण्याची." [२६]

आपल्या मनासारखा निर्णय घेतल्याने रघुनाथला ओळखीचं आभाळ गवसते. मनासारखा रियाज केल्यानंतर जो आनंद मिळतो तो आनंद त्याला त्याच्या आवडत्या सतारीसोबत राहण्याची इच्छा पूर्ण झाल्यावर होतो. अरण्यात रस्ता सापडणे कठीण असते पण अशक्य नाही असा आशावाद ही कथा निर्माण करते.

## २) नवस

'नवस' म्हणजे आपली इच्छा पूर्ण व्हावी याकरता देवाला काहीतरी देण्याचे कबूल करणे. नवस बोलणे आपली मानसिक गरज असते. देवाला नवस बोलण्याची गरज नसतेच. पण शेवटी आयुष्यात चांगले-वाईट, सुख-दुःख सगळे मनावरच अवलंबून असते ना! नवस बोलून मिळणारे मानसिक समाधान तो पूर्ण केल्याने अधिक वाढते.

या कथेची नायिका रेवती बोललेला नवस पूर्ण करण्यासाठी आपल्या मामांच्या गावी पंढरपूरला येते. तिच्या मुलाची, श्रीची मुंज विठ्ठलासमोर लावेन हाच तो नवस. या नवसाचे महत्त्व ती सोडून घरातल्या कोणालाच वाटत नाही. या गोष्टीचा रेवतीला त्रास होतो. फक्त तिच्या इच्छेखातर तिचा नवरा श्रीधर आणि मुलगा श्री पंढरपूरला यायला तयार होतात. तिचे दिगू मामा पंढरपूरला असतात. आपल्या आजोळच्या आठवणी मनात घेऊन ती पंढरपूरला येते. पत्र पाठवून दिगूमामांना ती सगळे कळवते. पत्राचे उत्तर

---

२६. अरण्य, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, १९८९, पृ. ५०

लिहिताना दिगूमामा अतिशय कोरडेपणाने लिहितात. पण प्रत्यक्ष भेटल्यावर रेवतीला हा कोरडेपणा जाणवत नाही. दिगूमामा व मामींना प्रत्यक्ष आयुष्यात दुःख सहन करावे लागत असले तरी ते तसे कधीच दाखवत नाहीत. आपलेपणाने सगळे करतात. श्रीधर आणि श्रीच्या वागण्यात मात्र कृत्रिमता असते. श्रीची मुंज तो कॉलेजच्या वयाचा झाल्यावर होते. दोन मुलींवर झालेला मुलगा म्हणून तिने हा नवस बोललेला असतो. तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी नाईलाजाने म्हणून का होईना ते दोघे येतात. पंढरपूरला आल्यानंतर नवस पूर्ण केला जातो. पंढरीच्या विठोबापुढे उभे राहताना तिचे भान हरपते. नवस पूर्ण झाल्यावर, दर्शन झाल्यावर हा प्रवास संपणार याचे तिला वाईट वाटते. आजोळाहून तिचे पाय निघत नाहीत. दिगूमामांच्या घरात वारकऱ्यांचा मुक्काम कायमच असे. विठोबाचे दर्शन झाल्यावर ते सुद्धा परतीच्या मार्गाला लागतात.

नवस बोलणे आणि तो पूर्ण करणे ही रेवतीची मानसिक गरज असते. कोणाला ते अंधश्रद्धेसारखे वाटले तरी विठोबासमोर उभे राहिल्यानंतर तिची झालेली अवस्था तिच्यापुरती एकदम खरी होती.

## ३) सायकल

आश्रित असण्याचे दुःख आशाताईंच्या कथांमध्ये वारंवार येते. हा आश्रितपणा कधी स्त्रियांच्या बाबतीत असतो तर कधी अनाथ, गरीब किशारांचा असतो. सायकल ही कथा सोमनाथ या होतकरू, कष्टाळू मुलाची आहे. विषय कोणताही असला तरी आशाताईंच्या कथांची नाळ मनाशीच जोडलेली असते. आपल्या आयुष्यात येणाऱ्या बऱ्या-वाईट प्रसंगांमध्ये आपले मनच त्या त्या प्रसंगाची परिणामकारकता कमी किंवा जास्त करते. म्हणजे एखादे मोठे संकटदेखील मनाच्या खंबीरपणामुळे लहान वाटते किंवा मनाच्या कमकुवतपणामुळे लहानशा संकटालादेखील तोंड देता येत नाही.

'सायकल' या कथेतील सोमनाथ हा एक अतिशय साधा, सरळ, कष्टाळू व अभ्यासू मुलगा आहे. घरची गरीबीची परिस्थिती असल्याने तो हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेत असतो. घरापासून लांब राहून, दुसऱ्यांकडे जेवण करून, काटकसरीने शिक्षण पूर्ण करत असतो. देशमुख यांच्या घरात आश्रितासारखे जेवायला जाणे त्याला थोडे विचित्र वाटते. पण परिस्थितीपुढे तो हतबल असतो. पोटाला चिमटा काढून त्याची आई व आजोबा त्याला शिकवत असतात. या गोष्टीची त्याला पूर्ण जाणीव असते.

एकदा परीक्षेचा फॉर्म भरायला उशीर होतो म्हणून तो देशमुख काकूंच्या मुलीची

म्हणजेच कल्पनाची सायकल घेऊन जातो. मात्र दुर्दैवाने ती सायकल कॉलेजमधून चोरीला जाते. त्यामुळे सोमनाथच्या पायाखालची जमीन सरकते. ही गोष्ट कोणालाही कळू नये असे त्याला वाटत असते. देशमुखांकडे जाणेच त्याला नकोसे वाटू लागते. पण पोटाची खळगी कशी भरणार हा प्रश्नही असतोच. जेवायला गेल्यानंतर तो देशमुख काकूंना सगळे खरे सांगतो. पण आश्चर्य म्हणजे सोमनाथला वाटते तेवढे काकू अजिबात चिडत नाहीत. सायकल चोरीला गेल्याने बेचैन झालेल्या सोमनाथला काकूंच्या या प्रतिक्रियेचे नवल वाटते. सायकल हरवल्याने दोन दिवस तो नीट जेवत नाही. त्याला चैन पडत नसते. मात्र काकू काहीच बोलत नाहीत. उलट दुसऱ्या दिवशी जेवायला ये असे सांगतात. सोमनाथच्या मनातली उलघाल वाचकाचे मनदेखील अस्वस्थ करते. सोमनाथच्या जागी स्वतःला पाहून सायकलचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो.

## ४) पूर

आशाताईंनी कुमार वयातल्या मुलांच्या मनातील निरागस भाव, त्यांची मैत्री पूर या कथेतून दाखवली आहे. मैत्री आणि प्रेम यांच्या सीमारेषेवरचे हे नाते आहे. बालपणापासून पौगंडावस्थेत जाताना मुलगा म्हणून चिंतूच्या मनाची अवस्था या कथेमधून लक्षात येते.

मनामध्ये विचारांचा पूर आल्यानंतर आणि तो ओसरल्यानंतर राहिलेल्या खुणा माणूस म्हणून कशा अनुभवल्या जातात याचे वर्णन या कथेत आहे. नदीला आलेल्या पुराचे व मनातल्या विचारांचे सारखेपण अतिशय परिणामकारकररित्या या कथेत अनुभवायला मिळते. वरवर पाहता पूर ओसरला आहे असे दिसते, आभाळाच्या रेषेला भिडलेले गढूळ, गहिरे पाणी मागे सरते. पण चिखलाचे भयाण, भेसूर रूप मागे राहते.

चिंतू आणि गौरी या दोन मुख्य पात्रांभोवती ही कथा फिरते. त्यांची निरागस मैत्री या कथेत जाणवते. चिंतू आणि गौरी ज्या गावात रहात असतात तिथे पूर येतो. या पूरात गौरीचे घर पाण्याखाली जाते म्हणून गौरीचे कुटुंब चिंतूकडे रहायला येते. या कारणामुळे चिंतू आणि गौरीमध्ये मैत्रीचे नाते जुळते. गौरीला पोलिओ झालेला असतो त्यामुळे तिला न्यूनगंड असतो. चिंतूला मात्र गौरी नेहमीच त्याच्यापेक्षा प्रत्येक गोष्टीत सरस वाटते. गौरी चांगलीच असते, पण चिंतूच्या आईला ती विशेष आवडत नसते.

चिंतू आणि गौरी दोघेही मोठे झाल्यानंतर गौरीच्या वडिलांचे चिंतू आणि गौरीचे लग्न व्हावे यासंदर्भातले पत्र येते. चिंतूच्या आईला गौरी सून म्हणून पसंत नसते. गौरीचे

लग्न एका श्रीमंत घरी होते, पण तिचा नवरा सतत आजारी असतो. चिंतू मात्र लग्न करत नाही. तिला भेटायला तिच्या सासरी गेल्यावर गौरीची अवस्था बघवत नाही. आपण गौरीशी लग्न करायला हवे होते असा विचार त्याच्या मनात येतो. त्याच्या मनातल्या विचारांचा पूर त्याला अस्वस्थ करतो. पूराचे पाणी ओसरले पण मागे खुणा सोडून. या कथेत आपण गुंतत जातो. प्रत्येक प्रसंग आपण स्वतः अनुभवतोय असे वाटते. पूराच्या खुणा जशा मागे रहातात तसेच कथा वाचून झाली तरी मनात खुणा तशाच रहातात.

**क. ३. अन्य कथा**

पूजा या कथासंग्रहातील अन्य कथांमध्ये वाचक म्हणून आपण तितकेच हरवून जातो.

**१) चितारओळ –**

मूर्ती घडवणाऱ्या एका शिल्पकाराची विमनस्क अवस्था कथेतून दिसते. हीसुद्धा पुरुषप्रधान कथा आहे. निराशेला पळवून लावण्यासाठी मनात आशेचा किरण निर्माण होणे आवश्यक असते. बऱ्याचवेळा आपल्या मनाने एखादी नकारात्मक गोष्ट ठामपणे मनाशी बाळगली की या निराशेतून आपण कधीच बाहेर पडू शकणार नाही असे आपल्याला वाटते. पण अशावेळी अचानक आशेचा एक किरण जीवनाला पुन्हा एकदा नवी दिशा देतो. आशेचा हा किरण दाखवणारी व्यक्ती घटना, जागा फार महत्त्वाची ठरते. श्रीपाद आणि सदाशिव या दोन जीवलग मित्रांची ही कथा आहे. मूर्ती घडवणारा सदा आपल्या वडिलांकडून प्रेरणा घेऊन मूर्ती घडवत असतो. उच्च घराण्यातला श्रीपाद त्याचा मित्र असतो. श्रीपाद अमेरिकेला जाऊन उच्च शिक्षण घेतो. त्या काळात सदाच्या वडिलांचे निधन होते. निराशेच्या गर्तेत सापडलेला सदा मूर्ती घडवणे बंद करतो.

कथेचे नाव चितारओळ आहे. चितारी म्हणजे मूर्ती घडवणारा. या चितारींची वस्ती म्हणजे चितारओळ. सदाची बहिण सरोज व श्रीपाद यांच्यामध्ये नाजूक असे रेशीमबंध असतात. मैत्री व प्रेम यामधली अवस्था ते दोघेही अनुभवत असतात. एकमेकांची काळजी घेत असतात. एकमेकांचे हित चिंतत असतात. त्यामुळेच श्रीपादच्या प्रगतीत सरोज अडथळा बनत नाही. सरोजशी लग्न करणे शक्य नाही हे कळल्यावर स्वतःचा निश्चित, निर्वेध रस्ता आखून श्रीपाद देर जातो. आपल्या प्रोत्साहनामुळे सदा पुन्हा एकदा मूर्ती घडवण्याचा विचार करतो आहे याची श्रीपादला पुसटशी जाणीवही नसते. या सगळ्या खुणा मागे सोडून श्रीपाद हमरस्त्यावर येतो, चितारओळीच्या आठवणी मागे

ठेवून. कथेचा शेवट वास्तवाला धरून असला तरी मनाला चटका लावतो. श्रीपाद आणि सदाच्या मैत्रीचा आदर्श मनात रेंगाळतो. मात्र सरोजवर असणारे प्रेम श्रीपाद का गमावतो? असा प्रश्न पडतो. "गजबजलेली चितारओळ, तिथला रंगांचा, मातीचा वास, औदुंबर, सदाच्या अंगणातला दगडी चबुतरा, सरोज....सारं मागे राहिलं होतं, गणपतीच्या मूर्ती आणि मूर्तीकाराची रंग-मातीत माखलेली कलावंत बोटंसुद्धा....." [२७]

## २) प्रदीर्घ

बालपण, तारुण्य आणि वार्धक्य हे मनुष्याच्या जीवनाचे तीन टप्पे आहेत. त्यातल्या त्यात बालपण व तारुण्य कधी येते आणि कधी जाते कळत नाही. वार्धक्य मात्र सरता सरत नाही. आपल्या वयाचे सगळे आपली साथ सोडून गेल्यावर हे वार्धक्य जास्तच अंगावर येते. मरण येत नाही आणि जगावेसे वाटत नाही. अशी मनाची अवस्था होते. त्यामुळे प्रदीर्घ असे हे वार्धक्य नकोसे वाटते. 'प्रदीर्घ' या कथेतील नानांनादेखील त्यांचे हे प्रदीर्घ असे वार्धक्य नकोसे झाले आहे. आपल्याच घरातले लोक आपल्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करीत आहेत अशी नानांची समजुत होते. त्यांचा मुलगा, सून, नातवंडे इतकेच नाही तर कामावर असणारी मोलकरीणदेखील त्यांचा शब्द खाली पडू देत नाही. मात्र नानांना सतत एकटेपणा जाणवतो. आपली कोणाला गरज नाही व कोणाचे आपल्याकडे लक्ष नाही असेच त्यांना सतत वाटते. नानांच्या वयाचे त्यांचे मित्र हे जग सोडून गेलेले असतात. काही मृत्यूची वाट पहात आहेत. नानांना एका गोष्टीचा राग येतो. तो म्हणजे, त्यांना मरण का येत नाही? हा राग ते घरातल्या सगळ्यांवर काढत असतात. नानांना आपली चूक कळतेही. पण तरीही वृद्धत्वामुळे आलेला हट्टीपणा ही चूक मान्य करत नाही. प्रदीर्घ अशा वृद्धत्वाचा राग राग करत नाना आयुष्य कंठत रहातात.

## ३) देठ

आशाताईंच्या बऱ्याचशा कथांमध्ये पाऊस प्रामुख्याने अनुभवायला मिळतो. कधी रिमझिमणारा, कधी कोसळणारा, कधी हवासा तर कधी नकोसा. देठ या कथेची सुरुवातही अंगात आल्याप्रमाणे कोसळणाऱ्या पावसाने होते. 'जया' ही नर्सची नोकरी करणारी नायिका आपल्या कुटुंबासाठी कष्ट करत असते. ती संवेदनशील आहे. पण घरची परिस्थिती आणि नोकरी यामुळे ती निर्विकार झाली आहे. त्यामुळेच काळजीने

---

२७. चितारओळ, पूजा, आशाबगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १८८६, पृ. २७

केलेली विचारपूसही तिला नकोशी वाटते.

आशाताईंच्या कथा प्रामुख्याने मनोविश्लेषणात्मक आहेत. माणसाच्या मनातले विचारच त्याच्या वागण्या-बोलण्यातून दिसतात. या कथेत एक सुंदर वाक्य आहे, "स्वतःच्या पोटात भूक असली की दुसऱ्यालाही भूक असेल असं वाटतं, पण स्वतःला जेवावसं वाटंत नसलं की वाटतं कुणालाच जेवावसं वाटत नसेल." [२८]

म्हणजेच आपल्या मनाच्या स्थितीप्रमाणे आपल्या सभोवतालचे जग बदलते. कथेतील नायिका जया हिच्या बाबतीतही असेच घडते. हॉस्पिटलमध्ये आलेल्या केसेस तिच्यासाठी नवीन नसतात. पण काही वेळा आत दडलेले संवेदनशील मन जागे होते. तसेच जयाच्या बाबतीत घडते. हॉस्पिटलमध्ये आलेल्या मिसेस शहा आणि त्यांचे बाळ यांच्यामध्ये ती नकळतपणे गुंतते. मिसेस शहांची आस्थेने चौकशी करते. नायडूअम्मांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना फ्लॉवरपॉट भेट म्हणून आणते. तिच्या मनाची बदललेली अवस्था दाखवण्यासाठी आशाताईंनी कथेत एका सुंदर प्रसंगाची पेरणी केली आहे. जयाच्या घराच्या जिन्याखाली कुत्री पिलांना जन्म देते. जन्म देणे ही घटना जयासाठी नवीन नसते. पण लाकडी खोक्यामध्ये कुत्रीने पिलांना दिलेला जन्म तिला नवलाईचा वाटतो. नायडूअम्मांसाठी आणलेल्या फुलाच्या देठासारखा ताजा. "समोर असूनही अनुकूल गोष्टींची वाट पहाणे कठीण असते." असे म्हणणारी जया एका वेगळ्या दृष्टीने विचार करू लागते.

## ४) अपूर्ण

आयुष्यातील अपूर्णताच आयुष्य पूर्ण करते. कदाचित ही अपूर्णता असणे म्हणजेच आयुष्य पूर्णत्वाकडे जाण्याचा प्रवास असतो. हाच विचार 'अपूर्ण' या कथेतून आशाताईंनी दिला आहे. आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यात काही ना काही तरी कमतरता असतेच. अगदी परिपूर्ण आयुष्य असलेली व्यक्ती असूच शकत नाही. पण नीट विचार केला तर आपल्या लक्षात येते की ही अपूर्णता असते म्हणूनच आपल्याकडे असलेल्या गोष्टींचे मोल समजते. आशाताई हे उदाहरण संगीताच्या भाषेत छान सांगतात. संगीतात सुद्धा खाली मात्रेला म्हणजेच कालाला महत्त्व आहे. कथेत कुसुमची आई तिच्या आयुष्यात असलेली अपूर्णता खेळकर वृत्तीने घेते. कुसुम पेंटिंग उत्तम करत असते. क्लासेस सुद्धा घेत असते. पती आणि मुलीसह सुखाचा संसार करत असते. एक दिवस तिच्या भावाचे

२८. देठ, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १९८६, पृ. १११

पत्र येते. तिची आई काही दिवसांसाठी तिच्याकडे येणार आहे असे पत्रात लिहिलेले असते. आईच असली तरी तिच्या येण्याने कुसुमचा दिनक्रम बदलणार असतो. त्यामुळे तिची चिडचिड होते. कुसुमच्या आईची दृष्टी अधू झालेली असते. कुसुमला जास्त काळजी वाटत असते. तिच्या आईला दृष्टी नसते पण ती आयुष्याचा आनंद भरभरून घेत असते. याची प्रचिती कुसुमला आईच्या वागण्यातून येते. कुसुम काढत असलेल्या चाफ्याच्या झाडाचे, पावलांचे आणि तिच्या आईच्या डोळ्याचे पेंटिंग एका समान धाग्यात जोडले आहे. तो धागा म्हणजे अपूर्णच. पण हे अपूर्णत्वच पेंटिंगला पूर्णत्व मिळवून देईल याची तिला खात्री वाटते.

## ५) खडक

माणसाच्या मनात प्रेमाची जागा अहंकाराने घेतली तर काय होऊ शकते? हे 'खडक' या कथेतून अनुभवायला मिळते. अहंपणामुळे माणूस सद्सद्विवेकबुद्धी हरवून बसतो. स्वतःची चूक मान्य करणे कठीण होते. अजय या बारावीमधल्या एका हुशार विद्यार्थ्याची व तितक्याच बुद्धिमान परंतु कडक शिस्तीच्या गोखले सरांची ही कथा आहे. गोखले सरांच्या क्लासला अजय जात असतो. त्याच्या गणितातल्या बुद्धिमत्तेविषयी गोखले सरांना प्रचंड अभिमान वाटतो, पण ते अहंकारापोटी व्यक्त होत नाहीत. काही कारणांमुळे अजय त्यांचा क्लास बंद करतो. गोखले सर गणिताच्या सगळ्या स्टेप्स समजावून न देता पुढे शिकवतात अशी सगळ्या विद्यार्थ्यांची तक्रार असते. खरे म्हणजे अजयला हा प्रश्न पडत नसतो. पण तो सगळ्यांसाठी याबद्दल सरांशी स्पष्ट बोलतो. रागारागाने सर त्याचा अपमान करतात. अजय त्यांचा क्लास सोडून देतो. मित्रांच्या व आईच्या सांगण्यावरूनदेखील तो सरांशी पुन्हा बोलत नाही. अहंकारापोटी अजय कॉलेजमध्येदेखील सरांशी संवाद साधत नाही. सरही त्याच्याशी बोलत नाहीत. ऐन परीक्षेच्या वेळी अजय आजारी आहे. हे समजल्यानंतर मात्र सर अजयच्या घरी जातात. अजय आपल्या क्लासला न येण्याने आपल्याला काहीच फरक पडत नाही असे समजणारे गोखले सर अजयबाबत वाटणाऱ्या जिव्हाळ्यापोटी त्याला भेटायला जातात. दोघांच्याही मनातला अहंकाराचा खडक वितळतो. अजयच्या डोळ्यातले पाणी सरांना सर्व काही

---

२९. खडक, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १९८६, पृ. १५४

सांगून जाते. दोघांमध्ये इतकी सहजता येते की काही घडले होते हे दोघेही विसरून जातात. गोखले सरच पुढाकार घेतात व हा कलह संपवतात. सरांना आपण घेतलेल्या पुढाकाराची खंत वाटत नाही. अजयलाही बरे वाटते. "अजयच्या डोळ्यात खळकन पाणी आलं. ते तसं येऊ न देण्याचा त्याने प्रयत्नही केला नाही.....तळाशी खडकासारखा घट्ट जमून बसलेला अहंकार हळूहळू वितळत होता." [२९]

**क. ५. समारोप**

मध्यमवर्गीय कुटुंबातील नातेसंबंध 'पूजा' या कथासंग्रहातून आशाताईंनी दाखवले आहेत. लघुकथा हा आशाताईंचा आवडता लेखनप्रकार. पण काळाच्या ओघात कादंबरीच्या मोठ्या पटापेक्षा दीर्घकथा वाचक अधिक पसंत करतील असे त्यांना वाटते. त्यांचे हे विचार योग्यही आहेत. 'पूजा' या शीर्षककथेत पूजा या पारंपारिक विधीबाबत विचार बदलायला लावण्याचे सामर्थ्य आहे. माणूस महत्त्वाचा की विधी? यामध्ये आशाताई माणूस म्हणून वागण्याला प्राधान्य देतात. 'अरण्य' या कथेतल्या रघुनाथला त्याच्या आयुष्यासंबंधी निर्णय घेताना द्विधा मनस्थिती होते. असे निर्णय घेणे अवघड असले तरी अशक्य नसते. फक्त तो निर्णय घेण्याची प्रत्येकाची वेळ वेगळी असते असे ही कथा सांगते. 'नवस' या कथेत नवस बोलणे आणि तो पूर्ण करणे ही मानसिक गरज आहे असे 'रेवती' या पात्राच्या माध्यमातून मांडले आहे. 'सायकल' या कथेत सोमनाथ या होतकरू, गरीब मुलाची घालमेल दाखवली आहे. त्याच्या मनातली उलघाल वाचक म्हणून अस्वस्थ करते. 'पूर' या कथेत कुमार वयातल्या चिंतू आणि गौरीची मैत्री दर्शवली आहे. मनामध्ये विचारांचा पूर आल्यानंतर त्या खुणा माणूस म्हणून कशा अनुभवल्या जातात हे या कथेतून दिसते. 'चितारओळ' ही कथा दोन मित्रांच्या प्रेमाची आहे. मूर्ती घडवणारा चितारी सदाशिव आणि श्रीपाद यांची ही कथा. 'देठ' या कथेत आशाताईंचा आवडता पाऊस वेगवेगळ्या रूपांमध्ये भेटतो. 'जया' या संवेदनशील तरीही निर्विकार नायिकेची ही कथा. आपल्या मनातल्या स्थितीप्रमाणे सभोवतालचे जग बदलते हे सांगणारी. आयुष्यात असणारी अपूर्णताच आपल्या आयुष्याला परिपूर्ण करते हा एक वेगळा विचार 'अपूर्ण' या कथेतून आशाताई देतात. अहंकाराने सद्सद्विवेकबुद्धी हरवलेल्या गुरु-शिष्यांची गोष्ट म्हणजे 'खडक'. मनातल्या भावनांचे विविधरंगी इंद्रधनुष्य आशाताईंच्या 'पूजा' या कथासंग्रहातून अनुभवायला मिळते.

**क. ६. संदर्भसूची**

२५. आशा बगे नवे अस्तित्व, सुलभा हेर्लेकर, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ८७

२६. अरण्य, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, १९८९, पृ. ५०

२७. चितारओळ, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १८८६, पृ. २७

२८. देठ, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १९८६, पृ. १११

२९. खडक, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १९८६, पृ. १५४

## ग्रंथसूची

१. आशा बगे नवे अस्तित्व

२. पूजा

## ड. मांडव

| अनु. क्र. | कथेचे नाव |
|---|---|
| १ | पूल |
| २ | मांडव |
| ३ | ठग |
| ४ | ऋण |
| ५ | नैवेद्य |
| ६ | हद्दपार |
| ७ | मुसळधार |
| ८ | साक्षी |
| ९ | प्रस्थान |

**ड. १. – प्रस्तावना**

**ड. २. – शीर्षककथा**

**ड. ३. – मला भावलेल्या कथा**

**ड. ४. – अन्य कथा**

**ड. ५. – समारोप**

**ड. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ड. १ प्रस्तावना

आशाताईंच्या लेखनप्रवासातील अगदी सुरुवातीच्या कथासंग्रहांपैकी एक म्हणजे 'मांडव' हा कथासंग्रह. या कथासंग्रहातील काही कथा उत्तमच आहेत पण काही कथा समजून घ्यायला थोड्या क्लिष्ट वाटतात. त्यांच्या लेखनातली सहजता या कथासंग्रहातही आहे. प्रभावी व्यक्तिचित्रण, भारतीय परंपरेतील नैतिक मूल्यांची जोपासना करणाऱ्या स्त्रिया, समंजस, बंडखोर अशा स्त्रिया या कथांमध्येही आढळतात. पुरुष पात्रांची संवेदनादेखील कथांमधून दिसून येते. लेखकाचा समाजाशी सांधा कशाप्रकारे जोडलेला असतो याचे उत्तर आशाताई समर्पकपणे देतात. त्या म्हणतात, "कुणाही लेखकाला समाजाची चौकट उधळून लावायची नसते. त्या चौकटीतही एक जीवनसातत्याचे सूत्र असते. पण हे सातत्याच खंडित होत असेल तर ते लेखनातून करता येते. एकाचे दुसऱ्याशी जोडलेपण, त्याची अनुभूती, त्यांचा उच्चार, त्याचे प्रकटीकरण यांचे लेखकाच्या

निर्मितीशी अतूट नाते आहे.  ते आहे म्हणूनच जोडलेपणही आहे.  कारण मुळात "तू ती मीच आहे" तरीही निर्मितीच्यावेळी माझा मी एकटा आहे.  हे एकटेपण पेलता आले तरच निर्मिती शक्य आहे." [३०]  आशाताईंच्या  या विचारांशी सुसंगत अशा कथा या कथासंग्रहात आहेत.

### ड. २. शीर्षककथा

सन पब्लिकेशन्सच्या म. ना. जोशी यांनी २२ फेब्रुवारी १९९३ रोजी आशाताईंचा मांडव हा कथासंग्रह प्रकाशित केला आहे.  नऊ कथा असलेल्या या कथासंग्रहात आशाताईंनी माणसातील नातेसंबंधांचा शोध घेतला आहे.  शीर्षककथा आशाताईंच्या आजवरच्या कथांपेक्षा खूप वेगळी आहे.  पहिल्यांदाच आशाताईंच्या कथेची नायिका चौकट मोडते.  म्हणून ही शीर्षककथा त्यांच्या लेखनाच्या प्रवासातील महत्त्वाची कथा आहे.  त्यांच्या या आधीच्या नायिका स्वतंत्र विचारांच्या आहेत पण चौकट न मोडणाऱ्या आहेत.  या कथेत मात्र मुन्नी आणि उज्ज्वला ही चौकट मोडून आपल्याला हवी असणारी गोष्ट मिळवण्यासाठी प्रयत्न करतात.

### १)   मांडव

आशाताईंनी 'मांडव' या कथेत लग्न या संस्काराचा स्त्रीच्या मनोभूमिकेतून वेध घेतला आहे.  मुन्नी आणि उज्ज्वला या दोन वेगळ्या व्यक्तिरेखांनी वेगवेगळ्या परिस्थितीत 'लग्न' या संस्काराला न जुमानता आपल्या सुखाचा विचार केला आहे.  या कथेत जे मांडले आहे ते चूक की बरोबर हे व्यक्तिपरत्वे बदलणारे आहे.  पण प्रत्येकाला आपले सुख आणि समाधान शोधण्याचा अधिकार असेल तर या दोघींनी केलेली कृती पटते. काहींना असेही वाटू शकते की हे सगळे स्वीकारण्याआधीच कळले नाही का?  पण योग्य-अयोग्य या वादात न पडता कथेचा आशय समजून घेतला तर ही कथा विचारप्रवृत्त करते.  या कथेचे वैशिष्ट्य म्हणजे 'भास्कर' नावाचे पुरुषपात्र या दोघींच्या भावनांना समजून घेते.

वसंता हा भास्करचा जीवलग मित्र असतो.  वसंताची पत्नी उज्ज्वला दोन अपत्यांच्या जन्मानंतर आपले घर सोडून दुसऱ्याच एका माणसासोबत रहाते.  तिचे हे वागणे कोणालाच पटत नाही.  पण भास्कर त्रयस्थ म्हणून उज्ज्वलेच्या मनोभूमिकेचा

---

३०.   वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ६४

विचार करतो. तो त्याच्या बायकोला म्हणतो, "नेमकं काय झालं ते आपल्याला कसं कळणार? वसंतासुद्धा हे सांगू शकत नाही. पण कधी कधी वाटतं उज्ज्वलानं एक रुटीन नाकारण्याचा प्रयत्न केला असेल. कदाचित वसंताच्या सहवासात तिला गुदमरायला लागलं असेल. एखाद्याला अशी चौकट नकोशी वाटते."[३१]

वसंता ज्या ठिकाणी रहात असतो तिथे भास्कर एका कामासाठी आलेला असतो. वसंताची वृद्ध आईच दोन्ही मुलांना सांभाळत असते. त्यांच्या शेजारच्या घरातल्या मुन्नीचे म्हणजे किरणचे लग्न ठरलेले असते. भास्करला मुन्नीच्या चेहेऱ्यावर नववधूचे भाव जाणवत नाहीत. लग्नाच्या आदल्या दिवशी क्लासला जायचे असे सांगून ती भास्करच्या गाडीत बसते. तो तिला आणि तिच्या मैत्रिणीला वाटेत सोडतो. पण आश्चर्य म्हणजे मुन्नी परत येतच नाही. मुलाकडचे लोक येतात. मुन्नीच्या घरच्यांना नावे ठेवून मांडव सोडून निघून जातात. दोन दिवस व दोन रात्र मुन्नी घरी येतच नाही. मांडव काढल्यानंतर ती घरी येते. तिचे वडील तिला खूप मारतात. त्यावेळी भास्कर मधे पडतो. मुन्नीला तिची बाजू मांडण्याची संधी द्यावी असे सांगतो. ती सांगते की, तिला हे लग्नच मान्य नव्हते म्हणून ती गावाबाहेरच्या हनुमानाच्या मंदिरात गेली होती. तिचे वडील अधिकच चिडतात. तेव्हा भास्कर तिला व त्यांना समजावतो. त्याला मुन्नीच्या जागी आपली पिंकीच दिसते. भास्कर तिथून निघतो. त्याच्या मनात विचार येतो, "मांडव म्हणजे कदाचित एक सुरक्षित, मंगल छत्र, डोक्यावरले आभाळ थोपवून धरणारे. एक मुन्नी ते नाकारते आहे आणि एखादी उज्ज्वला ते सोडून गेली आहे." [३२]

आशाताईंनी भास्करच्या मनातला सांगितलेला हा विचार एक स्त्रीवाचक आणि अभ्यासक म्हणून मला पटतो. कारण ज्या सुरक्षित छत्राखाली तिला आश्वस्त वाटत नसेल त्या छत्राला थोपवून धरण्यात काय अर्थ आहे? मुन्नीने ते स्वीकारण्याआधीच नाकारले आहे हे जास्त पटते. उज्ज्वलाने ते छत्र, त्यामधली असुरक्षितता जाणवून त्यानंतर नाकारले आहे. उज्ज्वलाने आपल्या मुलांचा विचार करायला हवा होता का? असेही वाटते. पण संसार आनंदाने करता येणे शक्य नसेल तर गाडा ओढल्यासारखा ओढण्यात तरी काय अर्थ आहे? मांडव हे छत्र सुरक्षित, आनंददायी आणि मंगलकारक असेल तरच तो आनंद उपभोगता येतो. त्यामुळे 'मांडव' या कथेत आशाताईंनी चौकट मोडून जाणारी रेखाटलेली स्त्री-पात्रे मनापासून पटतात.

---

३१. मांडव, मांडव, आशा बगे, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. २४

३२. मांडव, मांडव, आशा बगे, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. ४६

## ड. ३. मला भावलेल्या कथा

आशाताईंच्या मनस्वी नायिकांपैकी मला भावलेल्या दोन्ही नायिका 'मांडव' या शीर्षककथेत आहेत. त्यामुळे आशय, विषय आणि अभिव्यक्तिचा विचार करता मला मांडव ही कथा सर्वाधिक भावली आहे. उर्वरित कथांमध्ये 'मुसळधार' ही कथा वेगळ्या दृष्टिकोनातून लिहिली गेल्याने भावते. मुलीवरचे गिरीधरचे प्रेम आणि कथेतली गूढता 'मुसळधार' या कथेत आहे. ही गूढता कथेची जमेची बाजू आहे. आशाताईंच्या आवडत्या कथांमध्ये या कथेचा समावेश आहे.

### १) मुसळधार

आशाताईंची 'मुसळधार' ही कथा वाचकांकडून काहीशी दुर्लक्षित राहिली आहे. फार थोड्या जाणकारांना ती आवडली. माणसाच्या मनाचे तळ, त्याचे विभ्रम आशाताईंना मोहवतात. जीवनातल्या अतर्क्य अशा गूढतेला स्पर्श करणारी ही कथा आहे. मनातल्या खोलवरच्या अतीव उत्कट इच्छांची अपूर्णता माणसाच्या साध्या जगण्याला गूढतेचे अस्तर लावते. या कथेतील भाषा पावसात आणि गिरिधर आचाऱ्याच्या उत्कट तरल अवस्थेत भिनून एकाच लयीतली झालेली आहे. जे कळते ते आपले होते आणि जे कळू शकत नाही ते गूढ. अशा परिस्थितीत काय खरे? काय खोटे? असे प्रश्न न विचारलेलेच इष्ट ठरते. एक वेगळाच गूढ अनुभव देणारी ही कथा सुन्न करते.

गिरिधर आचारी या नायकाभोवती कथा फिरते. त्याच्यासारखा आचारी सगळ्या गावात नसतो. भाऊसाहेब जहागिरदारांकडे तर गिरिधरशिवाय पान हलत नसते. त्याच्या हातचा रावणभात आणि धीवर याची चव कोणाच्याही हाताला नसते. त्याची मुलगी पारु अनंत चतुर्दशीला बाळंत होणार असते. मुसळधार पाऊस पडत असताना, अंगात प्रचंड ताप असताना गिरिधर जाहागिरदारांचे बोलावणे येते म्हणून गावजेवणाचा स्वयंपाक बनवायला तयार होतो. पण त्याचा जीव पोरीसाठी तुटत असतो. स्वयंपाकाचे काम उद्यावर आले असता तो हट्टाने पूरातून पोहून जायचे ठरवतो. गावजेवणाच्या दिवशी सगळा स्वयंपाक उत्तम पद्धतीने होतो. सगळे गाव जेवून तृप्त होते. पण गिरिधरची बायको जेवायला येत नाही. गिरिधरही न जेवता लगेच निघून जातो. स्वयंपाक करायला येतो तो गिरिधर नसून त्याचे अपरूप असते. कारण खालच्या गावाला गिरिधरचे प्रेत किनाऱ्याच्या गाळात रुतलेले सापडते. त्याचा प्राण जाऊन ४८ तास झालेले असतात. दुसरी बातमी, अनंत चतुर्दशीच्या दिवशीच सकाळी पारुला म्हणजे गिरिधरच्या मुलीला

मुलगा झालेला असतो ही असते.

## २) ऋण

ऋण म्हणजे कर्ज. काही कर्ज फेडता येत नाहीत. पैशांचे कर्ज एकवेळ फिटू शकते. पण मनापासून केलेल्या मदतीचे कर्ज फिटत नाही. या कथेच्या संदर्भात ज्यांच्यावर हे कर्ज आहे त्यांचेच ऋण कर्ज देणाऱ्यावर आहे. नंदिनी व शरद, कौस्तुभ व चारू या दोन जोडप्यांची ही कथा आहे. शरद संघाचे काम करणारा मनस्वी कार्यकर्ता असतो. नंदिनी क्लासेस घेऊन आपले घर चालवत असते. त्यांचा मुलगा चेतन याला परिस्थितीची जाणीव असते. चारू उच्चमध्यमवर्गीय जीवन जगणारी व आपल्या संसाराशिवाय दुसरे विश्व नसाणारी असते. कौस्तुभ चांगल्या पदावर काम करत असतो. त्यांचा मुलगा मयूर इंजिनिअरिंग करत असतो. कौस्तुभला खरे तर नंदिनीशी लग्न करायचे असते. पण नंदिनी मनस्वी शरदला निवडते. आहे त्यात सुखी, आनंदी रहाण्याची कला नंदिनीला असते. चारू मात्र सगळे असूनही तितकींशी समाधानी नसते. शरदला अचानक हार्ट ॲटॅक येतो. नंदिनी कौस्तुभकडे पैशांची मदत मागते. तो तिला दहा हजार रुपये देतो. त्याची अँजिओग्राफी होते. एक वर्षानंतर शरद पहिल्यासारखा हिंडु फिरू लागतो. नंदिनी पैसे परत करण्याविषयी काही बोलत नाही हे पाहून चारूला तिचा राग येतो. दोन वर्षांनी अचानक शरदच्या निधनाची बातमी चेतन घेऊन येतो. नोकरीच्या निमित्ताने जपानला जायचे कौस्तुभ ठरवतो. एका रात्री नंदिनी अचानक चारूच्या घरी येते आणि निम्मे पैसे परत करते. चारू आणि कौस्तुभ त्यामुळे अवाक होतात. नंदिनीने पैसे परत केले नाहीत तर मयूरला नंदिनीकडे ठेवण्याचा आणि घरखर्चासाठी तिला पैसे न देण्याचा विचार चारू करत असते. कौस्तुभ नंदिनीला हे सगळे सांगतो तेव्हा नंदिनी म्हणते, या पैशांचा आणि मयूरच्या तिच्याकडे रहाण्याचा काही संबंध नाही. आपला एकमेकांवर तेवढा हक्क आहे. हे ऐकल्यावर कौस्तुभ आणि चारूला आपल्या मनाच्या कोतेपणाची लाज वाटते. ऋण नक्की कोणाचे कोणावर आहे हेच त्यांना कळत नाही. नंदिनीच्या रूपातली मनस्वी नायिका भावते.

## ३) हद्दपार

काही लोक आयुष्यात येतात आणि आयुष्याच बदलवून टाकतात. हव्याहव्याशा वाटणाऱ्या या गोष्टी तशाच रहाणार नाहीत हे माहिती असूनही माणूस नकळत त्यात गुंतत

जातो. अचानक जेव्हा ती व्यक्ती तिच्या तिच्या वाटेने निघून जाते, हद्दपार होते तेव्हा असे वाटते की, "अशी पूर्णपणे हद्दपार होऊन जाण्यापेक्षा माणसं भेटतातच कशाला?"

मुलींच्या हॉस्टेलला वॉर्डन देवधर यांच्या बाबतीतही असेच काहीसे होते. एरवी सगळ्यांशी जेवढ्यास तेवढे वागणाऱ्या मिसेस देवधर अनुपमा भिडे नावाच्या एका विद्यार्थिनीत त्यांच्याही नकळत गुंततात. सुरूवातीला अबोल, घुमी आणि विचित्रपणे वागणारी अनुपमा कालांतराने बदलते. एकांतात रहाणारी अनुपमा मुलींच्या घोळक्यात हसताना, बोलताना दिसू लागते. तिचे वडील सुरुवातीला जेव्हा सोडायला येतात तेव्हा ती धड बोलतही नसते. हॉस्टेलमध्ये कोणाशीही तिचे पटत नसते. मुलींची अशी तक्रार असते की ती शिव्या देते. एकंदर तिच्या वागण्याने सगळेच वैतागलेले असतात. देवधर मॅडम तिच्याशी मनमोकळ्या गप्पा मारतात. तिला समजून घेतात. तिचा घुमेपणा दूर करण्यासाठी प्रयत्न करतात. या सगळ्यात त्यांना यशदेखील येते. अनुपमेमध्ये बदल होतो. तिचे वडील मेजर भिडे यांनाही तो जाणवतो. ती नकारात्मक विचार जाऊन सकारात्मक विचार करू लागते. तिच्या रहाणीमानातही बदल होतो. गत आयुष्यातील कटू आठवणी ती विसरते. देवधर मॅडमना हेच तर हवे असते. अनुपमा नसताना त्यांचे बेचैन होणे मात्र त्यांना अस्वस्थ करते. अनुपमाचे लग्न ठरते आहे हे ती त्यांना सांगते. त्यामुळे आता तिला हॉस्टेल सोडावे लागेल हेदेखील त्यांना समजते. हे ऐकून त्या तिला म्हणतात, "म्हणजे आता नवीन खेळणं सापडलं तर तुला." थोडे थट्टेने पण कडवटपणे त्या हे म्हणतात. अनुपमेला याचे वाईट वाटते. नंतर देवधर मॅडमही अस्वस्थ होतात. त्यांचे संथ, स्थिर आयुष्य ढवळून टाकून ती निघून जाते हद्दपार.

### ४) प्रस्थान

वृद्ध लोक घरात नकोसेच असतात. एकेकाळी आपल्या कर्तृत्वाने संसार उभारलेली ही वृद्ध मंडळी घरातल्यांना अडगळ वाटू लागतात. त्यांची शुश्रूषा करताना त्यांच्या प्रस्थानाची वाट बघणारे त्यांचेच आप्त असतात. उच्चमध्यमवर्गीय कुटुंबातील ही समस्या आशाताईंनी 'प्रस्थान' या कथेत मांडली आहे.

अंथरुणाला खिळलेल्या नानींशी बोलायला त्यांच्या भावना समजून घ्यायला घरात कोणालाही वेळ नसतो. त्यांची नात शर्वरी व मुलगा सोडले तर सून, नातू, नातसून सगळेच त्यांना हिडीसफिडीस करत असतात. माणसाचे वय झाले की त्यांचे लहानपण सुरु होते असे म्हणतात. पण म्हाताऱ्या माणसाला लहान मुलांसारखे समजून घेतले जात

नाही. घरात येणारे जाणारेही त्यांच्याशी संवाद साधत नाहीत. असेच नानींच्या बाबतीत होत असते. खाण्यापिण्यातली इच्छा नानींना त्या परिस्थितीतही अस्वस्थ करते. त्यांना चमचमीत खावेसे वाटत असते. त्यांच्या या गोष्टीचा सूनेला मात्र खूप राग येत असतो. त्या घरात शर्वरी त्यांना समजून घेत असते. त्यांच्याजवळ बसून गप्पा मारत असते. एक दिवस नानींची तब्येत अचानक बिघडते. खाण्या-पिण्यावरली वासना उडते. आता नानी प्रस्थान ठेवणार या गोष्टीने सगळ्यांना आनंद होतो. कारण नानी आणि शर्वरीमुळे वरचा सगळा मजला अडलेला असतो. मात्र उपचारानंतर नानी पुन्हा बऱ्या होतात. त्यांचाच मुलगा त्यांना मागच्या व्हरांड्यात ठेवायला सांगतो आणि शर्वरीलादेखील नानींजवळ येण्याचे फर्मान सोडतो. त्या दोघींचे प्रस्थान अडगळीच्या ठिकाणी होते.

वृद्ध लोकांची समस्या आशाताईंनी या कथेत मांडली आहे. तरुणवयात रक्ताचे पाणी करून उभ्या केलेल्या संसारात वृद्धपणी अडगळीचे स्थान मिळालेल्या नानींची हि कथा मनाला चटका लावते. प्रगती करत असलेल्या आपल्या समाजात स्वतःच्याच आईवडिलांना अडगळ समजणारे लोक वाढत आहेत. ज्येष्ठांचा मान राखल्यानेच आपल्या पुढल्या पिढीवर चांगले संस्कार होणार आहेत. त्यांना अडगळीच्या ठिकाणी ठेवण्यापेक्षा त्यांना मानाची वागणूक देणे आवश्यक आहे असा संदेश या कथेतून मिळतो.

### ५) नैवेद्य

आपण देवाला नैवेद्य दाखवतो तेव्हा देव तो नैवेद्य खातच नाही. ते सगळे आपल्या मनाचे समाधान असते. आयुष्य म्हणजे पूजा असे मानले तर आयुष्याच्या अखेरी इच्छिलेला पदार्थ नैवेद्यच म्हणावा लागेल. कारण नैवेद्याप्रमाणे तो पदार्थ न खाताच ती व्यक्ती दुसऱ्या बेटावर जाते. 'नैवेद्य' ही आशाताईंची कथा मृत्यूच्या विळख्यात अडकलेल्या आईची आणि तिच्या मुलीची आहे. प्रतिमाचा भाऊ गुणाकर आणि वहिनी तिच्या वृद्ध आईची खूप काळजी घेत असतात. गुणाकरची अचानक बदली होते. त्यामुळे काही दिवसांसाठी प्रतिमा माहेरी रहायला जाते. कृश आणि आजारी आईकडे तिला पहावत नाही. पंधरा दिवस ती आईची जमेल तशी सेवा करते. प्रतिमाला मुलांची आणि नवऱ्याची काळजी वाटू लागते म्हणून ती घरी जाण्याचा निर्णय घेते. आई तिला गोडाचा शिरा करुन आणायला सांगते. प्रतिमा तो शिरा घेऊन येईपर्यंत आईची प्राणज्योत मालवते. त्यामुळे प्रतिमाच्या मनात येते, "शिरा तर ओठाला लागलाच नाही. निदान वास तरी घेतला की नाही. नसेलच. मघाच म्हणाली की आयुष्य म्हणजे पूजा! मग

हा शिराही तिने स्वतः करता नसेलच सांगितला... तो तिच्याकरता नसावाच....तो फक्त नैवेद्य..." [३३]

### ड. ४. अन्य कथा

अन्य कथांमध्ये आकलनास थोडी कठीण अशी कथा म्हणजे साक्षी. वाचक आणि अभ्यासक म्हणून आशाताईंच्या कथांमध्ये ही कथा थोडी दुर्बोध वाटली.

### १) साक्षी

साक्षी म्हणजे बघणे. एखादी घटना प्रत्यक्ष घडताना बघणाऱ्याला साक्षीदार म्हटले जाते. साक्षीदाराला फक्त बघावे लागते. घडणाऱ्या घटनेत काहीही करण्याचा अधिकार त्याला नसतो. या कथेत स्टेशनमास्तर पांड्या हे साक्षीदार आहेत.

नवसाला पावणाऱ्या गणपतीचे मंदिर असलेल्या एका लहानशा गावी पांड्या रेल्वे स्टेशनमास्तर म्हणून काम करत असतात. त्यांना या लहानशा गावाचा अतिशय कंटाळा आलेला असतो. गाव लहान असले तरी गणपतीच्या मंदिरामुळे प्रत्येक गाडी स्टेशनला थांबत असते. रेल्वे स्टेशनला दिमाखात येणारी रेल्वे आणि मुलीच्या पाठीवर दहा वर्षांनी झालेला मुलगा भालचंद्र या त्यांच्या आवडीच्या गोष्टी असतात. अचानक त्यांना ओळखणारे टिपणीस आणि त्यांची बायको रेल्वेतून उतरून त्यांना भेटायला येतात. इतक्या वर्षांनंतर भेटल्याने दोघांनाही आनंद होतो. पण पांड्या या दोघांना आपल्या लहानशा घरात रहायला बोलवत नाहीत. दर्शन घेऊन झाल्यावर गाडीत बसताना पांड्या त्यांना निरोप देतात. गाडी पुढच्या स्टेशनवर जाण्याआधीच गाडीला प्रचंड मोठा अपघात होतो. जवळपास सगळ्या प्रवाशांचा मृत्यू होतो. या मृत्यूच्या भयानक तांडवात मणी नावाची लहानशी मुलगी वाचते. पांड्या तिला आसरा देतात. नायडूंकडे मणी नोकर म्हणून रहात असते. भेदरलेल्या मणीला पांड्या घरी घेऊन येतात. एक दिवस नायडूंचा मुलगा तिला घ्यायला येतो. तिला निरोप देताना पांड्यांना गहिवरून येते. एका विचित्र अपघाताचे साक्षी या अनाकलनीय घटनेने हवालदिल होतात.

३३. नैवेद्य, मांडव, आशा बगे, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. ९८

२)	**पूल**

दोन व्यक्तिंमध्ये दुवा सांधणारी एखादी व्यक्ती असते. त्या दोन व्यक्तिंच्या नात्यातला पूल बनून ती व्यक्ती नात्याचा एक पूल तयार करते. दुवा असणारी व्यक्ती गेल्यानंतर नात्याचा हा पूल तसाच रहाणे अशक्य असते. नंदिनी आणि बाईंमध्ये नात्याचा असाच एक वेगळा पूल सुबोधमुळे तयार झालेला असतो. सुबोध हा बाईंचा मुलगा. नंदिनीचे आणि सुबोधचे एकमेकांवर खूप प्रेम असते. सुबोधच्या जाण्याने नंदिनी बाईंच्या घरी येणे कमी करते. बाई खूप आजारी पडतात. त्यांना भेटायला नंदिनी येत असते. पण कालांतराने तिच्या घरातले तिला बाईंकडे जाऊ देत नाहीत. बाई वाटेत भेटल्या तरी ती त्यांच्याशी नीट बोलत नसते. बाई तिच्या घरी जातात तरी तिची आई त्यांच्याशी नीट बोलत नाही. नंदिनीचे लग्न ठरल्याचे बाईंना कळते. तेव्हा त्यांना खूप आनंद होतो. आपल्या दुःखाशी झगडून ही त्यांची स्वतःची कमाई असते. कारण नंदिनीने सुखी राहाणे हेच त्यांना अपेक्षित असते. सुबोध गेल्यानंतरही नंदिनी आणि त्यांच्यामधला पूल तसाच आहे असे त्यांना वाटत असते. प्रत्यक्षात मात्र तसे नसते. नंदिनीचे लग्न ठरल्याचे कळताच त्या स्वतःहून नंदिनीच्या घरी जातात. तिथे त्यांना समजते, सुबोध नसतानाही त्या दोघींना जोडून ठेवणारे तिथे काहीच नसते.

३)	**ठग**

परक्या भागात गेल्यानंतर तिथे फसवले जाण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे अशा ठिकाणी येणाऱ्या लोकांना जपूनच रहावे लागते. पण काही वेळा येणाऱ्या प्रवाशांकडूनच फसवणूक होते. असेच काहीसे घडते 'ठग' या कथेत. फक्त या कथेत ती फसवणूक मानसिक असते. मनोहर, जान्हवी आणि मनोहरची आई बनारसला जाण्यासाठी निघतात. ट्रेनमध्येच त्यांना कल्लू आणि त्याचा मित्र भेटतात. त्यांच्या जागेवर हे दोघे बसतात म्हणून मनोहर त्यांच्यावर चिडतो. बनारसचे ठग या पूर्वग्रहदूषित नजरेने बघतो. त्या क्षणापासून कल्लू त्यांच्या सोबतच रहातो. त्यांना गंगा नदीचे दर्शन घडवणे, काशी विश्वेश्वराच्या मंदिरात नेणे, अलाहाबादला नेणे, चहा, नाष्टा, जेवण या सगळ्यासाठी त्यांना मदत करतो. ही मदत करताना तो सतत त्याच्या मालकाच्या बनारसी साड्यांच्या दुकानात येण्याविषयी त्यांना सुचवत असतो. जान्हवी आणि आई तयार सुद्धा होतात. पण मनोहर मात्र त्याच्याच दुकानासमोरील एका दुकानात साडी खरेदी करतो. कल्लू याविषयी विचारतो तेव्हा नीट उत्तरही देत नाही. त्यामुळे कल्लू खूप दुखावला

जातो. जान्हवीला याचे खूप वाईट वाटते. मनोहरने कल्लूला आशेला लावून त्याच्या मालकाच्या दुकानातून साड्या घेतलेल्या नसतातच. थोडक्यात त्यालाच मनोहर ठगवतो. बनारसचे वातावरण या कथेत हुबेहुब उतरले आहे त्यामुळे बनारसमध्ये फिरल्याचा अनुभव कथा वाचताना येतो.

### ड. ५. समारोप

जीवनानुभवांना लेखनामागची प्रेरणा मानणाऱ्या आशाताईंच्या सगळ्याच साहित्यात हे अनुभव दिसून येतात. त्यांच्या कथाविश्वात त्यांचे अनुभव नेहमी डोकावतात. 'मांडव' या कथासंग्रहाची शीर्षककथाच खूप भावणारी आहे. चौकट मोडणाऱ्या, निर्भयतेने विचार करणाऱ्या नायिका या कथेत आशाताईंनी रंगवली आहेत. लग्न हा संस्कार आपापल्या पद्धतीने नाकारणाऱ्या नायिका या कथेत आहेत. मुलीच्या प्रेमापोटी मुसळधार पावसात पूरात पोहून जाणारा गिरिधर 'मुसळधार' या कथेत आहे. कथेला गूढतेचे अस्तर असल्याने कथा दीर्घकाळ लक्षात रहाते. ज्याच्यावर कर्ज केले असे वाटते त्यानेच कर्ज देणाऱ्यावर ऋण करावे हे सांगणारी कथा 'ऋण'. कौस्तुभ-चारू व नंदिन-शरद या दोन जोडप्यांची ही कथा. कथेतली मनस्वी नंदिनी मनाला भावते. एखादी व्यक्ती आयुष्यात येते आणि संथ, स्थिर आयुष्य ढवळून टाकते. हे सगळे होऊन ती व्यक्ती हद्दपार होते त्याने होणारा त्रास 'हद्दपार' या कथेत आशाताईंनी दाखवला आहे. वृद्ध माणसांची होणारी अडगळ 'प्रस्थान' व 'नैवेद्य' या कथांमध्ये दर्शवली आहे. रेल्वे स्टेशनवर झालेल्या दुर्घटनेचे साक्षीदार पांड्या निष्पाप मणीला आपल्या घरी नेऊन तिची काळजी कशी घेतात हे 'साक्षी' या कथेतून दिसून येते. दोन व्यक्तींच्या नात्यामधला दुवा नसेल तर नात्यांचा पूल तसाच राहू शकत नाही हे 'पूल' या कथेतल्या बाई व नंदिनीच्या नात्यातून समजते. बनारसला गेल्यानंतर फसवले जाण्याची भीती वाटणारे मनोहर व जान्हवी नकळतपणे कल्लूलाच कसे फसवतात हे 'ठग' ही कथा सांगते.

या कथासंग्रहात चौकट उधळून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या नायिका आहेत हे या कथेचे वैशिष्ट्य आहे. आपल्याला नेमके काय हवे आहे हे समजले की मार्ग सोपा होतो. आपल्या भविष्याबाबत योग्य तो विचार करणाऱ्या आत्मनिर्भर स्त्रिया या कथासंग्रहात भेटतात. वेगळ्या वळणाने आपले ध्येय साध्य करणाऱ्या नायिका या कथासंग्रहात आशाताईंनी रेखाटल्या आहेत.

'मांडव' या कथासंग्रहातील चौकट मोडून स्वतःचे अस्तित्व निर्माण करणाऱ्या

नायिका एक वाचक आणि अभ्यासक या नात्याने मला भावल्या. या नायिकांनी मनात त्यांना अपेक्षित आयुष्याचे चित्र रेखाटले आहे. त्यामुळे विचारांची बैठक पक्की आहे. काय नको हे समजले की हवे असलेले मिळवता येते. चूल आणि मूल हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र नाही. तिला तिच्या मनासारखे जीवन जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. या अधिकाराची जाणीव आशाताई करून देतात. समाजामध्ये स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे आणि तिला तिच्या मनासारखे जगण्याचा अधिकार नाही हे भ्रम मोडणारे विचार प्रेरणादायक आहेत. यामधून स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीव होईलच तसेच पुरुषांनाही तिच्या स्वतंत्रपणे विचार करण्याच्या वृत्तीचा अंदाज येईल. हा परिणाम नक्कीच सकारात्मक असेल.

## ड. ६. संदर्भसूची


३०. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ६४

३१. मांडव, मांडव, आशा बगे, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. २४

३२. मांडव, मांडव, आशा बगे, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. ४६

३३. नैवेद्य, मांडव, आशा बगे, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. ९८


## ग्रंथसूची


१. वाटा आणि मुक्काम

२. मांडव

**इ. चंदन**

| अनु. क्र. | कथेचे नाव |
|---|---|
| १ | चंदन |
| २ | समुद्र |
| ३ | श्राद्ध |
| ४ | एका पावसाळी संध्याकाळी |
| ५ | वर्तमान |

**इ. १. – प्रस्तावना**

**इ. २. – शीर्षककथा**

**इ. ३. – मला भावलेल्या कथा**

**इ. ४. – अन्य कथा**

**इ. ५. – समारोप**

**इ. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

**इ. १. प्रस्तावना**

बदलत्या आयुष्यामुळे साहित्य बदलत जाते का? या प्रश्नाचे उत्तर आशाताई खूप छान देतात. “बदलत्या आयुष्यामुळे साहित्य बदलतेच असे नाही. निर्मितीप्रेरक बदलेल, त्याचा कोन बदलेल, परीघ वेगळा होईल. माणसाच्या भावनेचा, जगण्याचा, सुख दुःखाच्या अन्वयाचा निखालस स्पष्ट उच्चारच अभिप्रेत आहे. असे असेल तर बदलत्या आयुष्यामुळे साहित्य बदलते असे कसे म्हणता येईल? ही वाढ बघायची असेल तर लेखनाची खोलीच बघावी.” [३४]

आशाताईंच्या या विधानाचे प्रत्यंतर त्यांच्या कसदार लिखाणातून येते. प्रत्येक कथासंग्रहात आपल्या बदलत्या, समृद्ध जाणीवा दिसून येतात. ‘चंदन’ या कथासंग्रहात पाच कथा आहेत. प्रत्येक कथा एका वेगळ्या खोलीची, वेगळा अर्थ घेऊन आलेली आहे. कथेचा गर्भितार्थ समजून घेऊन वाचकाने आपल्या आपल्या कुवतीप्रमाणे कथेचा गर्भितार्थ ठरवायचा आहे. या प्रत्येक कथेत वाचक म्हणून आपली भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. कथांची प्रसिद्धी या कथासंग्रहातच सर्वप्रथम झाली आहे.

३४. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, भारत ससाणे, सानिया, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. ३२

## इ. २. शीर्षककथा

चंदन हा आशाताईंचा कथासंग्रह जाने. १९९३ मध्ये ज्ञानदा पब्लिकेशन्सच्या नंदप्रसाद बर्वे यांनी प्रकाशित केला आहे. मुखपृष्ठ व रेखाचित्रांमुळे हा कथासंग्रह विशेष वाचनीय व प्रेक्षणीय झाला आहे. अर्पणपत्रिकेत आशाताईंची मैत्रीण सुनीती यांचे नाव आहे. आयुष्याला अनेक दुर्मिळ क्षण बहाल करणाऱ्या आपल्या जीवलग मैत्रीणीला आशाताईंनी हा कथासंग्रह अर्पण केला आहे. त्यावेळी ८० रुपये मूल्य असणाऱ्या या कथासंग्रहाचे आत्ताच्या काळासही अमूल्य असे योगदान आहे. या कथासंग्रहातल्या शीर्षक कथेचे कथाविश्व जाणून घेऊ या.

### चंदन

वडील आणि मुलाच्या नात्यातला हळुवार बंध 'चंदन' या कथेत आशाताईंनी उलगडून दाखवला आहे. बऱ्याच वेळा आपल्या जवळ असणाऱ्या माणसांचे महत्त्व त्यांच्या दुराव्यातूनच लक्षात येते. एकमेकांजवळ असताना एकमेकांचे महत्त्व समजून न आल्याने निर्माण झालेला द्वेष आयुष्याच्या शेवटच्या घटकेला विरुन जातो. समाधान हेच मिळते की तो द्वेष मनात ठेवून कायमचा निरोप घेण्याची वेळ येत नाही. वडील आणि मुलामध्ये आलेला दुरावा संपून त्यांच्या नात्याचा सुगंध चंदनासारखा दरवळतो असे या कथेत दिसून येते. या कथेचा वाचक म्हणून असा एक निष्कर्ष काढता येईल की, चंदन जळल्यानंतर किंवा उगाळल्यानंतर त्याचा सुवास दरवळतो. त्याचप्रमाणे नात्यांचा कस लागल्यानंतर ती नाती चंदनाप्रमाणे सुगंधित होतात.

यशस्वी वकील आणि त्यांचा प्राध्यापक मुलगा मुकुंदा यांची ही कथा आहे. मुकुंदाच्या बाबांना त्यानेही वकील होऊन आपला वारसा पुढे चालू ठेवावा असे वाटत असते तर मुकुंदाला मात्र आपला स्वतःचा काहीतरी मार्ग स्वीकारायचा असतो. वडील आणि मुलगा यांच्यात अजिबात संवाद नसतो. वडीलांवर असलेल्या रागापोटी मुकुंदा नेहमीच त्यांच्याशी फटकून वागत असतो तर मुकुंदाही वडिलांना टाळत असतो. मुकुंदाची बायको निमा समजुतदारपणे या शीतयुद्धाची मध्यस्थी करत असते. मुकुंदाला स्वतःच्या अपयशी असण्याचा प्रचंड न्यूनगंड असतो. त्यातच त्याच्या कॉलेजमध्ये त्याची सिनिअर म्हणून मीनाक्षी जावडेकर यांची नेमणूक होणार असल्याचे कळताच त्याचा जळफळाट होतो. पीएचडीच्या प्रबंधाच्या बाबतीत अपयशी ठरलेल्या आणि आयुष्याकडे पाठ फिरवलेल्या मीनाक्षीच्या नवऱ्याला पुन्हा एकदा उभे करण्यात मुकुंदा तिला मदत करतो. त्याचे मन

मीनाक्षीकडे आकर्षित होते आहे आणि ही मदत निरपेक्ष नाही हेदेखील तो स्वतःच्या मनाशी कबूल करतो. त्याचे सतत मीनाक्षीकडे जाणे त्याच्या वडिलांना पटत नाही. या बाबतीतही निमा त्याला समजून घेते. एकदा मि. जावडेकरांनी अपमानित केल्याने मुद्दामच तो मीनाक्षीकडे जाणे टाळतो. तेव्हा न राहवून जावडेकर स्वतःच्या पायांनी, आत्मविश्वासाने मुकुंदाच्या घरी येतात. त्यांचा गमवलेला आत्मविश्वास त्यांना परत मिळतो. स्वतःच्या मृत्यूपत्रात मुलाच्या नावे काहीही न केलेल्या वकील साहेबांना मुलाच्या या माणुसकीचा अभिमान वाटतो. मृत्युशय्येवर असताना आपल्या मुलाचा मोठेपणा ते कबुल करतात. आयुष्यभर असलेली कटूता संपते. नात्याला आलेली दुर्गंधी संपून चंदनाचा सुगंध येतो.

वकीलसाहेब म्हणतात, "मुकुंदा मला या असल्या पावसात तर अजिबात मरायचं नाही. या तुफान पावसात कोणी येऊ शकणार नाही. हायकोर्ट, जज्ज, वकील....... मुकुंदा माझ्या चितेत चंदनाचं लाकूड हवं एखादे तरी." [३५]

### ड. ३. मला भावलेल्या कथा

आशाताईंच्या या कथासंग्रहातील पाचही कथा आपल्याला या ठिकाणी भावणाऱ्या आहेत. तरीदेखील त्यातील दोन कथांचा उल्लेख करता येईल. शीर्षककथाही तितकीच दमदार आहे. या कथेव्यतिरिक्त मला भावलेल्या दोन कथांचा उल्लेख या मुद्द्यात करता येईल.

### १) समुद्र

माणसाच्या मनाला समुद्राची उपमा दिली तर समुद्राप्रमाणेच मनाचा थांग लागणे शक्य नाही. माणसाचे आयुष्य म्हणजे या समुद्राचा थांग लावत चालणारा चिरंतन प्रवास आहे. राधा ही या कथेची नायिका आहे. तिच्या आजुबाजूला असणाऱ्या माणसांच्या वागण्याचा, त्यांच्या मनाचा थांग तिला लागत नाही. प्रचंड प्रतिभा असणारे डॉ. कणिकदळे असे क्षुद्रपणे का वागतात? निरंजनच्या पहिल्या लग्नाला, त्याच्या मुलाला, घराला समजून घेऊनही निरंजनच्या घरातले तिला समजून घेत नाहीत. तिच्यामुळे निरंजन सुखी होऊ शकत नाही असे त्यांना का वाटते? वडील नसताना, कष्ट करून आपल्याला मोठे करणाऱ्या आईबद्दल, घराबद्दल काहीही न वाटणारा तिचा भाऊ विक्रम असा का वागतो? या प्रश्नांनी ग्रासलेल्या राधाला नेमकी कारणेच कळत नाहीत.

---

३५. चंदन, चंदन, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जानेवारी १९९३, पृ. ५८

राधा ही खूप हुशार विद्यार्थिनी असते. मानसशास्त्रात पी.एच.डी. करण्याचे तिचे स्वप्न असते. तिचे आधीचे गाईड अचानकपणे अमेरिकेला गेल्याने तिला नाईलाजाने डॉ. कणिकदळे यांची गाईडशिप स्वीकारावी लागते. विक्षिप्त स्वभावाचे डॉ. कणिकदळे तिच्या संशोधनाला खिळ बसवतात. सतत तिला अपमानित करतात. तिच्या प्रबंधाचे काम पुढे जाऊ देत नाहीत. त्यांचे हे वागणे ती सहन करते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे विषय बदलते. तरीदेखील डॉक्टर तिला साथ देत नाहीत. एक विचित्र ताण त्यांच्यामध्ये असतो. एका मोठ्या कॉन्फरन्समध्ये ते तिचा संशोधनाचा पेपर स्वतःच्या नावावर वाचतात. समुद्रासारखी प्रतिभा असणाऱ्या डॉ. कणिकदळ्यांवर अशी वेळ का येते? हे तिला समजत नाही. एकदा केबिनमध्ये ते तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करतात. या धक्क्याने राधा पूर्ण कोलमडते. त्यांच्या अशा वागण्याने ती निराश होते. त्या घटनेनंतर डॉ. कणिकदळे आजारी पडतात. हार्टअॅटॅकने त्यांचा मृत्यू होतो.

राधा निरंजनला त्याच्या पहिल्या मुलासकट स्वीकारते. मनापासून प्रेम करते. पण निरंजनच्या घरात घडणाऱ्या वाईट घटना राधाच्या योगामुळे घडत आहेत असे निरंजनची आई म्हणत असते. निरंजनदेखील ही गोष्ट मान्य करून दुसऱ्या कोणाशी तरी लग्न करायला तयार होतो. निरंजनच्या मनाचा थांग तिला लागत नाही.

घरातल्या परिस्थितीची जाणीव नसलेला उडाणटप्पू भाऊ विक्रम तर तिच्यासाठी कायमच अनाकलनीय असतो. डॉ. कणिकदळेंच्या मृत्यूनंतर त्यांच्या जागी आलेल्या डॉ. सिन्हांनी तिच्या लिखाणाची केलेली स्तुती, तिच्या गुणांची घेतलेली दखल राधाला खूप भावते. निरंजनने नकार दिल्यानंतर तिला जाणीव होते, खरं म्हणजे दुसऱ्या कुणाकरता स्वतःला बदलणे कठीण असते. तिला निरंजनचे शब्द आठवतात. तो म्हणतो, "आमच्या घरी साधीसुधी अनअँबिशिअस मुलगी हवी. तिला प्रश्न पडतो, "म्हणजे नेमकी कशी?" निरंजन घरी येण्याच्या वेळेस सजून एखादा पदार्थ करून त्याची वाट पहाणारी. सगळ्यांच्या होला हो म्हणणारी. स्वतःला निरंजनच्या घरात पूर्णपणे मिसळून टाकणारी. खरं म्हणजे दुसऱ्या कुणाकरता स्वतःला पूर्ण वगळून टाकणे कठीण." [३६] डॉ. कणिकदळे त्यांच्या मृत्यूच्या आधी एक दिवस एक पत्र लिहितात. त्या पत्रामध्ये आपल्या सगळ्या चुकांची कबुली ते देतात. हे सगळे ऐकून राधा अवाक् होते. आपला प्रबंध पूर्ण होणार या आशेने व नव्या उमेदीने ती पुनश्च हरि ओम म्हणून कामाला लागते.

राधा या नायिकेच्या रूपाने आशाताईंच्या कथेमध्ये स्वतःचे मत असणारी आणि

---

३६. समुद्र, चंदन, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९३, पृ. १०४

ते ठामपणे सांगणारी नायिका भेटते व भावते.

## २) एका पावसाळी संध्याकाळी

आशाताई बगे यांच्या उत्कृष्ट कथांपैकी एक कथा 'एका पावसाळी संध्याकाळी'. 'माझ्या कथा – माझी आवड' या आशाताईंच्या आवडीच्या कथांच्या संग्रहात या कथेचा समावेश आहे. एखाद्या अनपेक्षित घटनेतून अनाकलनीय गोष्टी घडतात. काही आव्हानं समोर उभी ठाकतात आणि ती यशस्वीपणे पेलल्याचा अनंदही मिळतो. अशाच एका पावसाळी संध्याकाळी गुणवंत आपल्या विक्षिप्त मुलाची, जयची जबाबदारी सुमित्रावर सोपवण्यासाठी येतो. जयला झालेला मानसिक आजार दुसऱ्या कोणाच्या तरी घरी राहिल्याने कमी होणार असतो. म्हणून तो हक्काने तिच्याकडे येतो. गुणवंतचे सुमिताशी लग्न होणार असते, पण काही कारणाने ते होऊ शकत नाही. या अढीमुळे निरुपमा म्हणजे गुणवंतची बायको आपल्या मुलाला तिच्याकडे ठेवायला तयार नसते. पण सुमित्राच्या बोलण्याने ती तयार होते. डॉक्टरांशी चर्चा करून सुमित्रा आपल्या पद्धतीने त्याला वागवते. कधी प्रेमाने, कधी रागाने त्याच्याशी बोलून त्याला समजावण्याचा प्रयत्न करते. बेमुरवतपणे वागणारा जय सुमित्राच्या वागण्याने बदलण्याचा प्रयत्न करतो. निदान त्या वाटेवर चालू लागतो. तिला जयच्या तऱ्हेवाईक वागण्याचा राग येत नाही. उलट दया येते. तिला वाटते, सगळ्यांचे सगळे ठीक सुरू असताना या प्रवाहातून हा एकटा तरुण कोवळा मुलगा बाजूला कसा पडतो? पण त्याची कीव न करता, तळपायात घुसलेला बाभळीचा तीक्ष्ण काटा बारीक टोकदार सुईने आजूबाजूचे कोवळे मांस बाजूला करून हळूहळू वर काढण्याचा ती प्रयत्न करते. संपूर्ण दोन महिन्यांनंतर सुमित्रा एका वेगळ्या जयला घडवण्यात यशस्वी होते. तिच्या आईसकट सगळ्यांनाच याचे आश्चर्य वाटते. जय पूर्वीसारखा गिटार वाजवू लागतो. ते फक्त सूर नव्हते. हा तो रस्ता होता जिथे तिला जयसोबत पोहचायचे होते. एका अविरत प्रवाहासारखी दोन महिने ज्या रस्त्याच्या ध्यासाने सोबत केली होती तोच हा रस्ता. एका पावसाळी संध्याकाळी जयला घेऊन घरी येऊ का? असे गुणवंत विचारतो आणि सुमित्राचे आयुष्यच बदलते.

हळुवार व कठोर सुमित्रा, जयला सुधारण्यासाठी तिची तळमळ मनाला भावते. कथेच्या सुरुवातीला जयचा राग येतो. पण कथेच्या शेवटी त्याच्या नव्या प्रवासाला शुभेच्छा द्याव्याशा वाटतात.

### ड. ४. अन्य कथा

'चंदन' या कथासंग्रहातील अन्य कथांमध्ये महत्त्वपूर्ण अशी कथा म्हणजे 'श्राद्ध' कथेच्या विषयाच्या संदर्भात आशाताईंना माणूस महत्त्वाचा वाटतो. भारतीय परंपरेतील कर्मकांडाला विशेष स्थान त्यांच्या कथांमध्ये आहे. परंपरा, कुलाचार, रीतीभाती, व्यक्तीच्या श्रद्धा, समजुती यांचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमध्ये नेहमीच दिसते. परंपरेने चालत आलेल्या संस्कारांचा पगडा व दुसरीकडे बदलत जाणारी संस्कृती यामुळे निर्माण होणारी गुंतागुंत परिणामी येणारी अगतिकता, नैराश्य श्राद्ध या कथेत आहे.

### १) श्राद्ध

श्राद्ध ही एक भावना आहे. आपल्या प्रिय व्यक्तिच्या निधनानंतर श्रद्धापूर्वक स्मरण करण्याची रीत म्हणजे श्राद्ध. काळ बदलेल तशा या रुढीदेखील बदलतील. पण त्यामागे असणारी भावना मात्र तशीच राहील. या कथेतल्या सुमनताई आपल्या पतीचे श्रद्धापूर्वक श्राद्ध व्हावे या भावनेला धरून आहेत. पण बदलत्या परिस्थितीनुसार त्यांच्या मुलांना हे सगळे विधी करण्यासाठी पुरेसा वेळ नाही. या रुढीमागे जी भावना आहे ती महत्त्वाची अशी नवीन पिढीची धारणा आहे. सुमनताई या पिढीशी जुळवून घ्यायलाही तयार आहेत. पण निदान श्रद्धापूर्वक स्मरण केले जावे एवढीच त्यांची अपेक्षा असते. सुमनताईंचा धाकटा मुलगा श्राद्धासाठी येऊ शकत नाही तर त्या समजून घेतात. मोठा मुलगा सुधीर सुमनताईंच्या यजमानांसारखाच रोखठोक असतो. त्यांच्याप्रमाणेच त्याचाही या कर्मकांडावर विश्वास नसतो. तरी आईसाठी तो तयार होतो. फक्त जे भटजी व्यसनं करून धार्मिक कर्म करतात, त्यांच्या हातून श्राद्ध होऊ नये अशी त्याची इच्छा असते. त्यापेक्षा एखाद्या गरजू व्यक्तिला हे पैसे दान म्हणून द्यावेत या विचारालाही सुमनताई मान्यता देतात. श्राद्धाच्या दिवशीदेखील सुधीरला ऑफिसमधून रजा मिळत नाही. उशीरा का होईना जानवे घालून, धोतर नेसून तो धार्मिक विधी करतो. मधू काळे नावाच्या गरजू मुलाला पैसे द्यायचे ठरते. त्याच्या भाषेवरून आणि एकंदर उच्चारांवरून तो त्यांना ब्राह्मण वाटत नाही. दान हे सत्पात्री असावे इतकेच त्यांचे म्हणणे असते. पण त्यांनी दिलेले दान सत्पात्री नाही हे लवकरंच त्यांना कळते. एकदा मधू काळे सिगरेट ओढताना आणि अर्वाच्य बोलताना सुमनताईंना दिसतो. यजमानांच्या श्राद्धाच्या निमित्ताने दिलेले दान व्यर्थ गेले. त्यापेक्षा एखाद्या भटजीला बोलवून विधिवत श्राद्ध केले असते तर बरे झाले असते असे त्यांना वाटते. तो मुलगा त्यांना अपमानित करतो. तेव्हा त्यांना वाटते,

"हा तो मुलगा नव्हताच ज्याला त्यांना पैसे द्यायचे होते. श्राद्धाच्या खिरीत तर ही पालच पडली होती. स्वतःशी झगडत झगडत त्यांनीच एकेक गोष्ट वगळली होती. त्यात त्यांना यशही आले होते. आता हेही सोडून द्यायचे कठीण होते. सुमनाताईंनीच त्या मुलाकडं पाठ फिरवली." ३७

## २) वर्तमान

भविष्याचा वेध असणे ही नैसर्गिक गोष्ट आहे. पण भविष्यातल्या आनंदासाठी वर्तमान गमवणे हेदेखील अयोग्य आहे. भूतकाळ सहजपणे विसरता येत नाही. पण भविष्यकाळाचा विचार करताना भूतकाळातील काही महत्त्वाच्या व्यक्ती, तत्व विसरून वर्तमानात जगणाऱ्या अभिरामची ही कथा आहे. सिव्हील इंजिनिअर असूनही नोकरी नसल्याने खचलेला अभिराम ते आपल्याच मस्तीत, कशाचीही फिकीर न करणारा, तत्वांना मुरड घालणारा अभिराम असा त्याचा प्रवास या कथेत रेखाटला आहे.

गावात राहणारा, आई-वडिलांवर नितांत प्रेम-श्रद्धा असणारा अभिराम बेकारीमुळे त्रासला आहे. जयंतीचे अबोध प्रेम समजूनही तो फारसा प्रतिसाद देत नाही. नोकरी नाही म्हणून नैराश्याने ग्रासलेल्या अभिरामाला पी.डब्ल्यू.डीमध्ये नोकरी मिळते. नव्या शहरात गेल्यानंतर सुरुवातीला जयंतीचा फोटो, भाऊंनी दिलेली डायरी, आईने दिलेला खाऊ हे सगळे ठेवलेली पिशवी हरवते. याबरोबरच त्याची तत्वं, श्रद्धास्थानही हळूहळू हरवायला लागतात. असा संकेत कथेत मिळतो.

सुरुवातीला कोणतीही तडजोड करायला तयार नसणारा अभिराम त्याचे वरिष्ठ अधिकारी सोलव साहेब यांच्यासारखी तडजोड करून वरच्या वरच्या हुद्द्यावर जातो. या प्रवासात जयंती, घर, भाऊ, आई, विसू, विसूची बायको, वसुधा यांचा हात सुटतो. ज्या सोलव साहेबांना त्याने तडजोड करण्यासाठी नकार दिलेला असतो, नंतर त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून पुढे जातो. त्याला त्यांच्या विमनस्क झालेल्या घटस्फोटित तरुण मुलीच्या लग्नाचा प्रस्ताव येतो. तेव्हा तो एकटा असतो. हे वर्तमान स्वीकारण्याशिवाय त्याच्याकडे पर्याय उरत नाही.

यश मिळवण्यासाठी वाट्टेल ते करणाऱ्या, सगळे असूनही काही नसणाऱ्या अभिरामचे वर्तमान कथेत मांडले आहे.

---

३७. श्राद्ध, चंदन, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९३, पृ. १२३

### इ. ५. समारोप

'चंदन' हा दीर्घकथासंग्रह आहे. या कथासंग्रहात कथांची संख्या पाच आहे. पण प्रत्येक कथा वाचक म्हणून अंतर्मुख करायला लावते. कथेचा शेवट वाचकांच्या भावनांचा कस बघतो. नातेसंबंधातील ताण, नव्या-जुन्या पिढीतील संघर्ष, स्त्रीजीवनातील समस्या, मनाचा सश्रद्ध वृत्तीशी चाललेला झगडा या आशयाच्या कथा 'चंदन'मध्ये आहेत.

मुकुंदा आणि त्याच्या वडिलांचे शीतयुद्ध 'चंदन' मध्ये आहे. 'अति तेथे माती' या म्हणीचा प्रत्यय या कथेतून मिळतो. एकमेकांजवळ असतानाच एकमेकांचे महत्त्व समजणे कसे आवश्यक आहे हे या कथेतून लक्षात येते. अन्य कथांमध्ये 'समुद्र' या कथेतील ठाम विचारांची नायिका राधा मनाला भावते. 'एका पावसाळी संध्याकाळी' ही कथा आशाताईंना आवडलेल्या निवडक कथांपैकी आहे. परंपरेतील कर्मकांडाला विशेष स्थान देणारी 'श्राद्ध' ही कथा, संस्कारांचा पगडा व बदलत जाणारी संस्कृती यातील गुंता दाखवते. यश मिळवण्यासाठी अवैध मार्ग स्वीकारणाऱ्या अभिरामचे वर्तमान 'वर्तमान' या कथेतून वाचकांसमोर येते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर माणूस म्हणून कसे वागले पाहिजे याची जाणीव या सगळ्याच कथा करून देतात. या कथांमुळे वाचक म्हणून आपण अधिक समृद्ध होतो.

### इ. ६. संदर्भसूची

३४. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, भारत सासणे, सानिया, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. ३२

३५. चंदन, चंदन, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जानेवारी १९९३, पृ. ५८

३६. समुद्र, चंदन, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९३, पृ. १०४

३७. श्राद्ध, चंदन, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९३, पृ. १२३

### ग्रंथसूची

१. वाटा आणि मुक्काम

२. चंदन

## फ. अनंत

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | तुफान | श्रीवत्स, दिवाळी १९९१ |
| २ | नाळ | साधना, दिवाळी १९९३ |
| ३ | मोसम | दिपावली, दिवाळी १९८८ |
| ४ | सोबती | अक्षर, दिवाळी १९८६ |
| ५ | घरचा रस्ता | श्रीवत्स, १९९२ |
| ६ | नातं | साधना, दिवाळी १९९१ |
| ७ | काही पाने | साहित्य सागर, दिवाळी १९९१ |
| ८ | कर्ता | सा. सकाळ, दिवाळी १९९३ |
| ९ | अनंत | तरुण भारत, बेळगाव १९९३ |

**फ. १. – प्रस्तावना**

**फ. २. – शीर्षककथा**

**फ. ३. – मला भावलेल्या कथा**

**फ. ४. – अन्य कथा**

**फ. ५. – समारोप**

**फ. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### फ. १. प्रस्तावना

माणसामाणसामधील परस्परसंबंध हा आशाताईंच्या कथांचा मूळ विषय आहे. साहित्यिक म्हणून माणसांच्या परस्परसंबंधांची कोणती परिमाणे आशाताई लावतात? त्यांच्याच भाषेत सांगायचे तर, "माणसांच्या परस्परसंबंधांचे जाळे एका अथांग, विराट पटावर त्याचा गुंता बघताना, तो जाणून घेताना, त्यातले स्वतःचे अंतर्भूत असणे आणि नसणे एक साक्षी होऊन बघताना हे सगळे अक्षरशः अनेकविध, अपरिमित परिमाणांनी लेखकाच्या शोधात येऊ शकते. प्रत्येक माणूस दुसऱ्यापेक्षा वेगळा असतो आणि कुठेतरी आतील स्तराने सारखाही असतो. या वेगळेपणाने आणि सारखेपणाने हा एकेक माणूस हा संपूर्ण कथेचा, कादंबरीचा, कुठल्याही स्वतंत्र ललितकृतीचा ऐवज असतो. यात लेखकाला

महत्त्वाचा वाटतो तो मानवी अस्तित्वाचा शोध. हा शोध एका विराट, अथांग फलकावर घेता येणे हे एक महत्त्वाचे परिमाण लेखकाला अभिप्रेत असावे." [३८]

आशाताईंच्या या मताचा प्रत्यय अनंत या कथेत प्रकर्षाने जाणवतो. परंपरेने मिळालेले आणि आधुनिकतेच्या स्वीकाराने आलेले विविध आंतरिक ताण, गुंतागुंत, व्यामिश्रता शोधण्याचा प्रयत्न आशाताई नेहमीच करतात. स्त्रीची स्वत्वाची व सत्याची ओढ, वात्सल्याच्या अतूट बंधनांनी कवळू पाहणारी दृष्टी, कुटुंबाशी असणारे नाते यातून तिचा होणारा आत्मशोध या बाबी आशा बगे यांच्या कथांमधून दिसून येतात. लिहिण्याची साधी–सोपी शैली व माणसामाणसामधील नातेसंबंध मांडण्याची हातोटी हे त्यांच्या लिखाणाचे सामर्थ्य आहे. या कथासंग्रहातील कथा वाचतानाही वाचक म्हणून आपण अंतर्मुख होऊन विचार करू शकतो.

### फ. २. शीर्षककथा

'अनंत' या कथासंग्रहाचे प्रकाशन ज्ञानदा पब्लिकेशन्सच्या नंदप्रसाद बर्वे यांनी केले आहे. पहिली आवृत्ती जुलै १९९४मध्ये प्रकाशित झाली. या कथासंग्रहात एकूण नऊ कथा आहेत. पुस्तकात समाविष्ट होण्यापूर्वी विविध मासिकांमध्ये, दिवाळी अंकांमध्ये या कथांची पूर्वप्रसिद्धी झालेली आहे. श्रीवत्स, साधना, दिपावली, अक्षर, साहित्य सागर, साप्ताहिक सकाळ, तरुण भारत या मासिकांमध्ये प्रसिद्धी मिळाल्यानंतर ज्ञानदा पब्लिकेशन्सने या कथांना एकत्र गुंफून 'अनंत' या कथासंग्रहाचे प्रकाशन केले आहे. "पहाटेच्या संधीप्रकाशवेळेला जिने माझा स्वर जागवला" तिला हा कथासंग्रह समर्पित केला आहे. अर्पणपत्रिकेतही आशाताईंचे सुरांशी असलेले नाते स्पष्टपणे दिसून येते. या कथासंग्रहातील शीर्षककथा वाचकाला मृत्यूमुळे वाटणाऱ्या भयापासून मुक्त करते. तसेच अलौकिकाच्या प्रवासाकडे घेऊन जाते.

### अनंत

मृत्यूची भीती न वाटणे व जगण्याची आसक्ती विरणे या दोन्ही भावना, अनुभूती एकच आहेत असे 'अनंत' ही कथा वाचल्यावर जाणवते. तसेच कोणतीही गोष्ट करणे हे एकदा ठरवले की आपली प्रबळ इच्छाशक्तीच सकारात्मक गोष्टी घडवते. हाच अनुभव 'अनंत'मध्ये येतो. या कथेची सुरुवात अतिशय आनंदी वातावरणात होते. सुनेला मुलगा

---

३८. वाटा आणि मुक्काम – भारत ससाणे, आशा बगे, मिलिंद बोकील, सानिया, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. ३६

झाला या आनंदात आजी, आजोबा मग्न आहेत. सगळे घरच आनंदून गेले आहे. पण आज असणारा आनंद क्षणभंगूरच राहतो. तो दुसऱ्या दिवशीही टिकत नाही. दुसऱ्याच दिवशी टिकत नाही. दुसऱ्याच दिवशी बाळाच्या हृदयात डिफेक्ट असल्याचे डॉक्टर सांगतात. त्यामुळे घरातले सगळे हतबल होतात. बाळ जन्माला आल्याचा आनंद लगेचच लोप पावतो. आजीच्या मनात बाळाचे नाव अनंत ठेवावे असे असते. हा अनंता काही काळाचाच सोबती आहे हे कळल्यावर आजी अस्वस्थ होतात. त्यांची बाळासाठी काहीही करण्याची तयारी असते. वैद्यकीय उपचार चालू असतात. इतक्यात हॉस्पिटलच्या तिथेच एक माणूस आजींना भेटतो. तो बाळासाठी महामृत्युंजयाचा मंत्र म्हणावा असे सुचवतो. आजी विश्वासाने व श्रद्धेने तो मंत्र तीन वेळा म्हणण्याचे ठरवतात. ठरवल्याप्रमाणे मंत्रोच्चार केला जातो. अश्चर्य म्हणजे बाळ बरा होतो. एक दोन ऑपरेशन्स करून त्याचा जीव वाचण्याची शक्यता निर्माण होते. या मंत्रपठनामुळे आजी मनाने खऱ्या अनंताच्या म्हणजे ज्याने ही सृष्टी बनवली त्या विधात्याच्या नजीक जातात. बाळ वाचला या आनंदापेक्षाही वेगळे काहीतरी त्यांना गवसते. मंत्राच्या प्रत्येक आवर्तनाच्या वेळी मिटलेल्या डोळ्यांपुढे एक एक रस्ता उलगडत जातो. तो त्यांना कुठल्यातरी अज्ञात, अनाकलनीय प्रदेशात घेऊन जातो. तिथे रोजच्या आयुष्यातले राग, लोभ, प्रेम, माया काहीच नसते. ज्या चिमण्या जीवाकरीता हे सगळे केले तो अनंताही नसतो. सगळेच अतर्क्य, अघटित, विस्मयचकित करणारे. प्रवासाच्या शेवटी शेवटी प्रवासाचे कारणच शिल्लक राहू नये असे काहीतरी तेव्हा आजींच्या मनात येते, “कशा मंत्र उच्चारला! मृत्यूची भीती गेली की जगण्यातली आसक्ती विरत गेली” [३९]

## फ. ३. मला भावलेल्या कथा

अनंत या कथासंग्रहातील मानवी नात्यांचे भावबंध दाखवणाऱ्या कथा मनाला भावतात. यापैकी मला सगळ्यात जास्त भावलेली कथा ‘घराचा रस्ता’

## १) घराचा रस्ता

आशा बगे यांच्या सर्वोत्कृष्ट कथांपैकी एक म्हणजे ‘घराचा रस्ता’. लहान मुलाचे भावविश्व उलगडून दाखवणाऱ्या मोजक्याच कथांपैकी महत्त्वपूर्ण कथा म्हणजे घराचा रस्ता.

---

३९. अनंत, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. १९७

ही कथा मन हेलावून टाकणारी आहे. काळीज पिळवटून टाकणारी आहे. कथा वाचल्यानंतर काहीच सुचत नाही. कोणताही विचार करावासा वाटत नाही. नंदू या निरागस मुलाच्या हरवलेल्या बालपणाची ही कथा आहे. कथेच्या सुरुवातीला नंदूच्या घराकडे जाणारा रस्ता कथेच्या शेवटी वाचकाला हलवून टाकतो.

तिसरीमध्ये शिकणाऱ्या नंदूचे जग शाळा, घराकडे जाणारा रस्ता, त्याचे घर आणि आई इतकेच मर्यादित आहे. आपल्या आईवर त्याचे नितांत प्रेम आहे. त्याची आई आधी जशी वागत असते तशी आता वागत नाही. पेटी शिकवणारे एक सर त्याच्या घरी आईला पेटी शिकवायला येत असतात. ते सर घरी असले की घराचे दार आतून बंद असते. पलंगावरची चादर चुरगळलेली असते. आईच्या केसातील फुले मलूल झालेली असतात असे नंदूच्या लक्षात येते. 'त्या' माणसाच्या अत्तराचा उग्र वास घरात भरून राहतो. नंदूचे बाबा येण्याआधी 'तो' माणूस निघून जातो. या सगळ्या गोष्टी नंदूला खूप खटकतात. आपली आई आपल्यापासून कोणीतरी हिरावून घेत आहे असे त्याला वाटते. पण अचानक तो माणूस येईनासा होतो. त्याची आई थोडी पूर्वीसारखी वागू लागते. नंदूला जवळ घेऊन ती आपले मन मोकळे करते. तिला तो, नंदूचे बाबा आणि छोटी मिनू हवी आहे असे सांगते.

नंदू नेहमीप्रमाणे शाळेत जातो. वर्गात त्याला शिपाई काका बोलवायला येतात. त्याच्यासोबत त्याच्या बाईदेखील जातात. तो घराजवळ जातो तेव्हा त्याच्या घराभोवती खूप गर्दी दिसते. पुढे जाऊन बघतो ते पांढऱ्या चादरीत गुंडाळलेली आई त्याला दिसते. आईच्या पावलांवरून तो ओळखतो. आईने स्वतःला जाळून घेतले आहे हे नंदूला आजुबाजूच्या लोकांच्या बोलण्यावरून समजते. नंदूच्या मनात विचारांची कालवाकालव होते. हे सगळे करताना आईला माझी आठवण आली नसेल का? असे त्याला वाटते. कथेचा असा दुःखाचा शेवट वाचकाला अस्वस्थ करतो. काही दिवसांनी नंदूचे शाळेचे रुटीन सुरु होते. रस्ता तोच असतो पण त्या रस्त्यावर नंदूला आपले, जिव्हाळ्याचे असे काहीच दिसत नाही. घराचा हा रस्ता ओळखीचा असूनही त्याला अनोळखी वाटतो.

लहान मुलाच्या नजरेतून लिहिलेली ही कथा संयमी लिखाणाचा सर्वोच्च नमुना आहे. नंदूच्या आईचे आणि सरांचे संबंध दाखवण्यासाठी दार बंद असणे, चादर चुरगळलेली असणे, डोक्यातील फुले कोमेजलेली असणे, आईचे नंदूकडे दुर्लक्ष करणे अशा लिखाणातून वाचकाला कळतात. त्यासाठी वापरलेली भाषा संयमी आहे. आई हेच विश्व असणाऱ्या नंदूची तिच्या मृत्यूनंतर काय अवस्था झाली असेल? याचा विचार करून मन सुन्न होते.

कथेच्या सुरुवातीला निरागस असणारा नंदू कथेच्या शेवटी रुक्षपणे वागतो. त्या रस्त्यावर नक्षीदार पिवळी हिरव्या गवतातली फुलपाखरे त्याला दिसतच नाहीत. त्याच्या आईच्या साडीवरची फुलपाखरे जळून खाक होतात तशीच रस्त्यात भेटणारी फुलपाखरे त्याला दिसत नाहीत.

## २) नातं

आशाताईंची 'नातं' ही कथा वेगळ्या धाटणीची आणि त्यांचे लेखनसामर्थ्य व्यक्त करणारी आहे. मानवी नाती नेहमीच अनाकलनीय आणि गुंतागुंतीची असतात. दोन व्यक्तींमधील नात्याचे नेमके स्वरूप तिसऱ्याला समजू शकत नाही. एका मृत्यूच्या निमित्ताने जाणवलेला नात्यांचा हा विचित्र गुंता 'नातं' या कथेत आशा बगे हळूवारपणे पण मोठ्या ताकदीने मांडतात.

काही नाती शब्दांच्या पलिकडची असतात. त्या नात्यांना काळाची मर्यादा बांध घालू शकत नाही. कितीही काळ मध्ये लोटला तरी त्या नात्याला तडा जात नाही. अनू आणि केतन या बहिण-भावांच्या अनोख्या नात्याची ही कथा आहे. लग्नापूर्वीची अनू आणि लग्नानंतरची अनू यामध्ये खूप फरक पडला आहे असे केतनला वाटत असते. तिचे लग्न होण्याआधी अनू आणि केतनचे छान गूळपीठ असते. अनेकदा एकमेकांशी न बोलता त्यांना एकमेकांच्या मनातले समजत असे.

अनूचे लग्न झाल्यावर तिला तीनही मुलीच होतात. ती तिच्या संसारात खूप अडकते. त्यामुळे ती पूर्वीसारखी राहिली नाही असे केतनला वाटते. अनूच्या लग्नानंतर शेजारी राहणारे करमरकर काका आणि केतन एकमेकांशी खूप बोलू लागतात. केतनला अनूबद्दल काहीही वाटत असले तरी प्रत्यक्षात अनू पूर्वीसारखीच असते. या नात्यात आणखी एक व्यक्ती येते ते म्हणजे करमरकर काका. अनू, केतन आणि काकांचे त्रिकुट असते. म्हणूनच तिच्या लग्नानंतर केतन काकांच्या जास्त जवळ येतो. चौथ्या बाळंतपणाच्या वेळी अनू जेव्हा माहेरी येते तेव्हा पुन्हा एकदा अनूचे आणि केतनचे नाते बहरते. अमुक एक गोष्ट घडली तर तमुक होणार अशी गृहितके मांडण्याची अनू आणि काकांना सवय असते. अनूच्या कल्पनाशक्तीचे केतनला खूप कौतुक होते. लहान असताना परीक्षा झाल्यावर आई ताज्या कैरीची चटणी करायची. ही चटणी पाहिल्यावर अनू केतनला विचारायची, "कैरीच्या चटणीला कसला वास आहे सांग?"

"कसला? केतन मोठे डोळे करून आश्चर्याने म्हणायचा, "आंब्याच्या चटणीला

आंब्याचाच वास! आणि कसला?"

पण अनू म्हणायची, "सांगू, अरे या चटणीला वास असतो, आपल्या परीक्षा संपून सुट्ट्या लागणार असतात नं, त्या सुट्टीचा. परीक्षा संपत येणार असल्याचा वास....." ती कल्पना डोक्यातून काढणारी अनू त्याला त्यावेळी एकदम ग्रेटच वाटायची. [४०]

हे सगळे वाचताना नकळत वाचक आपल्या लहानपणी चाखलेल्या चटणीच्या स्वादात हरवून जातो. कधी कधी कैरीच्या चटणीचा संबंध अनू संस्कृतच्या पेपरशी जोडायची. आईने ही चटणी केली तर पेपर सोपा जाणार. केतनला हे सगळे खुळचट वाटायचे. करमरकर काकाही अगदी तसेच होते. अंगणात नीळकंठ पक्षी आला की काका म्हणायचे, अमेरिकेत असलेल्या दोन मुलांपैकी एकाचे पत्र येणार. केतनला या सगळ्याचे खूप नवल वाटायचे आणि आवडायचे.

चौथ्या वेळेला अनू येते तेव्हा त्याला तीच अनूताई पुन्हा एकदा भेटल्याचा आनंद होतो. अनूताई तीच असते. हा सगळा केतनच्या मनाचा खेळ असतो. तिला चौथ्या वेळेलाही मुलगीच होते. पण केतनला याचे वाईट वाटत नाही. उलट त्यांचे नाते अधिक दृढ होते. ज्या दिवशी अनूला मुलगी होते त्याच रात्री करमरकर काका देवाघरी जातात. एक नाते संपते. अनूच्या मुलीचे, अनूचे आणि केतनचे नाते बहरते.

### ३) कर्ता

आपल्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांचा कर्ता नेमका कोण असतो? आपण स्वतः, परिस्थिती की बाहेरचे कोणीतरी? काही वेळा या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. किंवा असेही म्हणता येईल की प्रत्येक वेळी मिळणारे उत्तर वेगवेगळे असते. पण बऱ्याच अंशी आपल्या आयुष्यातील बऱ्या वाईट घटनांना आपण स्वतः जबाबदार असतो. किंवा त्या परिस्थितीकडे आपला बघण्याचा दृष्टीकोन.

शेखरच्या बदलीमुळे रजू समुद्रकिनारा असलेल्या कडतूर या गावी येते. तिथल्या शाळेतल्या नोकरीमुळे ती चांगली रमते. तिच्या शाळेत पट्टू नावाचा एक मुलगा असतो. तो छोटासा मुलगा तिला खूप आवडत असतो. रजू तिच्या शाळेची सहल दुसऱ्या एका समुद्रकिनारी न्यायचे ठरवते. पट्टू सहलीला यायला तयार नसतो. कारण त्याच्या घरी त्याचा मामा आलेला असतो. मामासाठी मामी दाखवण्याचा कार्यक्रम होणार असतो. पण रजू पट्टूला बळजबरी सहलीला घेऊन जाते. तिथे पट्टूचे मन रमत नाही. रजू गोष्ट सांगून

४०. नातं, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. १३६

त्याचे मन रमवण्याचा प्रयत्न करावा असा विचार करते. पण पट्टूला घरी जायचे असते. गोष्ट सांगत असताना पुट्टू रजूला कुठेच दिसत नाही. तो समुद्रात तर गेला नाही ना? या भीतीने रजू बेचैन होते. सगळे बसमधून परतीच्या प्रवासाला निघतात. ती निराश मनाने पट्टूच्या घरी जाते. त्याच्या आईला काही सांगायच्या आत पट्टू तिला दिसतो व तिचा जीव भांड्यात पडतो. या सुखद धक्क्याचा कर्ता कोण? या विचारात रजू असते. पट्टू तिला सांगतो, तो दुसऱ्या बसने आला आहे. ती बस शाळेकडेच जात होती. रजूच्या शाळेतल्या स्वामीनाथनने तिचा कुत्रा पण सहलीला आणला होता. रजू गोष्ट सांगत असताना तो कुत्रा होडीच्या मागे मागे समुद्रात जातो. पुट्टू हे पहातो. त्यामुळे तो घाबरतो आणि घाबरून बसमधून घरी जातो. घरी गेल्यानंतर पुट्टू कागदावरचे अर्धवट चित्र पूर्ण करतो. त्यामध्ये त्याने रेघाट्यांच्या आधारे त्याचे घर, समुद्र, होडी, मामा, मामी आणि कुत्रा काढलेले असतात. रजू त्या रेघाट्यांकडे पाहतच बसते. पट्टूने तो एवढा मोठा समुद्र अंगणात आणून ठेवला होता.

'कर्ता' ही कथा वाचकाला गुंतवून ठेवते, उत्कंठा वाढवते आणि सुखद धक्का देते.

**फ. ४. अन्य कथा**

शीर्षक कथा आणि मला भावलेल्या कथा इतक्याच अन्य कथा प्रभावशाली आहेत.

**१) तुफान**

एखाद्या वेळी चाकोरीमध्ये जागणाऱ्या माणसाच्या साध्या सरळ आयुष्यातही आकस्मिकपणे तुफान येते आणि त्याचे सारे आयुष्यच बदलून जाते. 'तुफान' या कथेत मिसेस शारंगपाणीच्या बाबतीत असेच काहीसे घडते. दम्याच्या विकाराने आजारी असणाऱ्या मिसेस शारंगपाणी आपल्या रहात्या घरापासून लांब रहायला येतात. ते घरही त्यांचेच असते. त्या गावातली हवा प्रकृतीसाठी चांगली असते म्हणून त्या तिथे राहयला येतात. त्यांच्या आत्ताच्या घरासमोर एक बिल्डिंग असते. तिथे काही तरुण अविवाहित मुले राहत असतात. त्या सगळ्या मुलांमध्ये एकच मुलगी असते. चौकशीअंती असे समजते की, ती घरातल्यांचा विरोध पत्करून त्या मुलांपैकीच एकाशी कोणाशी तरी लग्न करणार असते. लग्न करणार असली तरी त्या मुलीने मुलांसोबत राहू नये असे मिसेस

शारंगपाणींना वाटत असते. या बाबतीत त्या बोलायला जातात तेव्हाच त्यांना एका तुफानाला सामोरे जावे लागते. त्या मुलींमध्ये त्यांना स्वतःची मुलगी दिसते. त्या मुलांमध्ये त्यांना स्वतःच्या मुलाची बेफिकीरी दिसते. आपली मुले समजून त्या बोलायला जातात. पण त्यांच्या बोलण्याने संतापलेली ती सगळी मुले सिस शारंगपाणींचे कपडे फेडून त्यांना अपमानित करतात. त्या मुलांच्या डोळ्यात विलक्षण क्रोध असतो, वासना नाही. दुसऱ्याच दिवशी मि. शारंगपाणी त्यांना घेऊन जायला येणार असतात. आदल्याच दिवशी हा प्रकार घडतो. हा सगळा अनाकलनीय प्रकार त्यांच्याच बाबतीत का घडतो? हा प्रश्न त्यांना सतावतो. त्या तुफानाचा आवेग त्या विसरूच शकत नाहीत. "त्या चढत चाललेल्या तापाच्या ग्लानीतही मिसेस शारंगपाणींना त्या नजरा आठवतात. क्रोधानं पेटलेल्या त्या नजरेतला एक क्षुद्र अनिर्बंध उसळता संताप. फक्त संतापच. आणि त्यांच्या उघड्या शरीरावर ते धगधगते डोळे कुठेही चिकटले नसतात. डोळे मिटूनही त्या जाग्याच. ठक्क." [४१]

## २) नाळ

आपण ज्या मातेच्या उदरातून या जगात आलो त्या ठिकाणाशी असणारे नाते कधीही न तुटणारे असते. आपण कितीही यशस्वी झालो, मोठे झालो तरी आपली नाळ तोडणे आपल्याला शक्य नसते. आईच्या उदरातून जन्म घेणारे बाळ नाळ तोडून या जगात येते. तरीही आईशी असणारे नाते अभेद्य असते.

कथेमधला उदयन नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत जातो. पण त्याला त्याच्या घराविषयी, कुटुंबियांविषयी ओढ तशीच असते. उदयन त्याच्या आईच्या कर्तृत्वाने भारलेला असतो. आईच्या व्यक्तिमत्वाचा उदयनच्या जीवावर खूप मोठा पगडा असतो. उदयनचे भाऊ, बहिण आईच्या समाजसेवेवर नाराज असतात. त्यांना आईच्या कर्तृत्वाचे कौतुक नसते. पण उदयनला त्याच्या आईच्या विचारांचा, कामाचा अभिमान वाटत असतो. संसारात असूनही आईचा अलिप्तपणा, सगळ्यांची काळजी घेणे, अगदी साध्या गोष्टींमध्ये समाजासाठी, आपल्या लोकांसाठी काहीतरी करण्याची वृत्ती हे सगळे गुण उदयनला भावतात. जीवनाची जोडीदार म्हणून फक्त सौंदर्याला तो महत्त्व देत नाही. नुसते रूप चांगले असून उपयोग नाही हे त्याला जाणवते. त्याच्याच घरात आईच्या परोपकारी वृत्तीमुळे राहणाऱ्या अवनीमध्ये त्याला हे सगळे गुण आढळतात. अवनीच्या वडिलांच्या

४१. तुफान, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. ३१

शारीरिक त्रासामुळे काही दिवसांसाठी उदयनच्या आईने त्यांना आपले राहते घर दिलेले असते. आईच्या या परोपकारी वागण्याचा उदयनला क्षणिक राग येतो. त्याला ते अजिबात पटत नाही. पण नंतर त्यांला त्याच्या घराचे आणि अवनीचे जुने संबंध असावेत असे वाटते. अवनीची नाळ या घराशी जोडली गेली असली पाहिजे असे त्याला जाणवते. तो मनात म्हणतो, "त्या खोल्यांमध्ये तिच्याच खुणा होत्या. तिच्या भिनलेल्या अस्तित्वाच्या. मी येण्याच्या आधीच ती खरं तर आमच्या घरी आलेली होती." [४२]

### ३) मोसम

माणसाचे मन फार विचित्र असते. बऱ्याचदा संकट किंवा दुःख आपल्या मनातल्या उलट्या सुलट्या विचारांमुळे येतात. मनाने एकदा एखादा गैरसमज करून घेतला की ते हट्टीपणाने वागते. या हट्टीपणात अनावधानाने मन दुखावले जाण्याची शक्यता असते. इतकेच नाही तर काही वेळा निव्वळ मनातल्या गैरसमजापोटी कधीही भरून न येणारे नुकसान होते. नंतर कळूनही काही उपयोग नसतो. मनात येणाऱ्या सगळ्या भावनादेखील मोसमी असतात, बदलणाऱ्या असतात. प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे. एकदा हे समजले की अनेक स्वनिर्मित संकटांवर मात करणे शक्य होते. हे सगळे समजण्याचा मोसम निघून गेला की हाती काहीच उरत नाही.

जगदीश आणि अपराजित हे घनिष्ट मित्र नाटकवेडे असतात. बॅक स्टेज, प्रॉम्पटिंगसाठी अपराजित तर दिग्दर्शन व भूमिका यासाठी जगदीश अनेक वर्षे काम करत होते. एकदा अपराजितच्या मनात अचानक जगदीशविषयी असूया निर्माण होते. आपले काहीच महत्त्व नाही, आपल्यावाचून नाटकाचे काही अडणार नाही हा गैरसमज दृढ होत जातो. मनातली असूया इतकी टोकाला जाते की अपराजित एक अतिशय हीन कृत्य करतो. जगदीश व नाटकात काम करणारी जोत्स्ना यांना निनावी पत्रे पाठवतो. विनाकारण वादंग माजवण्याचा प्रयत्न करतो. पण प्रत्यक्षात काहीच घडत नाही. जगदीशला जेव्हा हे सगळे समजते तेव्हा तो खूप दुखावला जातो. नाटकाचा प्रयोग यशस्वी होतो पण त्यांच्या मैत्रीत अविश्वास निर्माण होतो. या धक्क्याने जगदीशला हार्ट ॲटॅक येऊन त्याचा मृत्यू होतो. भावनांचा मोसम लक्षात घेतला असता तर..... अशी हुरहुर लावते.

---

४२. नाळ, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. ५४

### ४) सोबती

प्रत्येकाला आयुष्यात सोबतीची गरज असते. काही वेळा, काही लोक ही गरज नाकारतात. आपण एकटे जगू शकतो असा त्यांचा भ्रम असतो. 'सोबती' या कथेत श्रीमती डिसुझा आणि कल्याणी एकाच कॉलनीत राहणाऱ्या शेजारणी आहेत. डिसुझांना कॅन्सर झाला आहे. त्या घरात एकट्याच राहत असतात. त्यांच्या मुली लांब राहत असतात. त्यांच्या पतीचे निधन झालेले असते. डिसुझांना त्यांच्या आजाराविषयी बोललेले आवडत नाही. कल्याणीला त्यांच्याविषयी आपुलकी वाटते. त्या आपुलकीपोटी कल्याणी त्यांच्याशी आजारपणाबद्दल बोलते. एकटेपणामुळे डिसुझांचा स्वभाव थोडासा विक्षिप्त झालेला असतो. आपल्याला सोबतीची गरज नाही असे त्यांना वरवर वाटत असले किंवा त्या दाखवत असल्या तरी मनातून त्या हळव्या झालेल्या असतात. कल्याणी दोन दिवस जरी त्यांच्याकडे गेली नाही तरी डिसुझांना करमत नाही हे त्यांच्या लक्षात येते.

कल्याणीचे सासरे अण्णा यांना डिसुझांचा खरा स्वभाव लक्षात आलेला असतो. वरवर कितीही रुक्षपणे वागल्या तरी डिसुझा हळव्या आहेत हे त्यांच्या लक्षात येते. एकदा कल्याणीची मुले, चित्रात दिसावे असे डिसुझांचे घर अस्ताव्यस्त करतात. हे डिसुझांना आवडत नाही. कल्याणीच्या हे लक्षात येते. त्या रागापोटी कल्याणी डिसुझांकडे जात नाही. डिसुझांच्या मुली, फादर, टीचर्स येतात. त्यामुळे आपल्या सोबतीची त्यांना तितकीशी गरज नसल्याचे कल्याणीला जाणवते. पण प्रत्यक्षात तसे नसते. आपल्या सोबतीची त्यांना किती गरज आहे हे त्यांच्या नजरेतून व स्पर्शातून तिला कळते. "कल्याणीने डिसुझांचा हात घट्ट धरला. अगदी घट्ट. त्यांची कृश बोटं दाबली आणि डिसुझांनाही तो स्पर्श समजला...."[४३]

माणूस कितीही स्वतंत्र विचारांचा असला तरी एकमेकांच्या सोबतीची त्याला गरज असते हेच या कथेतून दिसून येते.

### ५) काही पाने

एका वेगळ्या ढंगातली ही कथा आहे. आपल्या मनातल्या विचारांना वाट मोकळी करून देण्याचे प्रभावी साधन म्हणजे डायरी लिहिणे. रोज किंवा जमेल तसे आपल्या जीवनातले प्रसंग डायरीत लिहिले जातात. 'काही पाने' ही कथा म्हणजे कथेचे नायक वृद्ध अण्णा यांची डायरी आहे.

अण्णा आणि मनोरमा हे चार चौघांसारखे जोडपे आहे. पण या दोघांचे विचार

---

४३. सोबती, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. ११४

आयुष्यभर जुळलेच नाहीत. दोघे आपापल्या जागी ठाम असतात. तीन मुलांपैकी एकाकडे अण्णा व एकाकडे मनोरमा राहत असतात. उतरत्या वयात दोघांनी एकत्र रहावे अशी आस दोघांनाही नाही. मात्र धाकट्या सुनेच्या बाळंतपणाच्या निमित्ताने हे दोघे एकत्र राहतात. एकमेकांचे विचार जुळत आहेत हे अण्णांच्या लक्षात येते. इतके दिवस ज्या व्यक्तीचा आपण द्वेष केला ती व्यक्ती आपल्याला वाटते तितकी वाईट नाही हेदेखील अण्णांच्या लक्षात येते. मनोरमेविषयी अण्णांच्या मनात जागा निर्माण होते. आयुष्यभर आग्रहाने, हट्टाने पोसले ते सगळे फार छोटे असते हे अण्णांच्या लक्षात येते. आयुष्याच्या उतरणीला अण्णा आणि मनोरमा नव्याने घरटे बांधतात. नव्याने चोचीत चारा आणतात. हे सगळे सुनेच्या होणाऱ्या बाळामुळे. दुर्दैवाने मंगलचे बाळ दगावते. त्यामुळे अण्णा प्रचंड अस्वस्थ होतात. हॉस्पिटलमध्येच त्यांचा तोल जातो. घरी आल्यावर मनोरमा अण्णांना समजावते की, "वाईट मलाही वाटलंय. पण आपल्याला जवळ आणणे हेच त्या चिमुकल्या जीवाचे प्रयोजन असेल." [४४]

कथेच्या शेवटी अण्णा डायरीचे पान लिहित असताना त्यांना प्रचंड थकवा येतो. अक्षरं फिकट होत जातात, पेनची रिफील संपते असा उल्लेख आहे. या शेवटाचा अर्थ आशाताई वाचकांवर सोपवतात. अण्णा थकून डायरी लिहिणे बंद करतात का धक्क्याने बेशुद्ध होतात हे वाचकांनी ठरवायला हवे. २७ जुलै १९८९ पासून सुरू झालेली ही डायरी २१ डिसेंबर १९९० पर्यंत मनोरमा आणि अण्णा लिहितात. डायरीच्या स्वरूपात प्रथमपुरुषी एकवचनी पद्धतीने लिहिलेली ही कथा आशाताईंच्या आत्तापर्यंतच्या कथालेखनातील वेगळेपणा दर्शवते.

**फ. ५. समारोप**

'अनंत' या कथासंग्रहातील सगळ्या कथा मानवी मनातल्या भाव-भावना मोकळेपणाने मांडतात. माणसांमाणसातील नात्यांमधले ताण, प्रेम, इर्षा या सगळ्याचा प्रत्यय त्यांच्या कथांमधून येतो. 'अनंत' या शीर्षककथेतून अलौकिकाचा प्रवास घडतो. 'घरचा रस्ता' ही कथा तर मन हेलावून टाकते. या कथेमधला नंदू डोळ्यासमोरून हलतच नाही. केतन आणि अनू या भाव-बहिणीचे अनोखे नाते 'नातं' या कथेतून उलगडते. 'कर्ता' कथेतला लहानगा पुट्टू त्याच्या निरागसतेमुळे लक्षात राहतो. 'तुफान' या कथेतील मिसेस शारंगपाणींवर ओढवलेल्या अत्याचाराने स्त्री म्हणून जरा जास्तच अस्वस्थ वाटते. 'नाळ'

---

४४. काही पाने, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. १६९

या कथेत अवनीमध्ये आपली खंबीर, अलिप्त स्वभावाची आई उदयन शोधतो. 'मोसम' या कथेत गैरसमजातून अपराजितकडून आपल्या जिवलग मित्राबाबत झालेला अन्याय नकोसा वाटतो. हे असे का? किंवा असे नसते झाले तर..... अशा जर-तरमध्ये आपण अडकतो. सोबतीची गरज असूनही सोबत नाकारणाऱ्या डिसुझा 'सोबती' कथेत भेटतात. 'काही पाने' ही कथा तर लिखाणाच्या आणि आशयाच्या दृष्टीने अतिशय वेगळी आहे. अण्णा आणि मनोरमा या वृद्ध जोडप्याची ही आगळी वेगळी कथा आहे. या सर्व कथांमधून वाचक म्हणून आपण विचार करू लागतो. नातेसंबंध, मानवी भावना मांडण्याच्या सोप्या शैलीने सगळ्याच कथा दीर्घकाळ स्मरणात राहतात.

**फ. ६. संदर्भसूची**


३८. वाटा आणि मुक्काम - भारत सासणे, आशा बगे, मिलिंद बोकील, सानिया, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. ३६)

३९. अनंत, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. १९७

४०. नातं, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. १३६

४१. तुफान, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. ३१

४२. नाळ, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. ५४

४३. सोबती, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. ११४

४४. काही पाने, अनंत, आशा बगे, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. १६९


**ग्रंथसूची**


१. वाटा आणि मुक्काम

२. अनंत

## ग. दर्पण

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | स्वामी | मौज, दिवाळी १९९६ |
| २ | अनोळखी | मौज, दिवाळी १९९५ |
| ३ | पाऊस | सा. सकाळ, दिवाळी १९९४ |
| ४ | नाटक | मौज, दिवाळी १९८३ |
| ५ | अज्ञात | महाराष्ट्र टाईम्स, वार्षिक १९८८ |
| ६ | देणं | हंस, दिवाळी १९८१ |
| ७ | दर्पण | मौज, दिवाळी १९८९ |

**ग. १. – प्रस्तावना**

**ग. २. – शीर्षककथा**

**ग. ३. – मला भावलेल्या कथा**

**ग. ४. – अन्य कथा**

**ग. ५. – समारोप**

**ग. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ग. १. प्रस्तावना

गेल्या काही दशकांमध्ये जोमदारपणे लेखन करून ज्यांनी वाचकांचे लक्ष आपल्या लेखनाकडे वेधून घेतले, त्यामध्ये आशा बगे यांची प्रामुख्याने गणना केली जाते. विशेषतः कथात्ममूल्य असलेले, एकमेकांशी संवादी असे वाङ्मयप्रकार त्यांच्या प्रतिभागुणाला मानवतात. त्या त्या वाङ्मयप्रकारातल्या विकासाच्या शक्यता समर्थपणे शोधत त्यांचे लेखन प्रवास करते. 'दर्पण' या दीर्घकथासंग्रहाचा यासाठी आवर्जून उल्लेख करता येईल.

मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र यांच्या सीमेवरले, बहुतांशी तिथल्या मध्यमवर्गाच्या जीवनाचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते. त्या परिसरातल्या भाषिक लकबी, रीतीभाती यांचा गोडवा सहजपणे त्यांच्या लेखनात मुरुन राहीलेला असतो.

या सगळ्यामागे माणसाच्या जीवनाला नियंत्रित करणारी एक अतर्क्य शक्ती कुठेतरी वसत असल्याचा विश्वास सूक्ष्मपणे त्यांच्या लेखनातून व्यक्त होत असल्याचा

अनुभव येतो. 'दर्पण' या कथासंग्रहात सात दीर्घकथा आहेत. तन्मयतेने लिहिल्या गेलेल्या त्यांच्या या कथातून त्यांच्या लेखनशैक्तीची वैशिष्ट्ये प्रकटताना जाणवतील.

### ग.२. शीर्षककथा

मौज प्रकाशन संस्थेच्या संजय भागवत यांनी १० मार्च १९९७ मध्ये या कथासंग्रहाचे प्रकाशन केले. दुसरी आवृत्ती जून २००० मध्ये प्रकाशित झाली. कथासंग्रहाची किंमत १०० रु. असून वासंती मुझुमदार यांनी मुखपृष्ठ काढले आहे. अर्पण पत्र अतिशय भावुक असे आहे. "दादाजी.....तसे तुम्ही माझ्या शब्दांतून कळत-नकळत व्यक्त होतच गेलात. आता हे 'दर्पण' ही तुम्हालाच" लेखकाच्या लेखनामागे कोणाची तरी प्रेरणा असतेच. या प्रेरणेची प्रांजळ कबुली आशाताई अर्पणपत्रिकेत देतात. सात सर्वोत्तम कथा असलेल्या 'दर्पण' या कथासंग्रहाच्या शीर्षककथेचे कथाविश्व आता पाहूया.

### दर्पण

दर्पणात म्हणजेच आराशात दिसणारे आपले प्रतिबिंब आपल्या मनाच्या प्रतिबिंवापेक्षा कितीतरी वेगळे असते. आरशात दिसणारे आपण आणि मनाच्या पातळीवरचे आपण यामध्ये बराच फरक असतो. काही वेळा मुखवटे घालून जगावे लागते. परिस्थितीनुरुप बनलेला स्वभाव सगळीकडे तसाच ठेवून चालत नाही. 'दर्पण' या कथेत सरुताई गरीब परिस्थिती असल्याने दुसरीकडे काम करतात. नरगुंदकरांच्या घरात त्या स्वयंपाक व इतर कामे करतात. त्यांची मुलगी चिमी पाच वर्षांची असताना त्या नरगुंदकरांच्या घरी येतात. कामात चोख असलेल्या सरुताईंचा स्वभाव मात्र थोडा तापट असतो. आपल्याला न मिळालेल्या आणि दुसऱ्यांना मिळणाऱ्या सुखाचा त्यांना हेवा वाटतो. चोरुन खाणे, वस्तू चोरणे, उलट बोलणे, शेजारी पाजारी चहाड्या करणे अशा दुर्गुणांसकट सुधाताई व डॉक्टर त्यांना स्वीकारतात. कित्येक वेळा त्यांना समजून घेतात. सरुताईंच्या हाताला चव असते. पण त्यांच्या अतिकडक व स्पष्ट स्वभावामुळे त्या सगळ्यांना दुखावतात. सुधाताईंच्या साध्या व समजुतदार स्वभावामुळे सरुताई बदलतात. सरुताईंचा नवरा नरगुंदकरांच्या घरी येतो तेव्हा त्यांना ते अजिबात आवडत नाही. म्हणून ते चिमीला ते तिचे लांबचे काका आहेत असे सांगतात. पण सुधाताईंच्या सहवासाने बदललेल्या सरुताई कथेच्या शेवटी मुलीला नवऱ्याची ओळख वडील म्हणून करुन देतात. घरात मूलबाळ नसताना सुधाताई संयमाने आपले काम करत असतात. डॉक्टरांच्या आकस्मिक निधनानंतरही

स्वतःला सावरतात. सरुताई हे सगळे अनुभवत असतात. त्यामुळे दर्पणात स्वतःचे रूप बघून खुश होणाऱ्या सुरताईंना सुधाताईच सुपर असल्याचे जाणवते. त्यांना सुधाताईंविषयी वाटणारी असूया कमी होते. दर्पणात आपले रूप पाहून स्वतःचेच कौतुक करणाऱ्या सरुताई नरगुंदकरांच्या घरातल्या माणसांच्या मनाच्या नितळ आरशात स्वतःचा कुरुप चेहरा पाहून निराश होतात. दर्पणातले स्वतःचे खरे रूप पाहून स्वतःला बदलवण्याचा प्रयत्न करतात. आशाताई कथेत या सगळ्याचे अतिशय समर्पक असे वर्णन करतात. "रिकामं होत चाललेलं नरगुंदकरांचे घर नि घरातली माणसं एखाद्या नितळ स्वच्छ आरशासारखी त्यांच्यासमोर उभी राहिली आणि त्या आरशात त्यांनी स्वतःला पाहिलं. स्वतःच्या राग–संतापासकट, हेव्या–दाव्यांसकट आणि पिंडालाच झोंबलेल्या हव्यासासकट. त्या थकून भिंतीला टेकल्या. स्वतःचा इतका करुप चेहरा त्या प्रथमच पहात होत्या." [४५]

सुधाताई आणि सरुताई या दोन परस्परविरोधी स्त्री व्यक्तिरेखा आशाताईंनी या कथेतून रेखाटल्या आहेत. सुधाताईंच्या खंबीरपणाचे कौतुक वाटते. पण सरुताईंच्या विचित्र वागण्याचा रागही येत नाही. कारण त्या त्यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे तशा वागत असतात. वरवरच्या दर्पणात न पहाता मनाच्य खऱ्या दर्पणात सरुताई स्वतःला बघतात आणि बदलतात. दर्पण या शीर्षकाची समर्पकता या बदलातून पटते. अशा दर्पणात पहाण्याची शिकवण ही कथा देते.

### ग. ३. मला भावलेल्या कथा

नेहमीच्या जगण्याच्या अनुभवापलीकडे लेखकाला लिहिता येते का? या प्रश्नाचे उत्तर आशाताई वाटा आणि मुक्काममध्ये खूप छान देतात, "तेच तर लेखक करू पाहतो. नेहमीच्या त्याच त्या अनुभवातून तो पलीकडे जाऊ बघतो. त्याला खुणावणारा अनुभव रोजचा परिचित. पण त्यातले वेगळेपण त्याला जाणवते. हे वेगळेपण तो स्वतःकरता शोधतो." [४६]

रोजच्या अनुभवांमधला वेगळेपणा दाखवणाऱ्या अप्रतिम कथा या कथासंग्रहात आहेत. 'मारवा' प्रमाणेच 'दर्पण' मधल्या सगळ्याच कथा मला भावलेल्या आहेत. त्यामधल्या सगळ्यात जास्त भावलेल्या कथांच्या कथाविश्वाचा आढावा घेऊ या.

---

४५. दर्पण, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. १८०

४६. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत ससाणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. २३

## १)    अज्ञात

मोठ्या वयाचे होऊनही लग्न न ठरणाऱ्या मुलीच्या वडिलांची मनोभूमिका या कथेत मांडली आहे. तसा विचार केला तर हा प्रसंग फार वेगळा आहे असे नाही. पण आशाताईंनी अशा संपूर्ण घराची परिस्थिती, भूमिका समर्पकतेने मांडली आहे. सर्वगुणसंपन्न असूनही लग्न ठरत नसलेल्या मुलीला आणि विशेषतः तिच्या वडिलांना काय वाटत असेल याचा भावपूर्ण आशय या कथेत आशाताईंनी मांडला आहे.

बऱ्याच वेळा आपल्या आयुष्यात अशी परिस्थिती निर्माण होते की आपल्या हातात काहीच नसते. जी सुरुवात वाटते ती सुरुवात नसते आणि जो शेवट वाटतो तो शेवट नसतो. सगळं अनाकलनीय, अतर्क्य आणि अज्ञात भासू लागते. बापूंची अवस्था अशीच काहीशी झाली आहे. चार लग्नाच्या मुली घरात असतात. त्यातल्या त्यात थोरलीचे लग्न जास्तच लांबलेले असते. उंच, गोरी आणि शिकलेली असली तरी त्यांची मधुरा वयाप्रमाणे अंगाने सुटत चालली होती. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिच्या चेहेऱ्यावर आत्मविश्वास दिसायचा नाही. शिक्षक म्हणून शाळेत बापूंनी विद्यार्थी घडवले पण स्वतःच्या मुलीमध्ये आत्मविश्वास निर्माण करू शकले नाहीत. मधुराच्या स्थळासाठी बापू वणवण हिंडतात. लग्न जमवण्याच्या प्रक्रियेत त्यांना खूप विचित्र अनुभव येतात. अच्युतचा अनुभव मात्र सकारात्मक विचार देतो. आपल्याला न कळणाऱ्या गोष्टी अज्ञात वाटतात. पण प्रत्येक वेळी आपल्यामधीलच एक अबोध शक्ती आपले रक्षण करत असते. याचा अनुभव बापू घेतात. एकाच दिवशी जन्म आणि मृत्यू ही दोन टोकं बापू बघतात. बऱ्याच वेळा आयुष्य अनाकलनीय, अज्ञात आहे हे कळावे म्हणून हा प्रवास असेल. एखादी गोष्ट मनाप्रमाणे होत नसेल तरीही त्यातून सकारात्मकता शोधण्याची दृष्टी या कथेतून मिळते. बापूंना वाटते, "मधुरेकरता एवढं रान तुडवलं, पण सगळंच पायाखाली चिरडलं गेलं नाही. काहीतरी शिल्लक हे राहीलंच. तळपत्या उन्हातून तो जन्म वेगळा उरला तसं. आयुष्यातलं अज्ञात, अनाकलनीय ते हेच असेल. ते कळावं म्हणूनच कदाचित हा सारा प्रवास...." [४७]

## २)    पाऊस

आशाताईंच्या आवडत्या विषयांपैकी एक महत्त्वाचा विषय पाऊस. त्यांच्या लिखाणातल्या पावसाची विविध रूपे पाहून आपल्यालाही पाऊस आवडायला लागतो.

४७. अज्ञात, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. १२६

आजुबाजूचे वातावरण, माणसांचे वागणे आणि अगदी आपले वागणेही आपल्या मनावरच अवलंबून असते. या कथेतही शास्त्रीय संगीत मनातल्या भावना सांगायला मदत करते. पाऊस आपल्या मनातल्या भावनांप्रमाणे बरसतो आहे असे भासते का पावसाप्रमाणे आपल्या भावना बदलत आहेत हेच बऱ्याचदा समजत नाही. सुदर्शन आणि दमयंतीची अधुरी प्रेमकहाणी पाऊस या निसर्गाच्या अविष्काराशी छान जोडली आहे. फ्लॅशबॅक तंत्राने उलगडत जाणारी ही कथा सुरु होते पावसाने आणि संपतेही पावसातच. पावसामुळेच दमयंती आणि सुदर्शनची पहिली भेट होते. वरवर अगदी साधी, सरळ आणि यशस्वी होणार असे वाटणारी ही प्रेमकथा अचानक वेगळे वळण घेते. सुदर्शन आणि दमयंतीच्या घरातून कोणताही विरोध होत नसतानाही त्यांचे प्रेम विवाहात रुपांतरीत होत नाही. माणसाच्या जवळ गेल्याशिवाय त्याचा खरा स्वभाव कळत नाही. असाच अनुभव दमयंतीला येतो. सुदर्शनचा स्वभाव समजल्यानंतर प्रेम या गोंडस नावाखाली नाते ओढत नेणे दमयंतीला मान्य नाही. स्वतंत्र विचारांची दमयंती हे सुदर्शनला स्पष्टपणे सांगते. त्यामुळेच ते लग्न करत नाहीत. पण तिचे सुदर्शनवर प्रेम असते. असे असले तरी सुदर्शनच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर दमयंतीचे अनाहुतपणे लक्ष असते. याबाबत नियती तिला साथ देते. दमयंतीचे माहेर सुदर्शन राहतो तिथेच असते. त्यामुळे त्याच्याविषयीच्या सगळ्या बातम्या तिला समजतात. त्याची पुस्तके ती वाचते. हे सगळे करत असताना आपला संसार उत्तम रीतीने करून, आपल्या मुलींना सुसंस्कारी बनवते. माहेर सुदर्शनजवळ असल्याने त्याच्या शेवटच्या काळातही ती त्याच्याजवळ थांबू शकते. पद, प्रतिष्ठा, पैसा यामुळे अहंकाराचा स्पर्श झालेला सुदर्शन मृत्यूसमयी मात्र बदललेला जाणवतो. त्यांच्या प्रेमकहाणीत अनेक निसटलेल्या, चुकलेल्या वेळा कथेच्या शेवटी साधल्या जातात. कथेच्या सुरुवातीला त्यांचे पावसात भिजणे वेगळ्या अर्थाने असते. कथेच्या शेवटी त्याच्याबरोबर पावसातले एक आगळे वेगळे भिजणे ती अनुभवते. पावसाची विविध रूपे ती अनुभवते. पहिल्यांदा भेटतात तो पाऊस रिमझिम बरसत असतो. संथ लयीत, एकसारखा, अविरत. त्याच्यामुळे धुऊन तजेलदार झालेली हिरवीकंच झाडे, ओले निथळते रस्ते आणि ओली माणसे दमयंतीला खूप आवडतात. नंतर सुदर्शन जेव्हा दमयंतीचा कायमचा निरोप घेतो तेव्हा दमयंतीचा जीव कासावीस होतो आणि पाऊस कोसळायला लागतो. तो एकदम शतधारांनी बरसायला लागला. सुदर्शन पाऊस पडत राहवा असे वाटत असते. कथेच्या आणि सुदर्शनच्या अंतसमयीदेखील पाऊस येतो. तेव्हा दमयंतीच्या मनात विचार येतो, "तुझ्याबरोबर हे दुसऱ्यांदा भिजले

मी सुदर्शन! बाहेर पावसाचं बेभान, तांडव सुरुच आहे. त्याकडे अनिमिष बघत राहताना वाटते, की केव्हा मरावं ही आपल्या हातातली गोष्ट नाही. पण सुदर्शन, ही वेळ तू साधायला हवी. तशा अनेक वेळा निसटल्या, हुकल्या, ही हुकायला नको." [४८]

### ३) देणं

गाणे, शास्त्रीय संगीत याच विषयावर आधारित ही कथा आहे. या कथेमध्ये महादेवकर मास्तर देणं लागतात, दोन प्रकारचे. एक म्हणजे सुरांचे. दुसरे म्हणजे बाबीचे त्यांच्यावर असलेले प्रेम जे त्यांना कधी कळलंच नाही. पण मास्तरांना बाबीच्या सरांशीच देणे होते. त्यांनी तिच्याकडे कधीही वाईट दृष्टीने पाहिले नव्हते. तिच्या मनात मास्तरांविषयी असणारे प्रेम तिच्या वागण्या बोलण्यातून सहज दिसते. पण बाबीच्या गळ्यातला सूर मास्तरांना महत्त्वाचा होता. तिच्या बाबत कोणताही वाईट विचार त्यांच्या मनात कधीच येत नाही. मास्तरांची पत्नी सरोज, मास्तरांच्या संगीतविषयक ज्ञानाला समजून घेणारी नव्हती. त्यांच्या कलेची तिला जाण नव्हती. बाबीला फुकट शिकवण्यामागे मास्तरांचा शुद्ध हेतू आहे हे तिच्यासकट कोणालाही कळू शकत नाही. बाबी मात्र नकळतपणे मास्तरांवर प्रेम करत असते. मास्तरांच्या मनात तिच्याविषयी तसा विचार नाही हे कळल्यावर ती दुखावली जाते. अपमानित झाल्याची भावना तिच्या मनात येते.

गावातल्या प्रतिष्ठितांची गायनाची शिकवणी नाकारल्याने मास्तर व बाबीबद्दल गावात विनाकारण वावड्या उठतात. पण मास्तर त्याकडे लक्ष देत नाहीत. राजेश्वर उपासनीच्या रूपात त्यांना एक नवीन शिष्य मिळतो. मास्तरांच्या क्लासचा हिशेब तपासणारे मास्तरांनी व्यावहारिक गोष्टी पाळाव्यात असे सुचवतात. कारण कला कितीही असली तरी पोट भरण्यासाठी पैसा हा लागतोच. राजेश्वरच्या रूपाने बाबीची जागा भरून निघते आहे असे त्यांना वाटते. पण मास्तरांना मनात दुखावल्यासारखे वाटते. त्यांना त्यावेळी बाबीची अपमानित नजर आठवते व त्यांचे बाबीसाठी असणारे देणेदेखील आठवते.

या कथेत आशाताईंचे शास्त्रीय संगीतावरचे प्रेम ठळकपणे दिसून येते. जौनपुरी या रागातली 'मंगल गावो रे बधाई, चतुर चतुराई' ही बंदिश. गौडमल्हार रागाचे सूर, यमनकल्याण, स्थिर वजनदार षड्ज-निषाद-गंधारावरून शुद्ध मध्यमाला केलेला

---

४८. पाऊस, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. ७२

स्पर्श. या सगळ्या गोष्टी आशाताईंचे शास्त्रीय संगीतावरील प्रेम व ज्ञान दर्शवतात.

**ग. ४. अन्य कथा**

खरे तर या कथादेखील मनाचा वेध घेणाऱ्या आहेत. माणूस कोणत्या प्रसंगी कसा वागेल हे सांगणे कठीण असते. तो असा का वागला हे सांगणे इतरांसाठी अनाकलनीय असते. स्वतःच्या कृतीमागे प्रत्येकाचे काहीतरी सबळ कारण असते. अमुक एक असा का वागतो? असे विचारण्यात काही अर्थ नसतो. अशा कथांचा मागोवा अन्य कथांमध्ये घेता येईल.

**१) स्वामी**

स्वामी या नावावरूनच कथेत स्वामी आणि सेवक असे असणार हे समजते. नोकर आणि मालक यांच्यातला संघर्ष या कथेत दाखवला आहे. नोकराने कितीही आरेरावीची भाषा केली तरी तो मालकाच्या वरचढ होऊ शकत नाही. नोकर आपल्यापेक्षा सरस आहे असे वाटले तरीही नोकराने आपल्या वरचढ होऊ नये अशीच मालकाची इच्छा असते. नोकराची हार पाहून मालकाला आनंदच होतो ही स्वामित्वाची भावना आनंद देते.

बापू सेवळकर हे हुकुमशहा पद्धतीने वागणारे असतात. त्यामुळे त्यांचा मुलगा कुमार याची तडफड होत असते. कुमारची बायको कांचन त्या दोघांमधला दुवा असते. सूर्यभान नावाचा मुलगा सेवळकरांकडे रंगाचे काम मागायला येतो. ते काम त्याला मिळत नाही म्हणून कुमारच्या मुलाला अक्षयला सांभाळण्याचे काम तो सुरू करतो. सूर्यभानच्या वागण्या-बोलण्यात प्रचंड ताठा असतो. ही गोष्ट कुमारला अजिबात पटत नाही. त्याच्या मनात सूर्यभानविषयी असूया निर्माण होते. कालांतराने सुभानबद्दल असणारा ताण पूर्णपणे जातो. आधी अजिबात करत नसतो अशी सगळी कामे सूर्यभान करतो. परिस्थिती त्याला तसे वागायला भाग पाडते. या सगळ्यामध्ये कुमारला आपण मालक आहोत ही भावना आनंद देते. सुभान नाईलाजाने, परिस्थितीमुळे निर्लज्जपणे कामावर येतो. तो कामावर येतो आहे हे पाहिल्यावर स्वामित्वाची भावना जास्त तीव्र होते. घराची सूत्र आता आपल्या हाती आहेत याचा त्याला आनंद होतो. तो एक दीडदमडीचा नोकर आहे हा विचार मनात आल्याने अलिप्त आणि अस्पष्ट हसू कुमारच्या ओठांवर येते.

## २)	अनोळखी

एका हसत्या खेळत्या कुटुंबात अचानक अशी घटना घडते की ते कुटुंबच उध्वस्त होते. असेच काहीसे श्यामला आणि हेमंतच्या बाबतीत होते. नोकरीतल्या ताणामुळे हेमंत आजारी पडून त्याचा अकस्मिक मृत्यू होतो. कोणावरही अवलंबून न राहता आपला मार्ग निवडण्याचा श्यामला निर्णय घेते. नोकरी करून संसाराचा गाडा ती एकटी हाकत असते. अचानकपणे एक अनपेक्षित घटना घडते. हेमंतचे मित्र भोगटे यांच्या सतत येण्याने आणि मनापासून काळजी घेण्याच्या स्वभावाने श्यामलेची त्यांच्याशी भावनिक जवळीक होते. हेमंतच्या जाण्यानंतर भोगटे श्यामलेची आणि मुलींची आस्थेने चौकशी करतात. हेमंत असताना जसे वागत होते तसेच तो गेल्यानंतरही वागतात. पण त्यांची पत्नी लीला मात्र बदलते. श्यामला आता एकटी आहे आणि भोगटे यांनी तिच्याशी कोणतेही संबंध ठेवू नयेत असे तिला वाटत असते. श्यामलाला मात्र भोगटे यांचा आधार वाटतो आणि तिच्या मुलींनासुद्धा भोगटे काका आलेले आवडत असते. सासर आणि माहेर पैकी कोणाचाही आधार न घेण्याचा निर्णय ती घेते. पण तीच श्यामला भोगट्यांचा आधार का घेते? हे तिलाही कळत नाही. इतर कोणत्याही परपुरुषाला ती दारातही उभे करत नाही. पण भोगटेंच्या बाबतीत ती अशी भावनिक का होते? समजत नाही. कदाचित हेमंत नसल्याने सुरक्षित आधार म्हणून ती भोगटेंकडे पाहत असेल. पण तेच भोगटे कालांतराने तिला खोटे आणि परके वाटतात. अनावर होऊन तिला रडूच येते. आपले ओळखीचे जग तिला अनोळखी वाटू लागते. भक्कमपणे एका अनोळखी जगाला सामोरी जाण्यासाठी सज्ज होत असताना कोणाचा तरी आधार आपण का शोधला? तोही इतका तात्पुरता आणि तकलादू या विचाराने ती निराश होते.

आपल्या आजूबाजूची परिस्थिती आणि माणसं आपल्या मनाच्या अवस्थेप्रमाणे बदलतात की खरेच माणसं बदलतात? या संभ्रमात श्यामला पडते. ओळखीच्या जगात अचानकपणे अनोळखी होणे म्हणजे काय हे सत्य या कथेत अनुभवायला मिळते. या विचारांनी श्यामलाची अवस्था आशाताईंनी वर्णन केली आहे ती अशी, ‘‘एका अनावरतेनं डोळ्यात पाणीच आलं. मग डोळे पुशीत ती स्वतःशीच समंजस हसली. एक ओळखीचं, आपलं म्हणून मानलेलं सुरक्षित जग हळूहळू अनोळखी होत होतं.....दुसरं संपूर्ण अनोळखी, अनपेक्षित असं जग पुढं ठाकत होतं.’’ [४९]

---

४९.	अनोळखी, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. ५६

### ३) नाटक

रंगमंचावरचे नाटक आणि आयुष्याच्या खऱ्या रंगमंचावरचे नाटक याचा वेध या दीर्घकथेतून आशाताईंनी घेतला आहे. काही लोक आपल्या आयुष्यातील मोठी दुःख पचवून आनंदी व सुखी असल्याचे नाटक करतात. नाटक या कथेत खऱ्या रंगमंचावर अशीच भूमिका करणारे डॉक्टर आपल्याला भेटतात.

गावात नाटक बसवण्यात रस असणारी अनेक मंडळी असतात. पण मोहनभाई विशेष ममत्वाने नाटक बसवत असतात. तरीदेखील त्यांच्यासकट सगळ्यांनाच डॉक्टरांचे महत्त्व वाटते. मोहनभाईंइतकेच डॉक्टरांचे नाटकावर प्रेम असते. फक्त त्याबाबत जास्त गंभीरपणे घेत नसल्याचे नाटक डॉक्टर करतात. जेव्हा एखाद्या व्यक्तिच्या आयुष्यात न सांगण्यासारखे दुःख असते, तेव्हा ते लपवण्याकडे त्यांचा कल असतो. तसेच काहीसे डॉक्टरांचे चालू असते. डॉक्टर त्यांचा मुलगा शेखर याच्या विचित्र वागण्याने त्रस्त झालेले असतात. मोहनभाईंच्या म्हणण्याचा मान ठेवून सगळे संगीत नाटक बसवायला तयार होतात. डॉक्टरही मदत करायचे ठरवतात. शेखरमुळे होणारा त्रास लपवतात. नाटक बसवताना जमेल तेवढी मदत करतात. पण मोहनभाई गैरसमजापोटी डॉक्टरांविषयी मनात अढी धरतात. त्यांच्याशी बोलणे बंद करतात. अनेक अडचणींचा सामना करुन नाटक बसवले जाते. मोहनभाई अगदी तालीमींपासून सगळी मेहेनत घेतात. पण डॉक्टर तिकीटे खपवण्यापासून सगळी कामे करतात. त्याचे श्रेय मात्र मोहनभाईंना देतात. नाटक यशस्वी होते याबद्दलचा सगळा मान ते मोहनभाईंना देतात. मोहनभाई आणि डॉक्टरांचे अंतर्मनाचे नाते असते. कितीही मतभेद असले तरी ते नाते तसेच राहते. हे नाटक संपते पण डॉक्टरांच्या जीवनाचे नाटक संपत नाही. त्यातून त्यांची सुटका होत नाही.

## ग. ५. समारोप

'दर्पण' या दीर्घकथांच्या संग्रहात मध्यमवर्गीयांच्या जीवनाचे दर्शन घडते. माणूस स्वतःच्या जीवनाचे निर्णय घेण्यासाठी कितीही सक्षम असला तरीही कोणतीतरी अतर्क्य शक्ती असते जी या सगळ्याच्या पुढे जाऊन आपले काम करीत असते. एका ठराविक वेळी याची जाणीव माणसाला होते. आपल्या रोजच्या अनुभवांमधला वेगळेपणा या कथांमध्ये दिसून येतो. नेहमीच्या जगण्यातल्या अनुभवापलीकडे जाऊन केलेला विचार या कथांमध्ये आढळतो.

'दर्पण' या शीर्षककथेत सरुबाई आणि सुधाताई या परस्परविरोधी व्यक्तिरेखा

भेटतात. सुधाताईंच्या खंबीरपणाचे कौतुक वाटते. सरुबाई विचित्र वागत असूनही त्यांच्या विषयीचा राग दीर्घकाळ टिकत नाही. आपल्या मनाच्या खऱ्या दर्पणात पाहण्याची शिकवण कथेत मिळते. 'अज्ञात' ही कथा पुरुषप्रधान पात्र असणारी आहे. कथेत बापूंना अज्ञात, अनाकलनीय गोष्टींचा प्रवास घडतो. आशाताईंना आवडणारे दोन्ही विषय ज्या कथेत समाविष्ट झाले आहेत ती कथा म्हणजे 'पाऊस'. सुदर्शन आणि दमयंतीची अधुरी प्रेमकहाणी म्हणजे पाऊस ही कथा. पावसाची आणि मनातल्या भावनांची सुरेख गुंफण या कथेत घातली आहे. सुरांचे देणं लागणाऱ्या महादेवकर मास्तरांवर 'देणं' ही कथा आहे. बाबीच्या एकतर्फी प्रेमाला प्रतिसाद न देता केवळ सुरांचं देणं जाणणाऱ्या संगीतप्रेमी शिक्षकाची ही कथा, भावनांच्या एका वेगळ्याच उंचीवर नेते. नोकर आणि मालक यांच्या संघर्षाची कथा 'स्वामी'. आपण मालक आहोत ही स्वामित्वाची भावना काही लोकांना किती आनंद देते हे या कथेत दाखवण्यात आले आहे. 'नाटक' ही कथा दोन मित्रांच्या खऱ्या प्रेमाची कथा आहे. मतभेद झाले तरी मैत्री तुटत नाही असे मोहनभाई आणि डॉक्टरांच्या नात्यातून स्पष्ट होते. ओळखीचे असे जग अचानक अनोळखी होण्याचा अनुभव श्यामला या पात्रातून 'अनोळखी' या कथेत अनुभवता येतो. नेहमीच्या त्याच त्या अनुभवातला वेगळेपणा 'दर्पण' या कथासंग्रहातील कथांमध्ये आशाताई वाचकाला देतात.

## ग. ६. संदर्भसूची


४५. दर्पण, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. १८०

४६. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. २३

४७. अज्ञात, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. १२६

४८. पाऊस, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. ७२

४९. अनोळखी, दर्पण, आशा बगे, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. ५६


## ग्रंथसूची


१. वाटा आणि मुक्काम

२. दर्पण

## ह. ऋतूवेगळे

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | पंख | साधना, दिवाळी १९९४ |
| २ | येरझारा | तरुण भारत, दिवाळी १९९६ |
| ३ | पत्र | साधना, दिवाळी १९९६ |
| ४ | शिल्प | महाराष्ट्र टाईम्स, वार्षिक १९९६ |
| ५ | मल्हार | अनुष्टुभ, दिवाळी १९९६ |

**ह. १. – प्रस्तावना**

**ह. २. – मला भावलेल्या कथा**

**ह. ३. – अन्यकथा**

**ह. ४. – समारोप**

**ह. ५. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ह. १. प्रस्तावना

विसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षातील हा कथासंग्रह स्वातंत्र्योत्तर काळातील एका प्रातिनिधिक वर्गाचे चित्रण करतो. या कथासंग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आशाताई कोणत्याही आवेशाने किंवा स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी अशा दृष्टीकोनातून आयुष्याकडे पहात नाहीत. स्त्री म्हणून जगताना येणाऱ्या अनुभवांचे आणि प्रश्नांचे विश्लेषण त्या मोठ्या ताकदीने करतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील जगणे आधुनिक आणि भौतिक झाले आहे. तरी माणसांच्या मनातील संघर्ष मात्र तसाच राहिला आहे. म्हणूनच माणूस अंतर्मुख होऊन 'तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलासी' या प्रचितीशी पुन्हा येऊ पहात आहे. आशाताईंच्या लिखाणाचा एक वेगळा साज घेऊन या कथा वाचकाला खिळवून ठेवतात. कथासंग्रहातल्या नावाप्रमाणेच प्रत्येक कथेचा वेगळा ऋतू आहे. कधी दुःख, कधी आनंद. सगळा मनाचाच खेळ. पण तरी खरा वाटणारा. मनातला ऋतू बदलला की आजुबाजूचे वातावरण बदलते. असे ऋतू या कथासंग्रहात अनुभवायला मिळतात. या कथासंग्रहाला शीर्षककथा नाही. तरी शीर्षकाप्रमाणे कथा आहेत. लहान मुलांच्या दृष्टीकोनातून लिहिलेल्या दोन कथा या कथासंग्रहात आहेत हे वैशिष्टय सांगता येईल.

### ह. २. मला भावलेल्या कथा

'ऋतूवेगळे' या कथासंग्रहात पाच कथा आहेत. दीर्घकथा या प्रकारात मोडणाऱ्या या सगळ्या कथा विविध मासिकांमधून लोकप्रिय झालेल्या आहेत. कमीत कमी पात्र आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारक रीतीने लिहिलेली व वाचकाच्या मनावर एकच एक ठसा उमटवणारी हकिकत म्हणजे लघुकथा असे ढोबळमानाने सांगितले जाते. लघुकथेचा दीर्घ पट म्हणजे दीर्घकथा. दीर्घकथा लांबीने लघुकथा आणि कादंबरी याच्या मध्ये असते. लघुकथेत पात्र आणि प्रसंगांवर कथेच्या लांबीच्यामुळे बंधन असते. दीर्घकथेत कथेचा नायक किंवा नायिकेच्या जीवनाचा मोठा पट दाखवण्याचे स्वातंत्र्य लेखकाला मिळते. आशाताईंनी साहित्याच्या या तीनही प्रकारात दर्जेदार लिखाण केले आहे. लघुकथा पटकन वाचली जाते, परिणाम मात्र दीर्घकाळ रहातो. दीर्घकथा वाचायला वेळ जास्त लागतो. लघुकथा आवडणारा वाचक कदाचित हा वेळ दीर्घकथेसाठी देईलच असे सांगता येत नाही. मात्र आशाताईंच्या दीर्घकथाही लघुकथेइतक्याच रंजक व परिणामकारक आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सुनील मेहता यांनी १९९९च्या ऑगस्ट महिन्यात हा कथासंग्रह प्रकाशित केला आहे. मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांनी रेखाटले असून किंमत ६० रु. आहे. अर्पणपत्रिकाही खूप वेगळी आहे. आपल्या नातवंडांना या कथा समर्पित केल्या आहेत. 'चि. ऋत्विज आणि चि. अनकित यांना, तुम्ही मोठे व्हाल तेव्हा वाचालच ना आजीची कथा......आशा' आजीने नातवंडांना कथा सांगण्याची आपली परंपरा या अर्पणपत्रिकेतून आशाताई जपतात. या कथासंग्रहातील मला भावलेल्या कथांच्या कथाविश्वाचा हा आढावा.

#### १) पत्र

माणसाच्या आयुष्यात काही प्रसंग असे येतात की त्यामुळे सगळे आयुष्यच बदलते. त्यातही लहान वयात असे प्रसंग घडले तर ते खोलवर परिणाम करतात. मनात एखाद्या व्यक्तिविषयी, घराविषयी एक वेगळीच कल्पना केलेली असते. पण प्रत्यक्षात परिस्थिती वेगळीच असते. विकू या लहानग्याच्या बाबतीत या कथेत असेच घडते. कथेची सुरुवात विकूला त्याच्या आत्याचे पत्र येते या प्रसंगाने होते. विकू व त्याची बहिण मंजू यांनी सुट्टीसाठी आपल्या घरी यावे अशा आशयाचे ते पत्र असते. विकूला या पत्रामुळे खूपच आनंद होतो. आत्याकडे जावे असे त्याला मनापासून वाटत असते. पण विकूच्या आईला तसे वाटत नसते. याचा विकूला राग येतो. शेजारचे बबलूचे बाबा

तिकिटे काढून आणतात. आत्याकडे जायचे, मज्जा करायची असते. दोघेही उत्साहात असतात. विकू आणि मंजू आत्याकडे येतात. प्रत्यक्षात तिथे गेल्यावर हळूहळू दोघांनाही कंटाळा येतो. आपलेच घर चांगले असे वाटू लागते. आत्याचे घर मोठे असते, खाण्यापिण्याची चंगळ असते, नोकर-चाकर असतात. पण घराला घरपण नसते. सगळे आपापल्या खोल्यांमध्ये झोपत असतात. आत्याचे मिस्टर सतत चिडचिड करत असतात. वळसंगकर या नोकराकडून विकूला एक धक्कादायक बातमी समजते. आमराईतल्या घरात काका एका दुसऱ्या बाईसोबत रहातात हे त्याला समजल्यावर त्याला आत्याची दया येते व काकांची चीड येते. विकू आत्याच्या मदतीने आई-बाबांना इंग्रजीतून पत्र लिहितो. एकदा आमराईतल्या घरात सगळेच रहायला जातात, खूप मज्जा करतात. पण तिथे वळसंगकर लहानग्या मंजूच्या बाबतीत चुकीचे वागतात. या प्रसंगामुळे सगळेच नाराज होतात. आत्या विकूला आई बाबांना घ्यायला येण्यासंबंधीचे पत्र लिहायला सांगते. पहिल्या सगळ्या पत्रांमधला उत्साह मावळून विकू अगदी औपचारिक पत्र लिहितो. लहानग्या विकूचे बदललेले भावविश्व आशाताई मांडतात. 'अजून कितीतरी पत्रात लिहायचं होतं. पण त्याला ते लिहिता येईना. मनातल्या मनात त्याने कितीतरी ओळी खोडल्या व लिहिल्या. शेवटी मनातच जीभ लावून ते पत्र चिकटवलंसुद्धा! आपण तर मजा नसलेल्या या घरातून जाऊच पण आत्या! तिला तर इथेच रहावं लागेल. ते पत्र विकूने कॅन्सल केलं. साध्या पोस्टकार्डावर पत्र लिहायचं ठरवलं अगदी औपचारिक.'[५०] कथेची सुरुवात पत्राने होते. आत्याकडे जायला मिळणार या आनंदाने विकू हरवून जातो. प्रत्यक्षात आत्याकडे गेल्यावर त्याची निराशा होते. आत्याकडे पोहोचल्याचे पत्र तो उत्साहाने लिहितो तितक्याच अधीरतेने बाबांनी त्याला आणि मंजूला तिथून घेऊन जाण्याविषयीचे पत्रही लिहितो. या कथेत पत्र हेदेखील एका पात्राची भूमिका बजावते. विकूच्या मनाचा आरसा म्हणजे पत्र. सुरुवातीला मोठ्ठे पत्र लिहिणारा विकू कथेच्या शेवटी पोस्टकार्डावर पत्र लिहितो. कारण आत्याकडे आलेल्या अनुभवांमुळे तिथे रहाण्यातला रस निघून गेलेला असतो. भावनांचा आवेग ओसरल्याने पोस्टकार्डावर थोडक्यात निरोप देण्याचा विचार हा लहानगा करतो. पत्राच्या रूपाने विकूचे मन वाचक म्हणून आपण वाचू लागतो.

५०. पत्र, ऋतूवेगळे, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट १९९९ पृ. ७०

## २) येरझारा

एकत्र राहणे म्हणजे एकमेकांना ओळखणे असे होत नाही इतकेच नव्हे तर कित्येकदा आपल्या जन्मदात्यांनादेखील आपण ओळखू शकत नाही. या कथेत अनूच्या बाबतीत असेच काहीसे झाले आहे. आपल्या आईला ओळखायला ती कमी पडली आहे. समाजकार्याची आवड असणाऱ्या आपल्या आईला स्वतःच्या घराशिवाय, घरातल्या माणसांविषयी अजिबात आत्मीयता नाही असा विचार अनू करत असते. आईने रक्ताच्या नात्यापेक्षाही जोडलेल्या नात्यांवर अधिक प्रेम केले असा तिचा आरोप होता. आईच्या जोडलेल्या नात्यांमध्ये सुरेश, ताराबाई, अक्का आईच्या अधिक जवळ होत्या असे तिला वाटते. स्वतःच्या नवऱ्यापेक्षा, सासूपेक्षा आईने या लोकांवर जास्त प्रेम केले असा तिचा गैरसमज होता. प्रत्यक्षात परिस्थिती खूप वेगळी असते. अनूच्या गरजेच्यावेळी याच आईने तिच्यासाठी एस.टी.चा कंटाळवाणा प्रवास करून आई कितीतरी वेळा येरझाऱ्या घालत होती.

अनूच्या मनात तिच्या आईविषयी, तिने जमवलेल्या गोतावळ्याविषयी, तिच्या कामाविषयी एक विचित्र अढी होती. आईने अनूच्या बाबांसाठी म्हणजे स्वतःच्या नवऱ्यासाठी व सासुबाईंसाठी केलेले कष्ट अनूला खरे वाटत नव्हते. आईने जमवलेल्या गोतावळ्याचे प्रेम खोटे वाटत होते. आईची मुलगी असून जी आपुलकी, जो जिव्हाळा आपल्याला वाटत नाही, तो सुरेशला म्हणजेच आईच्या मेसमध्ये डबे पोहचवणाऱ्या या मुलाला कसा वाटतो? या प्रश्नाचे उत्तर तिला मिळत नाही. तिला या गोष्टीचा मनोमन राग येतो. आपल्या आईसाठी त्याच्या डोळ्यात पाणी यावे आणि आपले डोळे, मन कोरडेच असावे याचे तिला आश्चर्य वाटते. रीत म्हणून ती सगळे सोपस्कार करते. पण आईविषयी तिला काहीच वाटत नसते. मात्र कथेच्या शेवटी आईचे सगळ्यांमध्ये राहून एकाकी, अलिप्त जगणे अनूला समजते. हा सगळा डोलारा तिने स्वतःसाठी उभारला नव्हता हे तिला कळते. तिच्या वागण्यातला खरेपणा तिच्या लक्षात येतो. तिच्या आयुष्यात तिने स्वतःला कुठेही केंद्रस्थानी ठेवले नव्हते हे अनूच्या लक्षात येते. तिच्या डोळ्यात पहिल्यांदाच आईसाठी अश्रू तरळतात. आईला ओळखण्यात अनू कमी पडते. निःस्वार्थीपणे वागणाऱ्या आईला ती समजून घेते. सुरेश, ताराबाई, अक्का या सगळ्यांना जर आई जवळची वाटते तर त्यात नक्कीच काहीतरी तथ्य असणार याचा विचार अनू करते. आईने जमवलेल्या गोतावळ्याचे दुःख तिला खरे वाटू लागते. सत्याची खूण पटल्यावर माणसाच्या विचारात असा बदल होऊ शकतो. पूर्वग्रहदूषित नजर बदलून

डोळसपणे अनू या सगळ्याकडे बघते. आईने तिच्यासाठी केलेली निरपेक्ष ये-जा (येरझारा) तिला आठवतात आणि आईच्याबद्दल कृतज्ञता दाटून येते.

## ३) मल्हार

या कथेच्या नावातच आशाताईंच्या आवडीच्या शास्त्रीय संगीताची झलक आहे. कथेत शास्त्रीय संगीतातल्या रागांची आणि मानवी भावनांची सुरेख गुंफण केली आहे. रागातल्या सुरांचा योग्य मेळ असेल तरच ते सूर मनाला भावतात. कोणत्या रागात कोणते सूर महत्त्वाचे, कोणते सूर वर्ज्य यावरून राग ओळखता येतो. माणसाच्या जीवनातही या सुरांप्रमाणेच आवश्यक आणि वर्ज्य गोष्टी असतात. एखाद्या रागात महत्त्वाच्या सुरांना वादी, संवादी म्हणतात. त्यांच्याशिवाय तो राग ओळखताच येत नाही. या सुरांना जितके महत्त्व असते तितकेच महत्त्व वर्ज्य स्वरांना असते. तसेच आवश्यक आणि अनावश्यक अशा सगळ्या गोष्टी आपल्या आयुष्यात तितक्याच महत्त्वाच्या असतात. त्यामुळे एखादी गोष्ट घडूच नये असे वाटत असले तरी ते घडणेही आवश्यक असते. असा संदेश मल्हार ही कथा देते.

या कथेत देसाई मास्तर गायन शिकवत असतात. त्यांच्याकडे शास्त्रीय संगीत शिकण्यासाठी मुले येत असतात. त्यांची मुलगी निरू हिचे लग्न जमत नसते. गुणी अशा आपल्या निरुचे कितीही प्रयत्न केले तरी लग्न जमत नाही याचे देसाई मास्तरांना वाईट वाटते. त्याचवेळी निरुच्या लग्नाइतकीच ते पावसाची वाट पहात असतात. म्हणूनच पाऊस पडला तरच नीरुचे लग्नही नक्की जमेल असे देसाई मास्तरांना वाटते. एका लांबच्या ठिकाणाहून नीरुसाठी स्थळ सांगून येते. त्या गावी देसाईंचा पेंढारकर नावाचा जुना मित्र रहात असतो. पेंढारकरची बायको अर्धवट संसार सोडून जाते, या एका दुःखाव्यतिरिक्त त्याला कोणतेही दुःख नाही असा देसाई यांचा समज असतो. देसाईंसाठी मुलीचे लग्न हा एकच महत्त्वाचा प्रश्न असतो. त्यावेळी पेंढारकरांचा नातू खूप आजारी पडतो. निरु त्यांच्या नातवासाठी खूप करते. हे देसाईंना फारसे पटत नाही. कारण तिचा दाखवण्याचा कार्यक्रम असतो. तेव्हा निरुने आपला मूड चांगला ठेवावा असे देसाईंना वाटत असते. श्रीखंडे यांच्या मुलाचे स्थळ निरुला आलेले असते. सुरुवातीला मुलीचे वडील म्हणून देसाई मास्तर अगतिकता दाखवतात. पण दाखवण्याचा कार्यक्रम झाल्यानंतरही श्रीखंडे दुसऱ्याच एका मुलीशी लग्न ठरवून मोकळे होतात. श्रीखंड्यांच्या मुलाला निरु आवडलेली असते. तरीही तो तिला नकार देतो याचे देसाई मास्तरांना वाईट

वाटते. पण या घटनेने देसाई मास्तरांना पेंढारकरांचे दुःख मोठे वाटू लागते. दुःख भोगून त्यातून सुटका होत नाही. सुखानंतर दुःख आणि दुःखानंतर सुख चालूच असते. दुःख भोगून झाले तरी संपत नाही याची त्यांना जाणीव होते. तिकडे जाताना प्रवासात असताना ते निरुला म्हणतात, 'काय झालं पावसाला माहित नाही.' तेव्हा निरु म्हणते, 'आता कशाला हवाय पाऊस? उलट प्रवासात नकोच.' निरुला ते काहीच बोलत नाहीत पण त्यांच्या मनातल्या पावसाचा आणि निरुच्या लग्नाचा संबंध फक्त त्यांनाच माहित असतो. तिचे लग्न तेव्हाच ठरेल जेव्हा पाऊस येईल असे त्यांचे गृहितक असते. पण प्रत्यक्षात वेगळेच घडते. श्रीखंड्यांचा निरुला नकार येतो तेव्हा पाऊस पडतो. श्रीखंडे तिला नकार देतात, तेव्हा स्थिर स्वरात देसाई त्यांना समज देतात. बाहेर पावसाचा जोर वाढतो. थांबायला तयार नसल्यासारखा पाऊस तीव्रतेने पडतो. निरुच्या लग्नाचा आणि पावसाचा असा संबंध असतो. मल्हार रागाचा आणि पावसाचा संबंध आहे त्यातून आपण चांगले किंवा वाईट ठरवत नाही अगदी तसाच.

### ह. ३. अन्य कथा

अन्य कथांमध्ये कथासंग्रहाची सुरुवातच एका उत्कृष्ट कथेने झाली आहे.

### १) पंख

लहान मुलांचे भावविश्व कसे निरागस असते हे या कथेतून दिसून येते. मीनूचे निरागस मन, तिचे अज्ञानातले सुख आणि वयानुसार तिला आलेली समज हा प्रवास या कथेतून आशाताईंनी मांडला आहे. मीनू नावाच्या एका लहानगीच्या नजरेतून ही कथा गुंफली आहे. लहान मुलांना आपलेच विश्व, त्या छोट्याशा विश्वातल्या मागण्या, कल्पना, पंख लावून स्वच्छंदीपणे जगणे हेच सारे आवडत असते. मोठ्या माणसांच्या जगातले नियम त्यांना समजतही नाहीत आणि पटतही नाहीत. मीनूच्या दृष्टीने उन्हाळ्याच्या सुट्टीत मामाकडे जाणे, सिनेमा बघणे व बाहुलीचे लग्न लावणे हेच सगळ्यात महत्त्वाचे वाटते. एका मे महिन्याच्या सुट्टीत तिला हे सगळे कार्यक्रम रद्द करावे लागतात. या सगळ्याचे मूळ कारण म्हणजे ओळखीच्या कुटुंबातील कमूताईसाठी नवरा शोधणे ठरते. त्यामुळे सुरुवातीला मीनूला कमूताईचा राग येतो. पण हळूहळू कमूताईचे आणि तिचे सूर जुळतात. मीनूला कमूताई खूपच आवडू लागते. कमूताईला तिच्या मनासारखा नवरा मिळावा असे मीनूला वाटते. कमूताई दिसायला खूप सुंदर नसते, पण ती गायला लागली की खूप सुंदर

दिसते असे मीनूला वाटते.  तिला बघायला येणाऱ्या नवऱ्याने तिला गुणगुणतानाच पसंत करावे असे मीनूला नेहमी वाटे.  कमूताईचे लग्न परागमामाशी व्हावे असेही मिनूला वाटत असे.  तसे तिने आईला सांगतले.  पण परागमामा गोरा पान आहे, इंजिनिअर आहे असे आई सांगते.  मिनूला आई असेही म्हणते, 'कुठले पंख लावून जन्माला आली आहेस?' म्हणजेच कल्पनेच्या कोणत्या दुनियेत रमते आहेस असे आईला म्हणायचे असते.

कमूताईचे लग्न एका बिजवर माणसाशी होते.  मीनूची आईच त्यात पुढाकार घेते.  हे असे का होते?  याचे उत्तर मीनूला मिळत नाही.  उलट आई म्हणत होती ते पंखच नाहीयेत की काय असे तिला वाटते.  त्या पंखावर बसून आलेले गाणेही संपले असे मीनूला वाटते.  लहान मुलांचा सच्चा निरागसपणा या कथेत दिसून येतो.  या कथेतही मनातल्या भावना व शास्त्रीय संगीतातील रागांचा सुंदर मेळ घातला आहे.  उदा. बहार रागाची बंदिश व कमूताईचे हसणे, समुद्रासारखा अथांग राग यमन.

निरागस मीनू कमूताईला विसरू शकत नाही.  आगळे वेगळे पंख ल्यालेली ती निरागस मीनू कमूताईच्या सासरी जाण्याने नाराज होते.  तिच्या बहिणीचा सोनूचा दाखवण्याचा कार्यक्रम होणार असतो तेव्हाही ती अशीच थोडी उदास होते.  सोनूताईनंतर आपलेही असेच होणार या कल्पनेने मीनू विचार करते, सारे बदलत गेले, मग हेच का नाही बदलत?  आई म्हणायची ते पंखही तुटून पडतात आणि त्या पंखांवर बसून आलेले गाणेही.  म्हणजेच कल्पनेचे जग सोडून ती वास्तवात जगायला लागते.  स्वप्नातल्या जगात रमण्यापेक्षा वास्तवातल्या दुनियेत जगण्यातच खरे शहाणपण आहे हा संदेश या कथेतून आशाताईंनी दिला आहे.

## २) शिल्प

मनोविश्लेषणात्मक भूमिकेतूनच ही कथा लिहिली आहे.  आपल्या मनातल्या विचारांवर आपली कृती अवलंबून असते.  इतकेच नव्हे तर सगळे जग आपण जसा विचार करू तसे दिसते.

या कथेतील सोमनाथची आई लहान वयातच गेल्याने तो त्याच्या आजीकडे रहात असतो.  आजीने केलेले संस्कार त्याच्या मनावर खोलवर रुजले आहेत.  निमाशी त्याचे लग्न होते.  त्यानंतर त्याचे विश्व बदलते.  त्याच्या आयुष्यात एक वाईट घटना घडते.  दुर्दैवाने चिक्कू नावाच्या त्याच्या मुलाचा समुद्र बळी घेतो.  गणपती विसर्जन करायला गेले असताना चिक्कू परत घरी येतच नाही.  त्यानंतर त्यांना एक मुलगी

होते.  पण तरीही निमा कायमच दुःखात बुडालेली दिसते.  सोमनाथचे विचार खूप वेगळे असतात.  जी गोष्ट आपल्याला त्रास देते, दुःख देते तिला सामोरे जाऊनच तिची धार बोथट करावी लागते.

सोमू आणि निमा महाबलीपूरमला फिरायला जातात.  तिथे शिल्पाप्रमाणे भासणारे दगड असतात.  दगडी शिल्प आणि आकाशातील ढगांमध्ये आपल्या मनातल्या विचारांचे प्रतिबिंबच दिसते.  सोमूला त्यातले एक शिल्प गणपतीसारखे दिसते.  एका क्षणी त्याला निमा, छोटी, आजुबाजूचा परिसर एक शिल्पच भासते.  निमाच्या मनातले विचार जाणून घेण्याचा सोमनाथ प्रयत्न करतो.  एका दुकानात तिला गणपतीची छोटी मूर्ती आवडलेली असते.  त्यावेळी ती मूर्ती खरेदी करण्यासाठी सोमू नकार देतो.  गाडी महाबलीपूरमचा परिसर सोडून गेल्यावर तो गाडी पुन्हा मागे फिरवतो व तो गणपती घेतो.  एकमेकांना समजून घेताना एकमेकांच्या मनातल्या व्यक्त, अव्यक्त इच्छा पूर्ण करणे किती महत्त्वाचे आहे हे त्याला पटते.  डोळ्यांसमोरचे शिल्प आपल्या मनातल्या विचारांसारखे भासते असे त्याच्या लक्षात येते.

एका वेगळ्या तऱ्हेने लिहिलेली ही कथा वाचकाला विचारप्रवृत्त करते.  मनातले विचार आणि कृती यांची सांगड घालावी लागते हाच तो विचार.    कथेच्या शीर्षकाची समर्पकता पटण्यासाठी कथा नीट समजून घ्यावी लागते.  आशाताईंच्या इतर कथा वाचकाच्या मनाचा वेध घेतात.  पण ही कथा विचार करायला लावते.

### ह. ४. समारोप

'ऋतूवेगळे' या कथासंग्रहात पाच दीर्घकथा आहेत. या सगळ्या कथा आशाताईंच्या इतर कथासंग्रहातील कथांपेक्षा वेगळ्या आहेत.  आधुनिक आणि भौतिक जगातील मानवी मनातला संघर्ष या कथांमध्ये प्रकर्षाने आढळतो.  प्रत्येक कथेत वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावण्याची ताकद आहे.  या कथांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आशाताईंच्या अन्य कथांसारख्या त्या समजून घ्यायला सोप्या नाहीत.  'पत्र' ही या कथासंग्रहातील मला आवडलेली कथा.  लहान विकूचे भावविश्व त्याच्याच नजरेतून प्रभावीपणे मांडले आहे.  आत्याकडे जाण्यासाठी उत्सुक असलेला विकू तिथे गेल्यावर नाराज होतो.  पुन्हा त्याच्या घरी जावे असे त्याला वाटते.  'येरझारा' कथेत आपल्याच आईविषयी गैरसमज बाळगणारी अनू पूर्वग्रहदुषित नजरेने वागत असते.  पण कथेच्या शेवटी तिचा गैरसमज दूर होतो.  जे व्हायचे ते होतेच.  ते टाळता येत नाही हा संदेश

'मल्हार' ही कथा देते. देसाई मास्तर पावसाचा आणि निरुच्या लग्नाचा संबंध लावत असतात. पण असा विचार करणे हे तितकेसे योग्य नाही असे त्यांना वाटते. लहान, निरागस 'मिनू' पंख या कथेत भेटते. लहानपणीचे तिचे पंख गळून पडलेत अशी जाणीव तिला होते. शास्त्रीय संगीताचा मनातल्या भावना दाखवण्यासाठी उत्तम वापर केला आहे. मनातल्या विचारांचा आणि कृतीचा संबंध 'शिल्प' या कथेत दाखवला आहे. एका वेगळ्या धाटणीतून या कथा लिहिल्या आहेत. स्त्री म्हणून जगताना येणाऱ्या अनुभवांचे विश्लेषण आशाताईंनी या कथासंग्रहात केले आहे.

## ह. ५. संदर्भसूची

५०. पत्र, ऋतूवेगळे, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट १९९९ पृ. ७०

## ग्रंथसूची


१. ऋतूवेगळे

## ई. निसटलेले

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १. | मैत्र | (सा. सकाळ, दिवाळी १९९६) |
| २. | निर्मला | (अक्षर, दिवाळी १९९५) |
| ३. | कोन ठगवा | (दीपावली, दिवाळी १९९६) |
| ४. | घोरपड | (श्रीशब्द गुलमोहोर, दीपावली १९९०) |
| ५. | शुद्ध | |

**ई. १. – प्रस्तावना**

**ई. २. – मला भावलेल्या कथा**

**ई. ३. – अन्य कथा**

**ई. ४. – समारोप**

**ई. ५. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ई. १. प्रस्तावना

स्त्री-पुरुष संबंधातली विविध नाती सुन्न करणारी असतात. आयुष्याला वळण देणारी असतात. अशाच काही नात्यांचे बंध 'निसटलेले' या कथासंग्रहात अनुभवायला मिळतात. स्त्री-पुरुष संबंध म्हटले की एक संकुचित विचार मनात येतो. पण हा कथासंग्रह वाचताना आपल्यालाही एक वेगळा दृष्टिकोन मिळतो. या कथासंग्रहातील स्त्री-पुरुष प्रेम, वासना, आकर्षण या भावनांपोटी एकमेकांशी संबंध ठेवत नाहीत. त्या ही पलीकडे माणूस म्हणून असणारे संबंध शोधतात.

नात्यांना समजून घेणे आणि त्याप्रमाणे जगणे ही एक जीवघेणी कसरत असते. ही कसरत करताना मनात असलेले खूप काही जगणे निसटलेले असते. त्या जाणीवेतही जीवन कळते. वर्षानुवर्षे सहवास असूनही जीवनातील अनाकलनीयता, मानसिक गुंतागुंत आणि वर्तनातील अगतिकता यातून निसटलेले जगणे हतबल करत नाही, तर आणखी जगण्याची उमेद देते. जीवनाचे हे सूत्र आशाताईंच्या कथांमधून सहजपणे प्रत्ययाला येते.

हा कथासंग्रह आशाताईंनी अशोक यांना समर्पण केला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सुनील मेहता यांनी फेब्रुवारी १९९८मध्ये कथासंग्रहाचे प्रकाशन केले आहे.

चंद्रमोहन कुलकर्णी यांनी मुखपृष्ठाचे रेखाटन केले आहे. लोकसत्ता, अक्षर, मौज, दीपावली, श्रीशब्द, गुलमोहोर, सा. सकाळ, मिळून साऱ्याजणी या दिवाळी अंकांमधून या कथांची पूर्वप्रसिद्धी झाली आहे.

### ई. २. मला भावलेल्या कथा

### १) मैत्र

मधुराशी असणारे मैत्र जपणारी विभा या कथेची नायिका आहे. विभा-भास्कर, मधुरा-उदयन, निखिल-मनू या जोड्या एकमेकांचे खूप चांगले मित्र असतात. मधुरा एक दिवस अचानक घराच्या गॅलरीतून उडी मारून आत्महत्या करते. तिचे असे अकाली जाणे सगळ्यांनाच अस्वस्थ करते. पण याची तीव्रता मधुराचा नवरा उदयन आणि विभा यांच्यासाठी जास्त असते. मधुराच्या मृत्यूचे कारण शोधताना उदयन सैरभैर होतो. हे विभाच्या लक्षात आल्यानंतर त्याला मदत करण्याचे ती ठरवते. कारण उदयन एक चांगला आर्किटेक्ट असतो. पण मधुराच्या आत्महत्येने तो खचतो. मधुरा सुमार दर्जाचेच लेखन करत असते. तरी पहलवार नावाचे प्रकाशक तिचे लेखन छापत असतात. तिच्या डायरीच्या पानावर उदयनला काही संदर्भ आढळतात. त्यावरून पहलवारांचे आणि मधुराचे संबंध असावेत असे त्याला वाटते. तो हे सगळे विभाला सांगतो. मधुरा तशी नसते हे विभाला माहिती असते. पण उदयनच्या मानसिक परिस्थितीमुळे ती या सगळ्यात लक्ष घालायचे ठरवते. खचलेल्या उदयनला पुन्हा जीवन देण्यासाठी ती त्याच्याशी खोटे बोलते. मरण्याआधी मधुराने कादंबरीवजा लिहिलेले बाड पहलवार तिला देतात. त्यामध्ये तिने लिहिलेल्या कशाचाही पहलवारांशी संबंध नसतो. विभा त्यांना तसे विचारतेदेखील. पण उदयनला सावरण्यासाठी ती त्याला सांगते की मधुराच्या बाबतीतली त्याची शंका खरी होती. मनातल्या मनात ती मधुराची माफीदेखील मागते. गेलेल्या मैत्रीणीशी असणारे मैत्र जपण्यापेक्षा धडधाकट, जिवंत पण खचलेल्या उदयनला पुनर्जन्म देण्याचे मैत्र ती जपते. मधुराच्या मृत्यूचे कारण समजल्याने व आपलाच अंदाज बरोबर आहे असे कळल्याने उदयन पूर्ववत होतो.

### २) निर्मला

आपल्या विचारांशी ठाम असणारी निर्मला या कथेची नायिका आहे. श्रीवास्तवसारख्या विक्षिप्त लेखकाला ती ताळ्यावर आणते. आला तेव्हा चिडचिडा,

विक्षिप्तपणे, तिरसटपणे वागणारा श्रीवास्तव जाताना संवेदनशील मनाने विचार करू लागतो. अरुणशी (निर्मलचा नवरा) परिचय झाल्याने श्रीवास्तव आपले आत्मचरित्र लिहायला अरुणच्या गावी येतात. पूर्वी त्यांनी पाहिलेले गाव आणि आत्ताचे गाव यामध्ये फरक पडलेला असतो. श्रीवास्तवांना आता लिखाणासाठी आल्याचा पश्चात्ताप होतो. ते आल्यापासूनच सगळ्यांवर चीडचीड करत असतात. कधीही उठणे, जेवणे, गलिच्छ वागणे यामुळे निर्मलेला काही वेळा त्यांचे आश्चर्य वाटत असे, पण तिने त्यांचा कधीही राग राग केला नाही. एकदा तर जास्त दारु प्यायल्याने ते प्रचंड घाण करून ठेवतात. ती आणि अरुण चिडचिड न करता सगळे आवरतात. निर्मलाचे सासरे तात्या मात्र त्यांना चांगलेच सुनावतात. संततधार पावसाने त्या गावात पूर येतो तेव्हा गावातले लोक निर्मलाच्या बंगल्याचा आश्रय घेतात. चार-पाच दिवस सगळ्यांबरोबर राहिल्याने श्रीवास्तवच्या स्वभावातला कटूपणा कमी होतो. लेखनिक म्हणून त्याला मदत करणारा सुदेशही त्याला आवडू लागतो. उद्धटपणे वागणाऱ्या श्रीवास्तवला आपल्या शांत स्वभावाने निर्मला वठणीवर आणते. लेखक म्हणून त्याला मानाने वागवते. त्याच्या विचित्र स्वभावातूनही चांगले शोधण्याचा प्रयत्न करते. श्रीवास्तवच्या विक्षिप्त वागण्याने वाचक म्हणून आपणही वैतागतो. पण निर्मला मात्र संयमाने सगळे हाताळते.

**ई. ३. अन्य कथा**

**१) कोन ठगवा**

'राधा' या अनाथ मुलीची ही कथा आहे. दद्दांच्या आणि तिच्या नात्याची कहाणी आशाताईंनी प्रभावीपणे सांगितली आहे. स्त्री-पुरुषांमधील वेगळ्या नात्यांचा शोध या कथासंग्रहात त्यांनी घेतला आहे. वडिलांच्या जागी असणाऱ्या दद्दांसाठी राधाची ओढ विलक्षण असते. अनाथाश्रमातून आणलेल्या राधाला दद्दा आपल्या मुलीहूनही जास्त माया करतात. त्यामुळेच राधा स्वतःला कधीच आश्रित समजत नाही. दद्दांचा ८५वा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्ताने ती अमेरिकेहून भारतात येते. हे एक कारण असले तरी तिच्या आयुष्यात आलेली विरक्ती आणि एक अनामिक पोकळी तिला दद्दांकडे घेऊन येते. दद्दांनी तिला स्वतःच्या घरातल्या सदस्याचा मान दिल्यामुळे त्यांच्या घरातल्यांना मात्र तिचा राग येत असे. ती खूप शिकून श्रीकरशी लग्न करून अमेरिकेत जाते. बऱ्याच वर्षांनी परत आल्यानंतर मात्र तिची आर्थिक परिस्थिती पाहून सगळ्यांचाच तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. उलट तिच्यावर हक्क असल्यासारखे सगळे

कशाची तरी अपेक्षा करतात. दद्दा हे शास्त्रीय संगीताचे उपासक असतात. वयोमानाने नीट ऐकू येत नसले तरी गाण्यावर असलेली श्रद्धा तशीच असते. त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी त्यांच्या काही जुन्या बंदिशींच्या कॅसेटस् काढाव्यात या उद्देशाने राधा तयारी करते. दद्दांकडे आल्यावर तिला एका असीम शांततेचा अनुभव येतो. परदेशातल्या रंगीबेरंगी कोलाहलात, पैसे कमवण्यात, श्रीकरच्या सहवासात, मुलांना मोठे करण्यात, कुठेही हा निवांत स्पर्श तिला अनुभवायला मिळत नाही. त्या ओढीनेच ती इतक्या लांब आलेली असते. सगळे असूनही काही तरी नसण्याची जाणीव दद्दांकडे आल्यानेच शांत झाल्याचे राधाला जाणवते. दद्दांच्या 'कोन ठगवा' या बंदिशीतून तिला उत्तर मिळते. ती म्हणते, ''गाण्याचे शब्द म्हणता म्हणता दिसतच गेले. दिसता दिसता दर्पणच होऊन गेले. जगण्याचे निमित्त, हेतू, प्रवाह, सारे सरमिसळ होऊन त्यांचा एक वेगळाच रंग होऊन गेला. ओळखीच्या खुणा भेटत गेल्या.''[५१]

## २) घोरपड

या कथेत आयुष्याच्या कुरुपतेला घोरपडीची उपमा दिली आहे. ही कुरुपता आहे दिवाकर विनायक रत्नपारखीच्या कुरुप आयुष्याची. 'घोरपड' ही कथा आहे एका वेगळ्या मैत्रीच्या नात्याची. खूपदा टाळूनही काही माणसं आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनतात. ही कथा आहे कथेची नायिका, दिवाकर विनायक रत्नपारखी आणि एका पुस्तकाची. एका पुस्तकामुळे दिवाकरची आणि कथेच्या नायिकेची ओळख होते. पाहताक्षणीच त्याचा तिला राग येतो. त्याच्या अस्तित्वाने गुदमरुन टाकावे इतका.

लायब्ररीत भेटलेला हा माणूस तिची इच्छा नसतानाही वेळी अवेळी तिच्या घरी येतो. संपूर्ण गावात त्याला रिकामटेकडा म्हणत असतात. तो असा कोणाच्याही घरी जाऊन बसत असतो. समोरच्याने कितीही चिडचिड केली तरी त्याला काही फरक पडत नसतो. तिला मात्र नकळतपणे त्याच्या येण्याची, बसण्याची, बडबडण्याची सवय होते. त्याला मुली बघायला जायचे असते तेव्हा दिवाकर तिने त्याच्या सोबत यावे असे म्हणतो. तिचे त्याच्या आयुष्यातले महत्त्व सांगतो. ती त्याच्या सोबत जाऊन एक मुलगी पसंतही करते. त्यानंतर दोन-अडीच महिने तो येतच नाही. त्याच्या न येण्याने ती अस्वस्थ होते. त्याने भेट दिलेले पुस्तक वाचते. त्यामध्ये असणारे आत्महत्येचे विचार त्याला पटलेले नसतात हे तिला आठवते. पण तिच्या मते ही आत्महत्या चुकीची नसते. थोड्याच

५१. कोन ठगवा, निसटलेले, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, फेब्रुवारी १९९९, पृ. क्र. १३२

दिवसात तिचा नवरा दिवाकरच्या आत्महत्येची बातमी तिला दाखवतो. ती मनात म्हणते, ''सौमित्रने समोर धरलेला पेपर मी बाजूला केला. पुन्हा पेपर वाचण्याची गरज नव्हती. त्यानं आत्महत्या केली हे मला पटलं होतं. नव्हताच दुसरा पर्याय त्याच्यापुढे....कदाचित आयुष्यातल्या कुरुपतेला तो प्रथमच समोरा गेला असेल.....त्या पुस्तकाने मला माणसात आणलं.....पण त्याच्यावर मात्र विपरित परिणाम झाला.....नसतं धैर्य तेवढं कुणात..... तशी संधी सुद्धा नसते...''[५२]

## ३) शुद्ध

शुद्ध या कथेविषयी आशाताई म्हणतात, "ही कथा माझ्या मनात कितीतरी दिवस सुरु होती. पण ती अकस्मात पूर्ण झाली. रामेश्वरच्या समुद्राच्या परिसरात उथळ होत गेलेल्या समुद्रातून रामाने बांधत नेलेला सेतू माझ्याशी वेगळे बोलून गेला. त्या प्रवासावरून परतल्यानंतर एका शब्दाचाही फरक न करता ही कथा मी लिहिली. ही कथा लिहितानाचा विलक्षण असा आवेग मी अलीकडे फार कमी अनुभवला. आज हे सारे दुरून बघून मी कथेची आवड सांगताना मलाच वेगळं वाटत आहे. आपण तरी तेच तसेच कुठे असतो. इतक्या काळानंतर.''

'शुद्ध' ही कथा एक वेगळाच अनुभव देणारी आहे. नवविवाहित सरिता एका विचित्र प्रसंगाला सामोरी जाते. कथा वाचताना अक्षरशः जीवाचा थरकाप होतो. पती-पत्नीच्या हळुवार नात्याला दृष्ट लागते. नुकतेच लग्न झाल्यानंतर एकमेकांना समजून घेण्याच्या प्रक्रियेतच त्या दोघांनाही या प्रसंगाला तोंड द्यावे लागते. लग्न झाल्यानंतर हनीमूनसाठी ते जातात. तिथे सरिता पहाटे उठून फेरफटका मारायला जाते. इथपर्यंत सगळे अगदी तना-मनावरून मोरपिस फिरवावे तसे हळुवार, नाजुक असते. तिथे फिरत असताना दोन-चार नराधम तिच्यावर पाशवी बलात्कार करतात. या प्रसंगाचे वर्णन आशाताई संयत भाषेत करतात, "नुकत्याच ओळखीच्या झालेल्या त्या नव्या नव्हाळीच्या झुळझुळ अनुभवात एका गटारपाण्याचा वाकडातिकडा जबरदस्त ओहळ आला. त्यानं आक्राळविक्राळ पुरासारखं त्या नव्हाळीला गिळूनच टाकलं.''

त्यानंतर तिच्या नवऱ्याचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलतो. प्रेमाची जागा तिरस्कार घेतो. तिच्या शरीराच्या ज्या वळणांचे, घाटांचे त्याला आकर्षण वाटत असते ते सगळे त्याला त्रास देऊ लागते. तिचा स्पर्श नकोसा होतो. केवळ उपचार म्हणून

---

५२. घोरपड, निसटलेले, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, फेब्रुवारी १९९९, पृ. क्र. १४६

तो तिच्यासोबत रहातो. प्रवास करत करत मदुराईहून ते रामेश्वरला जातात. तोपर्यंत तो तिच्याशी अजिबात नीट वागत नाही. तिची घालमेल, वेदना समजून घेत नाही. उलट संधी मिळेल तेव्हा तिला झिडकारून अपमानित करतो. रामेश्वरला गेल्यानंतर तिची मासिक पाळी सुरू होते. त्या घटनेने त्याच्या मनात असा विचार येतो की अजूनही काही रुजलेले नाही. त्यामुळे नव्याने काहीतरी रुजण्याची शक्यता आहे. त्याच्या स्वरात पुन्हा एकदा ओलावा निर्माण होतो.

### ई. ४. समारोप

'निसटलेले' या कथासंग्रहात आशाताईंनी स्त्री-पुरुषातील नात्यांचा शोध घेतला आहे. हे नाते नवरा-बायको किंवा प्रियकर-प्रेयसीचेच असावे असे नाही. एका वेगळ्या पातळीवरची मैत्री स्त्री-पुरुषांमध्ये होऊ शकते. याचाच वेध आशाताईंनी या कथासंग्रहात घेतला आहे.

लेखनाचा प्रवास चालू असताना लेखकाला नित्य नव्या वाटा खुणावत असतात. लेखनाची सुरूवात होते तिला लेखकाचा आरंभ म्हणून बघता येते. पण लेखकाची प्रत्यक्ष लेखनाआधी पूर्वतयारी म्हणून बरेच काही चालू असते. लेखकाचा हा प्रवास चालू असला तरी नित्य नवे प्रदेश, नव्या वाटा या साऱ्या अनुभवांमधून तो एका विशिष्ट ठिकाणीच येतो. कधी कधी तर वाटते, लेखकाला आयुष्यभर एकच गोष्ट खुणावत असते. त्या एकाच, गोष्टीतून तो एक संपूर्ण आकाश कवेत घेतो.

साहित्यिक आपले आयुष्य जगताना त्यांच्या विशिष्ट समाजात राहूनच जगतात. पण त्यांचा विचार हा त्या समाजमनाचाच असेल असे सांगता येत नाही. तो त्या समाजातील लोकांच्या विचारापेक्षा वेगळाही असू शकतो. जे आपल्यासमोर आहे त्याचेच बोट धरून त्यापलीकडे जाणे हेच निर्मितीचे बळ आहे. आशाताईंच्या कथा स्त्री-केंद्री आहेत. त्यांच्या कथांमध्ये स्त्रीचे भावविश्व उलगडत जाते. त्याचबरोबर पुरुषी मानसिकताही डोकावते. 'घोरपड' मधला दिवाकर विनायक रत्नपारखी कथेच्या नायिकेला अनुभवाने कळतो. सुरुवातीला त्याच्यावर असलेला राग कथेच्या शेवटी नाहिसा होतो. स्त्री-पुरुष नात्यामधली एक वेगळीच मैत्री या कथेत अनुभवायला मिळते. 'कोन ठगवा' या कथेत दद्दांशी आणि कथेतल्या अन्य पुरुषांशी राधाचे असणारे नाते अधोरेखित होते. 'शुद्ध' कथा तर अंगावर शहारे आणते. नवपरिणित जोडप्याचा एका दुर्घटनेने झालेला विसंवाद नकोसा वाटतो. ती दुर्घटना तिच्या आयुष्यात घडलीच नसती

तर, असा विचार वाचक म्हणून केला जातो. ‘निर्मला’ कथेतील निर्मला एक स्पष्टवक्ती तरीही मायाळू गृहिणी म्हणून भावते. श्रीवास्तव या विक्षिप्त लेखकाला ती माणसात आणते. ‘मैत्र’ मध्ये उदयन आणि कथेच्या नायिकेमधली शुद्ध मैत्री आशाताईंनी दाखवली आहे. उदयनच्या आयुष्यात मधुराच्या आत्महत्येने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी ती प्रामाणिकपणे प्रयत्न करते.

‘निसटलेले’ या कथासंग्रहातील दीर्घकथा मनात रेंगाळत रहातात, विचारप्रवृत्त करतात.

## ई. ५. संदर्भसूची

५१. कोन ठगवा, निसटलेले, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, फेब्रुवारी १९९९, पृ. क्र. १३२

५२. घोरपड, निसटलेले, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, फेब्रुवारी १९९९, पृ. क्र. १४६

## ग्रंथसूची

१. निसटलेले

## ज. माझ्या कथा माझी निवड

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | मारवा | सत्यकथा, दिवाळी ७९ |
| २ | शुद्ध | |
| ३ | एका पावसाळी संध्याकाळी | |
| ४ | नाळ | |
| ५ | पाहुणा | |
| ६ | मुसळधार | |
| ७ | मल्हार | |
| ८ | नवस | |

**ज. १. – प्रस्तावना**

**ज. २. – कथांचा आशय**

**ज. ३. – समारोप**

**ज. ४. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ज. १. प्रस्तावना

मराठी कथेच्या क्षेत्रातले आशा बगे हे एक महत्त्वाचे नाव. आपल्या लेखनातील गुणवत्तेच्या बळावर साहित्यक्षेत्रात त्यांनी हे अढळपद मिळविले आहे. विविध पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या आशाताईंच्या सगळ्याच कथा अप्रतिम आहेत. वाचक किंवा अभ्यासक म्हणून या कथांमधल्या आवडत्या कथा निवडायचे म्हटले तर ते खूप मोठे आव्हान ठरेल. वाचक म्हणून जर हे इतके कठीण वाटत असेल तर, आशाताईंना या कथांमध्ये आवडणाऱ्या कथा निवडताना किती जड गेले असेल. लेखक जेव्हा साहित्याची निर्मिती करतो तेव्हा ते साहित्य त्या त्या वेळच्या परिस्थिती व मनःस्थितीप्रमाणे लिहिले जाते. ते त्या प्रत्येक वेळी मनाला भावते. काही काळ गेल्यानंतर आपल्याच लिखाणातला दर्जा लक्षात येऊन त्यात सुधारणा होते. तरीही त्या त्या वेळी भावलेले साहित्य पुन्हा वाचताना पुनःप्रत्ययाचा आनंद देते. कथा लिहायच्या म्हणून आटापिटा न करता अगदी मनापासून लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये आशाताई अग्रेसर आहेत. त्यामुळेच त्यांच्या लेखनात सहजता, तरलता, प्रादेशिकता आहे. साहित्यिकांच्या लेखनावर त्यांच्या भोवतालच्या

प्रदेशाचा परिणाम होतो. याविषयी आशाताई म्हणतात, "भोवतालचा भौगोलिक प्रदेश, तिथली माणसं, संस्कृती यांचा लेखकाशी फार जवळचा संबंध असतो. त्या मातीच्या गंधानेच लेखनाला जीवनरस दिलेला असतो, ती त्याची शिदोरीच असते. माणूस बघण्या-समजण्याची, मानवी संबंध जाणून घेण्याची त्याची गरज त्याला लेखक म्हणून तिथेच जाणवत असेल." [५३]

आशाताईंच्या साहित्यात या प्रादेशिक, सांस्कृतिक खुणा पावलोपावली आढळतात. संगीत ही त्यांची भूमी आहे. या भूमीतले नित्यनवे अनुभव त्या लेखनातून मांडतात. आवडलेल्या कथा निवडताना मनोगतात त्या म्हणतात, "मला आवडलेल्या, सर्वात आवडलेल्या कथा म्हटल्यावर एकदम पहिल्या झटक्यात काही पाच, सात कथा समोरच येऊन ठाकल्या. आणि त्याही पुन्हा एकट्या नाहीत तर त्या लिहितानच्या वेळेचे एक समृद्ध मोहळ पुन्हा उठवून आल्या. आता त्या साऱ्याच अनुभवाकडे दूरस्थ असे पहाता येणे शक्य झाले आणि असे इतकी वर्षे गेल्यानंतर बाजूला राहून अलिप्तपणे त्याकडे बघता बघता काही कालाने अकस्मात आलेला तो वळवाचा पाऊस थांबला पण त्याने सुगंधित केलेली माती अजूनही तशीच कशी!" [५४]

कथासंग्रहाचे आशाताईंचे बोलके मनोगत त्यांच्या व्यक्तित्वाची उंची दर्शविणारे आहे. त्यांचे त्यांच्या स्वत्वाशी असणारे नाते कथांमधून दिसते. या कथा लिहिण्यामागची त्यांची अंतस्थ ताकद दिसते. या कथासंग्रहात 'मारवा' ही कथा सोडली तर इतर कथा खूप गुणवत्तापूर्ण, निर्दोष, रसिकांनी डोक्यावर घेतलेल्या अशा नाहीत. तर इथे निकष फक्त त्यांच्या आवडीचा आहे असे त्या म्हणतात. हे म्हणणे सुद्धा त्यांचा प्रामाणिकपणाच. खरे तर त्यांच्या इतरही बऱ्याच कथांचा समावेश या कथांमध्ये व्हायला हवा असे मनापासून वाटते.

### ज. २. कथांचा आशय

माझ्या कथा माझी निवड हा आशाताई बगे यांचा कथासंग्रह त्यांच्याच कथांच्या पुनःप्रत्ययाचा आनंद देतो. नागपूर येथील ज्ञानेश प्रकाशनच्या शैलजा काळे यांनी १ मे २००१ रोजी या कथासंग्रहाचे प्रकाशन केले आहे. विवेक रानडे यांनी मुखपृष्ठ रेखाटले आहे. आशाताईंच्या आवडत्या आठ सर्वांगसुंदर कथा या कथासंग्रहात आहेत. या कथांविषयी आशाताई लिहितात, "माझ्याच त्या कथानुभवाकडे आता वळून बघताना

५३. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५७

५४. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. ५

हळूहळू मी सजग होत गेले. या कथा मला आवडल्या होत्या. अजूनही आवडतात म्हणजे नेमके काय? आपल्याच कथा इतक्या वाटचालीनंतर आवडणे म्हणजे काय नेमके? त्या त्या अनुभवानी त्या त्या वेळी मला पार गुंतवून टाकले होते. ती गुंतवणूक आता नव्हती. त्यातून संपूर्ण नवे विलक्षण असे काही हाती आले असे तेव्हाही नव्हते, आताही नाही. मग तरीही हे आवडत रहाणे म्हणजे काय? त्या अनुभवांनी लिहितेवेळी माणसाच्या जगण्यासंबंधी एका कुतूहलाची अनुभूती दिली. [५५]

त्यांनी लेखन करताना घेतलेली अनुभूती वाचक म्हणूनही आपल्याला मिळते. या आठ कथांचा आशय आपण पाहिलेला आहेच. तरीही या कथासंग्रहाच्या निमित्ताने तो थोडक्यात पुन्हा एकदा अनुभवता येईल.

### १) मारवा

संगीत ही आशाताईंची भूमी आहे. या भूमीतील अनुभव त्यांना नित्यनूतन वाटतात. या भूमीने त्यांना कितीतरी दिले. 'मारवा' कथेला त्यांच्या घरातल्या संगीततृष्णेचे पाणी चढलेले आहे. तो अनुभव त्यांचा वैयक्तिक असावा असेच वाटते. या कथासंग्रहाच्या मनोगतात त्यांनी तसे म्हटलेही आहे. या कथेने त्यांना स्वतःपलीकडे नेले असे त्या म्हणतात. त्यांच्या आवडत्या कथांमध्ये त्यांची ही सगळ्यात आवडती कथा आहे. मारवा राग, त्यातला जीवघेणा रिषभ, ती सायंकाळची वेळ, नदीच्या पाण्यावर पडलेला प्रकाश या सगळ्या गोष्टी वैयक्तिक अनुभवातूनच आल्या आहेत.

आबा देशपांडे या पात्राच्या सहाय्याने वर्तमानकाळ व भूतकाळातील प्रसंगांमधून कथेची बांधणी केली आहे. आबा व रघुनाथ या मुख्य पात्रांभोवती कथेची गुंफण आहे. नव्या व जुन्या पिढीतला संघर्ष या कथेतून जाणवतो. कार्तिकी पौर्णिमेनिमित्त होणारा गोपालकृष्णाचा उत्सव आबांच्या घराण्याचा कुळधर्म असतो. या कुळाचाराला रघुनाथ दरवर्षी येतो. पण त्या वर्षी उत्सव सुरू होऊनही रघुनाथ येत नाही. कुळधर्माच्या कीर्तनाला रघुनाथ येतो पण त्यांच्या नवीन संकल्पनांसह. त्याने केलेले बदल स्वीकारणे आबांना जमत नाही. हे बदल अनुभवताना त्यांची अवस्था विचित्र होते. आपल्याच मुलाविषयी मनात आलेल्या मत्सराच्या भावनेची त्यांना शरम होते. आपला मुलगा आपल्या घराण्याची परंपरा व्यवस्थित चालू ठेवेल याची त्यांना खात्री वाटते. या कृतार्थतेच्या भावनेतच कथेचा समारोप होतो.

---

५५. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ६

## २) शुद्ध

'शुद्ध' या कथेविषयी आशाताई म्हणतात, "ही कथा माझ्या मनात कितीतरी दिवस सुरु होती. पण ती अकस्मात पूर्ण झाली. रामेश्वरच्या समुद्राच्या परिसरात उथळ होत गेलेल्या समुद्रातून रामाने बांधत नेलेला सेतू माझ्याशी वेगळे बोलून गेला. त्या प्रवासावरून परतल्यानंतर एका शब्दाचाही फरक न करता ही कथा मी लिहिली. ही कथा लिहितानाचा विलक्षण असा आवेग मी अलीकडे फार कमी अनुभवला. आज हे सारे दुरून बघून मी कथेची आवड सांगताना मलाच वेगळं वाटत आहे. आपण तरी तेच तसेच कुठे असतो. इतक्या काळानंतर.''[५६]

'शुद्ध' ही कथा एक वेगळाच अनुभव देणारी आहे. नवविवाहित सरिता एका विचित्र प्रसंगाला सामोरी जाते. कथा वाचताना अक्षरशः जीवाचा थरकाप होतो. पती–पत्नीच्या हळुवार नात्याला दृष्ट लागते. नुकतेच लग्न झाल्यानंतर एकमेकांना समजून घेण्याच्या प्रक्रियेतच त्या दोघांनाही या प्रसंगाला तोंड द्यावे लागते. लग्न झाल्यानंतर हनीमूनसाठी ते जातात. तिथे सरिता पहाटे उठून फेरफटका मारायला जाते. इथपर्यंत सगळे अगदी तना–मनावरून मोरपिस फिरवावे तसे हळुवार, नाजुक असते. तिथे फिरत असताना दोन–चार नराधम तिच्यावर पाशवी बलात्कार करतात. या प्रसंगाचे वर्णन आशाताई संयत भाषेत करतात, "नुकत्याच ओळखीच्या झालेल्या त्या नव्या नव्हाळीच्या झुळझुळ अनुभवात एका गटारपाण्याचा वाकडातिकडा जबरदस्त ओहळ आला. त्यानं आक्राळविक्राळ पुरासारखं त्या नव्हाळीला गिळूनच टाकलं. [५७]

त्यानंतर तिच्या नवऱ्याचा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलतो. प्रेमाची जागा तिरस्कार घेतो. तिच्या शरीराच्या ज्या वळणांचे, घाटांचे त्याला आकर्षण वाटत असते ते सगळे त्याला त्रास देऊ लागते. तिचा स्पर्श नकोसा होतो. केवळ उपचार म्हणून तो तिच्यासोबत रहातो. प्रवास करत करत मदुराईहून ते रामेश्वरला जातात. तोपर्यंत तो तिच्याशी अजिबात नीट वागत नाही. तिची घालमेल, वेदना समजून घेत नाही. उलट संधी मिळेल तेव्हा तिला झिडकारून अपमानित करतो. रामेश्वरला गेल्यानंतर तिची मासिक पाळी सुरू होते. त्या घटनेने त्याच्या मनात असा विचार येतो की अजूनही काही रुजलेले नाही. त्यामुळे नव्याने काहीतरी रुजण्याची शक्यता आहे. त्याच्या स्वरात पुन्हा एकदा ओलावा निर्माण होतो.

---

५६. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ६

५७. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ४८

### ३)    एका पावसाळी संध्याकाळी

आशाताई बगे यांच्या उत्कृष्ट कथांपैकी एक कथा म्हणजे 'एका पावसाळी संध्याकाळी'. एखाद्या अनपेक्षित घटनेतून अनाकलनीय गोष्टी घडतात. अशाच एका पावसाळी संध्याकाळी गुणवंत आपल्या विक्षिप्त मुलाची जयची जबाबदारी सुमित्रावर सोपवतो. जयला झालेला मानसिक आजार दुसऱ्या कोणाच्यातरी घरी राहिल्याने सुटणार असतो. जयच्या डॉक्टरांशी चर्चा करून सुमित्रा आपल्या पद्धतीने वागवते. कधी प्रेमाने, रागाने त्याच्याशी बोलते. पण बेमुर्वतपणे वागणारा जय सुमित्राच्या वागण्याने शहाणा होतो. निदान त्या वाटेवर चालू लागतो.

या कथेविषयी आशाताई सांगतात, "या कथेने सर्पासारखं वेटोळे घालून बसलेल्या माणसाच्या अहंकाराचे जे मूर्तिमंत भान दिले ते स्वतःच्याच संदर्भात या कथेने सगळे देऊ केले. कथेतील सुमित्रा, जयचे आई वडिल, बहीण, डॉक्टर हे सगळे अहंकाराचेच बळी नव्हेत का! ते जाणून घेताना किती नवी नाती कळलीत. [५८]

### ४)    नाळ

'नाळ' या कथेमधला उदयन नोकरीच्या निमित्ताने अमेरिकेत जातो. पण त्याला त्याच्या घराविषयी, कुटुंबियांविषयी ओढ तशीच असते. उदयन त्याच्या आईच्या कर्तृत्वाने भारलेला असतो. आईच्या व्यक्तिमत्वाचा उदयनच्या जीवनावर मोठा पगडा असतो. संसारात असूनही आईचा अलिप्तपणा, सगळ्यांची काळजी घेणे, अगदी साध्या गोष्टीमधून समाजासाठी काहीतरी करण्याची वृत्ती हे सगळे गुण उदयनला भावतात. जीवनाची जोडीदार म्हणून सौंदर्याला महत्त्व न देता हे सगळे गुण आवश्यक आहेत असे त्याला वाटते. त्याच्याच घरात आईच्या परोपकारी वृत्तीमुळे रहाणाऱ्या अवनीमध्ये त्याला हे सगळे गुण आढळतात. त्याच्या घराचे आणि अवनीचे जुने संबंध असावेत असे त्याला जाणवते. अवनीची नाळ त्या घराशी जोडली गेली असावी असे त्याला वाटते. आई आणि मुलाच्या अनोख्या नात्याचा वेध आशाताईंनी या कथेत घेतला आहे.

### ५)    पाहुणा

कथेची लांबी कमी असूनही वाचक म्हणून श्वास रोखून धरायला लावणारी ही कथा आहे. 'पाहुणा' या कथेत रखरखीत दुपार आपण प्रत्यक्ष अनुभवतो आहोत असे

---

५८.    माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ७

वाटते.  कथेचा नायक नरसप्पा हा जंगलात लहानाचा मोठा झालेला एक धाडसी तरुण असतो.  नाग शेपटीने पकडून, आपटून मारणे हा नरसप्पाच्या डाव्या हातचा मळ असतो. कोळशाच्या ढीगाजवळ नाग दिसल्यावर नागाला मारण्यासाठी तो झपाटल्यासारखा होतो. प्रचंड मेहनत करून, इतक्या तळपत्या उन्हात घाम गाळून तो सगळा ढीग उपसतो. शेवटचा ढीग उपसताना नाग सळसळत बाहेर येतो आणि त्याच्या पायाला दंश करतो. तरीही नागाची शेपटी हातात धरून धुणे धुतल्यासारखा नरसप्पा नागाला आपटतो.  नाग मरतो पण त्याच्या प्रतिस्पर्ध्याला म्हणजेच नरसप्पाला घेऊन.  भर माध्यान्हीला दुरून आलेले हे पाहुणे वस्तीलासुद्धा थांबत नाहीत.

पाहुणा ही कथा आशाताईंना विशेष आवडते.  त्यांच्या पूर्ण वाटचालीत ही एकच कथा अशी आहे की जी त्यांना हवी तशी व्यक्त करता आली.  स्वानुभवावर आधारित ही कथा त्यांना स्वतःच्याच जगण्यातले आयुष्यभराचे पाहुणेपण देऊन जाते.

## ६)  मुसळधार

आशाताईंची मुसळधार ही कथा वाचकांकडून काहीशी दुर्लक्षित राहिलेली आहे. फार थोड्या जाणकारांना ती आवडली.  माणसाच्या मनाचे तळ, त्याचे विभ्रम त्यांना मोहवतात.  जीवनातल्या अतर्क्य अशा गूढतेला स्पर्श करणारी ही कथा आहे.  मनातल्या खोलवरच्या अतीव उत्कट इच्छांची अपूर्णता माणसाच्या साध्या जगण्याला गूढतेचे अस्तर लावते.  या कथेतली भाषा पावसात आणि गिरिधर आचाऱ्याच्या उत्कट तरल अवस्थेत भिनून एकाच लयीतली झालेली आहे.  जे कळते ते आपले होते आणि जे कळू शकत नाही ते गूढ.  अशा परिस्थितीत काय खरे?  काय खोटे?  असे प्रश्न न विचारलेलेच इष्ट ठरते.  एक वेगळाच गूढ अनुभव देणारी ही कथा सुन्न करते.

गिरिधर आचारी या नायकाभोवती कथा फिरते.  त्याच्यासारखा आचारी सगळ्या गावात नसतो.  भाऊसाहेब जहागिरदारांकडे तर गिरिधरशिवाय पान हलत नसते.  त्याच्या हातचा रावणभात आणि धीवर याची चव कोणाच्याही हाताला नसते.  त्याची मुलगी पारू अनंत चतुर्दशीला बाळंत होणार असते.  मुसळधार पाऊस पडत असताना, अंगात प्रचंड ताप असताना गिरिधर जहागिरदारांचे बोलावणे येते म्हणून गावजेवणाचा स्वयंपाक बनवायला तयार होतो.  पण त्याचा जीव पोरीसाठी तुटत असतो.  स्वयंपाकाचे काम उद्यावर आले असता तो हट्टाने पूरातून पोहून जायचे ठरवतो.  गावजेवणाच्या दिवशी सगळा स्वयंपाक उत्तम पद्धतीने होतो.  सगळे गाव जेवून तृप्त होते.  पण गिरिधरची बायको

जेवायला येत नाही. गिरिधरही लगेच निघून जातो. स्वयंपाक करायला येतो तो गिरिधर नसून त्याचे अपरूप असते. कारण खालच्या गावाला गिरिधरचे प्रेत किनाऱ्याच्या गाळात रुतलेले सापडते. त्याचा प्राण जाऊन ४८ तास झालेले असतात. दुसरी बातमी अनंत चतुर्दशीच्या दिवशीच सकाळी पारूला (गिरिधरची मुलगी) मुलगा झालेला असतो ही असते.

### ७) मल्हार

या कथेत शास्त्रीय संगीतातल्या रागांची आणि मानवी भावनांची सुरेख गुंफण केली आहे. या कथेतील देसाई मास्तर गायन शिकवत असतात. त्यांच्या मुलीचे निरूचे लग्न होत नसते. याचे देसाई मास्तरांना वाईट वाटत असते. निरूच्या लग्नाइतकीच ते पावसाची वाट बघत असतात. निरूच्या लग्नाचा आणि पावसाचा संबंध त्यांना जवळचा वाटत असतो. इतका, जसा मल्हारातल्या निषाद-गंधाराचा. मल्हार राग आळवल्याने पाऊस पडतो म्हणूनच पाऊस पडला की निरूचे लग्न जमेल असे त्यांना वाटते. श्रीखंड्यांचे स्थळ निरूसाठी येते. सुरूवातीला मुलीचे वडील म्हणून देसाई मास्तर अगतिकता दाखवतात. पण दाखवण्याचा कार्यक्रम झाल्यानंतरही श्रीखंडे दुसऱ्याच एका मुलीशी लग्न ठरवून मोकळे होतात. श्रीखंड्यांचा नकार येतो तेव्हा पाऊस सुरू होतो. निरूच्या लग्नाचा आणि पावसाचा असा संबंध असतो. या कथेविषयी आशाताई म्हणतात, "संगीत याही कथेत आहे, पण अनुभव संगीताचा नाही. माझ्या लेखनाच्या प्रत्येक टप्प्यावर मुलींना लग्नाच्या बाजारात उभं राहावं लागतं, ह्या अनुभवावर लिहिलं आहे. तरीही मला ते अपुरेच वाटते." [५९]

### ८) नवस

'नवस' या कथेविषयी आशाताई म्हणतात, " 'नवस' सारखी आकाराने लहानशी कथा पण अनुभवाचा विस्तार काहीसा दीर्घकथेचा, पंढरपूरला नवस फेडायला जाणे-येणे यातला प्रदीर्घ प्रवास या कथेने घडवला. जणू ती वारकऱ्यांची वारी होती. माझ्याच मुलाची नवसाची मुंज मी पंढरपूरला करायला गेले. पण त्या टीचभर झरोक्यातून मला चंद्रभागेचे विस्तीर्ण वाळवंट, यात्रेकरूंच्या वाऱ्या, विठ्ठलाची काळी पाषाणमूर्ती मला एक विलक्षण जाणीव झाली ती काळाच्या अप्रतिहत प्रवाहाची." [६०]

---

५९. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ८

६०. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ७

या कथेची नायिका रेवती आपल्या मुलाची नवसाची मुंज लावायला पंढरपूरला येते. मुलगा लहान असताना बोललेला नवस काळाच्या ओघात विसरला जातो. तिच्या इच्छेखातरच तिचा नवरा आणि मुलगा थोडे नाराजीनेच पंढरपूरला येतात. कारण नवस ती बोललेली असते. तिचे दिगूमामा तिथे असतात. वैयक्तिक आयुष्यात दुःख सहन करावी लागत असतानाही मामा, मामी ते कधीच दाखवत नाहीत. ते रेवतीचे आपलेपणाने करतात. पण तिचा नवरा त्यांच्याशी कमालीचा कोरडेपणाने वागतो. नवस पूर्ण झाल्यावर, विठ्ठलाचे दर्शन झाल्यावर हा प्रवास संपणार याचे तिला वाईट वाटते. मामा-मामींच्या आयुष्यातील संधीप्रकाश तिला आशेचा किरण दाखवतो. कथेतल्या रेवतीला शेवटी रिक्षामागे सायकल घेऊन येणारे वृद्ध थकलेले एकाकी मामा दिसेनासे झाल्यावरही तो प्रवाह आपल्या चालीने असणारच होता. नवस हे एक निमित्त हा प्रवाह जाणून घेण्याचे याची तिला जाणीव होते आणि कथा संपते.

**ज. ३. समारोप**

'माझ्या कथा माझी निवड' हा कथासंग्रह आशाताईंसाठी जितका महत्त्वाचा आहे ततिकाच तो वाचकांसाठी आहे. कारण इतक्या महान लेखिकेच्या मोत्यांच्या राशीसारख्या कथांमधून निवडक कथा वाचण्याचा आनंद वाचकाला मिळतो. या कथासंग्रहाच्या मनोगतातून या प्रत्येक कथेमागची आशाताईंची भूमिका समजते. एखादी साहित्यनिर्मिती करताना त्या साहित्यिकाच्या मनाची अवस्था समजली की कथा वाचताना एक वेगळी भावना मनात निर्माण होते. आशाताईंच्या याच कथा स्वतःच्या दृष्टीकोनातून वाचताना आणि त्यांच्या दृष्टिकोनातून वाचताना वेगळेपणा जाणवतो. वाचक किंवा अभ्यासक म्हणून कथेबाबत आपण केलेला विचार जुळला की एक वेगळाच आनंद होतो. आपले विचार पडताळून पहाण्याची संधी मिळते. माझ्या बाबतीत हा आनंद आणखीन जास्त आहे. कारण कथा वाचताना मला मिळालेली अनुभूती आशाताईंच्या मनोगताशी बरीचशी जुळली आहे. कित्येक कथा वाचताना त्या कथेची नायिका आशाताईच आहेत हा अंदाजही बरोबर ठरला. 'नवस' आणि 'पाहुणा' या कथेच्या बाबतीत असे झाले आहे. 'शुद्ध' सारखी एक वेगळी कथा हादरवून टाकते. नवरा-बायको या नात्यातल्या बदललेल्या स्पर्शांची भाषा मन सुन्न करते. असे प्रसंग अनुभवणाऱ्या स्त्रियांचा विचार केला की वेदना होतात. 'एका पावसाळी संध्याकाळी' ही कथा तर एका वेगळ्याच पातळीवरची. 'मुसळधार' या कथेतली गूढता वास्तवाशी नाते सांगणारी नसली तरी

मनाला भावते. गिरिधरचे आपल्या मुलीवर असणारे प्रेम त्याला मुसळधार पावसात पूर पार करून जायला भाग पाडते. नंतर त्याच्या अपरूपाने केलेला स्वयंपाक हे अतर्क्य गूढ सुन्न करते. 'मल्हार' या कथेत देसाई मास्तरांनी पावसाचे आणि आपल्या मुलीच्या लग्नाचा लावलेला संबंध मनाला पटतो. कथेच्या सुरुवातीला त्यांच्या मनात असणारी भीती कथेच्या शेवटी आत्मविश्वासात परावर्तित होते. हा आशादायी शेवटही भावतो. 'नाळ' या कथेतील मुलगा आणि आईचे नाते दाखवले आहे. अमेरिकेत राहूनही आपल्या आईच्या विचारांशी त्याची नाळ कशी जोडली गेली आहे हे दाखवण्यात आशाताई यशस्वी झाल्या आहेत. 'मारवा' या त्यांच्या सर्वोत्तम कथेविषयी त्यांना संगीताच्या भूमीने दिलेले सगळे मारवातून जाणवते. या कथांचे वाचक म्हणून महत्त्व त्या कथा आधी वाचताना समजले होतेच. या कथासंग्रहामुळे आशाताईंच्या दृष्टीकोनासह ते पटते, भावते.

### ज. ४. संदर्भसूची


५३. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५७

५४. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. ५

५५. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ६

५६. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ६

५७. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ४८

५८. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ७

५९. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ८

६०. माझ्या कथा माझी निवड, आशा बगे, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ७


## ग्रंथसूची


१. वाटा आणि मुक्काम

२. माझ्या कथा माझी निवड

## ल. पाणी

| अनु. क्र. | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | पाणी | पुष्कळा, दिवाळी १९८७ |
| २ | कोरडी भूमी | तरुण भारत, नागपूर, दिवाळी १९८४ |
| ३ | पारंब्या | तरुण भारत, नागपूर, दिवाळी १९८२ |
| ४ | देखणा देहांत तो | तरुण भारत, नागपूर, दिवाळी १९७५ |
| ५ | मोहर | तरुण भारत, नागपूर, वासंतिक १९८१ |
| ६ | सोहळा | मराठवाडा, दिवाळी १९८१ |
| ७ | स्पर्श | चर्चा, दिवाळी १९८४ |
| ८ | अवेळ | वाङ्मयशोभा, दिवाळी १९७९ |
| ९ | खुर्ची | तरुण भारत, नागपूर, दिवाळी १९७६ |
| १० | मादी | स्त्री, एप्रिल १९७६ |
| ११ | शंखशिंपले | किर्लोस्कर, सप्टेंबर १९७९ |
| १२ | पाणी | माहेर, जून १९८१ |

**ल. १. – प्रस्तावना**

**ल. २. – शीर्षककथा**

**ल. ३. – मला भावलेल्या कथा**

**ल. ४. – अन्य कथा**

**ल. ५. – समारोप**

**ल. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ल. १. प्रस्तावना

'पाणी' या कथासंग्रहाच्या अर्पण पत्रिकेत आशाताईंच्या विशाल अंतःकरणाचे दर्शन घडते, समजूतदारपणा दिसून येतो. "मागे पडलेल्या सगळ्या बऱ्या वाईट दिवसांना ज्यातले हीन सारे जळूनच गेले असेल." असा आशावाद त्यांच्या लिखाणात अनुभवायला मिळतो. लेखकाला लेखनप्रवासात नित्य नव्या गोष्टी खुणावत असतात. याविषयी आशाताई सांगतात, "लेखनाची सुरुवात ज्यावेळी होते तिला त्या लेखकाचा आरंभ म्हणून बघता येते. पण लेखकाची प्रत्यक्ष लेखनाआधी त्याची पूर्वतयारी म्हणून अंतर्गत बरेच

सुरु असते. पण ते सारे पृष्ठभागावर येत नाही." [६१]

आशाताईंच्या या कथासंग्रहात त्यांचे मनोगत लिहिलेले आहे. इतर कोणत्याही पुस्तकात लेखिकेचे मनोगत नाही. या मनोगतातील मजकुरावरून असे लक्षात येते की या संग्रहातील कथा जुन्याच आहेत. या मनोगतात आशा बगे असे म्हणतात की, "माझ्या आरंभीच्या रेघोट्या पुस्तकरूपात येत आहेत. काही कारणामुळे या कथा तशाच राहून गेल्या. पण नवचैतन्य प्रकाशनचे शरद मराठे यांनी पाठपुरावा करून या कथा प्रकाशित केल्या. नाहीतर त्या एकट्याच राहिल्या असत्या."

या मनोगतात त्या असेही म्हणतात की, "मनोगत लिहिणं मला फारसं आवडत नाही. कथांमधून एका संतत धारेसारखी लेखक म्हणून आपली जीवनवृत्ती झरत असतेच. त्यासाठी वेगळ्या मनोगताची गरज नाही. पण या कथांना माझ्या मनोगताची गरज आहे." या कथासंग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पाणी, अवेळ, मादी अशा काही कथा कन्नडमधून अनुवादित झाल्या आहेत.

**ल. २. शीर्षककथा**

'पाणी' या कथासंग्रहाचे प्रकाशन नवचैतन्य प्रकाशनाच्या सुप्रिया शरद मराठे यांनी ऑगस्ट २००३ मध्ये केले आहे. मनोज आचार्य यांचे मुखपृष्ठ आहे. १२ कथा असलेल्या या कथासंग्रहात संग्रहाची सुरूवात व शेवट 'पाणी' या शीर्षकाच्या कथेने होते. त्यामुळे शीर्षककथा या मुद्द्यात या दोन्ही कथांच्या आशयाचा विचार केला पाहिजे.

**१) पाणी**

कित्येकवेळा दुसऱ्याच्या आयुष्यातली एखादी अडचण समजून घेऊन ती सोडवण्याचा प्रयत्न असफल ठरतो. प्रयत्न करूनही यश येत नाही. त्याला कारणे वेगवेगळी असू शकतात. अगदी कमी कालावधीतदेखील काही लोकांसोबत जवळीक निर्माण होते. यातूनच त्या व्यक्तिची सुख-दुःख आपली वाटू लागतात. त्या व्यक्तिचे दुःख, अडचण दूर करण्यासाठी आपण प्रयत्न करतो. पण त्यांना त्याचे काही सोयरसुतक नसते. या सगळ्या प्रक्रियेतून वाटणारे दुःख 'पाणी' या कथेत चित्रित केले आहे.

अनू तिच्या पतीच्या अनिलच्या नोकरीतल्या बदलीमुळे 'प्रसाद मॅन्शन' या बिल्डींगमध्ये रहायला येते. तिथे तिला सुरुवातीच्या काळात अजिबात करमत नाही.

---

६१. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ४७

तिला ती जागाच आवडत नाही. पण काही दिवसांसाठीच म्हणून ती रहाते. तिथे तिची मिसेस शर्मांशी ओळख होते. त्या बिल्डींगमध्ये पाण्याची प्रचंड टंचाई असते हे तिच्या लक्षात येते. मिसेस शर्मांना तर पाणी भरणे हा एक छंदच आहे. नंबर लावणे, पाण्यावरून होणारी भांडणे यामुळे अनू वैतागते. यावर उपाय म्हणून ती पाईपने पाणी भरायला सुरुवात करते. उद्देश एकच असतो की तिथल्या बायकांना असे पाणी भरण्यातले सुख लक्षात यावे. त्या बिल्डींगमधल्या प्रत्येक घरात नळ यावा यासाठी प्रयत्न करते. पाण्यासाठी या बायकांची होणारी वणवण कमी व्हावी असे तिला मनापासून वाटत असते. सार्वजनिक नळांना ती स्वखर्चाने तोट्या बसवते. मात्र दुसऱ्याच दिवशी पहाटे तोट्या गायब झालेल्या असतात. नळावर पाणी भरताना बायका अनूविषयीच कुचाळक्या करत असतात. असेच पाणी भरणे चांगले असे म्हणत असतात. पाण्यासाठी तिने केलेले निःस्वार्थी प्रयत्न अक्षरशः पाण्यात जातात. ते पाणी, नळ या भोवती तिथल्या बायकांच्या मानसिक शक्ती केंद्रित झाल्या होत्या. हा प्रवाहच अनूपेक्षा वेगळा होता. ती बिल्डींग सोडून जाताना सगळ्याजणी आपापल्या दारात उभ्या असतात. मिसेस शर्मा मात्र गाडीजवळ येते. अनू गाडीच्या खिडकीतून सगळ्यांना नमस्कार करते. मनापासून मिसेस शर्मांचा हात दाबते.

"आपण या लोकांकरता काही केले हा भ्रम आता तिच्या मनात नव्हता. निरोपाच्या वेळी थोडी हुरहुर मात्र वाटते. अनिल पाईपची गुंडाळी घेऊन येतो. "हे तू विसरलीस!" असे म्हणतो. अनू म्हणते, "मी विसरले नाही. मुद्दाम ठेवली. ती वस्तू माझी नाही. या बिल्डींगची, कदाचित या घराची आहे." [६२]

अनूच्या या बोलण्याने कथेचा शेवट होतो. यामधून ती काय सुचवू पहाते आहे? ज्या लोकांसाठी तिने एवढा आटापिटा केला त्या लोकांना तिची अजिबात कदर नाही असे वाटून निराशेने ती असे बोलते का? का आलेल्या अनुभवांचे शहाणपण आहे हे? असे सगळे प्रश्न आणि त्याची उत्तरे वाचक म्हणून आशाताई आपल्यावर सोडतात. लेखनाच्या या शैलीने वाचक अंतर्मुख होऊन विचार करतो.

### २) पाणी

सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे 'पाणी' या कथासंग्रहाची सुरुवातीच्या व शेवटच्या कथेचे नाव 'पाणी' आहे. दोन्ही कथांमध्ये पाण्यामुळे निर्माण झालेले बंध व पाण्याचे महत्त्व दिसून येते. ही कथा कन्नडमधून अनुवादित झाली आहे. आशाताईंच्या

---

६२. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. २६

कथांचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यांची जबरदस्त निरीक्षणशक्ती या कथेत तर आपण वाचक राहातच नाही. कथेमधल्या बिल्डींगमधले रहिवासी कधी होतो कळतच नाही. वऱ्हाडकडच्या रखरखीत उन्हाचे वर्णन, बिल्डींगचे तसेच त्यामध्ये रहाणाऱ्या माणसांचे वर्णन लेखिकेने उत्तम रीतीने केले आहे. ते इतके वास्तवदर्शी आहे की कथेतील पात्र आपणच आहोत असे वाटू लागते.

उदा. १) "वऱ्हाडचं रणरणतं वैशाखी ऊन! एरवीची सगळी ऐसपैस माया आवरून घेतल्यासारखं. तटस्थ, अलिप्त. रस्त्यावरलं एकुलतं एक शिरीषाचं झाड बापुडवाणं निमूटपणे उभं. मधेच उगाच सडसडून फांद्या हलवत होतं. उन्हातली त्याची सावलीसुद्धा अगदी विरळ. त्याच्या सावलीत एखादं ढोरसुद्धा भर दुपारचं येऊन बसायला धजत नव्हतं. उष्ण, कढत झळांनी शिरीषाची चिमलेली फुलं तेवढी समोरच्या बिल्डींगच्या पायऱ्यांवर, गॅलरीत पडलेली होती." [६३]

२) त्या सतत वाहणाऱ्या पाण्यानं बिल्डींगमागच्या गल्लीत निसरडं व्हायचं. शिंतोडे तर सतत उडायचे. जाणारे-येणारे नेसणं वर करून चालायचे. पण या सांडणाऱ्या शिंतोड्यावरच पोसल्यासारखं एक कण्हेरीचं झाड गल्लीच्या मधोमध उभं होतं. त्या चिखलातच मूळ रोवून. वारा जोरात आला की कण्हेरीची अरुंद, लांबट पानं गच्च भरलेल्या ड्रमवर तरंगायची नि त्यांचा हिरवट, उग्र गंध मग सगळ्या पाण्याला यायचा." [६४]

'ओबेरॉय मॅन्शन' या तीन मजली इमारतीत खारे व गोडे पाणी नियमित येत असे. आजुबाजूला उन्हाचा कितीही त्रास असला तरी या बिल्डींगला पाण्याचा तुटवडा भासत नाही. पण एकदा अचानकपणे खारे व गोडे पाणी येत नाही. सलग पाच, सहा दिवस पाण्याचा तुटवडा होतो. अशावेळी बिल्डींगमधल्या लोकांची झालेली अवस्था कथेत वर्णन केली आहे. एरवी एकमेकींना टोमणे मारणाऱ्या बायका अचानक बदलतात. पाणी नसताना माणसांच्या झालेल्या दर्शनातून त्यांच्या स्वभावांमधला खरेपणा उघडकीला येतो. या सगळ्यांचा खरेपणा पाण्यामुळे झाकला जात होता. पण पाणी नसताना प्रत्येकाचे खरे रूप समोर येते. अगदी शांत वाटणारी माणसं भांडकुदळ आहेत हे समजते. तसेच ज्यांचा द्वेष केला तेच उपयोगी पडत आहेत. हेदेखील या निमित्ताने समजते. पाण्यामुळे बिल्डींगमधल्या लोकांना चांगलाच धडा मिळतो. छोटे-मोठे राग, लोभ, ईर्षा, मत्सर

६३. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १९२
६४. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १९२

सगळे कमी होते. पंजाबी सरदारीण, गुजरातीण, मिसेस देशकर, मिसेस देशमुख, मिसेस जोशी, मिसेस आपटे, मिसेस कुलकर्णी या पात्रांच्या आधारे बिल्डींगमधले वातावरण उभे केले आहे. त्यांच्यातले भांडण पाण्यामुळेच सुरु होते आणि पाण्यामुळेच संपते. खारे पाणी, गोडे पाणी असा वादच संपतो. आता ते गोडे-खारे पाणी नव्हतेच ते फक्त पाणी होते. त्या नितळ, थंड, वाहत्या पाण्यात त्या चार आठ दिवसात विचित्रपणे उघडावाघडा पडलेला माणूस अलगद झाकला जातो.

**ल. ३. मला भावलेल्या कथा**

पाणी या कथासंग्रहातील मला भावलेल्या कथांपैकी सगळ्यात आवडलेली कथा 'कोरडी भूमी'.

**१) कोरडी भूमी**

वर्षानुवर्षे एखादा विचार, एखादे तत्व उराशी बाळगून जगताना तो विचार, ते तत्व आपल्यामध्ये रुजलेच नाही असा अनुभव देणारी ही कथा आहे. स्वतःच्या मुलांवर संस्कारांचे शिंपण करताना मुलांच्या जीवनात ओलावा येतो. मात्र आपल्या मनाची भूमी कोरडीच रहाते. आपलेच संस्कार घेऊन मोठी झालेली मुलं आजुबाजूच्या परिस्थितीत ठामपणे उभी रहातात. पण आपण मात्र तसेच रहातो. भर पावसात आडोशाची एखादी जमीन कोरडीच रहावी तसे. हे सगळच्या सगळं या कथेतून प्रत्ययाला येते. निलिमा एका मतिमंद मुलांच्या शाळेत शिकवत असते. त्या शाळेत शिकवल्यामुळे की काय ती स्वतःचा सामान्य विचारांच्या पातळीवर विचारच करू शकत नाही. घरातल्या सगळ्यांची खरे म्हणजे तिला साथ असते. अरुण तिच्या मुलाचा मित्र त्यांच्याकडे काही दिवसांसाठी रहायला येतो. सुरुवातीला तिला हे अजिबात पटत नाही. पण कालांतराने तिला विलासची सवय होते. तो त्याच्या घरी परत जाण्याचा निर्णय घेतो तेव्हा ती अस्वस्थ होते. ज्या मुलांसाठी ती जीव ओतून काम करत असते त्यातही तिचे मन रमेनासे होते. त्यामुळे ती शाळेत राजीनामा देण्याचा निर्णय घेते. अशा संभ्रमावस्थेत निलिमाचा मुलगा अरुण तिला योग्य मार्ग दाखवतो. आपला चांगला सुदृढ भाग आपल्याच दुसऱ्या अधू भागाशी बांधला गेलेला असतोच असे सांगून त्या विशेष मुलांना तिची गरज आहे हे सांगतो. म्हणजेच ही विशेष मुले तिच्या निरोगी आयुष्याचा एक भाग आहेत. तसेच या मुलांना तिच्या भक्कम आधाराची गरज आहे हे देखील समजावतो. प्रश्न पैशाचा नाही हे

देखील तिला पटवतो. त्यावेळी आपल्या मनातल्या कोरड्या भूमीची तिला जाणीव होते. निलिमाने आपल्या मुलांवर संस्कारांचे शिंपण करूनही तिच्या मनाची भूमी कोरडीच रहाते हे तिला एका प्रसंगातून समजते. अशा वेळी तिच्या संस्कारातून घडलेला तिचा मुलगाच तिला योग्य मार्ग दाखवतो. आपल्या मनातला आनंद कशात आहे हे बऱ्याचवेळा समजत नाही अशावेळी आपल्याच मुलाने आपल्याला किती मोलाचा सल्ला दिला आहे याची तिला जाणीव होते. या कथेतून वाचक म्हणून हे लक्षात येते की, आपणच केलेले संस्कार भविष्यात आपल्यालाच उपयोगी पडतात हे निलिमाच्या उदाहरणावरून पटते. कित्येकदा आजुबाजुचे सगळे सुधारताना आपलेच मन विकसित होत नाही. ओलावा संपून मनाची भूमी कोरडी होते.

## २) मोहर

आंब्याच्या झाडाला जितका मोहर येतो तेवढे आंबे येत नाहीत. वारा सुटला की बाळआंबे गळून पडतात. शेवटापर्यंत फार थोडा मोहर टिकतो. 'मोहर' या कथेतून हाच विचार आशाताई यशस्वीपणे मांडतात. आपण आयुष्याकडून अनेक गोष्टींची मागणी करतो पण त्या सगळ्याच गोष्टी आपल्याला मिळत नाहीत. कुठेतरी तडजोड करावीच लागते. कित्येकदा वरवर जाणवणाऱ्या गोष्टी तशाच असतील असेही नाही. सत्य आणि कल्पना यामध्ये अंतर असतेच. कम्मो नावाच्या अल्लड उपवर मुलीची ही कथा आहे. तिच्या किशोरी भाभीचा तिच्या मनावर खूप पगडा आहे. भैय्या आणि भाभीमधले हळूवार, तरल संबंध, नाजूक नाते याची तिला ओढ वाटते. स्वतःचा संसार, जोडीदार असाच हळूवार बंधाचा असेल असे तिला वाटते. तिचा दाखवण्याचा कार्यक्रम होतो. तेव्हा इटारसीचा तिचा होणारा नवरा तिला व भाभीला फारसा आवडत नाही. भाभी जेव्हा हे भैय्याला सांगते तेव्हा त्या दोघांमध्ये वाद होतात. नुसते रूप महत्त्वाचे नाही हे तो चिडून बोलतो. भाभीशी केलेले लग्न हेदेखील व्यवहाराचा एक भाग आहे. हे सगळे जेव्हा कम्मोला कळते तेव्हा तिला खूप वाईट वाटते. तिच्या कल्पनेतले त्या दोघांचे हळूवार बंध एक सोय असते. तिच्या आयुष्यातदेखील असेच बंध निर्माण होणार असतात. तिला काय हवे आहे, काय नको आहे यापेक्षा लग्न म्हणजे एक व्यवहार आहे हे ती स्वतःला समजावते. "पेंगलेली नजर उचलून कम्मोनं हळूच त्या मोठ्या थोराड इटारसीवाल्याकडे टाकली नि तिला वाटलं, भाभीच्या पायातले चाळ आत्ता भैय्याच्या खोलीकडे जाताना कदाचित वाजेनासेच होतील. त्याचा

आवाज मंद मंद होत आपला थांबूनच जाईल. नाहीतरी किशोरीभाभीच तर म्हणाली होती, जितका मोहर तितके आंबे कधीच नसतात. शेवटापर्यंत फार थोडा मोहर टिकतो.....” [६५] म्हणजे भैय्या आणि भाभीमधले हळुवार नाते हळूहळू संपून जाईल.

### ३) स्पर्श

स्पर्श या कथेतून असे जाणवते की माणसाच्या आयुष्यात आलेली सगळी दुःख त्याच्या मनावर लगेच परिणाम करतातच असे नाही. दुःखाचे हे स्पर्श काही वेळा उशीरा मनाला स्पर्शून जातात. कथेतील नलिनीलादेखील तिच्या आईला गमावल्याच्या दुःखाचा स्पर्श उशीरा होतो. तसेच तारामावशीबद्दल तिच्या मनात असणारा राग किती चुकीचा होता हेदेखील तिच्या लक्षात येते. तिच्या आईच्या मायेचा स्पर्श त्या घराला जितका झालेला असतो, तितकाच तारामावशीच्या अस्तित्वाचादेखील स्पर्श असतो हेदेखील नलिनीला जाणवते. तिची आई आणि अप्पा यांच्यामध्ये तारामावशी आली व त्यामुळे आपल्या आईला अप्पांचे पूर्ण प्रेम मिळू शकले नाही याचा नलिनीच्या मनात राग असतो. आई जिवंत असताना हा राग ती बोलूनदेखील दाखवते. पण तिच्या आईने तारामावशी आणि अप्पांचे नाते स्वीकारलेले असते. ती तारामावशीही अगदी आपुलकीने वागत असते. तारामावशीदेखील त्या घरावर, घरातल्या माणसांवर हातचे न राखता प्रेम करते. नलिनी तारामावशीचा वेळोवेळी अपमान करते तरी ती नलिनीशी प्रेमानेच वागते. तेही अगदी खरे आणि नैसर्गिक. आई गेल्यानंतर तारामावशीदेखील घरी जास्त येत नाही. नलिनीच्या आईच्या छपराखालीच तारामावशी रहात असते अशी तारा मावशीची भावना असते. नलिनी मात्र तारामावशीविषयीचा संताप, अप्पांबद्दल वाटणारा राग, अहंकार या भावनांपोटी खऱ्या मायेच्या स्पर्शाची अनुभूती घेऊ शकत नसते. आई गेल्याच्या दुःखाचा स्पर्शदेखील तिला उशीरा उमगतो. तिला जाणवते, “इतके दिवसात प्रथमच हा दुःखाचा स्पर्श अतिशय ताजा, निखळ होता. इतका ताजा की जशी आई आत्ताच गेली होती. मधे इतके दिवस गेलेच नव्हते. तारामावशीबद्दलचा राग, अप्पांची चीड काही समोर नव्हते. आई नसणे म्हणजे काय हे आतल्या आत जाणवले. खूप काहीतरी गमावले याची जाणीव खोल चिरत गेली.” [६६]

---

६५. मोहर, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. ११४

६६. स्पर्श, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १४७

### ४) अवेळ

'अवेळ' ही कथा कन्नडमधून अनुवादित केलेली आहे. आपल्या पतीवर नितांत प्रेम करणाऱ्या, खंबीर तरीही हळव्या आणि वास्तवाशी मुकाबला करण्याचे धैर्य असणारी जान्हवी अवेळ या कथेची नायिका आहे.

माणसाच्या आयुष्यात काही घटना वेळेवर घडतात तर काही अवेळी. ती घटना सुख घेऊन येणार असेल तर वेळ, अवेळ असे काहीच नसते. सुखाच्या क्षणांना वेळ-अवेळ हे गणित माहिती नसते. पण दुःख कधीही आले तरी ते पचवणे कठीण जाते. त्यातही माणसाच्या मनाची तयारी झाली असेल आणि दुःखाने आघात केला तर ते पचवणे थोडे सोपे जाते. अवेळी झालेला आघात पचवता येत नाही. अशीच अवस्था या कथेतल्या जान्हवीची झाली आहे. सुखाने चाललेल्या तिच्या संसारात मीठाचा खडा पडतो. तिचे पती विश्राम यांच्या आयुष्यातले शेवटचे काही महिने बाकी आहेत असे तिचा डॉक्टर भाऊ मल्हार तिला सांगतो. तिच्या मनावर अवेळी झालेला हा आघात सहन करण्याच्या पलीकडे असतो. पण दोन मुलांसाठी ती मनाची तयारी करते. विश्रामशिवाय जगण्याचा रस्ता शोधून त्यावर कसे चालायचे याविषयी ठरवते, नोकरी शोधते. मनातल्या सगळ्या वादळांवर मात करून, सोसून स्थिर रहाण्याचा प्रयत्न करते. मल्हारने दिलेली विश्रामच्या जगण्याची मुदत संपते तरी विश्रामची सोबत तशीच असते. त्याच्या मृत्यूची ही टांगती तलवार जान्हवीला सहन होत नाही. त्याची सोबत मिळणार असेल तर ती निर्भय मिळावी असे तिला वाटत असते. केवळ उपचार म्हणून विश्रामचे जिवंत असणे तिला त्रासदायक वाटते. ती मनात विचार करते, "विश्राम नसलेली वाट मी स्पष्ट रेखली होती. मला खूप सोसावं लागलं, पण आता मी स्थिर झालीय आणि पुढच्या प्रवासात मी विश्रामची साथ गृहित धरलेली नाही. पुढं तो नसणार हे नक्की ठरलंय. मिळत असेल तर त्याची मुक्त, निर्भय सोबत हवी. नाहीतर त्यानी संपून जायला हवं. केवळ उपचार म्हणून विश्रामचं हे असं जगत राहणं. सारीच अवेळ माथ्यावर येऊन दाटल्यासारखं....." [६७]

नवऱ्यावर मनापासून प्रेम करणारी जान्हवी तो नसणार आहे हे कळल्यावर ठामपणे दृढनिश्चयाने उभी रहाते. वाचक म्हणून काहींना तिचे हे वागणे अतिपणाचे वाटू शकते. पण मला ती मनापासून भावते. जे आहे ते स्वीकारलेले खूप चांगले. तो संपून जावा असे ती म्हणते म्हणजे तिचे प्रेम नाही असे नसते. पण जे आहे ते स्वीकारल्याने ती हे

---

६७. अवेळ, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १६१

बोलू शकते. आशाताईंची ही नायिका आपल्या मुलांसाठी कोणाचाही आधार न घेता उभे रहाण्याचा विचार करते हेच प्रेरणादायी आहे.

### ३) मादी

स्त्री-पुरुष संबंधाचा एक अनोखा बंध या कथेत उलगडून दाखवला आहे. लग्न या गोष्टीमुळे एक अनोळखी पुरुष स्त्रियांच्या आयुष्यात येतो. इतके दिवस कधीही न पाहिलेल्या पुरुषाला आपले सर्वस्व देणे हे स्त्रीच्या दृष्टीने अवघड असते. या कथेतील विभा हे पात्र अशा स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते. तिच्या घरातल्या सगळ्यांना आणि तिच्या होणाऱ्या नवऱ्याला अविनाशला विभा आणि अविनाशचे एकत्र फिरणे आवडत असते. मात्र विभाला हे सगळे अगदी नकोसे वाटते. अविनाशच्या येण्याचे, भेटण्याचे तिच्या मनावर विलक्षण दडपण येते. त्याचवेळी तिच्या मैत्रिणीचे लग्न ठरते. त्यामुळे तिची मैत्रिण अगदी खुष होते. तिच्या होणाऱ्या नवऱ्याच्या स्पर्शासाठी आसुसलेली असते. ही ओढ विभाला का जाणवत नाही याचे तिला आश्चर्य वाटते. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा ती खूप प्रयत्न करते. पण त्यामुळे तिचे डोके जास्तच दुखू लागते. पण अशाच एका क्षणी तिला अविनाशचे हक्काने बोलणे आवडू लागते. तिच्यातली मादी त्या स्पर्शांना प्रतिसाद देऊ लागते. इतके दिवस अनोळखी वाटणारे अविनाशचे जग तिला ओळखीचे वाटू लागते. अविनाश, त्याची माणसे, त्याचे घर तिला आपलेसे वाटू लागते. त्याच्यापासून दूर पळणारी विभावरी त्याच्या स्पर्शाने मोहरून जाते.

### ल. ४. अन्य कथा

'पाणी' या कथासंग्रहातील अन्य कथादेखील मनोविश्लेषणात्मक भूमिकेतूनच लिहिल्या आहेत.

### १) पारंब्या

काळाप्रमाणे आपणही बदलावे असे म्हटले जाते. काही गोष्टी सोडायला हव्यात. हे सगळे कितीही खरे असले तरी काही तत्व अशी घट्ट रोवलेली असतात की ती बदलत नाहीत. वडाच्या पारंब्या जशा मातीशी रुजलेल्या असतात, तसे या तत्वांचे असते. आपल्या तत्वाशी इमान राखणाऱ्या एका मनस्वी शिक्षकाची ही कथा आहे. तीन मजली शाळेचे स्वप्न पहाणारे सदावर्ते या कथेचे नायक आहेत. आपल्या घराच्या व्हरांड्यात अगदी कमी प्रतिसाद मिळत असताना ते शाळा सुरू करतात. गावातल्या काही धनाढ्य

व प्रतिष्ठित लोकांच्या सहकार्याने भाड्याने जागा घेऊन शाळा सुरू करतात. त्यासाठी त्यांना त्यांच्या तत्वांना मुरड घालावी लागते. शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या हिताकरीता ते काही गोष्टी सोडायला तयारही होतात. सदावर्त्यांना मोठी शाळा, ज्युनिअर कॉलेज, शिकणारे हुशार विद्यार्थी आणि त्यांच्या यशासाठी खुले असणारे आकाश याशिवाय काहीही दिसत नसते. संस्थाचालकांना सदावर्ते तसेच त्यांचे विचार खटकायला लागतात. त्यामुळे सगळे मिळून त्यांना खड्यासारखे बाजूला काढतात. नव्या लोकांना संधी दिली पाहिजे या गोंडस नावाखाली त्यांना राजीनामा द्यायला भाग पाडतात. सदावर्ते अत्यंत शांतपणे आपल्या पदाचा राजीनामा देतात. ताठ मानेने शाळेबाहेर पडतात. आपण पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले आहे या समाधानाने ते शाळेच्या पायऱ्या उतरतात. अहंकार मनात न बाळगता, आपल्या तत्वांशी एकनिष्ठ रहातात....अगदी वडाच्या पारंब्यांसारखे. "ते शाळेच्या पायऱ्या उतरले. भिंतीलगतची एक वीट थोडी खचली होती. त्यांनी हळूच बोट लावले नि ते निघाले. शाळेच्या मागच्या बाजूने. शाळेच्या तीन मजली इमारतीमागे लपलेला तो वड नि जमिनीला स्पर्श करणाऱ्या त्याच्या पारंब्या." [६८]

## २) देखणा देहांत तो

बा. भ. बोरकरांची एक कविता आहे,

देखणा देहांत तो, सागरी सूर्यास्तसा
अग्नीचा घेऊन जातो, रात्रगर्भी वारसा

या कथेतून ही कविता अनुभवायला मिळते.

मृत्यू ही मानवी जीवनातली अटळ अशी घटना आहे. कोणाला, कधी, कसे आणि कुठे मृत्यूला सामोरे जावे लागेल हे सांगता येत नाही. सूर्य मावळतो पण जाता जाता कितीतरी देऊन जातो, तसेच मृत्यूचेही आहे. एखाद्या व्यक्तिशी कोणतेही नाते नसताना त्याच्या मृत्यूची चाहुल दुसऱ्याच व्यक्तिला बेचैन करते. हे कसे घडते? याला उत्तर नाही. राघवला गेले काही महिने एका हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलेले असते. मनोरमा तो बरे होण्याची आणि डिस्चार्जची आतुरतेने वाट बघत असते. ज्या क्षणाची ती वाट बघत असते तो क्षण अगदी दोन चार दिवसांवर येऊन ठेपतो. पण अचानक मनोरमाला त्या दवाखान्यातून निदान अजून चार दिवस तरी जाऊच नये असे वाटते. अपघातात जवळपास मृत्यूची गाठभेट झालेल्या एका पेशंटबद्दल तिला आत्मीयता, ममत्व वाटू

६८. पारंब्या, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. ९२

लागते. त्याचा मृत्यू अटळ आहे हे तिला समजत असते. फक्त हा मृत्यू त्याच्या घरच्या माणसांसमोर व्हावा असे तिला वाटत असते. अशा परिस्थितीत मनोरमा त्याच्याजवळ थांबते आणि त्याच्या अखेरच्या क्षणी त्याची सोबत करते. निदान मरताना तरी त्याला एकटेपणाची जाणीव होऊ देत नाही. मनोरमाच्या मनाची एक विलक्षण अवस्था या कथेत अनुभवायला मिळते. अखेरचे क्षण मोजणारा तो मनिषा नावाच्या कोणाची तरी वाट बघत असतो. मनोरमा त्याच्याजवळ जाते तेव्हा त्याला त्याची मनिषा असल्याचाच भास होतो. मनोरमा त्याला म्हणते, "मी आलेय. मनु...मनिषा....ऐकलं का? मी आले आहे." त्याच्याभोवती तिने आवेगाने हात टाकले. तिच्या अशा वागण्याने त्या विझणाऱ्या चेहऱ्यावर हसे येते. मनिषा त्याच्यापर्यंत पोहचल्याची ती पावती होती. त्याचा हातही क्षीणपणे वर आला. तिच्या स्पर्शाकरता चाचपडू लागला. एक क्षणच त्याची पकड घट्ट झाली आणि दुसऱ्याच क्षणी तो कलंडला. संपला....विझला. पण त्याची मनिषा त्याला भेटली होती. अखेरच्या क्षणी तो एकटा नव्हता...

### ३) सोहळा

जगामध्ये एकाच वेळी किती वेगवेगळ्या प्रकारच्या घटना घडत असतात. कोणी सुखी होते तर कोणी दुःखी. सुखाचाही सोहळा आणि दुःखाचाही सोहळा. दोन्ही सोहळ्यात घातलेल्या जेवणावळी सारख्याच पण वेगळा अर्थ घेऊन आलेल्या. असे दोन सारखे सोहळे या कथेत चित्रित झाले आहेत. माणसाच्या आयुष्याची सुरुवातही वेदनेत आणि शेवटही वेदनेतच हे सांगणारे हे दोन सोहळे. या कथेतील शालीचे दिवस भरत आले होते. डिलीव्हरीची वेळ अगदी केव्हाही येऊ शकते अशी तिची अवस्था असते. त्याच वेळी समोरच रहाणारी पुसेगावकरांच्या नानींची सून, राजूची आई अखेरच्या घटका मोजत असते. शालीच्या तशा अवस्थेतही तिला राजूच्या आईला भेटावेसे वाटते. पण शालीची आई शकुन-अपशकुनाच्या गोष्टी सांगून तिला जाऊ देत नाही. तरीही शाली भेटायला जाते. राजूच्या आईची, अखेरची, अनोळखी नजर तिला अस्वस्थ करते. दवाखान्यात गेल्यानंतर ती एका छान मुलाला जन्म देते. सगळे प्रत्यक्ष भोगणे आणि भोगून झाल्यानंतर या दोहोतले अंतर खूप कोवळे असते हे तिला जाणवते. आई गेलेल्या राजूचा चेहरा, त्याची मानसिक अवस्था हे पाहून ती अस्वस्थ होते. पण तिच्या बाळाचे बारसे, शांत हे सगळे करण्याच्या धामधुमीत राजूच्या आईच्या जाण्याचे दुःख थोडे कमी होते. राजूच्या आईचे दिवसवार आणि बाळाचे बारसे हे दोन टोकाचे सोहळे एकाच दिवशी पार पडतात.

बहुतेक यालाच जीवन म्हणतात.

### ४) खुर्ची

अनेक वर्षे एकमेकांबरोबर राहूनही एकमेकांशी अनोळखी असणाऱ्या जोडप्याची ही कथा आहे. नवरा-बायको या नात्यास इतर कोणत्याही नात्यापलिकडचे हळुवार बंध असतात. पण दादासाहेब आणि लीला यांच्यामध्ये ते कधीच निर्माण होत नाहीत. दादासाहेब आपल्या आवडत्या खुर्चीवर बसून कथालेखन करतात. त्यांचा व्यासंग जबरदस्त आहे. त्यांचा अभ्यास प्रचंड आहे. त्यांनी मिळवलेले मानसन्मान डोळे दिपवणारे आहेत. त्या मानाने लीला ही सामान्य स्त्री आहे असे त्यांना वाटत असते. पण प्रत्यक्षात स्वतःच्या मृत्यूची चाहुल लागूनही दादासाहेबांपेक्षा लीला कणखरपणे सामोरी जाते. सारे सैल करून प्रवाहावर हातपायही न हलवता स्वतःला सोडून देण्याची स्थिर अवस्था लीलाला प्राप्त आहे. वेदनेकडे अलिप्तपणे पहाण्याची नजर तिला लाभली आहे. जी अवस्था प्राप्त व्हावी म्हणून दादासाहेब प्रयत्न करत होते ती अवस्था लीलाला सहजच प्राप्त झाली आहे. त्या दोघांचे नाते समांतर रेषांसारखे असते. एकमेकांना न भेटता एकत्र असणारे वेगळेच नाते. ज्या खुर्चीत बसून दादासाहेबांनी उत्तमोत्तम साहित्यनिर्मिती केली, सुख-दुःख शब्दबद्ध केली त्याच खुर्चीत त्यांना जीवनाचे खरे तत्वज्ञान समजते. आयुष्यभर दुर्लक्ष केलेल्या आपल्या पत्नीची महानता त्याच खुर्चीत बसून त्यांना समजते.

### ५) शंखशिंपले

लहान मुलांचे जग खूप वेगळे असते. मोठ्यांचे विचार, त्यांचे अंदाज मुलांना लागू पडत नाहीत. काही वेळा लहान मुले मोठ्यांना नको असणाऱ्या गोष्टी करतात, नको असणाऱ्या व्यक्तिंच्या सहवासात रमतात. त्यावेळी मोठ्या माणसांनी मुलांना धाक दाखवून रागवणे चूक आहे. थोडा काळ लोटला की त्यांच्या मनातले विचार आपसूक बदलतात. हाच विचार या कथेत मांडला आहे. जोर जबरदस्ती करून मुलांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला तर काही वेळा आपल्याला हव्या असणाऱ्या गोष्टीच्या विरुद्ध काहीतरी घडू शकते. कारण मुलांच्या कोवळ्या मनात योग्य-अयोग्य काय याचा गुंता झाला तर त्यांच्या व्यक्तिमत्वावर त्याचा परिणाम होऊ शकतो. वीणा हुशार, अभ्यासू आहे. अश्विनी ही तिची एकुलती एक मुलगी असते. जयंत म्हणजेच अश्विनीचे बाबा

आणि अश्विनी यांच्यामध्ये मैत्रीचे नाते आहे. अश्विनीला शेजारी रहाणाऱ्या सिंग काकू, त्यांची मुले यांच्यात रमायला आवडते. वाचन करून गोष्टी सांगणाऱ्या तिच्या आईपेक्षा घरात दिवसभर काम करणाऱ्या सिंग काकू आवडतात. वीणाला या गोष्टीचा खूप राग येतो. सिंगकाकूविषयी अश्विनीला वाटणारी माया, प्रेम कायमचे दूर व्हावे असे तिला वाटते. जयंतला मात्र वाटत असते की अश्विनीला सापडेल तसा आकार घेऊ दे. तिला घडवताना स्वतःचे विचार लादण्याच्या नादात बरेचसे हरवून जायला नको. हा विचार वीणालाही पटतो. अश्विनी घडत असताना तिला तटस्थपणे वहाणेच योग्य ठरेल असे तिला वाटते. नाहीतरी लहानपणी हौसेने जमवलेले शंखशिंपले बाजूला जाऊन मोठे होण्याचा बधिरपणा येतोच की. मग आपणहून बालपण हिरावून घेण्यात काय अर्थ आहे? त्यापेक्षा हे शंखशिंपले असेच राहू दे असा विचार वीणा करते. लहान मुलांचे भावविश्व समजून घेण्याची सुंदर प्रक्रिया कथेत उलगडते.

**ल. ५. समारोप**

'पाणी' या कथासंग्रहात आशाताईंच्या लेखनप्रवासातल्या आरंभीच्या कथांचा समावेश केला आहे. या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे आशाताईंच्या इतर कोणत्याही कथासंग्रहाला लेखिकेचे मनोगत नाही पण या कथासंग्रहाच्या मनोगतात त्या कृतज्ञतेने प्रकाशकांचे आभार मानतात. या कथासंग्रहातील पाणी, अवेळ, मादी अशा काही कथा कन्नडमधून अनुवादित झाल्या आहेत. 'पाणी' या शीर्षकाच्या दोन कथा या कथासंग्रहात आहेत. कथासंग्रहाची सुरुवात व शेवट 'पाणी' या शीर्षकाच्या कथांनी होतो. 'पाणी' या पहिल्या कथेत आणि शेवटच्या कथेत बिल्डिंगमधले वातावरण, पाण्यावरून होणारी भांडणे याचे हुबेहुब चित्रण आशाताईंनी केले आहे. या दोन्ही कथांमध्ये पाण्याच्या वापराचे महत्त्व नकळतपणे त्या सांगतात. 'कोरडी भूमी' या कथेत निलिमाचा मुलगाच तिला तिच्या कामाचे महत्त्व समजावतो. आंब्याच्या झाडाला जितका मोहर येतो तेवढे आंबे येत नाहीत. शेवटपर्यंत फार थोडा मोहर टिकतो. हळुवार कम्मोच्या मनावर या गोष्टीचा परिणाम होतो. माणसाच्या इच्छा आकांक्षांचेही असेच असते. सगळ्याच इच्छा पूर्ण होत नाहीत. हे सांगणारी कथा 'मोहर'. नलिनीला तारामावशीविषयी वाटणारा राग 'स्पर्श' या कथेतून दिसून येतो. तारामावशी आणि अप्पा यांच्या नात्यामुळे आईवर अन्याय झाला आहे असे तिला वाटत असते. पण प्रत्यक्षात या नात्याने कोणतेही प्रश्न निर्माण झालेले नसतात. वास्तवाचा स्वीकार करून नवऱ्याच्या मृत्यूची टांगती तलवार नाकारणारी खंबीर

जान्हवी 'अवेळ' या कथेत भेटते. स्त्री-पुरुष नात्यातला अनोखा बंध 'मादी' या कथेत आहे. विभा आणि तिचा नवरा अविनाश यांच्यामधली भावनिक दरी या कथेत दाखवली आहे. पण कालांतराने अविनाशचे आधी नको असणारे स्पर्श तिला हवेसे वाटतात आणि ती मादी असल्याची जाणीव करुन देतात. स्वाभिमानी सदावर्ते सरांची कहाणी म्हणजे 'पारंब्या' ही कथा. वडाच्या पारंब्या जशा जमिनीत खोलवर असतात तसेच सदावर्ते सरांची तत्व खोलवर रुजलेली आहेत. एका अनोळखी व्यक्तिच्या शेवटच्या क्षणी त्याला आनंद देऊन त्याचा देखणा देहांत बघणारी मनोरमा 'देखणा देहांत तो' या कथेत आहे. राजूच्या आईच्या मृत्यूनंतरच्या दिवसांचा आणि शालीच्या बाळाच्या बारशाचा सोहळा 'सोहळा' या कथेत आहे. एकमेकांशी समांतर नाते असणारे नवरा बायको 'खुर्ची' या कथेत आहेत. अश्विनी या लहानगीचे भावविश्व 'शंखशिंपले' या कथेत आहे.

या सगळ्याच कथांमधून आशाताईंची जीवनवृत्ती, जीवनाकडे बघण्याची दृष्टी पाझरताना दिसते. आशाताई त्यांच्या कथेत सहजपणे जीवनविषयक सत्य-तत्वज्ञान सांगून जातात. साहित्य व समाज यांच्या नात्याचे दर्शन या कथांमधील पात्रांमध्ये, त्यांच्या विचारांमध्ये घडते.

## ल. ६. संदर्भसूची


६१. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ४७

६२. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. २६

६३. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १९२

६४. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १९२

६५. मोहर, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. ११४

६६. स्पर्श, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १४७

६७. अवेळ, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १६१

६८. पारंब्या, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. ९२

# ग्रंथसूची

१. वाटा आणि मुक्काम

२. पाणी

**म. पाऊलवाटेवरले गाव**

| अनु. क्र. | कथेचे नाव |
|---|---|
| १ | केवडा |
| २ | गाव |
| ३ | लग्न |
| ४ | कलश |
| ५ | अँटिक |
| ६ | पुन्हा एकदा जन्म |
| ७ | अतिथी |

**म. १. – प्रस्तावना**

**म. २. – शीर्षककथा**

**म. ३. – मला भावलेल्या कथा**

**म. ४. – अन्य कथा**

**म. ५. – समारोप**

**म. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

**म. १. प्रस्तावना**

कोणत्याही लेखकाची जीवनाकडे बघण्याची दृष्टी, भान नकळतपणे त्याच्या साहित्यात उतरते. एखाद्या घटनेकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगवेगळा असतो. हेच सूत्र त्या त्या लेखकाच्या लेखनातून दिसून येते. जीवनाचे भान साहित्यात कसे व्यक्त होते? या प्रश्नाचे आशाताई छान उत्तर देतात. त्या म्हणतात, "आपले जीवन जगताना जीवनाचे भान असतेच किंवा काही निमित्ताने ते येतेच असे नाही. किंवा ते असत नाही असेही नाही. स्वसाक्षीने जगणाऱ्याला ते नसेल असे ठामपणे सांगता येत नाही. आपण आपल्या जगण्यात गुरफटले जात असतोच. पण लेखक जेव्हा लिहितो तेव्हा मात्र जीवनाला अस्तरासारखे असणारे भान त्याच्या लेखनातून व्यक्त होत जाते. ते व्यक्त होते ते लेखकाच्या जीवनदृष्टीने." [६९]

हीच आगळीवेगळी जीवनदृष्टी घेऊन 'पाऊलवाटेवरले गाव' या कथासंग्रहातील

६९. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, मिलिंद बोकील, भारत सासणे, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २८

कथा आशाताईंनी लिहिल्या आहेत. त्यांची जीवनदृष्टी आणि जीवनभान यांचा विलक्षण संबंध या कथांमधून दिसून येतो. या जीवनदृष्टीनेच त्यांच्या कथा वेगळ्या वाटतात. मेहता पब्लिकेशन्सने ऑगस्ट २००५ मध्ये या कथासंग्रहाचे प्रकाशन केले होते.

आशाताईंना त्यांच्या जगण्यातून झालेले आकलन त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. त्यांची जीवनदृष्टी, जीवनभान त्याचे आकलन आणि त्याचे साहित्यातून व्यक्त होणे ही एक प्रक्रिया आहे. ती प्रक्रिया कथा वाचताना आपल्याला अनुभवता येते. या जीवनदृष्टीमुळेच त्यांचे लेखन सजीव वाटते. अर्थातच वाचक म्हणून या जीवनदृष्टीचा आपल्यावर निश्चितपणे परिणाम होतो. आशाताईंच्या विचारांमध्ये आपले विचार कधी समरसून जातात हे समजतच नाही. हे समरसून जाणे हेच त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आणि बलस्थान आहे.

**म. २. शीर्षककथा**

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सुनील अनिल मेहता यांनी ऑगस्ट २००५ मध्ये आशाताईंचा पाऊलवाटेवरले गाव या कथासंग्रहाचे प्रकाशन केले आहे. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ रेखाटले आहे. या कथासंग्रहात सात कथा आहेत. आशाताईंचा आवडता साहित्यप्रकार कथालेखन आहे. त्यांचे हेच मत अर्पणपत्रिकेत दिसून येते. त्या अर्पणपत्रिकेत लिहितात, "दि. बा. मोकाशी, तुमच्या सहज सुंदर कथेला.... आशा बगे." आपल्या आवडत्या आणि आदर्श कथालेखकाला हे लेखन त्यांनी अर्पण केले आहे. मनातल्या विचारांच्या प्रलयापुढे माणसाचे काही चालत नाही. या सगळ्यात माणसाच्या इच्छा अनिच्छेचा प्रश्नच नसतो. अशीच ही शीर्षककथा.

**गाव**

चित्रदर्शी लिखाण हे या कथेचे प्रमुख वैशिष्ट्य सांगता येईल. एका वेगळ्याच गावात वाचकाला ही कथा घेऊन जाते. त्या निमित्ताने वाचकालाही आपल्या गावाची आठवण येते. बऱ्याचदा कथेतल्या गावाशी नकळत तुलना केली जाते.

आपल्यापैकी सगळ्यांच्याच बालपणीच्या आठवणी खूप मौल्यवान असतात. ज्या गावात आपले लहानपण गेलेले असते ते गाव आपल्याला अधिक जवळचे वाटते. ते गाव, गावातले रस्ते, गावातली माणसं, नातेवाईक, तिथला निसर्ग हे सगळे मनाच्या कोपऱ्यात घर करून बसलेले असते. आपण मोठे झाल्यावर मात्र परिस्थिती बदललेली

असते. या कथेत अनूच्या बाबतीत असेच होते. तिच्या ताराकाकू गेल्याचे पत्र येताच ती अस्वस्थ होते. तिच्या नवऱ्याकडे अंजनकडे गावी जाण्याचा हट्ट करते. या घटनेने तिचे मन भूतकाळातल्या आठवणींमध्ये रमते. गावात गेल्यावर तर तिला सगळे बालपण डोळ्यासमोर उभे रहाते. ताराकाकूंचे घर खूप बदललेले असते. तिच्या डोळ्यांमध्ये साठवलेले कोणतेही चित्र प्रत्यक्षात तसे नसते. ताराकाकूंचे एक गुपित तिला माहित असते. ते तिला प्रत्यक्षात बघायला मिळते. ते म्हणजे डॉ. गोवर्धन. काकूंचे आणि डॉक्टरांचे असणारे भावबंध अनूला माहिती असतातच. ती या नात्याचा तिरस्कार करत नाही. एक समजूतदार नायिका आशाताईंनी अनूच्या रूपात रेखाटली आहे. मूल व्हावे अशी इच्छा असणाऱ्या ताराकाकूंना डॉक्टरांविषयी वाटणारी ओढ अनू समजून घेते. ताराकाकूंच्या इस्टेटीवर डोळा असणारा रमेश सदाफळ तिला अजिबात आवडत नाही. डॉ. गोवर्धनांविषयी तिला वाटणारी आस्था ती लपवू शकत नाही. गावी आलेल्या अनूला तिचा नवरा घ्यायला येतो. तेव्हा डॉ. गोवर्धन तिला "पुन्हा ये" असे म्हणतात. तिला असे वाटते की जणू ते गावच तिला पुन्हा बोलावते आहे. कथेच्या शेवटी प्रचंड पावसाने गाडी लेट झाली आहे असे अनूला कळते. डॉ. गोवर्धन शेडच्या दुसऱ्या टोकाला स्टेशनच्या गेटशी पाठमोरे उभे असतात. गाडी अजून लेट होते. त्या प्रलयाच्या पाण्यात ते छोटसं किरकोळ मवाळ स्टेशन उभं असतं. आपल्याला अपेक्षित गोष्टी घडल्या नाहीत तरी अपेक्षित गाव येईपर्यंत जीवनाचा प्रवास थांबवून चालत नाही. तो चालू ठेवावाच लागतो. असा आशय या कथेतून व्यक्त होतो.

**म. ३. मला भावलेल्या कथा**

मनाच्या पातळीवर जाऊन विचारप्रवृत्त करणाऱ्या कथांमध्ये मला भावलेली कथा –

**१) पुन्हा एकदा जन्म**

आपल्याला आपण जिवंतपणी गवसतो का? आपलेच अस्तित्व ठळकपणे स्वतःलाच कधी जाणवते का? आपण आपल्यालाच हाक मारून साद देतो का? या सगळ्या प्रश्नांची सकारात्मक उत्तरे देणारी ही कथा आहे. ट्यूमरच्या आजाराने ग्रस्त झालेल्या कावेरीला या सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतात. काही वेळा, काही दुःख चांगल्या गोष्टी सोबत घेऊन येतात. तसे कावेरीचे हे आजारपण तिला तिचे स्वत्व शोधायला मदत करते. आपल्या आजुबाजूला असणाऱ्या गर्दीतन सापडणारी उत्तरं एकांतात सापडतात.

कधीही न अनुभवलेल्या घटना मनाच्या ताकदीने अनुभवता येतात. कधीही न दिसणारी माणसं बोलतात. हे सगळे अनुभव कावेरी तिच्या पातळीवर घेते. या सगळ्यात ती आणि तिचे मन याशिवाय अन्य कोणाला स्थानच नसते. अचानक घरातून निघून गेलेला तिचा मुलगा, तिचा कॉलेजमधला जवळचा मित्र सुदीप, तिच्या सासुबाई या सगळ्यांना ती तिच्या मनातल्या कल्पनांच्या आधारे भेटते. त्यांच्याशी गप्पा मारते. स्वतःचा जन्म स्वतःच अनुभवते. ती सोडून दुसऱ्या कोणावर तरी प्रेम करणाऱ्या तिच्या नवऱ्याचा तिला राग येत नाही. मृत्यूचे रूप घेऊन आलेल्या ट्युमरचे ती आभारच मानते. कारण, ट्युमरमुळे तिचा आधीचा जन्म संपून पुन्हा एकदा झालेला जन्म ती अनुभवते.

जिवंतपणी मृत्यूचे दर्शन घडल्याने असलेल्या आयुष्याचे महत्त्व कावेरीला उमगते. मृत्यू म्हणजे एका पर्वाचा शेवट. कावेरीच्या बाबतीत ट्यूमरच्या दुखण्याने मृत्यूचा अनुभव घेऊन ती पुनर्जन्माचाही अनुभव घेते.

मनाच्या ताकदीने माणूस काय काय अनुभवू शकतो हे विलक्षण गांभीर्याने सांगणारी ही कथा गुंतवून ठेवते. कावेरीच्या मनातले विचार वाचक म्हणून सत्यात अनुभवण्याची अनुभूती ही कथा देते. एका विशिष्ट मर्यादेनंतर आलेले दुःखही सुखच देते असा वेगळा अनुभव या कथेत आहे. या अनुभूतीमुळे वाचक स्वतःच्या जीवनात डोकावतो. त्याच्या जीवनविषयक जाणीवा परिपक्व होतात. मृत्यू, सुख आणि दुःखाचे चिंतन करू लागतो. कावेरीचा अनुभव तिच्याच शब्दात सांगायचा तर, "कावेरी डोळे मिटून घेते. त्या अथांगाचे हे ओझरते रूप, त्याचे पहिले टोक, कदाचित तिच्या आसपास असू शकेल. दुसरे मात्र नजरेच्या पलीकडे असेल. हे टोक कोणाला जोडता आले नाही आणि येणारही नाही. त्यावर तिचीच मालकी. मुदुंगाची आवर्तनं घुमतायत. आपला जन्मच जणू आपण अनुवतो आहोत का? एक जन्म तर होऊन गेला आहे. हा दुसरा. त्या खिडकीबाहेरच्या प्रकाशाचे टोक धरून येतोय हा. स्वतःचा जन्म पुन्हा एकदा अनुभवणे ही किती विलक्षण गोष्ट! थँक्स टू ट्यूमर......" [७०]

ट्यूमरच्या रूपाने कावेरीला साक्षात मृत्यूच भेटतो. मृत्यूच्या दर्शनामुळे तिला जीवनाचे दर्शन घडते. जे संपते ते संपवून टाकावे म्हणजे जे अविनाशी आहे त्याचा आनंद घ्यायला वेळ आणि मन रिते रहाते याचा अर्थ तिला कळतो. आपल्याला मिळणारे सुख आणि दुःख दुसऱ्यांवर अवलंबून नसून आपल्या आतच दडलेले असते हे सत्य तिला कळते. स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव आणि जीवनविषयक चिंतन याची अनुभूती ती

---

७०. पुन्हा एकदा जन्म, पाऊलवाटेवरले गाव, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट २००५ए पृ. क्र. १२४

घेते.

## २) अँटिक –

अँटिक म्हणजे पुरातन, जुनी वस्तू किंवा मूर्ती. या कथेत अशा पुरातन मूर्तीपेक्षा स्त्रीकडे बघण्याची वासनेने भरलेली नजर हा अर्थ ठळकपणे जाणवतो.

कॉलेजच्या जीवनात शामल व भूषण चांगले मित्र-मैत्रीण असतात. अनेक वर्षांनंतर परत एकदा ते भेटतात. दोघांचीही लग्न झालेली असतात. शामल आजही तशीच हळुवार, संवेदनशील असते. पण भूषण अगदी पुरुषासारखा वागतो. शामल आणि भूषण कॉलेजजीवनात एकमेकांच्या प्रेमात पडलेले असतात. दोघांनाही नाटकाचे वेड असते. कालांतराने हे वेड कमी होते. काही कारणांमुळे हे बंधही सुटून जातात. श्यामलचे उदयनशी लग्न होते. दोन मुलांसह उदयनबरोबर ती आनंदी असते. एक दिवस अचानक भूषणचा फोन येतो. तो दिल्लीतच उतरल्याचे तिला समजते. अर्थातच तिला त्याला भेटावेसे वाटते. पण तिच्या मनात कोणतीही वाईट भावना नसते. खूप विश्वासाने आणि उत्सुकतेने ती भूषणला भेटायला हॉटेलच्या रूमवर जाते. पण भूषण पूर्वीसारखा नसतो. तिच्यादेखत तो ड्रिंक घेतो. तरीही ती जुन्या आठवणी काढून त्याच्याशी गप्पा मारते. भूषणचे मात्र तिच्या भावनेपेक्षा तिच्या शरीराकडे लक्ष असते. तिने आणलेली भेटवस्तू बघून तिच्याशी गप्पा मारण्यापेक्षा तो तिला मिठीत घेण्याचा प्रयत्न करतो. त्याची पुरुषी वृत्ती त्याच्या कृतीतून स्पष्ट दिसते. आपली जवळची मैत्रीण आहे हे विसरून तो तिच्याकडे केवळ मादी म्हणून बघतो. मोठ्या ताकदीने ती त्याच्या 'अँटिक' नजरेतून आणि विळख्यातून स्वतःची सुटका करून घेते.

शिक्षणाने माणूस शिक्षित होतो. पण सुसंस्कृत होत नाही. हेच या कथेतून दिसून येते. भूषणसारखी व्यक्तिदेखील वासनांध होऊन रानटीपणाने वागते, विश्वासघात करते. त्यामुळे शामलचे मन दुखावले जाते. स्त्रियांची या 'अँटिक' नजरेतून सुटका अजूनही झालेली नाही हेच या कथेतून प्रत्ययास येते. शामलचा निरागस भाबडा भाव, भूषणला मित्र म्हणून भेटण्याची आतुरता, त्यासाठी शहराच्या दुसऱ्या टोकाला जाण्याचे धाडस, त्याच्यासाठी भेटवस्तू घेणे या सगळ्या गोष्टी शामलच्या निर्मळ मनाचे दर्शन घडवतात. याउलट पूर्वी शामल आपल्यावर प्रेम करत होती, आपल्या मिठीत विसावत होती त्यामुळे आजही तिच्या शरीरावर आपला तेवढाच हक्क आहे असे मानणारा व कृती करणारा भूषण या दोन परस्परविरोधी व्यक्तिरेखा या कथेत आहेत. भूषणने केलेल्या विश्वासघातकी

कृत्याचा एक स्त्री म्हणून संताप येतो. शामलने तिची सुटका करून घेतली नसती तर.....या विचाराने मन हेलावून जाते. शहरीकरण झालेले असो की ग्राम्य जीवन, स्त्रीकडे बघण्याचा पुरुषी दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. तिचा सन्मान करणे गरजेचे आहे हेच या कथेतून शिकणे गरजेचे आहे.

### ३) लग्न

कथालेखनाचा एक वेगळा प्रकार म्हणून या कथेचा उल्लेख करता येईल. पत्रांच्या माध्यमातून रेणूच्या लग्नानंतरचा काळ उभा केला आहे.

लग्न या एका संस्काराने माणसाचे आयुष्यच बदलते. वेगळे घर, वेगळी माणसे, वेगळे वातावरण या सगळ्यामुळे विशेष करून स्त्रियांच्या आयुष्यात खूप बदल होतो. मात्र हे लग्न प्रवाहाविरुद्ध जाऊन केले असेल तर हा बदल किती टोकाचा असू शकतो हे या कथेतून समजते. काळ कितीही बदलला तरी रुढी, परंपरा आणि जातीपातीच्या विळख्यातून माणूस बाहेर आला नाहीये. रेणू या एका उच्च कुळातल्या मुलीने चंद्रकांत या खालच्या जातीतील मुलाशी केलेले लग्न तिच्यासकट सगळ्यांचेच आयुष्य बदलवून टाकते. आपल्याला आवडणाऱ्या गोष्टी मिळवताना जवळची नाती दुरावतात. रेणूचे चंद्रकांतवर प्रेम असते. ते प्रेम उथळ नसते. दोघेही लग्न करतात. आपल्या आवडत्या व्यक्तिला मिळवण्यासाठी तिला आई, वडिल, गाव, तिची माणसे कायमची दुरावतात. तिची मुलगी नयनदेखील तिच्याच वाटेने पुढे जाणार असते. तिनेदेखील आपल्या आवडीचा जोडीदार निवडलेला असतो. आपण ज्या परिस्थितीतून गेलो त्याच परिस्थितीतून नयनला जावे लागेल की काय? या विचाराने रेणू अस्वस्थ होते. कारण रेणू तिच्या आयुष्यात यशस्वी झाली, पण आपल्या जीवाभावाच्या माणसांशिवाय समृद्ध झाली नाही. लग्न म्हणजे दोन भिन्न प्रवाहांनी एकमेकांना समृद्ध करत वहायचे असते. ती समृद्धी रेणूच्या वाट्याला येत नाही. तिच्यावर अव्यक्त प्रेम करणारा विश्वनाथ हे पात्रही या कथेत आहे.

प्रेम असूनही रेणूच्या आनंदात चंद्रकांत सुख मानतो. तिला पुन्हा गावी यायला मिळते. तिची आपली माणसं तिला सोडून गेलेली असतात. तरी तिला गावात यायला मिळते याचाच आनंद होतो. तिच्या मनातली खंत ती स्वतःच्या मनाशीच व्यक्त करते, "माझा संघर्षच वेगळा होता. मी पाणी विसरले. प्रवाह विसरले. आजूबाजूचे किनारे जणू हरवून टाकले. तरी मला यश मिळाले. पण मी समृद्ध नाही झाले. दोन भिन्न प्रवाहांनी

एकमेकांना समृद्ध करायचे असते ते माझ्या आणि चंद्रकांतच्या वाट्याला आले नाही. नयनलाही पुन्हा याच सगळ्यातून जावे लागेल, की काळ बदलतो आहे? खरंच बदलतोय का पण? कुठल्या रस्त्यावर मग बदलाच्या खुणा? पायवाटेवर की राजमार्गावर?.....”[७१]

रेणू आणि चंद्रकांतने आंतरजातीय विवाह केलेला असतो. व्यावहारिकदृष्ट्या सगळे यश तिला आणि चंद्रकांतला मिळते. पण माहेरची नाती तुटल्याने या यशाला थोरामोठ्यांचे आशीर्वाद, जिव्हाळा मिळत नाही. त्यामुळे नात्यांच्या दुराव्याने या यशाचे समृद्धीत रुपांतर होत नाही. तिची मुलगीदेखील पुन्हा याच मार्गाने प्रवासाला निघते तेव्हा रेणूला वाटते की, काळ बदलतोय असे वाटत असले तरी समाज बदलतोय असे नाही. मग हा बदल, बदलाच्या खुणा मोठ्या प्रमाणात झालेल्याच नाहीत. आजही बदलाची पायवाट तुडवतच समाज पुढे चालला आहे.

**म. ४. अन्य कथा**

कथासंग्रहातील अन्य कथादेखील मनोविश्लेषणात्मक भूमिकेतून लिहिल्या आहेत. मनाचे खेळ ‘केवडा’ या कथेतून दिसून येतात.

**१) केवडा**

एखाद्या विशिष्ट गंधाचे आणि आपले आगळे वेगळे असू शकते. विशिष्ट गंध आला की काही व्यक्तिंची प्रसंगांची आठवण येते. या कथेत या भावनेची अनुभूती येते. माणसाचे मन आपल्याला हव्या त्या गोष्टी निर्माण करते आणि नको असणाऱ्या गोष्टी अस्तित्वातच नसल्याचा भासही निर्माण करते. सारे मनाचेच खेळ असतात. आशाताईंची ‘केवडा’ ही कथा असाच अनुभव देते. ही कथा आपल्याला केवड्याच्या गंधात गुंगवून ठेवते. मुलाच्या म्हणजे कार्तिकच्या अकाली जाण्याने व्याकुळ झालेली जया या कथेत आपल्याला भेटते. कार्तिकच्या जन्माच्या चाहुलीआधी जयाला केवड्याचा गंध येतो. कार्तिक आणि केवड्याचा दरवळ हे जयासाठी अजब समीकरण असते. कार्तिकच्या मृत्यूनंतर हे सगळे तिच्या मनातून बऱ्यापैकी पुसले जाते. पण अभीनच्या (शेजारचा मुलगा) येण्याने पुन्हा एकदा तिला केवड्याचा सुगंध येतो. फक्त यावेळी तो सुगंध उग्र असतो. एका ठराविक वेळी येणारा हा सुगंध जयापुरताच मर्यादित असतो. कथेत एका टप्प्यावर जयाला हा उग्र सुगंध येईनासा होतो. केवड्याचा उग्र सुगंध येणे किंवा न येणे हा जयाचा भासच असतो. तो केवडा तिच्या मनात दरवळत असतो. कथेच्या शेवटी

---

७१. लग्न, पाऊलवाटेवरले गाव, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ८७

जयाला केवड्याचा तो मंद सुगंध पुन्हा येतो. तिच्या मनातील खळबळ बंद होऊन तिचे मन शांत होते याचेच हे प्रतीक. कथेच्या सुरुवातीला अभीन जयाची मुलगी कीर्ती हिच्याशी बोलतो हे तिला फारसे पटत नाही. पण नकळतपणे आपल्या मुलाशी ती अभीनची तुलना करते. त्यामुळे कीर्तीने त्याच्याशी मोकळेपणाने बोललेले ती समजून घेते. कार्तिकशी अभीनची केलेली तुलनाच तिला केवड्याच्या सुगंधाची अनुभूती देते. फक्त अभीनच्या येण्याने केवड्याचा सुगंध उग्र होतो. नंतर बंदच होतो. तिचे मन स्थिर झाल्यावर उरतो तो शुद्ध दरवळ.

२) **कलश**

भावना आणि कर्तव्य दोन्ही सांभाळून स्वतःचे विचार जपणारी देवकी 'कलश' या कथेची नायिका आहे. स्त्री-पुरुषांमध्ये निखळ नाते असू शकते हे 'कलश' या कथेतून प्रत्ययास येते.

कलश ही कथा तिघांची आहे. देवकी, सुधीर आणि विद्याधर. पण हा प्रेमाचा त्रिकोण नाही. ही कथा विद्याधर आणि देवकीमधल्या रेशीमबंधाची आहे. सुधीर हा देवकीचा नवरा, पण त्यांचे विचार जुळत नाहीत. तो भौतिक गोष्टींकडे लक्ष देणारा आणि त्यामध्येच रमणारा आहे. देवकी मात्र भावनाशील, निसर्गवेडी आहे. या कथेतील देवकी मनाला भावते. आपल्या संसारासाठी स्वतःच्या आवडीनिवडींना तिने बांध घातला आहे. सुधीरसारख्या व्यवहारी नवऱ्याशी तिने जुळवून घेतले आहे. विद्याधर तिचा जवळचा मित्र असतो. तो तिच्या गावी व्याख्यानाच्या निमित्ताने येतो. सुधीरला या दोघांच्या मैत्रीचे सोयर सुतक नसते. त्याच्या विश्वात तो मग्न असतो. देवकी आणि त्याच्यामध्ये प्रेम या भावनेपेक्षा निखळ मैत्रीचे नाते असते. वासना, हव्यास नसलेले निरपेक्ष नाते. एकमेकांच्या सवयी जुळणारे, एकमेकांना समजून घेणारे हळुवार नाते त्यांच्यामध्ये असते. बऱ्याच वर्षांनी ते एकमेकांना भेटतात. त्यावेळी विद्याधर आजारी असतो. त्याच्या तुटक वागण्याने देवकी थोडी नाराज होते. पण नंतर तिलाच हे जाणवते की विद्याधरचे आणि तिचे अनौपचारिक नाते आहे. तो तुटक वागत नसतो. कथेच्या शेवटी तिला विद्याधरच्या आजाराचे कारण कळते. आदल्या दिवशी पहाटे विद्याधरला आणायला ती स्टेशनवर येते. दुसऱ्या दिवशी रात्री त्याला सोडायला येते. घशाचा कॅन्सर झालेला विद्याधर देवकीची शेवटची भेट घ्यायला आल्यासारखा येतो. सगळे रीते होते आहे या जाणीवेने देवकीचे अवसानच गळते. पण तिला धीर देऊन उरलेल्या आयुष्याचा

कलश भरण्यासाठी तो बळ देतो आणि गाडी सुटते.

### ३) अतिथी

ध्यानी मनी नसताना अचानकपणे अनेक गोष्टी आपल्या आयुष्यात घडतात. ठरवलेले असते एक आणि घडते तिसरेच असेही अनुभव येतात. डॉ. सुदर्शन आणि नलिनीच्या बाबतीतही असेच काहीसे होते. दोघांचेही जोडीदार अर्ध्या वाटेत सोडून गेलेले असतात. वयाच्या पन्नाशीनंतर दोघेही लग्न करण्याचा निर्णय घेतात. या निर्णयाला त्यांच्या मुलांचा पाठिंबा असतो असे नाही. तरीही त्यांनी लग्न करायचे ठरवलेले असते. पावसाळ्यातल्या एका दिवशी सुदर्शनच्या सांगण्यावरून एका मंदिरात ते लग्न करण्यासाठी निघतात. नलिनीला असे वाटत असते की हे लग्न जवळपासच्या एखाद्या मंदिरातही होऊ शकते. मात्र सुदर्शनच्या पहिल्या बायकोचे उमाच्या आवडीचे ते मंदिर असते. तिथे जाताना मुसळधार पावसाने त्यांची गाडी अडकते. एका घराचा आसरा घेण्यासाठी अतिथी म्हणून ते जातात. दार उघडणाऱ्या मुलीला त्यांचे तिथे त्यावेळी येणे आवडत नाही. कारण तिचे आजोबा शेवटची घटका मोजत असतात. तिची आजी मात्र त्या दोघांचे आदरातिथ्य करते. असलेल्या परिस्थितीशी जुळवून घेते. असे अनोळखी अतिथी घरात ठेवणे तिच्या नातीला मात्र पटत नाही. आजोबा दुसऱ्या दिवशी पहाटे जातात. त्यांच्या मुलगा विमानाने येण्यासाठी निघालेला असतो. सुदर्शन आणि नलिनी मात्र पाऊस उघडताच त्यांचे ठरलेले लग्न लावण्यासाठी निघतात. शुभकार्यासाठी चाललेले हे दोघे अतिथी म्हणून जातात तेव्हा असा प्रसंग त्यांना बघायला मिळेल असे वाटतच नाही. त्या घरातल्या आजीच्या धीराचे कौतुक वाटते. आपले दुःख बाजुला ठेवून आलेल्या अतिथीचे आजीने केलेले स्वागत आश्चर्यकारक व प्रेरणा देणारे वाटते.

## म. ५. समारोप

आशाताईंची आगळीवेगळी जीवनदृष्टी, जीवनभान या कथासंग्रहातील कथांमध्ये दिसून येते. 'पाऊलवाटेवरले गाव' या कथासंग्रहातील सगळ्या कथांमध्ये लिखाणातला हा वेगळेपणा वाचक, अभ्यासक म्हणून जाणवतो. घटना फार वेगळ्या नाहीत. अगदी आपल्या आजुबाजूला अशा घटना घडतात. पण त्या घटनेकडे आशाताई एका वेगळ्या नजरेतून बघतात. उदाहरण द्यायचे झाले तर "पुन्हा एकदा जन्म' या कथेचे घेता येईल. या कथेतील कावेरी ट्यूमरच्या दुखण्याने त्रस्त आहे. पण या दुखण्यातच ती पुन्हा एकदा

जन्म अनुभवते.  हे आजारपणच तिला 'स्व'चा शोध घ्यायला मदत करते.  'लग्न' या कथेच्या लिखाणातच वेगळेपणा आहे.  पात्रांच्या माध्यमातून कथा पुढे जाते.  समाज रुढी, परंपरा आणि जातीपातीच्या विळख्यात आजही अडकलेला आहे.  हे या कथेतून समजते.  रेणू आणि चंद्रकांतच्या प्रेमकहाणीतून परंपरेचे हे जोखड आजही समाजमनावर आहे हे समजते.  'केवडा' या कथेत माणसाच्या मनाची ताकद आशाताईंनी दाखवली आहे.  आपल्या आयुष्यातल्या गोष्टींचे कारण आपले मनच असते.  माणसाचे मन आपल्याला हव्या त्या गोष्टी निर्माण करते  आणि नको असणाऱ्या गोष्टी अस्तित्वातच नसल्याचा भास निर्माण करते.  मनाचे खेळ 'केवडा' या कथेत अनुभवायला मिळतात. भावना आणि कर्तव्य सांभाळून स्वतःचे स्वतंत्र विचार जपणारी देवकी 'कलश' या कथेची नायिका आहे.  स्त्री-पुरुषांमध्ये निखळ नाते असू शकते हे या कथेतून प्रत्ययास येते.  स्त्रीकडे पुरुषाची बघण्याची वासनांध, अँटिक नजर 'अँटिक' या कथेतून ठळकपणे जाणवते.  आपल्या मित्रावर आंधळा विश्वास ठेवून शामल भूषणकडे जाते.  पण भूषण पुरुषासारखा वागतो.  'कलश' या कथेच्या अगदी विरुद्ध या कथेत घडते.  स्त्री-पुरुष संबंधाचे निर्व्याजपण एकीकडे तर दुसरीकडे फक्त वासना.  शीर्षककथा 'गाव' चित्रदर्शी लिखाणाचे उत्तम उदाहरण आहे.  अपेक्षित मुक्कामाचे ठिकाण येईपर्यंत प्रवास चालू ठेवावाच लागतो.  'अतिथी' या कथेत अनपेक्षित घटना घडते.  शुभकार्यासाठी निघालेल्या डॉ. सुदर्शन आणि नलिनी यांना अतिथी म्हणून एका विचित्र घटनेला सामोरे जावे लागते. अतिथी म्हणून ते ज्या घराचा आसरा घेतात तिथे मृत्युचे सत्र चालू असते.  त्या दोघांना सहानुभूती वाटत असली तरी रात्र संपताच ते दोघे घराबाहेर पडतात.  माणसाची स्वार्थी बुद्धि या कथेतून जाणवते.  पण व्यावहारिक विचार केला तर डॉ. सुदर्शनचे वागणे पटते. प्रत्येक कथेतून आत्मपरीक्षण करण्याची संधी आशाताई वाचकांना देतात.

**म. ६. संदर्भसूची**

६९. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, मिलिंद बोकील, भारत सासणे, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २८

७०. पुन्हा एकदा जन्म, पाऊलवाटेवरले गाव, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट २००५ए पृ. क्र. १२४

७१. लग्न, पाऊलवाटेवरले गाव, आशा बगे, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ८७

## ग्रंथसूची

१. वाटा आणि मुक्काम

२. पाऊलवाटेवरले गाव

## न. प्रतिद्वंद्वी

| अनु. क्र. | कथेचे नाव |
|---|---|
| १ | दुसरा |
| २ | किती दूर |
| ३ | निर्मोही |
| ४ | सखी |

**न. १. – प्रस्तावना**

**न. २. – मला भावलेल्या कथा**

**न. ३. – अन्य कथा**

**न. ४. – समारोप**

**न. ५. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### न. १. प्रस्तावना

आशाताईंचे सगळे साहित्य हे माणसांमधील परस्परसंबंध शोधते. मनाच्या पातळीवर जाऊन विचार करून वाचकाला विचारप्रवृत्त करणारे लिखाण करण्यात त्यांचा हातखंडा आहे. पण हे सगळे लेखन वाचकासाठी जितके आहे तितकेच ते स्वतःसाठीदेखील आहे असे जाणवते. माणसाच्या परस्परसंबंधाची कोणती परिमाणे साहित्यिक म्हणून शोधता येतात? याविषयी आशाताई सांगतात, "माणसाच्या सुख-दुःखाचे केंद्र बाहेर नाही. ते स्वतःमध्येच आहे. त्याचे चिंतन, त्या केंद्रशोधाचे चिंतन हाच या माणसाच्या परस्परसंबंधाचा आंतरिक स्वर असावा. माणसाला हवा असलेला संवाद, त्याची गरज, त्याचा शोध या तिन्हीला बिलगून बसलेली एक नितांत करुणा हे एक परिमाण लेखकाला हवे असते. ही करुणाच जर लेखकाच्या शोधात नसेल तर ते लेखन कोरडे होईल. माणसाच्या परस्परसंबंधांचा गुंता लेखक म्हणून जाणवताना लेखकाला एकाच वेळी त्याची अपरिहार्यताही जाणवेल आणि निरर्थकताही कळेल. या खेळात सहभागी न होणे लेखकाच्या म्हणजेच माणसाच्या हातात नाही." [७२]

नितांत करुणेची हीच भावना त्यांच्या लेखनातून जाणवते. प्रतिद्वंद्वी हा त्या मानाने अलिकडाचा म्हणजे २००५ सालातला कथासंग्रह आहे. त्यामुळेच स्त्री-पुरुष संबंधातला

७२. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ३७

मोकळेपणा, स्त्रीकडे पुरुषाची बघण्याची दृष्टी, लहान वयातल्या तरुण मुलाने वयाने मोठ्या असणाऱ्या स्त्रीकडे वासनांध नजरेने पहाणे अशा गोष्टी या कथासंग्रहात आहेत. तरीही लिखाणातला संयमीपणा हे वैशिष्ट्य कायम तसेच आहे. प्रतिद्वंद्वी या शब्दाचा अर्थ 'स्व' सोडून दुसऱ्या कोणीतरी केलेला विरोध. मग ते आपली मूळ प्रकृती सोडून इतर काहीही असू शकते. उदा. व्यक्ती, विचार किंवा आपल्याच व्यक्तिमत्वाची दुसरी बाजू. असे द्वंद्व आपण नित्यच अनुभवतो. तेच जाणून घेऊ या या कथाविश्वात –

**न. २. मला भावलेल्या कथा**

'प्रतिद्वंद्वी' या कथासंग्रहात चार दीर्घकथा आहेत. ऑगस्ट २००५मध्ये मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सुनील अनिल मेहता यांनी हा कथासंग्रह प्रकाशित केला. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी कथासंग्रहाचे मुखपृष्ठ रेखाटले आहे. नवकथेला एका वेगळ्या वळणावर नेणाऱ्या विद्याधर पुंडलिक यांना हा कथासंग्रह अर्पण केला आहे. दीर्घकथा या प्रकारात मोडणाऱ्या या कथा वाचकाला आपल्यातला प्रतिद्वंद्वी शोधायला मदत करतात. या कथासंग्रहातील मला आवडलेली सर्वोत्तम कथा 'निर्मोही'.

**१) निर्मोही**

प्रपंचात राहूनही कशाचाही मोह न होणे ही अध्यात्मिक पातळीतील सर्वोच्च अवस्था आहे. या कथेमध्ये अशी अवस्था कृष्णा या एका निर्मोही स्त्रीला प्राप्त झाली आहे. आश्चर्य म्हणजे ही अवस्था तिला कोणतेही प्रयत्न न करता मिळाली आहे. अनुराधाबाईंची मुलगी नीना कृष्णाला एका वृद्धाश्रमातून आणते. आपल्या आईची सोबत व्हावी म्हणून कृष्णा त्यांच्या घरी येते. नीना मुद्दाम तिच्या आईसाठी कृष्णाला आणते. वृद्धाश्रमात राहिलेली कृष्णा गबाळी, अस्वच्छ असते. नीनाला ती फारशी आवडत नसते. पण त्या वृद्धाश्रमात त्यातल्या त्यात तिला तीच बरी वाटते. अनुराधाबाईंच्या लक्षात येते की कृष्णाला आपल्या पद्धतीचे वळण लावावे लागणार आहे. दात घासणे, आंघोळ करणे, स्वच्छ राहणे हे तिला जणू माहितच नसते. कृष्णाला एकच वेड असते ते म्हणजे खाण्याचे आणि विणण्याचे. खाण्याशिवाय कोणतीही वासना, वयाची पन्नाशीही न गाठलेल्या, कृष्णाच्या मनाला शिवतही नाही. भीती तर तिला माहितीच नसते. अनोळखी शहरात आल्यासारखी ती कधीच वावरत नाही. हळूहळू बाईंच्या हाताखाली ती सगळे रीतीरिवाज शिकते. बाई आजारी पडल्यावर त्यांची सेवा करते. नीना बाईंच्या

घरी रहायला येणार हे कळल्यावर मात्र तिथून जाण्याचा निर्णय घेते. कशातही, कोणातही न अडकणारी कृष्णा खूप वेगळी आहे. जवळपास दीड वर्ष बाईंजवळ अगदी प्रेमाने, घरातल्यासारखी राहिलेली कृष्णा ते घर सोडून जाताना एकदाही मागे वळून बघत नाही. अनुराधाबाईंना नेहमी असे वाटते की, कृष्णासारखे निःसंग, निर्मोही, निर्भय, एकटे व्हायला त्यांना कधी जमेल का? कथा वाचताना आपल्यालाही कृष्णेच्या निर्मोही असण्याचा हेवा वाटतो. कृष्णाच्या निर्मोहीपणाचे आशाताईंनी कथेच्या शेवटी छान वर्णन केले आहे. "ती घराच्या पायऱ्या उतरली. फाटक उघडले, लावले. ती आली होती तेव्हासारखेच रखरख ऊन होते. ती तिच्या नेहमीच्या चालीने झपाझपा चालायला लागली. तिने मागे वळून पाहिले नाही. अनुराधाबाई उभ्याच होत्या." [७३]

## २) किती दूर

आपण आपल्या कुटुंबापासून, घरापासून दूर झालो तर तो दुरावा कमी करणे शक्य होते. मात्र आपण आपल्यापासूनच दूर गेला तर..... तर काय होते हे या कथेतून अनुभवता येते. ललिता आणि मनोहर या डॉक्टर पतीपत्नींचा सुजय हा एकुलता एक मुलगा त्या दोघांविषयी समाजात सगळ्यांना प्रचंड आदर असतो. एक सुसुसंस्कृत, सुशिक्षित जोडपे म्हणून ते परिचित असतात. त्यांच्या घरी मनुताई नावाच्या बाई घरकाम करत असतात. सात्विक आणि प्रामाणिक मनूताई त्या कुटुंबात रुळलेल्या असतात. ज्या घरात आपण काम करतो, ज्या घरचे मीठ खातो त्या घरासाठी प्रसंगी जीवदेखील देण्याची त्यांची तयारी असते. सुजय डॉक्टरकीच्या शिक्षणासाठी त्यांच्यापासून दूर रहात असतो. सुजय आणि त्यांच्या पालकांच्या मनामधले अंतर इतके वाढलेले असते की त्यांचा साधा संवादही होत नसतो. सुजय व्यसनाधीन होतो. चांगल्या घरातल्या मुलाने जे वागू नये ते सगळे करतो. ललिता आणि मनोहर सुजयपुढे हतबुद्ध झाले आहेत. एक दिवस सुजय अचानक घरी येतो. संस्कारांपासून दूर गेलेला सुजय बेमुर्वतपणे वागत असतो. नाती, प्रेम, भावना यांच्याशी त्याचा काहीच संबंध राहिलेला नसतो. ललिता आणि मनोहर तर त्याच्यासमोर हार मानतात. दूर गेलेल्या आपल्या एकुलत्या एका मुलाला जवळ आणण्याचा ललिता खूप प्रयत्न करते. पण अपयशी होते. मनुताईंच्या चांगल्या वागण्याचा सुजयवर परिणाम होतो. एकीकडे त्यांचा राग येतो तर दुसरीकडे एक स्त्री म्हणून त्यांच्याविषयी शारीरिक आकर्षण निर्माण होते. वाईट वागायचे ठरवूनही मनुताईंच्या सात्विकतेपुढे तो हारतो.

---

७३. निर्मोही, प्रतिद्वंद्वी, आशा बगे, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. १०२

आपण माणुसकीच्या, नात्यांच्या किती दूर आलो आहोत याची त्याला जाणीव होते. मनुताईंच्या ऑपरेशननंतर सुजय खूप बदलतो. त्याला बदलवण्यास मनुताईंचा सात्विकपणा कारणीभूत ठरतो. सगळ्या जगावर थुंकायला निघालेला सुजय मनुताईंमुळे बदलतो. त्याच्यातला बदल आश्चर्यचकित करणारा असतो. “किती दिवसांनी तो एखाद्या साध्या माणसासारखा बोलत होता. ललिताने त्याच्याकडे पाहिलं. सगळं विचारून झालं तरी तो तिथे तसाच उभा राहिला स्तब्ध. काहीसा अस्वस्थ. बाहेरच्या अंधाराकडे बघत. तो किती दूर निघून आला होता! स्वतःपासून.....” [७४]

**न. ३. अन्य कथा**

प्रतिद्वंद्वी या कथासंग्रहातील अन्य दोन कथांमध्ये ‘दुसरा’ ही कथा पुरुषप्रधान आहे. आशाताईंच्या कथालेखनातले सामर्थ्य हेच आहे की पुरुष पात्र रंगवतानादेखील ते वाचकाला जवळचे वाटते. डोळ्यासमोर कार्तिकचे आयुष्य उभे करणाऱ्या कथेचे कथानक जाणून घेऊ या.

**१) दुसरा**

आपल्या मनात येणारे सगळेच विचार आपले नसतात. आपल्यामध्ये लपलेल्या दुसऱ्या कोणीतरी ते प्रकट केलेले असू शकतात. असा एक वेगळाच विचार या कथेत मांडला आहे. वरवर पहाता अशक्य वाटणारी अशी ही भावना आहे पण कित्येक वेळा आपल्या असे लक्षात येते की, एखाद्या व्यक्तिच्या स्वभावापेक्षा खूप वेगळे वर्तन त्या व्यक्तीकडून होते. किंबहुना आपण असे कसे वागू शकतो? असा प्रश्न त्या व्यक्तिला पडतो. असेच काहीसे कार्तिकच्या बाबतीत घडते. अपघातामुळे आलेले अपंगत्व तो खेळकर वृत्तीने स्वीकारतो. घरातले सगळे त्याची खूप काळजी घेत असतात. पण त्याला मनात कुठेतरी वाटत असते की आपली बायको मणी, मुलगी सोनू आपल्याकडे विशेष लक्ष देत नाहीयेत. त्याची मोठी मुलगी मधुरा मात्र त्याचे सगळे मनापासून करत असते. फिजिओथेरपिस्ट अनू त्याच्या आयुष्यात वेगळीच भावना घेऊन येते. फारशी आकर्षक नसलेली, अबोल, घुमी अनू त्याला आवडू लागते. तिचा स्पर्श त्याला हवाहवासा वाटतो. खरे तर कार्तिकचे मणीवर खूप प्रेम असते. अनू व्यायाम करवून घेत असताना तो तिला मुद्दाम स्पर्श करण्याचा प्रयत्न करतो. पण अनू विलक्षण कोरडी असते. कार्तिकला मात्र

---

७४. किती दूर, प्रतिद्वंद्वी, आशा बगे, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ६४

आपण असे कसे वागलो हा प्रश्न पडतो. अंथरुणाला खिळलेल्या कार्तिकची अवस्था कथेत उत्तम पद्धतीने चित्रित केली आहे. कार्तिकमधला तो 'दुसरा' त्याला या वेगळ्या भावनेच्या जाळ्यात अडकवतो. कार्तिकच्या मनातले बदलणारे विचार, त्याच्या मनातली गृहितके, भावना आशाताईंनी मांडले आहे.

या कथेतून आपल्याच आत असलेल्या आणि आपल्यावर अंमल गाजवणाऱ्या दुसऱ्याचे वर्णन आशाताई करतात.

## २) सखी

आशाताईंचा आवडता विषय म्हणजे शास्त्रीय गायन. या कथेतदेखील शास्त्रीय संगीतातील रागांचा आणि भावनांचा सुंदर मेळ घातला आहे. भोवतालचे सगळे बदलते पण काहीतरी असतेच की जे बदलत नाही. हे प्रत्येकाला समजते. पण ते कळण्याची प्रत्येकाची वेगवेगळी वेळ असते. देवयानी आणि अंजलीच्या बाबतीत असेच काहीसे घडते 'सखी' या कथेत. त्या दोघी जिवलग मैत्रिणी, सख्या असतात. दोघींनी मिळून सुरू केलेली शाळा (बालक मंदिर) नंतर खूप विस्तारते. देवयानी शाळेतच रहाते. पण अंजली दुसरी नोकरी करते. देवयानी संवेदनशील असते तर अंजली खूप वास्तवतेत जगणारी. एकमेकांशी अतिशय मोकळेपणाने वागणाऱ्या या मैत्रिणी असतात. दोघींनाही शास्त्रीय संगीताची आवड असते. त्यातल्या त्यात संवेदनशील देवीला जरा जास्त. देवीच्या आयुष्यात एक विचित्र ताण आहे. तिचाच मुलगा जय घरापासून खूप लांब जातो. आपल्या मनासारखे काम करण्यासाठी आई वडिलांच्या भावनांचाही विचार न करणारा जय. पण देवीचा तो खूप लाडका असतो. देवीचा नवरा शशी आपण बरे नि आपले काम बरे या वर्गातला. जयच्या सगळ्याच चुका ती सहन करते. पण एकदा जय घरातल्या काही गोष्टी चोरून निघून जातो. परस्पर लग्न करतो. या गोष्टी मात्र देवीच्या मनाला खूपच लागतात. तो आपल्याला गृहित धरतो आहे याची तिला जाणीव होते. सगळे बदलते हे कितीही खरे असले तरी काहीतरी असे असते जे कधीच बदलत नाही. अंजलीचा हा विचार तिला आता पटतो. तिला हे कळते की, जे काय आहे ते माझ्या आतच तर आहे. कुणाशी त्याचा संवाद जुळो न जुळो. जयच्या अशा वागण्याने ती दुखावते. तरी पुन्हा उभी रहाते. अजंलीची त्यावेळी तिला खूप आठवण येते. अंजली हार्ट ॲटॅकने अचानक जाते. पण तिचे विचार देवीजवळ असतात. ते विचार अगदी योग्य वेळी देवीची साथ करतात, जिवलग सखीसारखे. देवी विचार करते आणि शशीला

सांगते, "अंजली म्हणाली होती, की सगळं बदलते. पण काहीतरी असतच की जे बदलत नाही. खरं असेल नाही ते? पण ते कळण्याचीही एक वेळ असेल. प्रत्येकाची वेगवेगळी....पण त्यामुळेच तर आपापल्या जगण्यातून आपण भरून राहिलो. नाही तर एकेकटे, एकेका कोपऱ्यात उरलो असतो. हो नं?" [७५]

आपल्या आत दडलेला शाश्वत विचार, धारणा बदलत नाहीत. आजुबाजुची परिस्थिती, माणसे बदलली तरी हा विचारच आपल्याला संकटकाळात दिशा दाखवतो. तो विचार समजून घेण्याची, कळण्याची प्रत्येकाची वेळ वेगवेगळी असते. कधी कधी हा विचार आपल्या जवळचे कोणीतरी आपल्याला देते. या कथेत अंजली हा विचार देवीला देते. हाच विचार देवीच्या जगण्याला नवीन बळ देतो.

**न. ४. समारोप**

'प्रतिद्वंद्वी' मधल्या चारही दीर्घकथा आशाताईंचे चिंतन दर्शवतात. माणसांमाणसांतील संबंधातील गुंतागुंत या कथांमध्ये आहे. माणसाचे मन त्याच्या सुख-दुःखाला कसे कारणीभूत असते हे या कथांमध्ये दिसून येते. माणसाच्या मनात चालणाऱ्या खेळात सहभागी व्हायचे का नाही हे त्याच्या हातात नसते. ते अपरिहार्य असते. ही अपरिहार्यता या कथांमध्ये दिसते. शीर्षककथा नसलेल्या या संग्रहात स्व सोडून केलेल्या विरोधाचे दर्शन घडते. या कथासंग्रहातील 'निर्मोही' ही कथा मला खूप आवडली. प्रपंचात राहूनही कशात न अडकणाऱ्या कृष्णाचा हेवा वाटतो. 'किती दूर' या कथेत मनूताईंसारखी सात्विक स्त्री भेटते. सुजयच्या मनातली वासना त्यांच्या सात्विकतेपुढे नष्ट होते. लहान वयातल्या सुजयला मनूताईंचे वाटणारे आकर्षण आणि त्याच वेळी येणारा राग या परस्परविरोधी भावना कथेत आहेत. 'दुसरा' या कथेतल्या कार्तिकला आपल्यामध्येच लपलेला दुसरा कार्तिक जाणवतो. जे विचार आपल्या मनात येऊच शकत नाहीत ते या दुसऱ्या कार्तिकच्या रूपाने तो अनुभवतो. अनू या फिजिओथेरपिस्टविषयी त्याला वाटणारे आकर्षण हा त्याचाच एक भाग. भोवतालचे सगळे बदलते पण काहीतरी असे असते की जे बदलत नाही. ते कळायचीदेखील प्रत्येकाची एक वेळ असते, पण वेगवेगळी. हे सांगणारी कथा 'सखी'. देवी आणि अंजलीच्या वेगळ्या मैत्रीची ही गोष्ट खूप काही शिकवून जाते. जगण्याच्या वेगळ्या जाणीवा समृद्ध करणाऱ्या या दीर्घकथा मनाला भावतात. पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटतात. विचारप्रवृत्त करतात.

---

७५. सखी, प्रतिद्वंद्वी, आशा बगे, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ६४

**न. ५. संदर्भसूची**


७२. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मोज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ३७

७३. निर्मोही, प्रतिद्वंद्वी, आशा बगे, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. १०२

७४. किती दूर, प्रतिद्वंद्वी, आशा बगे, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ६४

७५. सखी, प्रतिद्वंद्वी, आशा बगे, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ६४


## ग्रंथसूची


१. वाटा आणि मुक्काम

२. प्रतिद्वंद्वी

## प. अनुवाद

अनुवाद, मौज प्रकाशन गृह, मार्च २०१६

आशाताई बगे यांचे २०१२ पर्यंतचे कथासंग्रह माझ्या अभ्यासाचा विषय आहे. त्यामुळे २०१६ मध्ये प्रकाशित झालेल्या 'अनुवाद' या कथासंग्रहातील कथांचा सारांशरूपाने विचार केला आहे.

आशा बगे यांच्या अलिकडच्या काळातील म्हणजे २१व्या शतकातील काही निवडक कथांचा हा संग्रह आहे. या कथासंग्रहातील एकच कथा १९९७ सालातील आहे. सध्याच्या काळातील समाज, रूढी व भौतिक सुधारणा यांचे संदर्भ अपरिहार्यपणे या कथासंग्रहात येतात.

नात्यांमधील गुंतागुंत समजून घेणे आणि सर्वसामान्यांच्या आकलनापलीकडे असणाऱ्या नात्यांचा शोध घेणे हे आशा बगे यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य या कथासंग्रहातदेखील दिसून येते. सगळ्याच कथांचे शेवट हव्या त्या निकषांवर न आणता वाचकांच्या विचारशक्तीवर सोडून देण्यात आले आहेत.

त्यांच्या कथांमधील नायिका दिसायला चारचौघींसारख्या आहेत. त्यांचे वेगळेपण त्यांच्या विचारांमध्ये दाखवण्यात आले आहे. निर्भय, स्पष्टवक्त्या, निरागस अशा नायिका त्या साकारतात.

'सगर्भ', 'गोष्ट आदिलची', 'उन्हं', 'ग्राऊंड', 'खोटी', 'दंश', 'अनुवाद', 'अनाहत', 'मुद्रा', 'ऊन', 'निर्भिक', 'पैस' या सगळ्या कथांमध्ये माणसाच्या मनाचा तळ शोधून मनाची घालमेल दाखवली आहे. 'गोष्ट आदिलची' मध्ये संपन्न घरात वाढणारा असूनही आदिलला गाव सोडून जाण्याचा ताण येतो. तो आजारी पडतो. त्याच्या आत्याचा विचित्र स्वभाव लक्षात येऊनही आदिल परिपक्वतेने वागतो. लहान वयात निरीक्षणाने येणारी परिपक्वता त्याच्याकडे आहे. 'ग्राऊंड' या कथेत एका अनोळखी मुलाबद्दल कुंडलच्या मनात निर्माण झालेली मैत्रीची भावना व त्या मुलाच्या अबोलपणामुळे येणारा ताण याचे आशाताई छान वर्णन करतात. 'सगर्भ' या कथेत घरातील सगळ्यांकडूनच पोटच्या मुलाप्रमाणे माया मिळूनही आश्रित आहोत याची भावना श्रीनिवासला अस्वस्थ करते. मनोकायिक आजाराच्या रूपात ही अस्वस्थता बाहेर येते. नकळत मनावर येणारा ताण बहुतेक सर्व कथांमध्ये आहे.

'उन्हं' या कथेतील गरोदर नीरजा अमेरिकेतून आईकडे आलेली आहे. घरातून

पळून गेलेल्या आपल्या आत्याबद्दल माहिती काढून आत्याच्या मुलाला भेटायला ती जाते. औरस-अनौरस नात्याचा शोध, पिढीजात आलेला कलेचा वारसा याचाही शोध या कथेत आहे. 'उन्हं' व 'मुद्रा' या दोन्ही कथांना संगीताची पार्श्वभूमी आहे. आशा बगे यांचा संगीत व नाट्य या कलांशी असणारा संबंध त्यांच्या या कथांमधून जाणवतो. 'मुद्रा' आणि 'अनुवाद' या कथेत जवळच्या व्यक्तीच्या मृत्यूने जीवनाच्या क्षणभंगुरतेची होणारी जाणीव आहे. 'मुद्रा' या कथेत आशाताईंनी कलेसाठी आधी माणूस म्हणून स्वतःला सिद्ध करणे आवश्यक आहे असे सांगितले आहे. 'अनुवाद' या कथेत वडिलांनी हातात घेतलेले अनुवादाचे काम त्यांच्या मृत्यूनंतर अरुणाकडे (मुलीकडे) येते. पंजाबी व अपंग असलेल्या लेखकाला भेटण्यासाठी अरुणा त्याच्या घरी जाते. रणबीरशी (लेखकाशी) होणाऱ्या संवादातून वाचकाला आशावादी दृष्टिकोन मिळतो. ''ज्यात पुन्हा काही सुरू करण्याची ताकद असते तो अस्त.'' हे वाक्य प्रेरणादायी आहे.

'अनाहत' ही कथा आहे, मेडिकलच्या शेवटच्या वर्षाला असणाऱ्या केतनची. त्याने डॉक्टर व्हावे असे स्वप्न त्याची आई बघते. मात्र केतन एका कथेमुळे झपाटून जाऊन नाटक लिहितो. एखाद्या लेखकाची, कलाकाराची अस्वस्थता वाचकालाही अस्वस्थ करते आणि मनस्वी अशा लेखकाशी किंवा कलाकाराशी कसे वागावे हेदेखील सांगते. आई-वडिलांशिवाय वाढलेल्या लाडक्या नातीच्या साखरपुड्याचे वर्णन 'पैस' या कथेत आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा मनाने जोडलेली नाती अधिक घट्ट असतात हे या कथेतून दिसते.

या कथासंग्रहातील सगळ्याच कथा स्त्रीवादी नाहीत. पुरुषांमधील चांगुलपणाचे दर्शनदेखील या कथांमधून होते. मानवी स्वभावाचे विविध पैलू या कथांमधून दिसून येतात. या कथांमधून आलेले अनुभव त्यांच्या कुटुंबाच्या परिघातले आहेत असे जाणवते. मात्र हे अनुभव वाचक म्हणून आपणही घेतले असल्याची अनुभूती कथा वाचताना येते. आशा बगे यांच्या लेखनाच्या वाटचालीतील 'अनुवाद' हा कथासंग्रह महत्त्वाचा आहे. कथेतील वातावरण, ऊन, पाऊस, निसर्ग, संगीत एखाद्या पात्रासारखे सोबत करतात. मनाचा तळ दाखवणाऱ्या अतिशय तरल आणि सहज अशा या कथा बदलत्या काळाचे संदर्भ घेऊन येतात.

## २.४ समारोप

आशा बगे यांचे कथाविश्व या प्रकरणामध्ये आशाताई बगे यांच्या कथासंग्रहातील कथांचा अभ्यास केला आहे. सहजता हे आशाताईंच्या कथालेखनाचे वैशिष्ट्य आहे. त्यांचे लेखन आणि त्यांचे अनुभवविश्व वेगळे नाही हे त्यांच्या कथा वाचताना दिसून येते. एक व्यक्ती म्हणून जगताना जे कळते ते लेखनातून कसे मांडले जाते? याविषयी आशाताई सांगतात, ''व्यक्ती म्हणून जगताना स्वतःतले काही अन्तःप्रवाह जाणवत असतात. ते असतात नैसर्गिक पण पुष्कळदा बाह्य घटकांनी झाकोळले जातात. त्यातली स्वतःशी अभिन्न अशी उत्कटता आणि तटस्थता किंवा दोन्हीचे मिश्रण हे आतून जाणवत असताही बाहेरचे उपरे, लादलेले असे काही आकलनात येऊन मिसळते. व्यक्ती ही व्यक्ती म्हणूनच जगू पाहते. व्यक्तीचे स्त्री असणे किंवा पुरुष असणे आणि त्याने जीवनाचे आकलन निर्धारित होत जाणे हे बाह्य, लादलेले घटक आहेत. व्यक्ती म्हणून जगत असताना ती व्यक्ती त्यात इतकी बुडलेली, गुंतलेली असते की त्याकडे नजर वर करून स्वतःचे असे जगणे आणि त्या जगण्याने झालेल्या जीवनार्थाच्या आकलनाचे स्वरूप न्याहाळणे किंवा सहज कुतूहलाने कदाचित तटस्थपणेही त्याकडे बघणे घडत असतेच असे नाही.''[७६]

आशाताईंच्या या मनोगतातून त्यांचे अनुभव आणि लेखन वेगळे नाहीत हे समजते. या प्रकरणात आशाताईंच्या 'मारवा' पासून 'प्रतिद्वंद्वी' या कथासंग्रहातल्या सगळ्या कथा त्यांच्या अनुभवांचे प्रतिबिंब वाटतात. काही कथांमध्ये तर त्याच आहेत अशी जाणीव होते. 'पाहुणा' या कथेचे उदाहरण ठळकपणे सांगता येईल. या कथेत नरसप्पा नागाला मारण्याच्या अहंकारात स्वतःचा मृत्यू ओढावून घेतो. अहंकार मृत्यूपेक्षा मोठा नाही हे या कथेतून समजते. या प्रसंगाच्यावेळी आशाताई स्वतः असल्याचे जाणवते. आशाताईंशी बोलताना त्यांनीदेखील त्या तिथे होत्या असे सांगितले. कथा वाचतानाच हे लक्षात येते. आणखीन एक कथा म्हणजे 'ठग'. बनारसच्या घाटावर तिथल्या मुलाकडून फसवले जाण्याऐवजी कथेचा नायकच त्याला फसवून दुसऱ्या दुकानातून साड्या घेतो. या कथेत सुद्धा आशाताईंचे अस्तित्व जाणवते.

आशाताईंच्या कथांचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कथांमध्ये शास्त्रीय संगीत ठिकठिकाणी आढळते. देऊळ, वाडे, कीर्तन परंपरा, पाऊस, रूढी यांचा उल्लेख आढळतो. या सगळ्याचा त्यांच्या जीवनाशी असणारा संबंध कथांमध्ये आलेला आहे. या कथा वाचताना आपण स्वतः कथांचा एक भाग बनून जातो. कित्येक कथांमधून

७६. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २२

आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळतात. कित्येकदा आपण त्या कथानायिकांसारखे वागू शकलो तर... असेही वाटते. उदाहरण द्यायचे झाले तर 'निर्मोही' या कथेतल्या कृष्णाचे देता येईल. कशातही न अडकणारी कृष्णा किती वेगळी आहे याची जाणीव होते. छोट्या छोट्या गोष्टींमध्ये अडकणारे आपण कृष्णासारखे निर्लेप कधी वागणार? असा प्रश्नही पडतो. या सगळ्या कथा मनोरंजनाबरोबर प्रेरणा देतात, प्रबोधन करतात. आपल्याला एक नवी दृष्टी देतात.

## संदर्भसूची

७६. वाटा आणि मुक्काम, आशा बगे, सानिया, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २२

## ग्रंथसूची

१. वाटा आणि मुक्काम

| प्रकरण ३ सानिया यांचे कथाविश्व | पृष्ठ क्र.<br>१८४ ते ३१४ |
|---|---|
| ३.१ प्रस्तावना<br>३.२ सानिया यांचा परिचय<br>३.३ सानिया यांचे कथाविश्व<br>३.४ समारोप | |

## ३.१. प्रस्तावना

केवळ स्त्रियांच्या कथनात्मक साहित्यातच नव्हे तर समग्र मराठी साहित्य परंपरेमध्ये ज्यांचे स्थान लक्षणीय ठरते अशा लेखिकांमध्ये सानिया यांचा समावेश होतो. त्यांचे लेखन संख्यात्मक दृष्टीने मोजके आहे. तरी ते निश्चितपणे गुणवान व कसदार आहे. आपल्याला भावलेला अनुभव त्याच्या सूक्ष्मतेसह प्रतिकात्मक भाषेत सानिया आपल्या कथांमधून मांडतात. बाह्यविश्वातील घडामोडींबरोबरच माणसांच्या अंतर्मनातील हेलकावे शब्दांकित करण्याचे अनोखे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे.

सानियांचे साहित्य वाचताना मेंदूला जडपणा येतो तर मानवी मनाच्या अंतरंगात शिरून निष्कर्ष काढण्यात मन गुंतून जाते. कथा, दीर्घकथा आणि कादंबरी या तिन्ही साहित्यप्रकारांवर आपल्या आशयघनतेने व प्रयोगशिलतेने सानिया यांनी वाचकांच्या मनावर लखलखीत मोहर उठविली आहे. शिक्षणानंतर विवाह आणि नोकरीच्या निमित्ताने व लग्न झाल्यानंतर सानिया यांचे वास्तव्य महाराष्ट्रापासून आणि पुण्या-मुंबईसारख्या वाङ्मय निर्मितीच्या केंद्रापासून दूर होते. त्यामुळे साहित्यिक कार्यक्रमांमधून व सभांमधून त्या फारशा दिसल्या नाहीत. पण म्हणून मराठी भाषेपासून आणि मराठी माणसाच्या सुखदुःखापासून त्यांनी फारकत घेतली नाही. किंबहुना मराठी मुलखापासून दूर वास्तव्य करण्याचा त्यांना फायदाच झाला. अनेक जागा बदलत गेल्याने बरेच अनुभव वाट्याला आले. एक व्यक्ती म्हणून व्यापक दृष्टीकोन मिळाला. सानिया यांच्या बहुतेक कथा स्त्री केंद्री आहेत. स्त्रियांचे अनुभवविश्व बहुतेक कथांमध्ये केंद्रस्थानी आहे. त्यामुळे कौटुंबिक नातेसंबंधातून उत्पन्न होणारे ताण चित्रित करण्यावर सानिया यांनी आपले लक्ष केंद्रित केलेले दिसते. कदाचित त्यामुळेच या नायिका सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहेत. मात्र वास्तव स्त्रियांची कार्यक्षेत्रे विस्तारली असली तरी कथांमध्ये मात्र ती अध्यापन, स्वयंसेवी संस्था, जाहिरात कंपन्या, वास्तुरचना वा वैद्यक व्यवसायात जास्त आढळतात. भालचंद्र फडके आपल्या 'मराठी लेखिका चिंता आणि चिंतन' या पुस्तकात म्हणतात, ''समाजसुधारक आगरकर सत्यसृष्टीत उतरले. मला विश्वास निर्माण करणारा हा काळ आहे. गेल्या दहा वर्षात जवळजवळ ८० टक्के कथा कांदबऱ्या लेखिकांच्या आहेत. गांभिर्याने लिहिणाऱ्या, कथात्मकतेची समज असणाऱ्या, मूल्यविषयक जाणीव असलेल्या, दुर्गा भागवत, इरावती कर्वे, कमल देसाई, विभावरी शिरूरकर, इंदिरा संत, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे, अंबिका सरकार व प्रिया तेंडुलकर

इ. लेखिका आहेत. त्यांच्या लेखनाची जातकुळीच वेगळी आहे. याचा अर्थ सानियांच्या लेखनात आत्मउन्नतीच्या व प्रगल्भ विचारांच्या खुणा आहेत.''[१]

## ३.२. सानिया यांचा परिचय

सानियांना लहानपणापासून गोष्ट रचून सांगायला आवडत असे. त्यांच्या सगळ्या कथा, अनुभवांशी निगडीत आहेत. सुशिक्षित, अशिक्षित, स्वावलंबी, परावलंबी, कर्तृत्ववान, सामर्थ्यवान स्त्रिया त्यांनी आपल्या साहित्यात समाविष्ट केल्या आहेत. त्यांनी संयमी स्त्रीवाद समंजस मनाने स्वीकारला असून पुरुषप्रधान संस्कृतीतले पुरुष तसेच माणुसकी जपणारे पुरुषही सानियांच्या कथांमध्ये आहेत. सानिया यांच्या साहित्यातली स्त्री नवी पाऊलवाट निर्माण करते. अशी वेगळी पाऊलवाट निर्माण करणाऱ्या सानिया यांचा अल्पपरिचय करून घेणे आवश्यक आहे. त्यांचे वाङ्‌मयीन व्यक्तिमत्व त्यांच्या कथांमधून आपण पहाणार आहोतच.

पुण्याच्या बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयात शिक्षण घेत असल्यापासूनच सानिया यांचा ललित साहित्याच्या वाचन लेखनाकडे ओढा होता. अनेकांप्रमाणे त्यांनीही तरूण वयात कविता लिहिल्या. १९६८ च्या जूनमध्ये 'हरवलेली पायवाट' ही त्यांची असंग्रहित कथा 'श्री' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. त्यानंतर बहुधा कथा हे माध्यमच त्यांना व्यक्त होण्यासाठी सुयोग्य वाटले असावे. १९६८ ते १९७५ या काळात त्यांनी सातत्याने कथालेखन केले. त्यांच्या या कथा वहिनी, रागिणी, प्रियंवदा, वीणा, वसुधा, जिप्सी, स्त्री, मनोहर, किर्लोस्कर, युगवाणी व नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाल्या. १९७५ पासून मात्र मौज, सत्यकथा, हंस, दीपावली, सा. सकाळ, अनुष्टूभ, मिळून साऱ्याजणी, तरूण भारत इ. नियतकालिकांमधून त्यांच्या कथांना नियमित स्थान मिळाले. किंबहुना सानियांमुळे ही नियतकालिके दखलपात्र ठरली. त्यांचा खास असा वाचकवर्ग १९७५ ते १९९० च्या काळात तयार झाला.

---

१. मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, १९८०, पृ. क्र. ९५

**सानिया यांचा अल्पपरिचय**

सानिया (सुनंदा कुलकर्णी, बालरामन)

जन्मतारीखः १० नोव्हेंबर १९५२

जन्मस्थळः सांगली

शिक्षणः एम. कॉम. (मुंबई विद्यापीठ)

मानवाधिकार कायदा पदविका, नॅशनल लॉ स्कूल

पत्ताः ४८८, १० वा क्रॉस,

सदाशिवागर, बंगलोर - ५६००८०

साहित्यप्रकारः कथा, कादंबरी, अनुवाद

पुरस्कारः राज्यशासन पुरस्कार, साहित्य परिषद पुरस्कार, वर्टी पुरस्कार, वि. स. खांडेकर स्मृती पुरस्कार

**सानिया यांची साहित्य संपदा**

**कथासंग्रह**

| कथासंग्रहाचे नाव | प्रकाशन संस्था | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|
| शोध | मौज प्रकाशन | १९८० |
| प्रतीती | मौज प्रकाशन | १९८९ |
| खिडक्या | विमल प्रकाशन | १९८९ |
| भूमिका | ज्ञानदा पब्लिकेशन्स | १९९४ |
| परिमाण | मॅजेस्टिक प्रकाशन | १९९६ |
| प्रयाण | ज्ञानदा पब्लिकेशन्स | १९९७ |
| त्यानंतर | नवचैतन्य प्रकाशन | २००२ |
| आपण आपले | नवचैतन्य प्रकाशन | २००३ |
| ओमियागे | राजहंस प्रकाशन | २००४ |
| अशी वेळ | मौज प्रकाशन | २०१० |
| पुन्हा एकदा | समकालीन प्रकाशन | २०१५ |

**कादंबरी**

| | | |
|---|---|---|
| स्थलांतर | मौज | १९९४ |
| आवर्तन | मौज | १९९७ |
| अवकाश | मौज | २००१ |

**ललितलेखन**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | वाटा आणि मुक्काम सहलेखन | मौज | २००९ |
| २. | प्रवास | राजहंस | २००९ |
| ३. | वाट दीर्घ मौनाची (शशी देशपांडे यांच्या दॅट लाँग सायलेन्स या इंग्रजी कादंबरीचा मराठी अनुवाद) | मेहता पब्लिकेशन्स | १९९६ |
| ४. | फुल खाणारी म्हातारी (भाषांतरित कथा) | मिळून साऱ्याजणी | ऑक्टो- नोव्हें २००० |

**नाटिका**

| | | |
|---|---|---|
| अर्थ-अनर्थ | सत्यकथा | ऑगस्ट १९८२ |
| लेणी | सत्यकथा | जून १९८२ |

**कविता**

| | | |
|---|---|---|
| अस्तित्व | सत्यकथा | नोव्हेंबर १९८९ |
| इंग्रजी कविता | मौज | नोव्हेंबर १९९६ |

**स्फुटकथा**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अलिप्त समांतर | सत्यकथा | नोव्हेंबर १९७६ |
| २. | एक पाऊल पुढे | राजहंस | ऑगस्ट १९९७ |
| ३. | ऋतूअंत | सत्वकथा | डिसेंबर १९७७ |
| ४. | ती | मॅजेस्टिक | सप्टेंबर १९७९ |
| ५. | पत्र | सत्यकथा | मार्च १९७८ |
| ६. | निरंतर | सत्यकथा | मार्च १९७७ |
| ७. | सखी | मिळून साऱ्याजणी | नोव्हेंबर २००१ |

**सानिया यांचे अन्य भाषांत अनुवादित झालेले साहित्य**

**हिंदी**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | सानिया की कहानियाँ | अनुवाद - अजीम | जागर साहित्य कलामंडळ, इस्लामपूर | २००० |
| २. | भूमिका | अनुवाद - राधा गिरीधारी | चंद्रलोक प्रकाशन, कानपूर | २००७ |

**कानडी**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | सानिया कथेगळु | अनुवाद - चंद्रकांत पोफळे | एम आर एल पब्लिशिंग हाऊस, बंगलोर | २००२ |
| २. | आवर्तन | अनुवाद - चंद्रकांत पोफळे | वर्षा एंटरप्रायजेस, बंगलोर | २००३ |
| ३. | अवकाश | अनुवाद - चंद्रकांत पोफळे | शक्ती प्रिंटर्स पब्लिशर्स, बंगलोर | २००५ |

**कथांचे अनुवाद हिंदी**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | पराभूत | दुर्गा हाकारे | केंद्रिय निर्देशालय वार्षिकी | १९७९ |
| २. | अर्थ | पद्मजा घोरपडे | समकालिन भारतीय साहित्य, सा. अकादमी (१९७९मधील सर्वोत्कृष्ट कथासन्मान) | १९९९ |
| ३. | प्रवास | अजीम | समकालिन भारतीय साहित्य, सा. अकादमी | १९९९ |
| ४. | वारसा | प्रतिभा मुदलिया | भाषा केंद्रिय हिंदी निर्देशालय | मे-जून २००० |
| ५. | वारसा | सुनीता कट्टी | म. प्रदेश राष्ट्रभाषा प्रचार समिती, भोपाळ | २००९ |

**उर्दू**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | वर्तमान | मोइउदीन उस्मानी | सबरस हैद्राबाद | १९९३ |
| २. | दुष्काळ | नईम इकबाल | कर्नाटक उर्दू अकादमी | २०१० |
| ३. | तिसरी मुलगी आणि आई | अजीम | राजस्थान सा. अकादमी उदयपूर | २०१० |

**गुजराथी**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | आकार | सुशीला जोशी | पुनर्जन्म | १९९१ |

**बंगाली**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | आकार | जगत देवनाथ | आधुनिक मराठी गल्प | १९९१ |
| २. | वारसा | जगत देवनाथ | प्रवास निजभाषे | १९९५ |

**इंग्रजी**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | गतजन्म | शिरीन कुडचेडकर | संयुक्त विमेन्स इनिशिपटिव्ह त्रिवेंद्रम, | २००३ |
| २. | त्यानंतर | माया पंडित | फाईव्ह नॉव्हेलस् बाय वुमन रायटर्स ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस | २००८ |

**जर्मन**

| | नाव | अनुवादक | प्रकाशन संस्था | वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | चार दिवस | नीती बडवे | इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स जर्नल | १९९६ |

सानियांचे कथाविश्व पुरुषप्रधान व्यवस्थेत आव्हान देणारे आहे. त्यांनी निर्मिलेली पात्रे परंपरेच्या चौकटी झुगारून देतात. सानिया यांची बहुतेक पात्रे पर्याय शोधण्यावर स्वतःचे आयुष्य स्वतः प्रयत्नपूर्वक बांधून काढण्यावर विश्वास ठेवतात. 'आयुष्य जगायचे ते स्वतःला हवे तसे' याचा उल्लेख त्यांच्या कथांमधून आढळतो. स्वतःला समजून घेतले तरच आपण जगाला समजून घेऊ शकतो यावर त्यांच्या पात्रांचा विश्वास आहे. अखंडपणे चलणाऱ्या या प्रक्रियेमधून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्यक्तीच्या आत्मशोधाची व परिवर्तनाची दिशा मिळते.

वेगळ्या वाटेवरून आत्मशोधाची अनुभूती घडवणाऱ्या सानिया यांच्या कथाविश्वाचा आस्वाद या प्रकरणात घेऊ या.

## संदर्भसूची

१. मराठी लेखिका चिंता आणि चिंतन, भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, १९८०, पृ. क्र. ९५

## ३.३ सानिया यांचे कथाविश्व

सानियांच्या कथाविश्वाचा विचार करताना प्रत्येक कथासंग्रहातील शीर्षककथा, मला भावलेल्या कथा व अन्य कथा असे वर्गीकरण केले आहे. सर्व कथांचा समावेश करून त्यातले वेगळेपण समजावे म्हणून असे वर्गीकरण केले आहे.

## अ. शोध

| | **कथेचे नाव** | **पूर्वप्रसिद्धी** |
|---|---|---|
| १ | शोध | सत्यकथा, फेब्रवारी१९७९ |
| २ | इंप्रेशन | सत्यकथा, सप्टेंबर १९७५ |
| ३ | रिच्युअल | सत्यकथा, दिवाळी १९७५ |
| ४ | अपरिहार्य | सत्यकथा, फेब्रुवारी १९७६ |
| ५ | फ्रेम | मौज, दिवाळी १९७५ |
| ६ | आतंक | संदर्भ, मे-जून १९७५ |
| ७ | क्वचित | सत्यकथा, दिवाळी १९७७ |
| ८ | रस्ते काळोखाचे | सत्यकथा, दिवाळी १९७६ |
| ९ | सुटका | सत्यकथा, सप्टेंबर १९७७ |
| १० | जन्म | सत्यकथा, जून १९७७ |
| ११ | मार्ग | सत्यकथा, डिसेंबर १९७६ |
| १२ | दोघी | सत्यकथा, मे १९७८ |
| १३ | रेषेपलिकडे | सत्यकथा, सप्टेंबर १९७८ |
| १४ | वळण | सत्यकथा, दिवाळी १९७८ |
| १५ | वाट वेगळी | हंस, जून १९७८ |
| १६ | ओळख | सत्यकथा, डिसेंबर १९७८ |
| १७ | पराभूत | सत्यकथा मे १९७९ |

**अ. १. – शीर्षक कथा**

**अ. २. – मला भावलेल्या कथा**

**अ. ३. – अन्य कथा**

**अ. ४. – समारोप**

**अ. ५. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

मनात येणारे सगळे विचार एकसंध कुठे असतात एकाच वेळी भावनांचे कल्लोळ उठत असतात. या सगळ्या विचारांना भावनांना विसंगतपणे पण जसेच्या तसे मांडणे तेही कथारूपात हे इतके सोपे नाही. 'शोध' या कथासंग्रहात सानियांनी अशाच कथा लिहिल्या आहेत. कथांचे वेगळे आकृतीबंध या कथासंग्रहात आढळतात. 'शोध' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. या कथासंग्रहातील अनुभवविश्व पुढील काळातील कथासंग्रहातील अनुभवविश्वापेक्षा कितीतरी पटीने अधिक अमूर्त, धूसर आहे. व्यक्तिचित्रणाच्या रंग रेषाही फिकट व तुटक आहेत. निवेदनाची भाषा एकसुरी वाटते. या कथासंग्रहातील कथांना सत्यकथा, मौज, संदर्भ, हंस या मासिकांमधून पूर्वप्रसिद्धी मिळाली आहे.

शोध या कथासंग्रहाचे प्रकाशन मौज प्रकाशन गृहाच्या प्र. पु. भागवतांनी मार्च १९८० मध्ये केले आहे. या कथासंग्रहाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीने मंडळाने अनुदान दिले होते. कदाचित त्यामुळेच या कथासंग्रहाची किंमत बारा रूपये होती. या कथासंग्रहात १७ कथांचा समावेश आहे. मुखपृष्ठ पद्मा सहस्त्रबुद्धे यांनी रेखाटले आहे.

**अ. १. शीर्षककथा**

**शोध**

माणसाच्या जीवनात शोध ही अशी प्रक्रिया आहे जी निरंतर चालूच राहाते. एका सुखाचा शोध घेऊन ते मिळाले की माणूस नकळत दुसऱ्या सुखाकडे धावतो. सुख, आपल्याला हवीहवीशी वाटणारी व्यक्ती, मान-मरातब, पैसा या सगळ्याचा शोध चालूच असतो. या कथेतील मनू त्याच्या प्रेयसीचा शोध घेतो. निर्मल नावाच्या बालमैत्रिणीत तो पूर्णपणे गुंतलेला असतो. पण निर्मल विनायक नावाच्या सुंदर मुलावर प्रेम करते आहे असे त्याला कायमच वाटत असते. त्यामुळे मनूला तिच्यासमोर कायम अपमानास्पद वाटत असते. वयात आल्यापासून निर्मल या एकाच परस्त्रीला त्याने पाहिले असते अनुभवले असते. त्यामुळे निर्मलविषयी त्याला सुप्त आकर्षण असते. पण त्याच्या आईला ती नको असते.

मनू कॉलेजमध्ये शिकवत असतो. तेव्हा माधवी नावाची विद्यार्थिनी त्याच्या प्रेमात पडते. तिची आई चांगल्या वळणाची नसल्याने तीही चांगली नसावी अशा वावड्या लोकांनी उठवलेल्या असतात. पण माधवीच्या विलक्षण डोळ्यांनी मनू भारावून जातो. माधवीच्या प्रेमाला होकार देतो. ते दोघे लग्नही करतात. आई खुष होते. पण

त्याच्या लग्नानंतर निर्मलचे येणे-जाणे कमी होते. नंतर एके दिवशी माधवीला निर्मल सांगते विनायकची तिला कधी पत्रे आलीच नव्हती आणि तो तिला ओळखत नाही भेटणे तर दूरच. ते सगळे भासच होते. तेव्हा मनूची अवस्था विचित्र होते. आत्तापर्यंत प्रेम या भावनेमध्ये निर्मलने पराभव केला. माधवीने निर्मलसकट त्याला समजून घेतले म्हणजे तिनेही पराभवच केला. इथे त्याचा अहंकारच त्याला त्रास देतो. नंतर निर्मल स्वतःला पेटवून घेते. कारण ती तिच्या आईसारखीच मनोविकारांनी ग्रस्त असते. माधवीबरोबर संसार करतानाही मनू तिच्यासोबतच्या सुखाचा शोध घेतो. नवीन असते ते सगळे लवकरच सवयीचे होते आणि आपण पुन्हा काही निराळ्या गोष्टीची वाट पहातो. शोध घेतो. हाच आशय या कथेतून व्यक्त होतो.

### अ. २. मला भावलेल्या कथा

#### १) वळण

भावा बहिणीच्या नात्याची एक वेगळया वळणाची कथा अर्थात 'वळण'. एखाद्याचे भले व्हावे असा प्रामाणिक उद्देश मनात ठेवूनही त्या व्यक्तीच्या आयुष्याला चुकीचे वळण लावण्यात आपलाच हात असावा अशी व्यथा मांडणारी ही कथा. कृष्णा आणि राघव या बहिण भावंडांची ही कथा आहे. आई वडिलांच्या निधनानंतर कृष्णेची जबाबदारी घेऊन राघव तिला स्वतःबरोबर घेऊन जातो. गावात उगीच इकडे तिकडे भटकणारी कृष्णा शहरातल्या वातावरणाशीही लगेच जुळवून घेते. वास्तवात प्रवेश केल्याने ती सुंदर दिसू लागते. राघव तिच्याबरोबर लग्न करण्याचा निर्णय घेतो. कारण तिचे आयुष्य मार्गी लावल्याने श्रेय त्याला मिळवायचे असते. पण कृष्णाचे एका दुसऱ्या जातीतल्या मुलावर प्रेम असते. राघवचा त्याला विरोध असतो. कृष्णा पळून जाते पण त्या मुलाकडे नाही. परत आल्यावर राघवने सांगितलेल्या माणसाशी ती लग्न करते. पण सहाच महिन्यात तिला तो पुन्हा घरी आणून सोडतो. त्यानंतर ती एका मुलाला जन्म देते. दोन मुली असणाऱ्या थोडया प्रौढ माणसाशी ती लग्न करते. तिचा आणि तिच्या मुलाचा भार राघववर नको आणि राघवच्या चुकीची सल त्याला आयुष्यभर बोचत राहावी यासाठीच ती या वेगळ्या वळणावर जाण्याचा निर्णय घेते. लांब कोंदट अशा माणसांनी भरलेल्या या घरात नवऱ्याच्या निधनानंतरही कृष्णा तोंडातून शब्दही न काढता संसार करते. हे सगळे पाहून राघवला मात्र कायम अपराधी वाटते. या अवस्थेला आपणच कारणीभूत असल्याची खंत त्याच्या मनात असते. मनाविरूद्ध आयुष्याला वेगळे वळण

लागूनही कांगावा न करता सहन करून जीवन जगणारी कृष्णा वेगळी तर आहेच. पण तिचे सगळे वागणे अनाकलनीय वाटते.

## २) रेषेपलीकडे

आपल्या आयुष्यात बऱ्याचशा गोष्टी, आपण एखाद्या गोष्टीकडे कशा पद्धतीने बघतो, त्यावर अवलंबून असतात. आजूबाजूचे सगळे चांगले किंवा वाईट वाटणे हे आपल्यावरच अवलंबून असते. त्यासाठी आपणच आपल्या मनानी ठरवलेल्या रेषेपलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. असाच रेषेपलीकडचा विचार या कथेतील चारू करते. त्यामुळे मरगळलेल्या निराश झालेल्या तिच्या मनाला नवी उभारी मिळते. चारू आणि शंतनू हे जोडपे दहा वर्षे संसार करूनही मनाने जोडले गेलेले नसते. शंतनूच्या आयुष्यात चारूपेक्षा काकणभर हुशार समजुतदार आणि सुंदर अशी सरिता येते. सरिताशी संबंध असणारे शंतनू कधीही लपवत नाहीत. चारू घरात असली किंवा नसली तरी सरिता त्या घरात अगदी मनमोकळेपणाने वागत असते. श्रीरंग नावाच्या एका युवकाशी चारूची मैत्री होते. ते दोघे एकमेकांशी मोकळेपणाने वागू लागतात. पण एकदा श्रीरंग अचानक त्याच्या गावी निघून जातो आणि लग्नही करतो. बऱ्याच दिवसांनी मनमोकळेपणाने जगावे असे वाटून चारू श्रीरंगच्या गावी जाते. तिथल्या वातावरणाने ती ताजीतवानी होते. पुन्हा आपल्या स्वतःच्या घरी आल्यानंतर सरिताला घरात पाहून ती निराश होते. सरिता मात्र अगदी मोकळी ढाकळी वागते. शंतनूच्या वागण्यातही कसलाही ताण नसतो. सरितेच्या मोठेपणामुळे चारू दिपून जाते. तिच्याबददलचा दृष्टीकोन बदलून रेषेपलीकडे जाऊन चारू विचार करते. त्यामुळे तिचेच आयुष्य तिला आशादायी वाटू लागते.

## ३) वाट वेगळी

प्रत्येकाने आपला असा जगण्याचा एक मार्ग ठरवलेला असतो. त्या रस्त्यापेक्षा वेगळे काही करण्याची संधी येते. ती थोडी आवडते सुखावते देखील. पण मग लक्षात येते की आपण ठरवलेली वाटच वेगळी आहे आणि योग्य आहे. या कथेत प्रभा ही एक महत्वाकांक्षी स्त्री या कथेची नायिका आहे. आपण जसे आहोत तसेच चांगले आहोत अशी विचारांची बैठक असणारी अशी प्रभा आहे. नोकरी करून स्वतंत्र राहाणे कोणाचेही दडपण न घेणे असा तिचा स्वभाव असतो. तिच्या स्वतंत्र विचारांमुळेच तिचे कोणाशीही फारसे पटत नसते. लग्न हा विषय तर तिच्यापासून लांबच असतो. या वेगळ्या वाटेवर ती

तिच्या इच्छेने चाललेली असते. घरातल्या आग्रहानेही ती स्वतःमध्ये बदल करत नाही. स्वतःचा स्वतंत्र कारखाना असणाऱ्या रावचे स्थळ प्रभासाठी आणले जाते. प्रभापेक्षा थोडा लहानसर दिसणारा राव तिला आवडू लागतो. प्रभा त्याच्याशी लग्न करायलाही तयार होते. कधीही कोणाही बाबत उतावळी न झालेली प्रभा रावची वाट पाहू लागते. आश्चर्य म्हणजे तिची रात्रीची झोपही उडते. स्वतःमधला हा बदल तिला विचित्र वाटतो. पण तो बदल नैसर्गिक रितीने झाला आहे म्हणून ती स्वीकारते. दरम्यान बऱ्याच दिवसात राव तिला भेटत नाही. तिची बहीण वसंती घरी असताना राव येत असतो. एक दिवस रावला भेटायला ती जाणार असल्याचे प्रभा वसंतीला सांगते. तेव्हा ती प्रभाला असे सांगते की रावला प्रभा महत्वाकांक्षी वाटते. तिच्याशी लग्न करून त्याची घुसमट होईल. प्रभा नसताना राव जेव्हा घरी येतो तेव्हा वसंती त्याला आवडू लागते. राव वसंतीला लग्नाविषयी विचारतो. या बोलण्यावर वसंतीला हळूवार हसताना आणि लाजताना प्रभा बघते. हे लाजणे वगैरे आपल्या आवाक्याबाहेरचे आहे असे वाटून आलेल्या प्रसंगाला ती हसतमुखाने सामोरी जाते. ''वसंती अंधारातदेखील फुलासारखी हळूवार हसल्या लाजल्याची जाणीव प्रभाला झाली. ही जाणीव आपल्या अगदी स्पर्शाबाहेरची झालेली आहे हे लक्षात येऊन प्रभा दिवा लावण्यासाठी उठली. नंतर घर प्रकाशाने भरून गेल्यावर तिला पुष्कळ मोकळे आणि खंबीर वाटले.''[२]

## ४) **मार्ग**

एखादा मोठा निर्णय घेताना नेमका कोणता मार्ग निवडावा याबाबत कधी कधी साशंकता निर्माण होते. प्रत्येकाचा दृष्टीकोन वेगवेगळा असल्याने तो मार्गही वेगळा असतो. गरज असते ती आपण ठरवलेल्या मार्गावर चालण्याची. या कथेची नायिका शांती असाच एक मोठा संथ अपर्यायी असा शेवट असलेला मार्ग ती निवडते. शांतीचा नवरा निखिल गेले कित्येक महिने हॉस्पिटलमध्ये अंथरूणाला खिळून असतो. तो लवकर बरा होणार नाही किंबहुना कधीच बरा होणार नाही ते तिला कळलेले असते. असे असतानाही ती आपला आशावाद सोडत नाही. विजय नावाचा पेईंग गेस्ट तिच्या घरात राहात असतो. तो फोटोग्राफर असतो. कामे मिळेपर्यंत त्याला आसऱ्याची गरज असते. म्हणून शांती विजयच्या आग्रहाखातर त्याला जागा देते. विजय तिच्याशी निखिलच्या आजारपणाविषयी स्पष्ट बोलतो तो कधीच बरा होणार नाही हे सत्य तिने स्वीकारावे

२. वाट वेगळी, शोध, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १८६

असे त्याला वाटते.  पण शांतीच्या ठाम निश्चयापुढे तिच्या निखिलवरच्या प्रेमापुढे त्याचे विचार फोल ठरतात.  शांतीला अधिक त्रास होऊ नये म्हणून तो तिचे घर सोडून जाण्याचा मार्ग निवडतो.  निखिलबाबत डॉक्टर तिला सांगतात की त्याचे शेवटचे दिवस हॉस्पिटलमध्ये जाण्यापेक्षा घरी गेलेलेच बरे.  त्यामुळे शांती निखिलला घरी आणण्याचा निर्णय घेते.  आपण निवडलेल्या मार्गावर ठामपणे चालते.  आपले स्वतंत्र विचार जपणारी शांती प्रेरणादायी वाटते.

### ५) फ्रेम

फ्रेम म्हणजे चौकट.  चौकट म्हणजे ठराविक असे तेच ते रूटीन.  रोज वेगळे काही घडत नाही आणि घडावे असे वाटत नाही असे जे म्हणजे फ्रेम.  या कथेतली कल्याणी, (लहान कल्याणी) लहानपणापासून थोडीशी दुरावलेली असते.  त्यामुळेच आयुष्यावर सूड उगवणारी.  सुमंत तिला वडिलांसारखा असतो.  तिच्या आईचे आणि वडिलांचे संबंध ताणलेले असतात.  सुमंत तिच्या आईच्या अडीअडचणीला मित्र म्हणून उभा राहातो.  कोणत्याही अपेक्षेशिवाय तिच्यासाठी खूप काही काही करतो.  याचे ओझे कल्याणीच्या मनावर असते.  म्हणून सुमंत आजारी असताना ती त्याला स्वतःच्या घरी घेऊन येते.  पण ती अतिशय कोरडेपणाने कडवटपणे त्याच्याशी वागते.  मध्येच कधीतरी त्याला डॅडी म्हणते.  कल्याणीसारख्या तरूण, उत्साही आणि उमलणाऱ्या मुलीने आनंदी राहावे त्याच फ्रेममध्ये स्वतःला अडकवू नये असे त्याला मनापासून वाटते.  कितीतरी बांधलेले मार्ग प्रगती थांबवतात.  न तुटणाऱ्या अशा फ्रेम्समध्ये अडकवून टाकले की सुटका होत नाही.  कल्याणीच्याच दृष्टीकोनामुळे तिचे आयुष्य फ्रेममध्ये अडकते.  या सगळ्याचा तिला उबग येतो.  श्रीनिवासशी तिची मैत्री होते.  त्याला तिच्या कर्तृत्वाबद्दल आदर वाटतो.  पण प्रेम नाही.  तो लग्न मीराशी करतो.  या सगळ्यामुळे ती अधिकाधिक रूक्ष होते.  तिला वाटते की, माणसामाणसात खूप अंतर असते.  कमी करायचा प्रयत्न केला तर वाढावे इतके अंतर असते.  शेवटी कितीही प्रयत्न केला तरी हातात काही येत नाही.  आहे त्याच जागी प्रत्येक गोष्ट राहाते.  सुमंतला तिचे असे अडकणे आवडत नाही. कारण आपल्याला आवडणाऱ्यांचे पराभव पहाणे नको वाटते.  आपल्यावर कळत नकळत दोष आल्यासारखे वाटते.

## ६) क्वचित

क्वचित म्हणजे अवचित. कधीतरी क्वचितच एखादी व्यक्ती मनापासून आवडते. तिचे दोष, दुर्गुण स्वीकारून खरे प्रेम करावेसे वाटते. त्या व्यक्तीला आपल्याविषयी जराही आपुलकी नाही हे माहीत असूनही जीव जडतो. या कथेत पूनमीवर असे निर्व्याज प्रेम करणारा कनू आहे. रॉय ह्या त्याच्या मित्राच्या मदतीने त्याची आणि पूनमीची ओळख होते. पूनमीच्या शांत, स्थिर व अथांग डोळ्यांमध्ये तो विरघळून जातो. समाजातल्या किंचित पराभूत व खचलेल्या लोकांना शारिरिक सुख देऊन त्यांना आधार देण्याचे काम पूनमी करत असते. हे सगळे करताना ती विलक्षण अलिप्त असते. तिच्या बोलण्यातून कनूला असे समजते की रॉयवर सूड उगवण्यासाठी ती हे सगळे करत असते. कनू मात्र तिला इतर पुरुषांपेक्षा वेगळा वाटतो. तरीही ती त्याच्यात अडकत नाही. पूनमी आणि कनूची ओळख करून देण्यापूर्वीच रॉयने त्याला तिच्याविषयी, तिच्या अलिप्त स्वभावाविषयी सांगितलेले असते. पूनमीच्या संपन्न घराची वाताहात झाल्याने ती हे जग निवडते. घर, स्थैर्य आणि सगळ्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्याइतक्या समाधानाची वाट पहात राहणे हे तिच्या आयुष्याचे ध्येय बनते. कनूने निरपेक्ष प्रेम करूनही तिचा न गुंतण्याचा निर्णय कनूला तिच्यापासून लांब नेतो. रॉयवर सूड उगवण्यासाठी तिने स्वीकारलेला रस्ता तिला आजारपणाकडे घेऊन जातो. कुणावर तरी दबलेला सूड उगवण्यात आपण कनूला वापरतोय याची खंत तिला पोखरते.

## ७. रस्ते काळोखाचे (अलिप्त)

शोध या कथासंग्रहातील स्वतंत्र विचारांच्या खंबीर नायिकेची ही कथा आहे. आपल्या आयुष्याच्या प्रवासात खडतर काळातही आपला मार्ग आपल्यालाच शोधावा लागतो. अगदी आपली आपली म्हणणारी माणसेदेखील साथ देतीलच असे नाही. या काळोख्या रस्त्यावर आपणच आपला आधार होऊन वाटचाल करावी लागते. काही लोक वेगवेगळ्या वळणांवर भेटतातही पण आयुष्यभर साथ देतीलच हे सांगत येत नाही. एकदा मोडलेला डाव परत मांडता येईलच असे नाही. या कथेतील इलाच्या बाबतीतही असेच होते. माणसं कपटी स्वार्थी झाली तरी नात्याचा आदर का ठेवत नाहीत. हा प्रश्न तिला सतावतो. यशला ती भरभरून प्रेम देते. पण त्या सगळ्यातून जे ती देऊ शकत नाही त्या गौण गोष्टीच तो लक्षात ठेवतो. दिलेल्या इतर कशाचाही उल्लेख न करता तिचा सहवास भोगून कौमुदीशी लग्न करण्यात त्याला गैर वाटत नाही. तपन बॅनर्जी हा तिचा

बॉस.  त्यालाही इलाकडून काही गोष्टी हव्यात पण तो सावध असतो.  सहज मिळाले तर चालेल असा पवित्रा घेऊन तो तिच्याशी बोलत असतो.  कौशलने तिला कधीही हाक मार असे सांगितलेले असते.  पण हाक मारताना आपणही निरिच्छ, निःस्वार्थी राहू शकत नाही हे तिच्या लक्षात येते.  तो तरी असा निरपेक्ष असेल का असा विचार करून कौशलला लिहिलेले पत्र ती फाडून टाकते.  माणसे क्षणार्धात शब्दाशब्दावर विश्वास ठेवून बदलत असतात आणि ज्यावेळी खरी शब्दापलीकडची गरज असते तेव्हा लांब जातात. या अनुभवातून इला या काळोखाच्या रस्त्यावर एकटीनेच चालण्याचा निर्णय कथेच्या शेवटी घेते.

### ८)  जन्म

आत्मविष्कार घडल्याची जाणीव झालेली एक वेगळी कथा म्हणजे 'जन्म'. आपल्याच आत दडलेल्या 'मी' शी साधलेला संवाद म्हणजे जन्म.  रोज नव्या जाणीवा जगणारी ती या कथेची नायिका आहे.  त्या जाणीवांच्या रोज नव्या जागा आहेत. एकीकडून थारा मिळेनासा झाला की दुसरीकडे याप्रमाणे अर्धवट तुटलेल्या माळांसारखे विचार तिच्या मनात येतात.  हे सगळे कोणाला तरी सांगण्याची अदभूत उर्मी मनात दाटते.  पण  तीही दबलेली असते.  सांगू की नको या भूमिकेतही मग मनानेच निर्माण केलेल्या  भासमय व्यक्तीच्या  मनातल्या  गोष्टी  जाणून घेण्याचा आग्रह मन करते. त्याला काही सांगू नये असे म्हणणारे मन.  पण त्याच्याच आग्रहाखातर सांग म्हटल्यावर सगळे सांगितल्यानंतरही काहीही  न  समजलेला तो.  पण  मनातले सगळे सांगितल्याने स्वतःच्याच सामर्थ्याची जाणीव होऊन पूर्वीची खंत वाटेनाशी झालेली ती.  समोरच्याला समजो न समजो मनातल्या विचारांना वाट मोकळी करून दिल्याने स्वतःचेच स्वतःला जाणून घ्यायला मदत होते.  हा अनुभव म्हणजे जन्म.  उलट तिच्या मनातले विचार जाणून  घेण्याची  ऐकणाऱ्यात कुवत नाही.  ही  जाणीव झाल्याने तिला हर्ष होतो.  कथेची नायिका 'ती' आहे.  ती आपल्या सगळ्यांमध्ये आहे.  असा आत्मविष्कार आपल्यापैकी सगळ्यांना होतो.  गरज आहे हा जन्म अनुभवण्याची.  जाणीवेपासून नेणीवेपर्यंतचा हा प्रवास सानियांनी प्रचंड ताकदीने मांडला आहे.

### ९)  ओळख

एखाद्या व्यक्तीशी ओळख होईपर्यंत वाटणारे आकर्षण ती व्यक्ती प्रत्यक्ष भेटल्यावर

तसेच राहील असे नाही. उलट ओळख झाल्यानंतर भ्रमनिरास होण्याची शक्यता जास्त असते. या कथेत एक लेखक आणि वाचक यांची लेखनातून झालेली ओळख आणि प्रत्यक्ष झालेली ओळख यातील तफावत दाखवली आहे. सलग तीन वर्षे ज्या ओढीने एक वाचक म्हणून रेणूका जयवंतला लेखकाला पत्र लिहिते. त्याचे लिखाण वाचल्यानंतर जी ओढ वाटते ती प्रत्यक्ष भेटीत वाटत नाही. जयवंतचे लिखाण तिला खूप खरे, रसरशीत, दुःखाचे कढ दाखवणारे वाटत असते. स्वतःच्या आयुष्यात घडलेल्या दुःखी घटनांमुळे ती जयवंतच्या कथांमध्ये खूप रमते. लग्न करून नवऱ्याच्या घरी आल्यानंतर तिला नवऱ्याच्या महत्वाकांक्षी असण्याची जाणीव होते. त्या महत्त्वाकांक्षेपुढे नवरा या नात्याने तो रेणूकेशी कधी वागतच नाही. शेवटी स्वतःचे ध्येय गाठण्यासाठी तो तिला सोडून जातो. हे दुःख तिने जगापासून लपवलेले असते. जयवंतच्या आग्रहानंतरही ती उघडपणे मनातले दुःख सांगत नाही. ज्या जयवंतला ओढीने इतकी भराभरा पत्र लिहिली. तो जयवंत समोर आल्यानंतर त्याच्या भेटीनंतर ती अस्वस्थ होते. त्याची भेट झाल्यानंतर तिच्या एक लक्षात येते की त्याची ओळख होऊन आपल्याला जितका आनंद व्हायला हवा त्यापेक्षा कितीतरी जास्त आनंद जयवंतलाच झाला आहे.

### अ. ३. अन्य कथा

प्रत्येक लेखकाचा त्याच्या लिखाणामागे काहीतरी अंतरिक हेतू असतो, प्रेरणा असतात. याविषयी सानिया म्हणतात, ''आपल्याला अमुक एक समजले आहे आणि दुसरे तितकेसे न समजल्याने त्याबद्दल प्रश्न पडत राहातात. मग त्यांची उत्तरे काय असावीत त्या वाटांचा शोध घ्यावा. हा आंतरिक प्रवास यामुळेच रचावेसे वाटत गेले.''[३]

या आंतरिक प्रवासातूनच सानियांच्या कथा तयार झाल्यात. समजणे आणि न समजणे या मानसिक अवस्थेतून त्या लिहिल्या गेल्या आहेत. अशाच काही कथांचा आढावा अन्य कथांमध्ये घेता येईल.

### १) इंप्रेशन

आत्मसंवादी कथा या कथा-प्रकारातली ही कथा आहे. कथा लिहिण्याचा एक वेगळाचा बाज या कथेतून अनुभवायला मिळतो. थोडीशी अनाकलनीय अशी ही कथा

३. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ३

मनाशी चाललेले संवाद व वास्तव यांची सांगड घालते. पण या दोन्हीचा संबंध असेलच असे नाही हे देखील सांगते. कथेमध्ये प्रत्येक पानावर 'ती' च्याविषयी त्रयस्थपणे एकेक परिच्छेद लिहिला आहे.

कित्येकदा एखाद्या व्यक्तीचे, गावाचे, ठिकाणाचे पहिले इंप्रेशन (प्रभाव) जे होते तेच शेवटचे ठरते. प्रत्येकाची जगण्याची, जीवनाकडे बघण्याची दृष्टी वेगळी असते. एखादी गोष्ट, स्थिती, व्यक्ती काही केले तरी आवडत नाही. या कथेत ती मन्नूच्या म्हणजे होणाऱ्या नवऱ्याच्या गावी येते. त्या शहराची आणि त्याच्या घराची ओळख व्हावी म्हणून. लग्नासाठी होकार देण्याआधी सगळे तपासून घेण्यासाठी. फार विचित्र काहीही नसताना तिला मात्र ते काहीच आवडत नाही. मन्नूच्या मोठ्या बहिणीची मुकी-बहिरी मुलगी, त्याची दुसरी बहिण रमा, तिची चित्रे, ते घर, तिथला परिसर हे सगळे आवडूनही तिचे मन मन्नूशी लग्न करायला तिला परवानगी देत नव्हते. तिच्या मनात या सगळ्याविषयी एक इंप्रेशन तयार होते. कुठलाही भावनिक शेवट अदृश्य होण्यासाठीच असतो. त्याप्रमाणे मन्नू आणि त्याच्या जगला नकार देऊन ती गाडीतून निघून जाते. भावनांची गुंतवणूक दाखवण्याचा एक वेगळा प्रयत्न कथेत केला आहे. गाण्याची रेकॉर्डस, मुकी-बहिरी पण हसरी मुलगी, मीना कुमारीचा उदास पण सुंदर फोटो, रमाची घुसमट, जांभळी फुले असलेला पडदा, क्लब हाऊस, दंगल या सगळ्याचा वापर करून कथेतल्या पात्रांची मनःस्थिती दाखविण्याचा एक वेगळा प्रयत्न सानिया यांनी केला आहे. कथासूत्र अल्पजिवी आहे. पण त्याची मांडणी वेगळी केली आहे.

## २) रिच्युअल

कथालेखनाचा आणखी एक वेगळा प्रकार म्हणजे 'रिच्युअल'. आपल्याच मनाशी, 'स्व'शी पत्राच्या माध्यमातून साधलेला संवाद म्हणजे ही कथा. रिच्युअल म्हणजे परंपरा. या कथेपुरती "मनाची कसलीही चलबिचल होऊ द्यायची नाही." ही परंपरा आहे. नात्यांना महत्त्व न देता आपल्याच मताशी ठाम असणारी सुमित्रा या कथेची नायिका आहे. शिरिष नावाच्या संवेदनशील लेखकावर तिचे प्रेम असते. पण तिचे वडील लग्न होऊ देत नाहीत. कारण त्याच्याबरोबर ती सुखी राहू शकणार नाही असे त्यांना वाटत असते. स्वतःच्या मनासारखे मुक्तपणे जगणाऱ्या सुमित्राला कोणतीही तक्रार न करता शांतपणे राहाण्याच्या परंपरेत सुमित्राला अडकावे लागते. वसुदेवशी लग्न न झाल्याने तर ती या परंपरेची पाईकच बनते. रोहिणीला जन्म दिल्यानंतरही तिच्यात

बदल होत नाही. संवेदनशील मनाची सुमित्रा कोरडी होते. रोहिणीचा आणि तिचा जन्म देण्यापुरताच संबंध उरतो. जन्म दिल्यानंतर वसुदेवची आईच तिला सांभाळते. सुमित्रा करिअरमध्ये स्वतःल गुंतवते. वसुदेवही तिच्याशी कोरडेपणानेच वागत असतो. तो त्यांना सोडून जर्मनीला निघून जातो. रोहिणीला सुमित्रा हॉस्टेलवर ठेवते. ऑफिसमधले बॉस विश्वेश्वर प्रसाद, सहकारी अशोकन, अनिल या कोणातही ती कधीच अडकत नाही. अशोकन आणि कामाक्षीला झालेले बाळ हातात घेताना तिल खूप विचित्र वाटते. स्वतःच्या मुलीलाही तिने कधी हातात घेतलेले नसते. सुमित्राला इतका कोरडेपणा का येतो या प्रश्नाचे उत्तर या कथेत मिळत नाही. कदाचित पहिले हळवे प्रेम निसटल्याने ती अशी झाली असेल का? स्वतःच्या मनापासूनही ती किती दुरावली आहे हे तिने लिहिलेल्या पत्रावरून कळते. तिचे हळवे मन कोपऱ्यात तसेच आहे पण व्यवहारामध्ये कोरडेपणाने वागते.

## ३) अपरिहार्य

माणसाच्या आयुष्यात काहीही पर्याय नाही. अशा काही गोष्टी असतात, व्यक्ती असतात. त्या व्यक्तींमुळे वाट्याला आलेली सुख-दुःखं ही अपरिहार्य असतात. रघुवीर, ती आणि मीनाक्षी या त्रिकोणाची ही कथा आहे. एकमेकांची एकमेकांच्या आयुष्यातली अपरिहार्यता कळूनही, काहीही न करण्याची अपरिहार्यता या कथेत दिसून येते. माणसामाणसातील खोल नाती अधिक अर्थगर्भ करण्यात अशी वेळ येते की काही उरतच नाही. नुसते मनस्ताप आणि अपेक्षाभंग, बघता बघता आपण सामान्य पातळीवर येऊन पोहोचतो. अशी वेळ येते की सहन करण्याची ताकद संपून गेल्याप्रमाणे जीव द्यावासा वाटतो. मीनाक्षीची अशीच अवस्था या कथेत वर्णन केली आहे. मीनाक्षी नैराश्यातून हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते. तिथे तिचा मृत्यू होतो. रघुनाथ आणि तिचे बंध जुळूनही ते अधुरे राहातात. ते एकमेकांजवळ राहूनही अनोळखीच राहातात. कथेमधली प्रथमपुरुषी एकवचनी नायिका आणि रघुवीर यांना मीनाक्षीच्या मृत्युनंतर अशी जाणीव होते की तिला समजून घ्यायला हवे होते. संधीच न मिळणे ही आयुष्याची खरी दारूण आणि दुःखी शोकांतिका या कथेत मांडली आहे. कथा लिखाणाचा वेगळेपणा हे कथेचे वैशिष्ट्य असले तरी दुर्बोधता हा कथेचा दोष वाटतो.

### ४) आतंक

काहीतरी मिळवण्यासाठी आतंक केला जातो किंवा संकटातून सुटका करून घेण्यासाठीही आतंक केला जातो. आतंक म्हणजे आटापिटा, प्रयत्न करणे. या कथेतील नायिका संकटातून सुटका करून घेण्यासाठी आतंक केला जातो. एस. टी.च्या प्रवासातून कथेची सुरूवात होते. ते दोघे म्हणजे राम आणि ती नेमके कुठे आणि का चालले आहेत या प्रश्नांची उत्तरे कथेत मिळत नाहीत. पण सानियांच्या कथांच्या वैशिष्ट्याप्रमाणे तिचा मनोव्यापार या कथेतही उलगडलेला दिसून येतो. एस.टी.चा लांबच्या लांब कंटाळवाणा प्रवास, बाहेर पडणारा पाऊस, पावसामुळे व अंधारामुळे झालेली कोंडी, राम हा म्हटले तर ओळखीचा पण तशा अनोळखी पुरुषाबरोबर एका सीटवर बसणे तिला अवघड जाते. या आणि अशा मनाशी निगडीत संकटाशी झुंज देताना तिचा होणारा आतंक कथेत मांडला जातो. राम खेड्यात राहिलेला. प्रतिकूलतेवर मात करून यश मिळवलेला तरूण असतो. त्याच्यावर अविश्वास दाखवावा असा तो अजिबातच नाही. तरीही त्या विचित्र परिस्थितीत सापडल्याने तिला खूपच असुरक्षित वाटत राहाते. ती भयाण रात्र, पावसाचे थैमान, गाडी नक्की कुठे आहे न समजणे, इच्छित स्थळी केव्हा पोहोचणार याबददलची अनिश्चितता, एस. टी.तून खालीही न उतरता येण्याची असहाय्यता, थोडा वेळ खाली उतरून गेल्यानंतर झालेले ओंगळवाणे स्पर्श या सगळ्याचा उबग आलेली ती, यातून सुटण्याचा आतंक करणारी ती 'आतंक' मध्ये आहे. कथेचा निवेदक कथांतर्गत आहे.

### ५. सुटका

एखादी व्यक्ती जवळ असताना तिची जबाबदारी पेलणे नकोसे होऊन जाते. त्यातही ती व्यक्ती जर अपंग किंवा अकार्यक्षम असेल तर त्या व्यक्तीचे आयुष्यात असणे तापदायक होते. स्वतःच्या वैयक्तिक आशा-आकांक्षांचा बळी देऊन सांभाळ करावा लागत असल्यास त्या व्यक्तीपासून सुटका कधी होईल याचा वाट पाहिली जाते. पण खरेच जेव्हा अशी सुटका होते तेव्हा मात्र कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण होते. 'सुटका' या कथेत रेवतीच्या आयुष्यात शिनूच्या जाण्याने पोकळी निर्माण होते. रेवती, दमयंती आणि दमयंतीचा भाऊ शिनू अशी पात्रे या कथेत आहेत. शिनू लहानपणापासूनच अपंग असतो. त्यामुळे रेवतीलाच त्याचे सर्व काही करावे लागे. दमयंती लग्न करून नवऱ्याच्या घरी गेल्याने शिनूच्या जबाबदारीतून तिची कायमच सुटका होते. पण रेवतीला नोकरी आणि शिनू या जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतात. तिची यातून सुटका होत नाही.

लहानपणापासूनच स्वतःच्या आयुष्यात काहीतरी चुकत गेल्यासारखे तिला वाटत असते. शिनूच्या जबाबदारीतून सुटका करून घेण्यासाठी औषधाचा जास्तीचा डोस देण्याविषयी सुचवले होते. पण तिने हे कधीच मान्य केले नाही. एके दिवशी अचानक शिनू ज्या गाडीत बसलेला असतो त्या गाडीला अपघात होतो आणि शिनू मरतो. तेव्हा ही दमयंती रेवतीची काळजी संपली असे म्हणते. पण सुटका होऊनही शिनूच्या नसण्याने रेवती अस्वस्थ होते. सुटका हवी असते आणि सुटकेला मन घाबरते अशी एक विचित्र अवस्था रेवतीची होते. रेवतीच्या मनातला संघर्ष या कथेत दिसून येतो.

## ६) दोघी

दोन बहिणींची कथा म्हणजे दोघी. एका खिडकीतून दोघींच्या दृष्टिकोनाची वेगवेगळी परिमाणे दिसतात. निरूपमा हट्टाने लग्न करते. पहिले काही दिवस बरे जातात. पण तिचा नवरा तिला सोडून परदेशात जातो. त्यावेळी तिची सासुदेखील तिच्याशी तुटकपणे वागते. सुरूवातीचे काही दिवस त्याची तिला पत्रे येतात. ती पत्रे निरूपमा सईला दाखवायला घेऊन जाते. पण कालांतराने सगळे बंध तुटतात. ती सईकडेच राहायला येते. पहिले काही दिवस निरूपमा सारखी रडत असते. मग ते रडणेही थांबते. निरूपमा खिडकीत उभी असताना समोरच्या बिल्डींगमधला एक तरूण तिचे चित्र काढतो आहे असे तिला जाणवते. तिला स्वतःच्या सौदर्याचा अभिमान वाटू लागतो. तिचे चित्र पहायला तिने घरी यावे असे सांगायला जेव्हा तो घरी येतो तेव्हा मात्र ती त्याला जायला सांगते कारण सईला हे आवडणार नाही. सईला निरूपमासाठी मुलगी असणारा प्रौढ लग्नासाठी विचारतो. सुरूवातीला तिला हे आवडते. पण आहे त्या परिस्थितीतून सुटका करून घेण्याचा हा मार्ग तिलाच पटत नाही. एकदा सई खिडकीत उभी असतानाही तो तरूण तिचे चित्र काढतो. क्षणभर सईलाही स्वतःचा अभिमान वाटतो. पण वळून ती खिडकी बंद करते. एकदा दोघींनाही एकत्रच खिडकी उघडण्याची इच्छा निर्माण होते. पण आयुष्यात नव्या गोष्टींची वाट पहाण्यात अर्थ नाही. या मताशी दोघींचे एकमत होते. 'दोघी' या कथेतून सानियांनी या दोघींचे विचार, एकमेकींविषयी वाटणारी आपुलकी व मध्येच डोकावणाऱ्या असूयेचे वर्णन केले आहे.

## ७) पराभूत

पराभवाच्या तीन वेगळ्या कल्पना मांडणारी ही कथा आहे. कधी कथी

माणसाजवळ सगळे असूनही तो हरतो किंवा ते असणे कालांतराने काहीच उरत नाही म्हणून तो हरतो. हा पराभव त्याने स्वतःहून स्वीकारलेला असतो. रोहिणी आणि श्रीधर या दोघांनी प्रेमविवाह केलेला असतो. पण सतत नाविन्याचा ध्यास असणारी रोहिणी एका न संपणाऱ्या दुःखद वाटेवर स्वतःला नेते. तिची मानसिक फरपट होतेच. पण स्वतःबरोबर ती श्रीधरचीदेखील फरपट करते. गरोदर असल्याचे कळताच वेडीवाकडी औषधे घेते. परिणामी एका अपंग मुलीला जन्म देते. प्रचंड प्रेम असणाऱ्या श्रीधरचा तितकाच तिरस्कार करते. हे अजब रसायन तिची मैत्रिण वीणा हिला कळत नाही. रोहिणी आणि वीणाची मैत्री अतूट असते. खूप प्रेम करणारी एखादी व्यक्ती तितकाच तिरस्कार कसा करू शकते? या प्रश्नावर रोहिणी तिला स्वतःमध्येच असलेल्या दुष्ट कुरूप रोहिणीविषयी सांगते. ती म्हणते, ''श्रीधरवर माझे प्रेम आहे ग वीणा! त्याच्यासाठी भांडून घरातून पळून जाण्याची धमकी देऊन तर मी लग्न केले त्याच्याशी. पण आता कळत नाही की कधीकधी त्याचा द्वेष करावासा वाटतो. इतका की वाटतं हा अचानक मेला तर मला दुसऱ्या कोणाशी लग्न करता यईल पुन्हा आणि नवीन अनुभव मिळेल. मला असं वाटतं की माझ्या आत अतिशय प्रखर खरी पण कुरूप अशी एक व्यक्ती आहे. मी ही बाहेरून खोटी, नाटकी आणि खरं काय ते करावसं वाटलं की अगदी भितीदायक वाटतं बघ.''[४]

तिच्या मृत्युनंतर श्रीधर वीणाशी मैत्रीचे बंध जुळवतो. पण त्याच्या मनात लग्नाचे विचार येतात तेव्हा वीणा त्याला नकार देते. स्वतःचे कोणीतरी विशेष मोठे समजुतदार असल्याचे समाधान पराकोटीला जाते आणि त्यानंतर उरतो तो पराभव हे सत्य कथेत मांडले आहे. रोहिणीची शेवटची भेट न झाल्याची खंत वीणाच्या मनात सतत राहाते. रोहिणीवर प्रेम करून श्रीधरच्या वाट्याला एका अपंग मुलीशिवाय आणि रोहिणीच्या तिरस्काराशिवाय काहीच येत नाही. रोहिणीच्या मृत्युनंतर तो वीणाशी बंध जुळवू पहातो तर तिथेही त्याचा पराभवच होतो.

### अ. ४. समारोप

'शोध' हा सानियांचा प्रकाशित असा पाहिला कथासंग्रह आहे. त्यांनी १९७५ पासून लेखनाला सुरूवात केली. 'शोध' या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे कथांतर्गत व कथाबाह्य असे दोन्ही प्रकारचे निवेदक या कथासंग्रहात आहे. 'इंप्रेशन', 'आतंक' आणि

---

४. पराभूत, शोध, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १९८

'अपरिहार्य' या कथांमध्ये कथांतर्गत निवेदक आहे. तर उरलेल्या १४ कथांमध्ये कथाबाह्य निवेदक आहे. कथांतर्गत निवेदक कथेतील एक पात्र बनून कथा सांगण्याचे काम करतो. कथाबाह्य निवेदक कथेच्या बाहेरून कथेचे निवेदन करतो. सानिया यांच्या बहुसंख्य कथांचा निवेदक कथाबाह्य आहे. जेथे तो कथांतर्गत आहे तेथेही त्याच्या अंतरंगात कथाबाह्य निवेदकाने प्रवेश केला आहे.

सुखाचा निरंतर शोध घेणाऱ्या मानवी मनाचा वेध 'शोध' या शीर्षककथेतून घेतला आहे. मनू या पात्राच्या आधारे हा शोध दाखवला आहे. भावा-बहिणीच्या नात्याची वेगळ्या वळणाची कथा म्हणून 'वळण' या कथेकडे पहाता येईल. एखाद्याचे भले व्हावे म्हणून केलेले प्रयत्न त्या व्यक्तीच्या दुर्दैवाला कारणीभूत व्हावेत आणि त्या व्यक्तीच्या आयुष्याला वेगळे वळण लागावे असे या कथेचे कथानक आहे. आयुष्याला वेगळे वळण लागूनही कांगावा न करणारी कृष्णा कथेची नायिका आहे. मरगळलेल्या निराश मनाला नवी उभारी देण्यासाठी रेषेपलीकडे जाऊन विचार करणारी चारू 'रेषेपलीकडे' या कथेत भेटते. सरिता आणि शंतनूच्या म्हणजे तिच्या नवऱ्याच्या नात्याकडे ती रेषेपलिकडे जाऊन बघते. महत्वाकांक्षी प्रभाचा वेगळ्या वाटेवरचा प्रवास 'वाट वेगळी' या कथेत आहे. लग्न या संस्थेत न अडकण्याचा तिचा वेगळ्या वाटेवरचा निर्णय योग्य असतो याचा तिला आनंदच होतो. रावबददल वाटणारी ओढ कशी तात्पुरती होती हे या कथेतून समजते. आपल्या नवऱ्याचे निखिलचे आजारपण सकारात्मक दृष्टीकोनातून बघणारी शांती 'मार्ग' या कथेची नायिका आहे. स्वतंत्र विचार जपणारी शांती प्रेरणादायी वाटते. एका विशिष्ट चौकटीतले जीवन जगणारी कल्याणी 'फ्रेम' या कथेची नायिका आहे. सुमंत हा तिला वडिलांच्या जागी असतो. पण तिला प्रेम आणि जिव्हाळा या भावनेच्या फ्रेममध्ये अडकायचे नसते. पूनमीवर निर्व्याज प्रेम करणारा कनू 'क्वचित'या कथेचा नायक आहे. रॉयवर सूड उगवण्यासाठी समाजातल्या पराभूत व खचलेल्या लोकांना शारीरिक सुख देणारी पूनमी कथेची नायिका आहे. क्वचितच मिळालेल्या कनूच्या प्रेमाचाही विचार करत नाही ही खंत तिला कायम बोचते. स्वतंत्र विचारांच्या खंबीर नायिकेची इलाची कथा म्हणजे 'रस्ते काळोखाचे' नात्याचा आदर न ठेवणारी माणसे तिला भेटतात. पण या सगळ्या कटू अनुभवांमधून ती हा प्रवास एकटीनेच करण्याचा निर्णय घेते. आत्मविष्कार झाल्याची जाणीव 'जन्म' ही कथा देते. प्रत्यक्ष ओळख झाल्यापेक्षा पत्रातून रेणूकेला जयवंत आवडतो. वाचक व लेखकाच्या नात्याची कथा म्हणजे 'इंप्रेशन'. कथेची वेगळी मांडणी हे कथेचे मुख्य वैशिष्ट्य. 'रिच्युअल' या कथेत आपल्याच मनाशी पत्ररूपाने

साधलेला संवाद आहे. एकमेकांची एकमेकांच्या आयुष्यातली अपरिहार्यता दाखवणारी कथा 'अपरिहार्य'. रघुवीर, ती आणि मिनाक्षी या त्रिकोणाची ही कथा आहे. आलेल्या संकटावर मात करण्यासाठी केलेला आतंक 'आतंक' या कथेत आहे. सुटका हवी असणारी आणि सुटकेला घाबरणारी रेवती 'सुटका' या कथेत आहे. निरूपमा आणि सई या दोन बहिणींची कथा 'दोघी'. या कथेतून त्यांचे एकमेकींविषयीचे विचार व असूया दाखवली आहे. माणसाजवळ सगळे असूनही तो हरतो किंवा ते असणेच त्याच्या पराभवाचे कारण ठरते असे सांगणारी ही कथा. रोहिणी आणि श्रीधरचे नाते कथेतून मांडले आहे. मनात आहे ते खरेपणाने सांगणारी रोहिणी कथेची नायिका आहे.

१७ वेगवेगळ्या कथांमधून मानवी मनाचा, भावभावनांचा, विचारांचा शोध सानिया यांनी या कथासंग्रहातून घेतला आहे.

### अ. ५. संदर्भसूची


२. वाट वेगळी, शोध, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १८६

३. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ३

४. पराभूत, शोध, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १९८


## ग्रंथसूची


१. वाटा आणि मुक्काम

२. शोध

## ब. प्रतीती

| | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | प्रतीती | सत्यकथा, दिवाळी १९९१ |
| २ | प्रवाह | सत्यकथा, दिवाळी १९८० |
| ३ | कोष | मौज, दिवाळी १९८२ |
| ४ | अरण्ये | सत्यकथा, जून १९८० |
| ५ | पूल | सत्यकथा, दिवाळी १९७९ |

**ब. १. – प्रस्तावना**

**ब. २. – शीर्षककथा**

**ब. ३. – मला भावलेल्या कथा**

**ब. ४. – अन्य कथा**

**ब. ५. – समारोप**

**ब. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ब. १. प्रस्तावना

स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून तिच्या अस्तित्वाचा शोध घेणारी सानिया यांची कथा आहे. सानियांची कथा मराठी कथासाहित्यात स्त्रीवादी-कथा या नावाने आपली ओळख स्थिर करून आहे. पण सानियांनी स्त्रीवादी लेखिका म्हणून आपली ओळख व्हावी म्हणून हे लेखन केलेले नाही. त्या कोणत्याही वादाचा पुरस्कार करत नाहीत. त्यांच्या साहित्यात त्यांना स्त्री महत्वाची वाटते. स्त्रीच्या ठायी असणारी शक्ती त्यांना विस्मित करते आणि त्यातूनच त्यांची स्त्रीचा शोध घेण्याची प्रक्रिया त्यांच्या कथेतून सुरू होते.

साहित्याच्या निर्मितीबददल सानिया म्हणतात, ''साहित्याची निर्मिती म्हणजे मनातले रचणे प्रत्यक्ष भाषेत शब्दांमध्ये कागदावर उतरवणे. हे रचणे दोन पातळ्यांवर असते. बरेचसे संदिग्ध असे एकंदर जगण्याच्या अनुभवातले संवेदना, विचार, आकलन या पातळीवर. दुसरे ते एखाद्या कथा कादंबरीतल्या माणसा, प्रसंगा, घटनांतून खऱ्या आयुष्याची प्रतिकृती असे. बरेच खऱ्यासारखे पण प्रत्यक्षात काल्पनिक अशा रितीने मांडायचे या पातळीवर. ही दोन्ही निर्मितीची उदाहरणेच.''[५]

---

५. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ८

सानिया यांच्या या म्हणण्याप्रमाणे सानियांच्या नायिका आंतरिक बळावर वेगवेगळे अनुभव घेतात व निर्भिडपणे सत्याला सामोऱ्या जातात. त्यासाठी वाटेल ती किंमत द्यायची त्यांची तयारी असते. त्यामुळे कमालीच्या आत्म-निर्धाराने काही वेळा पळत, अडखळत जीवनात पुढे जातात. अशाच नायिका 'प्रतीती' या त्यांच्या कथासंग्रहात आहेत.

**ब. २. शीर्षक कथा**

'प्रतीती' हा कथासंग्रह श्री. पु. भागवत यांच्या मौज प्रकाशनगृहाच्या वतीने १९८९ मध्ये प्रकाशित झाला आहे. पद्मा सहस्त्रबुद्धे व बळी लवंगारे यांनी मुखपृष्ठाचे रेखाटन केले आहे. या संग्रहात पाच दीर्घकथा आहेत. मौज व सत्यकथा या मासिकांमधून या कथांची पूर्वप्रसिद्धी झाली आहे. या कथासंग्रहाची शीर्षककथा स्वानुभवातून आलेले शहाणपण दाखवते.

**प्रतीती**

माणसाला स्वतःच्या अनुभवाने झालेली प्रचिती म्हणजे प्रतीती. Realisation through self-experience. 'प्रतीती' या दीर्घकथेच्या माध्यमातून सानिया यांनी चंदना या कथेच्या नायिकेचे खऱ्या अर्थाने मोठे होणे दाखवले आहे. आपल्याला नेमके काय हवे आहे हे आयुष्य सरले तरी कळत नाही. बऱ्याचदा आहे त्या परिस्थितीत आहेत त्या माणसाशी जुळवून घेऊन आयुष्य संपून जाते. या दीर्घकथेतून चंदनाच्या रूपाने व्यक्तीमध्ये झालेले सकारात्मक स्थित्यंतर सानियांनी दाखवले आहे. गोष्टी आपल्याला वाटतात तशाच असतील असे नाही. बऱ्याचदा तात्कालिक मते बनवून वर्तमान न जगता असमाधानी राहाण्याची वेळ येते. पण मोठे होणे म्हणजे आपल्याला नेमके काय हवे आहे ते समजणे तेही अनुभवातून. चंदनाच्या अल्लड वयापासून तिला आलेल्या प्रगल्भतेपर्यंतचा मोठा पट 'प्रतीती' मध्ये दिसून येतो. एकाच कथेत वेगळ्या स्वभावाच्या वेगळ्या महत्वाकांक्षा असलेल्या स्त्रिया भेटतात. प्रत्येक स्त्री आपापल्या जागी योग्यच आहे असे वाटते. याचे महत्वाचे कारण स्वानुभवातून आलेली प्रतीती. कोणाला काय आवडावे, कोण आवडावे, कोणी कसे जगावे याबाबत सरसकटपणे काहीच ठरवता येत नाही. किंबहुना असे ठरवणे चूक आहे. त्यामुळे कोणत्या परिस्थितीत कोण कसे वागेल हे सांगणे शक्य नाही. जीवनाचे हे खरे मर्म सानिया प्रतीती मधून सांगतात.

साधी, सरळ पण स्वतःबद्दल न्यूनगंड असणारी चंदना कथेची नायिका आहे.

वयाच्या तिच्या पंधराव्या वाढदिवसापासून कथेची सुरूवात होते. आईला ‘रमा’ असे एकेरी नावाने संबोधण्याचा मोकळेपणा या कुटुंबात आहे. विक्रांत, रणजित, जान्हवी या भावंडांमध्ये रणजित त्यातला त्यात तिला जवळचा वाटतो. जान्हवी सुंदर असते. विक्रांत हुशार असतो. त्यामुळे हे दोघेही आपली टिंगल करत असतात असेच तिला वाटत असते. अल्लड वयात विनय नावाचा मुलगा तिच्याशी बीभत्सपणे वागतो आणि त्याला हवे ते न मिळाल्याने तू स्त्रीच नाहीस असा आरोप तिच्यावर करतो. हा ओरखडा मनावर घेऊन ‘प्रेमाच्या’ फंदात न पडण्याचा ती निर्णय घेते. तिच्या मैत्रिणीचे जयूचे विक्रांतवरचे अबोल प्रेमही ती मनातच ठेवते. कॉलेज पूर्ण झाल्यावर नोकरीच्या निमित्ताने आदित्य तिचा बॉस म्हणून तिच्या आयुष्यात येतो. कालांतराने त्यांच्या भेटी वाढतात. पण जेव्हा आदित्यचा स्पर्श तिला होतो तेव्हा हवेसे आणि नकोसे असे विचित्र भाव तिच्या मनात निर्माण होतात. आदित्य चांगला नाही असे तिच्या ऑफिसमधले लता आणि जोसेफ तिला सांगतात. पण त्याकडे दुर्लक्ष करून ती त्याला भेटतच राहाते. प्रथमच कोणत्या तरी पुरुषाचा स्पर्श तिला हवाहवासा वाटतो. आदित्यने दुसऱ्या कोणाबरोबर राहिलेले तिला आवडत नाही. आदित्यला अशी बंधने आवडत नसतात. चंदनाच्या लाडक्या भाईंचे अचानक निधन होते. त्यानंतर तिने दाखवलेला खंबीरपणा, समजूतदारपणा हा तिच्या अनुभवांची प्रचीती असते. कथेच्या शेवटी आदित्यकडे जाण्याचा निर्णय तिच्या मनाला समाधान देतो. आदित्यकडे राहाण्याने आपण आनंदी, समाधानी राहू शकतो असे तिला वाटते. हे वाटणे म्हणजेच तिने ‘स्व’ ला ओळखल्यासारखे आहे असे तिला वाटते. विचारीपणाने घेतलेल्या या निर्णयाचे आदित्यदेखील स्वागत करतो.

### ब. ३. मला भावलेल्या कथा

स्त्रीकेंद्री कथालेखन करणाऱ्या सानियांच्या सर्वच कथांमध्ये स्त्री आपापल्या परीने आपल्या जीवनाचा मार्ग शोधते. आपण जे करतो आहोत त्यावर ठाम विश्वास असणाऱ्या नायिकेची ही कथा मला भावली आहे.

### १) प्रवाह

आई आणि मुलीच्या वेगळ्याच नात्याचा गोफ या कथेत विणला आहे. सर्वसाधारणपणे मुलांमध्ये आई आणि वडील या दोघांचे प्रवाह असतात. पण या कथेत विनितामध्ये वडिलांचे म्हणजे प्रभाकरचे प्रवाह जाणवतात. गौरी ही विनिताची आई.

गौरी आणि प्रभाकर एकमेकांच्या स्वभावामुळे वेगळे झालेले असतात. प्रभाकर गेल्यानंतर गौरी तिची मुलगी विनिता हिच्याकडे येते. विनिताचा स्वभाव तिचे वागणे सगळे अगदी प्रभाकरसारखेच असते. गौरीसुद्धा तिच्यापेक्षा नीटनेटकी आणि छान राहात असते. पण विनिता मात्र कामात बुडालेली. सतत अभ्यास, पुस्तके, फाईल्स, प्रयोगशाळा हेच तिचे विश्व असते. कामाव्यतिरिक्त तिच्या डोक्यात दुसरे काहीच नसते. गौरी या वयातदेखील नीटनेटकी राहात असते. स्त्री म्हणून तिच्या संवेदना आजही जागृत असतात. पण विनिता मात्र अगदी पुरुषासारखी राहात असते. भावना संवेदना या स्त्रीसुलभ गोष्टींचा आणि तिचा काही संबंधच नसतो. काम करताना सहाय नावाच्या तिच्या सहकाऱ्याशीदेखील ती फटकूनच वागत असते. त्याचे तिच्याशी बोलणे हे कोणत्या तरी हेतूनेच असावे असे तिला वाटत असते. सौमित्र नावाच्या तिच्या मित्राशीदेखील ती तुटकपणेच वागत असते. गौरी तिच्याकडे राहायला आल्यानंतर गौरीची ऋजुता, हळुवारपणा, घराची सजावट करण्याची हौस, राहणीमानातला नीटनेटकेपणा या सगळ्या गोष्टी तिला नकळतपणे आवडू लागतात. शरीरात आणि मनात जाणवणाऱ्या स्त्रीत्वाच्या प्रवाहाने ती अंचंबित होते. वडिलांनी दिलेल्या संस्कारांपेक्षा आपण वेगळे काही मनात आणतो आहोत असे तिला वाटते. या सगळ्यापासून दूर जावेसे वाटते. म्हणूनच सौमित्रचा स्पर्श झिडकारून त्याला स्वतःच्या आयुष्यातून कायमचे दूर करते. गौरी तिच्या ऑफिसमधल्या सहायशी अगदी छान बोलते. त्याची वैयक्तिक अडचण समजून घेते. या वयातही एखादा पुरुष आपले कौतुक करतो आहे ही भावना तिला सुखावते. विनिताला हे सगळे आवडत नाही. गौरी परत जायला निघते तेव्हा विनीता थोडी अस्वस्थ होते. पण स्वतंत्र विचारांची विनीता हे मान्य करत नाही. कथेच्या शेवटी स्वतःच्याच घरात अनाकलनीय विचारांमध्ये गुरफटलेली निश्चल विनिता दिसते. आपण प्रवाहाविरूद्ध वागतो आहोत की काय अशी खंत तिला वाटते. सहाय तिथे येतो. तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करतो. तिला सांगतो, ''तू मला आवडतेस, तू माझा तिरस्कार करतेस हे माहीत असूनही. कित्येकदा दोन माणसांमध्ये परस्परांबददलचे भाव एकसारखे नसतात. पण त्याला काही उपाय नसतो.''[६]

विनीता डोळे मिटून आपल्यापुरते जग बंद करते आणि आत वाहाणाऱ्या प्रवाहाला सामोरी जाते.

६. प्रवाह, प्रतीती, सानिया, मौज प्रकाशन, १९८९, पृ. क्र. १०६

## २)    कोष

वयात येणारया मुलीच्या मनाची अवस्था सांगणारी एक सहज सुंदर तरल कथा म्हणजे 'कोष'. वयात येताना शरीरात मनात होणारे बदल, भावनांचे वादळ, संवेदनांचे आवेग अचूक शब्दात सांगणारी ही कथा आहे. शुभांगी ही या कथेची नायिका आहे. सुरक्षित, श्रीमंत घरात, अगदी कोषात राहाणारी शुभांगी अल्लड वयातला प्रेमभंग पचवून स्वतःच्याच शक्तीची नव्याने जाणीव कशी करून घेते हे या कथेत सानियांनी सांगितले आहे. सानियांच्या बऱ्याचशा कथा मध्यमवयीन स्त्रियांच्या मनातले हिंदोळे दर्शवितात. या कथेत त्यांनी अगदी नुकत्याच तारूण्यात पदार्पण केलेल्या मुलीच्या भावनांचा आवेग चित्रित केला आहे.

शुभांगी ही विभाकरची एकुलती एक मुलगी असते. आईविना वाढलेल्या लाडक्या लेकीसाठी विभाकर दुसऱ्या लग्नाचा विचारही करत नाही. तिला सगळी सुखं मिळावीत यासाठी तो सातत्याने झटत असतो. त्याची पत्नी गेल्यानंतर त्याला त्याच्या आईचा खूप आधार असतो. पण त्याच्या आईच्या मृत्युनंतर मात्र शुभांगी एकटी पडते. सुरूवातीला तिला खूप वाईट वाटते. पण तिच्या खोलीत तिच्या मनाप्रमाणे वागता येते आहे. याचा काहीसा आनंदही होतो. कॉलेजमध्ये दिलीप नावाचा धडाडीचा तरूण तिला आवडत असतो. नंतर तिचे हे आवडणे प्रेमात रूपांतरित होते. दिलीप एका सामान्य कुटुंबातला असतो. त्याला समाजकार्याचे वेड असते. शुभांगीच्या त्याच्याविषयीच्या भावना कळूनही तो कधीही तिला प्रोत्साहन देत नाही. विभाकरच्या मित्राची मुलगी फिरोझा शुभांगीला मैत्रिण म्हणून अजिबात आवडत नसते. पण ती कोणाच्या तरी प्रेमात पडली आहे आणि काहीही झाले तरी त्याच्याशीच लग्न करणार आहे हे ऐकल्यावर तिला फिरोझाविषयी असूया वाटू लागते. दिलीपबरोबर तिला खेडेगावात कँपला जायचे असते. पण विभाकर परवानगी देत नाही. दिलीपचा कोरडेपणा, विभाकरचा हट्टीपणा या सगळ्यात विभाकरचा मित्र विश्वास तिला जवळचा वाटतो. विश्वासच आपल्याला समजून घेतो असेही तिला वाटते. दिलीपच्या स्पष्ट नकाराने ती कोलमडून जाते. दिलीपने हे सगळे दोघांच्या हितासाठीच केलेले असते. पण शुभांगीच्या मनात येते की त्याने एकदा तरी आपले म्हणणे ऐकून घ्यायला हवे होते. ती स्वतःला सावरते. फिरोझच्या घरी जाते. फिरोझाला तिचे प्रेम मिळवून देण्याचे ती ठरवते. तिला प्रामाणिकपणे वाटते निदान तिच्या तरी मनासारखे होऊ दे. तिच्यामध्ये निर्माण झालेली प्रगल्भता तिच्या मोठे होण्याचे दर्शन घडवते. लाडाकोडात, कोषात वाढलेल्या शुभांगीला स्वतःमधली शक्ती

जागवते व ती जबाबदारीने वागते.

**ब. ४. अन्य कथा**

या दोन्ही कथादेखील मनोविश्लेषणात्मक प्रकारांमध्येच मोडतात. मनातले विचार आणि भावना यांचा एकमेकांशी असलेला संबंध सानियांच्या कथांमध्ये मांडला आहे.

**१) अरण्ये**

अरण्ये मनातलीच, मनातल्या भावनांचीच. गुंतून पडलेल्या नात्यांची काही वेळा या अरण्यांमध्ये अडकून पडायला होते. प्रत्येकालाच आपल्याला हवे ते हवे तसे मिळणे शक्य नाही. हवे ते मिळवण्यासाठी केलेल्या तडजोडी त्रासदायक ठरतात. हव्यासापोटी मनात असलेला राग चुकीच्या कृतींमधून बाहेर पडतो. या सगळ्यामध्ये माणूस असा हरवतो की त्याला या अरण्यातून बाहेर पडण्याचा मार्गच दिसत नाही. आपल्याकडे जे आहे त्यात समाधान मानणे हाच एक मध्यम मार्ग या सगळ्यातून निघतो या कथेमध्ये चारही पात्रे महत्वाची आहेत. करूणा आणि जगदीश पती-पत्नी असतात. पद्मा जगदीशची बहिण असते. तिने स्वकर्तृत्वाने सारे काही मिळवलेले असते. आणि जगदीशला उभे करण्यात तिचा मोठा वाटा असतो. करूणा आणि जगदीशचे लग्न झाल्यावर पद्माला खूप असुरक्षित वाटत असते. अगदी जगदीश आपल्या मुठीतून सटकतो आहे. इतके वाटण्यापर्यंत तिला असुरक्षित वाटत असते. त्यातून करूणाबद्दलचा द्वेष तिच्या मनात उफाळून येतो. ती करूणाशी विचित्र वागू लागते. स्वाभाविकपणे करूणा आणि पद्मामध्ये एक विचित्र तेढ निर्माण होते. या सगळ्यातून जगदीश आणि तिच्यातली दरी निर्माण होते. जय हा जगदीशचा मित्र असतो. पद्माला जय आवडत असतो. पण जयच्या मनात असलेली स्त्री करूणा असते. करूणा आणि जयचे नकळत फुललेले नाते जगदीशला समजते. तरीही तो आकांडतांडव न करता समजून घेतो. जय परदेशात कामानिमित्त जातो. त्यानंतर जगदीशच्या अपघातानंतर भेटायला येतो. मागचे सगळे विसरून जयने इथेच यावे असा विचार जगदीश करतो. कालांतराने जय राहायलादेखील येतो. करूणावर प्रेम असूनही तो संयमाने वागतो. जगदीश आणि जय या दोघांचेही करूणावर सारखेच प्रेम असते. अपघाताने अपंग झालेला जगदीश, सगळे असूनही निराश झालेली करूणा, स्वतःचे उध्वस्त अंतर्मन साधू न शकणारी पद्मा आणि आपल्या विचारांवर ठाम राहून एकमार्गी चालणारा जय आपापल्या मनातल्या अरण्यांमध्ये स्वतःच्या आयुष्याचा मार्ग शोधतात.

## २) पूल

भावनांच्या गुंतागुंतीतून एकमेकांना सांधणारा नात्यांचा पूल म्हणजे ही कथा. या कथेतली सगळी पात्र एकमेकांशी अदृश्य अशा पूलाने जोडली आहेत. स्वतंत्र राहाण्याचा विचार करूनही असे राहाता येत नाही. कारण प्रत्येकापासून दुसऱ्याला सांधणारा पूल मध्ये आहे. हे सगळे एकमेकांशी अदृश्य अशा कोणत्या तरी धाग्याने बांधले गेले आहेत. हे बांधले जाणे अपरिहार्य आहे. आपल्याला हवे आहे का नको याची वाट न बघता हे पूल एकमेकांमध्ये गुंतलेली नाती सांधतात.

कमलेश आणि जानकी पती-पत्नी आहेत. जानकी आंधळेपणाने पती म्हणून कमलेशवर, त्याच्या घरावर प्रेम करते. आपल्या संसारापलीकडे तिला जगच नाही. एक सुंदर बायको बाहुली म्हणून मिरवता येते याचा कमलेशला अहंकार आहे. अडचणींच्यावेळी तिला मदत करून तिला सुरक्षित घर देऊन आपण तिच्यावर उपकारच केले आहेत असे त्याला वाटत असते. या सुरक्षित घराच्या उपकाराच्या ओझ्याखाली जानकी आनंदाने वावरते आहे. त्याचा कपटीपणा तिच्या लक्षातही येत नाही. ज्योत्स्ना या दोघांची एकुलती एक मुलगी. ती रोहितच्या प्रेमात पडते. जानकीला जसे सुरक्षित घर मिळाले आहे तसेच घर तिला रोहितकडून हवे असते. पण रोहितला या सगळ्यात रस नसतो. आत्ताच्या क्षणाची मजा लुटणे असा त्याचा स्वभाव असतो. ज्योत्स्ना मात्र त्याच्यात पूर्णपणे बुडालेली असते.

विनोद हा कमलेशचा धाकटा भाऊ असतो. परदेशातून तो येणार हे कळल्यावर जानकीला झालेला आनंद कमलेशला अजिबात आवडत नाही. विनोद आणि जानकीमध्ये निखळ असे नाते निदान जानकीच्या बाजूने तरी तसेच असते. अनू नावाची कमलेशची सहकारी त्याला पुस्तकलेखनात मदत करत असते. जानकी मात्र कधीच असा संशय घेत नाही. विनोदला जानकी ठराविक अंतरावरच ठेवत असते. त्याची पत्नी रेणूका गेल्यानंतर तो एकटा पडतो. जानकी त्याच्याकडे स्वच्छ दृष्टीनेच पहात असते. कमलेशच्या मनात मात्र त्या दोघांविषयी संशय असतो. ज्योत्स्ना जानकीचा म्हणजे आपल्या आईचाच अकारण द्वेष करत असते. जानकीचे सुंदर दिसणे, तिची बहीण असावी इतके तरूण दिसणे याचा तिला मत्सर वाटतो. ती आपल्याच आईपासून लांब राहात असते. या कशाचाही विचार न करता जानकी आपल्या संसारात आनंदी असते. तिला या कशाचीही जाणीवच नसते. इतका विचार करण्याची शक्तीच नसते. कथेच्या शेवटी ज्योत्स्ना नैराश्यामुळे आत्महत्येचा प्रयत्न करते तेव्हा जानकी हादरते. आपण जशा होतो तशीच

ज्योत्स्ना आहे असे तिला वाटते. कमलेशचा धूर्तपणा, विनोदचा दृष्टीकोन, ज्योत्स्नाचा विचित्रपणा आणि या सगळ्यात आपली काय भूमिका होती या सगळ्याचा विचार करत ती शांत निश्चल राहाते. जानकी स्वतःच्याच भावविश्वात रममाण होते.

**ब. ५. समारोप**

सानिया यांच्या 'शोध' या कथासंग्रहाच्या तुलनेत 'प्रतीती' हा कथासंग्रह आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने कितीतरी पटीने उजवा आहे. या कथा माणसाचे मन, मानवी नात्यांचे संबंध, सानियांची मानसिकता याविषयी भाष्य करणाऱ्या आहेत.

'प्रतीती' या शीर्षककथेत सानिया यांनी चंदना या नायिकेच्या आधारे माणसाचे मोठे होणे दाखवले आहे. प्रतीती म्हणजे स्वानुभवाने घेता आलेली प्रचिती. चंदनामध्ये झालेले सकारात्मक बदल प्रतीतीतून दिसून येतात. 'प्रवाह' या कथेत आई आणि मुलीच्या नात्याचा गोफ विणला आहे. गौरी आणि विनिता या दोघी कथेच्या नायिका आहेत. वयात येणाऱ्या शुभांगीची मनःस्थिती, तिने पचवलेला प्रेमभंग, शुभांगीत झालेला सकारात्मक बदल 'कोष' या कथेत आहेत. मनातल्या आणि मानवी नात्यांच्या अरण्यात अडकलेले जगदीश, करूणा, जय आणि पद्मा 'अरण्ये' या कथेत भेटतात. भावनांच्या गुंत्यातून एकमेकांना सांधणारा दुवा म्हणजे 'पूल' ही कथा. या कथेतली सगळी पात्र अदृश्य अशा पूलाने जोडली आहेत.

लेखन म्हणजे 'स्व' चा शोध असतो. याविषयी सानिया म्हणतात, ''लेखन हा एक प्रकारे स्व चा शोध असतो. शिवाय तो अपरिहार्यच असतो. विचार संवेदना आपल्या मनातूनच निर्माण होत असतात. हा संपूर्ण स्वशोधाचा प्रवास अपरिहार्य आहेच. असे मरणापर्यंतचे जगणे अनिवार्य असेच असते. आपल्याला जे काही मिळते. जे काही समजून येते थोडक्यात जे काही वाट्याला आलेले असते ते सारे जगताना, शिकताना, सुख-दुःख भोगताना आपण आयुष्य पार करत राहातो. त्यातून एक 'स्व' घडत जातो. तो 'स्व' आपण लिहिलेल्या शब्दातून दिसतो. या अपरिहार्यतेला पर्याय नाही.''[७]

सानियांच्या 'प्रतीती' या कथासंग्रहातील नायिका मनोविश्लेषणात्मक भूमिकेतून विचार करणाऱ्या आहेत. स्वानुभवाने आलेल्या अनुभवावर ठाम राहून निर्णय घेणाऱ्या आहेत. कथा वाचल्यानंतर आपण घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी आपलीच असते हा विचार मनात घोळत राहिला. सानियांच्या या कथा 'स्व'चा शोध घ्यायला शिकवतात.

---

७. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. १२

**ब. ६. संदर्भसूची**

५. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ८

६. प्रवाह, प्रतीती, सानिया, मौज प्रकाशन, १९८९, पृ. क्र. १०६

७. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. १२

## ग्रंथसूची

१. वाटा आणि मुक्काम

२. पतीती

## क खिडक्या

| | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | एकदा जाग आली | हंस, दिवाळी १९८४ |
| २ | वय | दिनांक, दिवाळी १९८२ |
| ३ | स्रोत | रसिक, दिवाळी १९८२ |
| ४ | वाटा | स्त्री, दिवाळी १९८२ |
| ५ | हिवाळ्यातला पहिला दिवस | किर्लोस्कर, सप्टेंबर १९७८ |
| ६ | शिल्लक | तरुण भारत, वासंतिक १९८३ |
| ७ | प्रारंभी खेळाच्या | सत्यकथा, जानेवारी १९८० |
| ८ | पावसाळ्यातली गोष्ट | स्त्री, दिवाळी १९८१ |
| ९ | दुसरं घर | हंस, ऑगस्ट १९८४ |
| १० | चाफा | हंस, जानेवारी १९७९ |
| ११ | दुहेरी | रसिक, दिवाळी १९८० |
| १२ | खिडक्या | हंस, जून १९७९ |

**क. १. – प्रस्तावना**

**क. २. – शीर्षककथा**

**क. ३. – मला भावलेल्या कथा**

**क. ४. – अन्य कथा**

**क. ५. – समारोप**

**क. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### क. १. प्रस्तावना

ऐंशीच्या दशकात लिहिलेल्या कथांचा हा संग्रह पुन्हा एकदा नव्या आवृत्तीत वाचकांपुढे आणण्यात आला आहे. लेखनप्रवासाच्या सुरुवातीच्या काळात लिहिलेल्या या कथा आहेत. माणसांमधल्या निरनिराळ्या नातेसंबंधांचा शोध घेण्याचा प्रयत्न या कथा करतात. या कथांना आपल्या भोवतीच्या माणसांना समजून घेण्याची आस आहे. आपोआप गृहित धरली जाणारी आणि आयुष्यात नंतर बांधली गेलेली अशी नाती नक्की काय देतात आणि घेतात हे जाणण्याची उत्कट इच्छा या कथांमध्ये जाणवते. या प्रवासात घडत राहिलेल्या घटना-प्रसंगातूनही माणसे संवादाचे पूल बांधतात. त्याद्वारे समोरचा

माणूस अधिक समजून घेण्याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नात ते पूल अधिक मजबूत होतात. कधी नुसते तगतात तर कधी तुटतात. तरीही असे का होते हे जाणण्याची अनावर ओढ त्यांच्यात आहे. या भावना या कथांमधून व्यक्त होतात.

सानिया यांच्या कथांमध्ये बाह्य घटनांपेक्षा मनोविश्वातील हेलकाव्यांना अधिक प्राधान्य आहे. कथेतील पात्रांची संख्या मोजकीच आहे. बहुतांश कथांमध्ये तीन, चार किंवा पाच एवढीच पात्रे असतात. त्यांच्या परस्परसंबंधातून कथा आकारत जाते. आई-मुलगी, पती-पत्नी, सासू-सून, मित्र-मैत्रीण यापैकी कोणतेही नाते ताणलेले असले तरी या कथेत घडणाऱ्या बाह्य घटनांपेक्षा पात्रांच्या मनातील आंतरिक खळबळ, विचार महत्त्वाचे ठरतात. किंबहुना सानिया यांच्या कथांमध्ये पात्रांचे विचार हीच एक अर्थपूर्ण कृती बनते. अशाच कथांचा समावेश या कथासंग्रहात केला आहे.

### क. २. शीर्षककथा

'खिडक्या' या कथासंग्रहाची पहिली आवृत्ती पुणे येथील विमल प्रकाशनने १९८९मध्ये प्रकाशित केली होती. पुढे मुंबईच्या नवचैतन्य प्रकाशनच्या सुप्रिया मराठे यांनी ऑगस्ट २००४मध्ये दुसरी आवृत्ती प्रकाशित केली. मनोज आचार्य यांनी मुखपृष्ठ रेखाटले आहे. या कथासंग्रहातील कथांची पूर्वप्रसिद्धी हंस, दिनांक, तरुण भारत, स्त्री, किर्लोस्कर, सत्यकथा, रसिक या मासिकांमधून झाली आहे. या प्रकरणात नवचैतन्य प्रकाशनने प्रकाशित केलेल्या पुस्तकातील कथांचा अभ्यास केला आहे.

### खिडक्या

माणसांमधली नाती मोठी विचित्र असतात. अगदी रक्ताची नाती असूनही दोन माणसांमध्ये भिंती उभ्या असतात, खिडक्या नसलेल्या. या भिंतींना खिडकी असती तर निदान ती खिडकी उघडून ते नाते समजून घेण्याची संधी तरी मिळाली असती. पद्मनाभ, सुमा आणि जयंती यांच्या नात्यांमध्ये अशाच भिंती आहेत, खिडक्या आहेत पण त्या बंद आहेत.

सुमा ही पद्मनाभची मुलगी. पद्मनाभ स्वतःसाठी लिहिणारा एक लेखक असतो. जयंती आणि पद्मनाभचे सूर जुळतात. ते दोघे चार-पाच वर्षे एकत्रही राहातात. पण जयंती काही कारणाने परदेशी जाते. तेव्हा तिला जाणवते की, हे बांध खूपच कच्चे आहेत. ती त्याच्यासोबत एकत्र न राहाण्याचा निर्णय घेते. त्या दोघांमध्ये एक भिंत उभी

राहाते, खिडकी नसलेली. सुमा कायमच पद्मनाभपासून दूर होस्टेलला राहात असते. त्यामुळे तिला त्याच्याविषयी वडील म्हणून अतिबात काहीही वाटत नसते. ती सुट्टीला म्हणून आली असताना पद्मनाभचा अचानक मृत्यू होतो. सुमा आणि त्याच्यातही खिडकी नसलेली एक भिंत असतेच. त्याच्या मृत्यूनंतर त्याचे साहित्य प्रकाशित व्हावे असे भास्करला म्हणजेच पद्मनाभच्या प्रकाशकाला वाटत असते. पहिल्यांदा सुमा आपल्या त्या लिखाणाशी काहीही संबंध नसल्याने छापून येण्यासाठी परवानगी देते. या लिखाणात जयंती आणि पद्मनाभ यांचे नाते अगदी स्पष्टपणे दिसते. तरीदेखील जयंती या सगळ्याला परवानगी देते. पण एक दिवस अचानक सुमा ते सगळे न छापण्याविषयी भास्करला कळवते. जयंती तिला मुद्दाम भेटायला जाते पण सुमा आपल्या निर्णयावर ठाम असते. त्या दोघींमध्येही खिडकी नसलेली एक भिंत तयार होते. ''सुमाचे डोळे चमकत होते. जयंती खिळल्यासारखी तिच्यासमोर बसून तिच्याकडे पाहत राहिली. हळूहळू तिला वाटले की, सुमाचे पुष्कळ बरोबर आहे. आपण तिच्या जागी असतो तर कदाचित असेच म्हणालो असतो आणि ती आपल्या जागी असती तर कदाचित आपण वागलो तशी सर्व सोडून देऊन पाठ फिरवून निघून गेली असती. भिंती एकूण कायमच राहातात तर!'' [८]

## क. ३. मला भावलेल्या कथा

'खिडक्या' या सानियांच्या कथासंग्रहात मला भावलेल्या कथांमध्ये 'पावसाळ्यातली गोष्ट' ही कथा सर्वाधिक आवडली कारण या कथेतून सानियांच्या कथासृष्टीतील स्त्रियांच्या भावविश्वात मैत्रिणीला असलेले प्राधान्य दिसून येते. वादळातही उन्मळून न पडता स्थिर राहाण्याचे बळ देणाऱ्या मैत्रभावाचे दर्शन या कथेत घडते.

### १) पावसाळ्यातली गोष्ट

एखाद्यावर समर्पित वृत्तीने प्रेम करणे हे तितकेसे सोपे नाही. गुण-दोषांसकट एखाद्याला पूर्णपणे स्वीकारणे हे वाटते तितके सहज नाही. पहाताक्षणीच वाटणारे प्रेम क्षणिक असू शकते. सहवासानंतर जर त्या व्यक्तितल्या गुणांऐवजी दोषच दिसू लागले तर ते समर्पित प्रेम म्हणता येईल का? संपूर्णपणे स्वीकारल्यानंतर खरे म्हणजे कुरबुरींना जागाच असता कामा नये. पण ठराविक एका साच्यामध्ये आयुष्य कधीच वाहत नाही.

---

८. खिडक्या, खिडक्या, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. १९१

व्यक्तीपरत्वे भावनेची तीव्रता बदलते. हातातून सगळे निसटून जाते आहे की काय? असे वाटण्याच्या क्षणीच दोघांपैकी एकाने सगळे सावरले पाहिजे, हे खरे समर्पित प्रेम. हीच भावना या कथेतून व्यक्त होताना दिसते.

मोनिका ही श्रीमंत घरातली मुलगी असते. विद्याधर या गूढ पण वेगळे लिहिणाऱ्या लेखकावर ती प्रेम करते. आई-वडिलांचा विरोध असतानाही लग्न करते. फक्त लेखनावर पोट भरणाऱ्या, संवेदनशील पण थोड्याशा विचित्र विद्याधरवर ती जीवापाड प्रेम करते. ऐषारामात वाढलेल्या मोनिकाला संसारात तडजोड करताना खूप जड जाते. आपला निर्णय चुकला आहे की काय असे वाटू लागते. तिची मैत्रीण रती ही परदेशात अगदी ऐश्वर्यामध्ये राहात असते. ती भेटायला आल्यानंतर मोनिकाला हे प्रकर्षाने जाणवते. पण रतीच तिचा दृष्टिकोन बदलवायला कारणीभूत होते. दिवस गेल्याचे कळताच मोनिकाला टेन्शन येते. पण विद्याधर तिला आश्वस्तपणे समजावतो. त्याचे हे रूप पाहून विद्याधरशी लग्नाचा घेतलेला निर्णय योग्य असल्याचे तिला जाणवते. या सगळ्या घटना पावसाळ्याच्या दिवसांमध्ये घडतात.

## २) वय

प्रेम ही माणसाच्या जीवनातली एक अपरिहार्य अशी भावना आहे. आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर, कोणाहीबद्दल ही भावना तीव्र होते. त्यातही कोवळ्या वयात म्हणजे सोळा-सतराव्या वर्षी तर ती अधिक तीव्र असते. या कथेतील अश्विनी अशाच प्रेमाचा अनुभव घेते. हळूहळू तीव्र होत गेलेल्या, एकाच वेळी सुख आणि वेदना देणाऱ्या आणि प्रेम या भावनेचा उगम कधी झाला हेही न समजलेल्या अश्विनीची ही कथा आहे. अश्विनीची बहीण दिप्ती हिचे कुमारशी लग्न ठरलेले असते. कुमार रुबाबदार आणि देखणा असतो. अश्विनीला तो आवडत असतो. दिप्तीचे मकरंद नावाच्या दुसऱ्याच तरुणावर प्रेम असते. अश्विनीची मैत्रीण सुजाताने हा प्रकार अश्विनीला सांगितलेला असतो. आपल्या बहिणीची आई-पप्पांची आणि सगळ्यात जास्त कुमारची तिला काळजी वाटू लागते. हा सगळा प्रकार आपल्या पद्धतीने हाताळून आई-पप्पांना सांगायचा बेत ती आखते. पण त्यापूर्वीच दिप्तीने पत्रामधून कुमारला हे सगळे सांगितलेले असते. अतिशय मोठ्या मनाने कुमारने हे सगळे स्वीकारलेले असते. कुमारच्या याच स्वभावावर अश्विनी भाळते. नकळतपणे त्याच्यावर प्रेम करू लागते. एकीकडे आपल्या बहिणीची काळजी आणि दुसरीकडे कुमारविषयी दाटून आलेल्या भावना अशा भावनिक गुंत्यामध्ये ती सापडते.

कुणालाही न सांगता येण्याजोग्या भावनांच्या आंदोलनांनी ती बावरून जाते. कोवळ्या वयातल्या तरल प्रेमाची अनुभूती या कथेतून मिळते.

### ३) शिल्लक

ही सगळी कथा प्रथमपुरुषी एकवचनी म्हणजे कथांतर्गत निवेदकाच्या माध्यमातून साकारली आहे. कथेच्या नायिकेच्या पूर्वायुष्यात घडलेल्या या घटना आहेत. कथा वाचताना असे वाटते की तिची डायरी आपण वाचतो आहोत. प्रत्येकाच्या आयुष्यात सुख-दुःख, जमा-खर्चाच्या रूपात येतात. सुखाचे क्षण जमेच्या बाजूला तर दुःखाचे क्षण खर्चाच्या बाजूला असतात. सगळ्याचा हिशोब केल्यानंतर असे लक्षात येते की शिल्लक काहीच उरत नाही. असेच काहीसे कथेच्या नायिकेच्या बाबतीत घडते. तिचे डॉ. संतोषवर एकतर्फी प्रेम असते. पण आपल्या प्रेमाची कबुली ती त्याला देत नाही. त्याच्याकडून प्रतिसादाची अपेक्षा ठेवते. पण स्पष्टपणे काहीही न बोलल्याने संतोषवरचे तिचे प्रेम मनातच राहाते. कस्तुरी तिची रूममेट असते. ती (कथेची नायिका) एकदम शांत, व्यवस्थित, शिस्तप्रिय असते तर कस्तुरी तिच्या अगदी उलट बडबडी, अव्यवस्थित, थोडी जास्तच मोकळी-ढाकळी असते. कस्तुरीच्या बाबतीत ती उगाचच गैरसमज करून घेते. तिच्या वागण्या-बोलण्यातला उथळपणाचा बाऊ करते. कदाचित संतोषकडून अपेक्षित प्रेम न मिळाल्याने हा कडवटपणा तिच्यात आलेला असतो. संतोषचे लग्न दुसऱ्याच कोणाशी तरी ठरते. कस्तुरी अचानक खूप आजारी पडते. तिच्या आजारपणात डॉ. संतोष तिला खूप मदत करतो. पण कस्तुरीचा त्या आजारपणात मृत्यू होतो. कथेच्या नायिकेला उगीचच अपराधी वाटते. मनातल्या गोष्टी स्पष्टपणे न सांगितल्याने नाती कायमची तुटतात याचा अनुभव 'ती' घेते. कधी कधी आपल्याला काहीच वाचवता येत नाही हा अनुभव ती घेते. काही वाचवता येत नाही म्हणजे काहीच काहीच शिल्लक राहात नाही.

### ४) प्रारंभी खेळाच्या

आपले जीवन हे एखाद्या खेळासारखेच असते. कधी हारणे, कधी जिंकणे, कधी बरोबरी तर कधी खेळाच्या प्रारंभीच चक्क माघार घेतली जाते. खेळ खेळूनही हाती काहीच लागणार नसेल तर खेळाच्या प्रारंभीच हार मानलेली बरी, माघार घेतलेली बरी हा विचार या कथेत मांडला आहे. कथेची नायिका नंदिता हिचे लग्न होते. लग्नाविषयी

तिच्या मनात प्रचंड उत्सुकता असल्याने ती लवकरात लवकर लग्न जमवते. तिच्या वडिलांचा तापट स्वभाव, सतत दबून असलेले वातावरण या सगळ्यामुळे तिला माहेरातून कधी आपली सुटका होते आहे असेच वाटत असते. चारचौघींसारखा तिचा संसार सुरू होतो. पण एकाएकी तिच्या नवऱ्याचा अपघात होतो आणि त्यातच त्याचा मृत्यू होतो. हे दुःख पचवताना तिला खूप जड जाते. नंतर फारशी मनासारखी नसली तरी तिला एक नोकरी मिळते. तिथेच तिची तिच्यापेक्षा दोन-तीन वर्षे लहान असलेल्या किरणशी ओळख होते. किरण तिच्यावर प्रेम करू लागतो. तिला स्वतःच्या घरी नेतो. पण त्याच्या वेगाइतका वेग त्या नात्यात आपण निर्माण करू शकणार नाही याचे तिला भान असते. म्हणूनच ती त्याच्यापासून जाणीवपूर्वक लांब राहाते. त्याची पुस्तके, गाण्याच्या रेकॉर्डस्, त्याची प्रसन्नता, भाबडेपणा, त्याचा सहवास या सगळ्याचा मोह होऊनही ती मागे फिरते. एकाएकी किरणही रुक्षपणे वागू लागतो. खेळाच्या प्रारंभीच हरल्याची भावना तिला उदास करते.

''नंदिता काही क्षण किरणच्या चेहेऱ्याकडे पाहत राहिली मग काहीसे उलगडल्यासारखे झाले. निरोपच सोपा करून ठेवला असा म्हणजे तो कधी घ्यावा लागणार याचा विचार कशाला करायला हवा? कदाचित काही दिवस, महिने, वर्षे.... किंवा कदाचित उद्या सकाळीदेखील.''[९]

## ५) दुसरं घर

सूक्ष्म निरीक्षणातून केलेले व्यक्तिचित्रण हे 'दुसरं घर' या कथेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. कोवळ्या वयात आपल्याच वडिलांकडून झालेला आघात 'दुसरं घर' या कथेत आहे. आपले घर, आपले आई-वडिल फक्त आपलेच आहेत अशी प्रत्येक मुलाची ठाम समजूत असते. आपल्या माणसांवर आपली मालकी असते. एखाद्या दिवशी आपल्या माणसावरचा हा मालकी हक्कच संपून जातो तेव्हा मनात प्रश्नांचे काहुर उठते.

या कथेतील साधनाच्या मनात आणि जीवनात असेच एक वादळ येते. अतिशय अबोल, शांत व सर्वसाधारण बुद्धिमत्तेची साधना या कथेची नायिका आहे. आपल्याला कॉलेजमध्ये शिक्षण घ्यायची संधी मिळते आहे यातच तिला धन्यता वाटत असते. गबाळ्या आणि शांत आईचा म्हणजेच माईचा तिला कधी कधी राग येतो. तिचे वडील दादा उंच, बोलके, उत्साही पण ते महिन्यातून पाच-सहा दिवसच घरी असतात. त्यांची

९. प्रारंभी खेळाच्या, खिडक्या, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. ११५

फिरतीची नोकरी असल्याने उरलेले दिवस ते कामावर जातात असे साधनाला सांगितलेले असते. एक दिवस अचानक शेजारच्या शैलाताई तिच्या वडिलांचे दुसरे घर आहे आणि तिला सावत्र आई आहे असे सांगतात. याबद्दल ती दादांना स्पष्टपणे विचारते तर माई तिच्यावरच चिडून दादांची बाजू घेते. दादा एकदा तिला तिच्या सावत्र आईला मुक्ताला भेटायला घेऊन जातात. मुक्ता तिला चटपटीत, बोलकी आणि हुशार वाटते. ती साधनाला दादांनी दुसरे घर का थाटले याविषयी सगळे सांगते. पण साधनाचे प्रश्न वाढतच जातात. या प्रश्नांना सोबतीला घेऊन उत्तराच्या दिशेने तिचा एक लांबलचक प्रवास सुरू होतो.

## ६) दुहेरी

एकाच व्यक्तिमध्ये दोन वेगवेगळी व्यक्तिमत्त्व दडलेली असतात. एखादी व्यक्ती कधी देवासारखी वागते तर कधी दानवासारखी. अशा लोकांच्या दुहेरी वागण्याची उकल होणे कठीण असते. कथेची नायिका शहरी जीवन सोडून अनोळखी अशा अजितशी लग्न झाल्याने अनोळखी प्रदेशात येते. ती अजितला नीटशी ओळखतही नसते. पण मामांच्या घरुन स्वतःची सुटका करुन घ्यायची म्हणून ती अजितशी लग्न करते. अजित एका डोंगराळ प्रदेशात इंजिनिअर म्हणून काम करत असतो. तो प्रदेश, ती नोकरी, ते जंगल त्याला मनापासून आवडत असते. तो प्रदेश सोडून तो येणार नाही या अटीवरच त्या दोघांचे लग्न झालेले असते. कालिदास त्याच प्रदेशातला एक तरुण असतो. त्याला शहराचे आणि शहरातील लोकांचे आकर्षण असते. अजितच्या फार विश्वासातला माणूस असतो तो. पण एके दिवशी तो तिच्याशी वाईट वागण्याचा प्रयत्न करतो. त्याचा प्रतिकार करून ती घरी येते. सगळा प्रकार कळल्याने अजित व कालिदासमध्ये वैर निर्माण होते. पैसा आणि ऐषोआराम मिळवण्यासाठी तिथल्या स्त्रिया स्वतःचे शरीर द्यायलाही मागेपुढे पहात नाहीत. अजितच्या कडूनही अशी चूक झालेली असते. एकदा अजितवर हल्ला करून कालिदासच तिला न्यायला येतो. अजित आणि कालिदासचे दुहेरी वागणे ती स्वीकारते. पोलिसांना कालिदासविषयी तक्रार करत नाही. अजितला आश्वासक आधार देते. अजितला मारणारा कालिदास तिला अजितच्या जवळ आणतो. अजितचा इतिहास आणि त्याचे आत्ताचे प्रेमळ वागणे हा त्याचा दुहेरी स्वभाव ती स्वीकारते.

**क. ४. अन्य कथा**

माणसामाणसामधल्या निरनिराळ्या नातेसंबंधांचा शोध घेणाऱ्या या कथा आहेत. अन्य कथांमध्येही नातेसंबंधांचा हा शोध, मानवी मनाची गुंतागुंत या कथांमधून दिसून येते.

**१) एकदा जाग आली**

बऱ्याच वेळा आपल्याकडे सगळे असूनही कशाची तरी कमतरता जाणवते. नेमके काय हवे आहे हेदेखील कळत नाही. सुरळीत चालले आहे असे वाटणाऱ्या आयुष्यात अचानक कोणीतरी येते, आपल्याला हवे असणारे काहीतरी म्हणजे नेमके काय हे सांगते आणि अचानक सोडून जाते. असेच काहीसे घडले 'एकदा जाग आली' या कथेच्या कालिंदीच्या बाबतीत. अभय आणि कालिंदी एकमेकांना अनुरूप असे जोडपे असते. सुख म्हणून जे असते ते सगळे कालिंदीजवळ असते. तिचे अभयवर आणि अभयचे तिच्यावर खूप प्रेम असते. कालिंदी चित्रकार असते. पण अभयशी लग्न झाल्यानंतर ती चित्रे न काढता एका ऑफिसमध्ये ॲडव्हरटायझिंगचे काम करत असते. पण चित्र काढण्याइतकी कल्पकता या कामात नसते. या सगळ्याची जाणीव तिला तिचा जुना मित्र वसू वेलणकर याच्या येण्याने होते. तो अचानक तिच्या आयुष्यात येतो. सगळ्या हालचाली स्वतःच्या ताब्यापलीकडे जाव्यात तसे तिच्या बाबतीत होते. वसूच्या रूपात आलेल्या लाटांना ती तनामनाने सामोरी जाते. वसू आणि अभय या दोघांनीही दाखवलेल्या मार्गामध्ये अंतिम टप्पा ती ठरवेल तोच असणार आहे याची तिला जाणीव होते. या विचाराने भरकटलेल्या तिच्या मनाला जाग येते. वसू जसा अचानक येतो तसाच एक दिवस अचानक निघून जातो. त्यावेळी अभय तिला सांगतो, ''आपण आपल्याला एखाद्या अनुभवातून, व्यक्तीकडून काय मिळतं हे पहायचं, बाकीची चिंता कशाला?''[१०]

कालिंदीच्या मनाचे हिंदोळे कथेमध्ये अचूक टिपले आहेत.

**२) स्रोत**

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर प्रेरणास्रोत बनणारी एखादी व्यक्ती सगळ्यांनाच भेटते. काही वळणे पार केल्यानंतर त्या व्यक्तीचा हात सुटतो. तर काही आयुष्यभर प्रेरणेचा स्रोत बनून राहातात. काही व्यक्ती अशाही असतात ज्या आधी फारशा महत्त्वाच्या

१०. एकदा जाग आली, खिडक्या, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. २२

वाटत नाहीत पण जीवनाच्या कुठल्याशा वळणावर एक वेगळीच प्रेरणा देऊन जातात. स्रोत या कथेतील किशोरीच्या बाबतीत हे सगळे प्रेरणास्रोत वेगवेगळ्या रूपात तिला भेटतात. भगत सर ही अशी एक व्यक्ती ज्यांच्यामुळे किशोरीला नेहमीच आधार वाटत असतो. कॉलेजच्या जीवनात भगत सर, तिचे पालक, मार्गदर्शक, मित्र सगळेच असतात. चारुवर तिचे नितांत प्रेम असते. त्याच्यावरील उत्कट प्रेमामुळे ती आपले माहेर, ऐश्वर्य सगळे सोडून येते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाने ती प्रचंड भारावलेली असते. माहेरच्यांच्या मनाविरुद्ध ती चारुशी लग्न करते. आपल्या आवडत्या व्यक्तीसाठी अंतर्बाह्य बदलणे म्हणजे काय? हे तिच्या प्रेमातून दिसते. केदारचे तिच्यावर एकतर्फी प्रेम असते. जितके तिचे चारुवर असते तितकेच. पण चारु आणि किशोरी या दोघांचे लग्न होते तेव्हा भगत सरांच्याच मदतीने तो एक वेगळे ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल सुरू करतो. चारुसाठी त्याच्या राजकारणाच्या आड न येणारी, त्याच्या भटकंतीत जीव रमवणारी, कुठल्याही गावाबाहेर एकांतात एकटी राहाणारी, बागकाम करून आपला जीव रमवणारी किशोरी तिच्या आयुष्यातील प्रत्येक प्रेरणास्रोताकडून काहीतरी घेऊन पुढे जाते.

३) **वाटा** (स्त्री, दिवाळी १९८२)

माणसाची कृती त्याच्या मनातल्या विचारांवर अवलंबून असते. चांगले-वाईट, सुख-दुःख आपल्या मनातल्या विचारांवरच अवलंबून असते. सगळे काही असूनही रितेपणाची भावना असो किंवा काहीही नसताना समाधानाची जाणीव हे सगळे अवलंबून असते मनावर. सानियांच्या अन्य कथांप्रमाणेच या कथेतही मनातल्या हिंदोळ्यांवर झुलणारी नायिका भेटते.

मिनू आणि अनिरुद्ध एक सुखवस्तू जोडपे असते. कामाच्या व्यापामुळे मिनूसाठी वेळ द्यायला अनिरुद्धला वेळ नसतो. मानसिक आणि शारीरिक प्रेमापासून वंचित राहाणारी मिनू आतून तडफडत असते. याविषयी अनेकदा सांगूनही अनिरुद्ध सतत दुर्लक्ष करतो. याचा परिणाम म्हणून मिनू आपल्या ऑफिसमधल्या एका मित्राबरोबर फिरायला जाते. केवळ अनिरुद्धला त्रास व्हावा या उद्देशाने त्या मित्रासोबत संबंध ठेवते. या गोष्टी अनिरुद्धला कळल्यानंतर तो चिडण्यापेक्षा दुःखी होतो. मिनूची मैत्रीण सरोजिनी स्वानुभवावरून तिला नाते तोडताना विचार करून कृती करण्याचा सल्ला देते. मिनूचे सासू-सासरे ४० वर्षे एकमेकांसोबत राहाण्याचा सोहळा साजरा करतात. तेव्हा तिला प्रकर्षाने जाणवते की त्यांनीही नात्यांमधले चढ-उतार अनुभवले असतीलच. पण ते

दोघे एकमेकांसोबत आनंदी असतात. सगळे समजल्यानंतरही अनिरुद्ध समजूतदारपणाची भूमिका घेतो आणि स्वतःच्या आयुष्याला वेगळ्या वाटेवर घेऊन जातो. कितीही खाचखळगे आले तरी अडकून न राहाता पुढे जावेच लागते. हीच ती वाट.

### ४) हिवाळ्यातला पहिला दिवस

प्रत्येक माणसाचा दिनक्रम ठरलेला असतो. झोपेतून उठणे, जेवणे, झोपणे या सगळ्याच्या वेळा ठरलेल्या असतात. कित्येक लोकांना वेळा आम्ही कशा काटेकोरपणे पाळतो याचाच अभिमान वाटतो. प्रा. बर्वे हे या लोकांपैकी एक आहेत. संयमी वर्तन, शांत स्वभाव, काटेकोरपणा या सगळ्यामुळे ते एक शिस्तप्रिय प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांना परिचित असतात. कोणतीही गोष्ट ठराविक प्रमाणातच असावी अशा मताचे ते असतात. पण हिवाळ्यातल्या एका पहाटे ते नेहमीप्रमाणे फिरायला बाहेर पडले असता स्वतःच्याच शिस्तबद्धपणाचा त्यांना राग येतो. प्रमाणाबाहेर एखादी गोष्ट केल्याने काय होते हा अनुभव त्यांनी कधीच घेतलेला नसतो. या काटेकोर वागण्याने चाकोरीबाहेरचे आयुष्य जगण्याचा अनुभव घेणे राहूनच जाते. घराच्या पायरीवर ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त बसणे हे सुद्धा त्यांना बंड वाटते. मनात बंडाचे विचार आल्यावर ते अस्वस्थ होतात. मनात येणारे विचार नेहमीपेक्षा वेगळे आणि कष्टदायक वाटू लागतात. बर्व्यांना वाटते असे विचार करणे ही आपली कुवतच नाही. त्यांच्या मनात येते त्यापेक्षा सकाळी उठून फिरणेच चांगले. माहिती तर असतेच की अमूक असेच होणार किंवा होणार नाही. शरीराला आणि मनाला याचीही सवय लागते. या सवयींमुळे सुटलेल्या क्षणांची हळहळसुद्धा सवयीची होते. ज्या दिनक्रमापासून दूर जाण्याचे विचार त्यांच्या मनात येत असतात तो दिनक्रमच त्यांच्या आयुष्याचा भाग बनतो. स्त्रियांच्या भावविश्वाचे वर्णन करणाऱ्या सानियांच्या कथांच्या गर्दीत बर्वे हे पुरुषपात्रदेखील त्या समर्थपणे रंगवतात.

### ५) चाफा

चाफ्याचे फूल सुकले तरी चाफ्याचा सुगंध दरवळतो. या कथेत नायक चाफ्याच्या फुलांचा आणि आपल्या आयुष्याचा संबंध खूप छान जोडतो. कथेची सुरुवात चाफ्याच्या झाडापासून होते आणि शेवटही चाफ्याच्या झाडाजवळच होतो. जीवनात काही प्रश्न अनुत्तरीतच राहातात. एखादी व्यक्ती हवीशी वाटते पण ती शेवटपर्यंत अप्राप्यच राहाते. रत्नाकरच्या बाबतीत बीना ती व्यक्ती असते. कॉलेजमध्ये असताना देवधर सरांच्या

बीनावर रत्नाकरचे एकतर्फी प्रेम असते. बीना महत्त्वाकांक्षी असते. तिचे लग्न होऊन ती लंडनला जाते. रत्नाकर मात्र साधी एक नोकरी टिकवू शकत नाही. एक नोकरी जाते म्हणून दुसरी नोकरी मिळवण्यासाठी देवधर सरांनी शिफारस करावी म्हणून तो त्यांच्याकडे येतो. तेव्हा त्याला तिथे सोनचाफ्याचे झाड दिसते. कॉलेजमध्ये असताना बीनाऐवजी तिची बहिण सोनू हिलाच लग्नाचे विचारले असते तर बरे झाले असते असा विचारही त्याच्या मनात येतो. सरांच्या घरातून बाहेर पडल्यावर त्याला त्याचा मित्र नरेश भेटतो. नरेश त्याला खूप दारू पाजतो. उगाचच खोटी सहानुभूती दाखवून त्याला खिजवतो. सरांकडे असताना सोनूदेखील खिजवल्यासरखी हसते आहे असे त्याला वाटते. बाहेरचे जग आपल्या मनःस्थितीप्रमाणे आपण बघतो. मनात नकारात्मक विचार असतील तर समोरच्या माणसाची प्रत्येक कृती आपल्या विरोधात आहे असेच वाटते. रत्नाकरच्या मनातली अगतिकता, दुःख चाफ्याच्या झाडापाशी सुरू होते आणि दारुच्या नशेत तो चाफ्याच्याच झाडाला कवटाळून ही अगतिकता तो संपवतो. ही कथा देखील पुरुषप्रधान आहे.

**क. ५. समारोप**

'खिडक्या' हा सानिया यांचा कथासंग्रह त्यांच्या लेखनातील दुर्बोधता जाऊन वेगळे काहीतरी मांडतो. शीर्षककथेत नात्यांमधल्या भिंती सानियांनी दाखविल्या आहेत. 'पावसाळ्यातली गोष्ट' या कथेत एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला मदत करते हे दाखवले आहे. 'वय' या कथेत अश्विनीचे कोवळ्या वयातले प्रेम वाचक म्हणून भावते. योग्य वेळी व्यक्त न झाल्याने माणसाच्या आयुष्यात काहीच शिल्लक राहात नाही. हे 'शिल्लक' ही कथा मांडते. पुढे होणाऱ्या त्रासापेक्षा खेळाच्या प्रारंभीच माघार घेणारी विधवा नंदिनी आणि तिचा निर्णय स्वीकारणारा किरण 'प्रारंभी खेळाच्या' या कथेत भेटतात. आपल्या वडिलांनी दुसरा घरोबा केल्यावर साधनाच्या मनाची अवस्था कशी होते? हे 'दुसरं घर' या कथेत मांडले आहे. अजित या आपल्या नवऱ्याचे व त्याच्याकडे काम करणाऱ्या कालिदासचे दुहेरी रूप 'दुहेरी' या कथेत आहे. आपल्याच अस्तित्वाची नव्याने ओळख करून घेण्याची भावना 'एकदा जाग आली' या कथेत आहे. आयुष्यातल्या प्रत्येक गोष्टीकडून काहीतरी प्रेरणा घेऊन पुढे जाणारी, सकारात्मक विचारांची किशोरी 'स्रोत' या कथेची नायिका आहे. अनिरुद्ध हा समंजस नायक व मिनू ही थोडीशी आततायी नायिका 'वाटा' या कथेतून वाचक म्हणून अंतर्मुख व्हायला लावतात. 'चाफा' आणि

'हिवाळ्यातील पहिला दिवस' या कथेत पुरुषपात्र प्रधान आहेत हेच या कथांचे वैशिष्टय आहे. माणसांमधल्या नातेसंबंधांचा शोध या कथासंग्रहात सानियांनी घेतला आहे. मनाच्या खिडक्या उघड्या करून कथासंग्रहातील अनेक कथा मनात साठवून ठेवण्यासारख्या आहेत.

**क. ६. संदर्भसूची**


८. खिडक्या, खिडक्या, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. १९१

९. प्रारंभी खेळाच्या, खिडक्या, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. ११५

१०. एकदा जाग आली, खिडक्या, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. २२


## ग्रंथसूची


१. खिडक्या

## ड. भूमिका

| | कथेचे नाव | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | भूमिका | मिळून साऱ्याजणी, दिवाळी १९९० |
| २ | प्रतिभा | कथाश्री, दिवाळी १९९१ |
| ३ | वारसा | अक्षर, दिवाळी १९९१ |
| ४ | सुकन्या | साहित्य सागर, दिवाळी १९९१ |
| ५ | मित्राची कथा | श्रीवत्स, दिवाळी १९९२ |
| ६ | प्रतिमाची गोष्ट | केसरी, दिवाळी १९९० |
| ७ | भेट | मिळून साऱ्याजणी, १९९१ |
| ८ | आपापले प्रश्न | माहेर, ऑगस्ट १९९१ |
| ९ | लिक्वीड क्लीनर | सा. सकाळ, दिवाळी १९९२ |
| १० | रोहिणीची डायरी | तरुण भारत, दिवाळी १९९१ |
| ११ | वर्तमान | अनुष्टुभ, दिवाळी १९९१ |
| १२ | स्वदेशी | अनुष्टुभ, दिवाळी १९९२ |

ड. १. – प्रस्तावना

ड. २. – शीर्षककथा

ड. ३. – मला भावलेल्या कथा

ड. ४. – अन्य कथा

ड. ५. – समारोप

ड. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची

### ड. १. प्रस्तावना

लेखकाच्या मनातल्या विचारांना मूर्त रूप मिळणे म्हणजे साहित्य निर्मिती. साहित्य निर्माण होताना ते स्वान्तसुखाय असते का? असे लेखन सुरुवातीला फार खरे असते. कारण मनात येईल ते लिहावेसे वाटले की आपल्या आवडत्या साहित्यप्रकारात लिहिले जाते. काय लिहायचे हे मनात पक्के झाले की लिखाणाला सुरुवात होते. मग हे लिखाण कुणासाठी वा कशासाठी तरी लिहित आहोत याचे भानच नसते. पण हे लिहिलेले वाचकांपर्यंत जावे असे प्रत्येक लेखकाला वाटते. स्वान्तसुखाय लेखन करुन वाचकांच्याही पसंतीस आलेल्या कथालेखिकांपैकी महत्त्वाचे नाव म्हणजे सानिया.

'भूमिका' हा त्यांचा कथासंग्रह स्वान्तसुखाय लेखनाचा रंजक नमुना आहे. स्वतःसाठी लिहिण्याच्या प्रक्रियेबद्दल सानिया म्हणतात, ''मनात सतत काही घडत राहाणे आणि ते शब्दांतून लेखनात उतरवणे ही निर्मितीची प्रक्रिया सगळ्यात महत्त्वाची असे मानले तर लेखन एका अर्थाने स्वान्तसुखाय होत असते. तेवढेच नाही तर मुळात ते तसे झाले तरच आपण आपल्या आंतरिक उर्मींना जागून लिहितो आहोत याचे समाधान मिळते. याचे पुढे काय करायचे हा प्रश्न लिहिताना मुळीच पडू नये. म्हणजे लिहायला घेतले की तेवढ्यापुरता तो स्वान्तसुखाय असाच प्रवास असावा.'' [११]

सानियांच्या अशाच स्वान्तसुखाय लेखन प्रवासातील महत्त्वाचा कथासंग्रह म्हणजे 'भूमिका'.

## ड. २ – शीर्षककथा

'भूमिका' हा कथासंग्रह नंदप्रसाद बर्वे यांच्या ज्ञानदा पब्लिकेशनने जानेवारी १९९४ मध्ये प्रकाशित केला आहे. या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांनी रेखाटले आहे. कथासंग्रहात १२ कथांचा समावेश आहे. मिळून साऱ्याजणी, कथाश्री, अक्षर दिवाळी, साहित्य सागर, श्रीवत्स, साप्ताहिक सकाळ, केसरी, माहेर, तरुण भारत व अनुष्टुभ या मासिकांमधून या कथांची पूर्वप्रसिद्धी झाली आहे. हा कथासंग्रह सानियांनी त्यांच्या 'आईला' समर्पित केला आहे.

### १) भूमिका

प्रत्येक माणसाची स्वतःची अशी एक भूमिका असते. ती स्वतःपुरती तर असतेच पण आपल्या आजुबाजूला असणाऱ्या लोकांच्या आयुष्यातही आपली अशी काहीतरी भूमिका असते. काही लोक स्वतःपुरत्या असणाऱ्या भूमिकेपेक्षा इतरांसाठी असलेली भूमिका बजावण्यात आनंद मानतात. काहींची भूमिका स्वतःपुरती ठाम असते. कोणतीही भूमिका कसरत म्हणून स्वीकारू नये. तडजोड करायला हरकत नाही पण मनाला ती शंभर टक्के पटली पाहिजे तरच.

वसू आणि श्रीरंग एकाच ऑफिसमध्ये काम करत असतात. सुषम आणि श्रीरंग पती-पत्नी असतात. त्यांना बारा वर्षांचा एक मुलगा असतो. अनावधानाने सुषमला पुन्हा दिवस राहातात. ही गोष्ट पचवणे दोघांनाही थोडे कठीण जाते. पण मुलाला

११. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. १७

जन्म देण्याशिवाय पर्यायच नसतो. वसू आणि श्रीरंगची घट्ट मैत्री असते. त्यामुळे तो वसूला हे सगळे सांगतो. सुषमदेखील वसूजवळ आपले मन मोकळे करते. तिला गरोदर राहिल्यापासून अस्वस्थ वाटत असते. दुर्दैवाने एका गोंडस मुलाला जन्म देऊन सुषमचा मृत्यू होतो. सुषम स्वतःपेक्षा कुटुंबासाठी जगणारी कुटुंबवत्सल स्त्री असते. तर वसू मुलं आणि संसार या चौकटीत न बसणारी असते. ती करिअरकडे लक्ष देणारी मुलगी असते. सुषमच्या मृत्यूनंतर वसूने श्रीरंगशी लग्न करावे असा श्रीरंगसहित सगळ्यांचाच हट्ट असतो. मोठ्या वयात तरी वसूने लग्न करावे असे तिच्या आईला वाटत असते. श्रीरंग तर खुषच होतो. पण वसूची भूमिका ठरलेली असते. कोणत्याही दुसऱ्या भूमिकेत अट्टाहासाने बसणे तिला मान्य नसते. लवकरच वेगळी नोकरी शोधून, दुसऱ्या शहरात जाऊन, आपल्या भूमिकेवर ती ठाम राहाते.

**ड. ३. मला भावलेल्या कथा**

'भूमिका' या कथासंग्रहातील मला भावलेल्या कथा सांगणे थोडे अवघड आहे. कारण या सगळ्याच कथा भावण्यासारख्या आहेत. प्रत्येक कथेत त्या त्या नायक, नायिकेच्या माध्यमातून एक वेगळी भूमिका लक्षात येते. कळत नकळत वाचक म्हणून आपणही त्या पात्राच्या भूमिकेत शिरण्याचा प्रयत्न करतो.

**१) प्रतिभा**

एका वेगळ्या पातळीवर तडजोडी करत आयुष्य घालवल्यानंतर अचानकपणे स्वत्व समजलेल्या एका स्त्रीची कथा म्हणजे प्रतिभा. कोणाचेही वागणे चूक की बरोबर हे व्यक्तीपरत्वे बदलत असते. काही लोक लपून छपून तडजोडी करतात. तर काही उघडपणे आपण केलेल्या तडजोडी स्वीकारतात. प्रतिभा दुसऱ्या प्रकारातल्या लोकांमधली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातली प्रतिभा तिच्याही न कळत नोकरीच्या ठिकाणी मानसिक आणि शारीरिक पातळीवर तडजोडी करते. तिच्या अशा वागण्याने तिचे आई, दादा तिच्यापासून दुरावतात. तिची बहीण अनू मात्र तिला समजून घेते. प्रतिभाला अपेक्षित असणारी सुरक्षितता तिच्या आयुष्यात आलेल्या कोणत्याही पुरुषाकडून मिळत नाही. तिचा आत्ताचा बॉस तिला हवे तसे व्यवहाराने वागवतो. कोणताही मालकी हक्क न सांगता उतरत्या वयापर्यंत तो सोबत असणे हीच तिच्या दृष्टीने सुरक्षितता असते. लग्न करूनही अशी सुरक्षितता मिळतेच यावर प्रतिभाचा विश्वास नाही. तिच्या आयुष्यात

तिचा पहिला बॉस रघुनंदन एक निरपेक्ष ठिकाण असते. त्याला प्रतिभाकडून कोणतीही अपेक्षा नसते. उलट तो तिला आधार देतो, उभारी देतो. प्रतिभाच्या आयुष्यातला तो एकमेव पुरुष असतो जो तिच्याशी निःस्वार्थीपणे वागतो. त्याच्याविषयी तिच्या मनामध्ये आनंद आहे कारण ज्याच्यावर भरभरून प्रेम करावे, आयुष्याची किंमत ठेवू नये असे कोणीतरी असते. तसेच त्याचे दुःखही तिला वाटते कारण हे कितीही वाटले तरी ते निरर्थक आहे याची तिला जाणीव असते. रघुनंदनच्या भेटीनंतर प्रतिभा पुन्हा नव्या उत्साहाने जगण्याकडे बघू लागते. भेट नसली, संपर्क नसला तरी केवळ 'असण्याची' आश्वासकता उराशी बाळगून ती वर्तमानात आणि येणाऱ्या भविष्यकाळात जगायला सज्ज होते.

कथेमध्ये प्रतिभाच्या मनातले विचार सानियांनी प्रभावीपणे मांडले आहेत. ''अप्राप्य असलेल्याचा हव्यास धरल्यावर मिळतात त्या वेदनाच ना फक्त! मग जे असं दूरच आहे ते जवळ, काही क्षण, अट्टाहासाने तरी आणण्याचा वेडेपणा कशासाठी करतो आपण?'' [१२]

अनुभवाने सगळ्या नात्यांमधला फोलपणा कळूनही समर्थपणे जगण्याची उर्मी देणारे हे स्वगत प्रेरक ठरते.

''आपलीच जन्मदात्री आई, वडील, बहीण, मैत्रीण आणि तरीही ही सगळी निरुपयोगी कर्तव्यच न संपणारी, एकातून एक निघत राहाणारी आणि त्यापलीकडे आपल्याच आयुष्यातून उलगडून बाहेर पडत जाणारा गुंता आणि त्या गुंत्याच्या शेवटी उत्तरासारखं एक अस्तित्त्व....भेट नाही, संवाद नाही, संपर्काची शक्यता नाही, पण केवळ असण्याची आश्वासकता.'' [१३]

## २) सुकन्या

आपल्या रक्ताच्या नात्यांमध्ये काही वेळा गैरसमजूतीपोटी दुरावा येतो. वेळेतच काही गोष्टींचा खुलासा केला नाही तर काही प्रश्न गुंतागुंतीचे होतात. 'सुकन्या' या कथेत श्रीधर आणि त्याच्या पहिल्या बायकोची मुलगी रेणुका यांच्या नात्याबाबत असेच काहीसे होते. सुनीताशी दुसरे लग्न केल्यानंतर रेणुकेला तिची आजी घेऊन जाते. आपली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी श्रीधर दर महिना पैसे पाठवत असतो. सुनीताचा आणि त्याचा

---

१२. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. ३९

१३. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ४०

संसार दोन मुलांसह छान बहरतो. पैसा, गाडी, बंगला, ऐश्वर्य या सगळ्या गोष्टी त्याला मिळतात. सुनीता रेणुकाला कधीच स्वीकारत नाही. त्यामुळे श्रीधर रेणुकाला चोरून भेटतो. ताईंनी म्हणजे रेणुकाच्या आजीनी रेणुकाला सारखे भेटायला येऊ नका असे सांगितलेले असते. त्यामुळे श्रीधरच्या मनाची तगमग होते. पैसे पाठवले म्हणजे कर्तव्य पूर्ण झाले असे नाही. रेणुका नेहमीच वडिलांच्या मायेपासून दूर राहाते. स्वकर्तृत्वावर ती शिकते, नोकरी करते, घर घेते. आपलाच अंश असलेल्या या तडफदार सुकन्येचा त्याला अभिमान वाटतो. पैसे देण्याव्यतिरिक्त त्याने रेणुकेसाठी काहीच केलेले नसते. हे शल्य कायम त्याच्या मनात असते. रेणुकाला तो सहज भेटू शकत नसतो. मनावर प्रचंड दडपण घेऊन तो वावरत असतो. पण रेणुका या सगळ्यावर मात करून स्वतःला सिद्ध करते. आपल्या बाबांची होणारी कोंडी समजून घ्यायचा प्रयत्न करते.

### ३) मित्राची कथा

वेळ निघून गेल्यानंतर सुचलेल्या शहाणपणाचा काहीच उपयोग नसतो. नात्यांमध्ये प्रेम, स्नेह, विश्वास टिकवणे सोपे नाही. रक्ताच्या नात्यापेक्षाही महत्त्वाच्या अशा मैत्रीच्या नात्यात तर नाहीच. माधव आणि ऋषिकेश या जीवलग मित्रांची ही कथा आहे. कॉलेजजीवनापासून ते दोघे एकत्र असतात. आयुष्याच्या प्रवाहात वहात असताना वाटा वेगळ्या होणे अपरिहार्य असते. पण या वेगळ्या वाटांवरूनही नाते टिकवता येऊ शकते. दुर्दैवाने माधव आणि ऋषिकेशच्या बाबतीत हे नाते टिकत नाही. लौकिकार्थाने सर्वच मिळवलेल्या पण तरीही एकाकी, आजारी असणाऱ्या आपल्या मित्राला समजून घ्यायला माधव कमी पडतो. हे सगळे तो जाणीवपूर्वक करत नाही. अती दारु पिण्यामुळे ऋषि मरणासन्न अवस्थेत असतो. त्यावेळी माधवला आपण आपल्या मित्राकडे नकळत का होईना दुर्लक्ष केले याची जाणीव होते. ऋषिची हाक त्याच्या मनापर्यंत पोहोचते खरी पण स्वतःच्या तत्वाने आणि अहंकाराने त्याला ती ऐकू येत नाही. त्यावेळी त्याला जाणीव होते की ही हाक आपण ऐकली नाही. हाकेला प्रतिसाद दिला नाही. आपण स्वतःचा, मैत्रीचा आणि आपल्या तत्वांचाही पराभव केला आहे. आपापल्या वर्तुळात धावताना माणूस इतका व्यग्र होतो की त्याला आजुबाजूला पहायला वेळच नाही. जेव्हा वेळ मिळतो तेव्हा वेळ मात्र निघून गेलेली असते.

मित्राची अवस्था कळल्यावर माधवला फार उदास वाटते. ‘‘त्याला क्षणभर काहीच सुचेना. काहीतरी चुकल्यासारखं वाटत होतं. काय ते मात्र उमगत नव्हतं. एखादा

राहून गेलेला तुकडा. ती पोकळ जागा जाणवते आहे पण त्या हरवलेल्या तुकड्याचा आकार कळत नाही. हा कसला जीवघेणा खेळ? स्वतःचं डोकं हातात धरून तो थोडा वेळ स्तब्ध, भान हरवून गेल्याप्रमाणे बसून राहिला.'' [१४]

पुरुषप्रधान कथेचा उत्तम नमुना म्हणजे ही कथा. पुरुषाच्या मनातील भावनांचे प्रकटीकरणदेखील स्त्रियांच्या मनातील भावनांइतकेच प्रभावी झाले आहे.

### ४) भेट

कथेच्या शीर्षकावरून बऱ्याच दिवसांनी भेटलेल्या प्रियकर प्रेयसीची भेट असावी असे वाटते. पण ही भेट आहे दोन जीवलग मैत्रीणींची. एकमेकींशिवाय पानही न हालणाऱ्या ज्योत्स्ना आणि शमी बऱ्याच वर्षांनी एकमेकींना भेटतात. ही भेट एखाद्या सामान्य भेटीसारखी नसते. या भेटीतून दोघीही आपापल्या जाणिवा समृद्ध करून जगण्याच्या नव्या वाटेवर पहिले पाऊल टाकतात. ज्योत्स्ना आणि शमी बालपणापासूनच्या घट्ट मैत्रिणी असतात. कॉलेजमध्ये आल्यानंतर शमीचा भाऊ सुधीर आणि ज्योत्स्ना प्रेमविवाह करतात. सुधीरच्या घरातल्या शिस्तीच्या वातावरणात ज्योत्स्ना छान रुळते. शमी पहिल्यापासूनच बंडखोर विचारांची असते. ती तिच्यापेक्षा वयाने मोठ्या आणि विवाहित पुरुषाशी पळून जाऊन लग्न करते. त्यानंतर सुधीर, आई, अण्णा, आत्याबाई शमीशी सगळे संबंध तोडतात. अर्थातच ज्योत्स्नालादेखील शमीशी असणारी मैत्री तोडावी लागते. ज्योत्स्ना आपले सगळे आयुष्य सुधीर आणि त्याच्या घरासाठी देते. पण सुधीरच्या घरातले आणि तोसुद्धा नेहमीच तिला गृहित धरतात. तिला तिचे काहीतरी मत असेल याची जाणीवही त्यांना नसते. शमीही तिच्या बंडखोर निर्णयाने सुखी होत नाहीच. शेवटी दोघींना आपल्या स्वत्वाची जाणीव होते.

दोन मैत्रिणींनी आपल्या अस्तित्वाचा घेतलेला शोध अंतर्मुख करतो.

### ५) आपापले प्रश्न

एका विचित्र परिस्थितीत, नाईलाजाने, आपापले प्रश्न घेऊन एकत्र राहाणारे मित्र, मैत्रीण वैजू आणि मकरंद या कथेत आहेत. समाजात राहात असतानाही प्रत्येकाला आपापले वेगळे असे जग असते. या जगात आपापली जगण्याची एक पद्धत असते. आपापले प्रश्न घेऊन प्रत्येकजण वाटचाल करीत असतो. आपापले आयुष्य जगणारे मित्र

---

१४. मित्राची कथा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ७८

मैत्रीण खूप वर्षांनी पुन्हा एकदा भेटतात. वैजयंती आणि मकरंद कॉलेजला असताना खूप जवळचे मित्र मैत्रीण असतात. रवि आणि वैजयंती प्रेमविवाह करतात. मकरंद पहिल्यापासूनच सगळ्यांना मदत करणारा, साधा मुलगा असतो. मीनाक्षीशी त्याचे लग्न होते. त्यांना मधुरा नावाची एक गोंडस मुलगीदेखील होते.

रविच्या अकाली मृत्यूने वैजयंती एकटी पडते. पहिले वर्ष ती तिच्या माहेरी राहाते. पण स्वतंत्र विचारांची, स्वतःच्या पायावर उभी असणारी वैजयंती कोणाशीही जुळवून घ्यायच्या स्वभावाची नसते. तिला मुलांची, संसाराची, स्वयंपाकघरात रमण्याची विशेष आवड नसते. रविच्या जाण्यानंतर ती तिचे स्वतःचे, एकटीचे विश्व निर्माण करते. यातच एक दिवस अचानक मकरंद तिच्या घरी येतो, तोही त्याच्या एकुलत्या एका मुलीला घेऊन, बायकोला कायमचे सोडून. सुरुवातीला तो आल्याचा तिला फार ताण येत नाही. पण संध्याकाळी तो येतो आणि रात्रीचे अकरा वाजतात तरी जात नाही. दुसऱ्या दिवशी त्याची मुलगी आजारी पडते. नंतर त्याला परदेशी नोकरी मिळेपर्यंत तो वैजयंतीकडेच राहील असे सांगितल्यावर मात्र ती वैतागते. पण नंतर ती हे स्वीकारते की आता तिच्या घरी एक गरजू बाप आणि त्याची मुलगी राहाणार आहे. बाकीच्यांचे जसे कुटुंब असते तसेच कुटुंब असणार आहे. फक्त जरासे उलटे.

## ६. लिक्विड क्लिनर

सानियांनी एका वेगळ्या आशादायी विचारांची ही कथा मांडली आहे. आयुष्यात अडचणी, संकट येतच असतात. या सगळ्यात खचून न जाता मनाच्या उभारीने माणूस संकटावर मात करु शकतो हे या कथेतून दिसून येते. मनातल्या मळलेल्या विचारांवर मनाचेच लिक्विड क्लिनर वापरणे गरजेचे आहे असा वेगळा संदेश या कथेत आहे.

जाहिरात कंपनीत काम करणारी मुक्ता या कथेची नायिका आहे. तिचा चार वर्षांचा मुलगा अमर मतिमंद आहे. त्याच्या मतिमंदत्वामुळे तिचा नवरा प्रकाश नाखूश असतो. त्यांचे दोघांचे आधीचे आयुष्य खूप आनंददायी असते. मात्र अमरच्या जन्मानंतर निरस बनते. मुक्ता आपल्या कल्पकतेमध्ये वाढ करण्याचा प्रयत्न करते. कारण ती जाहिरात क्षेत्रात काम करत असते. रोज नित्य नव्याने कल्पना सुचवून त्या अमलात आणणे हेच तिचे काम असते. अमरच्या जन्मानंतर ती स्वतःमध्ये बदल होऊ देत नाही. मात्र नकळत व्हायचा तो परिणाम होतोच. लिक्विड क्लिनरच्या एका जाहिरातीदरम्यान तिला हे जास्तच जाणवते. गुंतवून टाकणारे विचार दूर करण्यासाठी असे एखादे लिक्विड

क्लिनर हवे. तेवढे घेऊन साफ केले की झाले. अमर सामान्य मुलासारखा नसल्याने तीदेखील व्यथित होते. त्याचा कोणाशीही संवाद नाही. कोणी त्याच्याशी संवाद साधु शकत नाही. या सगळ्या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी, ही अवस्था पुसून टाकण्यासाठी एक लिक्विड क्लिनर ती वापरते. त्यामुळे जाहिरातीतली वेंधळी, गोंधळलेली स्त्री पुसली जाऊन एक स्मार्ट स्त्री तिच्या डोळ्यासमोर उभी राहाते. तिच्या मनाला उभारी मिळून तिला नवीन कल्पना सुचू लागतात.

**ड. ४. अन्य कथा**

'भूमिका' या कथासंग्रहातील अन्य कथांमधल्या कथादेखील वाचनीय आणि अंतर्मुख करणाऱ्या आहेत.

**१) वारसा**

प्रत्येक माणूस विशिष्ट ध्येयासाठी जगतो. व्यवहारी आणि संवेदनशील दोन प्रकारचे लोक असतात. 'वारसा' या कथेत या सगळ्याचा उल्लेख आहे.

कथेमध्ये मृणाल व सौरभ पती-पत्नी आहेत. मिलींद हा त्यांचा जवळचा मित्र असतो. कॉलेजमध्ये असताना एका विशिष्ट ध्येयाने तिघेही झपाटलेले असतात. खरे तर तिघेही संवदेनशील मनाचे असतात. नवनिर्मितीचा ध्यास त्यांना असतो. विलक्षण कल्पनाशक्ती आणि सृजनशीलता त्या तिघांकडे असते. मृणाल आणि सौरभ आपापल्या कामात ही संवदेनशीलता जपतात. आजुबाजूला चालणाऱ्या वाईट गोष्टी, भ्रष्टाचार, अराजकता यावरून व्यथित होतात. त्यामुळेच या अशा वातावरणात मुलाला जन्म न देण्याचा निर्णय घेतात. मिलींदला कॉलेजपासूनच लीडरशिपमध्ये रस असतो. त्याच्या घरात काका, वडील राजकारणात असतात. त्यामुळे त्याच्यामध्ये नेता होण्याचे गुण वारशानेच आलेले असतात. मृणालला राजकारणाचा आणि राजकारण्यांचा प्रचंड राग असतो कारण समाजात घडणाऱ्या वाईट गोष्टी थांबवणे शक्य असूनही ते थांबवत नाहीत. पण दुर्दैवाने तिचा अगदी जवळचा मित्र, खरेपणाने वागणारा, संवेदनशील मिलींद याच वाटेने पुढे जाणार हे कळल्यावर तिला वाईट वाटते. मिलींद त्याच्या घराचा वारसा जपण्यासाठी ही वाट चोखाळतो. वेगळे पर्याय असूनही स्वतः राजकारणात पुढे जाण्याचे ठरवतो. राजकारणाच्या खेळात विजय मिळवण्याच्या ईर्षेने छक्के पंजे खेळण्याचे ठरवतो. या प्रवासात मृणाल आणि सौरभचा हात सुटणार नव्हे सोडावा लागणार या कल्पनेने तो व्यथित होतो. मृणालदेखील अस्वस्थ होते. वडिलांचा वारसा जपणाऱ्या मिलींदचा जड

अंतःकरणाने ती निरोप घेते.

## २) प्रतिमाची गोष्ट

काही वेळा एखाद्या व्यक्तीबाबत आपण उगीचच गैरसमज करून घेतो. ती व्यक्ती कितीही चांगली वागली तरी आपण पूर्वग्रहदूषित नजरेनेच तिच्याकडे पहातो. या सगळ्या गोष्टी समजून घेण्याचीही तयारी नसते. असेच काहीसे प्रतिमाच्या बाबतीत घडते. प्रतिमा आपल्या आईसोबत रघुवीरकडे म्हणजे तिच्या बाबांच्या बॉसकडे लहानपणापासून राहात असते. प्रतिमाच्या वडिलांच्या निधनानंतर रघुवीरच त्यांचे पालनपोषण करत असतो. त्यामुळे प्रतिमाला मात्र त्यांच्या उपकाराचे ओझे नकोसे वाटत असते. त्यांच्याच पैशांवर आपण वाढलो, शिकलो ही जाणीव तिला अस्वस्थ करत असते. आपली आई दुसऱ्याच्या घरात मोलकरणीसारखी राबते, वरून त्यांच्याच उपकारांचे गुणगान गाते ही गोष्ट तिला अजिबात सहन होत नाही. प्रतिमा जेव्हा होस्टेलला राहायला येते तेव्हा एकटीने राहाण्याचे हे स्वातंत्र्य तिला मनापासून भावते. रघुवीरचे घर तिला कधीच आपले घर वाटत नाही. ती होस्टेलवर आल्यानंतर रघुवीर कामाचे निमित्त काढून तिला भेटायला येतो. आपल्या स्वतःच्या मुलीप्रमाणे तिची काळजी घेतो. हे सगळे सुरुवातीला प्रतिमाला नाटकी वागणे वाटते. तिच्या मैत्रिणीला सुचाला मात्र तिचे हे म्हणणे पटत नसते. कारण स्वतःचे आई-वडिलही मुलांची इतकी काळजी घेत नाहीत हे तिला स्वानुभवावरून माहिती असते. कथेच्या शेवटी प्रतिमाला रघुवीरच्या भावनेतला खरेपणा भावतो. त्या घरापासून मुद्दाम दूर आलेली प्रतिमा सुट्टीत घरी जायला तयार होते. ती म्हणते, ‘‘परीक्षा झाली की सुट्टीत आम्ही दोघी येऊ. सुचाला घर पाहायचं आहे.’’ [१५]

## ३) रोहिणीची डायरी

डायरी लिहिणे हे माणसाच्या मनातील विचारांचा निचरा होण्याचे प्रभावी माध्यम आहे. या कथेतही डायरीच्या माध्यमातून रोहिणीच्या मनातील विचारांचा मागोवा घेतला आहे. एका श्रीमंत घरातील रोहिणीचे अजय नावाच्या मध्यमवर्गीय मुलावर प्रेम असते. या प्रेमापोटी ती त्याच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेते. रोहिणीच्या घरी मोकळे व पोषक वातावरण असते. अजयच्या घरी मात्र अतिशय संकुचित विचारांचे लोक असतात. स्वयंपाक, घरकाम, झोप, बाजारहाट यापलीकडचे जग त्यांना माहीती नसते. ते समजून

१५. प्रतिमाची गोष्ट, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन, जाने. १९९४, पृ. क्र. ९७

घेणेही त्यांना नकोसे वाटते. याउलट रोहिणीच्या घरी प्रत्येक मुद्द्यावर समरसून गप्पा मारणे, चर्चा करणे, हसणे-खिदळणे असे वातावरण असते. पद्मा ही अजयची बहीण. रोहिणी तिला आपल्या बहिणीप्रमाणे म्हणजे विनयासारखे वागवण्याचा खूप प्रयत्न करते. तिथल्या वातावरणाशी आणि लोकांशी जुळवून घेण्याचा सुद्धा ती खूप प्रयत्न करते. पण तिला या सगळ्यात यश मिळत नाही. अजयचेदेखील नंतर नंतर त्याच्याच आई-वडिलांशी पटेनासे होते. त्यामुळे रोहिणी आणि अजय वेगळे राहाण्याचा निर्णय घेतात. एकीकडे अजयला लोक काय म्हणतील? वगैरे प्रश्न पडतातच. पण रोहिणीला असे वाटते की, तिच्या आयुष्यातल्या काही महत्त्वाच्या वर्षांना या कृतीनेच अर्थ प्राप्त होईल. म्हणून लग्नाच्या होकारासाठी ती त्याच्या उत्तराची जितकी आतुरतेने वाट पहात असते तितक्याच आतुरतेने त्याच्या निर्णयाच्या उत्तराची वाट पहाते. कुटुंब व्यवस्थेला मानणारी रोहिणी या कथेची नायिका आहे. कुटुंब बांधलेले राहावे म्हणून प्रयत्न करुनही यश न मिळाल्याने ती वेगळे राहाण्याचे ठरवते. कुटुंबवत्सल असूनही स्वतंत्र विचारांची रोहिणी मनाला भावते. रोहिणीचे जीवनाविषयीचे सुस्पष्ट विचार या कथेत आहेत. 'मूल्यं, आपण आपल्याच आयुष्यात आखून घेतलेले नियम. कुणीतरी लादून दिलेले नाहीत. म्हणजे समाज, धर्म वगैरे गोष्टींनी तर आपणच बनवलेले आपले नियम की आपण कसं वागायचं, कसं राहायचं, कुठल्या गोष्टी पाळायच्या, कशाला महत्त्व द्यायचं.' [१६]

### ४) वर्तमान

भविष्याची चिंता आणि भूतकाळातले दुःख या दोन्हीमध्येच माणसाचा वर्तमान बिघडून जातो. वर्तमानात जगणे हे खरे जगणे. आत्ताच्या क्षणाचा आनंद घेणे हे खरे जीवन - असे जगण्याची इच्छा असूनही माणूस तसे जगू शकत नाही. प्रदीप या तरुणाची ही कथा आहे. विचारी, सदाचारी आणि सुशिक्षित असूनही केवळ नोकरी नाही म्हणून त्याला त्याच्याच घरात फारशी किंमत नसते. त्याच्या मित्रांमध्ये एखाद्या विषयावर चर्चा करताना लेख वाचून दाखवले जात असत. यामुळे त्यांची वैचारिक पातळी उंचावते. पण घरातल्या वातावरणामुळे तो मोकळेपणाने बोलत नसे. त्याची बहिण शुभा आणि त्याचे नातेही फार मैत्रीपूर्ण नसते. त्या दोघांना एकमेकांविषयी कितीही जिव्हाळा वाटला तरी आई-वडिलांच्या दबावामुळे ते मोकळेपणाने बोलत नसत. शुभाचे लग्न तिच्या तोडीस तोड नसलेल्या व्यक्तिशी होते. ती गरोदर राहते. मात्र खटक्यांचे प्रमाण वाढल्याने ती

१६. रोहिणीची डायरी, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १४९

माहेरी निघून येते. खरे तर तेव्हा प्रदीप आणि शुभा एकमेकांशी अधिक मोकळेपणाने बोलतात. आई-वडिलांनी सांगितल्याप्रमाणे वागले पाहिजे, त्यांचा आदर केला पाहिजे हे सगळे ठीक, पण आई-वडिल या सगळ्याचा अतिरेक करत असतील तर तेही चूकच आहे. त्यामुळे प्रदीप आणि शुभाचा वर्तमान बिघडत असतो. एकमेकांशी मनमोकळ्या गप्पा मारून वर्तमानकाळ प्रकाशित करण्याचा मार्ग या बहीण भावांना सापडतो.

## ५) स्वदेशी

आपले घर, आपली माणसे, आपला देश या संकल्पना मान्य करायच्या नाही असे कितीही ठरवले तरी त्या अस्तित्वात असतातच. स्वतंत्र, एकटं, निर्बंध असे आयुष्य हवेसे वाटत असले तरी कोणत्या तरी एखाद्या क्षणाला आपलेपणाची भावना मनात निर्माण होतेच. माधव हा 'स्वदेशी' या कथेचा नायक आहे. आपल्या मतांवर ठाम असणारा माधव एकटे जगण्याच्या हव्यासापोटी आपला देश, आपली माणसं सोडून परदेशात जातो. आपल्या कुटुंबाचे अस्तित्वच पुसून टाकण्याचा प्रयत्न करतो. आपल्या मनाप्रमाणे कोणत्याही जबाबदारीत न अडकता स्वच्छंद आयुष्य जगतो. आई-वडिलांनी ठरवून दिलेल्या मुलीशी लग्न होऊनही तिला परदेशी यायचे नसते म्हणून तो तिला घटस्फोट देतो. तिथल्याच एका परदेशी स्त्रीसोबत लग्न न करताच राहातो. सगळा डाव मांडायचा पण कोणतीही जबाबदारी नको, अडकणे नको असा त्याचा स्वभाव असतो. तो पुन्हा आपल्या देशात जाण्याचा निर्णय घेतो तेव्हा ती परदेशी मैत्रीण त्याच्यासोबत यायला नकार देते. उतारवायात आलेला एकटेपणा त्याला हवासाही वाटतो आणि खायलाही उठतो. त्याचा धाकटा भाऊ महेश याचा अकाली मृत्यू होतो. एका गावात राहूनही आपल्या आईशी, भावाच्या कुटुंबाशी त्याचा फारसा संबंध नसतो. अगदी जेवढ्यास तेवढे संबंध ठेवतो. पण भावाच्या कुटुंबियांना मात्र त्याचा आधार वाटत असतो. त्याला बरे वाटत नसताना त्याची म्हातारी आई त्याला भेटायला येते. स्वतःचे घर म्हणावे असे प्रत्येकाला असतेच. ते त्या व्यक्तीने मान्य केले किंवा नाही केले तरी आपलेपणा कमी होत नाही. कधीतरी माधवलादेखील एकटेपणा वाटतो. त्याच्या मनात विचार येतो, ''आपण चार दिवस खेळायला क्लबवर गेलो नाही म्हणून कोणी नवल करणार नाही की नेहमीच्या दुकानात भाजी-ब्रेड आणायला गेलो नाही म्हणून दुकानदार काळजी करणार नाही. हाच तो सर्वस्वी एकटेपणा.'' [१७]

---

१७. स्वदेशी, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १८६

माधवला आपल्या माणसांचे, घराचे आणि स्वदेशाचे महत्त्व त्याच्या घरातल्या लोकांच्या वागण्यामुळे पटते.

### ड. ५. समारोप

'भूमिका' या कथासंग्रहातील कथा संमिश्र स्वरुपाच्या आहेत. स्त्रियांचे भावविश्व रेखाटताना पुरुषप्रधान कथांचा समावेशदेखील या कथासंग्रहात आहे. दोन मैत्रिणींचे भावविश्वदेखील कथेत आहे. शीर्षककथेमध्ये ठाम भूमिका असलेली वसू आपल्याला भेटते. श्रीरंग हा तिचा मित्र असतो. श्रीरंगची पत्नी बाळंतपणात गेल्यानंतर वसूने त्याच्याशी लग्न करावे असे सगळे सुचवतात. पण मैत्रीच्या नात्यापलीकडे वसूला काहीच नको असते. ती तिच्या भूमिकेवर ठाम राहाते. वेळोवेळी मनात असताना वा नसताना केलेल्या तडजोडी मोकळेपणाने स्वीकारणारी 'प्रतिभा' या कथेत आहे. आपल्या चुकांची कबुली उघडपणे देण्याचे धाडस प्रतिभाकडे आहे. स्वकर्तृत्वाने स्वतःला सिद्ध करणारी रेणुका 'सुकन्या' कथेची नायिका आहे. पहिल्या पत्नीची मुलगी रेणुका हिला पित्याचे प्रेम देऊ शकत नसल्याची खंत तिच्या वडिलांच्या मनात आहे. पुरुषप्रधान कथेचा उत्तम नमूना म्हणून 'मित्राची कथा' या कथेकडे पहाता येईल. माधव आणि ऋषिकेश या दोन मित्रांची ही कथा आहे. आपल्या मित्राला समजून न घेतल्याची खंत माधवला चटका लावते. ज्योत्स्ना आणि शमी या दोन मैत्रिणींची भेट 'भेट' या कथेत सानिया यांनी प्रभावीपणे रेखाटली आहे. दोन भिन्न व्यक्तिमत्त्वाच्या या मैत्रीणी भेटीनंतर आपले स्वत्व शोधताना दिसून येतात. कुटुंब नसतानाही कुटुंबासारखे भासावे असे वैजू आणि मकरंद या मित्र मैत्रीणीचे कुटुंब 'आपापले प्रश्न' या कथेचे वैशिष्ट्य आहे. मनातही नसताना अचानकपणे आलेला मित्र आणि त्याची लहानगी वैजूच्या कुटुंबाचा भाग होऊन जातात. आपापले प्रश्न घेऊन ते एकत्र राहातात. आपल्या प्रश्नांवरचा एक रामबाण उपाय असणारे लिक्विड क्लिनर सानियांच्या कल्पनाशक्तीचा अफाट नमुना आहे. मिलींद, सौरभ आणि मृणाल या संवेदनशील मित्रांची कथा 'वारसा'. वडिलांचा राजकारणाचा वारसा जपण्यासाठी मिलींद त्या रस्त्याची निवड करतो. काही व्यक्तींविषयी आपण उगीचच गैरसमज करून घेतो. अकारण आकसाने वागतो असेच काहीसे घडते 'प्रतिमाची गोष्ट' या कथेत. प्रेमविवाहानंतर आपल्या सुखाचा विचार न करता कुटुंबाचा विचार करणारी तरीही स्वतंत्र विचारांची रोहिणी 'रोहिणीची डायरी' या कथेतून आत्मभान देते. घरातल्या वातावरणाचा परिणाम होऊन मनाने दुरावलेले बहिण-भाऊ वर्तमानात जगण्याच्या विचाराने पुन्हा एकत्र

येतात ‘वर्तमान’ या कथेत. वेगळ्या विचारांचा संदेश ‘स्वदेशी’ या कथेतून सानियांनी दिला आहे. आपण आपल्या माणसांना, देशाला विसरलो तरी वेळेला आपली माणसेच आपल्या मागे उभी राहातात हाच तो विचार. स्वान्तसुखाय लेखन करताना वाचकांना ‘भूमिका’ हा उत्तम असा कथासंग्रह सानिया यांनी दिला आहे.

## ड. ६. संदर्भसूची


११. वाटा आणि मुक्काम – सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. १७

१२. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. ३९

१३. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ४०

१४. मित्राची कथा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ७८

१५. प्रतिमाची गोष्ट, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन, जाने. १९९४, पृ. क्र. ९७

१६. रोहिणीची डायरी, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १४९

१७. स्वदेशी, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १८६


## ग्रंथसूची


१. वाटा आणि मुक्काम

२. भूमिका

## इ. परिमाण

| | कथा | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | परिमाण | रसिक, दिवाळी अंक १९८९ |
| २ | स्पर्श | किस्त्रीम, दिवाळी अंक १९८७ |
| ३ | क्षितीज | जनश्रद्धा, दिवाळी अंक १९८८ |
| ४ | एक पाऊल पुढे | श्रीवत्स, दिवाळी अंक १९८९ |
| ५ | काजवे | अक्षर, दिवाळी अंक १९८९ |
| ६ | स्व-रूप | किस्त्रीम, दिवाळी अंक १९८८ |
| ७ | चित्र | किस्त्रीम, दिवाळी अंक१९९० |
| ८ | परिघाबाहेर | स्पंदन, दिवाळी अंक १९९० |
| ९ | आकार | किस्त्रीम, दिवाळी अंक १९८९ |

**इ. १. – प्रस्तावना**

**इ. २. – शीर्षककथा**

**इ. ३. – मला भावलेल्या कथा**

**इ. ४. – अन्य कथा**

**इ. ५. – समारोप**

**इ. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### इ. १. प्रस्तावना

माणसांमाणसातले परस्परसंबंध आणि त्याबद्दलचे चिंतन इथूनच साहित्याचा प्रवास सुरू होतो. याबद्दलच्या चिंतनामुळेच लिहिण्याची उर्मी साहित्यिकाला मिळते. सतत लिहिल्यामुळे लिहिण्याच्या प्रवासात या नातेसंबंधांची परिमाणे आणखी चांगल्या पद्धतीने शोधता येतात.

'परिमाण' या कथासंग्रहातील कथांमध्ये मध्यम किंवा उच्चमध्यमवर्गीयांचे जीवन, त्यातले भोगापभोग, महत्त्वाकांक्षा, त्यांच्या कौटुंबिक आणि वैवाहिक जीवनातले ताणतणाव आणि त्यांची सूक्ष्मचित्रे दिसून येतात. प्रौढ स्त्री-पुरुषांमधले अनुबंध हा विषय त्यांच्या कथांमधून येतो. मात्र व्यक्ती, परिसर व त्यांचे व्यवसाय भिन्न भिन्न राखल्याने कथा रोचक होतात. खूप काही चांगले, अर्थवाही वाचल्याचा प्रत्यय या कथा देतात. रुढार्थाने कथानक नसलेल्या या कथा आंतरिक उर्मीतून आलेल्या आहेत. कथा आकर्षक

होण्यासाठी घ्यायचे विषय, लेखनात चलाखी किंवा दिखाऊ कारागिरी या कथांमध्ये दिसत नाही. व्यक्तींमधील मानसिक, भावनिक संबंधांना त्यांच्या कथांमध्ये महत्त्व आहे. समकालीन तरुण पिढीचे दर्शन त्यांच्या या कथांमधून होते.

### इ. २. शीर्षककथा

'परिमाण' या सानियांच्या कथासंग्रहाचे प्रकाशन अशोक कोठावळे यांच्या मॅजेस्टिक प्रकाशनसंस्थेच्या वतीने झाले आहे. या कथासंग्रहाची पहिली आवृत्ती जानेवारी १९९६मध्ये प्रकाशित झाली असून दुसरी आवृत्ती सप्टेंबर २००८ रोजी प्रकाशित झाली आहे. ११ कथा असलेल्या या कथासंग्रहात दर्जेदार व वाचनीय कथांचा समावेश आहे. या कथांची रसिक, किस्त्रीम, जनश्रद्धा, श्रीवत्स, अक्षर, स्पंदन या दिवाळी अंकांमधून पूर्वप्रसिद्धी झाली आहे. अनिल दाभाडे यांनी मुखपृष्ठ रेखाटले आहे. पुस्तकाची अर्पणपत्रिका सानियांच्या इतर लेखनाप्रमाणे थेट व प्रांजळ आहे. अर्पणपत्रिकेत त्या म्हणतात,

'माझ्या प्रिय मित्रास,
आयुष्याची सोबत करताना
आनंदात सहभागी झालास,
दुःखात बळ दिलेस,
स्वातंत्र्याचा मान राखलास
यासाठी

उत्कटता हे त्यांचे लेखन वैशिष्ट्य अर्पणपत्रिकेपासूनच अनुभवायला मिळते.

### १) परिमाण

'परिमाण' ही सानियांची एक वेगळी कथा आहे. नात्याचा एक वेगळा बंध उलगडून दाखवणारी ही शीर्षककथा आहे. आपल्या सुखाचे नेमके परिमाण कोणते हे आयुष्याच्या उतरणीला लागल्यावर कळलेल्या एका अभिनेत्याची ही कथा आहे. कैलास आणि देवकी लहानपणापासून जिवलग मित्र मैत्रीण असतात. कैलास स्वच्छंदी, स्वार्थी, बेफिकीर असतो तर देवकी अबोल, ठाम, स्वच्छ विचारांची. ती त्याच्यावर नकळत, मूकपणे प्रेम करत असते. त्याचे प्रेम मिळत नसतानाही कैलासच्या घरच्यांची जबाबदारीदेखील देवकी पेलते. कोणत्याही उपकाराचा अविर्भाव न आणता ती हे काम

मनापासून करते. मोठा अभिनेता व्हायच्या ध्यासापोटी कैलास घर सोडून जातो. देवकी मात्र लग्न होऊनही कैलासच्या घरच्यांची जबाबदारी घेते. काही काळ लोटल्यानंतर देवकी कैलासला भेटायला जाते. कैलासच्या मेकअपरूममध्येच ते एकमेकांवर समरसून प्रेम करतात. देवकी त्याला म्हणते, ''मला केव्हाच माहित होतं फक्त इथपर्यंत यायला इतकी वर्ष जावी लागली. या गोष्टीला तुझ्या आणि माझ्या दोघांच्याही आयुष्यात फारसं सिम्बॉलिक महत्त्व नाही. तरीही आत्ता हे घडण्याला खूपच अर्थ आहे....नाही?'' [१८]

या कथेतील देवकी हे पात्र वेगळ्या वाटेचा विचार करणारे आहे. तिच्या विचारांचा वेगळेपणा पुढील संवादातून दिसून येतो. ''माणसाच्या आत एक हाव असते कैलास. जी मला प्रत्येकात दिसते. तुझ्या-माझ्यासकट प्रत्येकात. त्याचं स्वरूप आणि खोली मला भयचकित करून टाकते; पण तरीही आकर्षण सुटत नाही. मग वाटतं, हे असं नैसर्गिक आहे का? असल्यास का आहे? या 'का'चं उत्तर मिळता मिळत नाही. कदाचित ते न मिळण्यातच सगळी सांगता असेल.'' [१९]

देवकीसारखीच तिची मुलगी रितू हीदेखील तिच्यासारखीच वेगळा आणि स्वतंत्र विचार करणारी आहे. आपल्या आईच्या अखेरच्या दिवसांमध्ये आईच्या प्रियकराची आणि आईची भेट व्हावी म्हणून धडपडते. ती आपल्या आईचा प्रियकर सहजपणे स्वीकारते. ती म्हणते, ''पपांवर तिचं खूप प्रेम होतं. त्यांना तिनं सगळ्याप्रकारे साथ दिली. आम्हा तिघांचं तिनं उत्तम केलं. संगोपन, अभ्यास, काळजी. आई म्हणून कुठल्याही प्रकारे ती कमी पडली नाही. मग तिचा तिला आयुष्याचा एखादा भाग जो ती वेगळा ठेवू इच्छित होती, आम्ही का नाकारावा?'' [२०]

प्रसिद्धी आणि पैशांमध्ये गुंतलेल्या कैलासला देवकी कळतच नाही. तिची आणि त्याची शेवटची भेटही होऊ शकत नाही. नकळत, अबोल तर कधी उत्कटतेने प्रेम करणारी देवकी कैलासला समजतच नाही. तिचा एकटेपणा जाणून घ्यायचा तो कधीही प्रयत्न करत नाही. सुखाचे जे परिमाण लावून तो संघर्ष करत असतो, तडजोडी करतो ते देवकीपुढे काहीच नव्हते याची जाणीव त्याला होते. पण तोपर्यंत उशीर झालेला असतो. सर्वस्व वाहून निरपेक्षपणे प्रेम करणारी देवकी व आपल्या आईचे मर्मबंध समजून घेऊन तिला मदत करणारी रितू ही स्त्रीची दोन रूपे या कथेत आहेत. स्वार्थी, लोभी, बेफिकीर कैलास आणि बायकोचा केवळ शोपीस म्हणून वापर करणारा सुखदेव अशी पात्रं या

---

१८. परिमाण, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १३
१९. परिमाण, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १२
२०. परिमाण, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १५

कथेत भेटतात. सुखाचे परिमाण सांगणारी ही कथा आहे. हे परिमाण सांगणारी प्रांजळ, प्रामाणिक, उत्कट, निरपेक्ष देवकी वेगळा विचार देते.

### इ. ३. मला भावलेल्या कथा

'परिमाण' या कथासंग्रहाची शीर्षककथादेखील मला भावलेल्या कथांपैकी एक आहे. या कथासंग्रहातील अन्य कथांपैकी मला भावलेल्या कथा निवडणे थोडे जिकीरीचे होते. कारण सगळ्याच कथा आपापल्या परीने वेगळा आशय व्यक्त करणाऱ्या आहेत. त्यापैकी काही कथांचा आशय आता जाणून घेऊ या.

### १) स्पर्श

'स्पर्श' ही कथा आहे सुचित्रा या सर्वसामान्य गृहिणीची. ती आपल्या आयुष्यात नेहमी आपल्या कुटुंबाला प्राधान्य देते. आयुष्याची पंधरा–वीस वर्षे कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडते. या काळात ती स्वतःचे अस्तित्वच ठेवत नाही. नवरा, घर, मुले यामध्ये स्वतःला झोकून देते. आपणही सुंदर आहोत, आत्मविश्वासाने काही करू शकतो याची तिला जाणीवच नसते. तिच्या समर्पित वृत्तीला तिचे कुटुंबीय मात्र गृहित धरतात. ही वेदना तिच्या मनात खोलवर असते. पण ही वेदना आहे या भावनेचा स्पर्शही तिच्या मनाला होत नाही. कारण तो विचार करायलादेखील तिला वेळ नसतो. सुरेंद्रच्या म्हणजेच नवऱ्याच्या आजारपणामुळे स्वतःमधली सुचित्रा तिला गवसते. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल्यानंतर सुचित्रा सुरेंद्रची खूप काळजी घेत असते. मुलगा, मुलगी, मित्र, नातेवाईक सगळे चौकशीपुरते येतात. ती मात्र त्याची मनापासून सेवा करते. या प्रेमाची सुरेंद्रला मात्र जाणीव नसते. आजारपणाने तो आणखीनच चिडचिडा होतो. या सगळ्यात डॉ. विक्रम हा तरुण डॉक्टर सुचित्राला उमेदीची नवी आशा देतो. प्रत्यक्ष काहीही कृती न करता तिच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करतो. डॉ. विक्रम हे सगळे सुचित्रासाठी करत नाही. त्याचा स्वभावच मोकळा, दिलखुलास आणि प्रेमळ असतो. पण सुचित्राला त्याने केलेल्या कौतुकाने, प्रशंसेने बळ मिळते. आपल्या मुलाच्या वयाचा असला तरी तो पुरुष आहे. एका पुरुषाने आपली इतकी स्तुती करावी याचा तिला आनंद होतो. तिच्या मनात डॉ. विक्रमबद्दल प्रेम आणि कृतज्ञता दाटून येते. तिच्या स्वत्वाचा स्पर्श विक्रममुळे तिला जाणवतो.

## २) क्षितिज

परदेशात जाऊन उच्चशिक्षण घेऊन परदेशी व्यक्तीशी लग्न करण्याचा धाडसी निर्णय घेतलेली यशोधरा 'क्षितिज' या कथेची नायिका आहे. इतका धाडसी निर्णय घेऊनही मनाच्या पातळीवर तिची क्षितिजे तितकीशी विस्तारलेली वाटत नाहीत.

बाळबोध वातावरणात लहानाची मोठी झालेली यशोधरा शिक्षणासाठी परदेशात जाते. तिच्या परदेशी जाण्याला तिच्या वडिलांचा विरोध असतो. पण तिच्या रमणकाकांचा पाठिंबा असतो. परदेशी गेल्यानंतर तिथे केविन नावाच्या अमेरिकन तरुणाशी ती लग्न करते. अर्थातच ही गोष्ट तिच्या घरात न पटणारी असते. केविनच्या घरच्यांनी मात्र आपल्या सुनेला स्वीकारले आहे. लग्नानंतर जवळपास आठ वर्षांनी ती तिच्या माहेरी जाण्याचा निर्णय घेते. जाण्याआधी प्रचंड उतावळ्या असणाऱ्या यशोधरेचा घरी गेल्यावर भ्रमनिरास होतो. घरातले सगळे तिच्या या निर्णयाचा आदर करत नाहीत. वरवर तिच्याशी चांगले बोलतात पण त्यांच्या मनातला सल जात नाही. केविनचे स्वागतही चमत्कारिक पद्धतीने होते. त्यावेळी आपण केविनशी लग्न करून चूक तर केली नाही ना? असा प्रश्न तिच्या मनात निर्माण होतो. तिला वाटते, ''दृष्टी विस्तारली जग मोठे झाले. पण आपण आपल्या माणसांकडून लांब गेलो.'' [२१]

पण क्षणार्धात तिच्या मनात येते, राहिलो असतो तरी ही नाती आपली राहिली असती का? मग तिला तीव्रपणे जाणवले की अंतर महत्त्वाचे नाही. आपल्यासारखीला इतक्या उंचीवर गेल्यानंतर सुद्धा एवढीशीच जागा मिळते. सारा गोतावळा मागे पडतो. आपण ते डोळसपणे स्वीकारणे महत्त्वाचे. या कथेत तिला हे व्यापक क्षितिज बघण्याची दृष्टी तिचा नवरा केविन तिला देतो.

## ३) काजवे

उजेडाची फसवी निशाणी
आणि काळोखाचेही भासच
चमकते क्षणिक काजवे मग
का तेही वाटेवरचे आभासच.

माणसाच्या आयुष्यात येणारी सुख-दुःख ही क्षणिकच असतात. आपल्याला ती भावना मनात ठेवून वागायची सवय असते. पण सुख किंवा दुःख क्षणिकच असते.

---

२१. क्षितिज, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. ५४

काजवे जसे क्षणार्धात चमकून नाहीसे होतात अगदी तसेच. जी गोष्ट आज सुखदायक वाटते ती उद्या तशी असेलच असे नाही. तसेच एखादे दुःखही कायमस्वरूपी राहात नाही. त्यामुळे काजव्याप्रमाणे क्षणभंगुर अशा क्षणांच्या आहारी न जाता आत्ताचा क्षण जगण्यातच खरा शहाणपणा आहे. असा अर्थ या कथेतून दिसून येतो.

दोन भिन्न स्वभावाची माणसे जोडीदार का होतात? अगदी आपल्या स्वभावाशी जुळवून घेणारी व्यक्ती आयुष्यात असतानाही एका भिन्न प्रकृतीच्या व्यक्तीशी गाठी का बांधल्या जातात? या सगळ्याचे उत्तर मिळत नाही. नंतर असे लक्षात येते की विचार जुळतात असे वाटणे तरी खरे आहे का? अनूच्या मनोवस्थेचे सुंदर चित्रण या कथेमध्ये केले आहे. राघव आणि अनूची शब्दांपलीकडची मैत्री असते. पण त्या दोघांचे लग्न होऊ शकत नाही. अनू आणि हेमंतचे लग्न होते. लीला आणि राघवचे लग्न होते. या सगळ्या घटनांचा अनूच्या विचार करण्याच्या दृष्टिकोनावर परिणाम होतो. तिच्या विचार करण्याच्या पद्धतीबरोबर बदलत गेलेले अर्थ या कथेत आहेत. क्षणिक अशा काजव्यांप्रमाणे जीवन असते असा संदेश देणारी ही कथा आहे.

### ४) स्व–रूप

एका स्त्रीची करिअर आणि स्त्रीत्व या दोन्हीमधली मानसिक लढाई स्व–रूप या कथेत आहे. कर्तबगारीने स्त्रीने कितीही यश मिळवले तरी स्त्री म्हणून तिला वाटणारी मातृत्वाची ओढ तशीच कायम राहाते. रेवती ही एक हुशार, तरुण यशस्वी स्त्री असते. अशोकच्या ऑफिसमध्ये जीव ओतून, मन लावून काम करत असते. निरंजन तिचा नवरा असतो. तिचे स्वातंत्र्य, तिचे अस्तित्व तो मनापासून जपत असतो. आपल्या कर्तृत्वाचा रेवतीला दुराभिमान असतो. सर्वसामान्य स्त्री म्हणून जगण्याची तिची अजिबात इच्छा नसते. ऑफिसमधले काम, यश यामध्येच तिला आनंद वाटत असतो. निरंजन तिला खूप समजून घेत असतो. तिचे वडील अप्पा, भाऊ दिनेश आणि त्याची पत्नी सुमा तिच्या करिअरच्या विरोधात नसतात. पण एक स्त्री म्हणून तिने सगळी कर्तव्य पार पाडावीत असे त्यांना वाटत असते. या दरम्यान तिला दिवस राहातात. एका सामान्य स्त्रीसारखे गरोदर राहाणे तिला फारसे आवडलेले नसते. पण तरीही हे मातृत्व पेलण्यासाठी ती सज्ज होते. पण मनातला अहंकार तिला स्वस्थ बसू देत नाही. सगळ्यांनी तिची काळजी घ्यावी, कीव करावी हे तिला सहन होत नाही. कामाच्या धावपळीत तिचा गर्भपात होतो. त्यानंतर मात्र रेवती अंतर्मुख होऊन झालेल्या घटनांचा विचार करते. एकटी असताना

तिला आपली काळजी घेणारे, कोणीतरी आपल्या आतले असावे असे तिला वाटते. ही ओढ जाणवून तिच्या डोळ्यात पाणी येते. कुणाची तरी अधीरतेने वाट पहाण्याचा तिचा हा पहिलाच अनुभव असतो. हे स्त्रीत्वच तिचे मूळ स्वरूप आहे असे तिचे मन तिला सांगते.

स्त्रीत्वाविषयी, तिच्या स्वरूपाविषयी तिचे आधीचे मत कथेत छान मांडले आहे. आपण गरोदर आहोत असे कळल्यावर तिला वाटते, ''मग नंतर कसं होईल आपलं? वाढलेलं वजन, पोटाचा आकार घेऊन रोज ऑफिसामध्ये जाऊन त्याच दमणुकीनं कामं करू शकू? इतर कुणाचा दृष्टिकोन बदलेल की तोच राहील? एखादं गुपीत फुटल्यासारखं तर नाही वाटणार? एखादा नाजुक कोपरा उघडा पडल्याप्रमाणे? की हीदेखील एक मादीच आहे शेवटी....जन्म देणारी....कितीही शर्यतीत बरोबर धावू म्हणाली तरी अखेर निमूट बाजूला होणारी....निसर्गानं अखेर ते सगळं आपल्या, स्त्रीच्या शरीरालाच व्हावं असा नियमच केलेला नाही का? तो तर आपण बदलू शकत नाही. उलट त्यात आता आपण फार आनंद मानावा अशीच सगळ्यांची अपेक्षा आहे.''[२२]

### ५) आकार

साध्या, भोळ्या सुचेताच्या आयुष्याला रेणू स्वतःच्याही नकळत आकार देते. सुचेताच्या प्रवासात रेणूचाही नकळतपणे प्रवास सुरू होतो. रेणू आणि अजय परदेशातून स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी भारतात परत येतात. परदेशात त्यांची रविशी मैत्री होते. रेणू आणि अजय ज्या शहरात स्वतःच्या व्यवसायाचा जम बसवू पहातात त्याच शहरात रविचे घर असते. म्हणून त्याच्याकडून पत्ता घेऊन रेणू आणि अजय त्याच्या घरी जातात. आपल्या नोकरीच्या आणि मिळकतीच्या बाबतीत त्यांनी आपल्या कुटुंबीयांना आणि मुख्य म्हणजे स्वतःच्या बायकोला सुचेताला अंधारात ठेवल्याचे रेणू आणि अजयच्या लक्षात येते. नवऱ्यावर प्रचंड विश्वास आणि आंधळे प्रेम असणाऱ्या सुचेताची रेणूला दया येते. आपल्या छोट्याशा व्यवसायात ती सुचेताला नोकरी देते. सुचेताही प्रामाणिकपणे घर आणि नोकरी सांभाळते. रेणू तिला नवीन, चांगल्या पगाराची नोकरी शोधण्यासाठीदेखील मदत करते. सुचेताच्या घरचे तिच्याबद्दल अजयकडे तक्रार करतात की ती पगार घरी देत नाही. घरी काम करत नाही, वगैरे वगैरे. पण रेणूच्या हे लक्षात येते की, आपणच सुचेताला सांगितले होते की, एखादीला आवाज फुटतो तेव्हा बाकीचे प्रतिक्रिया

२२. स्व-रूप, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १०५,१०६

नोंदवणारच. यात घाबरून जायचे नाही. आपला मार्ग सोडायचा नाही. कदाचित सुचेता आपला मार्ग सोडत नसल्याने उमटणाऱ्या या प्रतिक्रिया असाव्यात. एका साध्या, भोळ्या स्त्रीच्या आयुष्याला योग्य आकार दिल्याचे समाधान रेणूला मिळते.

**६) परिघाबाहेर**

काही वेळा आपण आपल्या जवळच्या माणसांनाच ओळखू शकत नाही. आपल्या विचारांच्या परिघाबाहेर एक वेगळे जग असू शकते. आपल्याच जवळची माणसे अशा जगात रमतात या गोष्टीची उकल व्हायला बराच काळ जातो.

'परिघाबाहेर' ही कथा इरा आणि जनार्दनची आहे. कर्तृत्वाने इरा आपल्या नवऱ्यासाठी जनार्दनसाठी आणि कुटुंबासाठी बऱ्याच तडजोडी करते. करिअरमध्ये चांगल्या संधी नाकारते. पण मुले मोठी झाल्यावर मात्र नोकरीच्या ठिकाणी झालेली बदली ती स्वीकारते. जनार्दनच्या मित्राच्या विश्वनाथच्या अकाली जाण्याने त्याची बायको नंदिनी एकटी पडते. इरासोबत २९ वर्षे संसार करूनही एका टप्प्यावर जनार्दनला नंदिनीविषयी आकर्षण वाटते. विश्वनाथच्या जाण्यानंतर इराने नंदिनीला भेटायला जावे असे जनार्दनला वाटते. पण दिखाऊपणा न करता इरा आपल्या सोयीप्रमाणे नंदिनीकडे जाऊन तिचे सांत्वन करते. थोड्याच दिवसात त्या दोघींमध्ये घट्ट मैत्री होते. नंदिनी इराकडे तिच्या बदलीच्या ठिकाणी राहायला जाण्याची तयारी दाखवते. जनार्दन मात्र या दोघींच्या नात्याच्या परिघाबाहेर राहातो. नंदिनी त्याच्याकडे आपल्या नवऱ्याचा मित्र आणि कर्तृत्ववान इराचा नवरा असेच पहात असते. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला समजून घेतले तर स्त्रियांचीदेखील अशी परिघाबाहेरची नाती निर्माण होऊ शकतात. नंदिनी आणि इराची मैत्री हे कथेला लागलेले अनपेक्षित वळण असते. मत्सर हा स्त्रियांना चिकटलेला दुर्गुण या कथेत अजिबात अनुभवायला मिळत नाही.

**इ. ४. अन्य कथा**

या कथासंग्रहातील सर्व कथा वाचनीय आहेत. खरे तर सगळ्याच कथा मला भावलेल्या कथा या सदरात येऊ शकतात. पण त्यातल्या त्यात या दोन कथांचा समावेश मी अन्य कथा या सदरात कला आहे.

**१) चित्र**

या कथेत कर्तृत्ववान अशा शशीची मनोभूमिका मांडली आहे. एस्वींच्या म्हणजेच

आपल्या सासऱ्यांच्या व्यवसायात शशी यश मिळवते. व्यवसाय वृद्धीसाठी सासरेही तिला प्रोत्साहन देतात. अर्थातच स्त्रीचा सन्मान म्हणून नाही तर केवळ व्यवसायातल्या फायद्यासाठी. कारण त्यांचा मुलगा विनोद याबाबतीत यशस्वी झालेला नसतो. विनोदही शशीला सुरुवातीच्या काळात उत्तेजन देतो. पण त्याला अपयश आणि तिला यश मिळाल्यावर प्रेमाचा, उत्तेजनाचा झरा आटतो. सूड घेण्यासाठी विनोद तोच पारंपारिक मार्ग चोखाळतो. विनोद जाणिवपूर्वक दुसऱ्या स्त्रीचा आधार घेतो. शशीला हिणवण्यासाठी आणि नवरा म्हणून त्याने तिला नाकारले आहे हे दाखवून देण्यासाठी तो असे करतो. तो तिला हे सांगू पहातो की, तुझ्या मुक्तीच्या मार्गाने तू जा. पण माझा पुरुषार्थ मी दाखवणारच. शुभदा ही शशीची जीवलग मैत्रीण असते. तिने लग्न, संसार या फंदात न पडण्याचा निर्णय घेतलेला असतो. शशी लग्न करून आणि शुभदा लग्न न करून शेवटी पिंजऱ्यातच असतात. वेणूताई या शशीच्या सासुबाई असतात. आपल्या सुनेच्या कर्तृत्वाचे त्यांना विशेष कौतुक नसते. पण मुलाने दुसऱ्या स्त्रीशी संबंध ठेवू नये असेही त्यांना वाटत असते. स्वतःमधल्या स्वतंत्र व्यक्तीला ओळखण्यासाठी शशीला मोठी किंमत द्यावी लागते. संसारसुख, मुलांचे संगोपन या स्त्रीसुलभ आवडींपासून ती लांब जाते. भावनांचा ओलावा असणारे संसाराचे चित्र रंगविण्यात ती अपयशी ठरते. ऋषिकेश हा तिचा ऑफिसमधला असिस्टंट असतो. शशीच्या कर्तृत्वाचा त्याच्यावर परिणाम होतो. तिच्याबरोबर काम करता करता नकळतपणे त्याची तिच्याशी मैत्री होते. ऋषिकेशचे एका चित्रकार मुलीवर प्रेम असते. शशीलादेखील चित्र काढायला आवडत असते. हळव्या मनाच्या शशीचे कर्तृत्ववान व्यावसायिकात रूपांतर होताना तिचे हळवे मन करपून जाते. ऋषिकेशला ते हळवे मन जाणवते आणि ते मन जागे करण्यासाठी तो तिला निसर्गचित्रांचे पुस्तक भेट देतो. त्याने पुस्तकावर लिहिलेल्या शशीच्या एकेरी नावाचा शशीला आनंद होतो.

### २) एक पाऊल पुढे

हुशार व कर्तृत्ववान असूनही संसाराच्या रहाटगाडग्यात अडकलेल्या उर्मिलेची ही कथा आहे. बहुतांश स्त्रियांच्या वाट्याला वयाच्या विशिष्ट टप्प्यावर जी घुसमट वाट्याला येते तीच उर्मिलेला अनुभवायला मिळते. विश्वाससारखा प्रेमळ, कर्तृत्ववान जोडीदार तिला मिळतो. सिव्हील इंजिनिअर असणारी उर्मिला डिझाईन्स उत्तम व कल्पकतेने काढत असते. तिची आणि विश्वासची भेट कामाच्या निमित्तानेच होते. पहाताक्षणीच ते प्रेमात

पडतात आणि लग्न करतात. विश्वास त्याच्या कामात बुडून जातो आणि उर्मिला तिच्या संसारात. आलोकच्या जन्मानंतर तर ती आणि घर इतकंच समीकरण उरते. आलोकही आर्किटेक्चरच्या क्षेत्रात जायचे ठरवतो. तिथेच त्याचे सूर प्राचीशी जुळतात. ते दोघे लग्न करण्याचा निर्णय घेतात. तरुण, हुशार, बुद्धिमान प्राची आपल्या सासुच्या गुणांना प्रोत्साहन देते. विश्वास मात्र अलीकडे खूप चिडचिडा झालेला असतो. दारु प्यायला लागतो. सतत उर्मिलेवर चिडचिड करत असतो. त्यामुळे ती अस्वस्थ होते. त्याच्या व्यवसायात झालेल्या तोट्यामुळे हे होते आहे हे उर्मिलेला आलोककडून समजते. प्राची उर्मिलेला प्रोत्साहन देते. प्रत्येक वेळी विश्वास तिला गृहित धरतो. तिच्यातली हुशारी मान्य करत नाही. पण प्राचीच्या मदतीने उर्मिला एक पाऊल पुढे टाकते. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीला समजून घेतल्याने स्त्रीची प्रगती कशी होते हे या कथेतून अनुभवायला मिळते.

## इ. ५. समारोप

सानियांच्या 'परिमाण' या कथासंग्रहात वेगळ्या वाटेने विचार करणाऱ्या स्त्रिया आहेत. करिअरला महत्त्व देऊन आपले अस्तित्व टिकवणाऱ्या स्त्रिया या कथांमध्ये दिसून येतात. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीचा मैत्रीण, आई किंवा अन्य नात्यांमधून केलेला विचार हे या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

'परिमाण' या शीर्षककथेतली देवकी कैलासवर जीवापाड प्रेम करते. म्हणूनच त्याचा प्रत्येक निर्णयाला, कृतीला पाठिंबा देते. त्याच्याशी लग्न होऊ शकत नाही तरी त्याच्या कुटुंबीयांची काळजी घेते. स्वतःचा संसारही उत्तम करते. मनात ती कैलासची जागा अबाधित ठेवते. आपल्या आईच्या प्रियकराला स्वीकारणारी रितू म्हणजेच देवकीची मुलगी हीदेखील वेगळ्या वाटेवरचा विचार करणारी आहे. सुखाचे परिमाण सांगणारी ही कथा आहे. 'स्पर्श' ही कथा आहे सुचित्रा या मध्यमवर्गीय गृहिणीची. संसाराच्या रामरगाड्यात सुचित्राने आपले अस्तित्व गमावले असते. नवऱ्याच्या आजारपणाच्या निमित्ताने डॉ. विक्रमच्या बोलण्याने तिचा आत्मविश्वास वाढतो. तिच्या स्वत्वाचा स्पर्श तिला होतो. परदेशात शिकलेली विद्युत आपल्या विचारांचे क्षितिज विस्तारू शकत नाही हे 'क्षितिज' या कथेतून दिसून येते. तिचा नवरा केविन तिला मदत करतो. आपले आयुष्य किती क्षणभंगुर असते हे 'काजवे' या कथेत अनुभवायला मिळते. सुख असो वा दुःख ते क्षणिक चमकणाऱ्या काजव्यांसारखेच आहे. अगदी 'उजेडाची फसवी निशाणी

अन् काळोखाचेही भासच' असे. करिअर आणि स्त्रीत्वाच्या लढाईत स्त्रीत्व उजवे ठरते असा आशय 'स्व-रूप' या कथेतून प्रतीत होतो. साध्या, भोळ्या सुचेताच्या आयुष्याला रेणू आपल्या पद्धतीने आकार देते. 'आकार' या कथेत ती सुचेताला तिच्यामधल्या कर्तृत्ववान स्त्रीची ओळख करून देते. मत्सर हा स्त्रियांना चिकटलेला एक दुर्गुण आहे. पण 'परिघाबाहेर' या कथेत तो दिसत नाही. एक स्त्री जेव्हा दुसऱ्या स्त्रीला मदत करते तेव्हा किती सकारात्मक बदल घडतो हे समजते. कर्तृत्ववान शशी आपल्यामधला हळवेपणा हरवते. पण कथेच्या शेवटी तिला तिचे मूळ रूप सापडते. 'एक पाऊल पुढे' या कथेत कर्तृत्ववान असलेल्या उर्मिलेला तिची सून प्राची तिच्या कर्तृत्वाची आठवण करून देते व तिला एक पाऊल पुढे टाकायला मदत करते.

सानियांच्या चिंतनातून, खोलवर केलेल्या विचारांमधून लिहिल्या गेलेल्या या कथा समंजसपणे लिहिल्या गेल्या आहेत. कथेचा नायक किंवा नायिका यांचे विचार ठाम आहेत. चांगल्या - वाईट परिणामांचा सामना करायला सज्ज आहेत. आजुबाजूला असलेल्या माणसांची कित्येक नाती मनात घट्ट रुतून बसलेली असतात. लिखाणातून ही नाती उलगडून दाखवण्याचा यशस्वी प्रयत्न या कथांमध्ये सानियांनी केला आहे.

## इ. ६. संदर्भसूची


१८. परिमाण, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १३

१९. परिमाण, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १२

२०. परिमाण, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १५

२१. क्षितिज, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. ५४

२२. स्व-रूप, परिमाण, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १०५,१०६


## संदर्भसूची


१. परिमाण

**फ. प्रयाण**

| | कथा | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | प्रवास | मौज, दिवाळी १९९० |
| २ | चार दिवस | मिळून साऱ्याजणी, ऑगस्ट १९८९ |
| ३ | तिसरी मुलगी आणि आई | कालनिर्णय, दिवाळी १९९४ |
| ४ | प्रयाण | तरुण भारत, दिवाळी १९८८ |
| ५ | रजू लिहिते... | दीपावली, १९९२ |
| ६ | कोपऱ्यावरलं घर | मोज, दिवाळी १९९४ |
| ७ | दाही दिशांचे पूल | तरुण भारत, दिवाळी १९९१ |
| ८ | जाग | मिळून साऱ्याजणी, दिवाळी १९९२ |

**फ. १. – प्रस्तावना**

**फ. २. – शीर्षककथा**

**फ. ३. – मला भावलेल्या कथा**

**फ. ४. – अन्य कथा**

**फ. ५. – समारोप**

**फ. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

**फ. १. प्रस्तावना**

गेल्या काही वर्षातील प्रमुख कथाकारांमध्ये सानिया हे नाव आपल्या अनोख्या शैलीमुळे लक्ष वेधून घेणारे आहे. सानियांच्या कथा स्त्री व्यक्तीरेखांना प्राधान्य देणाऱ्या आहेत. समाजातील विविध स्तरांतील स्त्रियांच्या भावभावनांचे, स्वभाववैशिष्ट्यांचे चित्रण त्या करतात. त्यांच्या कथांमधील नायिका या कोणी असामान्य व्यक्तिमत्व असणाऱ्या नाहीत; परंतु चारचौघींपेक्षा वेगळ्या आहेत. या नायिका मनाने, आचरणाने आणि विचाराने स्वतंत्र आहेत. नेहमीच्या वाटेपेक्षा वेगळ्या वाटेने प्रवास करणाऱ्या आहेत. प्रसंगी समाजाने ठरवलेल्या पारंपारिक व्यवस्थेला धुडकावणाऱ्या आहेत. मानवी नातेसंबंध, भाव-भावना, आंनद-दुःख यांच्या शोधांचे चित्रण सानियांच्या कथांमधून दिसते.

मानवी सुख-दुःख, माणसामाणसातली नाती, जन्म आणि मृत्यू, शरीर, चैतन्य,

निसर्ग, सगळी सृष्टी या पलिकडचे अमर्याद विश्व यातल्या सत्याच्या शोधाचा प्रवास म्हणजे 'प्रयाण' हा कथासंग्रह. रोजच्या साध्या, लहानसहान घटना-प्रसंगातून काहीतरी चटकन समजल्यासारखे वाटून अनपेक्षित उत्तरे मिळणे हा अनुभव या कथासंग्रहातील कथा वाचनाने मिळतो.

**फ. २. शीर्षककथा**

'प्रयाण' हा कथासंग्रह नंदप्रसाद बर्वे यांच्या ज्ञानदा पब्लिकेशन्सने फेब्रुवारी १९९७ मध्ये प्रकाशित केला आहे. रवि मुकुल यांनी मुखपृष्ठ रेखाटले आहे. हा कथासंग्रह सानियांनी वाटेत सोडून दिलेल्या तरीही मनात वस्तीला आलेल्या अनेक गावांच्या आठवणींना...समर्पित केला आहे. या कथासंग्रहातील आठ कथांची पूर्वप्रसिद्धी मौज, मिळून साऱ्याजणी, कालनिर्णय, तरुण भारत, दीपावली या मासिकांमधून झाली आहे.

**१) प्रयाण**

'प्रयाण' ही या कथासंग्रहातील शीर्षककथा आहे. प्रयाण म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. हे प्रयाण मनातल्या विचारांचेही असते. चारुच्या अबोल, निरस आणि एकाकी जीवनात मनोहर आणि आशिष या दोघांच्या रूपाने हे प्रयाण घडते. मनोहर हा परदेशी स्थायिक झालेला पण आपल्या आई वडिलांसाठी काही दिवसांकरीता मायदेशी आलेला एक मध्यमवयीन पुरुष आहे. आशिष हा त्याचा सात-आठ वर्षांचा मुलगा. आशिषच्या आजारपणाच्या निमित्ताने त्याची व डॉ. चारु यांची भेट होते. चारू ही हुशार व तज्ज्ञ डॉक्टर असते. परिसरात तिचे नावही असते. आशिष मनोहरच्या घरात लवकर मिसळत नाही. कारण त्याला या देशाची आणि मनोहरच्या माणसांची सवय नसते. आजारपणामुळे ते दोघे डॉ. चारुकडे येतात. हळूहळू त्या दोघांमध्ये मैत्री होते. चारुचे सासर अतिशय श्रीमंत असते. ती स्वतः व्यवस्थित कमवत असते. तिचे विचार वेगळे आणि स्वतंत्र असतात. पण चारु आपल्या वैवाहिक आयुष्यात अजिबात समाधानी नसते. तिचा नवरा आणि तिचा सासरा कामाच्या निमित्ताने सतत बाहेरगावी जात असतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यामध्ये भावनिक ओलावा अजिबात नसतो. मनोहर खूप कमी वेळात तिच्या मनात मित्र म्हणून घर करतो. पहिल्यांदाच कोणाशी तरी ती मनमोकळे बोलते. मनोहरच्या येण्याने तिच्या मनातल्या

विचारांचे, तिच्या मानसिकतेचे प्रयाण होते.

चारुच्या जीवनातल्या पोकळीचे वर्णन सानियांनी उत्तम पद्धतीने केले आहे. मनोहरला ती म्हणते, ''पुष्कळ जणांना पुष्कळ गोष्टी मिळत नाहीत. काहींना घर नसतं, पैसा नसतो, आई नसते, डोळे नसतात, हात-पाय नसतात, नशीब नसतं.... तसंच हे पण समजायचं. काही गोष्टी नसतातच. प्रत्येकाचा असा कुठला ना कुठला कोपरा रिकामा असतो. अगदी पूर्ण मोकळा, रिकामा. तिथं 'नसणं' हाच एक अस्तित्वाचा भाग असतो.'' [२३]

**फ. ३. मला भावलेल्या कथा**

'प्रयाण' या कथासंग्रहातदेखील सगळ्याच कथा उत्कृष्ट आहेत. त्यातल्या काही मला भावलेल्या कथांचा समावेश या सदरात केला आहे.

**१) प्रवास**

एकाच जागी थांबून राहायचे असे कितीही ठरवले तरी प्रत्येक माणसाला प्रवास करावाच लागतो. अर्थात हा प्रवास ध्यासापोटी, मुक्कामाला जायच्या ठिकाणाला पोहचण्यासाठीच केला जातो. कोणते सहप्रवासी सोबत असावेत हे देखील आपल्या हातात नसते. हवे ते मिळत नाही आणि नको ते कायम जवळ राहाते. तरीही करावा लागतो एक अटळ प्रवास आणि त्या प्रवासाचा प्रत्येकालाच असतो एक जीवघेणा ध्यास. सावित्री ही नंदिताची आई असते. स्वतंत्र विचारांची आपल्याला हवे तसेच वागणारी सावित्री प्रचंड बुद्धिमान, मनस्वी असते. पण एका वेगळ्या पुरुषाच्या प्रेमात पडून नंदिता आणि तिच्या वडिलांपासून ती दूर जाते. त्यामुळे नंदिताच्या मनात सावित्रीविषयी अजिबात प्रेम नसते. जगदीश एक दिवस आजारी पडलेल्या पण तरीही स्वच्छंदीपणे जगणाऱ्या सावित्रीला नंदिताकडे घेऊन येतो. नंदिता कर्तबगार, कमावणारी, स्मार्ट असते. स्वामीबरोबर झालेल्या प्रेमभंगाने एकटीच राहात असते. सावित्रीला बरे नाही हे कळल्यावरही तिच्या मनात सावित्रीविषयी माया निर्माण होत नाही. तिरुपतीला दर्शनासाठी जायचे असा सावित्रीचा हट्ट असतो. तो हट्ट पूर्ण करण्यासाठी जगदीश तिला इतक्या लांब नंदिताकडे घेऊन येतो. नंदिताला प्रवासासाठी तयार करतो. जगात प्रेम, नाती, देव सगळे खोटे आहे असे तिचे मत तयार झालेले असते. या वयात सावित्रीला कसला देवाचा शोध घ्यायचा आहे याचा तिला राग येतो. ती यात्रा न वाटता तिला सहलीसारखे वाटते. आईविषयी

---

२३. प्रयाण, प्रयाण, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, फेब्रुवारी १९९७, पृ. क्र. ७५

मनात राग असताना तिच्या इच्छेखातर नंदिता हा प्रवास करते. सावित्रीची निघायची वेळ येते तेव्हा निरोप घेणे तिला जड वाटते. स्वामीप्रमाणेच सावित्रीही आपल्याला सोडून प्रवासाला जाणार या कल्पनेने ती अस्वस्थ होते. लिखाणाची वेगळी शैली, सूचक व मोजक्या शब्दांमध्ये भावनांचे प्रकटीकरण ही या कथेची वैशिष्ट्ये आहेत. सावित्रीचा नंदिताने तटस्थपणे केलेला विचार तसेच नंदिताच्या सुरुवातीच्या विचारांमधला बदल या कथेचे बलस्थान आहे.

## २) चार दिवस

काही नाती अशी बांधली जातात की ती रक्ताच्या नात्याच्या पलिकडची वाटतात. नाते कागदावर असण्यापेक्षा ते मनात असले पाहिजे असे वसुंधरा आणि केतकीच्या नात्यावरून दिसून येते. केतकी ही वसुंधरेची पहिली सून असते. आपल्या डॉक्टर मुलासाठी म्हणजेच अविनाशसाठी ती हुशार, चाणाक्ष व डॉक्टर असलेल्या केतकीला निवडते. लग्नाच्या आधीही केतकी वसुंधरेच्या घरी राहात असे. वसुंधरा स्वतः प्रचंड महत्त्वाकांक्षी असल्याने केतकीची प्रगती करण्याची जिद्द तिला भावते. अविनाश मात्र केतकीची प्रगतीची आस समजू शकत नाही. म्हणूनच लग्नानंतर दोन एक वर्षातच वसुंधरा स्वतः केतकीला अमेरिकेत जाण्याची परवानगी देते. या सगळ्यात अविनाश आणि केतकीचे नाते संपुष्टात येते. पण याची दोघांनाही खंत वाटत नाही. नंतर त्याचे रजनीशी दुसरे लग्न होते. त्यांचा संसार त्याला हवा तसा चारचौघांसारखा असतो. एक दिवस अचानक केतकी वसुंधरेला भेटते. चार दिवसांसाठी त्या गावात केतकी राहाणार असते. वसुंधरा आणि केतकीच्या वयात इतके अंतर असूनही त्यांची मैत्री तशीच असते, जशी ती दहा वर्षांपूर्वी होती. करिअरकडे लक्ष देऊन एकाच मुलावर थांबलेली, करिअरसाठी कुटुंबीयांचा रोष पत्करणारी, जोडीदाराच्या निधनानंतरही आपले काम जोमाने करणारी वसुंधराच केतकीसारख्या तल्लख बुद्धिच्या मुलीला समजू शकते. केतकी ज्या दिवशी पुन्हा अमेरिकेत जाणार असते तेव्हा अविनाशही औपचारिकता म्हणून तिला भेटतो. कुठेतरी त्याला त्याने घेतलेल्या निर्णयाचा थोडा पश्चात्ताप होतो. पण त्या गोष्टी फार लावून न घेता तो अगदी नॉर्मल वागतो. वसुंधरा मात्र त्या चार दिवसांच्या केतकीच्या येण्याने आतून हालते. पुन्हा जुन्या आठवणींमध्ये रमते. केतकी तिची सून असती तर ...हा विचार तिच्या मनात येतो व तिचे मन सैरभैर होते.

### ३) तिसरी मुलगी आणि आई

मुलगा आणि मुलगी एक समान असे कितीही म्हटले तरी समाजामध्ये आजही मुलात आणि मुलीत भेद केला जातो. मुलींना मुलांसारखे वाढवले, मुलांसारखे स्वातंत्र्य दिले तरी मनात खोलवर हा भेद चालूच राहातो. पण मुलींना स्वातंत्र्य देऊन त्यांचा मुलांप्रमाणे सांभाळ केला तर त्यादेखील आई वडिलांचा म्हातारपणीचा आधार होऊ शकतात. हा विचार या कथेतून सानिया यांनी मांडला आहे.

शरद आणि शोभनाला माधुरी आणि मानसी या दोन मुलींच्या पाठीवर मुलगा हवा अशी इच्छा असते. पण त्यांना तिसरी मुलगी (मालविका) होते. या मुलीला ते मुलासारखे वाढवतात. पेहेरावापासून विचारांपर्यंत सगळे स्वातंत्र्य तिला देतात. अर्थातच मालविका इतर मुलींपेक्षा खूप वेगळी होते. एखाद्या सर्वसामान्य मुलीप्रमाणे घर, संसार, नवरा, मुले यामध्ये तिला अजिबात रस नसतो. ती इंजिनिअर होऊन स्वतःच्या पायावर उभी राहाते. स्वतंत्र विचारांची मालविका स्वकर्तृत्वाने खूप नाव कमवते. त्याचबरोबर आपल्या आई वडिलांची एखाद्या कर्त्या मुलाप्रमाणे काळजी घेते. तिने लग्न करून संसार करावा अशी शोभनाची इच्छा असते. पण आपणच तिचा मुलाप्रमाणे सांभाळ केला आहे आणि त्यामुळे स्वतंत्र विचार करणाऱ्या मालविकाचे ऐकण्याशिवाय तिच्यापुढे पर्याय राहात नाही. मालविका एका लग्न झालेल्या आणि दोन मुलांचा बाप असलेल्या व्यक्तीच्या प्रेमात पडते, वेगळी राहाते. पण ती स्वतःचे पाऊल वाकडे पडू देत नाही. आपले विचार त्याच्याशी जुळतात, तो एक चांगला मित्र आहे यापलीकडे तिला काहीच अपेक्षा नसतात. उलट शोभनाच्या दुसऱ्या दोन मुलींच्या संसारात जास्त प्रश्न असतात. त्या मालविकापेक्षा जास्त असमाधानी असतात. आपली ही मुलगी कर्तृत्ववान, समर्थपणे तिचे ती निर्णय घेणारी निघते. कोणत्याही संकटाचा समाना करण्यासाठी दुसऱ्या दोन मुलींपेक्षा ती अधिक कणखर बनते. त्यामुळे मालविकाची आई असल्याचा शोभनाला अभिमान वाटतो, आनंद वाटतो.

### ४) रजू लिहिते....

एका डायरीच्या माध्यमातून रजूच्या मनातली आंदोलने या कथेत मांडली आहेत. जवळची माणसे दूर होणे, दूरच्या माणसांनी आपलेपणाने वागणे, विचित्र प्रसंग घडणे हे सगळे अनुभव प्रत्येक माणसाच्या आयुष्यात येतात. कालावधीच्या दृष्टीने मोठा पट

असणारी ही कथा आहे.

रजू या अनाथ मुलीचे लग्न निखिलशी होते. तो चित्रकार असतो व आर्किटेक्ट म्हणूनदेखील काम करत असतो. पण त्याने विशेष यश मिळवलेले नसते. रजूशी लग्न झाल्यानंतर त्याला दीनानाथच्या बंगल्याचे इंटिरिअरचे काम मिळते. प्रचंड मेहनत करून तो मोठा होतो. कथेची सुरुवात रजूच्या बाळाच्या निधनाच्या दुःखाने होते, ती सुमित्रा आणि दीनानाथ यांच्या फार्महाऊसवर सुमित्राच्याच आग्रहाखातर राहायला जाते. पोटचा गोळा गेल्याने आणि पुन्हा कधीही आई व्हायची चिन्हे नसल्याने रजू दुःखी असते. पण सुमित्राकडे तिला भरपूर आराम मिळतो. सुमित्राला मिळालेली मोकळीक, तिची निर्णय घेण्याची क्षमता रजूला खूप भावते. दीनानाथ सुमित्राच्या मतांचा आदर करतात असेही तिला वाटते. रजूच्या अशा अवस्थेमुळे निखिलची पुरुष म्हणून जी अपेक्षा असते ती पूर्ण होऊ शकत नाही. या कारणामुळे तो थोडा चिडचिडा होतो. रजूला अधूनमधून भेटायला येतो. पण पूर्वीसारखी तिची ओढ राहात नाही. एक दिवस रजू सुमित्राबरोबर आपल्या स्वतःच्या घरी जाते तेव्हा तिला तिथे कंडोमचे पाकीट सापडते. या घटनेमुळे रजू जास्तच दुःखी होते. पण ती हे सगळे कोणालाही सांगत नाही. एक दिवस सुमित्राकडे प्रसाद आणि शुभदा ही जोडी येते. लग्न न करता ते एकमेकांजवळ राहात असतात. गोरगरीबांसाठी शाळा काढणे, अनाथ मुलांना काम देणे, गरीबांना न्याय मिळवून देणे असे काम ते करत असतात. प्रसादच्या समाजसुधारकाच्या आवेशामुळे रजू खूष होते. आपल्यासाठी सगळेच जगतात. पण प्रसादमधला वेगळेपणा तिला भावतो. रजू तिच्या घरी राहायला गेल्यानंतरही प्रसाद आणि शुभदाशी तिची मैत्री तशीच राहाते. स्वतःचा बडेजाव दाखवण्यासाठी निखिल एकदा त्यांना बाहेर जेवायला नेतो. स्वतःच्या श्रीमंतीचा तोरा मिरवतो. प्रसादला कुठेतरी हे लागते. एकदा अचानक प्रसाद रजू घरी एकटी असताना तिच्याकडे येतो. तो तिला इतक्या अधीरतेने आणि आवेशाने स्पर्श करतो की तिलाही बेभान व्हायला होते. घडलेल्या प्रसंगातून तिला आनंद मिळतो हे ती स्वतःच्या मनाशी कबूल करते. पण कालांतराने तिला प्रसादचे खरे रूप कळते. निखिलची रजू त्याने कशी सहज वापरली हाच तो भाव असतो. त्यामुळे रजू अस्वस्थ होते. दीनानाथ आणि सुमित्राच्या नात्यातला खोटेपणाही तिला कळतो. प्रसादची शुभदा दुसऱ्याच एका श्रीमंत माणसाशी लग्न करते. एकमेकांना समजून न घेता, स्वतःला काय वाटते आहे याला महत्त्व देऊन कथेतली सगळीच पात्रे एकमेकांशी विचित्र वागातत.

दुसऱ्याचे संपूर्ण असे वेगळे जग क्षणभरासाठी आवडते. आपल्याला जे मिळाले नाही ते आपण शोधतो. जवळ गेल्यानंतर त्यातला फोलपणाही कळतो. कधी कधी आपल्या आयुष्यात घडणारे प्रसंग, येणारी माणसं एखाद्या काल्पनिक कादंबरीप्रमाणे वाटतात. हे असे का घडले? कसे घडले? याचे आश्चर्य वाटते. पण आयुष्याची ही डायरी लिहावीच लागते. आयुष्यात कितीही विचित्र, अनाकलनीय प्रसंग आले तरी पुढे जावेच लागते हा संदेश या कथेची नायिका रजू देते. कोणत्याही मोठ्या गोष्टीचा बाऊ न करता येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची कला रजू शिकवते.

## ५) कोपऱ्यावरलं घर

एखादी जागा, घर, परिसर, माणूस वाईट किंवा अपशकुनी नसतो. जे घडायचे ते घडतेच हा आशय व्यक्त करणारी कथा म्हणजे 'कोपऱ्यावरलं घर'. किरण आणि श्रीवास्तव एकाच वाडीमध्ये अगदी शेजारी राहात असतात. श्रीवास्तवचा मुलगा अजय आणि किरण साधारण एका वयाचेच असतात. किरणला लहानपणापासून ते घर आणि त्या घरातली माणसे याबद्दल कुतुहल असते. त्या घरावर मृत्यूची छाया आहे आणि जो माणूस तिथे राहील त्याचा मृत्यू निश्चित होतो असे मत सगळीकडे पसरलेले असते. त्याला कारणही तसेच असते. श्रीवास्तवची पहिली बायको, म्हातारी आई, दुसरी बायको व मुलगी यांचा पाठोपाठ मृत्यू होतो. अजय दूर परदेशात निघून जातो. त्या घरात अजिबात प्रसन्न वाटत नसते. किरण तिच्या सासरहून कायमची माहेरी येते. ती गरोदर असते. तिच्या माहेरच्यांसाठी ती मोठे संकट बनते. ती मात्र आनंदी राहाण्याचा प्रयत्न करत असते. दरम्यान तिची आणि श्रीवास्तवची छान मैत्री होते. मृत्यूचे सावट असलेल्या त्या घरात ती वारंवार जाते. तिला मुलगा होतो. एकदा प्रचंड पाऊस पडत असताना मुलाला खांद्यावर घेऊन ती श्रीवास्तवची मदत मागायला येते. तिचा मुलगा खूप आजारी असतो. श्रीवास्तव तिला मदत करत नाही कारण तो खूप आजारी असतो. त्याला ही भीती वाटत असते की आपल्या सारख्या अपशकुनी माणसाच्या सावलीमुळे तिचे बाळ दगावेल. श्रीवास्तव बरोबर न जाताही तिचे बाळ देवाघरी जातेच. नंतर ती महिन्याभराने पुन्हा त्या घरात येते आणि श्रीवास्तवला सांगते की मृत्यूचे सावट असलेल्या त्या घराचा, श्रीवास्तवचा आणि बाळाच्या जाण्याचा काही संबंध नाही.

तिच्या बदललेल्या दृष्टिकोनाविषयी कथेत सानिया लिहितात, ''श्रीवास्तवच्या आता परिचित घरासमोर उभी राहून किरणनं त्यावर नजर टाकली. पण वर्षानुवर्ष उभ्या

असलेल्या त्या घराची बाहेरुन मनात ठसलेली प्रतिमा आता उमटून आली नाही. आपलं, आपल्याला माहीत असलेलं जग आतून बाहेर कसं असतं, हे ज्ञान तिला आता मिळालेलं होतं आणि त्यामुळं नजरेची दिशाच बदलून गेली होती.'' [२४]

**फ. ४. अन्य कथा**

'प्रयाण'मधील अन्य कथांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन आहे. आलेल्या परिस्थितीतून वाट काढण्यासाठी दृष्टिकोन फार महत्त्वाचा असतो हे या कथा वाचल्यावर पटते.

**१) दाही दिशांचे पूल**

पैसा, मान, कर्तृत्व, श्रीमंती या सगळ्याला आयुष्यात महत्त्व नक्कीच आहे; पण त्यामुळे आयुष्य परिपूर्ण होत नाही. प्रेम, नाती हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे. कितीही पैसा असला आणि प्रेम नसेल तर नात्यांना जोडणारा पूल तयार होऊ शकत नाही, हा आशय सांगणारी ही कथा आहे. या कथेतून एक लक्षात येते की, नात्यांमधला ओलावा कमी झाला की केवळ औपचारिकता म्हणून नातेसंबंध जपले जातात. एकत्र राहूनही एकमेकांविषयी अढी मनात तशीच राहाते. अशी नाती निरर्थक ठरतात. अहंकार दूर सारून एकमेकांना समजून घेतले तरच हे पूल तयार होतात.

नीरा, माधवी आणि मल्हार या आपल्या दोन्ही मुलांना छान वाढवते. मल्हार यशस्वी उद्योजक होतो. नीराच्या मनाविरुद्ध विनीताशी लग्न करतो. तिला नेहमी डिप्रेशनचे ॲटॅक येत असतात. मल्हारची मुले विकी आणि शमा हाताबाहेर गेलेले असतात. माधवी मात्र नवऱ्याच्या माघारी निलूला (मुलीला) अतिशय शिस्तीत वाढवते. पण अतिशिस्तीचा निलूला उबग आलेला असतो. ती शिक्षणासाठी परदेशी जाते. यश नीराची मुलगी नसूनही तिची खूप काळजी घेते. यश आपली सून व्हावी असे तिला मनापासून वाटत असे. पण मल्हारच्या विक्षिप्त वागण्याने यश नकार देते. निरंजन हा यशचा नवरा, धंद्यात अपयशी झालेला. ते जोडपेही मूल न झाल्याने दुःखी असते. विनीताच्या आत्महत्येनंतर मल्हार यशच्या जवळ येतो. वासनेचा स्पर्शही नसलेले त्यांचे नाते पुन्हा एकदा फुलते. 'एखाद्याने आपली चूक कबुल केली तर मोठ्या मनाने त्याला माफ करायला हवे' या सकारात्मक विचाराने कथेचा शेवट होतो. समाधान हे मानण्यावर आहे असा संदेश ही कथा देते.

---

२४. कोपऱ्यावरलं घर, प्रयाण, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, पृ. क्र. १४६

## २)  जाग

'जाग' या कथेची सुरूवात यशोदेच्या आजारपणापासून होते. तिची ही अवस्था कोणामुळे होते हे कथेत उलगडत जाते. एखाद्या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेताना स्वतःचेच अस्तित्व उलगडत जावे, अशा वेळी येणारी जाग त्या झोपलेल्या अस्तित्वाला उजळवते. असेच काहीसे कथेची नायिका यशोदा हिच्या बाबतीत होते. आपला नवरा, घर, मुलगा यामध्येच धन्यता मानणाऱ्या यशोदेला एका विचित्र संकटाला तोंड द्यावे लागते. समर्पित वृत्तीने संसार करणाऱ्या, श्रीधरला सर्वस्व देणाऱ्या, मुलाला (आशयला) भरभरून प्रेम देणाऱ्या यशोदेला मात्र प्रेम मिळत नाही. श्रीधर त्याच्याच ऑफिसमधल्या अरुंधतीशी संबंध ठेवतो. नेहमी मैत्रीण म्हणून वावरणारी अरुंधती आपला नवराच वाटून घेते हे दुःख ती सहन करू शकत नाही. माहेरी जे प्रेम, सुख, सुबत्ता तिला मिळाली नाही ते सगळे श्रीधर तिला भरभरून देतो. पण अरुंधतीशी असणाऱ्या संबंधांना तो आपल्या बाजूने योग्यच आहे असे सांगतो तेव्हा यशोदा यातच धन्यता मानावी असे वाटणारा श्रीधर तिला त्रासदायक वाटतो. त्याच्यावर ती मनापासून प्रेम करते. पण तो एकनिष्ठ राहात नाही. ही सल तिच्या मनात कायम राहाते. या सगळ्यात श्रीधरचा मित्र आनंद तिला समजून घेतो. त्यांच्यात एक वेगळाच बंध निर्माण होतो. आनंदच्या आजारपणात अगदी मृत्यूसमयी देखील ती त्याच्याजवळ असते. सगळ्याच पातळ्यांवर आपण कुणाला किती कमी ओळखतो याची जाणीव तिला होते. कथेच्या शेवटी यशोदेचा मृत्यू होतो. आपलाच आपल्या मनाशी झालेला संवाद आणि त्यातून मिळणारी उत्तरे हे या कथेचे वैशिष्टय आहे.

## फ. ५. समारोप

साहित्यिकाच्या साहित्यावर त्याच्या आजुबाजूच्या अनेक गोष्टींचा परिणाम होत असतो. कारण लेखन जर लेखकाच्या अनुभवाशी निगडीत आहे असे म्हटले तर अनुभवात हे सगळे घटक येतातच. कारण अनुभव भोवतीच्या वातावरणातूनच आलेले असतात. याविषयी सानिया म्हणतात, ''भौगोलिक प्रदेश, माणसं, संस्कृती हे महत्त्वाचे आहेच, पण ती एक बाजू झाली. निर्मितीशील मनाकडे कल्पनाशक्ती असते आणि त्याद्वारे केवळ आपल्या भोवतालच्या वातावरणात अडकून न राहता पुष्कळ प्रवास करता

येतो. साहित्यिकाचे मन काही नेहमी निगडीत अनुभवांपाशीच अडकून राहाते असे नाही. ते पुष्कळ काही अनुभवू शकते. साहित्यनिर्मितीच्या वाटेवरचा तो प्रवास आणि शोध असतो.'' [२५]

सानियांनी अनुभवलेल्या आणि अनुभवांच्याही पलिकडच्या अनुभवांना 'प्रयाण' या कथासंग्रहात त्यांनी शब्दबद्ध केले आहे. 'प्रयाण' या शीर्षककथेतल्या डॉ. चारुच्या विचारांचे प्रयाण या कथेत दाखवले आहे. मनोहरच्या येण्याने तिच्या मानसिकतेचे प्रयाण होते. 'प्रवास' या कथेत नंदिताचा आपली आई सावित्रीवरचा राग दाखवला आहे. जेव्हा नंदिताला तिच्या आईची गरज असते तेव्हा ती तिला सोडून जाते. त्यामुळे नंदिताला सावित्रीबद्दल प्रेम वाटत नसते. स्वामीबरोबर झालेल्या प्रेमभंगाने नंदिता जास्तच एकटी पडते. पण सावित्री आपल्याला सोडून शेवटच्या प्रवासाला जाणार या कल्पनेने अस्वस्थ होते. नंदिताच्या भावनांचा प्रवास सानियांनी उत्कटतेने साकारला आहे. केतकी आणि वसुंधरा या सासू-सुनेची कथा म्हणजे 'चार दिवस'. कर्तबगार सुनेला पाठिंबा देऊन वसुंधरा केतकीला अमेरिकेत पाठवते. तिचा मुलगा दुसरे लग्न करतो. चार दिवसांसाठी केतकी भारतात येते तेव्हा वसुंधरा मात्र अस्वस्थ होते. मुलगा आणि मुलगी एकसमान असे कितीही म्हटले तरी भेद कायम राहातोच. पण मुलींना स्वातंत्र्य देऊन मुलांप्रमाणे वाढवले तर त्यादेखील आई-वडिलांचा आधार बनतात हे 'तिसरी मुलगी आणि आई' या कथेतून सानियांनी सांगितले आहे. एका डायरीच्या माध्यमातून रजूच्या मनातली आंदोलने 'रजू लिहिते...' या कथेत मांडली आहेत. दुसऱ्याचे जग लांबून जितके छान वाटते तितके अनुभवानंतर वाटत नाही. आयुष्यात कितीही विचित्र, अनाकलनीय प्रसंग आले तरी पुढे जावेच लागते हा संदेश या कथेतून कथेची नायिका रजू देते. 'कोपऱ्यावरलं घर' या कथेत एखादी जागा, व्यक्ती, घर वाईट किंवा अपशकुनी नसतात. जे घडयचे ते घडतेच हा संदेश सानियांनी दिला आहे. किरण आणि श्रीवास्तव यांच्या अजब मैत्रीची ही कथा आहे. कितीही पैसा असला तरी प्रेम नसेल तर नात्यांना जोडणारा पूल तयार होऊच शकत नाही हा गर्भितार्थ 'दाही दिशांचे पूल' या कथेतून व्यक्त होतो. एखाद्याने आपली चूक कबुल केली तर मोठ्या मनाने त्याला माफ करायला हवे हा संदेश या कथेतून मिळतो. मल्हार आणि यशचे लग्न व्हावे अशी मल्हारच्या आईची नीराची इच्छा असते. पण तो डिप्रेशनचा ॲटॅक येणाऱ्या विनीताशी लग्न करतो. मल्हार चूक कबुल करतो तेव्हा यश त्याला माफ करते. त्यांच्यामध्ये वासनेचा स्पर्शही नसलेले नाते

२५. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५९

तयार होते. ‘जाग’ या कथेत आपलाच आपल्या मनाशी झालेला संवाद मांडला आहे. एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याच अस्तित्वाचा शोध लागतो. असेच काहीसे कथेची नायिका यशोदा हिच्या बाबत होते. ज्याच्यावर ती जीवापाड प्रेम करते त्या नवऱ्याचे आणि त्याच्या मैत्रिणीच्या संबंधांविषयी कळल्यावर ती कोलमडते. सगळ्याच पातळ्यांवर आपण कोणाला किती ओळखतो याची जाणीव तिला होते. श्रीधरचा मित्र आनंद या सगळ्यात तिला समजून घेतो. यशोदेच्या मृत्यूने कथेचा शेवट होतो. तिच्या विचारांना आलेली जाग कथेचे शीर्षक अधोरेखित करते.

चारचौघींपेक्षा वेगळ्या अशा नायिका ‘प्रयाण’ या कथासंग्रहातून भेटतात. मानवी संबंध व भावभावनांचे चित्रण, आनंद व दुःखाचा शोध सानियांच्या या कथांमधून दिसतो.

**फ. ६. संदर्भसूची**

२३. प्रयाण, प्रयाण, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, फेब्रुवारी १९९७, पृ. क्र. ७५

२४. कोपऱ्यावरलं घर, प्रयाण, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, पृ. क्र. १४६

२५. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५९

## ग्रंथसूची


१. प्रयाण

२. वाटा आणि मुक्काम

## ग. त्यानंतर

| | कथा | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | त्यानंतर | स्त्री, मे १९८५ |
| २ | दारं उघडावीत | हंस, दीपावली १९८५ |

**ग. १. – प्रस्तावना**

**ग. २. – शीर्षककथा**

**ग. ३. – मला भावलेल्या कथा**

**ग. ४. – समारोप**

**ग. ५. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ग. १. प्रस्तावना

'त्यानंतर' हा सानियांचा दीर्घकथासंग्रह आहे. या कथासंग्रहातील दोन्ही कथा 'दिशा घराच्या' (१९९१) या कथासंग्रहात प्रसिद्ध झाल्या होत्या. सतत प्रश्न उभे करणारी संवेदनशील स्त्री सानियांनी आपल्या लेखनातून मांडली आहे. त्या स्त्रीचा प्रवास ही बाब सानियांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. अंतिम उत्तरे मिळणे महत्त्वाचे नसते. कारण तशी ती आयुष्याच्या प्रवासात मिळतातच असे नाही असे सानिया यांना वाटते. पण त्या शोधात वाट्याला येणारे सामर्थ्य, भान, प्रगल्भता यामुळे आयुष्याला अर्थ येतो. अशा स्त्रीचे, तिच्या आजुबाजूच्या माणसांचे, नात्यांचे, त्या अनुषंगाने पडणाऱ्या प्रश्नांचे चित्रण त्यांच्या लेखनातून त्यांनी केले आहे.

या दीर्घकथा म्हणजे लेखनाकरवी घेतलेला शोध आहे. रोजचे आयुष्य जगत असताना वेगवेगळे प्रश्न पडतात. त्या प्रश्नांची उत्तरे शोधाणाऱ्या या दीर्घकथा आहेत. नवरा, मित्र, प्रियकर, मुलगा अशा नात्यांमधून सामोऱ्या येणाऱ्या पुरुषाची ओळख करून घेत जाणारी संवेदनशील स्त्री कथांमध्ये आहे. आत्मभान जागृत होत गेलेली स्त्री आणि तिचा प्रवास यांचा आलेख या दीर्घकथांमध्ये मांडला आहे.

व्यक्ती म्हणून जगताना स्वतःमधले काही अंतःप्रवाह जाणवत असतात. स्वतःमधली उत्कटता आणि तटस्थता किंवा दोन्हींचे मिश्रण जाणवत असते. व्यक्ती

म्हणून जगतानाचे जे आकलन असते ते लेखनातून व्यक्त होताना त्यात काही प्रक्रिया होते. काही मिश्रणे होतात. या साऱ्या आकलनाचे एक वेगळेच रसायन होते. म्हणूनच लेखक म्हणून जीवनाच्या आकलनाची आणि ते मांडण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष जीवन जगण्यापासून वेगळी आहे. अशीच वेगळी मांडणी या दीर्घकथांमधून अनुभवायला मिळते.

**ग. २. शीर्षककथा**

'त्यानंतर' या दीर्घकथासंग्रहात दोन दीर्घकथा आहेत. या कथासंग्रहाचे प्रकाशन सुप्रिया मराठे यांनी नवचैतन्य प्रकाशन द्वारा २००२च्या ऑगस्ट महिन्यात केले. मनोज आचार्य यांनी कथासंग्रहाचे मुखपृष्ठ रेखाटले आहे. १९९१मध्ये 'दिशा घराच्या' या कथासंग्रहात या कथा संग्रहित आहेत. 'स्त्री' आणि 'हंस' या मासिकांमध्ये या कथांची पूर्वप्रसिद्धी झालेली आहे. शीर्षककथेचा आशय आता पाहूया.

**१) त्यानंतर**

अगदी छान, रोजचे चाललेले आयुष्य अचानक एखाद्या वेगळ्याच वळणावर येऊन थांबते. अनपेक्षित बदल होतो आणि त्यानंतर सुरू होतो एक वेगळाच प्रवास. या प्रवासात न ठरवता सुरु होतो स्वतःचा शोध. नवरा अचानक निघून गेल्यानंतर ठरीव प्रतिक्रिया न देणाऱ्या राधिकाची ही कथा. स्वतःच्या सामान्य आयुष्याकडे ती बारकाईने बघते, माणसांना नव्याने ओळखते, स्वतःच्याच नवऱ्याच्या सहजीवनाची पारख करते आणि त्यातून तिला स्वतःची खरी ओळख होते. त्यामुळे मिळणारी शक्ती आणि सामर्थ्य यामुळे ती चकित होते.

ही कथा वाचताना वाचक म्हणून मनात अनेक प्रश्न उभे राहातात. अगदी या कथेत आहेत तशा व्यक्तिरेखा असतील का? इथपासून तिने असे का केले नाही? राधिका अशी शांत का राहिली? इथपर्यंत या कथेतील इतर सगळी पात्र वाचक म्हणून आपल्याला पडलेले प्रश्न विचारण्याचे काम करतात. पण राधिकेने त्यावर आपल्याला हवी तशी उत्तरे दिली नाही की आपण थोडे वैतागतो. खऱ्या आयुष्यातही असेच काहीसे घडते. राधिका मात्र आपल्याच स्वतःच्या आयुष्याकडे तटस्थपणे पहाते. जो प्रसंग जसा येईल तसा स्वीकारते. त्या त्या वेळी जे योग्य वाटेल ते करते. कोणी काहीही बोलले तरी एखाद्या अनपेक्षित घटनेनंतर होणारा बदल सहजपणे स्वीकारते. घटना घडून गेल्यानंतर....त्यानंतर...काय? जसे येईल तसे आयुष्य स्वीकारणे हा एकच पर्याय. पण

ते वाटते तितके सोपे नाही.

ही कथा आहे राधिका आणि ललित या जोडप्याची. एक दिवस सोळा वर्षांचा चाललेला सुखी संसार सोडून जाण्याचा निर्णय ललित घेतो. तो कुठे, का, कशाला चाललाय हे राधिकाला सांगत नाही. मनात कितीही प्रश्न असले तरी ते विचारायचे नाहीत असे ती ठरवते. त्यांच्या मुलावर अमोलवर या घटनेचा परिणाम होतो. तो जास्त एकलकोंडा, अबोल होतो. एक दिवस तोही त्याच्या आत्याकडे विशाखापट्टणमला कॉलेजसाठी जाण्याचा निर्णय घेतो. या निर्णयालादेखील राधिका विरोध करत नाही. ललितने तिच्यासाठी जे पैसे ठेवलेले असतात त्यातच तिचा उदरनिर्वाह होतो. बाहेर जाऊन स्वकमाईने काही करावे असे तिला मनापासून वाटत नाही. त्यामुळे ती तिचे घर सोडून कुठेही जात नाही, अगदी माहेरीसुद्धा. विजय (ललितचा मित्र) शालिनी (तिची मैत्रीण), तिचा नवरा चैतन्य, राधिकाची आई सगळे तिला या गर्तेतून काढण्याचा प्रयत्न करतात. पण ती तिच्याच विश्वात असते. ललित घर सोडून नेमका का गेला? या प्रश्नाने सारे तिला भंडावून सोडतात. या सगळ्या प्रकारात ती इतकी शांत कशी काय? हा प्रश्न विचारून तिला सतावतात. पण ती तिचा एकटीचा प्रवास चालूच ठेवते. अचानक पार्थ बॅनर्जीशी तिची ओळख होते. तो नेहमी तिच्या घरी येऊ लागतो. पार्थच्या ती प्रेमात पडते. या सगळ्यावरून व्हायची ती चर्चा होतेच. एकमेकांना कोणतेही प्रश्न न विचारता ते एकमेकांचा सहवास अनुभवतात. एक दिवस पार्थ घरी असतानाच दीड वर्षांनी ललित घरी परततो. त्यांचे नाते स्वीकारतो. कारण त्यालाही त्याची चूक माहिती असते. पण राधिकाला तिने कोणतीही चूक केली आहे असे वाटत नाही. कारण या सगळ्या प्रवासात ती स्वतःच्याच प्रेमात पडते.

ललितजवळ पार्थविषयी वाटणाऱ्या प्रेमाची प्रामाणिक कबुली देते. ''हो प्रेम आहे अगदी असूयेसकट. त्याने दुसऱ्या बायकांच्या नादी लागू नये म्हणून धडपडते. संशयाने पहाते. कधी रागावून अबोला धरते. प्रेम असंच असतं नाही?'' [२६]

अवघडलेला ललित आणि खोलीत आवराआवर करणारा गोंधळलेला पार्थ आणि विखुरलेली सगळी माणसं यामध्ये ती स्वतःच तिची उरली आहे हे सत्य तिला गवसते.

---

२६. त्यानंतर, त्यानंतर, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. ९२

**ग. ३. मला भावलेल्या कथा**

शीर्षककथा क्लिष्ट वाटली तरी विचारप्रवृत्त करायला लावणारी आहे. या कथासंग्रहातल्या दुसऱ्या दीर्घकथेत स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे भान मिळालेली करुणा भेटते.

**१) दारं उघडावीत**

'त्यानंतर' आणि 'दारं उघडावीत' या दोन्ही दीर्घकथा सानियांच्या लेखनप्रवासातील महत्त्वाचे टप्पे आहेत. 'दारं उघडावीत'मधली तरुण, वेगळा विचार करणारी करुणा अलिप्तपणे आयुष्याकडे पहात जगते. दूरस्थ अशा या प्रवासात स्वतःचे निर्णय घेण्याचे भान तिला मिळत जाते.

करुणा ही सुखवस्तू घरातली एक तरुण मुलगी असते. पण घर, करिअर, पैसा या चौकटीत राहून विचार न करणारी. ती हुशार आहे, समंजस आहे, स्वतंत्र विचारांची आहे. त्याच त्या रुळलेल्या वाटेने जाणे तिला मान्य नाही. प्रत्येकाचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन, गृहितके वेगळी असतात हा विचार ती खरा मानते. त्यावरून तिचे मित्र, मैत्रीणी तिची टिंगलही करतात, की हे सगळे तिच्या बोजड वाचनामुळे होते आहे. पण खरे तर वाचन व लेखनामुळे करुणा अधिक वेगळी बनत चालली होती. मुळातच असलेल्या तिच्या स्वतंत्र वृत्तीला पुष्टी जोडली जात नाही. करुणाचे आई-बाबाही तिला पूर्ण स्वातंत्र्य देतात कारण त्यांचा करुणावर विश्वास असतो. तिच्या वहिनीचा जयवंतीचा भाऊ प्रशांत करुणाला आवडतो. त्याच वेळी मनस्वी असा भरतही तिला आपलासा वाटतो. खूप वाचणारा, आपले आयुष्य आपल्या पद्धतीने जगणारा, मनमौजी भरत तिच्या मनावर प्रभाव पाडतो. तो विवाहित आहे हे माहिती असूनही तिला तो आवडतो. ती त्याच्याशी अगदी मोकळेपणाने बोलत असते. भरतही तिच्या या स्वभावाचा गैरफायदा घेत नाही. भरत एका शाळेत शिकवत असतो जिथे करुणाचा भाऊ राजीव शिकत असतो. करुणा त्याच्याकडे ओढली जाते. पण भरत तिला कधीच प्रोत्साहन देत नाही. त्यामुळे करुणा थोडी बेचैन होते. पण स्वतःला सावरते. ती प्रशांतकडे मुंबईला जाण्याचा निर्णय घेते. भरत ही संयमी अशी पुरुष व्यक्तिरेखा व प्रशांत मालकी हक्क दाखवणारा टिपिकल पुरुष असतो. करुणा मनातले विचार न लपवता वागणारी तरुणी असते. प्रामाणिक भरत म्हणतो, ''करुणा...प्लीज गीताशी मी लग्न केलेले आहे. लग्न या जुन्या पुराण्या संस्थेला मी अजूनही मानतो. येडगळ असेल ते कदाचित. सोयीचेदेखील नसेल. पण माझी अशी

प्रामाणिक समजूत आहे की त्याशिवाय कुठल्याही दोन व्यक्ती एकत्र राहूच शकत नाहीत, राहाणार नाहीत. चांगल्या समाजाला चांगल्या मुलांची गरज असते. उद्याचा आशादायी समाज, चांगली मुलं निर्माण करायला घरं हवीत. म्हणून....'' [२७]

### ग. ४. समारोप

'त्यानंतर' या दीर्घकथासंग्रहातून आपल्याच अनुभवांनी समृद्ध झालेल्या दोन स्त्रियांची ओळख होते. 'त्यानंतर' आणि 'दारं उघडावीत' या दोन दीर्घकथांमध्ये आयुष्याच्या प्रवासात राधिका आणि करुणा यांच्या वाट्याला येणारे सामर्थ्य, भान, प्रगल्भता दिसून येते. नवरा अचानक निघून गेल्यानंतर ठरीव प्रतिक्रिया न देता जगणारी करुणा 'त्यानंतर' या कथेची नायिका आहे. स्वतःच्या सामान्य आयुष्याकडे ती बारकाईने पाहते, माणसांना नव्याने ओळखते. स्वतःच्याच नवऱ्याची पारख करते आणि त्यातून तिला स्वतःची ओळख होते. त्यामुळे मिळणारी शक्ती आणि सामर्थ्य याने ती चकित होते. कथा वाचताना वाचक म्हणून मनात अनेक प्रश्न उभे राहातात. अगदी अशा व्यक्तिरेखा असतील का? इथपासून राधिका अशी का वागते? इथपर्यंत या कथेमधली इतर सगळी पात्र वाचक म्हणून आपल्याला पडलेले प्रश्न कथेमध्ये विचारतात. 'दारं उघडावीत' या कथेतील करुणा वेगळा विचार करणारी स्त्री आहे. आयुष्याकडे अलिप्ततेने पहाण्याचे कसब तिच्याकडे आहे. सुखवस्तू घरातली तरीही चौकटीत राहून विचार न करणारी आहे. त्याच त्या रुळलेल्या वाटेने जाणे तिला मान्य नाही. विवाहित भरतवर ती एकतर्फी प्रेम करते. भरत प्रोत्साहन देत नाही हे समजताच ती प्रशांतकडे म्हणजे तिच्या वहिनीच्या भावाकडे मुंबईला निघून जाते. भरतवर प्रेम असले तरी त्याच्या मार्गात अडसर बनून राहणे तिला मान्य नसते.

नेहमीच्या जगण्याच्या अनुभवापलीकडचे लेखकाला लिहिता येते का? याविषयी सानिया म्हणतात, ''अनेकदा असेही होते की, आपल्याला जाणवलेले काही वेगळे, आपल्या अनुभवापलीकडचे असे, परिघाबाहेरचे म्हणावे असे प्रश्न व त्यासंबंधीचे विचार मनात जागे असतात, पण साहित्यातून नेमके कसे मांडावे ते कळत नाही. ती संभ्रमावस्था असते. आपण एका तऱ्हेने लेखन करीत आलेलो असतो आणि त्या तऱ्हेत असे वेगळेच काही नक्की कसे अविष्कारित करावे ते समजत नाही. कधीकधी ते नंतर समजते. वेगळ्या वाटाही सापडतात. कधीकधी ते न उमजल्याने तसेच राहूनही जाते. वाट पाहावी

---

२७. दारं उघडावीत, त्यानंतर, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. १३९

लागते.''

या कथासंग्रहात सानिया यांनीदेखील अनुभवापलीकडे जाऊन कथालेखन केले आहे. विशेषतः शीर्षककथेतील राधिका आपल्या विचारांपेक्षा कितीतरी वेगळे वागते. आत्मभान जागृत होत गेलेली स्त्री 'त्यानंतर' या कथासंग्रहातून अनुभवायला मिळते.

**ग. ५. संदर्भसूची**

२६. त्यानंतर, त्यानंतर, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. ९२
२७. दारं उघडावीत, त्यानंतर, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. १३९

## ग्रंथसूची

१. त्यानंतर

## ह. आपण आपले

| | कथा | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | ओळख | तरुण भारत, दिवाळी १९८७ |
| २ | आपण आपले | तरुण भारत, दिवाळी १९८५ |

**ह. १. – प्रस्तावना**

**ह. २. – शीर्षककथा**

**ह. ३. – मला भावलेल्या कथा**

**ह. ४. – समारोप**

**ह. ५. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ह. १. प्रस्तावना

आयुष्याच्या ज्या टप्प्यावर स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायची क्षमता व संधी उपलब्ध होते त्या टप्प्यावर उभ्या असलेल्या तरुण, संवेदनशील मनाच्या प्रवासाचा आलेख चित्रित करणाऱ्या या दीर्घकथा आहेत. यामध्ये वेगवेगळे प्रश्न विचारणारी, त्यांची उत्तरे शोधणारी, स्वतःवरचा विश्वास बळकट करु पहाणारी आणि त्यातूनच स्वतःला व इतरांना जाणू इच्छिणारी तरुण माणसे आहेत. त्यांच्या प्रगल्भतेच्या शोधाचा हा पट आहे. केवळ स्त्रियाच नाही तर पुरुषही संवेदनशील असतात आणि वेगवेगळ्या संभ्रमातून स्वतःचा आणि जगाचा शोध पुरुषही घेतात. हे त्यांच्या कथांमध्ये दिसते. स्त्रीचा आत्मभानाचा झगडा अधिक तीव्र असतो तो सामाजिक परिस्थितीमुळे. तरीही बुद्धिनिष्ठ मन बधिर होऊ न देता जगायचे असते याचे भान सानियांच्या कथांमधील नायक नायिकांमध्ये असते.

माणूस म्हणून जगताना आपल्याला जे समजते ते आपले आयुष्याचे भान. साहित्यात अभिव्यक्त होताना ते सहाजिक साहित्यात उतरते. विशेषतः गंभीरपणे लेखनाकडे वळलेल्या कुणाचेही ते होणे अटळ आहे. लेखकाला समजलेले सगळे मांडणे हीच तर साहित्यनिर्मितीची प्रेरणा असेल. या सगळ्याचा अनुभव सानियांच्या 'आपण आपले' या दीर्घकथासंग्रहातून मिळतो. कोणतीही विशिष्ट भूमिका पत्करली की परंपरेने

चिकटलेली कर्तव्ये पालन करण्याचे बंधन येते. त्यामुळे भूमिकेच्या मोहक सापळ्यात न अडकण्याची स्वतंत्र जगण्याची पराकाष्ठा त्यांच्या नायिका करतात. भूमिकांचा भार पेलावा लागू नये याची दक्षता घेतात. 'ओळख' आणि 'आपण आपले' या दीर्घकथा पुन्हा एकदा या संग्रहातून वाचकांपुढे मांडण्यात आल्या आहेत. या दोन्ही दीर्घकथांची तरुण भारतच्या दिवाळी अंकात पूर्वप्रसिद्धी झाली आहे.

### ह. २. शीर्षककथा

'आपण आपले' हा सानिया यांचा कथासंग्रह सीमा पब्लिकेशन्सनी १९९२ साली 'ओळख' या नावाने प्रकाशित केला होता. त्यानंतर मुंबईच्या नवचैतन्य प्रकाशनने 'आपण आपले' या नावाने २००३ मध्ये पुनःप्रकाशित केला. सुप्रिया मराठे यांनी नवचैतन्य प्रकाशनच्या माध्यमातून या कथांचे पुनर्मुद्रण केले. मनोज आचार्य यांनी मुखपृष्ठ रेखाटले आहे.

### १) आपण आपले

आयुष्याच्या टप्प्यावर स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घेण्याची क्षमता व संधी सगळ्यांना मिळतेच असे नाही. या टप्प्यावर उभ्या असलेल्या तरुण, संवेदनशील मनाच्या विद्युतच्या प्रवासाचा आलेख म्हणजे 'आपण आपले' ही शीर्षककथा. यामध्ये विद्युत वेगवेगळे प्रश्न विचारते. त्यांच उत्तरे शोधण्याची धडपड करते. प्रसंगी निर्णय चुकला तरी स्वतःवरचा विश्वास ती ढळू देत नाही. 'आपण आपले' मधली विद्युत तिच्या स्वतंत्र, आत्मविश्वासपूर्ण व तडफदार स्वभावाने आलेली परिस्थिती समजून घेऊन, खचून न जाता किंवा त्याचा बाऊ न करता सारे समजून घेते.

अमेरिकेत उच्च शिक्षण घेतलेली, स्वतंत्र विचारांची विद्युत या कथेची नायिका आहे. तिच्या आई वडिलांनी तिच्या करिअरमध्ये तिला पूर्ण पाठिंबा दिला आहे. कॉलेजमध्ये शिकत असताना तिचे सतीशवर प्रेम असते. प्रेमासाठी तिने अमेरिकेला इतक्या दूर जाऊ नये असे त्याला वाटत असते. पण ती महत्त्वाकांक्षी असते. तिकडून आल्यानंतर परगावी तिला एक चांगली नोकरी मिळते. तिथेही असेल त्या परिस्थितीशी, माणसांशी जुळवून घेत ती राहाते. एक दिवशी अचानक तिची बालमैत्रीण पद्मजा आणि सतीश लग्न करत असल्याचे तिला समजते. या परिस्थितीतही ती संयमाने वागते. सतीश तिला भेटायला येतो तेव्हाही न चिडता, परिस्थितीला सामोरी जाते. होस्टेलवर राहाणारी

पद्मा नावाची तिची मैत्रीण विद्युतच्या हुशारीवर जळत असते तरी ती तिला वेळोवेळी समजून घेते. त्या गावात काम करणाऱ्या सुभाषचे अबोल प्रेम समजूनही त्याला प्रतिसाद देत नाही. तिच्या आईने तिच्यासाठी ठरवलेल्या नवऱ्या मुलाला म्हणजे भास्करला भेटते. पण त्याच्याशी लग्न करण्याइतपत किंवा सतीशबद्दल सांगावे इतकी आपुलकी तिला वाटत नाही. एकदा आई आजारी आहे असे कळताच ती तिच्या घरी जाते. तेव्हा सहज म्हणून सतीश आणि पद्मजाच्या घरी जाते. सतीश घरी एकटाच असतो. भावनेच्या आवेगात त्याच्या हातून तिच्यावर अत्याचार होतो. संताप, चीड, अपमान हे सगळे सहन करुन विद्युत पुन्हा उभी राहाते. भास्करला पत्रातून सगळे खरे खरे सांगते. या सगळ्यासह भास्कर तिच्याशी लग्न करायला तयार होतो. भास्करच्या होकारानंतर ती स्वतःलाच म्हणते, ''तू म्हणतेस ते अगदी खरं आहे. स्वतःला ओळखायला शिकलं पाहिजे. मग संवाद साधता येतो. इतरांना समजून घेणं सोपं आहे. आपणही इतरांकडून तशी अपेक्षा करणं मात्र चुकीच आहे. आणि स्वतःचच रूप इतर कुणात शोधण तर व्यर्थच आहे. आता वेळ आलीय होकार कळवायची, सगळ्यांना आनंदी करण्याची.'' [२८]

### ह. ३. मला भावलेल्या कथा

या दीर्घकथासंग्रहातील दुसरी कथा 'ओळख' जी मला भावलेली कथा आहे. आपली स्वतःशीच ओळख होण्याची प्रक्रिया नेमकी कशी असते हे या कथेतून अनुभवायला मिळते.

### १) ओळख

आपली स्वतःला ओळख होणे ही प्रक्रिया वाटते तितकी सोपी नाही. वरवर आपल्याला असे वाटत असते की मी मला ओळखले आहे. पण जसजसे आपण अंतरमनाच्या तळाशी जाऊन विचार करतो तेव्हा लक्षात येते की, कित्येक वेळा आपण घेतलेले निर्णय, कृती बरोबर होत्या की नव्हत्या. घडून गेलेल्या गोष्टींबाबत काही करता येणे सोपे नसते. पण तरीही आपण नेहमीच आपल्या वागण्याचे समर्थन करतो. पण ज्यांना स्वतःची खरी ओळख होते ते झालेले सगळे, होणारे सगळे आणि घडणारे सगळे स्वीकारतात. 'ओळख' या कथेत अश्विनी स्वतःला जाणण्याचा प्रयत्न करते तर भूषणच्या प्रवासाचाही त्याचा असा रस्ता आहे. जगाने कितीही बोल लावले तरी आपल्या स्वतःच्या झालेल्या ओळखीबाबत ते दोघेही ठाम आहेत. काही जण याला

---

२८. आपण आपले, आपण आपले, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, जाने. २००३, पृ. क्र. १२०

हट्टीपणा, अट्टाहास म्हणतीलही पण त्यांनी निवडलेला रस्ता त्यांना योग्य वाटतोय. तो योग्य का अयोग्य हे व्यक्तिनिष्ठ आहे. नेहमीप्रमाणे सानिया कथेतून कोणता निष्कर्ष घ्यायचा हे वाचकांवर सोडतात.

दोन वेगळ्या मनोवृत्तींचे तरुण प्रेमाच्या वाटेवर प्रवास सुरू करतात पण कालांतराने आपापल्या आवडी-निवडी दृष्टिकोन लक्षात आल्यानंतर एकमेकांना न दुखावता वेगळे होतात. अश्विनी आणि भूषण यांची ही कथा आहे. स्वतःच्या ओळखीतून आपापले मार्ग निवडणाऱ्या तरुणांची ही कथा आहे. केवळ स्त्रियाच नाही तर पुरुषही संवेदनशील असतात आणि वेगवेगळ्या संभ्रमातून स्वतःचा आणि जगाचा शोध घेतात. हे भूषण या व्यक्तिरेखेवरून लक्षात येते. अश्विनी एका चाकोरीबद्ध आयुष्याची अपेक्षा करत असते तर भूषण मनस्वी लेखक, कलावंत असतो. घर, संसार याविषयी स्वप्ने बघणारी अश्विनी आणि आपल्याच मस्तीत कलंदरासारखे आयुष्य जगणारा भूषण यांच्या प्रेमाविषयी सगळ्यांनाच माहिती असते. दोघांच्या कुटुंबामध्ये, गावात, मित्रमंडळीत त्यांचे प्रेमप्रकरण सर्वश्रुत असते. पण लग्न करण्यावरून दोघांचे एकमत होत नसते. कारण अश्विनीला भूषण हवा असतो. त्याने नोकरी करून आयुष्य मार्गी लावावे असे तिला वाटत असते. ते ती प्रत्यक्षपणे कधी बोलत नाही. तो समजून घेऊन बदलत नाही. असे लक्षात आल्यानंतर ती तिच्या भावाचा मित्र आनंद याच्याशी लग्न करते. भूषणशी केलेली प्रतारणा तिच्या घरात कोणालाही पटत नाही. पण भूषणचे यावर काहीही म्हणणे नसते. अश्विनी तिच्या निर्णयाने लौकिकार्थाने सुखी होते. पण मनाने नाही. भूषण त्याच्या मनस्वी वागण्याने आपले तेच खरे करतो पण अश्विनीचे प्रेम गमावतो. भूषणचे गुरु चौधरी सर त्याला वेगळेच तत्वज्ञान सांगतात, ''बेसावध असताना कधी पल्याडची आशा करू नये. तसच स्वतःला तरंगू द्यावं.'' [२९] चौधरी सरांचे हे तत्वज्ञानच त्याला स्वतःची ओळख करून देते.

### ह. ४. समारोप

सानिया यांच्या कथांमधील काळ साठोत्तरी असल्याने वाचकाला त्या आपल्या जीवनाशी साधर्म्य सांगणाऱ्या, जवळच्या वाटतात. आपल्या आजुबाजुला घडणाऱ्या गोष्टींचे प्रतिबिंब त्यांच्या कथेत अनुभवायला मिळते. काही कथा स्त्री-समस्याप्रधान असल्याने स्त्रीवाचक त्या कथांशी सहजपणे जोडला जातो. मात्र त्यांच्या कथा फक्त

---

२९. ओळख, आपण आपले, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, जाने. २००३, पृ. क्र. ७०

स्त्री वाचकांसाठी नक्कीच नाहीत. त्यांच्या कथांमधले अनुभवविश्व मानवी अस्तित्वाचा विचार करणारे व सनातन प्रश्नांना जाब विचारणारे आहे. त्यामुळे कथांमधले स्त्री-पुरुष केवळ सकारात्मक किंवा नकारात्मक नाहीत. किंबहुना सानिया यांच्या कथांचे बलस्थान हे आहे की त्यांच्या कथांमध्ये एकसुरीपणा नाही. अनाकलनीय व अतर्क्य अशा मानवी मनाचा वेध सानिया घेतात.

'आपण आपले' या दीर्घकथासंग्रहात तरुण आणि संवेदनशील मनाचा प्रवास सानियांनी घडवला आहे. या कथासंग्रहात स्वतःच्याच जीवनाचा, व्यक्तिमत्त्वाचा, सुखाचा आणि आंतरमनाचा शोध घेणारी माणसे आहेत. 'आपण आपले' या शीर्षककथेतली विद्युत स्वतंत्र विचारांची, उच्चशिक्षित तरुणी आहे. आपल्या मनाला पटेल तेच करणारी विद्युत सतीश या तिच्या मित्राचे प्रेम ठामपणे नाकारते. तिच्या नकारानंतर सतीशने केलेल्या अत्याचाराने ती मनाने उध्वस्त होते पण मनाच्याच ताकदीने पुन्हा उभी राहाते. तिच्या आईने लग्नासाठी ठरवलेल्या मुलाशी, भास्करशी सगळे मोकळेपणाने बोलते. कथेच्या शेवटी तिला जाणीव होते की, स्वतःचेच रूप इतर कोणात शोधणे व्यर्थ आहे. 'ओळख' या कथेत स्वतःची स्वतःशी झालेली ओळख अनुभवायला मिळते. कित्येक वेळा आपण घेतलेले निर्णय बरोबर आहेत की नाहीत हेच समजत नाही. घेतलेल्या निर्णयामुळे अपेक्षित समाधान मिळत नाही तेव्हा पुन्हा एकदा मागे वळून चाचपणी करावीशी वाटते. होऊन गेलेली गोष्ट बदलता येत नाही पण निदान पुढच्या आयुष्याचा मार्ग स्वच्छ, स्पष्ट दिसतो. स्वतःची ओळख करून घेत असताना झालेली चूक निदान स्वतःशी तरी मान्य करण्याचे धाडस या कथेतील अश्विनी करते. कथेतील भूषण स्वतःची चूक मान्य करत नसला तरी समजुतदारपणा दाखवतो.

प्रत्येकाने आपले बुद्धिनिष्ठ मन बधीर होऊ न देता जगायचे असते हे भान या कथांमधील नायक, नायिका देतात. संवेदनशीलता मरु देऊ नये असा संदेश या कथा देतात. चाकोरीबाहेरचे जीवन स्वीकारल्याचे फायदे व तोटे या कथानायिकांच्या वाट्याला येतात. त्या हे स्वीकारतात देखील. जसा विचार करतात तशाच कृती करतात. त्यामुळे या नायिका खऱ्या वाटतात.

### ह. ५. संदर्भसूची

२८. आपण आपले, आपण आपले, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, जाने. २००३, पृ. क्र. १२०

२९. ओळख, आपण आपले, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, जाने. २००३, पृ. क्र. ७०

## ग्रंथसूची

१. आपण आपले

## ई. ओमियागे

| | कथा | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | ओमियागे १,२,३ | सा. सकाळ, दिवाळी १९९९ |
| २ | सखी | मिळून साऱ्याजणी, दिवाळी २००१ |
| ३ | आमंत्रण | मौज, दिवाळी १९९८ |
| ४ | निरोप | कथाश्री, दिवाळी १९९८ |

**ई. १. – प्रस्तावना**

**ई. २. – शीर्षककथा**

**ई. ३. – मला भावलेल्या कथा**

**ई. ४. – अन्य कथा**

**ई. ५. – समारोप**

**ई. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ई. १. प्रस्तावना

'ओमियागे' हा सानियांचा दीर्घकथासंग्रह आहे. गावा-देशांची, जाती-धर्माची वेस ओलांडून माणसा-माणसामधल्या नातेसंबंधांचा नेमक्या शब्दात वेध घेणाऱ्या या दीर्घकथा आहेत. साहित्यिकांच्या साहित्यावर भोवतालचा भौगोलिक प्रदेश आणि तिथला प्रदेश याचा परिणाम होतो. या कथासंग्रहात हे जास्त प्रमाणात जाणवते.

बऱ्यापैकी मोठी, सजलेली घरे, मुलांच्या स्वतंत्र खोल्या, अद्ययावत साधने, वस्तू, चारचाकी गाड्या यावरून बहुतेक कथांमधले नायक, नायिका शहरात वा महानगरात वास्तव्य करणाऱ्या मध्यमवर्गीय व उच्चमध्यमवर्गीय आहेत. त्यामुळे बहुजन समाजातील अन्न, वस्त्र, निवारा हे प्रश्न त्यांच्या कथांमधून डोकवत नाहीत. प्रश्न आहेत पण उच्चमध्यमवर्गीयांचे. या घटकाचा त्यांच्या साहित्यमूल्यावर काहीही परिणाम होत नाही. सानियांनी आपल्या आजुबाजूचे, अनुभवलेले लिहिले आहे. मनातल्या विचारांचे, भावनांचे प्रत्ययकारी प्रकटीकरण त्यांच्या या कथांमध्येदेखील जाणवते. भोवतालचा प्रदेश, संस्कृती व माणसे यांचा साहित्यावर होणाऱ्या परिणामाविषयी सानिया म्हणतात, ''भोवतालचा भौगोलिक प्रदेश, माणसे, संस्कृती यांचा परिणाम एकंदर आयुष्य जगतानाच होणे अपरिहार्य आहे. साहाजिकच लेखनातूनही तो दिसणे शक्य आहे. आपले काम

आणि दैनंदिन जगणे हे सारे आपले पर्यावरण असते. त्यातून आपण कसे घडत जातो हे महत्त्वाचे. यातूनही निरनिराळे घटक आपल्यावर परिणाम करत राहातात. आपले विचार घडवत राहातात आणि विचार काही केवळ भोवतालच्या वातावरणातच बंदिस्त झालेले नसतात. केवळ एखाद्या व्यक्तीचा पुष्कळ भौगोलिक प्रवास झाला म्हणजे भरपूर साहित्यसामग्री मिळाली, इतके सोपे समीकरण असे शकणार नाही. संधी मिळणे, शक्यता उद्‌भवणे आणि त्यातून काही नवीन, वेगळे घेता-शिकता येणे या वेगवेगळ्या अवस्था असतात. तसे झाले की लेखनावर परिणाम होऊ शकतो. हा निर्णायक आहे किंवा नाही हे कुणी आणि कसे ठरवायचे?''[३०]

सानिया यांचे हे मत अगदी योग्य आहे. पण त्यांचे स्वतःचे वेगवेगळ्या भौगोलिक ठिकाणी असलेले वास्तव्य त्यांच्या कथांमधून दिसते.

### ई. २. शीर्षककथा

#### ओमियागे १,२,३

सानियांचा 'ओमियागे' हा कथासंग्रह राजहंस प्रकाशनच्या दिलीप माजगावकर यांनी प्रकाशित केला आहे. कथासंग्रहाची पहिली आवृत्ती जुलै २००४ मध्ये प्रकाशित झाली होती. सतीश देशपांडे यांनी कथासंग्रहाचे मुखपृष्ठ रेखाटले आहे. या कथा सा. सकाळ, मिळून साऱ्याजणी, मौज व कथाश्री या मासिकांमधून प्रकाशित झाल्या आहेत. या कथासंग्रहाच्या शीर्षककथा ओमियागे १, ओमियागे २, ओमियागे ३ या आहेत. या कथा जरी वेगवेगळ्या वाटल्या तरी त्या एकात एक गुंफलेल्या आहेत. एका कथेचा दुसऱ्या कथेशी संबंध आहे. ओमियागे १ मध्ये सुरू झालेली कथा ओमियागे ३ मध्ये संपते. अनिता, जेसन आणि रजत यांच्या मैत्रीच्या या कथा आहेत. अमिताच्या स्वतंत्र वृत्तीचा प्रत्यय या कथांमधून येतो. एक स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये निखळ मैत्री असू शकते हे जेसन आणि अनिताच्या मैत्रीतून अनुभवायला मिळते. ओमियागे हा जपानी शब्द आहे. ओमियागे म्हणजे भेटवस्तू.

ओमियागे १ या कथेत अनिता जपानमधील क्योतो या शहरात जेसन या आपल्या जुन्या मित्राकडे जाते. जेसनचा एकुलता एक मुलगा मॅथ्यू गेल्यानंतर त्याची बायको वॅलरीला दुसरीकडे जाऊन नव्याने आयुष्य सुरू करायचे असते. किंवा आपल्या देशात अमेरिकेत जायचे असते. पण जेसन क्योतो सोडायला तयार नसतो. जागा बदलल्याने

३०. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५८,५९

फार काही फरक पडणार नाही असे त्याला वाटत असते. त्यामुळे वॅलरी त्याला सोडून जाते.

भारतात असताना जेसन आणि अनिता यांची पुण्यातच कॉलेजमध्ये मैत्री झालेली असते. अनिता मोकळ्या विचारांची, स्वतंत्र वृत्तीची असते. तिची बहीण जाई मात्र चारचौघींसारखी असते. तिथेच रजत आणि अनिता यांचे प्रेम जमते. पण अनितासारखी बंडखोर विचारांची सून रजतच्या आईला नको असते. त्यामुळे त्यांचे लग्न सुजाताशी होते. महत्त्वाकांक्षी अनिता हे दुःख पचवून अमेरिकेत जाते. अभ्यास, काम याच्यात स्वतःला गुंतवून ठेवते. तिचे वडील नाना. नाना तिला पूर्ण स्वातंत्र्य देतात. श्रीकर नावाच्या विधुराशी उपकार करण्याच्या भावनेने ती लग्न करते. त्या दोघांमध्ये नवरा-बायकोचे बंध कधीच जुळत नाहीत. एकाच छताखाली राहून ते एकमेकांपासून खूप दूर गेलेले असतात. अशा या तीन मित्रांची कथा.

ओमियागे १ या कथेत अनिता जेसनकडे काहीही कारण नसताना जाते. खूप दिवस राहाते. श्रीकरला काहीही न सांगता, जेसनही तिला अगदी मोकळ्या मनाने घरात राहाण्याची परवानगी देतो. क्योतो शहर फिरवतो. खूप छान, प्रेक्षणीय स्थळे दाखवतो. आपले मुक्कामाचे ठिकाण शोधत शोधत जेसन क्योतोत स्थिरावतो. तिथल्या एका शाळेत नोकरी करतो. सर्वसामान्यांपेक्षा वेगळा विचार करणारे हे अनोखे मित्र-मैत्रीण असतात. संवाद खरा आत स्वतःशीच व्हायला हवा या मताशी ते दोघे ठाम असतात. क्योतोला अचानक रजत येतो. त्यावेळी अनिताला खूप अवघडल्यासारखे होते. कारण कोणे एकेकाळी त्यांचे एकमेकांवर खूप प्रेम होते. सुरूवातीचा अवघडलेपणा दूर होऊन फक्त एक मित्र म्हणून रजतशी तिचा संवाद होतो. ते सगळे खूप भटकतात. रजत भारतात परततो. काही दिवसांनी अनिता पण अमेरिकेला जाते. पण पुन्हा क्योतोत परतण्यासाठी.

ओमियागे २ मध्ये अनिता पुन्हा क्योतोत येते. तिथे तिची ओळख मिचिकोशी होते. मिचिकोचा नवरा तिला सोडून गेलेला असतो. भविष्यात दुसरीकडे जाऊन नव्याने आयुष्य सुरू करायचे तिच्या मनात असते. तिला जेसन आवडत असतो. पण जेसनपेक्षाही तिची आणि अनिताचीच छान मैत्री होते. क्योतोच्या इंटरनॅशनल हाऊसमध्ये तिची आणि जुन्कोची ओळख होते. जुन्को अनिताला जपानी भाषा शिकवते. खूपच कमी वेळात त्या दोघींचीही मैत्री होते. जुन्कोमुळेच अनिताला छोटी-मोठी कामे मिळतात. मुलाच्या मृत्यूने हललेला जेसन ती या काळात अनुभवते. तिला वाटते,

''माणसं आपण अधिकाधिक जवळ गेलो की, निराळ्याच रंगातली दिसू लागतात? की आपण मुळात काही रंगच गृहित धरल्याने तसं होणं अपरिहार्य असतं?'' [३१]

जेसनसाठी मिचिको अनिताकडे शब्द टाकते. पण जेसनला या सगळ्यात अजिबात रस नसतो. अनिता अमेरिकेत परत जाणार आहे हे कळताच मिचिको तिला मदतीची याचना करते. अनिताही तिला मदत करायला तयार होते. अमेरिकेत जाण्यासाठी अनिता तयार होते. पण यावेळी जेसन तिला थांबवून घेतो. पुण्याला जाण्याविषयी आग्रह करतो. रजतला दोन हार्टअॅटॅक येऊन गेलेत हाही त्यामागचा उद्देश असतो. अनितादेखील हा विचार मान्य करते. जेसनला तिला आठवण म्हणून ओमियागे द्यायचा असतो. पण ती भेटवस्तू ठेवायला अनिताला तिच्या स्वतःच्या घरी जायचेच नसते.

ओमियागे ३ मध्ये जेसन आणि अनिता भारतात येतात. अनिता, तिची बहीण जाईकडे दोन दिवस जाते. स्वतंत्र विचारांची, आधुनिक अनिता जाईला पटत नाही. मुलाच्या शिक्षणासाठी अनिताने मदत करावी हा तिचा स्वार्थी हेतू असतो. नात्यांमधली कृत्रिमता अनिताला कधीच आवडत नसते. तिथून ती आणि जेसन पुण्याला रजतकडे जातात, खूप फिरतात. जुन्या आठवणींना उजाळा देतात. त्यांच्या स्मरणरंजनातले ते दिवस, सुबक आणि फार हाताळले तर फुटणार नाहीत ना या भीतीत अडकलेल्या ओमियागेसारखे.

जेसन आणि अनिता जायला निघतात. सुजाता (रजतची बायको) आणि त्याची आई त्याची खूप काळजी घेत असतात. निघताना रजत तिच्या खोलीत येतो. तिला विचारतो, यापुढे तू कुठे असशील? तिचे उत्तर मार्मिक असते. ''तुला प्रतिकात्मक सांगू का रजत, आपला मुक्काम सोडच रस्तादेखील ठाऊक नसतो आपल्याला.'' नजरचुकीने काही राहिले तर नाही ना हे पहाण्यासाठी घर बंद करताना आपण जशी एक चक्कर मारतो तशीच अनिता आलेली असते. रजत, जेसन आणि अनिता काहीच बोलत नाहीत एकमेकांशी. कथेचा शेवट सानियांनी आशादायक केला आहे. ''उन्हाळ्याचे दिवस होते आणि वळवाचा पाऊस अपेक्षित होता.'' [३२]

या कथेतली वेगळी, स्वतंत्र वृत्तीची अनिता आवडून जाते. स्वतः केलेल्या चुका कबूल करण्याचा प्रामाणिकपणा तिच्याकडे आहे. जेसन आणि तिची निःस्वार्थी, निरपेक्ष मैत्री तर शब्दातीत आहे. 'रंगूनि रंगात साऱ्या रंग माझा वेगळा' या काव्यपंक्ती जगणारी अनिता तिच्या वेगळेपणामुळेच लक्षात राहाते.

---

३१. ओमियागे २, ओमियागे, सानिया, राजहंस प्रकाशन, जुलै २००४, पृ. क्र. ४८

३२. ओमियागे ३, ओमियागे, सानिया, राजहंस प्रकाशन, जुलै २००४, पृ. क्र. ८५

### ई. ३. मला भावलेल्या कथा

'ओमियागे' या कथासंग्रहात सहा दीर्घकथा आहेत. त्यापैकी तीन कथा ओमियागे १, २, ३ या शीर्षकाच्या आहेत. उर्वरित तीन कथांपैकी मला भावलेली कथा आमंत्रण.

#### १) आमंत्रण

प्रेमाची एक वेगळीच व्याख्या सांगणारी ही कथा आहे. दोन माणसांमध्ये जे बांधलेले असते तेच प्रेम असते. काही भेट, एकमेकांना वेळ देणे, नात्याला नाव देणे यांसारखे असंख्य फक्त तपशीलच राहातात. प्रेमाला संकुचित करतात.

सरिता आणि जय यांची ही कथा आहे. सरिता एक तत्वनिष्ठ डॉक्टर असते. आपल्या कामावर, रुग्णांवर तिची निष्ठा असते, प्रेम असते. तळागाळातल्या लोकांपर्यंत आरोग्याच्या सुविधा जाव्यात म्हणून ती धडपडत असते. एक दिवस तिचा नवरा जय त्याच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी अमेरिकेला जाण्याचा निर्णय घेतो. पण तत्वनिष्ठ सरिता त्याच्यासोबत जात नाही. लहानग्या निशीला सांभाळते. निशी मोठी झाल्यावर शिकण्यासाठी जयकडे जायचे ठरवते. तिच्या अभ्यासात तरुण डॉक्टर गौतम तिला मदत करत असतो. पण तो नकळतपणे सरितावर प्रेम करू लागतो. निशीचे आणि गौतमचे लग्न व्हावे असे सरिताला वाटत असते. पण खरा प्रकार गौतमकडून निशीला कळतो आणि ती परदेशी निघून जाते. सरिता महिन्याभरासाठी निशी आणि जयकडे जाते. तिथे बाप-लेकीचे असे छान जग निर्माण झालेले असते. निशीला मित्र असतात तर जयला मैत्रीणी असतात. सरिताला सुरुवातीला हे सगळे उथळ वाटते. पण परदेशात प्रॅक्टिकली जगणाऱ्यांचे विचार तिला पटू लागतात. जय आणि तिच्यामध्ये असणारी दरी बऱ्याच अंशाने कमी होते. दोघांचेही थोडे थोडे चुकले हे तिला कळून येते. जयचे आणि निशीचे परदेशी येण्याचे आमंत्रण स्वीकारल्याचा तिला आनंद होतो. जयने भारतात यावे यासाठी ती त्याला आमंत्रण देते.

#### २) सखी

श्यामल आणि तारा या जीवलग मैत्रीणी असतात. तारा परदेशी राहात असते. कथेत श्यामलच्या मनातले विचार दोन वेगळ्या भावनेतून येतात. एक म्हणजे तिची आणि ताराची घनिष्ठ मैत्री. दुसरी म्हणजे श्यामलला तिचा आलेला राग. तारा आणि सुबोधचे लग्न तिच्या जिव्हारी लागते. कारण सुबोध तिला आवडत असतो. पण ती

कधी हे बोलून दाखवत नाही. तारा आणि सुबोध परदेशात जातात. श्यामल कर्तृत्ववान असते पण दिसायला ताराइतकी सुंदर नसते. श्यामल समशेरशी लग्न करते. समशेर श्यायमलपेक्षा दिसायला चांगला असतो. त्यांना यामिनी नावाची मुलगी असते. समशेर स्वभावाने तापट असतो. त्याच्या स्वभावामुळे त्यांचे जमत नाही. तो तिला सोडून जातो. श्यामलच्या मनात सुबोधविषयी आकर्षण आहे हे ताराला समजलेले असते. तरीही ती श्यामलला समजून घेते. तिची चिडचिड, सततचे प्रश्न सहन करते. घरात कामाला असणाऱ्या आक्का, स्वतःची मुलगी यामिनी कुणीच आपल्याला समजून घेत नाही, जगात आपणच दुःखी आहोत अशा विचारांना ती कवटाळून बसलेली असते. भूतकाळातून वर्तमानकाळात यायला तयार नसते. श्यामलला हे समजते की खरी गोष्ट आपल्याला समजलेलीच नाही. स्वतःकडे ताराच्या नजरेने पाहाणे गरजेचे आहे. सतत आपल्यामध्येच रमल्याने बाकी जगाची पर्वाच केली नाही. घुटमळल्यासारखाच प्रवास झाला. नुसता काळाचा प्रवास झाला. पण त्यात आपणही चालायचे असते हे श्यामलला कधी कळलेच नाही. कळल्यानंतर तिला आपल्या सखीचे तिच्या आयुष्यातले स्थान आणि निरपेक्ष प्रेम तिला उमगते.

### ई. ४. अन्यकथा

### १) निरोप

अंतकाळ जवळ येतो तेव्हा पूर्वी केलेल्या बऱ्या वाईट गोष्टींचे हिशेब माणूस नकळतपणे मनात करतो. चांगल्या गोष्टी आनंद देतात. पण एखादी सल अंतकाळी निरोप घेताना त्रास देते. अशी सल गौण वाटण्यासाठी समोरची व्यक्ती मदत करते तेव्हा निरोप घेणे सुसह्य होते. सुजाता आणि जेसीच्या निरोपाची अशीच ही कथा आहे. सुजाता आणि राजीव कॉलेजच्या दिवसात प्रेमात पडतात. राजीवचे वडील जेसी उच्चशिक्षित व श्रीमंत असतात. समजुतदारपणे ते राजीव आणि सुजाताच्या लग्नाला होकार देतात. सुजाता तिच्या सासरी अगदी मुलीसारखीच राहाते. त्यांच्या लग्नानंतरची पाच वर्षे सुखात जातात. राजीव अर्थार्जन करत नसतो त्यामुळे त्यांनी मूल होऊ देऊ नये असा सल्ला जेसी त्यांना देतात. पाच वर्षांनी राजीवचा अकस्मिक मृत्यू होतो. त्यावेळी सुजाताला जेसी हे सत्य सांगतात की त्यांना राजीवचे भविष्य आधीच माहिती होते. अविनाशशी ती दुसरे लग्न करते. हर्षच्या रूपाने तिला अविनाशकडून मुलाचे सुखही मिळते. सारे सुरळीत चाललेले असताना अचानक राजीवच्या बहीणीचे, मंजिरीचे पत्र येते. त्या पत्रातून तिला

समजते की जेसी शेवटची घटका मोजत आहेत. ती जेसींना भेटायला जाते. सुरुवातीला तिच्या मनात जेसींविषयी राग असतो. पण दुसरे मन तिला जेसींना दोष देऊ नये असे सांगते. विधीलिखित जे आहे ते घडतेच. जेसींचा निरोप घेताना तिचे मन स्वच्छ आणि निर्मळ असते.

## ई. ५. समारोप

'ओमियागे' या दीर्घकथासंग्रहामध्ये सहा दीर्घकथा आहेत. त्यापैकी ओमियागे १, २, ३ या कथा जोडलेल्या आहेत. अनिता-जेसन आणि रजतच्या मैत्रीच्या या कथा आहेत. स्वतंत्र विचारांची अनिता मनाला भावते. जेसनची आणि तिची निरपेक्ष, निर्भेळ मैत्री वाचक म्हणून भावते. नकळतपणे अशा निर्भेळ मैत्रीची अपेक्षा केली जाते. ओमियागे म्हणजे भेटवस्तू एकमेकांना देतात. सरिता आणि जय यांच्या प्रेमाची कथा 'आमंत्रण'. या कथेत सरिता आणि जय दोघेही दोन पावले पुढे आल्याने तुटलेले त्यांचे नाते सांधण्याच्या मार्गावर येते. आपल्या स्वतःच्या चुका समजणे ही पुढे जाण्याची पहिली पायरी आहे. आमंत्रण कथेत सरिता आणि जय दोघेही आपल्या चुका कबूल करतात व एकमेकांच्या आमंत्रणाला प्रतिसाद देतात. श्यामल आणि तारा या मैत्रिणींची कथा 'सखी'. तारा आणि सुबोधचे लग्न होते. श्यामलला सुबोध आवडत असतो. पण ताराशी तो लग्न करतो. त्यामुळे ताराविषयी तिच्या मनात असूया निर्माण होते. श्यामलचा समशेरबरोबर संसार सुखी होत नाही. सतत स्वतःचे दुःख कुरवाळणाऱ्या श्यामलला तारा खूप समजून घेते. सतत स्वतःमध्ये रमल्याने जगाची पर्वा ती करत नाही हे तारा श्यामलला सांगते. आयुष्यात भूतकाळ मागे टाकून वर्तमानात जगण्याचा सल्ला ती श्यामलला देते. आपल्या सखीचे खरे स्थान श्यामलला उमगते. जेसी आणि सुजाता या सासरे आणि सूनेची कथा 'निरोप'. जेसी त्यांच्या अंतःकाळी सुजाताकडे स्वतःची चूक कबुल करतात. स्वतःच्या मुलाच्या मृत्यूचे भविष्य माहिती असूनही जेसी राजीव आणि सुजाताचे लग्न लावून देतात. त्यांनी मुलाला इतक्यात जन्म देऊ नये असे सुचवतात. हे सगळे जेसी पूर्वनियोजिताप्रमाणे करतात. त्यामुळे सुजाताच्या आयुष्यावर त्याचा परिणाम होतो. अविनाशशी दुसरे लग्न करून ती संसारसुख अनुभवते. पण आपण केलेल्या चुकीचा सल जेसींच्या मनात असतो. मृत्यू जवळ आलेला असताना, जेसी सुजाताचा निरोप घेताना सगळ्या चुका मान्य करतात.

गावा देशाची, जाती धर्माची वेस ओलांडून माणसामाणसांमधील नातेसंबंधांचा

अचूक वेध सानिया यांनी या कथासंग्रहात घेतला आहे. सानियांनी वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या भ्रमंतीतून या कथा लिहिल्या आहेत. त्यामुळे या कथा त्यांच्या अनुभवांनी अधिक जिवंत झाल्या आहेत.

## ई. ६. संदर्भसूची


३०. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलींद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५८,५९

३१. ओमियागे २, ओमियागे, सानिया, राजहंस प्रकाशन, जुलै २००४, पृ. क्र. ४८

३२. ओमियागे ३, ओमियागे, सानिया, राजहंस प्रकाशन, जुलै २००४, पृ. क्र. ८५


## ग्रंथसूची


१. वाटा आणि मुक्काम

२. ओमियागे

## ज.    अशी वेळ

| | कथा | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | लेखकाची अर्धी गोष्ट | मौज, दिवाळी २००५ |
| २ | दुष्काळ | मिळून साऱ्याजणी, २००४ |
| ३ | असण्याचा प्रश्न | सा. सकाळ, दिवाळी २००३ |
| ४ | कंगवे | माहेर, दिवाळी २००५ |
| ५ | रेषा | तरुण भारत, दिवाळी २००३ |
| ६ | सावट | मौज, दिवाळी २००४ |
| ७ | प्रेमाचं जनुक | शब्द दीपोत्सव, २००७ |
| ८ | बाई आणि.... | शब्द दीपोत्सव, २००५ |
| ९ | गतजन्म | अनुष्टुभ, दिवाळी २००२ |
| १० | लागण | अनुभव, दिवाळी २००४ |
| ११ | मुली | अनुष्टुभ, दिवाळी २००३ |
| १२ | स्वगत | अनुभव, दिवाळी २००३ |
| १३ | फक्त गृहिणी | माहेर, दिवाळी २००६ |
| १४ | तह | मौज, दिवाळी २००६ |
| १५ | अशी वेळ | सा. सकाळ, दिवाळी २००० |

**ज. १. –    प्रस्तावना**

**ज. २. –    शीर्षककथा**

**ज. ३. –    मला भावलेल्या कथा**

**ज. ४. –    अन्य कथा**

**ज. ५. –    समारोप**

**ज. ६. –    संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ज. १. प्रस्तावना

कथाकार आणि कादंबरीकार अशी स्वतःची ठळक ओळख निर्माण केलेल्या सानिया यांच्या कथांचा संग्रह म्हणजे 'अशी वेळ'. विविध दिवाळी अंकांमधून प्रकाशित झालेल्या पंधरा कथा यात समाविष्ट आहेत. स्त्रीवादी लेखिका म्हणून त्यांच्या लेखनातून अधोरेखित झालेली त्यांची प्रतिमा या संग्रहातूनही प्रत्ययास येते.

३३.    वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ६२

कुठलाही अभिनिवेश न ठेवता स्त्रीच्या स्वातंत्र्याचा, तिच्या अस्तित्वाचा अर्थ सांगू पहाणाऱ्या कथांचा समावेश या कथासंग्रहात आहे. आयुष्यातील रोजच्या, साध्या घटनांमधून स्त्रीला गवसत जाणारा स्व मुक्तीचा अर्थही त्या सूचकतेने व्यक्त करतात. स्त्रीला येत जाणारे आत्मभान, तिच्या सहवासातील पुरुष व्यक्तिरेखाही जेव्हा आजमावताना दिसतात तेव्हा स्त्री-पुरुष नात्याचे एक प्रगल्भ परिमाण या कथांमधून दिसून येते. अनुभवांचे रूप आगळ्यावेगळ्या दृष्टीतून न्याहाळणारी सानियांमधली लेखिकेची नजर या कथांच्या माध्यमातून वेगळ्या टप्प्यावर उभी असल्याचे जाणवत राहाते.

आपले जगणे एका तऱ्हेने सामाजिक असतेच. आपला समाज वेगवेगळ्या स्तरांचा, मिश्र, गुंतागुंतीचा बनलेला आहे. समाजाशी साहित्यिक म्हणून आपली बांधिलकी सानिया स्पष्ट करतात. त्या म्हणतात, ''साहित्यिक म्हणून आपली बांधिलकी आपण कशा तऱ्हेची व्यक्ती आहोत त्यावरच अवलंबून असणार. फार तर असे म्हणता येईल की आपण शब्दातून जे सांगत राहातो, आपल्या साहित्यातून आपल्यातल्या व्यक्तीचे म्हणून जे प्रतिबिंब पडते ते व आपण प्रत्यक्षात वागत राहणारी व्यक्ती यात तफावत असता कामा नये किंवा आपली आत्मिक बांधिलकी आपण स्वतः मान्य केलेल्या ज्या विचारांना आणि मूल्यांना असेल त्यानुसारच आपण समाजाचा एक घटक म्हणून वागत राहिलो तर तशी तफावत आढळणार नाही.'' [३३]

'अशी वेळ' या कथासंग्रहातील सगळ्याच कथा सानियांच्या स्वतःच्या विचारातून, मूल्यांमधून लिहिल्या गेल्या आहेत. समाजातले प्रश्न, समस्या, सुख-दुःख या कथांमधून सानिया सांगतात. त्यामुळे या कथा त्यांच्या वेगळेपणासह मनाला भावतात.

### ज. २. शीर्षककथा

सानिया यांचा 'अशी वेळ' हा कथासंग्रह मौज प्रकाशन गृहाने १ मार्च २०१० रोजी प्रकाशित केला आहे. संजय भागवत हे कथासंग्रहाचे प्रकाशक असून मुखपृष्ठ चंद्रमोहन कुलकर्णी यांनी रेखाटले आहे. कथासंग्रहात बहुतांश नायक किंवा नायिका प्रथमपुरुषी एकवचनी निवेदक आहेत.

### १) अशी वेळ

कथेतील घटना, भावना, पात्र अगदी रोजचीच आहेत. आपल्या प्रत्येकाच्या बाबतीत घडलेल्या या घटना आहेत. पण या कथेतून एका वेगळ्या सकारात्मकतेने

ही पात्र भेटतात. या कथेतील नायिका आपण नेहमी अनुभवतो. सानिया यांनी 'अशी वेळ' या कथेतून आयुष्याच्या सायंकाळी जडलेल्या विस्मरणाच्या सवयीकडे लक्ष वेधले आहे. वय उतरणीला लागले की भेडसावणारा प्रश्न म्हणजे विस्मरण. ही अवस्था प्रत्येकाचीच होते. ज्येष्ठ नागरिकांच्या एका साध्याशा पण महत्त्वाच्या समस्येवर ही कथा भाष्य करते. वय वाढत जाते तसतसे विसरण्याचे प्रमाण वाढत जाते. गॅस बंद केलाय की नाही? बाथरूममध्ये नळ चालूच आहे का? घराची किल्ली घरातच राहिली का? रस्त्यात भेटलेल्या माणसाचे नाव काय होते? या आणि अशा अनेक प्रश्नांना उतारवयात सामोरे जावे लागते. या कथेची नायिका एक वेगळाच मुद्दा मांडते. अशी कोणती आठवण असेल जी विसरली तर आयुष्यच संपेल? चांगल्या, सुखद अशा अनेक आठवणी असतात, ज्या विसरू नये असे प्रत्येकाला वाटते. पण नीट विचार केल्यावर लक्षात येते की त्या आठवणींचा आणि वर्तमानकाळाचा आता काहीही संबंध राहिला नाहीये. भविष्य सुधारेल या आशेने या आठवणी जपल्या जातात. तसे नाही झाले तर मग जगायचे कशाला? अशा प्रश्नाच्या भीतने त्या आठवणी हव्या असतात. अशी वेळ आयुष्यात येतेच की काही गोष्टी लक्षात राहातात, काही विसरल्या जातात. थोडक्यात काय आठवणींमध्ये रमण्यापेक्षा आजला महत्त्व दिले पाहिजे. कथेच्या नायिकेच्या मनातल्या विचारांमध्ये वाचक म्हणून आपण इतके हरवून जातो की ते सगळे विचार आपलेच असल्यासारखे वाटते. भूतकाळात रमण्यापेक्षा किंवा भविष्याचा विचार करण्यापेक्षा वर्तमानात जगण्याचा संदेश ही कथा देते.

**ज. ३. मला भावलेल्या कथा**

'अशी वेळ' या कथासंग्रहातील मला सर्वात जास्त भावलेली कथा 'फक्त गृहिणी' आणि इतरही वेगवेगळ्या आशयांच्या कथा या मुद्यात समाविष्ट होतील.

**१) फक्त गृहिणी**

प्रत्येक गृहिणीच्या मनातली व्यथा आणि भावना सानियांनी अगदी अचूकपणे मांडली आहे. घरातली सगळी कामे करणारी गृहिणी खरे तर नोकरीपेक्षाही जास्त महत्त्वाचे काम करत असते. पण प्रत्येक गृहिणीला पैसे कमवत नसल्याचा न्यूनगंड असतो. या कथेतल्या तिलाही हा न्यूनगंड येतो. योग्य वेळी करिअर करण्याचा निर्णय का घेतला नाही असा प्रश्न तिला पडतो. अशा वेळी नवरा म्हणतो, मी तुला अडवले नव्हते, पण त्यावेळी ती मुलगी आणि संसार या दोन गोष्टींना महत्त्व देते. आजुबाजूच्या

बायका नोकरी आणि घर छान सांभाळतात. मग आपल्याला ते जमले नसते का अशा विचाराने ती अस्वस्थ होते. अगदी घरात धुणीभांडी करणारी बाईसुद्धा कामाची आहे पण आपण नाही असे तिला वाटू लागते. कोणी विचारले, ''काय करता तुम्ही?'' तर फक्त गृहिणी असे म्हणण्याचा तिला राग येत असतो. स्वतःच्या मनाशी संवाद साधून आजुबाजूची परिस्थिती बघून ती ठरवते की आपणही कमी नाही. पुष्कळ काही करतो आपण. पैसे कमावले नाही म्हणून काय झाले? घरासाठी, संसारासाठी जे केले ते काही कमी नाही. स्वतःच्या मनाशी संवाद साधताना तिच्या एक लक्षात येते की, ती एक स्त्री आहे जी आपल्या स्वतःच्या कुवतीप्रमाणे जीवन जगते आहे. आपल्या परीने जमेल ते सगळे करते आहे. ती फक्त गृहिणी नाही तिला तिचे असे अस्तित्व आहे. तिच्या मनात येणारे विचार मांडताना सानिया कथेतून सांगतात, ''तिने मनात नोंद केली. काय करता तुम्ही? आहे, पुष्कळ काही करते. कोण आहात तुम्ही? गृहिणी आहे मी. बाई आहे. अमुकतमूक ढमुक आहे. आणि? दिसतं, ऐकू येतं ते टिपते. मनात ठेवते, साचवते, विचार करते, जगते. एकंदरीत रोजचा दिवस माझ्या पद्धतीने, कुवतीने, परीने, सुख-दुःखात जगते. दुसरं काय करणार? मी फक्त गृहिणी आहे. नाही नाही, मी गृहिणी आहे, नाही, तसंही नाही, मी 'मी' आहे. साधी माणूस आहे. बाई आहे आणि विचार करत करत जगते आहे. पुरेसं आहे.''[३४]

## २) तह

कथालेखनाचा एक वेगळा प्रकार म्हणजे ही कथा. पत्राच्या माध्यमातून मनातल्या विचारांची, भावनांची सुरेख मांडणी या कथेत केली आहे. प्रेम आणि युद्ध या दोन टोकाच्या भावनांचे उत्कट प्रकटीकरण म्हणजे ही कथा. रोजच्या जगण्यातले प्रेम आणि युद्ध अनुभवत असताना या दोन्हीमध्ये तह करूनच जगता येते अशी एक सुंदर कल्पना या कथेत मांडली आहे. माणसाकडे प्रेम आणि युद्ध करण्यासाठी तितकी टोकाची भावनिकता असावी लागते. ज्या व्यक्तीवर मनापासून प्रेम केले जाते तीच व्यक्ती युद्धाला कारणीभूत होते. म्हणजे ते खरे प्रेमच नाही. प्रेमाची उदात्तता कितीही समजली असे म्हटले तरी अपेक्षा ठेवल्याच जातात. अपेक्षाभंग झाली की दुःख वाट्याला येते आणि सुरु होते युद्ध. पण हे युद्धही कायम चालू ठेवणे शक्य नसते. जगण्यासाठी या दोन्हीमध्ये तह करावाच लागतो. कथेच्या नायिकेच्या मनात येणारे विचार सानियांनी प्रभावीपणे मांडले आहेत.

---

३४. फक्त गृहिणी, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. १५९

करुणा तिची मैत्रीण असते. अभावग्रस्तांना मदत करणारी, समाजकार्य करणारी करुणा. पण तिच्याच जीवनात प्रेमाचा अभाव असतो. तिच्या मनात निर्माण झालेली पोकळी माया नावाची अनाथ मुलगी भरून काढते. पण माणसे एकमेकांना कंटाळतात सुद्धा. मग कुरापती काढतात. वैर धारण करतात. पूर्ण ओळख झालेली असतेच असे नाही. नाते असले की भांडण आणि नसले की लढाई. जगभर जर लोकांना प्रेमच प्रेम मिळाले तर युद्धाची गरजच काय? प्रेम हा शब्दही युद्धाइतकाच मोठा. पण आपणच वापरून वापरून तो स्वस्त केला. शेवटी युद्धात काय आणि प्रेमात काय, तह केला तरच सर्वनाश टळतो. कित्येक वेळा खूप मोठे नुकसान टाळण्यासाठी तह केलेलाच बरा असे वाटते. कितीही मोठे संकट, दुःख वाट्याला आले तरी आयुष्याशी तह करून पुढे जावे लागते हा संदेश देणारी ही कथा आहे. मनातल्या विचारांचे जसेच्या तसे प्रकटीकरण सानिया करतात. कथा वाचताना अगदी आपल्याच मनातले विचार वाचतोय असे वाटते.

### ३) स्वगत

कथालेखनाचा एक वेगळा प्रकार म्हणजे 'स्वगत'. स्वगत म्हणजे मनाचा मनाशी चाललेला संवाद. पण हे स्वगत दुसऱ्या कोणाशी तरी संवाद साधणारे आहे. एका वेळी मनातल्या दोन वेगळ्या पुरुषांशी साधलेला संवाद या कथेत आहे. कळणे आणि आकळणे यामधली प्रक्रिया म्हणजे स्वगत ही कथा. मुंबईत नोकरीसाठी स्वतंत्र जीवन जगण्यासाठी आलेली मधू, तिचे जीवनानुभव आणि त्यातून तिला आलेली प्रगल्भता म्हणजे स्वगत. मधू नोकरीच्या निमित्ताने मुंबईला येते. ती तिच्या आईच्या मैत्रिणीकडे सईमावशीकडे राहाते. तिथे तिची ओळख तिच्या मुलाशी म्हणजे आनंदशी होते. आनंदचे आणि तिचे विचार जुळतात. गप्पांच्या माध्यमातून ते एकमेकांचे खूप चांगले मित्र होतात. आनंद तिला त्याच्या वर्धन सरांकडे घेऊन जातो. अतिशय विद्वान असे वर्धन सर आणि त्यांचे घर तिला आवडते. मधूला नोकरी आहे पण आपल्या मुलाला नोकरी नाही या विचाराने सईमावशी अस्वस्थ होते. मधूचे वर्धन सरांकडे येणे जाणे वाढते. त्याचबरोबर तिचे आणि आनंदचेही चांगले जमू लागते. त्याला नोकरी लागल्यानंतर तर तो अधिकच खूष होतो. ते लग्न करायचे ठरवतात. ही बातमी वर्धन सरांना सांगण्याआधी ते मधूशी गैरवर्तन करतात. ते ती कोणालाच सांगत नाही. पण नंतर वर्धन सर एका मुलीचा विनयभंग केल्याच्या प्रकरणात अडकतात. तेव्हा चौकशी समितीपुढे मधू तिच्यावरच्या प्रसंगाबाबत सांगते. यानंतर ती अधिक मोकळ्या आणि स्वच्छ मनाने पुढील आयुष्याला सामोरी

जाते. अधिक क्षमाशील बनते. तिच्या विचारांना वेगळ्या प्रकारची प्रगल्भता येते.

### ४) मुली

माणसाचे मन ही एक अजब गोष्ट आहे. मनात चाललेल्या सगळ्या विचारांचा थेट आपल्या आचार-विचारांवर परिणाम होतो. मनातले विचार कधी कधी इतके गंभीर रूप धारण करतात की, मनातच असलेल्या पण प्रत्यक्षात नसलेल्या गोष्टींचे, व्यक्तींचे अनुभव येऊ लागतात.

मनू ही एक साधी मुलगी असते. ती मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेली असते. तिचे आई-बाबा नोकरी करत असतात. भाऊ आपल्या कामात व्यस्त असतो. मनू कॉलेजमध्ये शिकत असते. तिचे रोजचे रुटीन चालू असतानाच तिला तिच्या रोजच्या रस्त्यावर दोन मुली दिसतात. एक पाच-सहा वर्षांची, एक तेरा-चौदा वर्षांची असते. मोठी मुलगी अतिशय कोरडी, शून्य नजरेची असते. धाकटी मात्र तिच्याच विश्वात रमलेली असते. मनू रोज या मुलींना पहात असते. या दोघींच्या आयुष्यातील वेदना तिला दिसते. एक दिवस अचानक ती मोठी मुलगी स्वतःच्या दुर्भाग्याची कहाणी सांगू लागते. त्यांना गावाहून हाकलून कसे दिले? मग दोन गाड्या बदलत त्या या शहरात कशा पोहोचल्या? एक दादा त्या मुलीचे शरीर वापरून पैसे कसे कमावतो? हे सगळे ती सांगते. ती सांगते की, तिच्या मोठ्या ताईला विकले आहे. कदाचित थोड्याच दिवसात तिलाही विकतील. हे सगळे ऐकून मनू हवालदिल होते. अंथरुणच धरते, खूप आजारी पडते. तिची आई जिन्यावरून येत असते. नुकत्याच आजारपणातून उठलेल्या मनूला आई रागावते. कोणीही नसताना तुला नुसते भास होत आहेत असे सांगते. आभासाच्या दुनियेत जगणाऱ्या मनूला या दोन मुलींचे जीवन हादरवून टाकते.

मनात निर्माण होणाऱ्या आभासी घटनांची लक्षवेधक कथा म्हणजे 'मुली'. आपल्या मनाचा थांगपत्ता लागणे किती कठीण असते हे या कथेवरून समजते. मनात रचलेल्या गोष्टी इतक्या तीव्रतेने रचल्या जातात की त्या प्रत्यक्ष दिसू लागतात. स्वप्नातले जग जसे काही काळापुरते खरे वाटते अगदी तसेच. अति संवेदनशील लोकांना येणाऱ्या अनुभवाचे सानियांनी परिणामकारक असे वर्णन केले आहे. ही कथा वाचताना आपणही मनूच्या आभासी जगाचा भाग बनतो.

### ५) गतजन्म

आपल्याच अचेतन मनात घडलेल्या एखाद्या भयंकर घटनेचा परिणाम म्हणजे गतजन्म. कोणत्याही स्त्रीसाठी तिचे चारित्र्य सर्वात महत्त्वाचे असते. स्वप्नातही शरीरावर झालेले अत्याचार सहन करणे बाईला अतिशय वेदनादायक असते. 'गतजन्म' कथेत ती तिच्या चौकोनी कुटुंबात चारचौघींसारखी सुखात जगत असते. तिचा मेनोपॉझ सुरू झालेला असतो. त्यामुळे शरीरसुखाची ओढ कमी झालेली असते. सहाजिकच नवऱ्याची चीडचीड होते. मुलगा नोकरी न करता घरात नुसता बसून राहातो. मुलगी शंभर गोष्टींमध्ये डोके खुपसून बसलेली असते. शिवाय मुलीचे एक गंभीर प्रेमप्रकरणदेखील चालू असते. या सगळ्यामुळे तिच्या मनावर ताण असतोच. त्यात भर पडते ती त्या विचित्र स्वप्नाची. तिच्यावर एक आडदांड माणूस बलात्कार करतो आहे असे स्वप्न तिला रोज पडते. त्यामुळे तिला डोकेदुखीचा विकार जडतो. त्याचे प्रमाण प्रचंड वाढल्यावर ती मनोविकारतज्ज्ञाला भेटते. काही औषधे, मनमोकळे बोलून तिला थोडे बरे वाटते. पण त्रास पूर्ण कमी होत नाही. त्यानंतर बलात्कार या विषयावरची पुस्तके वाचणे, बलात्कारपिडीत संस्थांना भेट देणे अशा गोष्टी ती सुरू करते. या ना त्या कारणाने तिच्या घरातले तिच्यापासून दूर होतात. तेव्हा आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिची डोकेदुखी थांबते आणि ते स्वप्नही पडणे बंद होते. तिला अचानक साक्षात्कार होतो की आत्तापर्यंत सामान्य आयुष्य जगलेली ती कुणीतरी वेगळीच बाई आहे. त्या बलात्कारित बाईच्या आयुष्याचा स्पर्श तिला होऊन गेला आहे आणि तिला तो घालवता येणार नाही. कदाचित गतजन्मात घडलेली घटना तिचा पाठलाग करत होती. ''मग ती तिच्या आयुष्यातून बाजूला झाली. सावकाश, मनानं आणि एका मोठ्या सामूहिक, एकत्र, खऱ्या अशा पटाचा भाग बनून गेली. आता 'तिचं', 'दुसरं' किंवा 'उरलेलं' असे आयुष्य तिच्या वाट्याला आलेलं आहे आणि एका अर्थी ते अपरिहार्य असलं तरी तिला निवड करून ते अविष्कृत करण्याचं स्वातंत्र्य मिळालेलं आहे.'' [३५]

### ६) बाई आणि......

स्त्रीने तिचे स्त्रीत्व ओळखणे आणि आपल्यासारख्याच दुसऱ्या स्त्रीला समजून घेणे म्हणजे 'बाई आणि.....' ही कथा. बाई आणि तिचे बाईपण अभिमानास्पद असले पाहिजे. तिचे शरीर, तिच्या भावना, तिच्या शारीरिक आणि भावनिक गरजा, तिला

३५. गतजन्म, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. १२०

वाटणारे आकर्षण, तिचे समाधान, तिचे आईपण हे सगळे एका स्त्रीने तिच्या नजरेतून दुसऱ्या स्त्रीला सांगितले आहे असे ही कथा वाचताना वाटते. कथेची नायिका आणि तिची आई याच त्या दोन स्त्रिया. ती शाळेत असल्यापासून तिचे लग्न होऊन संसार सुरळीत चालू आहे इथपासून तिच्या आईच्या शेवटच्या घटका इथपर्यंत ही कथा प्रवास घडवते. ती शाळेत असताना तिला शरीर संबंधांविषयी वाटणारे आकर्षण, ते नेमके काय असते हे जाणून घेण्याची जिज्ञासा सानिया मोकळेपणाने मांडतात. पण लेखनात अश्लीलता नाही. थेट, सरळ पडणारे प्रश्न त्यांनी कथेत मांडले आहेत. तिचे लग्न होत नसते. कसेबसे ते ठरते. तिच्या नवऱ्याशी तिचे संबंध फार आनंददायक नसतात. शरीरिक सुख उपभोगतानाही ती समाधानी नसते. पण बहुतेकांचे हे असेच असते असे मानून ती समाधान मानते. त्यानंतरचा तिचा संसार चारचौघींसारखा होतो. प्रौढ कुमारिका असणारी तिची आणि मैत्रीण आणि त्या मैत्रीणीच्या भावना बाईपणाचा आणखीन एक पैलू उलगडतात. आपल्याच भावाची बायको, अगदी काल परवा घरात आलेली. पण आता एक बाई म्हणून तिचे घरात समरसून जाणे या सगळ्या भावना एक बाई म्हणून लेखिकेने या कथेत मांडल्या आहेत.

## ७) प्रेमाचं जनुक

'प्रेमाचं जनुक' मधली मुलगी तिच्या आईच्या निधनानंतर वडिलांपासून वेगळी राहाते. बापाचा मुलीशी कधी संवादच नसल्याने तेवढा वेळ उसंत व मुख्य म्हणजे इच्छा नसल्याने बायकोच्या रूपाने दोघांमधला पूल कोसळल्यावर त्याला मुलीशी काय व कसे बोलावे हेदेखील उमगत नाही. आपले यशस्वी व चांगले करिअर सोडून प्राण्यांसाठी काम करणाऱ्या एका स्वयंसेवी संस्थेत कार्यकर्ती म्हणून दाखल होते. यामागची प्रेरणा त्याला कळत नाही, पटतही नाही.

एकमेकांवर नितांत प्रेम करणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. प्रेम करण्याची इच्छा मनात असायला लागते. काही गोष्टी आपल्या पूर्वजांकडून आपल्याला मिळतात. साधारणपणे आई-वडिलांचे गुण मुलांमध्ये नैसर्गिक रीतीने येतात. शास्त्रीय भाषेत त्याला जनुक असे म्हणतात. प्रेमाचं जनुकही असेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाते. फक्त ते जनुक असणाऱ्यांनाच प्रेमाचे खरे महत्त्व कळते. या कथेत तो अतिशय रुक्ष, व्यवहारी, कामालाच महत्त्व देणारा असतो. त्याची बायको प्रेमळ, सहनशील, माणसांना महत्त्व देणारी असते. त्याचे आणि त्याच्या बायकोचे स्नेहपूर्ण संबंध नसतातच. पण

त्यांच्या मुलीमध्ये प्रेमाचं हे जनुक आलेले असते. लहानपणापासून ती आपल्या आईलाच सर्वस्व मानते. कारण तिला वडिलांचे प्रेम कधी मिळतच नसते. अगदी आपल्याच मुलीचा वाढदिवस लक्षात राहू नये इतका तो कोरडा असतो. आईपासून मिळालेला प्रेमाचा ओलावा त्यांची मुलगी जपते. त्याच्या बायकोचा अचानक मृत्यू होतो. त्यानंतर तो एकटा पडतो. एक दिवस वर्तमानपत्रावरील तारीख वाचल्यानंतर त्याला आठवते की आज आपल्या मुलीचा वाढदिवस आहे. माणसांच्या जगात रमण्यापेक्षा ती प्राण्यांच्या जगात जास्त रमते. जखमी प्राण्यांसाठी काम करणाऱ्या संस्थेत स्वतःला वाहून घेते. ध्येय एकच ठेवते, ज्यांच्यामध्ये हे प्रेमाचे जनुक आहे अशांसाठी एक वेगळे जग उभे करायचे.

## ८) रेषा

जीवनात नाती कितीही नाकारली तरी कोणत्या ना कोणत्या वळणावर ती आपल्याला भेटतातच. नात्यामध्ये असणारी पुसटशी रेषा ही ओढ निर्माण करते.

निमी ही एक स्वतंत्रपणे आणि मुक्तपणे विचार करणारी मुलगी 'रेषा' या कथेची नायिका आहे. तिच्या माईने एकटीने तिला लहानाचे मोठे केले असते. निमीचे वडील तिच्या आईला अव्हेरून दुसऱ्या बाईशी संबंध ठेवतात. या अपमानाने मा निमी लहान असतानाच तिला घेऊन ते घर सोडून निघून जाते. निमी तिच्या वैयक्तिक आयुष्यात वडिलांनी केलेली चूकच करते. याचादेखील मा ला खूप राग येतो. कारण ती एका लग्न झालेल्या माणसावर प्रेम करते. एक संसार तोडण्याचे पाप निमी करते आहे असे तिला वाटते. निमीच्या वडिलांचा हा गुण तिच्यात आला आहे असेच तिला वाटते. मा तिला सांगते, ''आपला भरोसा फक्त स्वतःवरच ठेवायला शीक निमी. स्वतः चुका करून शिकण्याला पर्याय नसतो; पण दुसऱ्या कोणाच्या भरोशावर चुकांचा भार विनाकारण पाडून घेऊ नये, विश्वासघात व्हायला वेळ लागत नाही.'' [३६]

आजीच्या आजारपणाचे कळताच निमी आजीचा पत्ता शोधून तिच्या घरी जाते. तिथे तिला तिचा सावत्र भाऊ शिशीर भेटतो. मा आणि ती स्वतः, याहून वेगळे जग नसणाऱ्या निमीला नात्यांच्या रेषा आणि त्या नात्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रवास समजतो. हे नाते म्हणजे मागे मागे जात जाणारी पण सांधणारी रेषाच आहे असे तिला वाटते. आपण स्वतः आणि आपल्याला जन्म देणारी आई एवढाच नात्यांचा आवाका नाही. या गर्भाचे

---

३६. रेषा, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. ६३

(स्वतःचे) कोणाकोणाशी असे रेषांमधून पसरणारे नाते असते हे तिला पटते. ती विचार करू लागते.

''निमीला मात्र स्वतःचाच प्रवास दिसला. परतीचा. गेल्यावर कधीतरी मा विचारेलच. तिला समजेल, पटेल असे काही सांगता येणे अशक्यच आहे. ती आपल्याही निर्णयाबद्दल विचारेल; पण तेही सांगणे अवघड आहे. इथे येऊन इतकी वर्षे हरवलेल्या आजीला सापडवणे एवढीच गोष्ट, सरळ साधी आहे. कदाचित पुढेमागे तेवढीच सोपी वाटेल आणि त्याचा आनंद होईल. बाकीचे काळात वाहून गेलेल असते.'' [३७]

जीवनाची रेषा चुकलेल्या निमीला तिच्या भविष्यकाळाची रेषा सापडते.

### ९) कंगवे

रोजच्या आयुष्यातला एक साधा प्रसंग पण त्यातून आयुष्याचा अर्थ 'कंगवे' या कथेतून सांगितला आहे. आज असणारी परिस्थिती उद्या असेलच असे नाही पण जीवन चालूच राहाते. आज आपल्यासोबत असणारी माणसं उद्या असतीलच असे नाही. तरीही जगणे थांबवून चालत नाही असा जीवनाचा अर्थ सांगणारी कथा 'कंगवे'. कंगवे विकणारा म्हातारा माणूस कथेचा विषय होऊ शकतो ही गोष्ट एरवी लक्षातही येत नाही. पण ही कथा वाचताना आपल्याला सहजच दिसणारा एखादा कंगवेवाला आठवतो.

कथेची नायिका म्हणजे आपणच आहोत असे वाटते. रस्त्याच्या कडेला रंगीबेरंगी वेगवेगळ्या आकाराचे कंगवे विकणारा म्हातारा तिचे लक्ष वेधून घेतो. गर्दी आपल्यामुळे खोळंबली आहे याचेही तिला भान राहात नाही. त्याच्याकडे पाहून मनात अनेक विचार येतात. याचे या कंगव्याच्या विक्रीतून भागत असेल का? हा कुठे राहात असेल? इ. इ. ती त्याच्याकडून कंगवे विकत घेते. मुलीला आपले आपण केस विंचरायला शिकवते. तिचा नवरा दुसऱ्या गावी नोकरीनिमित्त राहात असतो. सहा महिन्यांसाठी गेलेला तो जवळपास दोन वर्षे होतात तरी येत नाही. घर, ऑफिस, मुलगी, सासु या जबाबदाऱ्या ती पार पाडत असते. एके दिवशी अचानक तो कंगवेवाला तिला दिसत नाही. ती उगीचच खूप बेचैन होते. मनात एक विचित्र हुरहुर निर्माण होते. आधीच बरेच कंगवे घेऊन ठेवल्याचा आनंदही तिला होतो. त्याला पोलिसांनी धरून नेले आहे हे कळताच तिला वाईट वाटते. आज जरी तो कंगवेवाला तिथे नसला तरी पुढेमागे विकायला आलेले कंगवे असतीलच या आशावादी विचाराने कथेचा शेवट होतो. एकंदरीत जीवन कोणासाठी

---

३७. रेषा, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. ७०

थांबवून चालत नाही, ते आशेच्या जोरावर चालू ठेवावेच लागते हा विचार सांगणारी ही कथा आहे.

### १०) असण्याचा प्रश्न

एक वेगळीच कल्पना या कथेत सानियांनी मांडली आहे. आपल्या जगासारखे एक दुसरे जग म्हणजे 'पर्यायी जग'. या जगातले आयुष्य आपल्या जगातल्या आयुष्यापेक्षा थोडे वेगळे असते. म्हणजे खऱ्या जगात एखादी गोष्ट आपण सोडून दिलेली असते. त्या गोष्टीची अनुभूती या पर्यायी जगात आपल्याला मिळते. हे जग बाहेर कुठेही नसून आपल्या मनातच असते. फक्त असे आभासी जग अनुभवता आले पाहिजे.

संसारात राहूनही बऱ्यापैकी अलिप्त राहाणारी ती ही कथेची नायिका आहे. ती तिच्या मुलीच्या बाळंतपणासाठी परदेशात आलेली असते. तेव्हा कॉलेज जीवनात तिच्या विचारांनी भारवलेला तिचा मित्र तिला खूप वर्षांनी भेटतो. परदेशातलाच नवरा हवा या हट्टापोटी तिच्या मुलीने परदेशातल्या मुलाशी लग्न केलेले असते. ती तिथे गेल्यानंतर तिला त्या दोघांमधल्या वादविवादाची कल्पना येते. तिचा नवरा म्हणजे जावई तिच्याशी फारच जेमतेम संबंध ठेवून असतो. कोणत्याही प्रकारची जबरदस्ती करत नसतो. कारण त्याला असे वाटत असते की, बांधून ठेवले की माणसे प्रेमात राहात नाहीत. तिची मुलगी आणि तिचा नवरा अतिशय कोरडेपणाने एकमेकांशी वागत असतात. त्यामुळे तीही तशीच वागते. या सगळ्यामध्ये तिचा मित्र तिला समजून घेण्याचा प्रयत्न करतो. ती मनातल्या पर्यायी जगात जगते. कारण तिथे तिच्या मनासारखे असे संपूर्ण व्यापलेले असते. त्या जगात राहून, ते जग आपल्यासोबत घेऊन ती जगते. तिला कायमच व्यक्त व्हायला आवडत असते. पण व्यक्त न होणाऱ्या अव्यक्त जगात राहून व्यक्त होण्याचा आनंद ती घेते. तिला वाटते, कोणत्याही बाबतीत आपण असण्याचा प्रश्न असतो. बाकी सगळी पोकळ गृहितकच असतात. त्यामुळे ज्या जगात आपल्या मनासारखे घडत नाही त्या जगात असण्यापेक्षा पर्यायी जगात असण्याने ती जास्त समाधानी राहाते.

### ११) दुष्काळ

अगदी आजही लागू व्हावी अशी ही कथा आहे. 'नळ' हे एक प्रतीक घेऊन तिच्यातला आणि त्याच्यातला संवाद खरे तर विसंवाद कथेत शब्दबद्ध केला आहे. पाणीबचत करण्यासाठी घरातल्या गळक्या नळाला घट्ट बंद करायला हवे हा तिचा विचार

असतो, तर नवीन लग्न झाल्यावर या असल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून फक्त प्रणायातच रंगून जावे असे त्याचे म्हणणे असते. दुष्काळ आणि पाणीबचत याच्याविषयी त्याच्या मनात असलेला दुष्काळ या कथेत जाणवतो. आपले घर, आपला नवरा, आपले ऑफिस, आपला संसार या सगळ्याच्या पलीकडे जाऊन विचार करणारी ती कथेची नायिका आहे. नवरा आपलाच असतो तर त्याने आपले इतके साधे म्हणणे का ऐकू नये असा विचार ती करते. नळ घट्ट बंद न करण्याने, गळणाऱ्या नळाचा आवाज ऐकून बेचैन झालेली ती त्याला दुष्काळाविषयी सांगून पाणी बचतीचे महत्त्व सांगण्याचा प्रयत्न करते. पण तो या सगळ्या समजूतींच्या पलीकडे असतो. शेवटी या सगळ्या वातावरणाशी तीच जुळवून घेते. कारण दुष्काळ, दुर्भिक्ष आणि भांडणे या प्रकाराला ती कंटाळते. बघता बघता हे सगळे तिच्या आयुष्याचा एक भाग बनून जाते. दुष्काळासारखी गंभीर बाबदेखील माणूस आपल्या आयुष्याचा एक भाग म्हणून स्वीकारतो. माणसाच्या मनातल्या माणुसकीचा दुष्काळही या कथेतून जाणवतो.

**ज. ४. अन्य कथा**

अन्य कथांमध्ये 'लेखकाची अर्धी गोष्ट' या कथेमध्ये एका लेखकाची मानसिकता सानिया मांडतात. ही पुरुषप्रधान कथा आहे. फक्त स्त्रियांच्याच नव्हे तर पुरुषांच्या नजरेतून भावना व्यक्त करण्याचा सानियांचा हा प्रयत्न प्रभावी झाला आहे.

**१) लेखकाची अर्धी गोष्ट**

माणसाचे आयुष्य हे अगम्य व अतार्किक घटनांनी भरलेले असते. सुखी-समाधानी वाटणारे आयुष्य अचानक ढवळून निघते. मनाचा आढावा घेताना एकीकडे समाधान तर दुसरीकडे अस्वस्थता येते. आयुष्यातल्या ठराविक यशामधला चाकोरीबद्धपणा सुख देतो. पण त्याच वेळी त्या सुखांमधला पोकळपणाही जाणवतो. विशेषतः ती व्यक्ती लेखक किंवा कलावंत असेल तर जास्तच. या कथेतील लेखकाला अशी अस्वस्थता आहे. त्याने लेखक म्हणून स्वतःला सिद्ध केलेले असते. नोकरी, बायको, मुले असे सुखवस्तू आयुष्य तो जगत असतो. आपल्या कथा-कादंबऱ्यांमधून रेखाटलेली पात्रे लोकांना आवडत आहेत याचा त्याला विशेष आनंद वाटतो. व्यक्तीरेखांचा त्याचा अभ्यास दांडगा आहे. तो संवेदनशील लेखक आहे, अशा प्रतिक्रिया त्याला वाचकांकडून मिळत असतात. एकदा अचानक त्याला एका स्त्री वाचकाचे पत्र येते. त्या पत्रात ती त्याची वर्गमैत्रीण आहे असे तिने लिहिलेले असते. नंतर तिचा फोनही येतो

आणि एकदा तर चक्क ती त्याला भेटायला ऑफिसमध्ये येते. त्याला स्त्री कळलेलीच नाही असा आरोप ती त्याचावर करते. त्यामुळे त्याच्यातील संवेदनशील लेखकाला त्रास होतो. इतके लिहूनही परिपूर्ण लेखक नसल्याची जाणीव त्याला अस्वस्थ करते. लेखन म्हणजे माणसांच्या गूढ नात्यांना समजून घेऊन लिहिणे, स्त्रीला समजून घेऊन लिहिणे हे त्याला जमलेले नाही असा आरोप त्याची मैत्रीण करते. त्यामुळे तो एकदा तिला भेटायला जातो. प्रत्यक्ष गेल्यावर तिच्या घराला कुलूप असते. तिच्याबद्दल शेजारची बाई चांगले बोलत नाही. तो हताशपणे घरी येतो आणि एका न समजलेल्या मैत्रीणीची कथा लिहायला सुरुवात करतो. कथा जमेल की नाही हे त्याला माहित नाही. या लेखकाची ही गोष्ट अर्धीच राहाते.

सानिया यांनी एका पुरुषाच्या नजरेतून ही कथा मांडली आहे. स्त्रीचा अनाकलनीय स्वभाव त्याला त्याच्या मैत्रीणीच्या रूपाने अस्वस्थ करतो व त्याची गोष्ट अर्धीच राहाते.

## २) सावट

मना तुझे मनोगत,<br>
मला कधी कळेल का?

या ओळी ही कथा वाचल्यानंतर पटकन आठवतात. खरेच मनाचा व्यवहार समजून घेणे फार कठीण असते. आपलेच मन जगण्यासाठी उभारी देते तर हेच मन असहाय्यतेचे सावट समोर उभे करते. आपल्या स्वचा शोध घ्यायला हे मनच मदत करते. जगण्याची, काहीतरी करण्याची उर्मी मनात निर्माण होते ती मनामुळेच. अचानक अपघातात मृत्यू झालेल्या मुलाची ती आई, एक सर्वसामान्य गृहिणी असते. संवेदनशील असल्याने आजुबाजूच्या छोट्या छोट्या गोष्टी ती मनाला लावून घेते. तिची मुलगी आधी अगदी तिच्यासारखी असते. पण नंतर तीही तिच्या वडिलांसारखी रोखठोक बनते. गॅलरीत उभे राहिल्यानंतर दिसणाऱ्या संधीप्रकाशाचा ती आपल्या मनाने अर्थ लावत असते. किंवा असेही म्हणता येईल की तिच्या मनातल्या विचारांप्रमाणे तो संधीप्रकाश तिला भासतो. कधी मोकळा छान, कधी गुदमरलेला, सावट असलेला असा. नवरा आणि मुलीने केलेल्या दुर्लक्षामुळे ती अधिकच नाराज होते. टीव्हीवर चाललेल्या कार्यक्रमाचाही तिच्या मनावर परिणाम होतो. मनातल्या विचारांमध्ये गढलेली असतानाच तिला जाणवते की, आपण लहानपणी स्वतंत्र विचारांच्या व चौकस होतो. या एका

विचाराने आणि आठवणीने तिच्या मनावरचे सावट दूर होते. एक वेगळाच प्रकाश हळूहळू पसरतो. शहरावर, तिच्यावर, अगदी सगळीकडेच. तो प्रकाश प्रत्यक्षातला की कल्पनेतला हे तिला समजून येत नाही. पण ते न समजल्याने तिच्या मनावर सावट येत नाही. आपल्याच मनातल्या प्रश्नांवर आपणच कोणाचीही मदत न घेता मिळवलेले उत्तर तिला सकारात्मकतेकडे नेते.

### ३) लागण

लागण म्हणजे सतत एकसारखे एखादी गोष्ट करण्याची सवय लागणे. ही लागण कधी आपोआप लागते, कधी आपणच जाणीवपूर्वक लावून घेतो. लागण रोगाची होते, लागण चांगले वागण्याची होते. 'लागण' या कथेत सानिया यांनी एक खूप वेगळा विचार मांडला आहे. या जगात प्रत्येकाला जगण्याची लागण झाली आहे हाच तो विचार. कथेची नायिका आपल्या निरीक्षणांमधून हा विचार मांडते आणि वाचक म्हणून आपल्यालाही तो विचार पटतो. महिन्याच्या तिसऱ्या रविवारी भेटणाऱ्या मैत्रीणींच्या गप्पांमधून तिला 'लागण' या संज्ञेविषयी कुतूहल निर्माण होते व ती त्या दिशेने अभ्यास करते असे कथेचे सूत्र आहे. माणसाचे वय जसजसे होत जाते तसतशी ही लागण घट्ट होत जाते. म्हातारे लोक व्यायाम करून, चांगला आहार ठेवून, औषधे घेऊन आपले जगणे अधिक चांगले करतात. त्यांना जगण्याची लागण लागलेली असते. कोणी एखादे दुःख उराशी बाळगून जगण्याची लागण लावून घेतात. कोणी आपल्या कुटुंबासाठी, कोणी देशासाठी, कोणी एखाद्या व्यक्तीसाठी जगण्याची लागण लावून घेतात. जगण्याची ही लागण सगळ्यांनाच लागलेली असते. नव्याने जन्मणाऱ्या आणि सळसळणाऱ्या तारूण्याला ही जगण्याची लागण नाही असा निष्कर्ष कथेची नायिका मांडते. लांबलचक मार्ग असलेल्या म्हाताऱ्या स्त्री - पुरुषांमध्ये ही लागण आहे. ही लागण पुष्कळशी मानसिक आहे. आत्मिक-अध्यात्मिक प्रश्नांची भलीमोठी शून्यं आणि त्यातून आलेली अपरिहार्यता यातून दिसते. वर्तमानाची लागण इथूनच चालू झालेली असते. लागण याविषयी कथेच्या नायिकेची निरीक्षणे विचारप्रवृत्त करतात.

## ज. ५. समारोप

स्त्रीच्या अस्तित्वाचा अर्थ सांगणाऱ्या कथा 'अशी वेळ' या कथासंग्रहात आहेत. आयुष्यातल्या रोजच्या घटनांमधून स्त्रीला गवसलेला स्त्रीमुक्तीचा अर्थ या कथांमध्ये

मांडण्याचा प्रयत्न सानियांनी केला आहे. 'अशी वेळ' या शीर्षककथेत उतारवयातील विसरण्याच्या सवयीवर भाष्य केले आहे. वर्तमानकाळाला महत्त्व दिले पाहिजे असा संदेश या कथेमधून मिळतो. 'फक्त गृहिणी' या कथेत गृहिणी म्हणून निर्माण झालेला न्यूनगंड आणि नंतर तिलाच स्त्रीत्वाची झालेली जाणीव चित्रित केली आहे. 'तह' या कथेत पत्राच्या माध्यमातून मनातल्या भावनांची सुरेख मांडणी केली आहे. प्रेम आणि युद्ध या टोकाच्या गोष्टींमध्ये तहाचे महत्त्व कथेत पटवून दिले आहे. कथालेखनाचा एक वेगळा प्रकार म्हणून 'स्वगत' या कथेकडे बघता येईल. मनूच्या मनोव्यापाराचे दर्शन घडवणारी कथा म्हणजे 'मुली'. मनात निर्माण होणाऱ्या आभासी घटनांची लक्षवेधक कथा म्हणजे 'मुली'. स्त्रीने तिचे स्त्रीत्व ओळखणे आणि दुसऱ्या स्त्रीला समजून घेणे हा विचार 'बाई आणि....' या कथेत मांडला आहे. 'प्रेमाचे जनुक' मधली मुलगी प्रेमाचे जनुक असणाऱ्या मुक्या प्राण्यांच्या सस्थेत काम करण्याचा निर्णय घेते. निमी या स्वतंत्र विचारांच्या मुलीची कथा म्हणजे 'रेषा'. नात्यांमध्ये असणारी पुसटशी रेषाच नात्यांमध्ये ओढ निर्माण करते असा आशय या कथेतून व्यक्त होतो. जीवन कोणासाठी थांबवून चालत नाही हा विचार सांगणारी कथा म्हणजे 'कंगवे'. आपल्या जगासारख्याच पर्यायी जगाची कल्पना 'असण्याचा प्रश्न' या कथेत आहे. खऱ्या जगात व्यक्त व्हायची संधी मिळत नसल्याने अव्यक्त जगात व्यक्त होण्याची भावना या कथेत मांडली आहे. दुष्काळासारखी गंभीर गोष्ट आपल्या स्वार्थासाठी दुर्लक्षित करणारा तो आणि गळणारा नळ पाहून पाण्याचा गैरवापर पाहून व्याकुळ होणारी ती कथेचे नायक-नायिका आहेत. स्त्रीच्या विश्वावर कथा लिहिणाऱ्या एका लेखकाची कथा म्हणजे 'लेखकाची अर्धी गोष्ट' ही कथा. मनाचे खेळ प्रभावीपणे मांडणारी कथा म्हणजे 'सावट'. मनच असहाय्यतेचे सावट उभे करते. आपल्या मनानेच हे सवाट दूर केले जाते. आपल्या मनातल्या प्रश्नांवर आपणच मिळवलेले उत्तर 'सावट' या कथेत मिळते.

साहित्यिक म्हणून समाजात वावरताना आपल्यामधल्या व्यक्तीचे प्रतिबिंब कथांना वेगळा आकार देते हे या कथासंग्रहातील कथांमधून दिसून येते.

**ज. ६. संदर्भसूची**

३३. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ६२

३४. फक्त गृहिणी, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. १५९

३५. गतजन्म, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. १२०

३६. रेषा, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. ६३

३७. रेषा, अशी वेळ, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. ७०

## ग्रंथसूची

१. वाटा आणि मुक्काम

२. अशी वेळ

## ल. पुन्हा एकदा

| | कथा | पूर्वप्रसिद्धी |
|---|---|---|
| १ | मार्ग | साधना, दिवाळी १९९४ |
| २ | समज | पूर्वा, दिवाळी १९८७ |
| ३ | सखा | श्रीवत्स, दिवाळी १९९० |
| ४ | धागा | मसाप, दिवाळी १९८५ |
| ५ | पुन्हा एकदा | सा. सकाळ, ऑक्टोबर १९९० |
| ६ | प्रतिसाद | हंस, जानेवारी १९८० |
| ७ | वीण | हंस, मे १९८७ |
| ८. | लेणी | सत्यकथा, जून १९८२ |
| ९. | कारण | सकाळ, दिवाळी १९८६ |
| १०. | अर्थ-अनर्थ | सत्यकथा, ऑगस्ट १९८२ |
| ११. | मुक्ती | सा. सकाळ, ऑक्टोबर १९८९ |

**ल. १. – प्रस्तावना**

**ल. २. – शीर्षककथा**

**ल. ३. – मला भावलेल्या कथा**

**ल. ४. – अन्य कथा**

**ल. ५. – समारोप**

**ल. ६. – संदर्भसूची / ग्रंथसूची**

### ल. १. प्रस्तावना

सानिया यांचे ‘पुन्हा एकदा’ हे पुस्तक वाचत असताना आपल्याला सतत जाणवत राहाते की पुस्तकातली पात्रे विचारी आहेत. त्यांना प्रश्न पडत असतात. ती कसला ना कसला शोध घेत आहेत. मुख्य म्हणजे ‘स्व’चा शोध घेत आहेत. आपल्या विचारांचा, नात्यांचा, भावभावनांचा आणि संपूर्ण सभोवतालचा शोध. हे शोध आपण वाचत जातो तेव्हा आपणही त्यात अडकत जातो. अचानक असे जाणवते की, आपण पुस्तकात खूप गुंतलो आहोत. त्या पात्रांच्या विचारांचे प्रतिबिंब आपल्यावर पडले आहे. नकळतपणे आपणच पात्रांच्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागतो.

गेली तीस, चाळीस वर्षे सातत्याने लिखाण करणाऱ्या काही प्रमुख

लेखिकांमध्ये सानियांचे नाव येते. 'पुन्हा एकदा' मध्ये पूर्वी विविध मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या पण असंग्रहित अशा कथा आणि दोन एकांकिका आहेत. या कथा ऐंशीच्या दशकातल्या असल्या तरीही वाचताना त्या कालबाह्य वाटत नाहीत. त्यात कुठेही जुनेपणा नाही, या कथा नातेसंबंधांभोवती फिरताना दिसून येतात. लेखनातून जिवंत होणाऱ्या सगळ्या पात्रांना एका समजुतीपाशी पोहोचण्याची गरज वाटते. त्या पात्रांच्या शोधांना आणि मनात सतत उसळणाऱ्या संभ्रमांना त्याशिवाय पर्याय नसतो. या कथासंग्रहाविषयी सानिया सांगतात, ''कथालेखनाचा प्रवास सुरू झाला त्याला अनेक वर्षे झाली. माणसांच्या गोष्टी लिहिताना आपण त्यांचं जग उभं करत असतो. भोवतालात आपल्याला मनातले रंग, रूप-आकार मिसळून, आपले विचार-चिंतन आणि आकलन मांडत गुंगून जायला होईल अशा अपेक्षेने आपण साहित्यातलं जग निर्माण करत राहातो. कथा वाचून पानं मिटून ठेवली तरी ते कुठे जात नाही. पुन्हा एकदा हातात घेऊन वाचायला सुरुवात केली की ते साक्षात समोरच साकारतं.''[३८]

'पुन्हा एकदा' या कथासंग्रहातील तरल कथा मनाचा ठाव घेणाऱ्या आणि वाचकाला आपल्यासोबत घेऊन जाणाऱ्या आहेत.

### ल. २. शीर्षककथा

'पुन्हा एकदा' या कथासंग्रहाचे प्रकाशन समकालीन प्रकाशनचे आनंद अवधानी, शाम देशपांडे, सुहास कुलकर्णी यांनी केले आहे. १ ऑगस्ट २०१५ रोजी कथासंग्रहाचे प्रकाशन झाले आहे. सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ रेखाटले आहे. अर्पणपत्रिकेत हा कथासंग्रह विजया राजाध्यक्ष यांना समर्पित केल्याचे म्हटले आहे. या कथासंग्रहातील अकरा कथांपैकी दोन एकांकिका आहेत.

### १) पुन्हा एकदा

एखादी कृती आपण करणार नाही असा ठाम निश्चय केला तरी त्या गोष्टी नकळतपणे पुन्हा एकदा आपल्यासमोर येतात आणि मग निश्चय मोडकळीस जातो. आपणच आपल्या हातांनी बंद केलेले दरवाजे आपणच उघडतो. 'पुन्हा एकदा' या कथेत अमेरिकेत कायमचा स्थायिक झालेला श्रीधर आपल्या वडिलांच्या (अण्णांच्या) दिवसकार्यासाठी येतो. त्याची आई दहा वर्षांपूर्वीच गेली होती. त्यात आता वडिलही नाहीत. त्यामुळे पुन्हा इकडे येण्याचे कारणच नसते. सगळी काम उरकून सगळ्या

३८. प्रस्तावना, पुन्हा एकदा, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५

नातेवाईकांना तो फोन करतो. आता या जागेशी, या शहराशी आपला काही संबंध नाही असा विचार करून तो बाहेर पडतो. त्याला त्याची कालेजची मैत्रीण निर्मल भेटते. ती घरी ये असे म्हणते तेव्हा श्रीधर तिला म्हणतो, ''आता परत येणार नाही. भेटायला जायच्या लोकांच्या यादीत तुझं नावही नव्हतं.'' त्यावर निर्मल त्याला समजावते की निरोप असा ठरवून घ्यायचा नसतो. तरीही पुन्हा या देशात न येण्याचा त्याचा विचार पक्का असतो. निर्मलच्या आणि त्याच्या बोलण्यातून त्यांच्याच कॉलेजमधल्या एका मैत्रीणीचा विषय निघतो. निर्मल त्याला बळजबरीने घेऊन जातेही. तिथे गेल्यावरही तो पुन्हा कधीही न येण्याचा निर्णय सांगतो. नंतर मित्रांसोबत असतानाही तो त्याच्या परत कधीही न येण्याच्या विधानाचा वारंवार उल्लेख करतो. तिथून तो निर्मलच्या घरी जातो. निर्मल त्याला 'पुन्हा भेटूया' असे म्हटल्यावर पुन्हा न येण्याचे पालुपद तो चालूच ठेवतो. आपल्या संस्कृतीत असा निरोप देण्याची पद्धत नाही असे निर्मल म्हणते. ती त्याला समजावते की मी आता परत येणारच नाही असे म्हणायचे नसते. निर्मल हे त्याला सांगते आणि हसतमुखाने निरोप देते. या सगळ्याचा परिणाम म्हणून की काय, परतीच्या वाटेवर श्रीधरच्याही मनात विचार येतो, आता खरंच पुढच्या वेळी....... म्हणजेच पुन्हा न येण्याचा विचार करणारा श्रीधर पुन्हा एकदा भारतात येण्याचा विचार करतो.

**ल. ३. मला भावलेल्या कथा**

या कथासंग्रहातील कथा माणसाच्या मनातल्या गुंतागुंतीला हळुवारपणे हात घालतात. त्या कथांमधली पात्रे आपल्याला वेगवेगळे प्रश्न विचारतात. वाचक म्हणून आपणही या पात्रांमध्ये गुंतून पडतो.

**१) मार्ग**

आपल्या अगदी जवळची व्यक्ती आपल्याला सोडून जाते तेव्हा कोणताही मार्ग समोर दिसत नाही. सगळे संपून गेले आहे असे वाटते. पण अशा संपलेल्या क्षणीच पुन्हा एकदा नव्याने जीवन जगण्याचा मार्ग सापडतो. कदाचित यालाच जीवन असे म्हणतात. या कथेतल्या नमितालादेखील असाच आशेचा एक मार्ग सापडतो. तिचा तरुण मुलगा राजीव अपघातात मृत्यूमुखी पडतो. त्यानंतर ती शाळेची नोकरी सोडून देते. कुठेही बाहेर जात नाही. जवळपास दोन वर्षे ती स्वतःला कोंडून घेते. एक दिवस तिची मैत्रीण माया येते. तिला एका स्वामींच्या प्रवचनाला येण्याचा आग्रह करते. पण नमिताचा या सगळ्यावर विश्वास नसतो. माया नमिताशी राघवची ओळख करून देते. त्याच्याशी

बोलताना नमिताला खूपच मोकळे वाटते, मनावरचे दडपण दूर होते. आपली मुलगी क्षमा आपल्यावर प्रेम करत नाही असा तिचा गैरसमज झालेला असतो. मोकळे होण्याच्या प्रवासाच्या मार्गावर चालल्याने तिचा हा गैरसमजही दूर होतो. माया आणि राघवच्या जुन्या संबंधांबद्दल जेव्हा तिला कळते तेव्हा मायाला पुन्हा एकदा राघवकडे जाण्यासाठी ती प्रवृत्त करते. तिला सकारात्मक विचारांचा मार्ग मिळतो म्हणूनच हा बदल शक्य होतो. हा बदल तिच्या बोलण्यावरून कळतो, ''आपापला स्वामी आपण शोधायचा असतो किंवा जो आयुष्यात आला की ओळखायचा असतो.'' [३९]

## २) समज

'समज' ही कथा पुन्हा एकदा हरवलेले काहीतरी शोधायला भाग पाडते. ही समज रेणूची की सुधाची हे वाचकाने ठरवायचे आहे. दिलीप आणि रेणूचा मित्र श्रीरंग असतो. श्रीरंगच्या बायकोचे नाव सुधा असते. वरवर पहाता दोन जोड्या आणि सुखी कुटुंब वाटते. कथेच्या सुरुवातीलाच श्रीरंग गेल्याची बातमी कळते. त्यानंतर उलगडत जातात या नात्यातले बंध. श्रीरंग अचानक गेल्यानंतर उन्मळून पडलेल्या सुधाला रेणू आधार देते. श्रीरंग नसल्याने त्याच्या कुटुंबाची जबाबदारी आता आपली आहे. ही भावना तिच्या मनात असते. त्याचे कारण कथेच्या मध्यात उलगडते. नकळतपणे श्रीरंग आणि रेणूमध्ये निर्माण झालेले शारीरिक आणि मानसिक संबंध हेच ते कारण असते. श्रीरंगशी तिचे संबंध निर्माण झाले असले तरी तिचे दिलीपवर आणि तिच्या मुलांवर तितकेच प्रेम असते. श्रीरंग गेल्यानंतर त्याची पत्नी सुधा हिने रेणूला मारलेली मिठी, तिचा स्पर्श रेणूच्या लक्षात राहातो. पण ज्यासाठी ती आसुसलेली होती तो श्रीरंगचा पहिला स्पर्श तिला आठवत नाही. या चमत्कारिक विचारांनी तिला गोंधळायला होते. आपली नेमकी भूमिका काय? या प्रश्नाचे उत्तर शोधताना ती म्हणते, ''नवऱ्याची भरभराट, मुलांचं मोठं होणं, स्वतःच्या करिअरचा बसलेला जम आणि मनातली खंत की आपण कुठेच नीट पुरुन उरत नाही. कुठेच न्याय देत नाही. आपली खरी भूमिका काय आहे? सदैव वाटत राही तो केवळ दोष.... स्वतःच वेडवाकडं पसरलेलं घर, मुलांची बेशिस्ती, दिलीपचा चिडचिडेपणा आणि सतत स्वतःला विचारलेले प्रश्न की माझी खरी भूमिका काय? की मला भूमिकाच नाही? आपण म्हणजे एक केवळ पडद्याआडची बदलती छाया? हव्या त्या आकाराची छोटी, मध्यम.'' [४०]

---

३९. मार्ग, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. २८

४०. समज, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ३५

या सगळ्या परिस्थितीत श्रीरंगने दिलेली साथ तिला मोलाची वाटते. त्याने सांगितले होते की स्वतःला असे प्रश्न विचारणे सोडून दे. त्यावेळी वाटले होते आपले प्रश्न समजून घेणारा हाच तो माणूस. श्रीरंगच्या आणि तिच्या नात्याचा तिच्या मनावर ताण होता. पण तो तसा श्रीरंगच्या मनावर नव्हता. श्रीरंग गेल्यानंतर सगळे संदर्भच बदलतात. कथेच्या शेवटी श्रीरंगची पत्नी सुधा रेणूला थेट विचारते, ''हे तुझ्यात काय शोधत होते ते कळणं फार अवघड नाही. पण तुला काही सापडलं का? एक बाई म्हणून. कारण जे बाईला हवं असतं ते पुरुषाला हवं असण्याहून वेगळं असतं.''[४१]

हे सगळे कळल्यावर रेणूला वाटते, आपणदेखील भिऊन होतो त्या आतल्या मनाची द्वंद्व सुधाने किती सहजपणे उलगडून दाखवली. रेणूने आपोआप सुधाच्या मांडीवर डोके ठेवले आणि आतला उमाळा घट्ट आवरून धरला.

### ३) धागा

आपल्या स्वतःच्या आयुष्यात असलेल्या कमतरतांमुळे नकळतपणे दुसऱ्याचे दोष, उणीवा काढून असुरी आनंद घेण्याकडे मनाचा कौल गेलेली प्रतिमा. तसेच लगेचच असे न वागता एखाद्या अमानुष समजल्या जाणाऱ्या प्रवृत्तीची नाती उघडपणे सांगायची नसतात हा धागा सापडलेली प्रतिमा या कथेत आपल्याला भेटते.

माणसाला दोन मने असतात. एक चांगले आणि एक वाईट. जगाविरुद्ध संताप आला की वाईट मन जागे होऊन चुकीचे वागायला सांगते. पण त्याच वेळी चांगले मन हा आपला मार्ग नसल्याचे सांगते. वेदांत राव हा प्रतिमाचा चुलत भाऊ असतो. प्रतिमा आपल्या कुरुप चेहेऱ्यामुळे आणि कोडामुळे चिडचिड झालेली असते. तिचा नवरा विनय, मुले, नोकरी या सगळ्यापासून दूर गेली आहे. थोडे खरे आणि थोडे तिच्या मनाचे आडाखे बांधून तिने हार पत्करली आहे. आपला शास्त्रज्ञ असलेला चुलत भाऊ डॉ. वेदांत राव याच्याकडे ती जाते. त्याने आपल्या घराशी नव्हे साऱ्या जगाशीच संबंध तोडून टाकलेले असतात. रात्रंदिवस त्याने स्वतःला कामात झोकून दिलेले असते. त्याच्या विक्षिप्त स्वभावामुळे तो कुठेही येत-जात नसतो. त्याच्या पत्नीला उमाला त्यानेच जाळून मारले आहे असे शेजारीण रेणुका सांगते. मात्र प्रतिमाचा यावर अजिबात विश्वास बसत नाही. तिच्या घरी ती परत गेल्यानंतर तिच्या लक्षात येते की तिच्या नसण्यामुळे कशात काही फरक पडलेला नव्हता. आपला कुरुपपणा, आपण कोणालाही नको असणे या

४१. समज, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ३९

सगळ्याने तिचा संताप होतो. संताप, मत्सर यामुळे ती आतून बाहेरून काळवंडते. या सगळ्याचा सूड उगवण्याचा विचार तिच्या मनात येतो. अगदी आपले घर, नवरा, मुले आपल्यासारखेच जळत जावे या विचारापर्यंत ती पोहोचते. स्वतःतल्या या विनाशी प्रवृत्तीच्या अचानक झालेल्या दर्शनाने ती चकित झाली. तिच्या मनात येते, ती जर बुद्धिमान, यशस्वी, श्रीमंत असती तर तिने हे सगळे सहज लाथाडले असते अगदी डॉ. वेदांतसारखे. पण ती तशी नव्हती आणि लाथाडले जाण्याशिवाय तिच्या हातात काही नव्हते. त्या विचारांच्या भरात तिच्या मनात आत्महत्येचे विचारही येतात. पण तिचे भित्रे मन तिला या परिस्थितीतही साथ देत नाही. डॉ. वेदांतच्या यशाची बातमी विनय तिला दाखवतो. सुरुवातीला तिला त्याचा राग येतो पण शांतपणे विचार केल्यावर तिला वाटते, ''दुसऱ्या कुणाचं यश आणि प्रतिष्ठा आनंदाने समजून घेण्यात भूषण मानायचे असते. पण एखाद्या अमानुष, हिंसक समजल्या जाणाऱ्या प्रवृत्तीची नाती उघड सांगायची नसतात.'' [४२]

या विचारासरशी तिच्या मनात उत्तेजित आनंदाची सूक्ष्म कंपने येतात. ती डॉक्टर वेदांतच्या लौकिक यशाची बातमी अधीरतेने वाचते. विचारांचा आणि कृतीचा धागा जुळतो.

### ४) प्रतिसाद

समोरच्या व्यक्तीकडून येणाऱ्या सादाचा योग्य विचार करून प्रतिसाद दिला तरच एक चांगला संवाद निर्माण होऊ शकतो. या संवादात कसल्या शंका नसतात, आरोप नसतात, प्रत्यारोप नसतात. फक्त गरज असते ती एकमेकांना एकमेकांकडून नेमके काय हवे आहे याची. गैरसमज करून न घेता दिलेला प्रतिसाद निखळ संवादाची सुरुवात असतो. हे या कथेतून व्यक्त होते.

जयंती ही अच्युतची ज्युनिअर असिस्टंट आहे. आपल्या हुशारीवर, कर्तबगारीवर तिचा पूर्ण विश्वास आहे. अच्युतदेखील प्रचंड हुशार, कर्तबगार पण तितकाच विक्षिप्त असतो. कंपनीला त्याची गरज असल्याने त्याचे सगळे नखरे, विक्षिप्तपणा खपवून घेतला जात असतो. एका सेमिनारच्या निमित्ताने तो आणि जयंती जातात. तेव्हा जयंती आपल्या मुलीच्या वयाची असूनही तिच्याबद्दल वाटणारी ओढ तो स्पष्टपणे सांगतो. सुरुवातीला जयंतीला त्याचा राग येतो. हेच सगळे आपल्या वयाचा एखादा पुरुष बोलला असता तर

---

४२. धागा, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ७८

तिला ते आवडले असते. पण एकीकडे तिला त्याच्याविषयी ओढही वाटते, एकीकडे हवासा आणि दुसरीकडे नकोसा असा तिचा अनुभव तिला त्रास देतो. पण ती मनाशी ठरवते की, आपल्याला अजून पुष्कळ काही मिळवायचे आहे. विलक्षण गुंतागुंतीत न अडकताच कदाचित ते सोपे होईल. तिच्या या निर्णयामुळे अच्युतच्या हाताखाली काम करायला तिला अवघड वाटत नाही. सद्सद्विवेकबुद्धी जागृत असणारी समजुतदार जयंत म्हणते, ''आपापलं यश आता आपण सहज साजरं करायला हरकत नाही.'' [४३]

तितकाच मोकळ्या मनाचा अच्युतही मनाला भावतो. तो म्हणतो, ''जयंती या क्षणी तू इतकी रागावलेली आहेस की मी काही स्पष्टीकरणं देत बसलो तर ते तुझ्या डोक्यात शिरणार नाही. माझ्या तुझ्याबद्दल काही विशिष्ट भावना आहेत. गेल्या दोन दिवसात प्रकर्षाने जाणवलेल्या त्यामागेही पुष्कळ काही आहे. जे तुला आत्ता सांगण्यात अर्थ नाही.'' [४४]

### ५. लेणी

सानिया यांची असंग्रहित असलेली ही एकांकिका. संवादात्मक कथानक हे त्यांच्या कथांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. ही तर एकांकिकाच आहे. डोळ्यांसमोर चित्र उभे करण्याचे विलक्षण सामर्थ्य हा त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य त्यांच्या या एकांकिकेत ठळकपणे जाणवते. लेणी हे रुपक मानून 'एखादे ध्येय उराशी बाळगलेले असताना आपला जोडीदार आपली साथ देईलच' यावर पूर्ण विश्वास ठेवणे शक्य नाही असा अर्थ या कथेतून व्यक्त होतो. आपल्या जोडीदाराचे ध्येय, स्वप्न, सुख-दुःख आपलीच आहेत असे कितीही म्हटले तरी प्रत्यक्षात वेळ आल्यावर या विचारांशी आपण ठाम राहूच याची खात्री देता येत नाही. या एकांकिकेतील श्यामल व सतीश यांच्या बाबतीत असेच काहीसे होते. एखादी तिऱ्हाईत व्यक्ती म्हणून दोघांचेही म्हणणे आपल्याला पटते. लेणी बघण्याच्या स्वप्नाने झपाटलेला सतीश आपली पत्नी श्यामल हिला घेऊन डोंगर चढू लागतो. सुरुवातीला आनंददायी वाटणारा हा प्रवास श्यामलसाठी कठीण होतो. तीन-चार तास चालून गेल्यानंतरही लेण्यांचा पत्ताच नसतो. इतक्या पुढे गेल्यावर सतीश तिला सांगतो की आपला खाण्याचा डबा खाली विसरला आहे. यापूर्वीही तो या डोंगरावर एकटा आला होता. या दोन्ही गोष्टी ऐकून आणि सतीशची लेण्यांसाठी असणारी ओढ

---

४३. प्रतिसाद, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. १००

४४. प्रतिसाद, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ९७

पाहून श्यामल एक क्षण घाबरते. त्यात पाऊस आणि काळोख या कल्पनेने तिची भीतीने गाळणच उडते. सतीश तिच्यासाठी खाली जायला तयार होत नाही आणि ती त्याच्यासाठी वर जायला तयार होत नाही. अशा विचित्र परिस्थितीत सतीश बेभान होऊन डोंगर चढायला लागतो तर श्यामल उतरण्याच्या परतीच्य वाटेला लागते. या सगळ्यात कोणाचे चूक कोणाचे बरोबर असे काही नाही. दोघांच्या विचार करण्याच्या पद्धतीत फरक आहे.

### ६. कारण

छान, सुरळीत चाललेल्या आयुष्यात अचानक एकाएकी वादळ यावे आणि त्यात सगळे उध्वस्त व्हावे अशी ही कथा. त्यातून कळस म्हणजे या वादळाला काही कारणही नसावे. आपण नेहमी म्हणतो प्रत्येक गोष्ट घडण्यामागे काहीतरी कारण असते. विनाकारण कोणतीही गोष्ट घडत नाही. पण माणसाच्या आयुष्यात अनाकलानीय वाटाव्यात अशा घटनाही घडतात, कोणतेही कारण नसताना.

या कथेतल्या सुबोध आणि प्रतिभाच्या बाबतीत असेच काहीसे घडते. प्रतिभाचे आणि सुबोधचे लग्न ठरलेले असते. समंजस, हुशार, बुद्धिवादी तरीही नास्तिक सुबोध प्रतिभाला मनापासून आवडतो. एकनिष्ठ अशा सुबोधच्या ती प्रेमातच पडते. एकदा ते दोघे एका हॉटेलमध्ये कोल्ड्रींक्स घ्यायला जातात. तेव्हा एक मध्यमवयीन स्त्री सुबोधकडे एकटक, प्रेमळ नजरेने पहात असते. प्रतिभाच्या हे लक्षात येताच ती त्याला विचारते, ''ती बाई तुझ्या ओळखीची आहे का? आणि ती तुझ्याकडे अशा नजरेने का पहाते आहे?'' यावर सुबोध तिला सांगतो की, ''त्या बाईचा आणि माझा काहीही संबंध नाही.'' पण सुबोधच्या बदललेल्या चेहेऱ्यामुळे प्रतिभाला त्याचा संशय येतो. त्या दोघांमध्ये वाद होतात. त्यावेळी सुबोधला अशी जाणीव होते की हा प्रसंग यापूर्वीच आपण पाहिलेला आहे. गोंधळलेल्या सुबोधची अचानक तब्येत बिघडते. तो सिगरेट ओढायला लागतो. प्रतिभा दोन पावले पुढे येऊन त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करते. पण पड घेऊनही त्यांचे नाते दुभंगते. सुबोधचा मित्र प्रकाश त्याला समजावण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा तो म्हणतो, ''अरे पुष्कळ गोष्टी असतात ज्याला काही कारणं नसतात किंवा आपल्याला समजून येत नाहीत.''[४५]

---

४५. कारण, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. १४०

### ७. मुक्ती

आलेली परिस्थिती सकारात्मक विचारांनी स्वीकारली तर अवघड आयुष्यही सोपे होते. बंधनातून सोडवल्याचे दुःख न मानता त्याला मुक्तता म्हटले तर आयुष्यात अनेक वाटा निर्माण होतात. अतिशय सकारात्मक विचार देणारी ही कथा आहे. वसुधा आणि केदार बहीण भाऊ असतात. तरुण वयात नाटकाच्या वेडापायी केदार घर सोडून निघून जातो. त्यांचे वडील दादा अत्यंत कडक स्वभावाचे असतात. वसुधा मात्र अगदी आई-दादा जिवंत असेपर्यंत त्यांची मनापासून सेवा करते. दरम्यानच्या काळात केदारचा काहीच पत्ता नसतो. आई दादांसाठी वसुधा सगळ्या सुखांचा त्याग करते. एकाकी आयुष्य जगते. पण दादा गेल्यानंतर तिला केदारला बोलावणे भाग पडते. कारण दादांनी राहाते घर केदारच्या नावावर केलेले असते. खरे तर वसुधाने आपले सगळे आयुष्य आई दादांसाठी दिलेले असते. केदार सगळ्या जबाबदाऱ्या झटकून निघून गेलेला असतो. ज्या कारणासाठी तो घर सोडून जातो त्यात तो यशस्वीदेखील होत नाही. त्याला साधा संसारही टिकवता येत नाही. पण वसुधा या सगळ्याकडे म्हणजे दादांच्या निर्णयाकडे सकारात्मकतेने बघते. केदारचा बिनभरवशाचा वेडावाकडा प्रवास यामुळे स्थिर होईल आणि बांधून घातलेल्या या आयुष्यातून तिची सुटका होईल. निदान आता तरी ती मुक्तपणे जगू शकेल हाच तो विचार. इतके वर्ष निकराने सांभाळलेले सगळे केदारच्या हाती सोपवून वसुधा हळूहळू मुक्त होते.

### ८) वीण

माणसाच्या मनातल्या गुंतागुंतीला हात घालणारी सानियांची आणखीन एक कथा म्हणजे 'वीण'. कथालेखनाचा एक वेगळा प्रकार वाचक म्हणून अनुभवायला मिळतो. पत्राच्या माध्यमातून कथा पुढे जाते. मनात झालेला गुंता सुटला की आयुष्याची वीण सुबक होते. शुभांगी पत्राच्या माध्यमातून आपल्या मनातले विचार आपल्या बाबांना सांगत असते. सासरी गेल्यानंतरही तिचे मन तिथे रमत नसते. कुठल्यातरी ताणाखाली आल्याने ती सतत आजारी पडते. तिच्या आजारपणामुळे तिच्या सासरी सतत खटके उडतात. स्पष्टपणे कोणी काही बोलत नसले तरी सासरच्यांच्या वागण्या-बोलण्यातून तिला ते जाणवते. तिचा नवरा प्रदीपही तिच्याकडे दुर्लक्ष करतो आहे असे तिला वाटते. या सगळ्यामुळे ती एकाकी होते. युनिव्हर्सिटीत जाऊन छान शिकणारी शुभांगी एकदम अबोल होते.

तिचे सासरी आल्यानंतरचे काही दिवस चांगले जातात. सगळे तिच्याशी प्रेमाने बोलत असतात. तिचे जर डोके दुखले, ताप आला तर तिची काळजी घेत असतात. पुढे पुढे मात्र तिचे आजारपण नित्याचेच झाल्याने ते सगळेही वैतागतात. शुभांगीच्या पत्रांमधून हे सगळे जाणवते. तिथले डॉक्टरही त्या लोकांना मिळालेले असतील काय? इथपर्यंत तिच्या डोक्यात उलटे सुलटे विचार येतात. शेवटी ती तिच्या बाबांना पत्र लिहून आपल्याला घेऊन जायची विनंती करते. बाबांच्या घरी गेल्यानंतरही तिच्या आजारपणात फारसा फरक पडत नाही. तिच्या बाबांचे मित्र विश्वास यांच्यावर तिचा जीव असतो. त्यांच्या आधाराची, शब्दाची तिला गरज असते हे तिच्या शेवटच्या बोलण्यातून समजते. ती भावना वासनेपोटी नसते. पण विश्वास जेव्हा तिला जवळ घेऊन समजावून सांगतात तेव्हा तिला आश्वासित वाटते. इतके दिवस मनावर उमटलेले सगळे विरून जाते. डोक्यावर प्रहार करणारे घण नाहिसे होतात. त्यानंतर ती तिच्या घरी सुखरूप जाते. तिचा आजारही हळूहळू कमी होत जातो. विश्वासबरोबर असलेली वीण तिला या दुःखातून बाहेर काढते.

समजुतदार पुरुष पात्र विश्वास या कथेत आहे. त्याच्या समजावण्यामुळे शुभांगी तिच्या दुःखावर मात करू शकते. तो तिला म्हणतो, ''अशी वेड्यासारखी वागू नकोस. तू एक समंजस चांगली मुलगी आहेस. सगळ्या अवघड समस्यांमधून मार्ग निघतात. जगायचे सोपे, सोयीचे मार्ग. जगाला मान्य असणारे. त्या पलीकडे आपण जाता कामा नये, कळलं?''[४६]

विश्वासच्या या सकारात्मक बोलण्याने ती पुन्हा तिच्या सासरी जाते. औषधांपासून स्वतःची सुटका करून घेते. युनिव्हर्सिटीत जायचे ठरवते. आनंदी जगण्याशी तिची वीण घट्ट होते.

**ल. ४. अन्य कथा**

'पुन्हा एकदा' या कथासंग्रहातील अन्य कथांमध्ये 'सखा' आणि 'अर्थ-अनर्थ' या एकांकिकेचा आढावा घेऊ या.

**१) सखा**

उशीरा का होईना नात्यांचे महत्त्व समजलेल्या एका पुरुषाची कथा म्हणजे 'सखा'. सानियांच्या कथांचे हे एक वैशिष्ट्य सांगता येईल की, त्यांच्या कथांमध्ये सगळे पुरुष

४६. वीण, पुन्हा एकदा, सानिया समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ११९

वाईट आणि अन्याय करणारेच असतील असे नसते. लहानपणापासून घरातल्या विचित्र परिस्थितीमुळे 'घर' या संकल्पनेपासून काहीसा दूर राहिलेला धनंजय या कथेत भेटतो. या कथेतले हे एकमेव पुरुष पात्र आहे. जे कथेतल्या इतर स्त्री पात्रांना समजून घेते. सगळ्या स्त्री पात्रांना विश्वासाचा हात तो देतो. लहानपणीच दुरावलेली बहीण मनू, मित्राच्या निधनानंतर एकाकी पडलेली त्याची बायको आदिती, घर आणि आई असूनही आपल्याच विचारांमुळे घरापासून दूर गेलेली नमिता यांचा धनंजय सखा होतो. बायको निमा आणि मुलगी बेबी यांचा तर तो आधार असतोच. कामाच्या व्यापात दुरावलेली बहीण मनू जेव्हा खूप वर्षांनी भेटते तेव्हा तो सुखावतो. तिच्यासाठी खरेदी करतो. कामासाठी जायचे असते ते फ्लाईट रद्द करतो. तिला थांबण्याचा आग्रह करतो.

घरापासून दूर राहिलेल्या आणि एकाकी पडलेल्या नमिताला धनंजयमध्ये आपले वडील दिसत असतात. त्यावेळी तो म्हणतो, ''एवढ्या गर्दीतून नमिता जवळ आल्याचं त्याला एकदम कुठे तरी आवडलं. त्याला वाटलं, आपण आणि नमिता आपल्या आयुष्यात रिकाम्या राहिलेल्या भूमिकांचा स्वप्नील शोध घेतो आहोत का? एकाच वेळी? भासात्मक?''[४७]

स्त्री पात्रांचा सखा होणारा धनंजय आदितीचा मुलगा मिलींद याचा सखा होऊ शकत नाही. वडिलांच्या मृत्यूनंतर अलिप्तपणे वागणाऱ्या मिलींदशी संवाद साधणे धनंजयला शक्य होत नाही. वेगवेगळ्या वयातल्या नात्यातल्या स्त्रियांचा सखा होण्यात मात्र धनंजयला यश मिळते.

## २) अर्थ-अनर्थ

सानियांची आणखीन एक असंग्रहित एकांकिका म्हणजे 'अर्थ-अनर्थ'. दोन व्यक्तींमधल्या संवादातून उलगडत जाणारी ही एकांकिका आहे. दृश्य सगळे तेच पण परिस्थितीमुळे संवादातून निर्माण झालेले अर्थ-अनर्थ कथेतून दिसून येतात. एखादी व्यक्ती आपल्याला पूर्णपणे कळली आहे असा आपला भ्रम असतो. पूर्णांशाने कोणालाही आपण ओळखू शकत नाही. तीन दृश्यांमध्ये हि एकांकिका लिहिली आहे. पहिल्या दृश्यात नटून थटून आलेली स्वरूप, तिची आतुरतेने वाट पहाणारा शंकर आपल्याला भेटतात. एकमेकांच्या प्रेमात ते आकंठ बुडाले आहेत असे दिसते. शंकर तिच्या सौंदर्याचे कौतुक करत असतो. ती सुंदर आहे असे तिला वाटत नाही. तिच्या घरून त्यांच्या लग्नाला

४७. सखा, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ६०

परवानगी मिळण्याची शक्यता तरी असते. पण शंकरच्या घरी विरोध असतो. पहिल्या दृश्यात स्वरूप शंकरला विचारत असते, ''मी खरंच सुंदर दिसते का रे?'' त्यावर शंकरचे ठरलेले उत्तर असते, ''तू दिसतेसच ग छान.'' गप्पांच्या ओघात त्यांचा विषय नको तिकडे जातो. शरीरसुखही तितकेच महत्त्वाचे असे शंकर म्हणतो. तू चार भिंतींच्यामध्ये मला भेट असे शंकर तिला सांगतो. त्यावर स्वरूप चिडते आणि निघून जाते.

दुसऱ्या दृश्यात स्वरूप त्याला भेटायला येते त्याच ठिकाणी पण विशेष नट्टा-पट्टा न करता. यावेळी तो तिच्या सौंदर्याचे विशेष कौतुक करत नाही. उलट तीच त्याच्यासोबत चार भिंतींच्या आड यायला तयार होते. पण तो नाही म्हणतो. गावात तिच्याविषयी चाललेल्या उलटसुलट चर्चांमुळेच तो असे बोलतो आहे असे स्वरूपला वाटते. आपण नुसत्याच गप्पा मारण्यात तरबेज आहोत पण प्रत्यक्षात काहीच करू शकणार नाही म्हणूनच स्वरूप असे म्हणते आहे असे शंकरला वाटते. अर्था-अनर्थातून दोघांचे समज-गैरसमज होतात. तेव्हादेखील स्वरूप शंकरला विचारते, ''तुला मी खरंच सुंदर वाटते का?'' त्यावर तो म्हणतो, ''तेवढंच खरं आहे. खोटं असलेलं खरं.''

तिसऱ्या दृश्यात स्वरूप म्हणते, ''तुला वाटलं होतं ना की मी येणारच नाही म्हणून.'' त्यावर शंकर म्हणतो, ''तू असं कधी केलं आहेस का? पण ही साडी शोभून दिसते तुला, छान दिसते गं.'' या दृश्यात दोघे एकमेकांचे हात हातात घेऊन पूर्ण प्रेमात असल्यासारखे दिसतात. बोलण्यातून दोन व्यक्तींच्या भिन्न प्रकृती, स्वभाव, त्यांचे एकमेकांकडे खेचले जाणे आणि नंतर होणारी मतमतांतरे या एकांकिकेत दिसून येतात.

थोडीशी दुर्बोध अशी ही एकांकिका वाटते. शीर्षकाचा कथेशी अन्वय जुळवणे थोडे कठीण जाते.

**ल. ५. समारोप**

'पुन्हा एकदा' या कथासंग्रहात पूर्वी विविध मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या पण असंग्रहित राहिलेल्या सानिया यांच्या कथा आणि एकांकिका आहेत. या कथा नातेसंबंधाभोवती फिरतात. कथासंग्रहातील तरुण व मध्यमवयीन पात्रांना सतत काही ना काही प्रश्न पडतात. ही पात्रे नात्यांचा शोध घेतात.

'पुन्हा एकदा' या शीर्षककथेला श्रीधर भारतात परत येणे होणार नाही असे ठरवून परदेशातच स्थायिक होण्याचे ठरवतो. नातेवाईक आणि मित्रमंडळींना शेवटचे भेटून घ्यायचे असे ठरवून यादीतील एक एक नाव कमी करतो. त्या गडबडीत त्याला त्याची

जुनी मैत्रीण भेटते आणि त्याचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. या कथेतही सानिया श्रीधरच्या विचारप्रक्रियेबद्दल बोलतात. 'लेणी' आणि 'अर्थ-अनर्थ' या दोन एकांकिकामधल्या शंकर-स्वरूप, सतीश-श्यामल या जोड्या भावनिक आंदोलनातून जात आहेत. 'लेणी'मध्ये लेणी बघण्यासाठी पूर्ण डोंगर चढून जायची सतीशची इच्छा असते. त्यात त्याच्या खूप आठवणी असतात. पण श्यामलला त्यात विशेष स्वारस्य वाटत नसते. तिला हे सगळे फोल वाटत असते. 'अर्थ-अनर्थ' मधील शंकर आणि स्वरूपचे आधी एकमेकांकडे खेचले जाणे, लग्नाचा विषय निघाल्यावर उणे-दुणे काढणे, कधी जवळ येणे तर कधी दूर जाणे अनुभवायला मिळते. 'कारण' कथेतल्या सुबोधचे लग्न ठरलेले असते. पण अचानक ओढवलेल्या प्रसंगामुळे त्यांचे नाते संपुष्टात येते. त्याला भेडसावणारे विचार प्रतिभा समजून घेऊ शकत नाही. 'वीण' कथेतल्या नुकतेच लग्न झालेल्या शुभांगीचे सारखे आजारी पडणे आणि तिच्या मनातली द्वंद्व सानियांनी प्रभावीपणे सांगितली आहेत. 'प्रतिसाद' कथेतल्या तरुण, हुशार आणि होतकरू जयंतीचे तिच्या वरिष्ठ असणाऱ्या अच्युतबद्दलचे विचार अंतर्मुख करतात. पुरुष केंद्रस्थानी असणारी आणखी एक कथा म्हणजे 'सखा'. धनंजय या पात्राच्या सहाय्याने कथा रंगते. त्याचे कुटुंबात असून नसल्यासारखे असणारे रूप अस्वस्थ करते. 'मार्ग' या कथेत नमिता आणि माया या मैत्रीणी भेटतात. नमिताचे नैराश्य, मायाला दिसलेला स्वामींचा मार्ग आणि त्या दोघींनाही भेटलेला राघव यात कथा सुंदर गुंफली आहे. 'समज' कथेत श्रीरंगच्या मृत्यूने बदललेले रेणूचे जग, तिला आलेले आत्मभान दिसून येते. 'धागा' या कथेत प्रतिमाच्या विचार आणि कृतींमध्ये असणारी तफावत आणि कथेच्या शेवटी विचार आणि कृतीचा जुळलेला धागा अनुभवायला मिळतो. 'मुक्ती' या कथेत आपल्यावर आलेली परिस्थिती सकारात्मकतेने स्वीकारणारी वसुधा खूप काही शिकवून जाते.

या कथासंग्रहातील पात्रे कसला ना कसला शोध घेत आहेत. मुख्य म्हणजे ते 'स्व'चा शोध घेत आहेत. त्यांच्या विचार आणि शोधाच्या प्रक्रियेत आपणही नकळत गुंतत जातो.

**ल. ६. संदर्भसूची**


३८. प्रस्तावना, पुन्हा एकदा, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५

३९. मार्ग, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. २८

४०. समज, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ३५

४१. समज, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ३९

४२. धागा, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ७८

४३. प्रतिसाद, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. १००

४४. प्रतिसाद, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ९७

४५. कारण, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. १४०

४६. वीण, पुन्हा एकदा, सानिया समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ११९

४७. सखा, पुन्हा एकदा, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ६०


## ग्रंथसूची


१. पुन्हा एकदा

## ३.४ समारोप

कथा, कादंबरी, दीर्घकथा या सगळ्या साहित्य प्रकारांवर आपली छाप उमटवणाऱ्या सानिया यांच्या कथाविश्वाचा अभ्यास करताना एक वेगळाच अनुभव मिळाला. आशाताईंच्या कथा आधी वाचल्यानंतर अभ्यासक म्हणून सानियांच्या कथा समजून घ्यायला थोडा विचार करावा लागला. कथा संपल्यानंतरही मनात प्रश्न चालू राहिले. कथालेखनातील वेगळेपणामुळे सानियांच्या कथा वाचकाच्या मनावर छाप पाडतात. सानियांच्या कथानायिका स्वतःला हवे ते करण्याकडे भर देतात. लग्न, प्रेम, कुटुंब या सगळ्याकडे बघण्याचा त्यांच्या नायिकांचा दृष्टिकोन वेगळा आहे. मानवी मनाचा तळ शोधण्याचे त्यांचे कसब वाखाणण्याजोगे आहे. आशाताईंच्या कथा वाचताना आशाताईंचे अस्तित्व त्या कथांमधून स्पष्टपणे जाणवते. तोच अनुभव सानियांच्या कथा वाचताना येतो. एक व्यक्ती म्हणून जगताना जे कळते ते लेखनातून कसे मांडले जाते? याविषयी सानिया सांगतात, ''लिहिण्याआधी आपण एक व्यक्ती असतो आणि जगणे, अनुभवणे हे प्राथमिक असते. साहित्यिक म्हणून जगणे असे काही वेगळे असते असे वाटत नाही. जी काही वाट पायाखाली आहे तिथले अनुभव आपण व्यक्ती म्हणून घेत असतो. मग ते लिहिताना आविष्कारित होत जातात. शब्दांतून आणि आपण रचत राहिलेल्या जगातून सहाजिकच आपल्या वाट्याचे अनुभव आपल्याच परिघातले असू शकतात. आपल्या अनुभवांपलीकडचे लिहिणे आव्हानात्मक, अवघड असेल, पण अशक्य नाही. अनेकदा ती आपली निवडही असते. आपल्याच परिघातले प्रश्न आपल्याला साद घालत असतात आणि त्यांचा अधिक खोलवर शोध घेताना काही मुलभूत प्रश्नांना आपण भिडू शकतो. अनेकदा असेही होते, आपल्याला जाणवलेले काही वेगळे, आपल्या अनुभवांपलीकडचे असे, परिघाबाहेरचे म्हणावे असे प्रश्न व त्यासंबंधीचे विचार मनात जागे असतात. पण साहित्यातून नेमके कसे मांडावे ते कळत नाही. ती संभ्रमावस्था असते. आपण एका तऱ्हेने लेखन करीत असतो आणि त्या तऱ्हेत असे वेगळेच काही नक्की कसे आविष्कारित करावे ते समजत नाही. कधीकधी नंतर समजते. वेगळ्या वाटाही सापडतात. कधीकधी न उमजल्याने तसेच राहून जाते. वाट पाहावी लागते.''[४८]

सानिया यांच्या सगळ्या कथांमधून त्यांचे व्यक्ती म्हणून मांडलेले विचार स्पष्टपणे जाणवतात.

त्यांच्या साहित्यातली स्त्री एका वेगळ्या वाटेने जाण्याचा प्रयत्न करते. जगाला काय वाटेल यापेक्षा स्वतःच्या मनाला काय वाटेल याचा विचार करते. माणूस बऱ्याच गोष्टी जगाला काय वाटेल यासाठी करत नाही. आयुष्य कोणासाठी थांबत नाही. पण जे करायचे ते न केल्याने

---

४८. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २३

एक विचित्र घुसमट वाट्याला येते. योग्य वेळी मनाचे ऐकले तर लोकांना काय वाटेल यापेक्षा आपल्याला काय हवे याचा विचार केल्याचे समाधान तरी मिळते. सानियांच्या नायिका हेच करतात. या निर्णयामुळे जर काही जखमा झाल्या तर ते सहन करण्याची ताकदही त्यांच्याकडे आहे. उदाहरण द्यायचे झाले तर 'त्यानंतर' या दीर्घकथेतील राधिकेचे देता येईल. तिचा नवरा ललित अचानकपणे तिला सोडून जातो तरी ती तिचे आयुष्य तिच्या पद्धतीने जगते. जग काय म्हणेल याचा विचार न करता तिला ज्या गोष्टींमधून आनंद मिळतो त्या गोष्टी ती करते. 'प्रतीती' या कथेतील चंदना ही नायिका स्वानुभवातून जीवन जगते. कोणाला काय वाटेल याचा विचार न करता वागते. त्यामुळे आपल्या आयुष्याचे निर्णय आपण घेत आहोत याचा आनंद तिला मिळतो. हे सगळे इतके नैसर्गिक रीतीने घडते की नायिकांचे वागणे चूक वाटत नाही. आपल्या आजुबाजूला असे काही घडत नाही म्हणजे हे शक्यच नाही असे वाटणे योग्य नाही. किंवा माझ्या मनाला असे वागणे पटत नाही मग हे योग्य नाही असेही वाटणे चूक आहे. साहित्य हे समाजमनाचा आरसा असते त्यामुळे सानियांच्या नायिका मनाला भावतात.

वेगळ्या वाटेवरून आत्मशोधाची अनुभूती घडविणाऱ्या सानिया यांच्या कथा आहेत. स्वतःला समजून घेतले तरच आपण जगाला समजून घेऊ शकतो यावर त्यांच्या पात्रांचा विश्वास आहे. अखंडपणे चालणाऱ्या या प्रक्रियेमधून प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे व्यक्तिच्या आत्मशोधाची व परिवर्तनाची दिशा मिळते.

## संदर्भसूची

४८. वाटा आणि मुक्काम, सानिया, आशा बगे, भारत सासणे, मिलिंद बोकील, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २३

## ग्रंथसूची

१. वाटा आणि मुक्काम

| प्रकरण ४ आशा बगे आणि सानिया यांच्या कथाविश्वातील साम्य आणि विरोध | पृष्ठ क्र. ३१५ ते ३७२ |
|---|---|
| ४.१ प्रस्तावना<br>४.२ साम्य<br>४.३ विरोध (तुलना)<br>४.४ समारोप | |

## ४.१. प्रस्तावना

मराठी साहित्य वैविध्यपूर्ण अशा कथासाहित्याने समृद्ध करणाऱ्या लेखिकांच्या मांदियाळीत आशा बगे आणि सानिया या दोन लेखिकांनी मोलाची भर घातली आहे. विशेषतः स्त्रीच्या भावविश्वाशी निगडीत अशा साहित्याची निर्मिती या दोन्ही लेखिकांनी केली आहे. अन्य वाङ्मय प्रकारांबरोबरच 'कथा' या वाङ्मयप्रकारात त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे. या दोन्ही लेखिकांचे लिखाण मोजकेच पण दर्जेदार आहे. प्रबंधांच्या विषय निवडीच्या वेळी असंख्य लोकांशी बोलल्यानंतर हे लक्षात आले की, या दोघीही आत्ताच्या पिढीला फारशा परिचित नाहीत. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावासा वाटला. त्यातही कथा हा साहित्यप्रकार अधिक जवळचा वाटला. त्यांच्या कथा वाचताना अनेकदा वेळ-काळ, तहान-भूक याचेही भान राहिले नाही. हे मी स्वानुभवाने सांगू शकते. दोघींच्या कथालेखनामध्ये 'स्त्री' हा केंद्रबिंदू असल्याने त्या कथा आणखीच जवळच्या वाटल्या. या दोघींच्या कथांमध्ये आपल्या सभोवती घडणाऱ्या घटनांचे चित्रण कित्येकदा येते. त्यामुळे कथांशी, कथेतल्या पात्रांशी जवळीक निर्माण होते. आपल्याच आयुष्यात घडून गेलेले प्रसंग, पात्रे कथांमध्ये दिसून येतात. सहाजिकच कथांविषयी आपुलकी निर्माण होते. सगळे कथासंग्रह वाचनालयातून मिळवून वाचलेले आहेत. कथासंग्रहांच्या मलपृष्ठाआधीच्या पानावर वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया नोंदवलेल्या आढळल्या. असे लिहिणे चुकीचे असले तरी त्यातून याची जाणीव झाली की, माझ्याप्रमाणेच अनेकांना या कथा जवळच्या वाटत आहेत. कथा ऐंशीच्या दशकातल्या असल्या तरी स्त्रीचे, भावविश्व, तिचे प्रश्न, तिची घुसमट आजही तशीच आहे. सुसंस्कृत, सुशिक्षित घरांमध्येही ही घुसमट आहे. यामुळेच आत्ताच्या काळाशी या कथा साधर्म्य सांगतात. या कथांमधील स्त्रिया चारचौघींसारख्या असल्या तरी स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या आहेत. आनंद, दुःख, असूया, द्वेष, मोह या सगळ्या भावनांचे दर्शन या कथांमधून होते. सामान्य माणूस म्हणून जगताना जे जे अनुभव येतात तेच सगळे अनुभव या कथांमधून अनुभवायला मिळतात. या दोघींच्या कथांमधील महत्त्वाचे साम्य म्हणजे जवळपास सगळ्याच कथा नायिकाप्रधान आहेत, नातेसंबंधांचा शोध घेणाऱ्या आहेत, आपल्या सभोवती असणाऱ्या जगाचे प्रतिबिंब या कथांमधून आढळते. आणखी एक महत्त्वाचे साम्य म्हणजे त्यांच्या कथांमध्ये दलित, ग्रामीण स्त्री फारशी आढळत नाही. या प्रकरणामध्ये आत्तापर्यंत केलेल्या अभ्यासातून या दोन्ही लेखिकांच्या लिखाणातील साम्य आणि विरोध बघणे गरजेचे आहे. स्त्री हा

केंद्रबिंदू मानून दोघींनी लिखाण केले असले तरी दोघींच्या लिखाणामध्ये विरोधही आहे. त्या दोघींच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास करून स्त्री म्हणून जाणीवा समृद्ध करणे हे संशोधनाच्या अभ्यासाचे ध्येय या प्रकरणातून साध्य होईल असे वाटते. या कथालेखिकांचे आणखी एक साम्य म्हणजे स्त्रीने स्त्रीचे भावविश्व रेखाटले आहे. त्यामुळे अगदी छोट्या प्रसंगातही एखादी स्त्री कशा पद्धतीने विचार करू शकते याचे दर्शन घडते. चांगली कथा म्हणजे आयुष्याच्या आकलनाचे दर्शन असते. आशा बगे आणि सानिया यांनीदेखील त्यांच्या स्वानुभवातून त्यांना उमगलेले सारे वाचकांसमोर मांडले आहे.

आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांनी स्त्रीचे अंतरंग आपल्या साहित्यातून उलगडून दाखवले आहे. स्त्रीचे विश्व, तिची घुसमट, तिची सुख-दुःख यांचा विचार आपल्या कथांमधून या दोघींनी मांडला आहे.

एखाद्या भावनेचा विचार प्रत्येक व्यक्ती आपापल्या दृष्टिकोनातून करते. व्यक्ती बदलली की त्या त्या भावनेमागील भूमिकाही बदलते. आशाताई आणि सानिया यांनी स्त्री-विषयक साहित्याचे लेखन केले असले तरी त्यांच्या लिखाणात वेगळेपणा निश्चितपणे आहे. हा वेगळेपणा या प्रकरणात समजून घेणे आवश्यक आहे.

एखादे स्थिर चित्र काढताना, आपण दिलेल्या वस्तूंकडे ज्या कोनातून बघतो तसे चित्र आपल्या कागदावर आकार घेते. अगदी याप्रमाणेच सुख-दुःखं तीच असली तरी त्याकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो. एका व्यक्तीला जाणवणारे दुःख दुसऱ्याला तितक्याच तीव्रतेने जाणवेल असे नाही. तसेच एका व्यक्तीसाठी एखादी गोष्ट सुखदायी असेल तर ती गोष्ट दुसऱ्या व्यक्तीसाठी सुखदायी असेलच असे नाही. सुख-दुःखाची तीव्रता व्यक्तीनिहाय असते. ही तीव्रता, त्याचे मनावर होणारे परिणाम त्या त्या व्यक्तीच्या जीवनविषयक दृष्टिकोनावर अवलंबून असतात. ऊन-सावली सारखी असणारी ही सुख-दुःखं प्रत्येकासाठी वेगवेगळ्या तीव्रतेची असतात. मग असा विचार मनात येतो की, एकाला वाटणारे दुःख दुसऱ्याच्या दृष्टीने तितकेसे दुःखदायी नसेल तर ती पहिल्याची चूक असते का? याचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. कारण या दुःखाची तीव्रता व्यक्तीप्रमाणे बदलते. त्यामुळे कोण चूक, कोण बरोबर असे सांगणे अशक्य आहे. रोजच्या जीवनात आपण सरसकट हा चूक, हा बरोबर असे शेरे मारतो. हे पूर्णपणे चूक आहे हे या दोघींच्या कथांच्या अभ्यासानंतर समजते. एखाद्या व्यक्तीचे त्याच्या स्वभावाचे, त्याच्या दृष्टिकोनाचे मूल्यमापन सर्वांगीण विचार केल्यानंतर केले पाहिजे ही शिकवण या दोघींच्या कथांमधून मिळते. या दोन्ही लेखिका मला माझ्या

खूप जवळच्या वाटतात. खरे तर मैत्रीणीच वाटतात. कारण कित्येकदा माझ्या व आजुबाजूच्या लोकांचे मनोव्यापार या कथांमधून अनुभवायला मिळतात. त्यामुळे त्यांच्या लेखनातील तुलना कोण श्रेष्ठ हे दाखवण्यासाठी करायची नसून त्यांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करण्यासाठी आहे. आशाताईंची चौकट न मोडणारी नायिका चांगली आणि सानियांची चौकट मोडून स्वतःच्या मनासारखे जगणारी नायिका वाईट असे ढोबळमानाने म्हणणे म्हणजे आपल्या अनुभवविश्वाचे अपुरेपण ठरेल. कारण आपण ज्या समाजात राहातो त्या नियमांचे पालन करणे योग्य असे वाटणे नैसर्गिक असले तरी ते पूर्णपणे योग्य नाही. त्यामुळे कोणत्याही नायिकेच्या भूमिकेतून परिस्थितीचा आणि तिने घेतलेल्या निर्णयांचा अभ्यास करण्याची व्यापक दृष्टी अभ्यासाअंती मिळते. तुलना वेगळ्या मुद्यांवर मांडण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. या तुलनात्मक अभ्यासाने माणूस वाचण्याची क्षमता वाढीस लागली आणि हे समजायला लागले की, जीवनात प्रत्येक जण आपापल्या जागी बरोबर असतो.

आशा बगे व सानिया यांच्या कथांमधील साम्य सांगणारे मुद्दे आता पाहू.

## ४.२. साम्य

### १) नायिकाप्रधान कथा

संवेदनशीलता आणि स्त्री हे एक अतूट असे समीकरण आहे. त्यामुळेच या दोन्ही लेखिकांनी अतिशय संवेदनशील मनाने स्त्रीचे भावविश्व रेखाटले आहे. त्यांच्या बहुतांश कथा नायिकाप्रधान आहेत. स्त्रीची स्वत्वाची व सत्याची ओढ त्यांच्या कथांमधून अनुभवायला मिळते. ‘मारवा’ पासून ‘माझ्या कथा माझी निवड’ पर्यंतच्या कथासंग्रहांमध्ये आशा बगे यांनी एकाहून एक सरस अशा नायिकाप्रधान कथा लिहिल्या आहेत. तसेच सानिया यांनी ‘शोध’ पासून ‘पुन्हा एकदा’ पर्यंतच्या कथासंग्रहांमध्ये स्त्रियांचे अनुभवविश्व रेखाटले आहे.

**आशा बगे**

**१) मारवा** – ‘मारवा’ कथासंग्रहातील ‘रुक्मिणी’ या कथेने आशाताईंना कथाकार म्हणून चांगलाच नावलौकिक मिळवून दिला. कथेची नायिका रेणू हिच्या विचारांशी असणारे नाते रूपकात्मक पद्धतीने त्यांनी उलगडले आहे. रेणू आणि अनंताचे

हळुवार नाते त्यांनी प्रभावी रीतीने सांगितले आहे. वाढत्या वयानुसार मैत्री हरवून नवरा-बायकोचे नाते त्या दोघांमध्ये निर्माण होते. पण रेणूला बालपणीचा अनंताच आवडतो. बाळकृष्णाच्या बदलत्या रूपाचा विचार केल्यानंतर तिच्या असे लक्षात येते की, अनंताचेही तसेच आहे. तो आक्रमक, धसमुसळा नाही, तर आपल्यावर प्रेम करणारा अनंता आहे. या कथेत रेणूची प्रगल्भतेकडे वाटचाल दिसून येते. आपण करत असलेला विचार चुकीचा आहे हे ती मान्य करते. तसेच बदलाची तयारी ठेवते. रेणूच्या मनाचा तळ शोधून तिच्या भावनांचा कल्लोळ आशाताईंनी शब्दबद्ध केला आहे. शास्त्रीय संगीताचे मनातल्या भावभावनांशी नाते अचूक पद्धतीने मांडले असून काही वाक्यांमधून उच्च आध्यात्मिक पातळी अनुभवायला मिळते.

या कथासंग्रहातील 'नातं' मधील 'नीना', 'घट्ट' मधील 'मृदुला', 'बेईमान' मधील 'माधवी', 'जन्म' मधील 'ती', 'पांगळी' मधील 'कल्याणी', 'रंग' मधील 'मानसी', 'वाळवंट' मधील 'मिसेस देवरस' व 'मिसेस पंडित', 'मैत्रीण' मधील 'ती', 'कोवळी उन्हं' मधील 'मनोरमा', 'डोळे' मधली 'ती', 'वर्तुळ' मधील 'नीला' या नायिकांच्या रूपाने मनातील भावनांचा गुंता, प्रश्न तसेच या प्रश्नांवर आपापल्या परीने या नायिकांनी मिळवलेली उत्तरे प्रेरणा देतात.

२) **अत्तर** – परंपरा आणि नवतेच्या ताणात सापडलेल्या 'नर्सिंग होम' या कथेची नायिका 'सुचरिता' क्षणभंगुर आयुष्याविषयी भाष्य करून वाचकाला अंतर्मुख करते. आपले आयुष्य इतके क्षणभंगुर असले तर अहंकार बाळगून उपयोग नाही हे तिला पटते.

३) **पूजा** – 'पूजा' या कथासंग्रहातील 'अपूर्ण' या कथेची नायिका कुसुम आयुष्यातल्या अपूर्णतेच्या प्रवासाचा वेध घेते. अपूर्णता असणे म्हणजेच आयुष्य पूर्णत्वाकडे जाण्याचा प्रवास हा सकारात्मक विचार कुसुम आपल्याला देते.

४) **मांडव** – 'मांडव' या कथासंग्रहातील 'मांडव' या शीर्षककथेत 'लग्न' या संस्काराचा स्त्रीच्या मनोभूमिकेतून वेध घेण्यात आशाताई यशस्वी झाल्या आहेत. मुन्नी आणि उज्ज्वला या दोन वेगळ्या व्यक्तिरेखांनी वेगवेगळ्या परिस्थितीत लग्न या संस्काराला न जुमानता आपल्या सुखाचा केलेला विचार मनाला भावतो. प्रत्येकाला आपले सुख आणि समाधान शोधण्याचा अधिकार असेल तर या दोघींनी केलेली कृती मनाला पटते. या कथेमध्ये आशाताईंनी पहिल्यांदाच पारंपारिक चौकट मोडून आपल्या सुखाचा, आनंदाचा विचार करणारी नायिका रंगवली आहे. आनंद शोधण्याच्या कृतीला

दुजोरा दिला आहे.

या चारही कथांमध्ये नायिका आणि तिचे भावविश्व या गोष्टींना महत्त्व दिले आहे.

**सानिया**

सानियांचे कथाविश्व पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान देणारे आहे. त्यांच्या बहुतेक कथा स्त्री-केंद्री आहेत. स्त्रियांचे अनुभवविश्व बहुतेक कथांमध्ये केंद्रस्थानी आहे. त्यामुळे कौटुंबिक नातेसंबंधातून उत्पन्न होणारे ताण त्यांच्या कथांमध्ये आहेत. त्यांच्या कथांमधील नायिका सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहे. आपल्याला हव्या असणाऱ्या सुखाचा निरंतर शोध घेणारी आहे.

१) **शोध** – 'शोध' या कथासंग्रहातील रेषेपलीकडे या कथेतील चारू मरगळलेल्या, निराश झालेल्या तिच्या मनाला नवी उभारी देण्यात यशस्वी होते. तिच्या नवऱ्याच्या आयुष्यात तिच्यापेक्षा काकणभर हुशार, समजुतदार आणि सुंदर सरिता येते. तिच्याशी शंतनूचे असणारे संबंध तो चारूपासून कधीच लपवत नाही. शंतनू आणि सरिताच्या वागण्यात कसलाही ताण नसतो. सरितेच्या मोठेपणामुळे चारू तिचा दृष्टिकोन बदलून रेषेपलीकडे जाऊन विचार करते. त्यामुळे तिथेच आयुष्य तिला आशावादी वाटू लागते.

२) **प्रतीती** – 'प्रतीती' या कथासंग्रहातील शीर्षककथेत स्वतःच्या अनुभवाने आलेल्या प्रचितीचा अनुभव घेणारी 'चंदना' ही नायिका भेटते. आपल्याला नेमके काय हवे आहे? हे जेव्हा माणसाला कळते तेव्हा विचार आणि कृतीदेखील त्या दिशेने होते. चंदनाच्या अल्लड वयापासून तिला आलेल्या प्रगल्भतेपर्यंतचा मोठा पट 'प्रतीती' या दीर्घकथेत दिसून येतो. आनंदी आणि समाधानी होण्याची वाट तिला मिळते. हे वाटणे म्हणजेच 'स्व'ला ओळखण्यासारखे आहे.

या कथासंग्रहातील 'प्रवाह' या कथेत प्रवाहाविरुद्ध वाहाणारी 'विनिता', नवऱ्यावर आणि संसारावर आंधळे प्रेम करणारी 'जानकी' या नायिका आपापले अस्तित्व सिद्ध करतात.

३) **भूमिका** – एका वेगळ्या पातळीवर तडजोडी करत आयुष्य घालवल्यानंतर अचानकपणे स्वत्व समजलेल्या एका स्त्रीची कथा म्हणजे 'प्रतिभा'. ही कथा 'भूमिका' या कथासंग्रहातील आहे. प्रतिभाच्या मनातले विचार सानियांनी प्रभावीपणे मांडले आहेत.

''अप्राप्य असलेल्याचा हव्यास धरल्यावर मिळतात त्या वेदनाच ना फक्त! मग जे असं दूरचं आहे ते जवळ, काही क्षण, अट्टाहासाने तरी आणण्याचा वेडेपणा कशासाठी करतो आपण?''[१] सर्वसामान्य कुटुंबातली प्रतिभा तिच्याही नकळत नोकरीच्या ठिकाणी मानसिक आणि शारीरिक पातळीवर तडजोडी करते. प्रतिभाला अपेक्षित असणारी सुरक्षितता तिच्या आयुष्यात आलेल्या कोणत्याही पुरुषाकडून तिला मिळत नाही. सगळ्या नात्यांमधला फोलपणा कळूनही ती समर्थपणे जगायला सिद्ध होते.

४) **त्यानंतर–** या दीर्घकथासंग्रहाच्या शीर्षककथेत नवरा अचानक निघून गेल्यानंतर ठरीव प्रतिक्रिया न देणारी राधिका कथेची नायिका आहे. आपल्या अचानक निघून गेलेल्या आणि तशाच अचानकपणे आलेल्या नवऱ्याला आपला मित्र पार्थ याच्याविषयी ती मोकळेपणाने सांगते. हे ऐकून गोंधळलेला ललित आणि खोलीत आवराआवर करणारा पार्थ आणि विखुरलेली माणसे यामध्ये ती स्वतःची स्वतःला गवसते.

वेगवेगळ्या पद्धतीने विचार करणाऱ्या, 'स्व'चा शोध घेणाऱ्या नायिका सानियांच्या कथांमध्ये आहेत.

## २) स्त्रीची घुसमट

स्त्रीचे भावविश्व रेखाटताना आशा बगे व सानिया या दोन्ही लेखिकांनी तिची घुसमट आपल्या कथांमधून वाचकांसमोर मांडली आहे. कारण स्त्रीच्या आयुष्यात ही घुसमट अपरिहार्यपणे येतेच. कधी ती घरात होते तर कधी बाहेर. ही घुसमट व्यक्तिपरत्वे वेगवेगळ्या पातळीची असते. तसेच तिची तीव्रतादेखील व्यक्तिपरत्वे वेगवेगळी असते. स्त्रीची होणारी घुसमट हे या दोन्ही लेखिकांच्या लिखाणातील साम्य आहे.

### आशा बगे

१) **बंदिशाळा** – आहे त्या परिस्थितीत आपण काहीच बदल करू शकत नाही या कल्पनेने व्याकुळ होऊन बंदिशाळेत अडकलेल्या अनुपमा, वेणू आत्या आणि शिल्पा या कथेत भेटतात. कितीही घुसमट झाली तरी या बंदिशाळेतून बाहेर पडण्याचा निर्णय त्या घेऊ शकत नाहीत. अनेकदा वरवर छान वाटणाऱ्या गोष्टी तशा नसतात. एखादे दुःख मन पोखरत असते. बाहेरून लोकांना या दुःखाचे कारण समजत नाही.

---

१. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. ३९

इतका बाऊ करण्यासारखे यात काय आहे असे लोकांना वाटते. कोणताही धाडसी निर्णय घेणे सोपे नसल्याने अगतिकता, कोंडमारा, घुसमट या कथेत अनुपमा या व्यक्तिरेखेच्या बाबतीत जाणवते. अनुपमा कथेच्या शेवटी मार्मिक बोलते. ''आपलं असं हे परत जाणं फक्त आपलं एकटीचं थोडं आहे? ते वेणू आत्याचं आहे. शिल्पाचं आहे आणि कितीतरी जणींचं आहे.''[२]

२) **अनंत** – 'अनंत' या कथासंग्रहात मिसेस शारंगपाणी या कथेच्या नायिकेची विचित्र घुसमट अनुभवायला मिळते. चाकोरीबद्ध जगणाऱ्या साध्या, सरळ मिसेस शारंगपाणी यांच्या आयुष्यात एक विचित्र तूफान येते. बिल्डिंगमध्ये राहाणारी मुले त्यांना अपमानित करतात. त्या मुलांना चांगले काही सांगायला जातात. याचा त्या मुलांना राग येतो. म्हणून कपडे फाडून त्यांचा अपमान केला जातो. हे सगळे इतके अनपेक्षित रीतीने घडते की त्यांना काही सुचतच नाही. ''त्या चढत चाललेल्या तापाच्या ग्लानीतही मिसेस शारंगपाणींना त्या नजरा आठवतात. क्रोधाने पेटलेल्या, त्या नजरेतला एक क्षुब्ध, अनिवार्य, अनिर्बंध उसळता संताप. फक्त संतापच. आणि त्यांच्या उघड्या शरीरावर ते धगधगते डोळे कुठेही चिकटलेले नसतात. डोळे मिटूनही त्या जाग्याच राहातात.''[३]

३) **पाऊल वाटेवरले गाव** – या कथासंग्रहातील 'अँटिक' या कथेत शामलची घुसमट दाखवली आहे. कॉलेजच्या जीवनात जीवलग मित्र असणारा भूषणच तिच्या घुसमटीचे कारण बनतो. शामल हळुवार आणि संवेदनशील असते. पण भूषण मात्र तिच्याशी परपुरुषासारखा वागतो. बऱ्याच वर्षांनी भेटल्यानंतर भूषण तिच्याशी वासनांध होऊन रानटीपणाने वागतो. स्त्रियांची या 'अँटिक' म्हणजेच पुरातन नजरेतून सुटका झालेली नाही, तिची घुसमट आजही तशीच आहे. हेच या कथेतून प्रत्ययाला येते.

४) **पाणी** – या कथासंग्रहातील 'कोरडी भूमी' या कथेतली नायिका निलिमा बाहेरच्या कोणाहीमुळे नाही तर स्वतःच्या विचारांमुळेच अस्वस्थता, घुसमट अनुभवते आहे. वर्षानुवर्षे एखादा विचार, एखादे तत्व उराशी बाळगून जगताना तो विचार, ते तत्व आपल्यामध्ये रुजलेच नसल्याचा अनुभव निलिमाला येतो. संस्कारांचे शिंपण करताना तिच्या मुलांच्या जीवनात ओलावा येतो. पण आपल्या मनाची भूमी कोरडीच राहाते या विचाराने ती अस्वस्थ होते.

---

२. बंदिशाळा, अत्तर, आशा बागे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. क्र. ४९

३. तुफान, अनंत, आशा बगे, शारदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. क्र. ३१

आशा बगे यांनी आपल्या कथांमधून तिची होणारी घुसमट प्रभावीपणे मांडली आहे. प्रत्येक परिस्थितीत ती वेगवेगळी असते, तिची तीव्रतादेखील कमी अधिक असते. आनंद, समाधन मिळवण्यासाठी तिची धडपड निरंतर चालू असते. हवे ते न मिळाल्यास होणारी घुसमट, कोंडमारा या कथांमधून जाणवतो.

**सानिया**

१) **शोध** – या कथासंग्रहातील 'सुटका' या कथेत रेवतीच्या आयुष्यात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण होते. तिचा अपंग भाऊ शिनू याच्या मृत्यूने ही पोकळी रेवतीला अनुभवावी लागते. एखादी व्यक्ती जवळ असताना तिची जबाबदारी पेलणे नकोसे होऊन जाते. त्यातही ती व्यक्ती अपंग असेल तर त्या व्यक्तीचे आयुष्यात असणे तापदायक होते. स्वतःच्या आशा-आकांक्षांचा बळी देऊन त्या व्यक्तीचा सांभाळ करावा लागत असेल तर त्या व्यक्तीपासून सुटका कधी होईल याची वाट पाहिली जाते. पण खरेच जेव्हा सुटका होते तेव्हा मात्र कधीही भरून येणार नाही अशी पोकळी आणि अस्वस्थता निर्माण होते. 'सुटका' या कथेत रेवती या अस्वस्थतेतून जाते.

२) **खिडक्या** – 'खिडक्या' या कथासंग्रहातील 'शिल्लक' या कथेत कथेच्या नायिकेच्या मनोव्यापारातून तिला आलेली अस्वस्थता सानियांनी दाखवली आहे. मनातल्या गोष्टी वेळेत आणि स्पष्टपणे न सांगितल्याने नाती कायमची तुटतात. याचा अनुभव ती घेते. संतोषवर असणाऱ्या एकतर्फी प्रेमाने ती ही अस्वस्थता अनुभवते. या सगळ्यामध्ये व्यक्त न होण्याचा तोटा तिला सहन करावा लागतो. सुख, दुःखाचा जमाखर्च मांडताना शिल्लक काहीच नसल्याचा अनुभव ती घेते.

३) **अशी वेळ** – या कथासंग्रहातील 'फक्त गृहिणी' ही कथा प्रत्येक गृहिणीच्या मनातली व्यथा आणि भावना सानियांनी अचूकपणे मांडली आहे. नोकरी आणि घर ही तारेवरची कसरत आपल्याला जमली नसती का? या विचाराने ती अस्वस्थ होते. फक्त गृहिणी आहे असे म्हणण्याचा तिला राग येतो, वाईट वाटते. मात्र या कथेत या घुसमटीतून ती बाहेर पडते. ती स्वतः कुठेही कमी नसल्याच्या आशादायक भावनेत कथेचा शेवट होतो.

४) **पुन्हा एकदा** – माणसाच्या मनातल्या गुंतागुंतीला हात घालणारी सानियांची कथा म्हणजे 'वीण'. शुभांगी तिच्या सततच्या आजारपणामुळे त्रस्त झालेली असते. या अस्वस्थतेतून बाहेर पडण्यासाठी ती 'पत्र' या माध्यमाचा उपयोग करते.

आजारपणामुळे तिच्या सासरी सतत खटके उडत असतात. स्पष्टपणे कोणी काही बोलत नसले तरी सासरच्यांच्या वागण्या-बोलण्यातून तिला ते जाणवत असते. या सगळ्यामुळे ती एकाकी होते.

सानियांच्या कथांमधल्या नायिका घुसमट कमी करण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. बऱ्याचदा ही घुसमट आपल्याच मनातल्या विचारांचा परिणाम असल्याचा साक्षात्कार या कथानायिकांना होतो.

**३) पुरुषप्रधान कथा**

मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांनी स्त्री केंद्रस्थानी ठेवून लिखाण केले आहे. असे असले तरी या दोघींनीही पुरुषप्रधान कथादेखील तितक्याच ताकदीने लिहिल्या आहेत. स्त्री असूनही पुरुषाच्या मनाचा वेध या दोन्ही लेखिकांनी घेतला आहे.

**आशा बगे**

१) **मारवा –** आशाताईंच्या लेखनातला सहजपणा, साधेपणा आणि सच्चेपणा ही वैशिष्ट्ये 'मारवा' या कथासंग्रहातील सर्वच कथांमध्ये आहेत. या कथासंग्रहातली शीर्षककथा 'मारवा' आबा देशपांडे या पात्राच्या भूमिकेतून वर्तमानकाळ आणि भूतकाळातील प्रसंगांमधून कथेची बांधणी केली आहे. आबा व त्यांचा मुलगा रघुनाथ या मुख्य पात्रांभोवती कथेची गुंफण आहे. दोन पिढ्यांमधल्या पुरुषांच्या मनाचा वेध आशाताईंनी या कथेत घेतला आहे. नव्या आणि जुन्या पिढीतला संघर्ष, आबांचा हट्टी स्वभाव, रघुनाथचे भारावलेपण 'मारवा'मध्ये अनुभवयाला मिळते.

२) **अत्तर –** या कथासंग्रहात एकाहून एक सरस अशा पुरुषप्रधान कथा आहेत. शीर्षककथेमध्येच रंगनाथ आणि रावसाहेबांच्या मैत्रीमधला सुगंध दरवळतो. माणसामाणसातील नातेसंबंधांवर या कथेत भाष्य केले आहे. काळ कितीही लोटला तरी एकमेकांशी जोडलेले बंध तसेच राहातात असे ही कथा सांगते. अस्सल अत्तराचा सुगंध जसा दरवळत राहातो तसा रंगनाथ आणि रावसाहेबांच्या मैत्रीचा सुगंध कठीण परिस्थितीनंतरही दरवळतो.

याच कथासंग्रहातील 'पाहुणा' या कथेतला हट्टाला पेटलेला 'नरसप्पा', 'महावस्त्र' मधील आश्रित 'मोरेश्वर', 'झोपाळ्यावर अभंग कातर' मधील वार्धक्याने विकल झालेले

'अप्पा'. हे कथेचे नायक आशाताईंनी रंगवले आहेत. वेगवेगळ्या वयोगटातील, परिस्थितीतील हे नायक आशाताईंच्या लेखन सामर्थ्यामुळे भावतात.

**३) पूजा –** मध्यमवर्गीय व उच्चमध्यमवर्गीय पुरुषप्रधान कथा या कथासंग्रहात आहेत. शीर्षककथेमध्येच मध्यमवर्गीय कुटुंबातील पूजा, परंपरा, धार्मिक कार्य अधोरेखित झाले आहे. दादांच्या घरात पूजेला असणारे महत्त्व, महादेवकर गुरुजी नसल्याने त्यांचा बारा–तेरा वर्षांचा मुलगा बाळकृष्ण पूजा करायला येतो. दादांना सुरुवातीला त्याचा राग येतो पण नंतर पूजेविषयी, बाळकृष्णाविषयी दादांचे विचार बदलतात. पूजा हा धार्मिक उपचार वरवर करण्याने मन शुद्ध होत नाही तर शुद्ध मनाने केलेले कोणतेही काम मनःशांती मिळवून देते हा संदेश या कथेतून आशाताई देतात.

या कथासंग्रहात 'अरण्य' मधील 'रघुनाथ', 'सायकल' मधील 'सोमनाथ', 'प्रदीर्घ' मधील 'नाना', खडक या कथेतील 'गोखले सर व अजय' हे कथेचे नायक मनातल्या भावनांचे विविधरंगी इंद्रधनुष्य दाखवतात.

**४) मांडव –** या कथासंग्रहातील 'मुसळधार' मधील 'गिरिधर आचारी' कथासंग्रह वाचल्यानंतर कित्येक दिवसांनीही लक्षात राहातो. जीवनातल्या अतर्क्य अशा गूढतेला स्पर्श करणारी ही कथा आहे. या कथेतील भाषा पावसात आणि गिरिधर आचाऱ्याच्या उत्कृष्ट, तरल अस्वस्थतेत भिनून एकाच लयीतील झाली आहे. गिरिधर आचारी या नायकाभोवती ही कथा फिरते.

या कथासंग्रहात 'साक्षी' ही कथा 'पांड्या' नावाच्या कथेच्या नायकाचे विचार व्यक्त करते. 'ठग' या कथेत कथेतील पुरुष पात्र 'कल्लू' आशाताईंनी हुबेहुब रंगवले आहे.

आशाताईंच्या लेखनात पुरुषपात्र रंगवतानादेखील तीच सहजता आहे. आपल्या आजुबाजूला असे कथानायक नेहमीच आढळतात. स्त्रीच्या मनाचा वेध जितका समर्थपणे घेतला आहे तितकाच पुरुषाच्या मनाचा तळ शाधण्यात आशाताई यशस्वी झाल्या आहेत.

**सानिया**

माणसामधल्या निरनिराळ्या नातेसंबंधांचा शोध घेण्याचा प्रयत्न सानियांच्या कथा करतात. त्यामुळेच नायिकाप्रधान कथांइतक्याच पुरुषप्रधान कथादेखील लक्षात राहातात.

१) **खिडक्या** – ‘खिडक्या’ या कथासंग्रहातील ‘हिवाळ्यातील पहिला दिवस’ या कथेत प्रा. बर्वे हे नायक म्हणून आपल्याला भेटतात. संयमी वर्तन, शांत स्वभाव, काटेकोरपणा या सगळ्यामुळे ते एक शिस्तप्रिय प्राध्यापक म्हणून परिचित असतात. कोणतीही गोष्ट ठराविक प्रमाणात करण्याकडे त्यांचा कल असतो. पण एकदा या दिनक्रमापासून दूर जावे असा विचार त्यांच्या मनात येतो. मनात येणारे विचार नेहमीपेक्षा वेगळे आणि कष्टदायक वाटू लागतात. असा विचार करण्याची आपली कुवतच नाही, त्यापेक्षा रोजचा दिनक्रमच बरा असे त्यांना वाटू लागते. स्त्रियांच्या भावविश्वाचे वर्णन करणाऱ्या सानियांच्या कथांमध्ये प्रा. बर्वे हे पुरुषपात्रदेखील त्या समर्थपणे रंगवतात.

याच कथासंग्रहातील ‘चाफा’ या कथेतील ‘रत्नाकर’च्या मनातील अगतिकता, नैराश्य, दुःख सानियांनी प्रभावीपणे मांडले आहे.

२) **भूमिका** – या कथासंग्रहातील ‘मित्राची कथा’ या कथेत माधव आणि ऋषिकेश ही दोन पुरुषपात्रे सानियांनी रंगवली आहेत. आयुष्याच्या प्रवाहात वाटा वेगळ्या होण्याची शक्यता असते, पण या वेगळ्या वाटांवरुनही नाते टिकवता येऊ शकते. माधव आणि ऋषिकेशच्या बाबतीत मात्र असे होत नाही. ऋषिकेशच्या आजारपणात माधवला फार उदास वाटते. ‘‘त्याला क्षणभर काहीच सुचेना काहीतरी चुकल्यासारखं वाटत होतं. काय ते उमगत नव्हतं. एखादा राहून गेलेला तुकडा. ती पोकळ जागा जाणवते आहे. पण त्या हरवलेल्या तुकड्याचा आकार कळत नाही. हा कसला जीवघेणा खेळ? स्वतःचं डोकं हातात धरून तो थोडा वेळ स्तब्ध, भान हरवून गेल्याप्रमाणे बसून राहिला.’’[४] पुरुषप्रधान कथेचा उत्तम नमुना म्हणजे ही कथा.

या कथासंग्रहातील ‘वर्तमान’ व ‘स्वदेशी’ या दोन कथांमध्ये अनुक्रमे प्रदीप व माधव ही पुरुषपात्रे आहेत. स्त्रियांचे भावविश्व रेखाटतानाच पुरुषप्रधान कथांचा समावेशदेखील या कथासंग्रहात आहे.

३) **अशी वेळ** – सानिया यांनी एका पुरुषाच्या नजरेतून ‘लेखकाची अर्धी गोष्ट’ ही कथा मांडली आहे. स्त्रीचा अनाकलनीय स्वभाव त्याला त्याच्या मैत्रीणीच्या रुपाने अस्वस्थ करतो व त्याची गोष्ट अर्धीच राहाते. तो एक संवेदनशील लेखक आहे, अशी प्रतिक्रिया त्याच्या वाचकांकडून मिळत असते. परंतु एकदा अचानक त्याची बालपणीची मैत्रीण म्हणून आलेली स्त्री त्याला स्त्री कळलेलीच नाही असा आरोप त्याच्यावर करते. त्यामुळे तो प्रचंड अस्वस्थ होतो. त्याची ही अस्वस्थता सानियांनी

४. मित्राची कथा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ७८

अचूकपणे मांडली आहे.

४) **पुन्हा एकदा** – या कथासंग्रहाच्या शीर्षककथेतच 'श्रीधर' हे पुरुषपात्र सानियांनी रंगवले आहे. एखादी कृती आपण करणार नाही असा ठाम निश्चय केला तरी त्या गोष्टी नकळतपणे पुन्हा एकदा आपल्यासमोर येतात आणि मग निश्चय मोडकळीस निघतो. निर्मल या त्याच्या बालमैत्रीणीमुळे भारतात परत कधीही न येण्याचा त्याचा निर्णय तो बदलण्याचा विचार करतो.

सानियांच्या कथालेखनातील बलस्थानांपैकी एक म्हणजे त्यांनी रंगवलेली पुरुषपात्रेदेखील मनाला भावतात. स्त्रियांचा मनोव्यापार त्या जितक्या समर्थपणे मांडतात, तितक्याच प्रभावीपणे पुरुषप्रधान कथा त्या लिहितात.

## ४) नातेसंबंधांचा शोध

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. त्यामुळे त्याला समाजात राहणे, मिसळणे, नातेसंबंध निर्माण करणे माणसाला आवडते मग ती स्त्री असो वा पुरुष. त्यातल्या त्यात स्त्रिया जास्त संवेदनशील असतात आणि नाती निर्माण करण्याकडे त्यांचा ओढा असतो. आशा बगे आणि सानिया या दोघी स्त्रीलेखिका आहेत आणि त्यांचे लेखन स्त्रीवादी दृष्टिकोनातून लिहिले गेले असून स्त्रीकेंद्री आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यात नातेसंबंधाचा शोध असणार यात शंका नाही. रक्ताच्या व रक्ताच्या नात्यांपलीकडल्या नात्यांचा शोध या दोन्ही लेखिकांनी घेतला आहे. हा शोध घेता घेता नायिकेचा किंवा नायकाचा 'स्व'चा शोधही दिसून येतो.

### आशा बगे

१) **मारवा** – 'मारवा' या कथासंग्रहातील 'नातं' या कथेत माणसाच्या नात्यांविषयी असणाऱ्या भावनांचे मनोविश्लेषणात्मक परीक्षण आशाताईंनी नोंदवले आहे. आपल्या आयुष्यातील नाती विचित्र असतात. ती नाकारताही येत नाहीत आणि तोडताही येत नाहीत. या नात्यांना जपावे मात्र लागते. नात्यांमधल्या प्रेमाची धार काळाच्या ओघात बोथट होते. नीना आणि भास्कर या दांपत्याची ही कथा आहे. नीनाची जाऊ वीणा हिचा अचानक मृत्यू होतो. पण कितीही मनात असले तरी नीना घरगुती अडचणींमुळे जाऊ शकत नाही. तिच्याकडे घरकाम करणाऱ्या गीताबाईंच्या आजारपणातही कोरडेपणाने वागते. गीताबाईंच्या आजारपणामुळे नीनाला जायला मिळत नाही म्हणून चिडचिड करते.

माणसाच्या सगळ्या भावना स्वतःपुरत्या आणि संदर्भहीन असतात असे तिला वाटते. ती विचार करते, ''नाहीतरी कुणी कुणाचं नसतंच. कशावरंच तर आपली मालकी नसते. अगदी आपली म्हणून असलेली सुख-दुःखही आपली नसतात. तरी सारा प्रवाह वाहता असतो. आपल्या नकळत कुणीतरी आपल्याला या प्रवाहाशी विचित्रपणे बांधून ठेवतं, नाकारता येत नाही. सहन मात्र करावी लागतात.''[५]

या कथेत आशाताईंनी नीनाचे स्वतःशी असणारे आणि तिला उमगलेले नाते शब्दबद्ध केले आहे.

२) **चंदन** – वडील आणि मुलाच्या नात्यातला हळुवार बंध 'चंदन' या शीर्षककथेत आशाताईंनी उलगडून दाखवला आहे. बऱ्याच वेळा आपल्याजवळ असणाऱ्या माणसांचे महत्त्व त्यांच्या पुराव्यातूनच लक्षात येते. एकमेकांजवळ असताना एकमेकांचे महत्त्व समजून न आल्याने निर्माण झालेला द्वेष मनात ठेवून आयुष्याच्या शेवटच्या घटकेला विरुन जातो. वडील आणि मुलामध्ये आलेला दुरावा संपून त्यांच्या नात्याचा सुगंध चंदनासारखा दरवळतो. अगदी नात्यांचा कस लागल्यानंतर चंदनाप्रमाणे झिजूनच नाती सुगंधित व्हावीत असे या कथेत अनुभवण्यास मिळते. यशस्वी वडील आणि त्यांचा प्राध्यापक मुलगा मुकुंदाची ही कथा आहे.

३) **अनंत** – आशाताईंची 'नातं' ही कथा वेगळ्या धाटणीची आणि त्यांचे लेखनसामर्थ्य व्यक्त करणारी आहे. मानवी नाती अनाकलनीय आणि गुंतागुंतीची असतात. दोन व्यक्तींमधल्या नात्याचे नेमके स्वरूप तिसऱ्या व्यक्तीला समजू शकत नाही. एका मृत्यूच्या निमित्ताने जाणवलेला विचित्र गुंता 'नातं' या कथेत आशाताई हळुवारपणे पण मोठ्या ताकदीने मांडतात. काही नाती शब्दांच्या पलीकडची असतात. त्या नात्यांना काळाची मर्यादा बांध घालू शकत नाही. कितीही काळ मध्ये लोटला तरी त्या नात्याला तडा जात नाही. अनू आणि केतन या बहीण भावांच्या अनोख्या नात्याची ही कथा आहे.

४) **दर्पण** – या कथासंग्रहात 'अज्ञात' या कथेत मोठ्या वयाची लग्न ठरत नसलेली मुलगी व तिचे वडील यांची मनोभूमिका मांडली आहे. तसा विचार केला तर हा प्रसंग फार वेगळा आहे असे नाही. पण आशाताईंनी या संपूर्ण घराची भूमिका, नातेसंबंध समर्पकतेने मांडले आहेत. सर्वगुणसंपन्न असूनही लग्न ठरत नसलेल्या मुलीला आणि विशेषतः तिच्या वडिलांना काय वाटत असेल याचा भावपूर्ण आशय या कथेत

---

५. नातं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जून २००२, पृ. क्र. ७५

आशाताईंनी मांडला आहे.

माणसाच्या मनाचा गुंता आशाताईंनी त्यांच्या सगळ्याच कथांमधून मांडला आहे. मनोविश्लेषणात्मक लेखन हा त्यांच्या कथांचा आत्मा आहे. माणसाचे मन अनाकलनीय आहे. त्यामुळे या मनाने निर्माण केलेली नातीदेखील अनाकलनीय असतात. आशाताईंच्या लेखनात या मनाचा तळ शोधण्याचे सामर्थ्य वेळोवेळी जाणवते.

**सानिया**

१) **शोध** – लेखनाच्या प्रारंभी लिहिलेल्या या कथासंग्रहात मानवी मनाची गुंतागुंत सानियांनी प्रभावीपणे मांडली आहे. या कथासंग्रहातील 'वळण' या कथेत भावा-बहिणीच्या नात्याचा शोध घेतला आहे. आपणच आपल्या बहिणीच्या कृष्णाच्या आयुष्याला चुकीचे वळण लागले अशी खंत बाळगणारा तिचा भाऊ राघव या कथेत भेटतात. आई-वडिलांच्या निधनानंतर कृष्णेची जबाबदारी घेऊन राघव तिला स्वतःबरोबर घेऊन जातो. शहरातल्या वातावरणातही ती छान जुळवून घेते. परंतु तिच्या लग्नाचा चुकीचा निर्णय राघव घेतो. त्याच्या त्या एका निर्णयाने कृष्णाच्या आयुष्याची वाताहात होते. मनाविरुद्ध आयुष्याला वेगळे वळण लागूनही कांगावा न करता सगळे सहन करून जगणारी कृष्णा वेगळीच वाटते.

२) **प्रतीती** – या कथासंग्रहातील 'प्रवाह' या कथेत आई आणि मुलीच्या वेगळ्याच नात्याचा गोफ विणला आहे. गौर (आई) आणि विनिता (मुलगी) यांच्यामध्ये आई-मुलीच्या नात्यातला ओलावा नाही. लहानपणापासूनच विनिता तिच्या वडिलांशी जास्त बांधलेली असते. तिच्या वडिलांचे प्रवाह तिच्यामध्ये जास्त जाणवतात. स्त्रीसुलभ गोष्टींचा आणि तिचा काहीही संबंध नसतो. तिची आई तिच्याकडे आल्यानंतर ती थोडी बदलते पण हे मान्य करत नाही. आपण प्रवाहाविरुद्ध वहात आहोत की काय अशी खंत तिला वाटते.

३) **खिडक्या** – या कथासंग्रहातील 'पावसाळ्यातली गोष्ट' या कथेत मैत्रीणींच्या नात्याचा वेध सानियांनी घेतला आहे. मोनिका आणि रती या मैत्रीणींची ही कथा आहे. या कथेत एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला मदत करते हे दाखवले आहे. श्रीमंत घरात वाढलेल्या मोनिकाला विद्याधरशी लग्न करण्याचा निर्णय चुकल्याची जाणीव होते. ऐषारामात वाढलेल्या मोनिकाला संसारात तडजोड करताना खूप जड जाते. पण तिची मैत्रीण रती तिचा हा दृष्टिकोन बदलवायला कारणीभूत होते. विद्याधरशी लग्नाचा निर्णय

योग्य असल्याच्या आनंदात कथा संपते.

४) **पुन्हा एकदा** – या कथासंग्रहातील ‘प्रतिसाद’ या कथेत जयंती आणि तिचा बॉस अच्युत यांच्या एका वेगळ्याच नात्याचा शोध सानियांनी घेतला आहे. अच्युत जयंतीपेक्षा वयाने मोठा असतो. त्याच्या मनातले तिच्याविषयीचे प्रेम तो प्रामाणिकपणे कबुल करतो. सुरुवातीला जयंतीला या सगळ्याचा खूप राग येतो. पण गैरसमज करून न घेता दिलेला प्रतिसाद निखळ संवादाची सुरुवात असते हे या कथेतून व्यक्त होते.

माणसाच्या जीवनात शोध ही एक अशी प्रक्रिया आहे जी निरंतर चालूच राहाते. एका सुखाचा शोध घेऊन झाला की माणूस नकळत दुसऱ्या सुखाच्या शोधाकडे धावतो. या सगळ्या प्रक्रियेत माणसांमधील नातेसंबंध फार महत्त्वाची भूमिका बजावतात. मग हा संबंध कधी दुसऱ्या कोणाशी तरी असतो किंवा स्वतःच्या मनाशी. नातेसंबंधांचा हाच शोध सानिया आपल्या कथांमधून घेतात.

### ५) वृद्धांच्या भावना

स्त्री-केंद्री आणि पुरुषप्रधान कथालेखनामध्ये आशा बगे आणि सानिया यांनी उमटवलेली छाप आपण अनुभवली. या दोन्ही लेखिकांनी वार्धक्यातल्या स्त्री-पुरुषांचे अंतरंग दाखवणाऱ्या कथादेखील लिहिल्या आहेत. वायपरत्वे मनातल्या भावना बदलत असतात. त्यामुळे निर्माण होणारे प्रश्नदेखील बदलतात. या प्रश्नांचा, भावनांचा वेध या दोघींनी घेतला आहे.

**आशा बगे**

१) **अत्तर** – या कथासंग्रहातील ‘झोपाळ्यावर अभंग कातर’ ही कथा आहे वार्धक्याने विकल झालेल्या अप्पांची. घरामध्ये ज्येष्ठ नागरिकांचे महत्त्व कोणालाही कळत नाही. दोन प्रेमाचे शब्द, जिव्हाळा आणि आपुलकी याव्यतिरिक्त त्यांना काही नको असते. पण नेमक्या या गोष्टीपासूनच ते वंचित राहातात. आपले सगळे आयुष्य, घरदार आणि मुलेबाळे यांच्यासाठी दिल्यानंतर, वार्धक्याने निर्माण झालेली पोकळी त्यांना खायला उठते. सासऱ्यांचा जाचक स्वभाव वाटणाऱ्या पद्माला त्यांचाच आधार वाटतो. कातरवेळी अप्पांच्या आठवणीने तिच्या मनात हुरहुर दाटते.

२) **पूजा** – ‘प्रदीर्घ’ या कथेत ‘नाना’ हे वृद्ध पात्र आपल्याला भेटते. बालपण, तारुण्य आणि वार्धक्य हे मनुष्याच्या जीवनाचे तीन टप्पे आहेत. त्यातल्या

त्यात बालपण व तारुण्य कधी येते आणि कधी जाते कळत नाही. वार्धक्य मात्र सरता सरत नाही. आपल्या वयाचे सगळे आपली साथ सोडून गेल्यावर हे वार्धक्य जास्तच अंगावर येते. मरण येत नाही आणि जगावेसे वाटत नाही अशी मनाची अवस्था होते. त्यामुळे प्रदीर्घ असे हे वार्धक्य नकोसे वाटते. या कथेतील नानांनादेखील त्यांचे हे वार्धक्य नकोसे झाले आहे. आपल्याच घरातले लोक आपल्याकडे मुद्दाम दुर्लक्ष करीत आहेत अशी नानांची समजूत होते. खरे तर असे काहीच नसते. नानांना आपली चूक कळतेही पण तरीही वृद्धत्वामुळे आलेला हट्टीपणा त्यांना ही चूक मान्य करून देत नाही.

या कथासंग्रहाच्या शीर्षककथेतदेखील दादांच्या वार्धक्यामुळे आलेला हट्टीपणा आशाताईंनी शब्दबद्ध केला आहे.

३) **मांडव –** या कथासंग्रहातील 'प्रस्थान' या कथेत आशाताईंनी वृद्ध नानींची समस्या मांडली आहे. वृद्ध लोक घरात नकोसेच असतात. एकेकाळी आपल्या कर्तृत्वाने संसार उभारलेली ही वृद्ध मंडळी घरातल्यांना अडगळ वाटू लागतात. त्यांची सेवा शुश्रुषा करताना त्यांच्या प्रस्थानाची वाट बघणारे त्यांचेच आप्त असतात. उच्च मध्यमवर्गीय कुटुंबातील ही समस्या आशाताईंनी या कथेतून व्यक्त केली आहे.

याच कथासंग्रहात 'नैवेद्य' या कथेत मृत्यूच्या विळख्यात अडकलेल्या वृद्ध आईची कथा आशाताईंनी सांगितली आहे.

४) **मांडव –** या कथासंग्रहातील 'श्राद्ध' या कथेत सुमनताईंचा परंपरावादी दृष्टिकोन मांडला आहे. श्राद्ध ही एक भावना आहे. आपल्या प्रिय व्यक्तीच्या निधनानंतर श्रद्धापूर्वक स्मरण करण्याची रीत म्हणजे श्राद्ध. काळ बदलेल तशा या रुढीदेखील बदलतील, पण त्यामागे असणारी भावना मात्र तशीच राहील. या कथेतल्या सुमनताई आपल्या पतीचे श्रद्धापूर्वक श्राद्ध व्हावे या भावनेला धरून आहेत. पण बदलत्या परिस्थितीनुसार त्यांच्या मुलांना हे सगळे विधी करण्यासाठी पुरेसा वेळ नाही. या रुढीमागे जी भावना आहे ती महत्त्वाची अशी नवीन पिढीची धारणा आहे. सुमनताई या पिढीशी जुळवून घ्यायलाही तयार आहेत, पण निदान श्रद्धापूर्वक स्मरण केले जावे एवढीच त्यांची अपेक्षा असते. सुमनताईंच्या भावना समर्पक रीतीने आशाताईंनी व्यक्त केल्या आहेत.

वार्धक्य हा शाप वाटावा अशा भावना या कथांमधून व्यक्त होतात. प्रत्येक वेळी नव्या पिढीचे चुकतेच असे नाही. ज्येष्ठांनीदेखील हे समजून घ्यायला हवे. बदलत्या काळानुसार बदलायला हवे. असे केले नाही तर दोन पिढ्यांमधले हे अंतर कधीच कमी होणार नाही. दोन्ही पिढीतल्या लोकांनी दोन दोन पावले पुढे आल्यास वार्धक्य सहन

करणे वृद्धांना सोपे जाईल व नव्या पिढीला ज्येष्ठांना समजून घेणे सोपे जाईल. हा संदेश आशाताई देतात.

**सानिया**

आशा बर्गेप्रमाणेच सानिया यांनी वृद्धांचे प्रश्न, वृद्धांची मानसिकता, वृद्धांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन यावर आपल्या कथांमधून भाष्य केले आहे.

१) **खिडक्या** – या कथासंग्रहातील 'हिवाळ्यातला पहिला दिवस' या कथेत 'प्रा. बर्वे' या शिस्तप्रिय प्राध्यापकाच्या रूपाने मनात चाललेला संघर्ष सानिया लिहितात. काही लोकांना आपल्या शिस्तप्रिय वागण्याचाच दुराभिमान वाटतो. त्यापैकीच एक म्हणजे प्रा. बर्वे. त्यांच्या काटेकोर वागण्याने चाकोरीबाहेरचे जगणे राहूनच जाते. घराच्या पायरीवर ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त बसणे हेदेखील त्यांना बंड वाटत असते. मनात बंडाचे विचार आल्यावर ते अस्वस्थ होतात. बर्व्यांच्या मनातली ही घालमेल सानियांनी अचूकपणे मांडली आहे.

२) **भूमिका–** या कथासंग्रहातील 'स्वदेशी' मधील 'माधव' स्वतःच्या विचारांमुळे एकाकी आहे. स्वतंत्र, एकटे, निर्भय राहाण्याच्या भावनेमुळे तो आपल्या कुटुंबापासूनच नव्हे तर देशापासूनही लांब राहातो. हे सगळे त्याला कितीही हवेसे वाटले तरी एखाद्या क्षणाला आपलेपणाची भावना मनात निर्माण होतेच. मात्र एकदा हा एकाकीपणा स्वतःहून स्वीकारला की लोकांनाही अशा व्यक्तीसोबत न राहाण्याची सवय होते. या एकटेपणाबद्दल माधव म्हणतो, ''आपण चार दिवस खेळायला क्लबवर गेलो नाही म्हणून कोणी नवल करणार नाही, की नेहमीच्या दुकानात भाजी–ब्रेड आणायला गेलो नाही म्हणून दुकानदार काळजी करणार नाही. हाच तो सर्वस्वी एकटेपणा.''[६]

३) **प्रयाण –** या कथासंग्रहातील 'दाही दिशांचे पूल' या कथेत नात्यांमधल्या आपलेपणाचा, दुराव्याचा आलेख मांडणारी नीरा भेटते. पैसा, मान, कर्तृत्व यामुळे आयुष्य परिपूर्ण होतेच असे नाही. नाती, प्रेम हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे हा आशय या कथेतून सानियांनी व्यक्त केला आहे. नीराने आपल्या दोन्ही मुलांना उत्तम संस्कार देऊन लहानाचे मोठे केलेले असते. पण त्यांच्या त्यांच्या वाटा त्यांनी निवडल्यानंतर प्रेम, नातेसंबंध याविषयीची आस्था कमी होते. जे आहे त्याच्यात आनंद मानण्यापेक्षा जे नाही त्याविषयी दुःख करत बसण्याकडे तिच्या मुलांचा कल जातो. नात्यांच्या या

---

६. स्वदेशी, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १८६

गुंत्याचा सकारात्मक शेवट सानियांनी कथेमध्ये दाखवला आहे. एखाद्याने आपली चूक कबुल केली तर मोठ्या मनाने त्याला माफ करायला हवे या विचाराने कथेचा शेवट होतो. चांगले संस्कार करूनही मुलांच्या वागण्याने नीरेला झालेली वेदना कथेत मांडली आहे.

४) **अशी वेळ** – या कथासंग्रहाची शीर्षककथा आयुष्याच्या संध्याकाळी जडलेल्या विस्मरणाच्या सवयीकडे सानियांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. कथेतील घटना, भावना, पात्र अगदी रोजचीच आहेत. आपल्या प्रत्येकाच्या आजुबाजूला घडलेल्या या घटना आहेत. वय उतरणीला लागले की भेडसावणारा प्रश्न म्हणजे विस्मरण. ही अवस्था प्रत्येकाचीच होते. ज्येष्ठ नागरिकांच्या एका साध्याशा पण महत्त्वाच्या समस्येवर ही कथा भाष्य करते. वय वाढते तसे विस्मरणाचे प्रमाणही वाढते. या कथेची नायिका एक वृद्ध स्त्री वेगळ्या सकारात्मकतेने या कथेकडे बघते.

सानियांनी रंगवलेली ज्येष्ठ पात्रेदेखील स्वतंत्र विचारांची आहेत. कोणावर अवलंबून राहिल्याने निर्माण झालेले प्रश्न, व्यथा त्यांच्या जीवनात नाहीत. स्वतःहून स्वीकारलेला एकटेपणा ते अनुभवतात. स्वत्वाची जाणीव झालेली समंजस वृद्ध पात्रे सानियांनी रंगवली आहेत. मुलांनी दुर्लक्ष केल्याने, आजारपणाने त्रस्त झाल्याने, मानसिक, शारीरिक दुर्बलतेने त्यांना दुःख सहन करावे लागत नाही. पूर्वायुष्यात घेतलेल्या निर्णयांचे परिणाम म्हणून आलेला एकाकीपणा हे त्यांचे दुःख आहे.

## ४.३. आशा बगे व सानिया यांच्या लेखनातील विरोध (तुलना)

आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांनी परंपरा जपणाऱ्या आणि परंपरेचे जोखड तोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या किंवा दोलायमान स्थितीतल्या नायिका रंगवल्या आहेत. पुरुष हा स्त्रीचा शत्रूच असतो आणि तो तिच्या प्रगतीला खिळ बसवतो असे या दोघींचे म्हणणे नाही. दोघींनीही त्यांच्या कथांमधून समजुतदार पुरुष पात्रे रंगवली आहेत. पुरुषप्रधान कथादेखील लिहिल्या आहेत. माणसामाणसातील नातेसंबंधांचा शोध घेत, व्यक्तीच्या मनातील सूक्ष्म आंदोलनांचा मागोवा या दोघींनी आपल्या कथांमधून घेतला आहे. प्रबंधाचा विषय मांडत असताना त्यांचे कथाविश्व, कथांमधील साम्य हे मुद्दे मांडून झाल्यानंतर त्यांच्या कथा-लेखनाची तुलना प्रबंधाच्या परिपूर्णतेच्या दृष्टीने आवश्यक आहे. यासंबंधीचे काही मुद्दे या प्रकरणात पाहू या.

## १) कथेचा विकासक्रम

मराठी साहित्यविश्वात स्त्रीच्या भावभावनांचे चित्रण करणाऱ्या सर्व लेखिकांमध्ये आशा बगे व सानिया यांचे निश्चितपणे एक वेगळे स्थान आहे. स्त्रियांच्या साहित्यामध्ये आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनाने या दोघींनीही मोलाची भर घातली आहे. १९८० ते १९९० या दशकामध्ये लिखाणाची सुरुवात करणाऱ्या या दोन्ही लेखिका आहेत. समकालीन असल्या तरी त्यांच्या दृष्टिकोनात फरक असल्याचे कथांमधून अनुभवायला मिळते. लेखिकांचे वय, ती राहात असलेला परिसर, कुटुंब, मित्र-मैत्रीणी, अनुभव, दृष्टिकोन या सगळ्याचे प्रतिबिंब या दोघींच्या लेखनात जाणवते.

### आशा बगे

जीवनाच्या विस्तीर्ण पटावर माणूस म्हणून स्त्री-पुरुषांच्या भावभावनांचा शोध घेण्याचे काम आशा बगे यांची कथा करते. माणसामाणसातील भावबंध पुन्हा पुन्हा तपासून पहाणे, निव्वळ नात्यांचे लेबल न लावता अलवार नात्यांचा शोध घेणे हे त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीची स्वत्वाची ओढ, वात्सल्यदृष्टी, कुटुंबाशी असणारे नाते, तिचा आत्मशोध या बाबी आशाताईंच्या कथांमधून दिसतात. काव्यात्म वृत्तीचे पडसाद त्यांच्या कथालेखनात उमटले आहेत. त्यांचे संगीतविषयक प्रेम त्यांच्या कथांमधून दिसते. 'मारवा' या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहापासूनच त्यांची विकसित कथा वाचकाला अनुभवायला मिळते. त्यांच्या सर्वोत्तम कथासंग्रहांपैकी एक म्हणजे 'मारवा'. या कथासंग्रहास राज्य पुरस्कार प्राप्त झाला आहे. कथासंग्रहाची प्रथम आवृत्ती जानेवारी १९८४ मध्ये प्रकाशित झाली तर पाचवी आवृत्ती २००२च्या जून महिन्यात प्रकाशित झाली. यावरुनच कथासंग्रहाची प्रचंड लोकप्रियता दिसून येते. लेखनातील साधेपणा व सहजता प्रत्येक कथेत जाणवते. कोणतीही कथा वाचल्यानंतर तिचा अर्थबोध होतच नाही असे होत नाही. आशाताईंची वाचकप्रिय कथा 'रुक्मिणी' याच कथासंग्रहातली आहे. त्यांना कथाकार म्हणून नावलौकिक मिळवून देण्यात या कथेचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे. पारंपारिक वातावरण असले तरी कथेची मांडणी नव्या वळणाची आहे. 'रेणू' या नायिकेभोवती कथा फिरते. या कथेत रेणूच्या अंतरंगातील बदलणाऱ्या भावना आशाताईंनी सूक्ष्मपणे टिपल्या आहेत. आजुबाजूला घडणाऱ्या घटना वाचकांपर्यंत पोहोचवताना त्या परिपक्व असाव्यात याकडे त्यांनी कायम लक्ष दिले आहे. लेखिका म्हणून त्यांनी सुरुवातीच्या कथासंग्रहातच स्वतःला सिद्ध केले आहे. पुढील काळात लिहिलेले सगळे

कथासंग्रह असेच दर्जेदार आहेत. ‘पाणी’ या कथासंग्रहाच्या अर्पण पत्रिकेतच त्यांच्या विशाल अंतःकरणाचे दर्शन घडते. मनोगतात त्या म्हणतात, ‘‘मनोगत लिहिणं मला फारसं आवडत नाही. कथांमधून एका संतत धारेसारखी लेखक म्हणून आपली जीवनवृत्ती झरत असतेच. त्यासाठी वेगळ्या मनोगताची गरज नाही.’’ त्यांचा हा विचारच त्यांच्या कथेच्या विकासक्रमाचे प्रतिबिंब आहे.

**सानिया**

सानियांचे साहित्य वाचताना मेंदूला जडपणा येतो. वाचक म्हणून आपण त्यांच्या कथेच्या पात्रात शिरून निष्कर्ष काढण्यात गुंगून जातो. आशयघनतेने व प्रयोगशीलतेने त्यांनी वाचकांच्या मनावर मोहर उठवली आहे. नोकरीच्या निमित्ताने व लग्न झाल्यानंतर अनेक जागा बदलत गेल्याने बरेच अनुभव त्यांच्या वाट्याला आले. एक व्यक्ती म्हणून व्यापक अनुभव मिळाला असला तरी त्यांच्या बहुतेक कथा स्त्रीकेंद्री आहेत. त्यांच्या नायिका सुशिक्षित व नोकरी करणाऱ्या आहेत. सानियांचे कथाविश्व पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान देणारे आहे. त्यांनी निर्मिलेली पात्रे परंपरेच्या चौकटी झुगारून देतात, वेगळ्या वाटेवरून आत्मशोधाची अनुभूती घेतात. सानियांचा ‘शोध’ (प्रकाशन वर्ष १९८०) हा कथासंग्रह त्यांच्या लेखनाच्या सुरुवातीचा कथासंग्रह. कथांचे वेगवेगळे आकृतीबंध या कथासंग्रहात आढळतात. या कथासंग्रहातील अनुभवविश्व पुढील काळातील कथासंग्रहात प्रकटणाऱ्या अनुभवविश्वापेक्षा कितीतरी पटीने अधिक अमूर्त व धूसर आहे. व्यक्तिचित्रणाच्या रंगरेषाही फिकट व तुटक आहेत. निवेदनाची भाषा एकसुरी वाटते. ‘शोध’ या कथासंग्रहातील कथांमधली पात्रे समजून घेण्यासाठी कथा पुन्हा पुन्हा वाचाव्या लागतात. या कथासंग्रहातील ‘वळण’ या कथेची नायिका ‘कृष्णा’ मनाविरुद्ध आयुष्याला वेगळे वळण लागूनही कांगावा करत नाही. पण तिचे सगळे वागणे अनाकलनीय वाटते. जाणीवेपासून नेणीवेपर्यंतचा प्रवास घडवणारी ‘जन्म’ ही कथा अशीच थोडी वेगळ्या पद्धतीने मांडली आहे. अर्धवट तुटलेल्या माळांसारखे नायिकेचे विचार सानियांनी या कथेत मांडले आहेत. समोरच्याला समजो न समजो मनातल्या विचारांना मोकळी वाट करून देणारी नायिका आपल्यामध्येच असली तरी कथेच्या रूपात तिला समजून घेणे थोडे जड जाते. ‘अपरिहार्य’ ही कथा लेखनाचा वेगळेपणा हे वैशिष्ट्य घेऊन वाचकाच्या भेटीला आली तरी दुर्बोधता हा कथेचा दोष वाटतो. सानियांच्या ‘पुन्हा एकदा’ (प्रकाशन वर्ष २०१५) हा कथासंग्रह वाचताना आपल्याला जाणवते की त्या

कथांमधली पात्रे विचारी आहेत, त्यांना प्रश्न पडत असतात. ही पात्रे कसला ना कसला शोध घेत आहेत. मुख्य म्हणजे स्वतःचा शोध घेत आहेत. पुस्तक वाचत असताना आपण त्यात नकळतपणे अडकत जातो. त्या पात्रांच्या विचारांचे प्रतिबिंब आपल्यावर पडते. नकळतपणे आपणच पात्रांच्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागतो. या कथा ऐंशीच्या दशकातल्या असल्या तरी कालबाह्य वाटत नाहीत. लेखनातून जिवंत होणाऱ्या सगळ्या पात्रांना एका समजुतीपाशी पोहोचण्याची गरज असते. 'मार्ग' या कथेची नायिका 'नमिता' हिला कथेच्या शेवटी सकारात्मक विचारांचा मार्ग मिळतो. 'समज' या कथेतली 'रेणू' आणि 'सुधा' ही पात्रे आपापली भूमिका शोधून जीवनाचा अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. आपल्या स्वतःच्या आयुष्यात असलेल्या कमतरतांमुळे दुसऱ्याचे दोष, उणीवा काढून असुरी आनंद घेण्याकडे मनाचा कल असलेली प्रतिमा. तसेच एखाद्या अमानुष प्रवृत्तीची नाती उघडपणे सांगायची नसतात हा धागा सापडलेली 'प्रतिमा', 'धागा' या कथेची नायिका आहे.

कथेच्या विकासक्रमाच्या मुद्याचा विचार करत आशाताईंच्या पहिल्याच कथासंग्रहापासून विकसित व परिपक्व कथा वाचकाच्या भेटीला येते. सानियांच्या कथा नंतरच्या काळात अधिक विकसित व परिपक्व झाल्याचे जाणवते.

## २) लेखनशैली

लेखकाची लेखनशैली ही त्याच्या अंतरंगाचा आरसा असते. कारण प्रत्येक साहित्यिकाची लेखनाची आकांक्षा जरी समान असली तरी ते प्राप्त करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. प्रत्येकाची स्वतंत्र वाट असते. मुख्य म्हणजे या लेखकांची लेखनशैली निरनिराळी असते आणि म्हणून वाचकाला त्याचे आकलनही वेगवेगळे होते. आशाताई आणि सानिया या समकालीन लेखिका आहेत. तरीही त्यांच्या कथांमध्ये, आशय-विषयाच्या लेखनामध्ये, मांडणीमध्ये फरक आहे.

### आशा बगे

आशा बगे यांची लेखनशैली साधी व सोपी आहे. सोपे लिहिणे किती अवघड हे लिहिल्यानंतरच समजते. आशाताई मात्र अगदी सहजतेने, वाचकाला समजेल असे लेखन करतात. त्यांचे लेखन अस्तित्ववाद किंवा स्त्रीवाद अशा कोणत्याही वादाचा पुरस्कार करत नाही. प्रयोगशीलतेची हौस त्यांच्या कथांना नाही. माणसामाणसातील

नातेसंबंधाचा शोध घेत, व्यक्तीच्या मनातील सूक्ष्म आंदोलनांचा मागोवा घेण्यात त्यांना आत्मीयता वाटते. आध्यात्मिक वृत्तीचे पडसाद त्यांच्या कथालेखनात उमटले आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर 'मारवा' या कथासंग्रहातील 'रुक्मिणी' या कथेचे देता येईल. ''वाळवंट, जिथे स्वतःच्या कर्माची पावले उमटत नाहीत असे निर्विकल्प ठिकाण.''[७]

आशा बगे यांचे संगीतविषयक प्रेम आणि शास्त्रीय संगीतात त्यांनी प्राप्त केलेली पदवी याची सर्व कथा साक्ष देतात. त्यांच्या कित्येक कथांमध्ये संगीताचे हे सूर आढळतात. भजनाच्या माध्यमातून दोन पिढ्यांमधील सूक्ष्म संघर्ष (मारवा), सतारीच्या सुरांमधून देवेंद्रच्या मनातील विषण्णता (रंग), नोकरी न करता संगीताला वाहून घेणारा रघुनाथ (अरण्य), कलेसाठी कोणतीही तडजोड मान्य न करणारा मास्तर (देणं) ही काही उदाहरणे सांगता येतील. 'मारवा', 'रंग', 'देणं' या कथांमधून हमीर, जोग, बिहाग, यमनकल्याण, गौड मल्हार अशा रागांचे संदर्भ मिळतात.

प्रभावी व्यक्तिचित्रण हे आशाताईंच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य सांगता येईल. उदा. 'निर्मोही' कथेतली 'कृष्णा', 'रुक्मिणी' मधली 'रेणू', 'घराचा रस्ता' मधील लहानगा 'नंदू' अशी कितीतरी उदाहरणे सांगता येतील.

आशाताईंच्या लेखनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची जबरदस्त निरीक्षणशक्ती. 'पाणी' या कथासंग्रहातील 'पाणी' या कथेत तर ती प्रभावीपणे जाणवते. कथा वाचत असताना आपण वाचक राहातच नाही. आपण कथेमधल्या बिल्डिंगचे रहिवासी कधी होतो हे कळतच नाही.

वऱ्हाडकडच्या रखरखीत उन्हाचे, बिल्डिंगचे व तिथल्या रहिवाशांचे वर्णन आशाताईंनी उत्तम रीतीने केले आहे. ते इतके वास्तवदर्शी आहे की कथेतील पात्र आपणच आहोत असे वाटू लागते.

''वऱ्हाडचं रणरणतं वैशाखी ऊन! एरवीची सगळी ऐसपैस माया आवरून घेतल्यासारखं, तटस्थ, अलिप्त. रस्त्यावरलं एकुलतं एक शिरीषाचं झाड बापुडवाणं निमूटपणे उभं. मधेच उगाच सडसडून फांद्या हलवत होतं. उन्हातली त्याची सावलीसुद्धा अगदी विरळ. त्याच्या सावलीत एखादं ढोरसुद्धा भर दुपारचं येऊन बसायला धजत नव्हतं. उष्ण, कढत झळांनी शिरीषाची चिमलेली फुलं तेवढी समोरच्या बिल्डिंगच्या पायऱ्यांवर, गॅलरीत पडलेली होती.''[८]

---

७. रुक्मिणी, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जून २००२, पृ. १६२

८. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १९२

आशा बगे यांच्या कथांमध्ये पाऊस नेहमी भेटतो.  पावसाचे आकर्षण त्यांच्या कथांच्या शीर्षकांमधून अनुभवायला मिळते.  उदा.  पाऊस, मुसळधार, एका पावसाळी संध्याकाळी, पूर ही शीर्षके.  कधी रिमझिम बरसणारा तर कधी पूर येऊन सर्वस्व वाहून नेणारा अशी पावसाची रुपे त्यांच्या कथांमधून दिसून येतात.

भारतीय परंपरेतील कर्मकांडाला त्यांच्या कथांमध्ये विशेष स्थान आहे.  विदर्भातील सरंजामशाही वातावरणाचे, कर्मकांडाचे चित्रण त्यांच्या कथांमधून येते.  त्या स्वतः परंपरेची जपणूक करणाऱ्या कुटुंबाचा एक घटक आहेत हे त्यांच्या वास्तवदर्शी लेखनातून समजते. परंपरा, कुळाचार, रीतीभाती, व्यक्तीच्या श्रद्धा, समजुती, कीर्तनपरंपरा, उत्सव याचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमधून दिसून येते.  एकीकडे परंपरेने चालत आलेल्या संस्कारांचा पगडा व दुसरीकडे बदलत जाणारी संस्कृती यामुळे निर्माण होणारी गुंतागुंत त्यांच्या कथांमधून त्यांनी लिहिली आहे.

१)  'नवस' या कथेतील 'रेवती' पंढरपूरच्या देवळात आपल्या मुलाची मुंज करायचे ठरवते.  तिने बोललेला नवस पूर्ण करण्यासाठी ती जाते.  एकीकडे तिची श्रद्धा आणि दुसरीकडे तिच्या कुटुंबियांचा या नवसाकडे बघण्याचा औपचारिक दृष्टिकोन यामुळे रेवतीची फरफट होते.

२)  'श्राद्ध' या कथेतल्या सुमनताईंना आपल्या पतीचे श्राद्ध व्हावे अशी इच्छा असते.  कामाच्या व्यापात त्यांच्या मुलांकडे इतका वेळ नसतो.  बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा त्या प्रयत्न करतात.  पण त्यांना त्यामध्ये स्वतःच्या तत्वांना, भावनांना मुरड घालावी लागते.

आशाताईंच्या लेखनशैलीचे एक वैशिष्ट्य म्हणजे कित्येकदा कथेचा शेवट झाल्यानंतर वाचक म्हणून आपण अधिक विचारप्रवृत्त होतो.  किंवा असे म्हणता येईल की कथेचा शेवट वाचल्यानंतर वाचक म्हणून आपण त्या कथेचा शेवट आपापल्या परीने करू लागतो.

१)  'मारवा' या कथासंग्रहातील 'जन्म' या कथेत कथेची नायिका एका मॅटर्निटी होमच्या समोर राहात असते.  तिला मूल जन्माला येणे या प्रक्रियेचे खूप आकर्षण असते.  हा जन्म सोहळा आपण प्रत्यक्ष बघावा अशी तिची खूप इच्छा असते.  पण प्रत्यक्षात चित्राच्या रूपाने हे सगळे अनुभवण्याची संधी तिला मिळते तेव्हा मात्र ती माघार घेते.  ती अशी विचित्र का वागते? याचे उत्तर आपले आपण शोधायचे आहे.  तिने घेतलेली माघार आपल्याला अस्वस्थ करते, एका विचित्र अस्वस्थतेला जन्म देते.

२)  'अत्तर' या कथासंग्रहाची शीर्षककथा अशाच प्रकारातली आहे. आशाताईच्या लेखन वैशिष्ट्याच्या खुणा या कथेतही सापडतात. रंगनाथ आणि रावसाहेब यांच्या मैत्रीची ही कथा आहे. सरंजामशाहीचे शाही वर्णन अनवट रागांचे उल्लेख आणि कथेचा शेवट वाचकावर सोडून देणे ही लेखनवैशिष्ट्ये या कथेत आहेत.

३)  'अत्तर' याचा कथासंग्रहातील 'निवडुंग' या कथेत कथेचा शेवट वाचकावर सोडून देण्याचे कसब आढळते. कथेचा शीर्षकाशी तादात्म्य पावणारा शेवट ज्याचा त्याचा वेगळा असू शकतो. आशाताई वाचकाला फक्त त्या प्रवाहापर्यंत घेऊन जातात. देऊस्करांकडे आश्रित म्हणून राहिलेली गायत्री घर सोडून जाताना विश्वासच्या खोलीकडे बघून नमस्कार करते, म्हणजे तिच्या मनातही विश्वासबद्दल प्रेम फुललेले असते का? पण ज्या घराने आपल्याला आसरा दिला त्या घराला त्रास होईल असे वागायचे नाही म्हणून ती त्याग करते का? या कथेच्या शीर्षकाचा असाही अन्वय लावता येईल की, निवडुंगासारखी वाढलेली गायत्री देऊस्करांच्या छत्रछायेचा त्याग करते व पुन्हा जोमाने उभी राहाते.

आशाताईंची लेखनशैली साधी व सोपी आहे. कथेचा वाचनानंतर दीर्घकाळ कथा मनात रेंगाळत राहाते. कथेचा शेवट वाचकावर सोडून देणे हे लेखन वैशिष्ट्य आहे. वाचकाने कथेचा शेवट ठरवणे आणि कथेचा अन्वयार्थ लावण्याइतकी सहजता त्यांच्या लेखनात आहे.

**सानिया**

सानियांच्या सगळ्या कथा अनुभवांशी निगडीत आहेत. 'संपादित सानिया' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात त्या म्हणाल्या होत्या, ''मी वाचकांना गृहित धरत नाही. माझ्याबरोबर वाचकांनीही विचार करावा, अशी माझी अपेक्षा असते. मी जो विचार करते असाच विचार माझ्या कथेतील व्यक्तीरेखाही करतात. जाणून घेण्याची अधीरता असल्याने बधीरपणाने जगणे मला मान्य नाही.''[१]

सानिया यांच्या या दीर्घ लेखनप्रवासात चिंतनशीलतेच्या खोलीबरोबरच त्यांची अभिव्यक्ती आणि शैली काळाबरोबर बदलत गेलेली दिसते. सुरूवातीच्या सत्यकथा कालखंडातल्या त्यांच्या कथा अनवट नात्यांची रहस्ये उलगडताना अधिक धूसर, काव्यात्म आणि क्वचित प्रसंगी काहीशा दुर्बोधितेकडे झुकतात. सानिया यांच्या सुरूवातीच्या अनेक

१. http://www.loksatta.com.pune-new/smpadeet-saniya-book-published by-milind bokil-397209#

कथा गुंतागुंतीची मांडणी, तुटक संवाद यामुळे वाचकावर जास्त जबाबदारी टाकतात. उदा. 'शोध' या कथासंग्रहातील 'आतंक' या कथेत एक कोणीतरी स्त्री कुठल्या तरी बसमधून कुणातरी रामबरोबर प्रवास करते आहे आणि बाहेर पाऊस पडतो आहे. बस मध्येच बंद पडते व सुरू होत नाही. ही कथा इतकी धूसर आणि अनाकलनीय होते की वाचकाला कशाचाच काहीच बोध होत नाही. दोघांचे नाते काय? ती नेमकी का अस्वस्थ आहे वगैरे कशाविषयी काहीच न सांगता कथा संपते. रामचे असंबद्ध वाटणारे आत्मनिवेदन, आजुबाजूच्या पर्यावरणाचे अत्यंत रहस्यमय वर्णन आणि सततची प्रतीकात्मता यामुळे वाचक निव्वळ चक्रावून जातो. नात्यांमधली अनाकलनीयता, निरर्थकता आणि तरीही एकमेकांची अटळता अशा आशयसूत्रांभोवती फिरणाऱ्या या कथा आहेत. सानिया फारच थोडे सांगतात आणि बरेच धूसर ठेवतात. प्रतिभावंत वाचकाला हे आव्हान आवडते. पण कथांच्या आस्वाद प्रक्रियेत अडथळा येतो.

सानिया यांच्या लेखनातील उल्लेख करण्याजोगी गोष्ट म्हणजे त्यांना स्त्रीवादी लेखिका असे जरी म्हटले तरी त्यांचे लेखन केवळ स्त्रीची बाजू मांडणारे निश्चितपणे नाही. स्त्रीवादी लेखनात स्त्रीच्या दुःखाला, घुसमटीला केवळ पुरुषच जबाबदार असतो असा सूर आळवला जातो. सानियांच्या लेखनात या विचाराला स्थान नाही. निखळ, खरे व प्रामाणिक लेखन सानिया करतात.

उदा. 'ओमियागे' या कथासंग्रहातील 'आमंत्रण' ही कथा. ध्येयवादी डॉक्टर असलेली सरिता कथेची नायिका आहे. तिचा नवरा जयतीर्थ कामाच्या निमित्ताने परदेशी जातो. कालांतराने तिची मुलगी निशीदेखील वडिलांकडे जाण्याचा निर्णय घेते. सरिता मात्र तिच्या परदेशी न जाण्याच्या विचारावर ठाम असते. घटस्फोट घेतलेला नसला तरी जयतीर्थ आणि सरिताचे नाते संपल्यातच जमा असते. सरिता जेव्हा तिला दिलेले परदेशी येण्याचे आमंत्रण स्वीकारून जाते, तेव्हा निशी आणि जयचे एक छान विश्व उभारलेले असते. सरिता ध्येयवादी असते, पण म्हणून जयतीर्थ चुकीचा नाही हे सानिया या कथेत सांगतात. वाचक म्हणून नकळत आपण जयची बाजू समजून घेतो. आपल्याच अहंकारामुळे नवरा आपल्यापासून दूर गेला आहे की काय? अशी जाणीव सरिताला होते. त्याच्या गुणदोषांसकट ती पुन्हा एकदा त्याच्या प्रेमात पडते. स्वतःकडून त्याला भारतात परतण्याचे आमंत्रण देते. या कथेत सरिता जयला स्वीकारून, आपल्या चुका सुधारून त्यांच्या नात्याला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न करते. समंजस व सकारात्मक शेवट होऊन कथा संपते.

नंतरच्या काळात सानियांची कथा वाचकप्रिय होत गेल्याचे दिसून येते. 'प्रतीती' या कथासंग्रहातील प्रतीती, अरण्ये, प्रवाह, पूल या कथा बदलत्या लेखनशैलीची साक्ष देतात. त्यांना वाचकापर्यंत जे पोहोचवायचे आहे ते अधिक सुस्पष्टपणे पोहोचवण्यात त्या यशस्वी होतात. उदा. 'प्रतीती' या कथासंग्रहाच्या शीर्षककथेतील नायिका 'चंदना' हिच्यामध्ये विचाराअंती झालेला सकारात्मक बदल. तिच्या स्वानुभवाने आलेली प्रचिती तिला योग्य मार्ग दाखवते. मोठे होणे म्हणजे आपल्याला नेमके काय हवे आहे हे स्वानुभवातून समजणे हा अर्थ सानिया या कथेतून मांडतात. चंदनाच्या अल्लड वयापासून तिला आलेल्या प्रगल्भतेपर्यंतचा मोठा पट 'प्रतीती' मध्ये दिसून येतो. या एकाच कथेत वेगळ्या स्वभावाच्या, वेगळ्या महत्वाकांक्षा असलेल्या स्त्रिया भेटतात. प्रत्येक स्त्री आपापल्या जागी योग्य आहे असे वाटते. कोणाला काय आवडावे? कोण आवडावे? कोणी कसे जगावे? याबाबत सरसकटपणे काहीही सांगता येत नाही. किंबहुना असे ठरवणे चूक आहे. हा विचार कथा वाचताना वाचकला मिळतो.

याविषयी सानिया म्हणतात, ''आपण विचार कसा करतो आणि लेखनातून बंध कसे उलगडतो हे महत्वाचे असते. ती अभिव्यक्ती करण्याचे, भाषा हे माध्यम आहे. ही अभिप्रेतता माझ्या आयुष्यात आणि लेखनात आहे. जगण्यामध्ये आणि आकलनामध्ये झालेला बदल लेखनातून उमटतो. विसाव्या वर्षी झालेले आकलन आणि चाळीसाव्या वर्षीचे आकलन यामध्ये प्रगल्भता निश्चित असते.''[१०]

सानियांच्या कथाविश्वात मोडलेल्या नात्यांच्या कथा तुलनेने जास्त आहेत. प्रेम हरवत चालल्याची, सुख बाहेरून मिळवण्याची धडपड, 'स्व' चा शोध या गोष्टी त्यांच्या कथांच्या केंद्रस्थानी आहेत. विशेषतः नवरा बायकोच्या नात्यात असलेले ताण, स्त्री-पुरुष समस्यांचे वेगवेगळे पैलू त्याच्या कथांमध्ये आहेत.

उदा. 'त्यानंतर' या कथासंग्रहात नवरा, मित्र, प्रियकर, मुलगा अशा नात्यांमधून सामोऱ्या येणाऱ्या पुरुषाची ओळख करून देणारी संवेदनशील स्त्री आणि तिचा प्रवास सानियांनी रेखाटला आहे. नवरा अचानक निघून गेल्यानंतर ठरीव प्रतिक्रिया न देणाऱ्या राधिकाची ही कथा आहे. ती स्वतःच्या सामान्य आयुष्याकडे बघताना स्वतःच्याच माणसांना नव्याने ओळखते. त्यातून तिला स्वतःची खरी ओळख होते. त्यामुळे मिळणाऱ्या सामर्थ्याने ती चकित होते. आत्मभान जागृत होत गेलेली स्त्री आणि तिचा प्रवास या दीर्घकथेमध्ये सानियांनी मांडला आहे.

---

१०. 'संपादित सानिया' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभातील मनोगत

निखळ, निर्मळ मानवी नात्यांचा शोध हे सानियांच्या लेखनाचे महत्वाचे लक्षण आहे. ‘ओमियागे’ या कथांच्या मालिकेत कथेची नायिका अनिता आणि जेसनची निखळ मैत्री आहे. पुण्यातल्या कॉलेजमध्ये शिकलेल्या व नंतर परदेशात स्थायिक झालेल्या अनिता या नायिकेची ही कथा आहे. मुक्तपणाच्या वेडापायी प्रियकर रजत याला ती गमावून बसते. परोपरकाच्या हौसेपायी आपल्यापेक्षा वयाने मोठा असणाऱ्या अपयशी बीजवराशी लग्न करते. कथेचा शेवट मात्र सूचक सकारात्मकतेमध्ये होतो. आधीच्या संभ्रमित नकारात्मकतेकडून सुस्पष्ट आणि वाचकाभिमुख सूचक सकारात्मकतेकडे सानियांचा प्रवास झालेला दिसतो. सकारात्मक स्वीकार नंतरच्या काळात सानियांनी केला आहे. पण हा स्वीकार तडजोड करायची असा नाही. त्या तडजोडीत स्वतःचा असा विचार आहे, नाईलाज नाही.

या बदलानंतरही सानियांच्या कथा निर्विवाद श्रेष्ठ ठरत नाहीत. कारण सानियांच्या कथांमध्ये नात्यांचा शोध आजूबाजूची परिस्थिती लक्षात न घेता केला जातो असे वाटते. ह्यांच्या कथेतली माणसे केवळ नाती उभारतात, मोडतात आणि या सगळ्याची बौद्धिक चर्चा करतात. त्यात आक्रस्ताळेपणा नसतो. सत्य तपासले जाते पण फक्त चर्चेतच. ‘आमंत्रण’ कथेतील जयतीर्थ परदेशात नेमके कोणते काम करायला जातो याचा तपशील सापडत नाही. ‘ओमियागे’ मधल्या मिचिकोच्या नवऱ्याची नोकरी जाते असा अस्पष्ट उल्लेख येतो. पण नेमकी सत्यता समजत नाही. ‘त्यानंतर’ मधली नायिका राधिका, नवरा अचानक निघून गेल्यानंतर, इतकी शांत कशी राहाते? असे अनेक प्रश्न वाचक म्हणून पडतात. या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. या कथा घडतात त्या केवळ चर्चेत, बोलण्यात आणि विचारात. प्रत्यक्ष जीवनात तसे घडतेच असे नाही. चिंतनातून नाती रचली, सांभाळली व मोडली जातात. पण नात्यासाठी फक्त हीच कारणे नसतात. त्यामुळे त्यांच्या कथा भुरळ घालतात पण परिपूर्ण वाटत नाहीत.

असे असले तरी सानियांची कथा सहजतेकडे वाटचाल करण्याचा प्रयत्न करते आहे. श्रेष्ठतेचा अट्टाहास त्यांच्या कथेला नाही. मनस्वी सानिया त्यांना मनापासून जे वाटते, भावते तेच लिहितात. समंजस स्वीकाराच्या वाटेवर त्यांची कथा चालते आहे.

उदा. ‘अशी वेळ’ या मार्च २०१० च्या कथासंग्रहातली शीर्षककथा ‘अशी वेळ’. कथेतील भावना, घटना, पात्र रोजचीच आहेत. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात या घटना घडतात. या कथेतील नायिका आपल्याला नेहमी भेटते. ज्येष्ठ नागरिकांच्या विस्मरणाच्या सवयीवर ही कथा भाष्य करते. ही कथा हलकेसे वळण घेऊन समंजस

जागी थांबते. ती पुढील प्रमाणे – ''अशी ही वेळ येऊन ठेपतेच आयुष्यात, की जेव्हा काही गोष्टी लक्षात येतात, काही येतच नाहीत.''

सानिया यांच्या कथालेखनात संवादाला अतिशय महत्व आहे. हा संवाद दोन पात्रांमधला आहे किंवा कित्येकदा स्वतःशी आहे. 'शोध' या कथासंग्रहातील 'पराभूत' या कथेतील रोहिणी. नाविन्याच्या ध्यासापोटी रोहिणी एका न संपणाऱ्या दुःखद वाटेवर स्वतःला नेते. या सगळ्यात तिची मानसिक फरफट होतेच. त्याचबरोबर ती श्रीधरचीदेखील (नवऱ्याची) फरफट करते. ती गरोदर असल्याचे कळताच वेडीवाकडी औषधे घेते व एका अपंग मुलीला जन्म देते. रोहिणी आणि वीणा (मैत्रीण) यांच्या संवादातून रोहिणी स्वतःची चूक कबूल करते. ती म्हणते, ''श्रीधरवर माझं प्रेम आहे गं वीणा. त्याच्यासाठी भांडून घरातून पळून जांण्याची धमकी देऊन तर मी त्याच्याशी लग्न केले. पण आता कळत नाही की, कधीकधी त्याचा द्वेष करावासा वाटतो. इतका की वाटतं हा अचानक मेला तर मला दुसऱ्या कुणाशी लग्न करता येईल पुन्हा आणि नवीन अनुभव मिळेल. मला असं वाटतं की; माझ्या आत अतिशय प्रखर, खरी पण कुरूप अशी एक व्यक्ती आहे. मी ही बाहेरून खोटी, नाटकी आणि खरं काय ते करावसं वाटलं की अगदी भीतीदायक वाटतं बघ.''[११]

या संवादातून नायिकेचा प्रामाणिकपणा सानिया सांगतात. वाचताना हे कितीही विचित्र वाटले तरी जे वाटते ते खरेपणाने सांगायचे धाडस सानियांच्या कथेतली नायिका करते. इतके खरे आणि स्पष्ट संवाद लिहिण्याचे धाडस सानिया करतात.

सानियांची लेखनशैली संवादात्मक आहे. कथेचा अन्वयार्थ समजून घेण्यासाठी वाचकाची भूमिका महत्वपूर्ण ठरते. जे आपण अनुभवले नाही ते जग पहाण्याची संधी सानियांची कथा देते.

### ३) **पात्रयोजना**

आशा बगे आणि सानिया यांच्या लेखनात स्त्री, पुरुष, वृद्ध, मुले, तरूण, किशोरवयीन अशी सगळ्या वयोगटाची पात्र आहेत. दोघींच्या कथालेखनात फरक आहे. कोणत्याही कथेतील पात्रे त्यांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेल्या जगात व्यवहार करत असतात. या दोघी स्त्री-लेखिका असल्याने त्यांचे कथानुभव स्त्रीनिष्ठ आहेत हे वेगळे सांगायची गरज नाही. कारण स्त्रियांच्या अनुभवविश्वात त्यांचे स्त्रीत्व झळकणारच.

---

११. पराभूत, शोध, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १९८

लिंगभेदाच्या पलिकडे जाऊन लिहिण्याचा प्रयत्न केला असला तरी स्त्री म्हणून अनुभवाच्या परिघात समाविष्ट होणाऱ्या कथांचे लेखन दोघींकडून मोठ्या प्रमाणात केले गेले आहे.

**आशा बगे**

आशा बगे यांच्या कथांमध्ये वेगवेगळ्या स्वभावधर्माची पात्रे आहेत. आई-मुलगी, मुलगी-वडील, पती-पत्नी, मित्र-मैत्रिण, मित्र-मित्र अशा नात्यांमध्ये बांधलेली पात्र आशाताईंच्या कथांमध्ये आहेतच. या व्यतिरिक्त वेगवेगळ्या स्वभावधर्मांची पात्र त्यांच्या कथांमध्ये समाविष्ट आहेत. 'पांगळी' या कथेत प्रसिद्ध लेखक आणि नवोदित लेखिका या पात्रांचा समावेश केला आहे. 'पांगळी' या कथेत आप्पासाहेब या प्रसिद्ध लेखकाच्या मनातला संघर्ष आशाताईंनी दाखवला आहे. कल्याणी या नवोदित लेखिकेमधल्या गुणी लेखकेला प्रोत्साहन न दिल्याने आप्पासाहेब मनातल्या मनात स्वतःला दोष देतात. ती त्यांच्यापेक्षा चांगले लिहू शकते या असूयेपोटी ते तिच्याशी विचित्र वागतात. कल्याणी आप्पांच्या आधाराने लेखन क्षेत्रात आपले पाय रोवण्याचा प्रयत्न करते, पण कथेच्या शेवटी तिच्या आधाराशिवाय आप्पाच पांगळे असण्याचा अनुभव घेतात.

भिन्न विचारसरणी असली तरी मैत्रीचे बंध जुळू शकतात हे 'मैत्रिण' या कथेत आशाताई सांगतात. कथेची नायिका आणि मिसेस मिश्रा या पात्रांच्या आधारे मैत्रीच्या नात्याचे वेगळे पदर त्यांनी उलगडून दाखवले आहेत. काही वेळा अगदी भिन्न परिस्थितीतली, भिन्न स्वभावाची दोन माणसेदेखील एकमेकांच्या सुख-दुःखाचा विचार करतात. अशाच वेगळ्या पात्रयोजनेची रचना करून 'मैत्रीण' ही कथा लिहिली आहे. स्वतःच्या विचारांवरून इतरांचे मूल्यमापन करू नये हा विचार या पात्रांच्या आधारे आशाताई मांडतात.

आशाताईंची 'पाहुणा' कथा तर वाचक म्हणून श्वास रोखायला लावते. कथा वाचतानाच प्रसंग डोळ्यासमोर उभा राहातो. 'पाहुणा' या कथेत नरसप्पा या धाडसी तरुणाचे पात्र आशाताईंनी रेखाटले आहे. त्याच्या तोडीसतोड असलेला विषारी नागसुद्धा या कथेचे एक पात्रच बनते. नरसप्पाचा त्या नागाला मारण्यासाठी असलेला जोश थक्क करतो. इतका आटापिटा करून तो नागाला मारण्याच्या प्रयत्न करतो. त्यात यशस्वी होतो. पण कथेच्या शेवटी नरसप्पाचा मृत्यू चटका लावतो. 'पाहुणा' या कथेत कथेचा नायक नरसप्पा आहे आणि विषारी नागदेखील कथेचा भाग आहे. भर मध्यान्हीला दुरून

आलेले हे पाहुणे वस्तीलासुद्धा थांबत नाहीत असा उल्लेख आशाताई करतात. जिद्दी असणे चांगले पण त्याचा अतिरेक नाशाला कारणीभूत ठरतो असे नरसाप्पा या पात्राच्या आधारे आशाताई सांगतात. संवाद नसलेली ही कथा पात्रयोजनेच्या आधारे दीर्घकाळ लक्षात राहाते.

'मांडव' या कथासंग्रहातील 'ठग' या कथेत 'कल्लू' हे उत्तरप्रदेशातील पात्र आशाताईंनी सुरेख रंगवले आहे. सुरूवातीला पूर्वग्रहदूषित नजरेने कल्लूकडे आपणही बघतो. कथेच्या शीर्षकावरून तर असे वाटते की हा कल्लूच ठग म्हणजे फसवणारा वाटतो. पण पत्यक्षात कथा वाचल्यानंतर लक्षात येते की कल्लू फसवत नाही. कल्लू या पात्राला एका वेगळ्या पद्धतीने आशाताईंनी रंगवले आहे. कथेच्या शेवटी तर परप्रांतीय असूनही कल्लूची दया येते. बनारसचे वातावरण आणि कल्लू यामुळे बनारस फिरल्याचा आनंद मिळतो.

'चंदन' कथासंग्रहातील 'वर्तमान' या कथेमध्ये 'अभिराम' या पात्राच्या सहाय्याने भविष्यातल्या आनंदासाठी वर्तमान गमावण्याची वृत्ती दाखवली आहे. सिव्हील इंजिनियर असूनही नोकरी नसल्याने खचलेला अभिराम ते आपल्याच मस्तीत, कशाचीही फिकीर न करणारा, तत्वांना मुरड घालणारा अभिराम असा त्याचा प्रवास या कथेत रेखाटला आहे. यश मिळविण्यासाठी वाट्टेल ते करणाऱ्या, सगळे असूनही काही नसणाऱ्या अभिरामचे वर्तमान या कथेत आशाताईंनी उत्तम पद्धतीने मांडले आहे. 'अनंत' या कथासंग्रहातील आशाताईंची मला सर्वात जास्त आवडलेली आणि डोळ्यात अश्रू आणणारी कथा म्हणजे 'घराचा रस्ता'. तिसरीत शिकणारा नंदू, त्याची शाळा, त्याचे इवलेसे जग आणि त्याच्या जीवनातले सर्वात मोठे दुःख आशाताईंनी सुंदररित्या लिहिले आहे. 'नंदू' या निरागस बालकाच्या रूपात ही कथा एक वेगळीच अनुभूती देते. 'नंदू' या पात्राच्या आधारे आशाताई वाचकाचे मन हेलावून टाकतात. संयमीपणे लिखाण करून आशाताईंनी नंदूची आई आणि सरांचे संबंध दाखवले आहेत. या सगळ्याकडे नंदू जसा पहातो ती दृष्टी दाखविण्यात आशाताई यशस्वी होतात. नंदूच्या आईच्या मृत्युनंतर त्याचे काय होईल? या विचाराने मन सुन्न होते. 'दर्पण' या कथासंग्रहाच्या शीर्षककथेत 'सरूताई' या पात्राच्या आधारे आत्मशोध घेतल्याने वाईट वृत्ती चांगल्या वृत्तीत बदलू शकते हे आशाताई दाखवतात. सुधाताई नरगुंदकरांकडे घरकाम करणाऱ्या सरूताई वैयक्तिक दुःखामुळे विचित्र वागत असतात. सुधाताई मात्र त्यांच्याशी चांगल्याच वागतात. वरवरच्या दर्पणात न पहाता मनाच्या खऱ्या दर्पणात सरूताई स्वतःला बघतात आणि बदलतात. अशा

दर्पणात पहाण्याची शिकवण 'सरूताई' या पात्राच्या आधारे आशाताई देतात.

'प्रतिद्वंद्वी' या कथासंग्रहातील 'निर्मोही' कृष्णा हे पात्र आशाताईंनी अप्रतिमरित्या उभे केले आहे. प्रपंचात राहूनही कशाचाही मोह न होणे ही अध्यात्मिक पातळीतील सर्वोच्च अवस्था आहे. 'निर्मोही' कथेमधल्या कृष्णाला कोणतेही प्रयत्न न करता ही अवस्था प्राप्त झाली आहे. कथा वाचताना वाचक म्हणून आपल्याला कृष्णेच्या असे निर्मोही असण्याचा हेवा वाटतो.

'पाणी' या कथासंग्रहात 'मादी' या कथेत पती-पत्नी या नात्यातले हळूवार बंध आशाताई 'विभावरी' या पात्राच्या आधारे दर्शवतात. विभाला तिचा नवरा अविनाश याच्याविषयी ओढ का वाटत नाही याचा तिला खूप त्रास होत असतो. मैत्रीणीचा अनुभव ऐकल्यानंतर तिच्यातली मादी अविनाशच्या स्पर्शासाठी आतुर होते. इतके दिवस अनोळखी वाटणारे अविनाशचे जग तिला ओळखीचे वाटू लागते. त्याच्यापासून दूर पळणारी विभावरी त्याच्या स्पर्शाने मोहरून जाते. नवीन लग्न झालेल्या स्त्रीचे भावबंध, मनातले विचार व भावना याचे वर्णन आशाताई 'विभावरी' या पात्राच्या साहाय्याने उत्तम पद्धतीने करतात.

वरील सर्व कथांच्या उदाहरणांमधून आपल्याला असे दिसून येते की आशाताईंच्या कथांमध्ये त्यांनी वेगवेगळ्या स्वभावधर्माची, वेगवेगळ्या वयोगटातली, वेगवेगळ्या आर्थिक गटातली पात्रे लिहिली आहेत. या पात्रांच्या साहाय्याने आशाताई त्या पात्रांच्या मनातला संघर्ष, विचार व भावना आपल्यापर्यंत पोहोचवतात. या पात्रांमुळे वाचक म्हणून आपण विचारप्रवृत्त होतो. अंतर्मुख होऊन विचार करायला लागतो.

**सानिया**

सानिया यांच्या कथालेखनात घटनाप्रधान पात्रयोजना दिसून येते. प्रधान व्यक्तीरेखेबरोबर इतर पात्रांचे चित्रणही तितक्याच उत्कटतेने सानिया करतात. स्त्री म्हणून लिहिलेल्या कथांमध्ये स्त्री व्यक्तीरेखा प्राधान्याने येतात. मात्र स्त्री पात्रांसोबत इतर पात्रांची गुंफणही मुख्य पात्रास पूरक अशी केली आहे. सानियांच्या कथांमध्ये वेगवेगळ्या स्वभावाच्या पात्रांपेक्षा प्रेमाचे त्रिकोण, घटस्फोट, विवाहबाह्य संबंधातून निर्माण झालेली नाती ही पात्रे प्रामुख्याने दिसून येतात. पात्रांची संख्या जास्त असते. अंतर्मनाशी संवाद करणारी पात्रे त्यांच्या कथांमध्ये आहेत. 'स्वगत' हा प्रकार प्रामुख्याने आहे. त्यांच्या कथांमध्ये उच्चमध्यमवर्गीय पात्रे अधिक आहेत. सुशिक्षित, बुद्धीमान, आत्मनिर्भर स्त्रिया

त्यांनी रंगवल्या आहेत. दलित, ग्रामीण स्त्री त्यांच्या कथांमध्ये आढळत नाही.

सानियांच्या लेखनाच्या सुरूवातीच्या काळातल्या ‘शोध’ या कथासंग्रहातील ‘जन्म’ ही कथा अंतर्मनाशी संवाद करणारी आहे. कथेच्या नायिकेला आत्मविष्कार घडल्याची जाणीव या कथेतून सानियांनी प्रभावीपणे मांडली आहे. मनातले सगळे व्यक्त केल्याने स्वतःच्याच सामर्थ्याची जाणीव होऊन दुःखमुक्त झालेली नायिका या कथेत आहे. स्वतःच्या मनातल्या विचारांना वाट मोकळी करून दिल्याने स्वतःला जाणून घ्यायला मदत होते, हा अनुभव म्हणजे ‘जन्म’ ही कथा. या कथेची नायिका आपल्यामध्येही आहे. आपल्याला जाणवणाऱ्या अनेक गोष्टी समारेच्याला कळत नाहीत. पण म्हणून त्या सगळ्या भावना व्यर्थ नसतात. असा आत्मविष्कार या कथेत सानिया यांनी दाखवला आहे. जाणीवेपासून नेणीवेपर्यंतचा हा प्रवास म्हणजे ‘जन्म’. आपल्यामध्ये दडलेल्या ‘मी’ शी साधलेला संवाद म्हणजे ‘जन्म’.

‘शोध’ याच कथासंग्रहातली ‘इंप्रेशन’ ही कथा आत्मसंवादी कथाप्रकारातली कथा आहे. ही कथा कथेच्या नायिकेचा मनाशी चाललेला संवाद व वास्तव यांची सांगड घालते. तसेच ही कथा या दोन्ही विचारांचा संबंध असेलच असे नाही हेदेखील सांगते. या कथेत आजुबाजूच्या परिसरातील हसरी मुलगी, मीना कुमारीचा उदास पण सुंदर फोटो, रमाची घुसमट, जांभळी फुले असलेला पडदा, क्लब हाऊस दंगल या सगळ्याची सांगड कथेतल्या पात्राच्या विचारांशी घातली आहे. यावरून कथेच्या नायिकेची मनःस्थिती दाखवण्याचा एक वेगळा प्रयत्न केला आहे. कथेमध्ये पात्र एकच आहे, ते म्हणजे कथेची नायिका, आजुबाजूच्या वस्तू, व्यक्ती यांचा संबंध जोडला आहे. तसे पाहिले तर कथेच्या नायिकेशी या सगळ्याचा संबंध आहेच असे नाही. खऱ्या आयुष्यातही कित्येकदा आजुबाजूच्या परिस्थितीचा काहीही संबंध नसताना आपण उगाच अर्थ लावत बसतो आणि आपल्या विचारांवर, मनावर इंप्रेशन पाडतो.

‘शोध’ या कथासंग्रहात ‘रिच्युअल’ या कथेत आपल्याच मनाशी, ‘स्व’शी पत्राच्या माध्यमातून साधलेला संवाद म्हणजे ‘रिच्युअल’ ही कथा. मनातले विचार दुसऱ्या कोणाला सांगण्यापेक्षा पत्राच्या माध्यमातून स्वतःलाच सांगणारी नायिका या कथेत आहे.

‘खिडक्या’ या कथासंग्रहातील ‘शिल्लक’ ही कथा वाचताना नायिकेची डायरी वाचत असल्याचा अनुभव येतो. मनातल्या गोष्टी वेळेत न सांगितल्याने शिल्लक काहीच राहात नाही असा अनुभव या कथेची नायिका सांगते.

‘खिडक्या’ या कथासंग्रहातील ‘हिवाळ्यातला पहिला दिवस’ ही कथा प्रा. बर्वे या एकाच पात्राभोवती फिरते. आपल्याच मनातल्या विचारांनी अस्वस्थ होणारे आणि आपल्याच मनाला समजावणारे प्रा. बर्वे हे एकच पात्र कथेत आहे. ‘भूमिका’ कथासंग्रहातली ‘प्रतिभा’ ही कथा कथेच्या शीर्षकावरूनच लक्षात येते. नायिकाप्रधान पात्र असलेली कथा मनाला भावते. या कथेत सगळ्या अनुभवानंतर नात्यांमधला फोलपणा कळूनही समर्थपणे जगण्याची ऊर्मी देणारे ‘स्वगत’ प्रेरक वाटते.

‘‘आपलीच जन्मदात्री आई, वडील, बहीण, मैत्रीणी आणि तरीही ही सगळी निरुपयोगी कर्तव्यच न संपणारी, एकातून एक निघत राहाणारी आणि त्यापलीकडे आपल्याच आयुष्यातून उलगडून बाहेर पडत जाणारा गुंता आणि त्या गुंत्याच्या शेवटी अत्तरासारखं एक अस्तित्व.....भेट नाही, संवाद नाही, संपर्काची शक्यता नाही, पण केवळ ‘असण्याची’ आश्वासकता.’’[१२]

सानिया पात्रांच्या स्वगतातून त्यांच्या मनाची स्थिती वर्णन करतात. बऱ्याच गोष्टी दुसऱ्यांना सांगण्यापेक्षा स्वतःला सांगणेच हितकारक असते असे त्यांच्या कथांमधील बहुतांश नायक, नायिकांना वाटते. स्वतःच्या मनातले प्रश्न आपले आपण सोडवावेत अशा स्वतंत्र विचारांची पात्रे सानियांनी रंगवली आहेत.

‘भूमिका’ या कथासंग्रहातली ‘लिक्विड क्लिनर’ या कथेची नायिका मुक्ता आपल्या प्रश्नांवर स्वतःची अशी उत्तरे मिळवते. मनातल्या मळलेल्या विचारांवर मनाचेच लिक्विड क्लिनर वापरणे गरजेचे असे असा वेगळा संदेश या कथेची नायिका मुक्ता देते.

‘भूमिका’ या कथासंग्रहातील ‘स्वदेशी’ या कथेत ‘माधव’ हा कथेचा नायक आहे. एकटे राहाण्याच्या हट्टापायी तो कुटुंबापासून दूर राहातो. पण त्याच्या घरामधली इतर मंडळी स्वतःच्या वागण्यातून माधवचे विचार बदलवायला भाग पाडतात.

‘प्रयाण’ या कथासंग्रहातील ‘रजू’ लिहिते..... या कथेत डायरीच्या माध्यमातून रजूच्या मनातली आंदोलने शब्दबद्ध केली आहेत. एकमेकांना समजून न घेता, स्वतःला काय वाटते आहे याला महत्त्व देऊन कथेतली सगळीच पात्रे एकमेकांशी विचित्र वागतात. आयुष्यात कितीही विचित्र, अनाकलनीय प्रसंग आले तरी पुढे जावेच लागते हा संदेश या कथेची नायिका रजू देते. कोणत्याही मोठ्या गोष्टीचा बाऊ न करता येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची कला रजू शिकवते.

‘प्रयाण’ या कथासंग्रहातील ‘जाग’ या कथेत, कथेची नायिका यशोदा तिला

१२. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ४०

पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना 'स्व'चा शोध कसा घेते हे सानियांनी दाखवले आहे. आपलाच आपल्या मनाशी झालेला संवाद आणि त्यातून मिळणारी उत्तरे यशोदा या पात्राच्या द्वारे दाखवणे हे कथेचे वैशिष्ट्य आहे. 'मनाचिया घावावरी, मनाची फुंकर' या ओळी या कथेच्या बाबतीत चपखल बसतात. अशी वेळ या कथासंग्रहातली 'फक्त गृहिणी' ही कथा एका सर्वसामान्य गृहिणीची आहे. गृहिणी म्हणून तिला वाटणारी व्यथा, वेदना सानियांनी या कथेतून मांडली आहे. कथेची नायिका आपल्या मनाशी संवाद साधतच मनातला न्यूनगंड दूर करते. फक्त गृहिणी असल्याने तिला नैराश्य आलेले असते. या नैराश्यावर ती स्वतःच मात करते. ती फक्त गृहिणीच नाही तिचे असे अस्तित्व आहे हे तिच्या लक्षात येते. 'अशी वेळ' या कथासंग्रहातील 'स्वगत' ही कथा तर 'स्वगत' या लेखनप्रकाराचा उत्कृष्ट नमुना आहे. स्वगत म्हणजे मनाचा मनाशी साधलेला संवाद. एका वेळी मनातल्या दोन पुरुषांशी साधलेला संवाद या कथेत आहे. कळणे आणि आकळणे यामधील प्रक्रिया म्हणजे 'स्वगत' ही कथा.

स्वान्तसुखाय लेखन करणाऱ्या सानिया यांच्या लेखनात पात्रयोजना कमीत कमी आहे. बऱ्याच कथांमध्ये स्वगत या प्रकाराचा समावेश जास्तीत जास्त आहे. कथांमध्ये प्रधान व्यक्तिरेखा कथेची नायिका किंवा नायक असतो. त्यांचा मनाशी संवाद हे बऱ्याच कथांमध्ये आढळते. सानियांच्या कथांमधील तरुण व मध्यमवयीन पात्रांना सतत काही ना काही प्रश्न पडतात. ही पात्रे नात्यांचा शोध घेतात.

### ४) कथेच्या शीर्षकाचा अन्वयार्थ

आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांनी आपापल्या अनुभव विश्वाला समर्थपणे शब्दबद्ध केले आहे. दोघींनी स्त्रीचे भावविश्व मांडले आहे. स्त्री म्हणून या सगळ्याकडे वेगळ्या संवेदनशीलतेने दोघी बघतात असे कथा वाचताना जाणवते. सहाजिकपणे स्त्रीनिष्ठ अनुभव कथेमध्ये आहेत. कथेचे शीर्षक वाचून कथेचा गाभा कळावा असे अपेक्षित असते. पण काही लेखक कथेचे शीर्षक आणि कथा याची सांगड घालण्याची जबाबदारी वाचकावर टाकतात. आशा बगे आणि सानिया यांच्यामधला मुख्य फरक म्हणजे आशा बगे यांच्या कथेच्या शीर्षकाचा कथेशी अन्वयार्थ लावणे वाचक म्हणून तितके अवघड नाही. पण सानिया यांच्या कथांची शीर्षक आणि कथा यांची सांगड घालणे आव्हानात्मक आहे.

**आशा बगे**

आशा बगे यांच्या कथांमध्ये संगीत हा विषय प्रामुख्याने येतो. इतकेच नव्हे तर त्यांच्या कथांच्या शीर्षकामध्येही संगीत आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास 'मारवा' या शीर्षककथेचे देता येईल. कथेमध्ये वेगवेगळ्या भावनांसाठी त्या त्या रागांचा उल्लेख आशाताई करतात. 'मारवा' हे शीर्षक वाचल्यानंतर कथेमध्ये संगीताची पार्श्वभूमी असणार याची कल्पना येते. कथा वाचल्यानंतरही 'मारवा' हे शीर्षक मनाला भावते. संगीत हा आशाताईंचा आवडता विषय आहे. मारवा हा राग दिवसाच्या अंतिम प्रहरी गायला जातो. या कथेत आबांच्या आयुष्याची सायंकाळ झाली आहे. त्यामुळेच 'मारवा' हे शीर्षक योग्य वाटते. मारवा या रागातली हुरहुर, आतुरता या कथेत स्पष्टपणे जाणवते. सगळे काही मिळाले असतानाही मनात दाटलेली हुरहुर व्यक्त करणारा मारवा मनाच्या तारा छेडतो. 'मारवा' या रागाचा स्वभाव लक्षात आल्यानंतर कथा समजायला अधिक सोपे जाते.

'ऋतुवेगळे' या कथासंग्रहातील 'मल्हार' या कथेच्या नावातच आशाताईंच्या आवडीच्या शास्त्रीय संगीताची झलक आहे. कथेत शास्त्रीय संगीतातल्या रागांची आणि मानवीय भावनांची सुरेख गुंफण घातली आहे. एखाद्या रागात महत्त्वाच्या सुरांना वादी संवादी म्हणतात. त्यांच्याशिवाय तो राग ओळखताच येत नाही. या सुरांना जितके महत्व असते तितकेच महत्व वर्ज्य स्वरांना असते. तसेच आपल्या आयुष्यात आवश्यक आणि अनावश्यक गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या असतात. त्यामुळे एखादी गोष्ट घडूच नये असे वाटत असले तरी ते घडणेही आवश्यक असते असा संदेश ही कथा देते. शीर्षकाशी अनुरूप विवेचन आशाताई करतात.

'मारवा' या कथासंग्रहातील 'बेईमान' या कथेचे शीर्षकही कथा वाचल्यावर अनुरूप वाटते. मानवी मनाचा विलक्षण खेळ या कथेत आहे. सुख, दुःख हा आपल्याच मनाचा खेळ आहे असे या कथेत सांगितले आहे. आज तीव्रतेने त्रास देणारी गोष्ट उद्या अस्तित्वात राहू नये इतके मन बेईमान असते हे 'माधवी' या नायिकेच्या विचारांमधून आशाताई दाखवतात.

'प्रतिद्वंद्वी' या कथासंग्रहातील 'दुसरा' या कथेत 'कार्तिक' या पात्राच्या आधारे आपल्यामध्ये लपलेल्या दुसऱ्याचे विचित्र वागणे आशाताई अधोरेखित करतात. आपल्या मनात येणारे सगळेच विचार आपले नसतात. वरवर पहाता अशक्य वाटणारा हा विचार आहे. पण कित्येक वेळा असे लक्षात येते की एखाद्या व्यक्तीच्या स्वभावापेक्षा खूप

वेगळे वर्तन त्या व्यक्तीकडून होते. कार्तिकच्या मनातले बदलणारे विचार, त्याच्या मनातल्या भावना आशाताईंनी व्यक्त केल्या आहेत.

आशाताईंच्या सगळ्याच कथांची शीर्षके कथा वाचल्यानंतर योग्यच वाटतात. अपवाद म्हणून एक व दोन कथांचा उल्लेख करावा लागेल. एक म्हणजे 'ऋतूवेगळे' या कथासंग्रहातील 'शिल्प' ही कथा. ही कथा मनोविश्लेषणात्मक भूमिकेतूनच लिहिली आहे. वेगळ्या तऱ्हेने कथेचे लेखन केले आहे. कथेच्या शीर्षकाची समर्पकता पटण्यासाठी कथा नीट समजून घ्यावी लागते. आशाताईंच्या इतर कथा वाचकाच्या मनाचा वेध घेतात. ही कथा शीर्षकाशी जुळवून घेताना विचार करावा लागतो.

अशीच आणखी एक कथा म्हणजे 'मांडव' या कथासंग्रहातील 'साक्षी' ही कथा. साक्षी म्हणजे एखादी घटना घडत असताना त्यामध्ये हस्तक्षेप न करता बघणे. स्टेशनमास्तर पांड्या हे या कथेत साक्षीदार आहेत. अपघातात आश्रय दिलेल्या मुलीला घ्यायला येणारे नायडू कोण? स्टेशनमास्तर पांड्या तिला त्यांच्याकडे सुपूर्त करताना हवालदिल का होतात? याचा आणि कथेच्या शीर्षकाचा अन्वयार्थ लावणे थोडे कठीण जाते.

या सर्व उदाहरणांवरून असे लक्षात येते की, आशा बगे यांच्या कथांची शीर्षके त्यांच्या कथांशी सुसंगत आहेत. अपवादात्मक शीर्षक सोडले तर सगळ्या कथा वाचल्यानंतर त्या कथेच्या शीर्षकाचे महत्त्व लक्षात येते. कथा वाचून झाल्यानंतर शीर्षकाची समर्पकता पटते.

**सानिया**

सानिया यांच्या कथा वाचकाला विचार करायला भाग पाडतात. कथा एकदा वाचून ती तिच्या सगळ्या गुणांसकट पसंतीस पडतेच असे नाही. आत्मनिर्भर आणि स्वतःला हवे असलेले मिळवणारी स्त्री वाचक म्हणून मनाला भावते. कथेचे शीर्षक कथेच्या अन्वयार्थाशी जुळवून घ्यावे लागते असा अनुभव काही कथांच्या बाबतीत येतो. प्रत्येक लेखक स्वान्तसुखाय लेखन करतोच असे नाही. सानिया कोणत्याही व्यावसायिक हेतूने लेखन करत नाहीत. मनातली आंतरिक प्रेरणा लेखनासाठी प्रवृत्त करते. त्यांनी मनात आलेले सगळे कढ जसेच्या तसे उतरवले आहेत असे दिसून येते. कथेची शीर्षकेदेखील त्या त्या वेळेच्या भावनिक मनःस्थितीप्रमाणे दिली आहेत असे वाटते. एखादी कथा पूर्ण करायची आणि तिला शीर्षक द्यायचे, ते समर्पकच असावे, वाचकाला

त्यातून संदेश मिळाला पाहिजे असे हट्ट त्यांच्या लेखनात नाहीत. काही कथांची शीर्षके इंग्रजीतून देखील आहेत. शहरीकरणाचा प्रभाव यातूनही जाणवतो.

'शोध' या कथासंग्रहातील 'रिच्युअल' या कथेचे शीर्षक वाचल्यानंतर असा विचार मनात येतो की एखाद्या जुन्या परंपरेवर आधारलेली कथा असेल. पण कथा वाचल्यानंतर 'सुमित्रा' या पात्राच्या आधारे सानिया एका वेगळ्याच परंपरेविषयी बोलत आहेत असे जाणवते. शिरीष नावाच्या संवेदनशील लेखकावर तिचे प्रेम असते. पण तिचे वडील हे लग्न होऊ देत नाहीत. ठराविक साचेबद्ध आयुष्य जगणे सुमित्राला आवडत नसते. स्वतःच्या मनासारखे, मुक्तपणे जगणाऱ्या सुमित्राला कोणतीही तक्रार न करता दुसऱ्याच कोणाशी तरी लग्न करावे लागते. वसुदेवशी लग्न करून ती या परंपरेचा भाग बनते. मनाविरूद्ध या परंपरेचा भाग बनल्याने ती कोरडी होते.

'प्रतीती' या कथासंग्रहातील 'अरण्ये' या कथेचे शीर्षक वाचल्यानंतर कथेमध्ये नेमक्या कोणत्या अरण्याचे वर्णन असेल, कथेचा आशय काय असेल, हा विचार वाचक म्हणून आपण करतो. पण कथा वाचल्यानंतर लक्षात येते की मनातल्या विचारांच्या, भावनांच्या अरण्यात अडकलेली पात्रे आणि कथासूत्र या कथेत आहे. ही अरण्ये आहेत मनातलीच, मनातल्या भावनांची, गुंतून पडलेल्या नात्यांची. या अरण्यात अडकून पडलेली पात्रे या कथेत आहेत. अपघाताने अपंग झालेला जगदीश, सगळे असूनही निराश झालेली करूणा, स्वतःचे उध्वस्त अंतर्मन सांधू न शकणारी पद्मा आणि आपल्या विचारांवर ठाम राहून एकमार्गी चालणारा जय आपापल्या मनातल्या अरण्यांमध्ये स्वतःच्या आयुष्याचा मार्ग शोधतात. 'ओमियागे' या कथासंग्रहाची शीर्षककथा दीर्घकथेचा उत्तम नमुना आहे 'अनिता' या कथेच्या नायिकेचे स्वतंत्र जीवन मनाला भुरळ घालते. ओमियागे हा जपानी शब्द आहे. ओमियागे म्हणजे भेटवस्तू हे कळल्यानंतर कथेचा अर्थ समजायला मदत होते. जेसन आणि अनिताची मैत्री, अनिताचा मोकळा स्वभाव या सगळ्या कथेच्या जमेच्या बाजू आहेत. मात्र 'ओमियागे' या शीर्षकाचा अन्वयार्थ लावण्यासाठी ओमियागे या शब्दाचा मराठी अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. 'अशी वेळ' या कथासंग्रहातील 'कंगवे' या कथेतून सानिया यांनी एक वेगळा विचार मांडला आहे. एकंदरीत जीवन कोणासाठी थांबवून चालत नाही हाच तो विचार. 'कंगवे' ही कथा रोजच्याच आयुष्यातला एक साधा प्रसंग आहे. आज असणारी परिस्थिती उद्या असेलच असे नाही. पण जीवन चालूच राहाते. कथा समजायला साधी सोपी आहे. मात्र या कथेचे शीर्षक 'कंगवे' का दिले असेल हे समजत नाही.

सानिया यांच्या कथा वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावतात. सुरूवातीच्या काळातल्या धूसर, दुर्बोध कथा नंतर सुस्पष्ट होत गेल्या आहेत.

## ५) कुटुंबसंस्थेविषयी दृष्टिकोन

आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांच्या बाबतीत सर्वात महत्त्वाचा विरोध याच मुद्यात आढळतो. आशाताईच्या कथांमध्ये कुटुंबवत्सल, चौकट न मोडणारी स्त्री आढळते. 'मांडव' सारखी अपवादात्मक कथा सोडली तर कुटुंब जपणारी स्त्री मोठ्या प्रमाणात आहे. प्रभावी व्यक्तीचित्रण हे लेखनवैशिष्ट्य आहे. कथेतील स्त्रिया भारतीय परंपरेतील नैतिक मूल्यांची जपणूक करणाऱ्या आहेत. धीट, बुद्धिमान, समंजस, बंडखोर परंतु चौकट न तोडणाऱ्या आहेत. तोडण्यापेक्षा जोडण्याकडे कल असणारी स्त्री-पात्रे अधिक आहेत. स्त्रीमुक्तीच्या कल्पनांनी भारावून अतिरेकी वर्तन करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथांमध्ये आढळत नाहीत. कुटुंब जोडून, त्याग करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथांमध्ये आहेत. आहे त्या कौटुंबिक परिस्थितीचा कितीही त्रास झाला तरी सुवर्णमध्य काढणाऱ्या स्त्रिया अधिक प्रमाणात आहेत.

### आशा बगे

'अत्तर' या कथासंग्रहातली 'निवडुंग' कथेची नायिका आश्रित म्हणून देऊस्करांकडे राहात असते. त्या घरातला विश्वास तिच्यावर प्रेम करतो आहे हे तिला समजते. मात्र ती आपली मर्यादा न सोडता तिथे राहाते. तिच्या मनात विश्वासविषयी प्रेम फुलल्याची पुसटशी जाणीव आशाताई करुन देतात. पण गायत्री त्या घराला सोडण्याचा निर्णय घेते. ज्या घराने आसरा दिला त्या घराला त्रास होईल असे वागायचे नाही असा निश्चय करून स्वतःच्या सुखाचा ती विचार करत नाही.

'ऋण' या कथेतली नंदिनी येणाऱ्या प्रत्येक संकटावर खंबीरपणे मात करते. आहे त्यात आनंदी राहाण्याची कला नंदिनीला अवगत असते. नंदिनीवर आलेल्या संकटात तिचा मित्र कौस्तुभ तिला मदत करतो. हे ऋण नंदिनी फेडते. कौस्तुभची पत्नी चारू ती पैसे परत करेल की नाही यावर शंका घेते. पण नंदिनी त्यांच्या वागण्याचा ताण मनावर घेत नाही. ऋण नक्की कोणाचे कोणावर आहे हेच कळत नाही. नंदिनीच्या रूपातली मनस्वी नायिका भावते.

'चंदन' य कथासंग्रहातील 'समुद्र' या कथेत 'राधा' ही खंबीर नायिका आशाताईंनी

रेखाटली आहे. राधा पी.एच.डी. करत असताना तिचे गाईड तिच्याशी खूप विचित्र वागतात. प्रबंध पूर्ण करण्यासाठी ती कोणत्याही गैर मार्गाचा वापर करत नाही. ती निरंजनला त्याच्या पहिल्या मुलासकट स्वीकारते. मनापासून प्रेम करते. पण निरंजनच्या घरात घडणाऱ्या वाईट घटनांना राधाच जबाबदार आहे असे निरंजनच्या आईचे म्हणणे असते. निरंजनही तिच्याशी विचित्र वागतो. उडाणटप्पू भाऊ विक्रम तर तिच्यासाठी कायम अनाकलनीयच असतो. ही सगळी विचित्र परिस्थिती असूनही स्वतःचे मत असणारी, ठामपणे संकटाचा सामना करणारी राधा मनाला भावते.

'दर्पण' या कथासंग्रहातील 'अनोळखी' या कथेत मनावर संयम असणारी नायिका 'श्यामल' भेटते. पतीच्या अचानक निधनानंतर श्यामलवर दुःखाचा डोंगर कोसळतो. ओळखीच्या जगात अचानकपणे ती अनोळखी होते. जवळची माणसं विचित्र वागतात, अनपेक्षित असे जग निर्माण होते. मि. भोगटे यांच्या रूपात एक तकलादू आधार शोधण्यापेक्षा भक्कमपणे एका अनोळखी जगाला ती सामोरी जाते.

'पाऊलवाटेवरील गाव' या कथासंग्रहातील 'पुन्हा एकदा जन्म' या कथेत कावेरी ट्यूमरसारख्या भयंकर आजाराशी लढा देते. मनाच्या ताकदीने स्वतःचा जन्म अनुभवते. ती सोडून दुसऱ्या कोणावर ती प्रेम करणाऱ्या तिच्या नवऱ्याचा तिला राग येत नाही. मृत्युचे रूप घेऊन आलेल्या ट्यूमरचे ती आभारच मानते. कारण ट्यूमरमूळे तिचा आधीचा जन्म संपून पुन्हा एकदा झालेला जन्म ती अनुभवते.

आशा बगे यांच्या कथांमध्ये कुटुंबव्यवस्था मानणाऱ्या कुटुंबाला जोडणाऱ्या स्त्रिया अधिक प्रमाणात आहेत. सर्वसामान्यपणे मध्यमवर्गीय कुटुंबातल्या स्त्रीचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमध्ये मोठ्या प्रमाणात आहे.

**सानिया**

सानियांच्या बहुतेक कथा स्त्री-केंद्री आहेत. स्त्रियांचे अनुभवविश्व कथांमध्ये केंद्रस्थानी आहे. त्यामुळे कौटुंबिक नातेसंबंधातून निर्माण होणारे ताण सानियांनी आपल्या कथांमधून मांडले आहेत. त्यांच्या नायिका सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहेत, स्वतंत्र विचारसरणीच्या आहेत. सानियांच्या लेखनात स्त्रीच्या आत्मउन्नतीच्या खुणा आहेत. त्यांच्या नायिका स्वैराचारी आहेत असे म्हणण्यापेक्षा त्या त्यांच्या मनाला योग्य वाटेल तेच करतात. बऱ्याचदा असे स्वतंत्र निर्णय घेतल्याने होणारे तोटे त्यांना सहन करावे लागतात. काही कथांच्या बाबतीत जे होते ते आपल्या मनाचे ऐकल्याने होते हे

समाधान तरी त्या स्त्रियांच्या वाट्याला येते का? हाही प्रश्न निर्माण होतोच. स्वयंपूर्ण असल्याने आर्थिकदृष्ट्या कोणावर अवलंबून राहाण्याची गरज या कथा नायिकांना नाही. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीप्रमाणे प्रत्येक जण वेगळा आहे. त्यामुळे हेच योग्य आणि ते अयोग्य असे म्हणणे तितकेसे योग्य होणार नाही. कुटुंब या संस्थेकडे सानियांच्या नायिका एका वेगळ्या दृष्टीकोनातून बघतात. एखादा विचार जोपर्यंत पूर्णपणे पटत नाही तोपर्यंत त्या निर्णय घेत नाहीत. सानियांचे कथाविश्व पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान देणारे आहे. त्यांनी निर्मिलेली पात्रे परंपरेच्या चौकटी न मानता, पर्याय शोधून स्वतःचे आयुष्य मनाप्रमाणे जगतात. वेगळया वाटेवरून आत्मशोधाची अनुभूती घेतात.

सानियांचा 'शोध' या पहिल्या कथासंग्रहातच आत्मनिर्भर स्त्री-पात्रे आहेत. 'वाट वेगळी' या कथेमधली प्रतिमा एक महत्त्वाकांक्षी स्त्री आहे. नोकरी करून स्वतंत्र राहाणे, कोणाचेही दडपण न घेणे असा तिचा स्वभाव आहे. तिच्या या विचारांमुळेच तिचे कोणाशी फारसे पटत नाही. लग्न हा विषय तर तिच्यापासून लांबच असतो. तिच्यासाठी आणलेल्या एका स्थळाचा 'रावचा' ती विचार करू लागते. आश्चर्य म्हणजे त्याच्या विचारांनी तिची झोपही उडते. याचे तिलाही आश्चर्य वाटते. पण हा बदल नैसर्गिक आहे असे समजून ती रावला स्वीकारण्याचा निर्णय घेते. पण प्रभाची बहीण तिला रावचे प्रभाबद्दलचे मत सांगते आणि राव प्रभावर नाही तर तिच्यावर प्रेम करतो आहे हे सांगते तेव्हा प्रभा अंतर्मुख होऊन विचार करते. लाजणे, प्रेम करणे, लग्न करणे हे आपल्या आवाक्याबाहेरचे आहे. हा विचार करून या लग्न, कुटुंब या सगळ्यापासून दूर राहाण्याचा निर्णय घेते.

'भूमिका' या कथासंग्रहाच्या शीर्षककथेमधील वसू लग्न, कुटुंब यापासून दूर राहाते आहे. श्रीरंग हा तिचा जवळचा मित्र असतो. त्याच्या पत्नीच्या अकाली निधनानंतर वसूने श्रीरंगशी लग्न करावे असे सगळ्यांनाच वाटत असते. श्रीरंग, वसूच्या घरातले सगळे खूष असतात. पण वसूची भूमिका ठरलेली असते. दुसऱ्या कोणत्याही भूमिकेत अट्टाहासाने बसणे तिला मान्य नव्हते. वेगळी नोकरी शोधून दुसऱ्या शहरात जाऊन आपल्या भूमिकेवर ती ठाम राहाते. माणसांमाणसातल्या परस्पर सबंधाचे चित्रण सानिया करतात. आपल्याला नको असलेली परंपरा झुगारून देऊन स्वतंत्र वृत्तीने विचार करण्याची मोकळीक सानिया आपल्या व्यक्तीरेखांना देतात.

## ६) विवाहबाह्य संबंध

माणसामाणसातील भावबंध पुन्हा पुन्हा तपासून पहाण्याचे कसब आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांना अवगत आहे. या दोन्ही लेखिकांच्या लेखनात काही साम्य आहे पण महत्वाची भिन्नता आधीच्या मुद्द्यात प्रकर्षाने जाणवते. कुटुंबव्यवस्थेबद्दल त्यांचे विचार भिन्न आहेत. आशाबाईंच्या नायिका कुटुंबव्यवस्था मानणाऱ्या आहेत. परंपरेची चौकट मोडण्याची त्यांची तयारी नाही. सानियांची कथा नायिका मात्र स्वतंत्र विचारांची आहे. स्त्रियांचे भावविश्व या दोघींनीही समर्थपणे शब्दबद्ध केले आहे. फक्त विचारसरणीतला फरक स्पष्टपणे दिसून येतो.

### आशा बगे

आशा बगे यांच्या कथेमध्ये विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या नायिका अपवादात्मक सापडतील. 'मांडव' या कथासंग्रहाची शीर्षककथा अशीच अपवादात्मक आहे. काही लेखकांना समाजाची चौकट उधळून लावायची नसते. आशाबाई त्याच गटातल्या आहेत. त्या चौकटीतही जीवन सातत्याचे सूत्र असते. पण हे सातत्यच खंडित होत असेल आणि त्यामुळे ती चौकटच उधळून लावण्याची गरज असेल तर लेखनातून ती करावी लागते. अशीच गरज 'मांडव' या कथेतून आशाताईंनी पूर्ण केली आहे. 'लग्न' या संस्काराचा स्त्रीच्या मनोभूमिकेतून वेध घेतला आहे. मुन्नी आणि उज्ज्वला या दोन व्यक्तीरेखांनी लग्न या संस्काराला न जुमानता आपल्या सुखाचा विचार केला आहे. ते चूक की बरोबर हे व्यक्तीपरत्वे ठरेल. काहींना असेही वाटू शकते की हे सगळे स्वीकारण्याआधी त्यांना समजले नाही का? पण योग्य-अयोग्य त्या पात्राच्या जागी जाऊन ठरवता यायला हवे. या कथेत उज्ज्वला आपला संसार सोडून आपल्या सुखाचा विचार करते, चौकट मोडते. 'भास्कर' नावाचे पुरुषपात्र उज्ज्वलाच्या वागण्यावर वेगळ्या पद्धतीने विचार करतो. उज्ज्वलाच्या नवऱ्याच्या म्हणजे वसंताच्या सहवासात तिला गुदमरायला लागले असेल असे तिला वाटते. तिला ती चौकट नकोशी झाली असेल. या कथेतली मुन्नी तिच्या लग्नाच्या दिवशीच घरातून पळून जाते. तिला ते लग्न मान्य नसते. म्हणून ती असा निर्णय घेते.

'अनंत' या कथासंग्रहातील 'घराचा रस्ता' या कथेत नंदू या लहानग्याच्या आईचे विवाहबाह्य संबंध वाचक म्हणून अस्वस्थ करतात. त्याची आई असे का वागते? याचा राग येतो आणि कथेत नंदूच्या आईची आत्महत्या मनाला चटका लावते. लहानग्या नंदूचे

भावविश्व आशाताईंनी समर्पकतेने रंगवले आहे.

'पाऊलवाटेवरील गाव' या कथासंग्रहातील 'गाव' या कथेत ताराकाकू आणि डॉ. गोवर्धन यांचे भावबंध असतात असा उल्लेख आहे. ताराकाकूंना डॉक्टरांविषयी वाटणारी ओढ अनू समजून घेते. कारण त्यामध्ये वासना नसते.

**सानिया**

स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून तिच्या अस्तित्वाचा शोध घेणारी सानिया यांची कथा आहे. सानियांची कथा मराठी कथा साहित्यात स्त्रीवादी कथा या नावाने आपली ओळख स्थिर करून आहे. पण सानिया कोणत्याही वादाचा पुरस्कार करत नाहीत. त्यांना त्यांच्या साहित्यात स्त्री महत्वाची वाटते. स्त्रीच्या ठिकाणी असणारी शक्ती स्तिमित करते. लिहून व्यक्त करणे व लिहिता लिहिता व्यक्तीमनाचा शोध घेणे हे त्यांना जास्त महत्वाचे वाटते. सानियांची नायिका स्वतंत्रपणे विचार करणारी आहे. आपल्याल्या हव्या असणाऱ्या गोष्टी मिळवण्यासाठी कुटुंबाची चौकट मोडण्याची तिची तयारी आहे.

'प्रतीती' या कथासंग्रहातल्या शीर्षककथेत जान्हवी आणि चंदना या लग्न न करताच शारिरिक संबंध ठेवतात. जान्हवी संघवीबरोबर असे संबंध ठेवते. आदित्य चंदनाचा बॉस असतो. तो फारसा चांगला नाही असे सगळे तिला सांगतात. पण तिला आदित्य आवडायला लागतो. लग्न न करताच ती त्याच्याबरोबर राहाण्याचा निर्णय घेते. तिच्या घरात असलेल्या मोकळ्या वातावरणामुळे हा निर्णय घेणे तिला सोपे जाते. 'खिडक्या' या कथासंग्रहातील 'वाटा' या कथेची नायिका मिनू अशीच एक व्यक्तिरेखा आहे. मिनू आणि अनिरूद्ध एक सुखवस्तू जोडपे असते. कामाच्या व्यापामूळे मिनूसाठी त्याला वेळ नसतो. मानसिक आणि शारिरिक प्रेमापासून वंचित राहाणारी मिनू आतून तडफडत असते. याविषयी अनेकवेळा सांगूनही अनिरूद्ध दुर्लक्ष करतो. याचा परिणाम म्हणून मिनू आपल्या ऑफिसमधल्या एका मित्राबरोबर फिरायला जाते. अनिरूद्धला त्रास व्हावा या उद्देशाने त्या मित्राशी संबध ठेवते. या सगळ्यात कथेच्या शेवटी सगळे कळूनही अनिरूद्ध समजूतदारपणाची भूमिका घेतो. 'भूमिका' या कथासंग्रहातील 'प्रतिभा' ही कथा आपण केलेल्या तडजोडी उघडपणे स्वीकारते. एका सर्वसामान्य कुटुंबातली प्रतिभा तिच्याही नकळत नोकरीच्या ठिकाणी मानसिक आणि शारीरिक पातळीवर तडजोडी करते. प्रतिभाला अपेक्षित सुरक्षितता तिच्या आयुष्यात आलेल्या कोणत्याही पुरुषाकडून मिळत नाही. लग्न करूनही अशी सुरक्षितता मिळेलच

यावर प्रतिभाचा विश्वास नाही. रघुनंदनच्या रूपाने तिला कोणीतरी असण्याचे आश्वासक ठिकाण मिळते. पण त्या ठिकाणाहून देखील संपर्क, संवाद होतच नाही. फक्त कुणीतरी असण्याची आश्वासकता मिळते. याच कथासंग्रहातील 'आपापले प्रश्न' या कथेतली वैजयंती रविच्या म्हणजे तिच्या पतीच्या अकाली जाण्याने एकटी पडते. पण स्वतंत्र विचारांची, स्वतःच्या पायावर उभी असणारी वैजयंती कोणाशीही जुळवून घेण्याच्या विचारांची नसते. तिला संसाराची, मुलांची आणि स्वयंपाकघरात रमण्याची विशेष आवड नसते. रविच्या जाण्यानंतर ती स्वतःचे एकटीचे विश्व निर्माण करते.

'त्यानंतर' या दीर्घकथासंग्रहाची शीर्षककथा अनेक प्रश्न निर्माण करते. नवरा अचानक घरातून निघून गेल्यानंतर ठरीव प्रतिक्रिया न देणाऱ्या राधिकाची ही कथा आहे. पार्थ बॅनर्जी नावाच्या तशा अनोळखी पुरुषाशी ती संबंध ठेवते. एकमेकांना कोणतेही प्रश्न न विचारता ते एकमेकांचा सहवास अनुभवतात. राधिकाला तिने कोणतीही चूक केली असे वाटत नाही. 'प्रयाण' या कथासंग्रहातल्या 'प्रवास' या कथेत सावित्री ही कथेच्या 'नंदिता' या नायिकेची आई असते. स्वतंत्र विचारांची, आपल्याला हवे तसेच वागणारी सावित्री प्रचंड बुद्धीमान, मनस्वी असते. पण एका वेगळ्या पुरुषाच्या प्रेमात पडून नंदिता आणि तिच्या वडिलांपासून ती दूर जाते. 'परिमाण' या कथासंग्रहाच्या शीर्षककथेत कैलास आणि देवकी यांच्या वेगळ्या नात्याचे बंध उलगडून दाखवले आहेत. ते दोघे चांगले मित्र असतात. मोठा अभिनेता व्हायच्या ध्यासापोटी कैलास घर सोडून जातो. देवकी मात्र दुसऱ्याशी लग्न होऊनही कैलासच्या घरच्यांची जबाबदारी घेते. काही काळ मध्ये लोटल्यानंतर जेव्हा कैलास आणि देवकी भेटतात तेव्हा ते शारीरिकदृष्ट्या जवळ येतात. हे सगळे देवकी खूप सकारात्मक घेते असे कथेत दाखवले आहे. लग्न झालेले असूनही कैलासशी झालेली शारीरिक जवळीक तिला मान्य असते. 'प्रयाण' या कथासंग्रहातील रजू लिहिते – या कथेची विवाहित नायिका रजू प्रसादच्या स्पर्शाने मोहरून त्याला सर्वस्व देते. दुसऱ्याचे संपूर्ण असे वेगळे जग क्षणभरासाठी आवडते. पण जवळ गेल्यानंतर त्यातला फोलपणाही कळतो. रजूचे असेच होते.

सानियांच्या कथांमधल्या नायिका विवाहबाह्य संबंधांकडे एका वेगळ्या दृष्टीने बघतात. आपल्याला हवे असणारे आणि न मिळणारे शारीरिक सुख परपुरुषाकडून मिळविण्यात त्यांना गैर वाटत नाही. काही वेळा अशा वागण्याने वाट्याला आलेला मनस्तापही त्या स्वीकारतात आणि पुढे चालतात.

## ७) गृहिणी असणाऱ्या व नोकरी करणाऱ्या कथानायिका

मराठी कथासाहित्यात स्त्रीच्या भावभावनांचे चित्रण करणाऱ्या लेखिकांमध्ये आशा बगे आणि सानिया यांचे निश्चितपणे एक वेगळे स्थान आहे. स्त्रियांच्या लेखनामध्ये आपल्या कसदार लेखनाने या दोघींनीही मोलाची भर घातली आहे.

निखळ नात्यांचे लेबल न लावता अलवार नात्यांचा शोध घेणे हे त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीची स्वत्वाची व सत्याची ओढ, वात्सल्यदृष्टी, कुटुंबाशी असणारे नाते यातून तिचा होणारा आत्मशोध या बाबी आशा बगे यांच्या कथांमधून दिसून येतात. त्यांच्या कथांमधल्या नायिका सुशिक्षित, समंजस आहेत. पण चौकट मोडणाऱ्या नाहीत. नोकरी करणाऱ्या व गृहिणी म्हणून घर सांभाळणाऱ्या कथानायिका त्यांच्या कथांमध्ये आहेत. जास्त करून कुटुंबवत्सल, गृहिणी अधिक आहेत. गृहिणी असल्या तरी त्या नायिका आत्मनिर्भर आहेत. आर्थिक स्वातंत्र्य नसल्यामुळे परावलंबित्व आल्याचे दुःख काही वेळा त्यांच्या वाट्याला येते.

### आशा बगे

'मारवा' या कथासंग्रहातील 'घरटं' या कथेची नायिका मृदुला एक आदर्श गृहिणी असते. चाळीतल्या दोन खोल्यांमध्येदेखील ती आनंदाने संसार करते. कित्येकदा लहानसहान गोष्टींची चणचण भासते. असे असूनही तिची काहीच तक्रार नसते.

याच कथासंग्रहातल्या 'बेईमान' कथेमधील संवेदनशील माधवी गृहिणीच असते. 'जन्म', 'रंग', 'वाळवंट', 'मैत्रीणी', 'कोवळी उन्हं', 'डोळे', 'वर्तुळ', 'रुक्मिणी' या कथांच्या नायिका गृहिणीपदच भूषवताना दिसतात. गृहिणी म्हणवून घेताना त्यांना कमीपणा वाटत नाही.

'अत्तर' कथासंग्रहातील 'बंदिशाळा' या कथेची नायिका आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर नसल्याने घर सोडण्याचा निर्णय घेऊ शकत नाही. कारण स्वतःचे घर सोडून येताना पुन्हा त्या घरात परत न जाण्याचा निर्णय तिने घेतलेला असतो. पण कथेच्या शेवटी ती पतीबरोबर जाते. यामागे आर्थिक स्वातंत्र्य नसणे हे एक महत्त्वाचे कारण असू शकते.

याच कथासंग्रहातील 'चितारओळ' या कथेची नायिका सरोज कथेचा नायक श्रीपाद याच्यावर मनापासून प्रेम करत असते. पण श्रीपादच्या प्रगतीत ती स्वतःचा अडथळा येऊ देत नाही. कारण त्या दोघांनाही याची कल्पना असते की त्यांचे लग्न

होऊ शकत नाही.  ती आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण असती तर कदाचित आपल्या मनासारख्या जोडीदाराशी संसार करणे तिला शक्य झाले असते.

या कथासंग्रहातील 'अपूर्ण' या कथेची नायिका पेंटिंगचे क्लासेस घेत असते. अर्थार्जन करत असली तरी ते नोकरी करून करत नसते.

'मांडव' या कथासंग्रहातील 'ऋण' या कथेची नायिका 'नंदिनी' आलेल्या संकटांवर समर्थपणे मात करते.  कौस्तुभ व चारु यांनी दिलेले पैसे परत करते.  पण घरी क्लासेस घेऊन अर्थार्जन करते.  तिचा नवरा शरद संघाचे काम करणारा मनस्वी कार्यकर्ता असतो.  असे असतानाही ती नोकरी न करता घरात क्लोसस सुरु करते.

आशाताईंची अपवादात्मक कथा म्हणजे 'नाळ'.  या कथेतल्या उदयनची आई कर्तृत्ववान आहे.  उदयनला तिची सगळ्यांना मदत करण्याची वृत्ती भावते.  जीवनाची जोडीदार म्हणूनही त्याला त्याच्या आईच्या विचारसरणीची अवनी आवडते.

या सगळ्या उदाहरणांवरून असे लक्षात येते की आशाताईंच्या कथांमध्ये जास्तीत जास्त कथानायिका गृहिणी आहेत.  आपल्यापेक्षा आपल्या कुटुंबाची गरज ओळखून तडजोडी करणाऱ्या आहेत.

**सानिया**

सानियांच्या कथानायिका कर्तृत्ववान, नोकरी करणाऱ्या, स्वतःच्या पायावर उभ्या आहेत.  त्यांच्या  साहित्यातली स्त्री नवी पाऊलवाट निर्माण करते.  उच्चमध्यमवर्गीय कमावत्या स्त्रिया सानियांच्या कथांमध्ये मोठ्या प्रमाणात आहेत.  गृहिणी असणाऱ्या कथानायिका अपवादात्मक कथांमध्ये आहेत.

'त्यानंतर' या कथासंग्रहातल्या शीर्षककथेची नायिका राधिका नोकरी करून अर्थार्जन करत नाही.  तिचा नवरा ललित अचानक सोडून गेल्यानंतरही उपजिविकेसाठी ती नोकरी करत नाही.  ललितने बँकेत ठेवलेल्या पैशांवर दिवस काढते.  जेव्हा ते पैसे संपत येतात तेव्हा पार्थ बॅनर्जीशी संबंध ठेवते.  एकमेकांना प्रश्न न विचारता, एकमेकांशी नाते ठेवतात.  एकमेकांच्या गरजा पूर्ण करतात.  'अशी वेळ' या कथासंग्रहातली 'फक्त गृहिणी' ही कथा गृहिणी असलेल्या कथानायिकेची व्यथा सांगणारी आहे.  पण कथेच्या शेवटी ती फक्त गृहिणी नाही तर तिचे तिला अस्तित्व आहे असा आत्मशोध कथेच्या नायिकेला होतो.

'रजू लिहिते' या कथेची नायिका 'रजू' अनाथ असते.  तिचे निखिलशी लग्न

झाल्यावर ती नोकरी न करता घरातच राहाणे पसंत करते.

सानियांच्या सगळ्या कथांमधून मोजक्या कथांमध्ये गृहिणी असणाऱ्या कथानायिका आहेत. बहुतांश कथानायिका कमावत्या आहेत.

## ८) भौगोलिक प्रदेश

साहित्याच्या भोवतालचा भौगोलिक प्रदेश, तिथली माणसे, संस्कृती याचा लेखकाशी जवळचा संबंध असू शकतो. त्या वातावरणाचा लेखकाच्या लेखनावर परिणाम होतो. भोवतालचा प्रदेश, संस्कृती यांचा परिणाम आयुष्यावर होतो. सहाजिकच लेखनातूनही तो दिसतो. लेखकाचे लेखन त्याच्या अनुभवांशी निगडीत असते. असे म्हटले तर त्या अनुभवात सगळेच घटक येतात. आपले अनुभव भोवतीच्या वातावरणातूनच आलेले असतात. त्यामुळे आपण कुठे राहातो याचा आपल्या लेखनावर परिणाम होतोच. भोवताल बदलत राहिला तर काही नवे, निराळे दिसू शकते. एखाद्या व्यक्तीचा पुष्कळ भौगोलिक प्रदेशांचा प्रवास झाला म्हणजे भरपूर साहित्यसामग्री मिळाली असे नाही. मात्र भौगोलिक प्रदेशाचा लेखनावर निश्चितपणे परिणाम होतो. लेखनात वेगवेगळ्या ठिकाणांचे संदर्भ तेव्हाच आढळतात जेव्हा लेखक प्रवास करतो. आशा बगे व सानिया यांच्या कथाविश्वाचा विचार केला तर आशा बगे यांच्यापेक्षा सानियांच्या कथांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणचे संदर्भ आढळतात.

### आशा बगे

आशा बगे यांच्या कथेच्या विषयास भारतीय परंपरेतील कर्मकांडाला विशेष स्थान आहे. त्यांच्या कथांचा उगम त्यांच्या बालपणात झाल्याचे जाणवते. अनुभवांकडे बघण्याची वेगळी दृष्टी त्यांच्या बालपणातच त्यांना मिळाली. एकत्र कुटुंब पद्धतीमुळे माणसांची सुख-दुःख जवळून अभ्यासता आली. आशाताईंच्या कथांमध्ये नागपूर, विदर्भ या भागातल्या खुणा मोठ्या प्रमाणात आढळतात. नागपूर ही त्यांची भूमी आहे. त्यामुळे त्या भागातले संदर्भ, चालीरिती, रुढी, परंपरा यांचा उल्लेख आहे. अपवादात्मक कथांमध्ये इतर ठिकाणांचे उल्लेख आहेत.

'मारवा' या कथेतील 'मारवा' या शीर्षककथेत नागपूर जिल्ह्यातील, उमरेड तालुक्यातील उमरी या गावचा उल्लेख आहे. आबांच्या घराण्यातल्या कार्तिकी

पौर्णिमेनिमित्त होणाऱ्या गोपाळकाल्याचा उल्लेख आहे.

याच कथासंग्रहातल्या 'बेईमान' या कथेत नागपूर बाजूच्या उन्हाळ्याचा उल्लेख आहे.

'अत्तर' या कथेतल्या शीर्षककथेत नागपूरच्या बाजूचे वाडे, सरंजामशाही याचे वर्णन केले आहे. रावसाहेबांची शाही श्रीमंती कथेमध्ये दाखवली आहे. अत्तराची आवड, गाण्याचा शौक, वाड्याची भव्यता, झुंबरांची सजावट यातून वाडा डोळ्यासमोर उभा राहातो.

याच कथासंग्रहात 'पाहुणा' ही कथा आहे. यामध्ये विदर्भातले संदर्भ, रेल्वेलाईनजवळचे वातावरण, आग पेटल्यासारखे ऊन, वावटळीसारखे उष्ण धुळीचे लोट, काळशाची धूळ हे सगळे वर्णन विदर्भातल्या रेल्वेलाईनजवळचे एखादे गाव डोळ्यासमोर उभे राहाते. या कथासंग्रहातील 'महावस्त्र' या कथेत देशपांड्यांचा वाडा, मोरेश्वर हे पात्र, सोवळ (महावस्त्र) हे सगळे टिपिकल विदर्भातल्या वाड्यातले वातावरण आहे.

'निवडुंग' या कथेतही देऊस्करांचा वाडा याच भागातला असावा असे वाटते.

'बंदिशाळा' या कथेत अनुपमाचे माहेर, जवळ जवळ असणारे बंगले, भोवतालची बाग, शेजारी, अंगण या सगळ्या गोष्टी नागपूर-विदर्भातल्याच आहेत असे वाटते.

'पूजा' या कथासंग्रहातील 'पूजा', 'सायकल', 'देठ', 'खडक' या सगळ्या कथा विदर्भ भागात घडतात असे वाटते. 'मांडव', 'चंदन', 'अनंत', 'दर्पण', 'पाऊलवाटेवरले गाव', 'ऋतूवेगळे', 'प्रतिद्वंद्वी', 'पाणी' या सगळ्या कथासंग्रहांमध्ये विदर्भाच्या भूमीच्या, तिथल्या भौगोलिक प्रदेशाचा उल्लेख आहे.

आशाताईंच्या कथांमध्ये 'ठग' या कथेत बनारसच्या घाटांचे, तिथल्या वातावरणाचे वर्णन हुबेहूब केले आहे. त्यांचे वास्तव्य नागपूर व परिसरात जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे सहाजिकच त्यांच्या कथांमध्ये हा प्रदेश डोकावतो.

### सानिया

सानिया मूळच्या पुण्याच्या असल्या तरी कारणानिमित्ताने अनेक शहरांमध्ये वास्तव्य असल्याने त्यांच्या कथांमध्ये वेगवेगळ्या प्रदेशांच्या, शहरांच्या खुणा सापडतात. एक व्यक्ती म्हणून व्यापक दृष्टिकोन मिळण्याचे भ्रमंती हे महत्त्वाचे कारण आहे.

'खिडक्या' या कथासंग्रहातल्या 'दुहेरी' या कथेत डोंगराळ प्रदेशातल्या एका गावाचे वर्णन सानियांनी केले आहे. कथेची नायिका इंजिनिअर असलेल्या अजितशी लग्न

करून जाणीवपूर्वक शहरापासून लांब डोंगराळ भागात येते. जंगल, तळी, डोंगर, तिथल्या लोकांचा पेहेराव, भाषा याचे उल्लेख कथेत आहेत. हा सगळा प्रदेश शहरी वातावरणापासून खूप लांब असतो. शहरापासून दूर असल्याने इथल्या लोकांना उपजिविकेसाठी तडजोडी करायला लागतात. इतक्या की स्त्रिया आपले शरीर देण्यासाठी देखील तयार होतात.

'भूमिका' या कथासंग्रहातील 'स्वदेशी' या कथेत 'माधव' या कथानायकाला आपल्या देशाविषयी, माणसांविषयी वाटणारे प्रेम दाखवले आहे. स्वतंत्र, एकटे राहाणे आवडते म्हणून तो परदेशी राहातो. तिथल्याच एका परदेशी स्त्रीसोबत लग्न न करताच राहातो. कोणतीही जबाबदारी न घेता डाव मांडायचा या स्वभावामुळे आणि अडकणे हा स्वभाव नसल्याने तो आपल्या देशात जाण्याचा निर्णय घेतो. या कथेत परदेशातल्या वास्तव्याच्या खुणा सापडतात. 'आपण आपले' या कथासंग्रहातल्या शीर्षक कथेची नायिका विद्युत अमेरिकेतून उच्चशिक्षण घेऊन भारतात आलेली असते. तिचे आई वडील राहात असतात तिथपासून दूर नोकरीच्या ठिकाणी होस्टेलवर ती राहाते. या कथेत अमेरिका आणि दोन गावांच्या वास्तव्याचा उल्लेख आहे.

'प्रयाण' या कथासंग्रहामधील 'प्रवास' या कथेच्या नावातच प्रवास आहे. नंदिताची आई 'सावित्री' हिला तिरुपती बालाजीचे दर्शन घ्यायचे असते. म्हणून ती नंदिताकडे येते. मोजक्या शब्दांमध्ये भावनांचे प्रकटीकरण केले आहे. आईविषयी मनात राग असतानाही तिची शेवटची इच्छा म्हणून नंदिता प्रवास करते.

'ओमियागे' या कथासंग्रहाच्या नावातच जपानचे दर्शन घडते. वेगवेगळ्या देशांमध्ये सानियांनी केलेले वास्तव्य त्यांच्या कथांमधून दिसून येते. 'ओमियागे' मध्ये तर पहिल्या तीन कथांमध्ये जपान दर्शन घडते. त्याचबरोबर पुण्यातला एफ. सी. रोड, कोथरुड या भागांचा उल्लेखही आहे. जपानमधल्या क्योतो शहरातले रस्ते, हॉटेल्स, शाळा, रेल्वे स्टेशन, बागा, धबधबे यांचे हुबेहुब वर्णन या कथांमध्ये आहे. तिथे 'अनिता' या कथानायिकेच्याद्वारे वाचक जपानमधील शहराचा फेरफटका मारतो.

याच कथासंग्रहातल्या 'आमंत्रण' या कथेत सरिता जय (नवरा) आणि निशी (मुलगी) यांच्याकडे राहायला परदेशात जाते. परदेशात त्या दोघांची जीवनशैली, तिथल्या जेवणाच्या पद्धती, जयची आणि परदेशी स्त्रीची मैत्रीचे सानियांनी वर्णन केले आहे.

'परिमाण' या कथासंग्रहात 'क्षितिज' या कथेत बाळबोध वातावरणात लहानाची मोठी झालेली यशोधरा शिक्षणासाठी परदेशी जाते. तसेच तिथेच राहाणाऱ्या केविन नावाच्या परदेशी तरुणाशी लग्न करते असा उल्लेख आहे.

परदेशात राहून, शिकूनही तिच्या विचारांचे क्षितिज विस्तारत नाही असा कथेचा आशय आहे. कथेत परदेशातल्या वास्तव्याचा आणि तिच्या गावाचा उल्लेख आहे, वर्णन आहे.

'पुन्हा एकदा' या कथासंग्रहात 'केणी' या एकांकिकेत लेणीचे वर्णन आहे. संवादात्मक कथनामध्ये डोळ्यांसमोर चित्र उभे करण्याचे सामार्थ्य हे सानियांच्या कथांचे वैशिष्ट्य या एकांकिकेत प्रकर्षाने जाणवते.

सानिया यांच्या कथांमध्ये गावा-देशांची, जाती धर्माची वेस ओलांडून माणसांमाणसांमधील नातेसंबंधांचा नेमकेपणाने वेध घेण्याचा प्रयत्न दिसतो. आशाताईंच्या कथांमध्ये विदर्भातल्या ठिकाणांचे उल्लेख मोठ्या प्रमाणात आहेत. साहित्यिकाच्या साहित्यावर भोवतालच्या भौगोलिक प्रदेशाचा परिणाम होतो.

## ९) कथेमधील निवेदक आणि निवेदनशैली

कोणत्याही कथेतील पात्रे त्यांच्या परस्परसंबंधातून निर्माण झालेल्या जगात व्यवहार करत असतात. साहित्यामधील कथनात्म साहित्याचा विचार करता कथेचा निवेदक कथेला अर्थ प्राप्त करून देतो. दोन लेखकांचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना निवेदनशैली हा मुद्दा म्हणूनच महत्त्वाचा वाटतो. कथात्म साहित्यात घडणाऱ्या घटनांचे, घटनांच्या मालिकेचे कथन किंवा निवेदन होते. निवेदक ही कथाकाराची निर्मिती असते. निवेदकाच्या मार्फत लेखक कथा सांगत असतो. निवेदक त्रयस्थ बुद्धिने कथेतील पात्र, घटना, स्थळे यांच्याकडे पहातो. निवेदक वाचकाला कथा सांगत असतो. निवेदक कधी बोलीभाषेत संवाद साधतो, तर कधी प्रमाणभाषेत संवाद साधतो. कथाबाह्य निवेदक व कथांतर्गत निवेदक हे निवेदकांचे दोन ठळक प्रकार पडतात. कथाबाह्य निवेदक कथेकडे त्रयस्थ दृष्टीने पहातो. कथांतर्गत निवेदक कथेतले पात्रच असतो. काही वेळा पत्रात्मक किंवा आत्मनिवेदनात्मक निवेदनशैलीचाही लेखक वापर करतात.

आशा बगे आणि सानिया या लेखिकांच्या बाबतीत विचार करायचा झाल्यास आशा बगे यांनी कथाबाह्य व कथांतर्गत निवेदकाच्या माध्यमातून कथा लिहिल्या आहेत. सानिया यांनी कथाबाह्य निवेदकाचा तसेच आत्मनिवेदनात्मक निवेदनाचा वापर जास्त प्रमाणात केला आहे. त्यांच्या मोजक्या कथांमध्ये कथांतर्गत निवेदकही आहे.

**आशा बगे**

आशाताईंच्या 'मारवा' या गाजलेल्या कथासंग्रहातली शीर्षककथा कथांतर्गत निवेदकाचे उत्तम उदाहरण आहे. 'आबा' या पात्राच्या आधारे कथा पुढे जाते. सूत्रधार कथेला जोडण्याचे काम करतो. आबांच्या मनातले भावनांचे हिंदोळे आशाताईंनी समर्पक शब्दांमध्ये मांडले आहेत.

''त्रिपुरी पौर्णिमेचा दिवस मख्खासारखा उभा राहिला. मंदिराचे पांढरे कळस अशक्त वाटायला लागले. वणा नदीच्या खुळखुळत्या पाण्यावर पडलेली सूर्याची कोवळी किरणं कडक होऊन पुन्हा मलुल झाली.''[१३]

आबांच्या आयुष्याची संध्याकाळ, 'मारवा' या कथेचा शेवट सूत्रधाराच्या माध्यमातून उत्तम रीतीने मांडला आहे.

''गोपालकृष्णासारख्याच सावळ्या उजेडात नदीचं पात्र आबांना स्पष्ट दिसलं पैलतीरासह.''[१४]

'मारवा' या कथासंग्रहातील 'नातं' या कथेत अनाकलनीय आणि गुंतागुंतीची मानवी नाती दाखवण्यात आशाताई यशस्वी झाल्या आहेत. 'नीना' या कथांतर्गत निवेदक अर्थात पात्राच्या मनोविश्लेषणात्मक भूमिकेतून कथा मांडली आहे. नात्यांमधल्या प्रेमाची धार काळाच्या ओघात बोथट होत जाते हे या कथेतून दिसून येते. माणसाच्या एकटेपणाविषयी नीनाचे भाष्य अंतर्मुख करायला लावते.

''नाहीतरी कोणी कुणाचं नसतंच, कशावरंच तर आपली मालकी नसते. अगदी आपली म्हणून असलेली सुख-दुःखही आपली नसतातच. तरी सारा प्रवाह वहाता असतो. आपल्या नकळत कुणीतरी आपल्याला या प्रवाहाशी विचित्रपणे बांधून ठेवतं. नाकारता येत नाही. सहन मात्र करावी लागतात.''[१५]

'मारवा' या कथासंग्रहातली 'घरटं' ही कथा 'राजीव' या पात्राच्या दृष्टिकोनातून मांडली आहे. कथांतर्गत निवेदकाची भूमिका राजीव पार पाडतो. घर या संकल्पनेला न मानणारा राजीव कथेच्या शेवटी घरट्याचे अस्तित्व मान्य करतो. चिमणीचे घरटे मोडले तरी ती जिद्दीने दुसरे घरटे बांधते. त्याचप्रमाणे अट्टाहासाने नाकारलेले घरटे राजीव स्वीकारतो. तो म्हणतो,

---

१३. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. ७

१४. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. १५

१५. नातं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. ७१

''या सुंदर घरट्याभोवती भिरभिरणारे इवले, कोवळे, नाजूक स्पर्श मनुष्य अखेर नाकारू शकत नाही. निदान आपल्यासारखा सामान्य मनुष्य तरी.''[१६]

आशाताईंच्या 'अत्तर' या कथासंग्रहातली सर्वोत्तम कथा म्हणजे 'पाहुणा'. कथाबाह्य निवेदकाच्या माध्यमातून आशाताईंनी पाहुणा या कथेत कमाल केली आहे. कथेची लांबी कमी असूनही वाचक म्हणून श्वास रोखून धरायला लावणारी ही कथा आहे. प्रसंग जसाच्या तसा उभा करणे हे आशाताईंचे लेखनसामर्थ्य आहे. कथाबाह्य निवेदक वाचकाला कथा सांगतो.

''नरसप्पा तिथं पोचला तेव्हा माध्यान्ह नुकतीच कलली होती. आग पेटल्यासारखं ऊन होतं. कढत कढत झळा कानाची पाळी भाजून काढत होत्या. वावटळीसारखे मधूनच उष्ण धुळीचे लोट उठत होते. त्यात कोळशाची काळी धूळही मिसळली होती. जवळच्या रेल्वेलाईनचे तापलेले लोखंडी रूळ उन्हात काळ्या नागासारखेच गेलेले वाटत होते.''[१७]

'अत्तर' या कथासंग्रहातली 'निवडुंग' ही कथा कथाबाह्य निवेदकाचे उदाहरण आहे. या कथेत देऊस्करांच्या घरात आश्रीत म्हणून राहाणाऱ्या गायत्रीच्या मनाची अवस्था आशाताईंनी सूचकतेने वाचकांपर्यंत पोहचवली आहे.

''रिक्षा हालली. कमलवैनी, सुन्नू सगळ्यांनीच हात हलवला. गायत्रीने वर पाहिलं तर विश्वासच्या खोलीतला दिवा लागला. गायत्रीने नकळतपणे हात जोडले.''[१८]

'पूजा' या कथासंग्रहात 'चितारओळ' या कथेत संवाद व कथाबाह्य निवेदकाचा उपयोग कथा सांगताना केला आहे. श्रीपाद आणि सदाच्या मैत्रीची ही कथा आहे. चितारी म्हणजे मूर्ती घडवणारा. सदा मूर्ती बनवणारा शिल्पकार (चितारी) असतो. निराशेच्या गर्तेत सापडलेल्या सदाला श्रीपाद योग्य मार्ग दाखवतो. चितारओळीच्या आठवणी मागे सारून आपल्या मार्गाने जाताना श्रीधरच्या मनातले विचार कथाबाह्य निवेदकाच्या माध्यमातून मांडले आहेत. ''गजबजलेली चितारओळ, तिथला रंगाचा, मातीचा वास, औदुंबर, सदाच्या अंगणातला दगडी चबुतरा....सरोज....सारं मागे राहिलं होतं. गणपतीच्या मूर्ती आणि मूर्तीकाराची रंग...मातीत माखलेली कलावंत बोटंसुद्धा.''[१९]

आशा बगे यांनी कथांमध्ये कथाबाह्य व कथांतर्गत निवेदकाच्या माध्यमातून कथा

---

१६. घरटं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. ३८
१७. पाहुणा, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जानेवारी १९८६, पृ. क्र. ८४
१८. निवडुंग, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जानेवारी १९८६, पृ. क्र. ८३
१९. चितारओळ, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हेंबर १९८६, पृ. क्र. २७

वाचकांपर्यंत पोहचवली आहे. आत्मनिवेदनात्मक कथनशैलीत कथा आढळत नाहीत. संवाद, सूत्रधार, निवेदक, पात्रे कथा सांगताना दिसून येतात.

### सानिया

सानिया यांच्या कथांमध्ये कथांतर्गत (प्रथमपुरुषी), कथाबाह्य (तृतीयपुरुषी), आत्मनिवेदनात्मक निवेदक आहेत. प्रत्येक लेखकाची एक शैली असते. सानियांच्या कथांच्या बाबतीत त्या कथा थोड्या दुर्बोध आहेत. पण हा दोष होऊ शकत नाही. ही त्यांच्या शैली आहे. वाचकाने विचारप्रवृत्त व्हावे यासाठी निवेदनशैलीचा वेगळा वापर त्यांनी केला आहे. 'शोध' या पहिल्या कथासंग्रहात कथाबाह्य निवेदकाकडे त्यांचा कल आहे. पुढील सगळ्या कथासंग्रहातदेखील कथाबाह्य निवेदक मोठ्या प्रमाणात आढळतो. मोजक्या ठिकाणी त्यांनी कथांतर्गत निवेदकाचा उपयोग केला आहे.

कथांतर्गत निवेदकाचे उदाहरण घेताना सानिया यांच्या 'त्यानंतर' या कथासंग्रहातल्या शीर्षककथेचे उदाहरण घेता येईल. अगदी छान चाललेल्या आयुष्यात अचानक वादळ यावे तसे कथानायिका राधिकाचे जीवन बदलून जाते. कथेमध्ये राधिका निवेदक आहे तिचा नवरा ललित अचानक घर सोडून का जातो? या प्रश्नाचे उत्तर मिळत नाही. या प्रश्नाचे उत्तर ललित आणि राधिकाच्या भूतकाळात आहे. लग्नाच्या अगोदरची दोघांची ओळख, ललितची बौद्धिकता, त्यांच्या चर्चा, एकमेकांकडूनच्या अपेक्षा या गोष्टींचे कथन येते. कथेमध्ये वर्तमानकाळ व भूतकाळाच्या पुसट रेषा सुस्पष्ट जपल्या आहेत. त्यामुळे भूतकाळातील राधिका आणि वर्तमानकाळातली राधिका यांच्यातील भेद काटेकोरपणे जपला जातो. त्या दोन वेगळ्या व्यक्तीच होतात. लग्नाअगोदरचे आठवणींचे निवेदन कथाबाह्य निवेदकाने केलेल्या निवेदनासारखेच होते. राधिकेतला बदल स्पष्टपणे जाणवतो. ललितजवळ पार्थविषयी वाटणाऱ्या प्रेमाची प्रामाणिक कबुली ती देते.

''हो....प्रेम आहे. अगदी असूयेसकट. त्याने दुसऱ्या बायकांच्या नादी लागू नये म्हणून धडपडते. संशयाने पहाते. कधी रागावून अबोला धरते. प्रेम असच असतं नाही?''[२०]

'प्रतीती' मधील 'अरण्ये' ही कथा, कथाबाह्य निवेदकाच्या दृष्टीने पहाण्यासारखी आहे. कथेचे सहा भाग पाडले आहेत. पहिल्या, तिसऱ्या आणि पाचव्या भागाचे निवेदन

२०. त्यानंतर, त्यानंतर, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. ९२

करुणा करते आहे.  कथांतर्गत निवेदकाचे अस्तित्व पुरेसे वाटत नाही म्हणून की काय उरलेल्या तीन भागांचे निवेदन कथाबाह्य निवेदकाकडे सोपवलेले आहे.

सानिया यांच्या बहुसंख्य कथांचा निवेदक कथाबाह्य आहे.  जेथे तो कथांतर्गत आहे, तेथेही त्याच्या अंतरंगात कथाबाह्य निवेदकाने प्रवेश केला आहे.  एकंदरीत सानिया यांचा कल कथाबाह्य निवेदकाकडे आहे.

कथाबाह्य निवेदक हा प्राचीन काळापासूनच्या कथनपरंपरेने पारंपारिक निवेदक आहे.  तो कथेमध्ये घडणाऱ्या घटनांचे निवेदन कथेबाहेरून करतो.  कथांतर्गत निवेदकाशी तुलना केली तर कथाबाह्य निवेदकाला निवडीचे पर्याय जास्त असतात.  सानिया यांनी निवेदनशैलीचा जो प्रकार निवडला आहे तो अनेक लेखकांनी निवडला आहे.  संपूर्ण कथा कथाबाह्य निवेदकाने सांगितलेली असूनही ती विशिष्ट पात्राच्या दृष्टीतून सांगितली आहे. हे पात्र जे पहाते तेच कथेमध्ये येऊ शकते.  ते जिथे जाते तिथे कथाबाह्य निवेदक जातो. विशिष्ट कोनातून लावलेल्या कॅमेऱ्याप्रमाणे पहाणाऱ्या पात्राला दिसू शकते तितक्याच गोष्टींचे चित्रण करतो.  विशिष्ट पात्राचा दृष्टिकोन स्वीकारून त्या पात्राच्या मनात उतरल्याने कथाबाह्य निवेदकाला कथांतर्गत निवेदकाचे अनेक पैलू प्राप्त होतात.  हा पर्याय सानियांनी स्वीकारला आहे.

'पुन्हा एकदा' या कथासंग्रहाच्या शीर्षककथेत मीरा आणि वृंदावन यांचा दृष्टिकोन आहे.

'प्रयाण' या कथासंग्रहातील 'दाही दिशांचे पूल', 'प्रतीती' मधील 'अरण्ये' व 'पूल' तसेच 'शोध' मधील 'क्वचित' व 'दोघी' या कथा एकाहून अधिक निवेदकांच्या आहेत.  एकाच घटनेचे चित्रण करताना त्या घटनेत सहभागी असणाऱ्या सर्व पात्रांच्या मनात निवेदक प्रवेश करत नाही.

सानिया यांच्या कथेतील निवेदक आढावे सादर करताना, माहिती पुरवताना, वर्णने करताना स्वतंत्र असतो.  पात्रांच्या स्वरूपाबद्दल बोलताना पात्राच्या बाजूने बोलतो.

उदा. ''आता तर आपल्याला काय सांगायचे आहे याचाही तिला विसर पडू लागल्याप्रमाणे वाटले.  तिचे सगळे शरीर आतापर्यंत हालचाली करत होते ते हळूहळू शांत होऊ लागले.  तिच्या डोळ्यांतून फुलांचे बहर आल्याप्रमाणे भाव व्यक्त होते तेही जड होऊन मिटू लागले.  स्वतःच्या घसरत्या, संपत जाणाऱ्या शक्तीची जाणीव येताच

तिला संपूर्ण कळून चुकले की, शेवटी जसे आयुष्यभर वाटत आले तेच झाले. रोजच्या अद्‌भुतांचे, नव्या कथांचे अनुभव कोणाला सांगण्याआधीच सगळे संपून जात आहे.''[२१]

नीट निरीक्षण केले तर सानिया यांच्या कथेचा व त्यांच्या निवेदकाचा हा संरचनात्मक विशेषच आहे ही गोष्ट लक्षात येते. माहिती राखून ठेवणे, माहिती उघड करणे असे निवेदकाचे भाग आहेत. सानिया यांच्या कथांमधली पात्रे भूतकाळात घडून गेलेल्या महत्त्वपूर्ण घटनांचे ओझे डोक्यावर घेऊन त्यांचे वर्तमानातले आयुष्य जगतात. या सर्व घटना निवेदकाला माहिती असते. ही माहिती निवेदक आपल्याला हवी त्यावेळी उघड करतो, असा निष्कर्ष काढता येतो.

## ४.४. समारोप

आशा बगे आणि सानिया यांच्या कथासंग्रहांचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर त्या दोघींमधल्या लेखनातील साम्य दाखवणारे काही मुद्दे या प्रकरणाच्या एका भागात दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन्ही लेखिकांच्या कथांमध्ये 'स्त्री' हा केंद्रबिंदू आहे. आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांचे चित्रण अनेकदा त्यांच्या कथांमध्ये येते. आपल्याच आयुष्यातील अनेक पात्रे त्यांच्या कथांमध्ये भेटतात.

आशा बगे आणि सानिया यांच्या लेखनातील मुख्य साम्य म्हणजे एका स्त्रीने स्त्रीच्या प्रश्नांचा आढावा घेतला आहे. कदाचित त्यामुळेच या दोघींच्या कथा तरल आणि वाचनीय आहेत. या दोन्ही लेखिकांच्या बहुतांश कथा नायिकाप्रधान आहेत. या दोन्ही लेखिकांनी अतिशय संवेदनशील मनाने स्त्रीचे भावविश्व रेखाटले आहे. स्त्रीचे भावविश्व, तिची घुसमट, तिची व्यथा, तिची वेदना, तिची बंडखोरी या दोघींच्या कथांमधून प्रत्ययाला येते. नायिकाप्रधान कथा हे या दोन्ही लेखिकांच्या लिखाणातील महत्त्वाचे साम्य आहे. घरात व बाहेर स्त्रीच्या वाट्याला येणारी घुसमट हे या दोन्ही लेखिकांच्या लेखनाचे आणखीन एक साम्य आहे. वेगवेगळ्या कथांमधून ही घुसमट त्या दोघींनी दाखवली आहे. ही घुसमट आणि तिची तीव्रता व्यक्तीपरत्वे बदलते. वेदनेचे अनुभव या लेखिकांनी जिवंतपणे उभे केले आहेत. या सगळ्या कथा आपल्या रोजच्या आयुष्याशी निगडीत असल्याने त्या जवळच्या वाटतात. स्त्रीचे भावविश्व समर्थपणे रेखाटणाऱ्या आशा बगे व सानिया यांनी पुरुषाप्रधान कथादेखील तितक्याच ताकदीने लिहिल्या आहेत. स्त्री असूनही वेगवेगळ्या वयाच्या पुरुषांची मनःस्थिती

२१. शोध, शोध, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १३७-१३८

प्रभावीपणे मांडली आहे. मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीय गटातील पुरुष पात्रे या कथांमध्ये आहेत. माणसामाणसातील नातेसंबंधांचा शोध हे तर आशा बगे व सानिया यांच्या कथालेखनाचे बलस्थान आहे. विविध नात्यांनी बांधलेल्या माणसाला बऱ्याचदा या नात्यांमधूनच दुःख भोगावे लागते. कित्येकदा काही नाती जगण्याचे बळ देतात. आई-मुलगी, वडील-मुलगी, भाऊ-बहीण, मैत्रीण-मैत्रीण अशा सर्व नात्यांचा शोध या दोन्ही लेखिकांच्या कथांमध्ये आहे. वेगवेगळ्या वयोगटातील स्त्री-पुरुषांच्या भावविश्वाचे मूर्त रूप मांडत असतानाच वार्धक्यातले प्रश्न, समस्यादेखील आशा बगे आणि सानिया लिहितात. एकटेपणा, आजारपण, दुर्लक्षित केले जाणे, विस्मरण यासारख्या समस्या या कथांमधून प्रकर्षाने जाणवतात. आशा बगे व सानिया यांच्या कथालेखनातील साम्य या मुद्द्यांमधून प्रकर्षाने जाणवते.

आशा बगे आणि सानिया या दोन्ही लेखिकांनी स्त्रीचे विश्व, तिची घुसमट, तिची सुखं-दुःखं आपल्या कथांमधून मांडली आहेत. आशाताई आणि सानिया यांनी स्त्रीविषयक साहित्याचे लेखन केले आहे असे असले तरी त्यांच्या लेखनात निश्चितपणे फरक आहे. प्रबंधाचा मुख्य विषय तुलना हा आहे त्यामुळे या प्रकरणात आशाताई आणि सानिया यांच्या कथांमध्ये तुलना करून काही मुद्द्यांच्या आधारे हा फरक दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. या दोघींची जीवनविषयक दृष्टी वेगवेगळी आहे. त्यामुळे अर्थातच त्यांच्या लेखनात हीच जीवनविषयक दृष्टी डोकावते. कथेचा विकासक्रम, लेखनशैली, पात्रयोजना, विवाहबाह्य संबंधांकडे बघण्याचा दृष्टिकोन, भौगोलिक प्रदेश, कथेच्या शीर्षकाचा अन्वयार्थ, निवेदनशैली इ. मुद्दे विचारात घेऊन या दोघींच्या कथांमध्ये तुलना करून अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. व्यक्तिपरत्वे दृष्टिकोन बदलतो. तो चूक की बरोबर असे म्हणणे तितकेसे योग्य नाही. आशा बगे आणि सानिया यांच्या कथा वाचताना वाचक आणि अभ्यासक म्हणून जाणवलेल्या गोष्टी या प्रकरणात समाविष्ट केल्या आहेत. योग्य, अयोग्य ठरविणे अशक्य आहे. कारण प्रत्येक जण आपले अनुभवविश्व आपल्या साहित्यात मांडत असतो. त्यामुळे प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत वेगळी असते. काही स्त्रियांना आशाताईंचा परंपरागत चौकट न मोडण्याचा विचार पटेल तर काहींना सानियांची बंडखोरी भावेल. जो चष्मा लावून कथावाचन करू तसे विचार बदलतात. आपला चष्मा, आपला दृष्टिकोन आपण ठरवायचा आहे. या कथा वाचून, अभ्यासून एक नमूद करावेसे वाटते ते म्हणजे, एखाद्या व्यक्तिरेखेचे, त्याच्या दृष्टिकोनाचे मूल्यमापन सर्वांगीण विचार केल्यानंतरच केले पाहिजे.

## संदर्भसूची


१. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. ३९

२. बंदिशाळा, अत्तर, आशा बागे, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. क्र. ४९

३. तुफान, अनंत, आशा बगे, शारदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. क्र. ३१

४. मित्राची कथा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ७८

५. नातं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जून २००२, पृ. क्र. ७५

६. स्वदेशी, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १८६

७. रुक्मिणी, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जून २००२, पृ. १६२

८. पाणी, पाणी, आशा बगे, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १९२

९. http://www.loksatta.com.pune-new/smpadeet-saniya-book-published by-milind bokil-397209#

१०. 'संपादित सानिया' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभातील मनोगत

११. पराभूत, शोध, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १९८

१२. प्रतिभा, भूमिका, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ४०

१३. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. ७

१४. मारवा, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. १५

१५. नातं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. ७१

१६. घरटं, मारवा, आशा बगे, मौज प्रकाशन, जानेवारी १९८४, पृ. क्र. ३८

१७. पाहुणा, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जानेवारी १९८६, पृ. क्र. ८४

१८. निवडुंग, अत्तर, आशा बगे, पिसारा प्रकाशन, जानेवारी १९८६, पृ. क्र. ८३

१९. चितारओळ, पूजा, आशा बगे, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हेंबर १९८६, पृ. क्र. २७

२०. त्यानंतर, त्यानंतर, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. ९२

२१. शोध, शोध, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १३७-१३८

## ग्रंथसूची


१. भूमिका

२. अत्तर

३. अनंत

४. मारवा

५. पाणी

६. शोध

७. पूजा

८. त्यानंतर

| प्रकरण ५ समकालीन लेखिकांमध्ये आशा बगे आणि सानिया यांचे वेगळेपण | पृष्ठ क्र. ३७३ ते ३९६ |
|---|---|
| ५.१ प्रस्तावना<br>५.२ कमल देसाई<br>५.३ अंबिका सरकार<br>५.४ गौरी देशपांडे<br>५.५ विजया राजाध्यक्ष<br>५.६ वसुधा पाटील<br>५.७ आशा बगे व सानिया यांचे वेगळेपण<br>५.८ समारोप<br>५.९ संदर्भसूची / ग्रंथसूची | |

## ५.१. प्रस्तावना

आशा बगे व सानिया यांनी साधारणपणे ७० ते ८०च्या दशकात लेखनास प्रारंभ केला. स्त्रियांच्या लेखनामध्ये अग्रणी असणाऱ्या या दोन लेखिका आहेत. आशा बगे व सानिया यांनी स्त्रीवादी भूमिकेतून जास्तीत जास्त कथा लिहिल्या आहेत. स्त्रीच्या जीवनातील समस्या रंगवण्याचा व स्त्रीमनाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न या लेखिकांनी केला आहे.

१९६० नंतरच्या स्त्रियांचे लेखन कथेच्या आघाडीवर स्त्रियाही मागे नाहीत याचा प्रत्यय देणारे आहे. सर्वसाधारणपणे सगळ्यांनाच आपण प्रत्यक्षात जगतो ते वास्तव जीवन जगण्यापेक्षा आदर्श, स्वप्नवत जीवनाचे आकर्षण वाटते. स्त्री-पुरुष भेदामध्ये स्त्रिया त्यागी, सोशिक आणि प्रेमळ असे ठरवले गेले आहे तर पुरुष बलवान, खंबीर व बुद्धिमान. स्त्रीचे स्त्रीत्व त्याग आणि सोशिकपणाशी जोडले गेले आहे. पुरुषांचा पुरुषार्थ कर्तबगारीशी जोडला आहे. लेखकांकडून कळत नकळत या प्रतिमा जपल्या गेल्या. मात्र हे चित्र १९६०नंतर बदलले. या कालखंडातील स्त्रियांनी स्वतःचे व्यक्तित्व प्रकट करण्याचा प्रयत्न केला. या कालखंडातील कथा कोणत्याही एका विषयापुरत्या मर्यादित न राहता स्वानुभवातून व आत्मप्रत्ययातून लिहिल्या गेल्या आहेत.

गेल्या तीस-चाळीस वर्षातील स्त्री साहित्य गतकाळातल्या लेखनाचे पडसाद घेऊन पडले आहेत. मुळूमुळू रडण्यापासून हे लेखन बंडखोरीपर्यंत गेले आहे यात शंकाच नाही. असे असले तरी आजही स्त्री लेखिकांकडून शृंगारिक लेखन झाल्यास त्या लेखनाकडे वेगळ्याच दृष्टीने पाहिले जाते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेला आपल्या लेखनातून आव्हान देताना लेखिका आता महत्त्वपूर्ण भूमिका बजावू लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये समाजाचा स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. स्त्रीचीदेखील स्वतःकडे बघण्याची दृष्टी आत्मविश्वासपूर्ण होते आहे. याचे प्रतिबिंब स्त्रियांनी लिहिलेल्या कथांमध्ये उमटते आहे.

या प्रकरणात अशा काही स्त्रीवादी लेखिकांच्या दृष्टिकोनाचा आढावा घेऊन त्यात आशा बगे आणि सानिया यांचे वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. समकालीन लेखिकांमध्ये प्रातिनिधिक स्वरूपात पाच लेखिकांच्या साहित्यविषयक दृष्टिकोनाचा विचार केला आहे. यामध्ये कमल देसाई, अंबिका सरकार, गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष व वसुधा पाटील या लेखिकांचा समावेश आहे.

## ५.२ कमल देसाई

मराठी कथेच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा या दृष्टीने कमल देसाई यांच्या कथेकडे पहावे लागेल. कमल देसाई यांनी कथेला तरल व सूक्ष्म घाट दिला आहे. सवेदंनांच्या व प्रतिमांच्या आधारे त्या आपल्या कथेतील आशय व्यक्त करतात. मानवी मनातील गूढ गुंतागुंतीचे चित्रण करून नवकथेला वेगळे वळण देण्याचे काम त्यांनी केले आहे. मानवी मनाचा शोध त्यांच्या कथांमध्ये आहे. वैफल्यग्रस्त माणसे, दुबळी माणसे, जगणे नाकारणारी माणसे त्यांचे कथाविषय आहेत.

१९५०नंतर त्यांनी कथालेखनास प्रारंभ केला. शिक्षिकेची नोकरी करत असताना त्यांनी पहिली कथा लिहिली. ही कथा सत्यकथेच्या फेब्रुवारी १९५३च्या अंकात छापून आली. त्यामुळे ''बाई, सर्व्या घंटा झाल्या'' ही १९५३ साली प्रसिद्ध झालेली त्यांची पहिली कथा म्हणता येईल. 'वारसा' ही अनुवादित कथा कमल देसाईंच्या नावाने १९५२मध्ये प्रसिद्ध झाली.

### लेखनामागच्या प्रेरणा

त्यांच्या कथांच्या प्रेरणा जीवनानुभवांशी निगडीत आहेत. त्या लेखिका म्हणून घडण्यात वडिलांचा, साहित्याचा मोठा वाटा आहे. त्यांच्या कथालेखनाची बीजे बालपणात आहेत. बालपणापासून वस्तूंशी, ढगांशी, भिंतींशी, पाखरांशी बोलण्याची सवय त्यांना होती. त्यांच्या कथांमधील पात्रांचा वस्तूंशी घडणारा संवाद हा याचाच परिणाम आहे.

### कथालेखनाची धारणा

'कथा' हा कमल देसाई यांचा आवडता साहित्यप्रकार आहे. कथा ऐकणे, सांगणे, निर्माण करणे यामध्ये त्यांना विशेष रुची होती. त्यांनी पाश्चात्य साहित्याचे वाचन, अभ्यास केला आहे. त्यांच्या कथांमध्ये याच संदर्भ आहेत.

### कथाविश्व

'व्हर्जिनिया वुल्फ' या कथेचा अनुवाद १९५२मध्ये सत्यकथेत प्रकाशित झाला. 'वारसा' या नावाने कमल देसाई यांची पहिली कथा प्रकाशित झाली. तसेच १९५३ ते १९६२ मध्ये लिहिलेल्या १९ कथा 'रंग' व १९६३ – १९७५ मध्ये लिहिलेल्या १५ कथा 'रंग २' असे दोन कथासंग्रह १९८८या दरम्यान प्रसिद्ध झाले.

तसेच असंग्रहित कथांमध्ये वारसा - १९५२, माशी - १९६१, दादा - १९६२, भेट - १९५५, एक पहाट उगवते - १९५६, मुक्त - १९५७, पंख - १९६० या कथांचा समावेश होतो.

**कथाविषय**

कमल देसाई यांच्या कथांमध्ये मध्यमवर्गीयांचे जीवनचित्रण आहे. माणसाच्या अस्तित्वाचा शोध, मानवी मनाचा शोध, स्त्रीचे जीवनचरित्र या बाबींचे चित्रण त्यांच्या कथांमध्ये आहे. स्त्री हा त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे. स्त्रीने स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगले पाहिजे, कणखरपणे जीवनाला सामोरे गेले पाहिजे असे त्यांना वाटते. त्यांच्या कथांमध्ये संगीताचे व नाटकांचे संदर्भ येतात. उदा. महादेववाडी, तिळा बंद, बाई सर्व्या घंटा झाल्या, मी टॉलस्टॉयच्या प्रेमात पडते.

**कथेची वैशिष्ट्ये**

**१) संदर्भ संपृक्तता**

भारतीय साहित्याप्रमाणे पाश्चिमात्य साहित्याचे वाचन कमल देसाई यांनी केले आहे. बालकवींप्रमाणेच शेक्सपिअरचा संदर्भ आढळतो. 'रंग' या कथासंग्रहात ब्राऊनिंग, कालिदास, जे. कृष्णमूर्ती, संत नामदेव, सार्त्र असे संदर्भ येतात.

उदा. ''ती एकदम इजिप्शियन ममी होते आणि कसे कुणास ठाऊक आत भरलेले सारे मसाले गळून पडतात, शरीर सडतं.''[१]

**२) संवेदनपूर्ण वाक्यरचना**

संवेदनपूर्ण वाक्यरचना हे देसाई यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे कथेतील वर्णनाचा नेमका परिणाम साधला जातो.

(अ) गंधसंवेदना - प्रत्येक वस्तूला एक वेगळा गंध असतो.

उदा. ''खिडकीची काच उघडत नाही. फार अडचण होते आहे. बसभर पुरुषांचा वास भरून राहिला आहे.''[२]

(ब) स्पर्श संवेदना - उदा. ''तिच्या उघड्या दंडावर धुळीचा थर साचतो. मातीच्या कोरड्या स्पर्शानं ती थोडी विचित्रपणे उमलते.''[३]

---

१. रंग - कमल देसाई, रंग, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६२, पृ. ५९

२. रंग - रंग२, कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. १३०

३. रंग २ - कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. क्र. २७

(क) ध्वनी संवेदना – कमल देसाई पात्राच्या आवाजाचा पोत, विचार व्यक्त करण्याची पद्धत, त्या पात्राच्या लकबी ठळकपणे वाचकाच्या नजरेसमोर उभ्या करतात. त्यांचे सूक्ष्म निरीक्षण व सखोल अभ्यास यातून दिसून येतो.

उदा. ''त्याचा आवाज मुरलीसारखा मधुर आहे.''[४]

**३) फॅन्टसी**

कमल देसाई यांच्या कथा प्रामुख्याने गंभीर प्रकारच्या आहेत. पण फॅन्टसीचा आधार घेऊन त्या सूक्ष्म विनोदाची निर्मिती करतात. त्यामुळे वाचकाचा मानसिक ताण कमी होतो. फॅन्टसीशिवाय माणूस जगू शकत नाही. आपल्या रोजच्या आयुष्यात फॅन्टसी आजुबाजूला घडत असतेच. त्याचा वापर कमल देसाई आपल्या कथांमध्ये करतात.

**४) जगातील कुरुपता व किळसवाणेपणाचे दर्शन**

कमल देसाई यांच्या कथांमध्ये सौंदर्याने नटलेले, मनाला भुरळ घालणारे जीवनचित्रण येत नाही. तर बेचैन करणारे, अस्वस्थ करणारे, तणावपूर्ण चित्रण येते. उदा. 'मी एक मुंगी – तू एक मुंगी' या कथेत चिकचिक पाऊस पडत असताना चिखलाने बरबटलेल्या रस्त्यावरून कावेरी शाळेत जाण्यासाठी निघते. अशावेळी ''तिच्या शेजारी चिखलानं माखलेली दांडगी चप्पल चटकन आपटते. तिच्या पातळावर चिखल उडतो. कावेरीच्या चपलेखाली अगदी सावकाश खोलवर एक गांडूळ चिरडलं जातं आणि तसंच चिकटून राहतं.''[५]

**५) पती–पत्नी संबंध**

कमल देसाई यांच्य कथांमध्ये पती–पत्नी संबंध रुक्ष व कोरडे आहेत. स्त्रीला पतीच्या बरोबरीचे स्थान त्यांच्या कथांमध्ये नाही. कायम दडपणाखाली वावरणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथांमध्ये आहेत. मनातील सल, वेदना, शल्य लपवण्याचा प्रयत्न त्यांच्या कथानायिका करतात. त्यांच्या कथेत पती–पत्नी संबंधात एकरूपता नाही. उदा. 'भुलावण', 'अर्थ', 'एका किंचित माणसाची गोष्ट', 'श्राद्ध', 'महादेववाडी', 'ही पूर्णता'.

**६) स्त्री–पुरुष संबंध**

कमल देसाई यांच्या कथांमध्ये विवाहबाह्य संबंधांचे चित्रण आढळते.

उदा. 'मुक्त', 'आठ वर्षे', 'बांधू चिमणे खोपट की'. याही पुढे जाऊन कमल

---

४. रंग २ – कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. क्र. १४२

५. मी एक मुंगी – तू एक मुंगी, रंग, कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६२, पृ. क्र. १५५

देसाई समलिंगी संबंधांचे चित्रणही करतात. दोन स्त्रियांमध्ये असणारे संबंध 'स्वप्नकोष' या कथेत आहेत. ऋता आणि मनू या दोन स्त्रीपात्रांचे संबंध या कथेत कमल देसाई यांनी दाखवले आहेत.

**७) 'स्व'चा शोध**

कमल देसाई यांच्या कथांमध्ये 'स्व'चा शोध घेणारी पात्रे आहेत. खऱ्या 'मी'ला एका विशिष्ट चौकटीत बंद करून माणूस जगतो. त्यामुळे मनामध्ये द्वंद्व निर्माण होते. संघर्ष होतो. मग सुरु होतो 'स्व'चा शोध. कमल देसाई यांच्या 'रंग', 'तिळा बंद', 'भिंती दूर सरकतात' या कथांमध्ये असे द्वंद्व आणि 'स्व'चा शोध घेणारी पात्रे आहेत.

**८) स्त्रीचे एकाकीपण**

कमल देसाई यांच्या केंद्रस्थानी स्त्री आहे. स्त्रीचे इतरांशी असणारे संबंध, एकाकीपणाची व्यथा, समाजाशी असणारा संबंध, स्त्रीकडे समाजाची बघण्याची दृष्टी त्यांच्या कथांमध्ये आहे. स्त्रीने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करावे असे त्यांचे मत आहे. 'श्राद्ध'मधील 'शांताक्का', 'तांडव'मधील 'तापो', 'महादेववाडी'तील 'अक्का', 'अव्वा' एकाकीपणाचे दुःख सहन करतात.

कमल देसाई यांच्या कथांविषयी काही निरीक्षणे पुढीलप्रमाणे सांगता येतील –

१) त्यांच्या कथांमध्ये यातनामय, ओंगळवाणे जीवनचित्र पहायला मिळते.

२) कमल देसाई यांनी त्यांच्या कथांमध्ये कनिष्ठ मध्यमवर्गीयांचे चित्रण केले आहे.

३) त्यांच्या कथांच्या पात्रांमध्ये नकारात्मकता हा प्रमुख विशेष आहे.

४) कथा आकलनास सोप्या नाहीत.

५) कथेमध्ये बऱ्याचदा अनुभवांची सरमिसळ अनुभवायला मिळते.

६) मानवी मनातील तीव्र ताण त्यांच्या कथांमध्ये आहे.

७) गंभीर कथानक हे कमल देसाई यांच्या कथांचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.

८) त्यांच्या कथांमध्ये पात्रांना मृत्यूचे तीव्र आकर्षण आहे. तसेच त्यांच्या कथांची पात्रे मृत्यूनंतरच्या जीवनाचा शोध घेतात.

९) सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कथांमध्ये स्त्री-केंद्रस्थानी आहे.

कमल देसाई यांनी मराठी कथेच्या विश्वात मोलाची भर घातली आहे यात शंका नाही. नवकथेला एक वेगळे वळण त्यांच्या कथांमुळे प्राप्त झाले. मानवी मनातील गूढ गुंतागुंतीचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या कथा वाचकाला विचारप्रवृत्त करतात.

## ५.३ अंबिका सरकार

१९६० नंतरच्या महत्त्वाच्या लेखिकांमध्ये अंबिका सरकार आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनाने प्रसिद्ध झाल्या आहेत. १९६० ते २००० या कालखंडात त्यांनी मोजकेच लेखन केले आहे. या काळात त्यांनी ३८ कथा लिहिल्या. या कथा संख्येने कमी असल्या तरी गुणात्मकता श्रेष्ठ दर्जाची आहे. त्यांच्या कथांच्या केंद्रस्थानी स्त्री आहे. स्त्रियांचे अनुभवविश्व त्यांनी आपल्या कथांमध्ये रेखाटले आहे. वेगवेगळ्या वयोगटातील स्त्रियांच्या समस्या, व्यथा वेदना आपल्या कथांमध्ये त्यांनी मांडल्या आहेत.

### कथाविश्व

अंबिका सरकार यांनी चाळीस वर्षांच्या काळात मोजकेच कथालेखन केले आहे. त्यांचे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. चाहुल (१९८०), प्रतीक्षा (१९८१), प्रचीती (२००४).

तसेच त्यांच्या काही असंग्रहित कथादेखील आहेत. उदा. शांतवन, मैत्रीण, वंचना, क्षणभंगुर, नाळ, आरंभ, एका चरित्राची कथा, जंगल, घरदार, मळलेली वाट, खिडकी, बिकट वाट वहिवाट, प्रतीक्षा, परंपरा.

### प्रेरणा

अंबिका सरकार यांना कथालेखनाची प्रेरणा त्यांच्या आईकडून मिळाली. त्यांच्या कथांचे बीज त्यांच्या आईकडून सांगितलेल्या गोष्टींमधून मिळाले आहे. त्यांनी लघुकथा आणि दीर्घकथा हाताळल्या आहेत. अंबिका यांच्या मते, कथा लिहायला अधिक सोपे जाते. कथा हा साहित्यप्रकार त्यांना जास्त आवडतो.

### कथाविषय

अंबिका यांना त्यांच्या कथांमध्ये स्त्री महत्त्वाची वाटते. त्यामुळे स्त्रीचे जीवनानुभव हा त्यांच्या कथांचा मुख्य विषय आहे. मानसिकदृष्ट्या कोसळलेल्या स्त्रिया प्रामुख्याने दिसतात. अंबिका यांच्या कथेत घटनांना महत्त्वाचे स्थान नाही. घटनेच्या अनुषंगाने व्यक्तीच्या मनात निर्माण होणारी खळबळ, विचारांची आवर्तने, मानसिक संघर्ष कथांमध्ये येतो. त्यांच्या कथांमध्ये मृत्यूलाही महत्त्वाचे स्थान आहे.

उदा. 'चाहुल', 'वीज', 'नदीचे मूळ', 'प्रचीती', 'चुलीतली लाकडं'. त्यांच्या

कथांमध्ये स्त्रीची दुःखं, संघर्ष, दुर्दशा याचे वर्णन आहे.

**कथेची वैशिष्ट्ये**

**१) माणसांमाणसांमधील संबंध**

'गृहस्थाचं घर', 'पारख', 'सांगता', 'ताटातुटी', 'आश्रय', 'आरंभ' या कथा माणसांमाणसांतील संबंधांचा तकलादुपणा दाखवतात.

उदा. ताटातुटी, आरंभ या कथांमध्ये विभक्त कुटुंबपद्धतीमुळे दुरावत चाललेले संबंध दाखवले आहेत.

**२) पती-पत्नी संबंध**

अंबिका सरकार यांच्या कथांमध्ये लग्नाच्या बंधनात बांधल्याने नाईलाजास्तव एकत्र रहाणारी जोडपी येतात. त्यामुळे नकोसे असणारे नाते जपण्यातले ताण त्यांच्या कथांमध्ये जाणवतात. पुरुषी वर्चस्वामुळे आलेला चिडचिडेपणा स्त्री पात्रांमध्ये आहे. पती-पत्नीच्या नात्यामध्ये प्रेम, आपुलकी, माया नसून वरवरचे संबंध असल्याचे दिसून येते.

उदा. 'चार दिवस', 'वेसण', 'सौभाग्य', 'उन्हाळा', 'बीज', 'सांगता', 'लेकी बोले', 'परंपरा', 'शिळी', 'वंचना'.

**३) मृत्यूची संकल्पना**

बहुतेक कथांचा केंद्रबिंदू मृत्यू आहे. मृत्यूचे संमिश्र पडसाद त्यांच्या कथांमधील पात्रांच्या वर्तनात दिसून येतात.

उदा. 'प्रचीती', 'बीज', 'चुलीतली लाकडं', 'पार्थिव', 'ताटातुटी', 'महत्तम साधारण विभाजक', 'नदीचे मूळ', 'चाहुल', 'उन्हाळा', 'कुसुमचे डोळे मिटले होते'.

स्वकीयांच्या मृत्युमुळे मनात होणारी भावनांची उलथापालथ फक्त स्त्री पात्रांमध्ये आढळतो. अशा स्त्रियांचे वर्तन भ्रमिष्टासारखे आहे.

**४) पुरुषांची मानसिकता**

पुरुषांच्या चित्रणाला दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. पुरुषपात्राचे स्वभावदर्शन अधोरेखित करण्याकडे कल नाही. स्त्रीचे जीवन प्रकाशमय करण्यापुरताच पुरुषपात्रांचा उपयोग केल्याचे आढळते. पुरुषांची स्वकेंद्री मानसिकता दिसून येते.

उदा. 'वरणभात', 'सौभाग्य', 'उन्हाळा', 'परतफेड', 'चाहुल', 'गृहस्थाचं घर', 'बिकट वाट वहिवाट'.

## ५) वैवाहिक जीवनातील दुरावस्था

विवाहानंतर स्त्रीच्या दुरावस्थेचे चित्रण अंबिका सरकार यांच्या कथांमध्ये आहे. लग्नसंस्थेच्या बळी पडलेल्या नायिका त्यांच्या कथांमध्ये आहेत. त्यांच्या कथांमध्ये अन्याय होऊन अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यास स्त्रिया तयार नाहीत. नाईलाजाने कोंडमारा सहन करणाऱ्या स्त्रिया, पुरुषी व्यवस्थेचा बळी पडलेल्या स्त्रिया त्यांच्या कथांच्या नायिका आहेत. उदा. 'सौभाग्य', 'लेकी बोले', 'काय हरकत आहे?', 'निरुद्देष', 'वीज', 'कुसुमचे डोळे मिटले होते'.

## निरीक्षणे

अंबिका सरकार यांच्या कथाविश्वाचे अवलोकन केल्यानंतर पुढील निरीक्षणे काढता येतील -

१) त्यांच्या कथा स्त्री-केंद्री आहेत.

२) त्यांच्या कथांचे बीज आईन सांगितलेल्या कथांमध्ये आहे.

३) लहान वाक्ये, साधी भाषा हे वैशिष्ट्य आहे. कथांमध्ये क्वचित पाल्हाळही आढळते.

४) परंपरागत समजुती व नीतीतत्वाची शिकवण कथांमध्ये आहे.

५) अनपेक्षित कलाटणी देऊन वाचकाला चकवणे हे वैशिष्ट्य आहे.

६) कथेमध्ये वास्तववादी चित्रण आढळते.

७) कथांना उपरोधिक शीर्षके आहेत.

८) कधी कधी अनावश्यक गोष्टींमुळे कथा लांबते.

९) सशक्त, कसदार जीवनानुभव त्यांच्या कथांमध्ये आहे.

## ५.४ गौरी देशपांडे

१९७० नंतरच्या काळात स्वतःच्या अंगभूत वैशिष्ट्यांनी उठून दिसणारी कथा म्हणून गौरी देशपांडे यांच्या कथांचा उल्लेख करावा लागेल. स्त्रीवादी विचारांचा मोठा प्रभाव त्यांच्या कथांवर आहे. स्त्री-पुरुष समानतेचे आग्रही प्रतिपादन त्यांच्या कथांमध्ये असते. धीट, स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या व स्वतःच्या विचारांवर ठाम असणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथांच्या नायिका आहेत. पारंपारिक स्त्रीचे चित्रण न करता एक वेगळा दृष्टीकोन असलेल्या मुक्त स्त्रियांचे चित्रण गौरी देशपांडे आपल्या कथांमधून करतात.

कर्वे घराण्याकडून मिळालेला सुधारणवादी विचारांचा वारसा गौरी यांच्या लिखाणातून दिसून येतो. महर्षी धोंडो केशव कर्वे यांची नात व इरावती कर्वे यांची कन्या असलेल्या गौरी यांचे आधुनिक विचार त्यांच्या कथांमधून दिसून येतात. अफाट बुद्धीमत्ता, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, आधुनिक विचारसरणी, स्वभावातली बंडखोरी कथानायिकांची वैशिष्ट्ये आहेत.

**कथाविश्व**

१९७० नंतर त्यांचे लेखन प्रकाशित झाले. सप्टेंबर १९७० मध्ये 'कावळ्या चिमणीची गोष्ट' ही कथा सत्यकथेत छापून आली. त्यानंतर मौज, स्त्री, मोहिनी, किर्लोस्कर या मासिकांमधून कथा छापून येत होत्या. १९७० ते १९८० या दहा वर्षात लिहिलेल्या कथांमध्ये 'आहे हे असं आहे' हा कथासंग्रह १९८६ मध्ये मौज प्रकाशन गृहाने प्रकाशित केला. या कथासंग्रहामध्ये २४ कथा आहेत.

'आहे हे असं आहे' या कथासंग्रहाबरोबरच १) एका भांडणाचा शेवट २) अनुदिनी अनुतापे ३) तुझ्यासाठी एक गोष्ट ४) ओनीलचे प्रियाराधन ५) गुडबाय ड्रॅगन ६) भिजत भिजत, कोळी या असंग्रहित कथा आहेत.

**कथालेखनामागील प्रेरणा**

गौरी देशपांडे यांच्या घरातील वैचारिकता हीच त्यांच्या लेखनामागील मुख्य प्रेरणा आहे. स्वतःच्या साहित्यातून त्यांनी स्त्रियांना त्यांच्यातील माणूसपणाची जाणीव करून दिली. दीर्घकथेपेक्षा लघुकथा लिहिणे सोपे आहे असे त्यांना वाटते. ठोस मुद्दा असणाऱ्या प्रसंगाला उठाव देणाऱ्या व्यक्ती त्यांच्या कथांमध्ये आहेत.

**कथाविषय**

गौरी देशपांडे यांच्या कथांमध्ये स्त्रीचे जगणे, तिचे विश्व हे महत्वाचे विषय आहेत. संसारातल्या तिच्या वेगवेगळ्या भूमिका आणि त्या भूमिका निभावताना तिच्या मनात निर्माण होणारे विचार, समाजाची स्त्रीकडे पहाण्याची दृष्टी, स्त्रीच्या जीवनाचा शोध या विषयांवर त्यांनी कथा लिहिल्या आहेत. अर्थार्जन करत असली तरी संसारात दुय्यम स्थान असलेली स्त्री त्यांच्या कथांमध्ये आहे. आत्मनिर्भर असली तरी बंधनात अडकलेली स्त्री हा त्यांच्या कथांचा विषय आहे. स्त्रीचे दुय्यम स्थान, पती-पत्नी नात्याचे स्वरूप याविषयी गौरी यांनी कथालेखन केले आहे.

**गौरी देशपांडे यांच्या कथांची वैशिष्टये**

**१. माणसांमाणसांमधील संबंध**

माणसांमध्ये असणाऱ्या वैयक्तिक भिन्नतेमुळे माणसांच्या गराड्यात राहूनही तो एकटा असतो. असे विचार त्यांच्या कथांमधून येतात. नाती जपताना अटी सांगणाऱ्या कथा आहेत.

उदा. 'जाऊ दे', 'जाग', 'देण', 'ओहोटी'

**२. पती–पत्नी संबंध**

पतीपत्नींचे स्वभाव एकमेकांशी मिळते जुळते नाहीत असे त्यांच्या कथांमधून दिसून येते. पती–पत्नी नात्यातला अपुरेपणा, निराशा, असमाधान, चिडचिड कथांमधून जाणवते.

उदा. 'आता कुठ जाशील टोळंभटा', 'देणं', 'एकदा काय झालं', 'इंडियन समर', 'उद्दालक ऋषींची बायको', 'हात्तीच्या', 'राईट ऑन सिस्टर'.

गौरी पती–पत्नी संबंधाकडे स्त्रीच्या दृष्टिकोनातून पहातात. स्त्रीच्या मनातली खंत सांगतात. परंतु तटस्थपणे या कथांकडे पाहिल्यास कथेच्या नायिकांच्या स्वभावात दोष आढळतात.

उदा. 'उद्दालक ऋषींची बायको' या कथेतील कमल चिडचिड करणारी, रागाने बेभान होणारी, वादविवाद करणारी स्त्री आहे. 'हात्तिच्या' कथेतील नायिका क्षुल्लक वाटणाऱ्या घटनेला भडक रूप देते. याउलट पती शांत व समजूतदार आहेत.

**३. स्त्री–पुरुष संबंध**

भारतीय समाजात स्त्री आणि पुरुष यांच्यातील नाते एका ठराविक चौकटीत राहून जपले जाते. परंतु गौरी यांना व्यक्ती स्वातंत्र्याचे मूल्य जास्त वाटते. समाजाने मानलेल्या चौकटीबाहेर जाऊन ही माणसे वागतात. नैतिकतेच्या मूल्यांचा विचार ही पात्रे करत नाहीत. उलटपक्षी या मूल्यांना आव्हान देणारे प्रश्न ही पात्रे विचारतात.

उदा. 'कावळ्या चिमणीची गोष्ट', 'जाग', 'आता कुठं जाशी टोळंभटा?', 'ओहोटी'.

स्त्री–पुरुष संबंधांचा शोध गौरी यांच्या कथांमधून घेतला जातो. शारीरिक आकर्षणाला सहजपणे भुलणारी पात्रे त्यांच्या कथांमध्ये आहेत. परपुरुषाबद्दलचे आकर्षण त्यांच्या नायिकांना गैर वाटत नाही. त्यांच्या कथांमध्ये विवाहबाह्य संबंधाचे चित्रण येते. असे संबंध जोपासल्यानंतर स्त्रीच्या मनात रितेपणाची जाणीव असते. अशा सबंधांचा

ताण या पात्रांवर असल्याचे निदर्शनास येते. विवाहबाह्य संबंध समाजमान्य नाहीत. असे असूनही त्यांच्या कथांमधील नायिकांना अपराधीपणाची भावना नाही. उलट समाजात वावरताना माणूस अशा नात्यात गुंतला जाण्याची शक्यता या कथानायिकांकडून वर्तवली जाते.

**४. स्त्रियांची मानसिकता**

त्यांच्या कथेतली स्त्री सुशिक्षित आहे. शहरी जीवनशैलीचा अंगीकार केलेली आहे. कथानायिका आधुनिक विचारसरणीची आहे. स्वतंत्र स्वावलंबी बुद्धीमान आहे. गौरी यांच्या नायिका शरीरसौंदर्याच्या रूढ कल्पनांपासून मुक्त आहेत. आत्मभान असलेली स्त्री त्यांच्या कथांची नायिका आहे. लग्न आणि शरीरसंबंध यांचा काहीही संबंध नाही असे ती मानते.

उदा. 'आत्ता कुठं जाशील टोळंभटा?' मधली नायिका लेखकाच्या प्रेमात पडते. त्याच्या सहवासाचा आनंद उपभोगते. धनंजयशी प्रतारणा करत आहोत असे तिला वाटत नाही.

**५. व्यक्ती स्वातंत्र्य मानणाऱ्या स्त्रिया**

स्वतःच्या मनाप्रमाणे वर्तन करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथानायिका आहेत. इतरांची पर्वा करावी असे त्यांना वाटत नाही. वडीलधाऱ्या माणसांच्या विचारांचा आदर केला जात नाही.

उदा. 'पाऊस आला मोठा' या कथेतील सावित्रीचे वर्तन स्वैरपणाचे आहे. ती बेदरकारपणे वागते. उलट उत्तरे देते.

त्यांच्या कथांमधील स्त्रियांना दांभिकपणाचा तिटकारा आहे. माणसे इतकी खोटी का वागतात? असा प्रश्न त्यांना पडतो.

उदा. 'राईट ऑन सिस्टर' या कथेतील नायिकेला पुरुषांच्या दुटप्पी वागण्याचा संताप येतो.

**निरीक्षणे**

१. गौरी यांच्या कथेची नायिका आत्मविश्वासाने परिपूर्ण स्त्री आहे.

२. गौरी यांच्या कथानायिकांना स्वातंत्र्य हे महत्वाचे मूल्य वाटते. जबाबदारीचे भान ठेवून स्वतंत्रपणे निर्णयाची जबाबदारी स्वीकारून स्वतःचा विकास घडवावा या विचारांच्या नायिका त्यांच्या कथांमध्ये प्रामुख्याने दिसतात.

३. कथेतील पात्रे परंपरेच्या चौकटी, मानवी नातेसंबधाचे संकेत नाकारतात.

४. गौरी यांच्या कथालेखनात कमालीचा मोकळेपणा आहे. प्रणय, शृंगाराचे बिनधास्तपणे केलेले वर्णन त्यांच्या कथांमध्ये आहे.

५. मोजक्या शब्दात मोठा आशय व्यक्त करण्याची ताकद त्यांच्या कथांमध्ये आहे.

६. प्रामाणिक अनुभवकथन हे त्यांच्या कथांचे वैशिष्ट्य आहे.

७. तीव्र निरिक्षणशक्ती, फुटकळपणा, मिश्किल शैलीतून येणारा उपहास त्यांच्या कथांमध्ये आहे.

८. पुरोगामी विचारांच्या कथा लिहून त्यांनी भविष्यातील वैचारिक क्रांतीची नांदी केली आहे.

गौरी देशपांडे यांच्या कथेत आत्मनिर्भर, आत्मविश्वासाने संकटांना सामोरी जाणारी स्त्री आहे. स्वतः घेतलेल्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारणाऱ्या परंपरेच्या चौकटी न मानणाऱ्या नायिका त्यांच्या कथांमध्ये आहेत.

## ५.५ विजया राजाध्यक्ष

विजया राजाध्यक्ष यांची कथा वेगळ्या वाटेने जाणारी आहे. वेगळ्या जाणीवा जपणारी कथा विजयाताईंनी लिहिली. साहित्यातून नवी दिशा देण्याचे काम त्यांच्या कथेने केले. मराठी साहित्यात स्त्रीवादी लेखन व समीक्षा करणाऱ्या लेखिकांमध्ये त्यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते.

एल्फिस्टन्स महाविद्यालय व एस. एन. डी. टी. विद्यापीठात त्यांनी मराठीचे अध्यापन केले आहे. कथाकार आणि समीक्षक म्हणून प्रसिद्ध असलेल्या विजया राजाध्यक्ष यांनी ललित लेखनाला सुरूवात केली ते मानिनीतील सदरातून. त्या सदराचे नाव होते 'नित्य नवा दिस जागृतीचा'. सहा दशके अविरतपणे लेखन करणाऱ्या विजया राजाध्यक्ष यांची प्रामुख्याने ओळख आहे ती कथालेखिका आणि समीक्षक म्हणून. त्यांच्या कथा प्रामुख्याने मध्यमवर्गीय परिवेषातले स्त्रीजीवन चित्रित करण्यावर भर देते. त्यांच्या मते, ''स्त्रीने स्वतंत्र होणे म्हणजे पुरुषांचे न शोभणारे अनुकरण करणे नव्हे तर आपल्याला आलेल्या बऱ्या-वाईट अनुभवांबद्दल लिहिणे, बोलणे, व्यक्त होणे. ते मौनात न जिरवणे म्हणजे खरी स्त्री होणे.''

### कथाविश्व

१९६५ मध्ये 'अधांतर' हा त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्यांनतर टिंबे (१९६५), विदेही (१९७२), अनोळखी (१९७३), पारंब्या (१९७६), अकल्पित (१९७६), कमान (१९७८), लॅंडिंग (१९७८), उघडमीट (१९७८), हुंकार (१९८४), अखेरचे पर्व (१९८८), वेचक विजया राजाध्यक्ष (१९९०), अनामिक (१९९०) हे कथासंग्रह प्रकाशित झाले.

### कथालेखनाच्या प्रेरणा व कथेचे विषय

आपल्या कथालेखनातून स्त्री आणि स्त्रीजीवन यांना केंद्रस्थानी ठेवणाऱ्या विजयाताईंनी आपल्या कथांमधून प्राधान्याने महाराष्ट्रीय मध्यमवर्गी स्त्री-जीवनाचा पट मांडण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीचे मन, तिचे विचार, तिचे नाते यामधली तरलता त्यांच्या कथांमध्ये आहे. आधुनिकता आणि परंपरा यांची सांगड घालणाऱ्या विजयाताईंच्या कथा सामान्य वाचकांनाही आवडतात. आपल्या कथाविश्वात स्त्री पात्रांना प्राधान्य देणाऱ्या विजयाताई मानवी मनाविषयी, मानवी मनात निर्माण होणाऱ्या गुंत्याविषयी समरसून लिहितात. आपल्या कथांमथ्ये सामान्य माणूस आणि मध्यमवर्गीय कुटुंब केंद्रस्थानी ठेवणाऱ्या कथांमध्ये साध्या माणासाची निरागसता त्याचे सुख, जगण्यासाठी लागणारे बळ व स्त्री-पुरुषांचे सहजीवन किती महत्वाचे आहे यावर विजयाताईंनी लेखन केले आहे. त्यांच्यातला साधेपणा, संवेदनशीलता हेच त्यांचे लेखन सामर्थ्य आहे.

### कथेची वैशिष्टये

#### १. स्त्रीला प्राधान्य

नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीला गुंतागुंतीला सामोरे जावे लागते. समाजात आणि घरात तिला अनेक प्रश्न भेडसावतात. या सगळ्याचे चित्रण विजयाताईंच्या कथांमध्ये आहे.

उदा. 'विसंवाद' या कथेत प्रश्नांचा बारकाईने शोध घेण्यात आला आहे. स्वावलंबी जीवनाचे समर्थन करणाऱ्या विद्याला मुलांकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. सतत नाटकाच्या दौऱ्यांवर असणाऱ्या विद्याचा मुलगा तिच्यापासून दुरावतो. हे दुरावलेपण मुलीच्या आजारपणात तिच्या लक्षात येते. आपला मुलगा आपल्याला ओळख देत नाही हे शल्य तिला अस्वस्थ करते.

## २. अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांचे अनुभव

नोकरी करणाऱ्या स्त्रियांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे समाजाचा विरोध अनुभवायला लागतो याचे चित्रण त्यांच्या कथांमध्ये येते.

'वेचक विजया राजाध्यक्ष' या कथेत महाविद्यालयात प्राध्यापिकेची नोकरी करणाऱ्या कथेच्या नायिकेला तिच्या सहकाऱ्यांकडून विरोध पत्करावा लागतो. मात्र या सगळ्याला सामोरे जाऊन आपले काम करणाऱ्या खंबीर नायिकेचे चित्रण या कथेत येते.

## ३. स्त्री-पुरुष संबंध

स्त्री-पुरुष शारीर अनुबंधाचे विविध दृष्टिकोन त्यांच्या कथांमध्ये येतात. स्वतःच्या शारिरिक गरजा भागवणे हा शरीराचा स्वभावधर्म असल्याचे अनेक कथांमधून चित्रित झाले आहे.

उदा. अनोळखी, विदेही, माझी गोष्ट, पुरुष

व्यक्तीच्या जीवनातील वासना, मोह, विकार, शरीर आकर्षण, स्त्री-पुरुषांची मानसिकता, गर्भारपण, बाळंतपण, प्रसूती यासारखे स्त्रीनिष्ठ अनुभव त्यांच्या कथांमध्ये येतात. शरीराच्या तृप्तीसाठी धडपडणारे, मिलनोत्सुक असणारे, तृप्तीचे सुख अनुभवणारी स्त्री-पुरुष पात्रे विजयाताईंच्या कथाविश्वात आहेत.

## ४. मृत्यूचे चिंतन

माणसाच्या मृत्यूचे चिंतन त्यांच्या कथांमध्ये आहे. माणसाच्या मृत्यूमुळे आप्तस्वकियांवर होणारा परिणाम व त्याचे मनोविश्लेषणात्मक चित्रण त्यांच्या कथांमध्ये आहे.

उदा. 'तीन दृष्टांत', 'देह', 'मृत्यूचे भातुके', 'वॉर्ड', 'कुबड्या', 'आशा' इत्यादी.

माणसाला मृत्यूचे भय वाटतेच. मृत्यूपेक्षा मृत्यूची भिती माणसाला खचवते. चाहुल अंतमुख करते. मनाला जाणवणारे एकाकीपण, शून्यपण याचे संदर्भ त्याच्या कथांमध्ये येतात.

एक वेगळा विचार, जीवनानुभव सांगणारी कथा म्हणून विजयाताईंच्या कथेचा विचार करावा लागेल.

**निरिक्षणे**

१. विजयाताईंच्या कथांामध्ये पांढरपेशा मध्यमवर्गाचे चित्रण केले जाते.

२. सुखवस्तु कुटुंबाचे जीवन कथांमधून अनुभवायला मिळते.

३. बदलत्या काळातील बदलती जीवनमूल्ये हे विजयाताईंच्या कथेचे वैशिष्ट्य आहे.

४. भौतिक सुखाच्या मागे लागलेला आत्मकेंद्री व स्वार्थी वर्ग त्यांच्या कथांमध्ये आहे.

५. ढासळणारे कौटुंबिक जीवन त्यांच्या कथांमधून अनुभवायला मिळते.

६. बदलणारी सांस्कृतिक मूल्ये कथांमध्ये आहेत.

७. स्त्री-पुरुष संबंधाची नवी परिमाणे कथांमध्ये आहेत.

८. स्त्रीला प्राधान्य आहे. त्यांच्या कथा स्त्रीकेंद्री आहेत.

वेगळ्या वळणाने जाणारी कथा विजया राजाध्यक्ष यांनी लिहिली आहे. मराठी साहित्यात स्त्रीवादी लेखन व समीक्षा करणाऱ्या लेखिकांमध्ये विजयाताईंचे स्थान अनन्यसाधारण आहे.

## ५.६ वसुधा पाटील

चाळीस वर्षांहून अधिक काळ लेखन केलेल्या वसुधा पाटील यांनी स्त्रीच्या जीवनदर्शनाचे विविध पैलू आपल्या लेखानातून दाखवले आहेत. १९६० ते २००१ या कालखंडात त्यांनी कथालेखन केले आहे. शिक्षिका म्हणून नोकरी करत असल्याने त्यांचा विविध स्तरांशी संबंध आला. नोकरीतून मिळालेला व्यासंग, बहुश्रुतता, चिकित्सक वृत्ती याचे दर्शन त्यांच्या कथांमधून घडते. नव्या जीवनपद्धतीशी जुळवून घेताना पारंपारिक बंधनाशी होणारा संघर्ष त्यांच्या कथांमधून येतो. वसुधा पाटील यांनी रूढार्थाने बंडखोर लेखन वगैरे केले नाही. तरी त्यांच्या कथा या मातीशी नाते जपणाऱ्या आहेत. समाजव्यवस्थेतील पारंपारिक बंधने व बंधनातून मुक्त होऊ पहाणारी स्त्री त्यांच्या कथेची नायिका आहे.

**लेखनाच्या प्रेरणा**

वसुधा पाटील यांना नोकरीच्या निमित्ताने मिळालेले अनुभव त्यांच्या कथालेखनाच्या प्रेरणा आहेत. वाचनाची आवड ही मुख्य प्रेरणा म्हणता येईल. कौटुंबिक कथा लिहिताना

बदलत जाणारी कौटुंबिक स्थिती त्यांच्या कथांमध्ये दिसून येते. परंपरा जपूनही स्वत्व जपणारी स्त्री त्यांच्या कथांमध्ये आहे.

**कथाविषय**

चाळीस वर्षांच्या प्रदीर्घ काळात वसुधा पाटील यांचे २७ कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांनी 'जमुना के तीर' या कथासंग्रहापासून लेखनाला सुरूवात केली. या पहिल्या कथासंग्रहातच नव्या जाणीवांचे परिपक्व दर्शन घडते. नव्या परिस्थितीशी जुळवून घेताना येणारा मानसिक ताण त्यांच्या कथेचा विषय आहे. कौटुंबिक जीवनातले स्थित्यंतर हा मुख्य गाभा असल्याचे जाणवते.

**कथालेखनाची वैशिष्टये**

**१. कौटुंबिक जीवनचित्रण**

वसुधा पाटील यांच्या कथांमध्ये कौटुंबिक जीवनचित्रण आढळते.

उदा. 'नातं', 'रक्ताची ओढ', 'भेट', 'जाऊ', 'चांदणी'. त्यांच्या कथांमध्ये वृद्धांचे प्रश्न मांडले जातात.

उदा. 'हळवा दगड', 'परवड', 'उतरती उन्हं', 'श्यामसुंदर'.

घटस्फोटामुळे विभक्त होणाऱ्या कुटुंबाचे चित्रण वसुधा पाटील आपल्या कथांमधून करतात.

उदा. 'बिऱ्हाड', 'अकाली मोहोर', 'पत्र', 'सोबत', 'द्विधा'.

पुनर्विवाह हा विषय त्यांच्या कथांमध्ये आहे.

उदा. 'आई', 'दुसरं लग्नं', 'एका खुनाची गोष्ट', 'एकटी'.

व्यसनाधीनतेचे तोटे, व्यसनाधीनतेमुळे आलेली संकटे त्यांच्या कथांमध्ये आहेत.

उदा. 'ओंडका', 'पुरुष', 'सनई', 'वाकळ', 'नामर्द'.

**२. पाश्चात्य कुटुंबांची दुःख**

वसुधा पाटील यांच्या कथांमध्ये आपल्या देशातील कुटुंबांचे चित्रण केले आहे. कौटुंबिक वातावरण, कौटुंबिक प्रश्न हे त्यांच्या कथांचे मुख्य विषय आहेत. त्यांनी भारतातल्या कुटुंबातले प्रश्न प्रभावीपणे मांडले आहेत. तसेच पाश्चात्य कुटुंबांची दुःखदेखील मांडली आहेत.

उदा. ‘प्रमेय’, ‘पिढी’, ‘डायरी’.

**३. स्त्री–पुरुष संबंध**

कौटुंबिक समस्यांचा विचार करताना विवाहसंस्थेतील दोषांचा निर्देशही त्या करतात. परंपरागत विवाहसंस्थेतील अनिष्ट चालीरीती दूर करून नव्या स्वरूपात विवाहाकडे पाहिले पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे. स्त्रीला निर्णयाचे स्वातंत्र्य असावे व कुटुंबाचा त्या निर्णयाला मार्गदर्शक म्हणून पाठिंबा असावा असे त्यांना वाटते. आंतरजातीय विवाहाकडे स्त्री–पुरुष संबंधांचे परिमाण म्हणून त्या पहातात.

**निरीक्षणे**

१. वसुधा पाटील यांच्या कथा जीवनव्यवहाराशी संबंधित आहेत.
२. स्त्री–पुरुष संबंधातील चित्रणाचे विविध पैलू त्यांच्या कथेमध्ये आहेत.
३. कौटुंबिक जीवनातील स्थित्यंतराचा शोध त्यांची कथा घेते.
४. बदलत्या जीवनमूल्यांचा शोध त्यांच्या कथांमध्ये आहे.
५. सामाजिक विषयांवर त्यांनी कथालेखन केलेले आहे.
६. त्यांच्या कथा प्रेमविषयक, कुटुंबविषयक, मनोविश्लेषणात्मक आहेत.
७. समन्वयवादी व मावळ स्त्रीवादी दृष्टीने लिखाण केले आहे.
८. कौटुंबिक जीवनातील स्त्री–पुरुषांच्या विचारांचे, वासनाविकारांचे, विकृतीचे निर्भीड चित्रण वसुधा पाटील आपल्या कथांमधून करतात.

नव्या जाणीवांच्या परिपक्व कथा देऊन वसुधा पाटील यांनी मराठी साहित्यक्षेत्रात मोलाची भर घातली आहे.

## ५.७ आशा बगे व सानिया यांचे वेगळेपण

मराठी साहित्यविश्वात स्त्रीच्या भावभावनांचे प्रभावीपणे चित्रण करणाऱ्या लेखिकांमध्ये आशा बगे व सानिया यांचे निश्चितपणे वेगळे स्थान आहे. स्त्रीची स्वत्वाची ओढ, कुटुंबाशी असणारे नाते, सत्याची असणारी ओढ, त्यातून तिचा होणारा आत्मशोध या बाबी आशा बगे यांच्या कथांमधून दिसून येतात. साधी, सोपी लेखनशैली आणि माणसामाणसामधील नातेसंबंध वेगळ्या पद्धतीने दाखवणे हे या लेखिकेचे सामर्थ्य आहे.

आपल्याला भावलेला अनुभव त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणातून प्रतीकात्मक भाषेत सानिया आपल्या कथांमधून मांडतात. बाह्यविश्वातील घडामोडींबरोबरच माणसाच्या

अंतर्मनातील हेलकावे शब्दांकित करण्याचे अनोखे सामर्थ्य सानिया यांच्या लेखणीत आहे. सानियांचे साहित्य वाचताना मेंदूला जडपणा येतो आणि मानवी मनाच्या अंतरंगात शिरून निष्कर्ष काढण्यात मन गुंतून जाते.

आशा बगे आणि सानिया या दोघींमध्ये वाचक म्हणून स्वतःला बघण्याचा मोह आवरत नाही. परंपरेची चौकट जपणाऱ्या आशाताई आणि चौकटीबाहेर जाऊन मला काय हवे? याचा विचार करणाऱ्या सानिया मनाला भावतात. आशाताईंच्या कथानायिकांचे जीवन आणि स्वतःचे जीवन यांच्यातले साम्य तसेच सानिया यांच्या कथानायिकांसारखे मुक्त जगण्याची इच्छा या दोन्ही विचारांनी मन व्यापून जाते. माणसामाणसामधील भावबंध पुन्हा पुन्हा तपासून पहाणे, निव्वळ नात्याचे लेबल न लावता अलवार नात्यांचा शोध घेणाऱ्या आशाताई मनाला भावतात. पुरुषप्रधान व्यवस्थेला आव्हान देणारे लेखन सानिया यांनी केले आहे. त्यांनी निर्मिलेली पात्रे परंपरेच्या चौकटी झुगारून देतात. सानिया यांची बहुतेक पात्रे पर्याय शोधण्यावर विश्वास ठेवतात.

'आयुष्य जगायचं तर स्वतःला हवं तसं' याचा उल्लेख त्यांच्या कथांमधून आढळतो.

समकालीन लेखिकांपैकी पाच लेखिकांचे कथाविश्व अभ्यासल्यानंतर आशा बगे व सानिया यांच्या कथालेखनाचे व कथाविषयांचे वेगळेपण जाणवते.

**आशा बगे यांच्या कथेचे वेगळेपण**

१. अस्तित्ववाद, स्त्रीवाद अशा कोणत्याही वादाचा पुरस्कार त्यांची कथा करत नाही.

२. प्रयोगशीलतेची हौस त्यांच्या कथेला नाही.

३. व्यक्तीच्या मनातील सूक्ष्म आंदोलनांचा मागोवा घेण्यात त्यांच्या कथेला विशेष रस आहे.

४. आशाताई जीवनानुभवांना कथेच्या प्रेरणा मानतात. त्यांच्या आजवरच्या जीवनाचा परिपाक म्हणजे त्यांचे लेखन आहे.

५. स्वानुभवातून केलेल्या लेखनामुळे त्यांच्या कथांमधली वातावरणनिर्मिती वाचकाला थेट त्या स्थळी घेऊन जाते.

६. विदर्भातील सरंजामशाही वातावरणाचे, कर्मकांडाचे चित्रण त्यांच्या कथेत येते. त्या स्वतः परंपरेची जपणूक करणाऱ्या कुटुंबाचा एक घटक असल्याचे जाणवते.

७. ‘संगीत’ हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे त्यांच्या कथांमध्ये संगीत वेगवेगळ्या रूपात येते.

८. लघुकथा, दीर्घकथा व कादंबरी या तीनही साहित्य प्रकारात लघुकथा त्यांना जवळची वाटते. लघुकथा हा कठीण परंतु उदात्त साहित्यप्रकार आहे असे त्या मानतात.

९. आशाताईंना पावासाचे आकर्षण आहे. त्यांच्या कथांमध्ये पावसाची वेगवेगळी रूपे अनुभवायला मिळतात.

१०. कथेच्या विषयाच्या संदर्भात त्यांना माणूस महत्त्वाचा वाटतो. भारतीय परंपरेतील कर्मकांडाला त्यांच्या कथेत विशेष स्थान आहे.

११. परंपरा, कुलाचार, रीतीभाती, व्यक्तीच्या श्रद्धा, समजुती, कीर्तनपरंपरा, उत्सव, सणवार याचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमध्ये नेहमीच अनुभवायला मिळते.

१२. एकीकडे परंपरेने चालत आलेल्या संस्कारांचा मनावरील पगडा व दुसरीकडे बदलत जाणारी संस्कृती यामुळे निर्माण होणारी गुंतागुंत त्यांच्या कथांमध्ये दिसून येते.

१३. नातेसंबंध, नात्यांमधले ताण, जुन्या-नव्या पिढीतील संघर्ष, स्त्रीजीवनाच्या समस्या, व्यक्तीचा सश्रद्ध वृत्तीशी चाललेला झगडा हे विषय त्यांच्या कथांमध्ये येतात.

१४. माणसामाणसामधील नातेसंबंधांचा रेशीम गोफ त्यांच्या कथांमधून अनुभवायला मिळतो.

१५. आशाताई आपल्या कथांमधून वृद्धांची मानसिकता अतिशय भावपूर्ण रीतीने मांडतात.

१६. स्त्रीची वैवाहिक आयुष्यातील दुरावस्था त्यांनी आपल्या काही कथांमधून मांडली आहे.

१७. प्रभावी व्यक्तीचित्रण हे त्यांचे महत्त्वाचे लेखनवैशिष्ट्य आहे. स्वार्थी, क्षमाशील, धूर्त, बंडखोर, सुशील अशी सर्व स्त्रीपात्रे त्यांच्या कथांमध्ये आहेत.

१८. ‘स्त्रीवादी’ असा शिक्का जरी त्यांच्यावर बसला असला तरी पुरुषाच्या दृष्टिकोनातूनही त्यांनी लेखन केले आहे.

१९. परंपरेतील नैतिक मूल्यांची चाड असणाऱ्या, धीट, बुद्धिमान, समंजस, बंडखोर परंतु चौकट न मोडणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथानायिका आहेत. तोडण्यापेक्षा

जोडण्याकडे त्यांच्या पात्रांचा कल जास्त आहे. स्त्रीमुक्तीच्या कल्पनांनी भारावून जाऊन अतिरेकी वर्तन करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथेत अपवादात्मकच सापडतात.

२०. आशाताईंच्या साहित्यनिर्मितीचा आरंभ कवितेतून झाला आहे. काव्यात्म वृत्तीचे पडसाद त्यांच्या कथांमध्ये उमटले आहेत.

सानिया यांच्या बहुतेक कथा स्त्रीकेंद्री आहेत. स्त्रियांचे अनुभवविश्व बहुतेक कथांमध्ये केंद्रस्थानी आहे. त्यामुळे कौटुंबिक नातेसंबंधातून उत्पन्न होणारे ताण चित्रीत करण्यावर सानिया यांनी आपले लक्ष केंद्रित केलेले दिसते. त्यामुळे कदाचित त्यांच्या नायिका सुशिक्षित व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आहेत.

१. सानियांना लहानपणापासूनच गोष्ट रचून सांगायला आवडत असे.

२. त्यांच्या सगळ्या कथा त्यांच्या अनुभवांशी निगडीत आहेत.

३. सुशिक्षित, अशिक्षित, स्वावलंबी, परावलंबी, कर्तृत्ववान, सामर्थ्यवान स्त्रिया त्यांनी आपल्या साहित्यात समाविष्ट केल्या आहेत.

४. त्यांनी संयमी स्त्रीवाद समंजस मनाने स्वीकारला असून पुरुषप्रधान संस्कृतीतले पुरुष व माणुसकी जपणारे पुरुषही सानियांच्या कथांमध्ये आहेत.

५. सानिया यांच्या साहित्यातली स्त्री नवी पाऊलवाट निर्माण करते.

६. सानिया यांनी अनुवादित साहित्याची निर्मिती केली आहे.

७. सानिया यांच्या कथा स्त्रीकेंद्री आहेत. तरीदेखील पुरुषाच्याही मनाचा कोंडमारा होतो हे सानिया यांच्या कथेत अनुभवायला मिळते.

८. त्यांच्या कथांमध्ये हट्टी, आततायी स्वभाव असलेल्या स्त्रिया आहेत तसेच क्षमाशील स्त्रियादेखील आहेत.

९. सानियांच्या नायिका आंतरिक बळावर वेगवेगळे अनुभव घेतात व निर्भिडपणे सत्याला सामोऱ्या जातात. त्यासाठी वाट्टेल ती किंमत द्यायची त्यांची तयारी असते.

१०. कमालीचा आत्मविश्वास त्यांच्या नायिकांमध्ये आहे. त्यामुळे कमालीच्या आत्मनिर्भर स्त्रिया त्यांच्या कथानायिका आहेत. काही वेळा चुकत, अडखळत जीवनात पुढे जातात.

११. स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून तिच्या अस्तित्वाचा शोध त्यांची कथा घेते.

१२. सानिया स्त्रीवादी लेखिका म्हणून प्रसिद्ध असल्या तरी त्या कोणत्याही वादाचा पुरस्कार करत नाहीत. त्यांच्या साहित्यात त्यांना स्त्री महत्त्वाची वाटते. स्त्रीच्या ठायी असणारी शक्ती त्यांना स्तिमित करते. यातूनच त्या स्त्रीचा विविधांगी शोध घेतात.

१३. लिहून व्यक्त करणे व लिहिता लिहिता व्यक्तीमनाचा शोध घेणे त्यांना आवडते. त्यामुळे कोणएक व्यक्ती किंवा तिचा प्रभाव त्यांच्या कथांवर आढळत नाही.

१४. त्यांच्या कथांमधील नायक, नायिकांना चित्रकलेची आवड आहे. त्यांच्या कथांमध्ये रंगांचा उल्लेखही आढळतो.

१५. लग्नाशिवाय परपुरुषाशी संबंध किंवा विवाहबाह्य संबंध ठेवण्यात त्यांच्या कथानायिकांना विशेष गैर वाटत नाही.

१६. १९८० पर्यंतच्या त्यांच्या कथा धूसर, दुर्बोध आहेत. परंतु नंतरच्या काळात त्यांच्या कथालेखनात अमूलाग्र बदल झालेला दिसून येतो.

१७. त्यांच्या बहुतेक कथा एकाकीपणा अधोरेखित करतात. अंतर्मनाशी संवाद साधणारी पात्रे त्यांच्या कथांमध्ये आहेत.

१८. त्यांच्या कथांमध्ये उच्चमध्यमवर्गीय समाजाचे चित्रण अनुभवायला मिळते. दलित, ग्रामीण स्त्री त्यांच्या कथांमध्ये नाहीत.

१९. गरीबी, बेरोजगारी, गुन्हेगारी वृत्ती, संप हे प्रश्न त्यांच्या कथांमध्ये येत नाहीत. वैचारिक तरंग असणाऱ्या कथा त्यांच्या कथासंग्रहांमधून आहेत.

२०. कथांचा शेवट अधांतरी सोडून दिल्याने वाचक आपल्या पद्धतीने कथेच्या शेवटाचा विचार करतो. वाचकाला विचारप्रवृत्त करण्यासाठी सानिया कथांचा शेवट वाचकावर सोडून देतात.

## ५.८ समारोप

आशा बगे व सानिया यांच्या कथालेखनाचे वेगळेपण समजण्यासाठी त्यांच्या समकालीन पाच लेखिकांच्या कथांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. कमल देसाई, अंबिका सरकार, गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष व वसुधा पाटील यांच्या कथांचा अभ्यास केल्यानंतर आशा बगे व सानिया यांच्या कथा वेगळ्या कशा आहेत हे निरीक्षणातून नोंदविण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. केवळ स्त्रियांच्या कथनात्मक साहित्यातच नव्हे तर समग्र मराठी साहित्य परंपरेमध्ये ज्यांचे स्थान लक्षणीय ठरते अशा लेखिकांमध्ये

या दोन्ही लेखिका अग्रणी आहेत. आपल्याला भावलेले अनुभव, सूक्ष्मपणे व वाचकाला भावतील अशा भाषेत मांडण्याचे कसब या दोघींमध्ये आहे. त्यांच्या समकालीन लेखिकांचे लेखनही दर्जेदार आहे. पण आशा बगे व सानिया या दोघी व त्यांच्या कथा मला माझ्या आयुष्याचा भाग वाटतात. आपल्या जीवनाच्या अविभाज्य अशा 'मन' या अनाकलनीय भागाचा त्यांच्या कथांमध्ये खूप विचार केला आहे. आपले मन आपल्या प्रत्येक विचारामध्ये, कृतीमध्ये सामावलेले असते. आशा बगे व सानिया यांनी या मनाच्या तळापर्यंत जाऊन विचार मांडले आहेत. मनोविश्लषणात्मक कथा, भावनांचे योग्य प्रकटीकरण, स्त्रीचे तरल मन, प्रेम या भावनेचा अविष्कार, स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती, आपल्या हातून घडणाऱ्या चुकांचे समर्थन न करता जबाबदारी पेलणाऱ्या कथानायिका ही त्यांच्या कथांची वैशिष्ट्ये आहेत. स्त्री हा केंद्रबिंदू असूनही पुरुषाच्या मनोभूमिकेचा देखील विचार या दोघींच्या कथांमध्ये करण्यात आला आहे. मानवी मनातील हिंदोळे शब्दबद्ध करण्याची हातोटी या दोन्ही लेखिकांना आहे. 'कथा' या वाङ्मय प्रकाराची निवड करून छोट्याशा खिडकीतून भावनांचे आभाळ दाखवण्यात या दोन्ही लेखिका यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या कथा विचारप्रवृत्त करतात. कित्येकदा आपल्या आयुष्याचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमधून अनुभवायला मिळते. आपल्या आयुष्यातील प्रश्नांची उत्तरे त्यांच्या कथा देतात. आपल्या भरकटलेल्या आयुष्याला दिशा देतात. मनाच्या हिंदोळ्यांना शब्दबद्ध केल्याने आपल्याच मनाच्या खोड्या आणि मनाची ताकद ओळखायला मदत होते. जीवनाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन त्यांच्या कथा देतात. आशा बगे व सानिया यांच्या कथा मनापासून भावतात. या दोन्ही लेखिकांचे आवडते विषय माझेदेखील आवडते आहेत. उदाहरणे द्यायची झाली तर मन, पाऊस, प्रेम, माणसामाणसामधील नातेसंबंध, परंपरा व नवता यांचा संगम, बंडखोरी करण्याची वृत्ती ही देता येतील. साहित्यातून जगण्याची दिशा मिळावी असे म्हटले जाते. आशा बगे व सानिया यांच्या कथा जगण्याची दिशा देतात. इतकेच नव्हे तर जगण्याचा अर्थ नव्याने समजावून सांगतात. या दोघींचे व्यक्तिमत्व त्यांच्या कथांमधून स्पष्टपणे अनुभवायला येतात. आशा बगे व सानिया यांचे मिश्रण माझा स्वभाव आहे. कदाचित त्यामुळेच या दोन्ही लेखिका माझ्या प्रबंधाचा विषय बनल्या आहेत. कथांची आशयघनता व संवेदनशीलता यामुळे या दोन्ही लेखिकांनी माझ्या मनावर मोहोर उमटवली आहे. त्यांच्यासारखेच लिखाण माझ्याही हातून व्हावे असे वाटते. स्वतःचा दृष्टिकोन व्यापक व विकसित करून लेखन करण्याचा मंत्र या दोन लेखिकांच्या व त्यांच्या कथांच्या

सहवासातून मिळाला आहे. मानवी मनाचे अंतरंग शोधून काढणारे लेखन वाचक, अभ्यासक व एक स्त्री म्हणून प्रेरणा देणारे आहे यात शंका नाही. त्यांच्या लेखनाने समृद्ध झालेल्या विचारांची शिदोरी भावी जीवनातही उपयोगी पडणार आहे. आशा बगे व सानियामय झालेल्या माझ्या व्यक्तिमत्वाला प्रेरणा देणाऱ्या या दोन्ही लेखिकांना मनापासून धन्यवाद!

## संदर्भसूची


१. रंग – कमल देसाई, रंग, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६२, पृ. ५९
२. रंग – रंग२, कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. १३०
३. रंग २ – कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. क्र. २७
४. रंग २ – कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. क्र. १४२
५. मी एक मुंगी – तू एक मुंगी, रंग, कमल देसाई, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६२, पृ. क्र. १५५


## ग्रंथसूची


१. रंग
२. रंग २

| प्रकरण ६ उपसंहार | पृष्ठ क्र.<br>३९७ ते ४३६ |
| --- | --- |
| अ. प्रस्तावना<br>ब. सारांश<br>क. पुढील संशोधनासाठी उपस्थित विषय<br>ड. प्रबंधाची आधुनिक काळातील उपयुक्तता | |

## अ. प्रस्तावना

उपसंहार या प्रकरणात आत्तापर्यंत अभ्यासलेली प्रकरणे सारांश रूपाने पाहू या. आशा बगे व सानिया यांच्या कथासाहित्याचा अभ्यास करताना माणूस म्हणून जाणीवा प्रगल्भ झाल्या. त्यांच्या कथांच्या प्रदेशात जाण्यापूर्वी कथा या साहित्यप्रकाराचा व त्याचबरोबर अन्य साहित्यप्रकारांचा अभ्यास केला. त्यामुळे अन्य साहित्यप्रकारांमधून कथेचे निराळेपण शोधता आले. कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र या सगळ्या प्रकारांमध्ये कथा या साहित्य प्रकाराचे वेगळेपण समजल्याने आशाताई व सानियांच्या कथा वाचणे सोपे गेले.

आशाताई व सानिया यांच्या कथांनी वैचारिक, मानसिक परिपक्कता दिली. आपल्याच अवतीभवती घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब या दोघींच्या कथांमध्ये दिसून आले. आशाताईंच्या १३ कथासंग्रहांचा व सानियांच्या ११ कथासंग्रहांचा समावेश या प्रबंधात केला आहे. या दोन्ही लेखिकांनी स्त्री-केंद्री कथा लिहिल्या आहेत. नायिकाप्रधान कथा हे मुख्य वैशिष्ट्य आहे. स्त्रीची घुसमट, तिची व्यथा, तिचे प्रश्न, तिच्या भावभावना याचे चित्रण त्यांच्या कथांमधून दिसते. नातेसंबंधांचा शोध घेणाऱ्या या कथा मनाला भावतात. मनोविश्लेषणात्मक कथाप्रकार हे या दोन्ही लेखिकांच्या कथांचे मुख्य वैशिष्ट्य आहे. आपल्या सभोवती असणाऱ्या जगाचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमध्ये दिसून येते. या दोघींनी स्त्रीकेंद्री लिखाण केले असले तरी त्यांनी पुरुषप्रधान कथादेखील लिहिल्या आहेत. पुरुषप्रधान कथा लिहितानादेखील त्यांची लेखणी कमाल करते. लहान मुले, वृद्ध यांच्या समस्या त्यांच्या कथांमध्ये आहेत. आशाताईंच्या कथांमध्ये नागपूर व विदर्भाचे संदर्भ येतात. सानिया यांच्या कथांमध्ये आपल्या देशाबरोबरच परदेशाचेही वर्णन येते.

या दोन्ही लेखिकांमधले साम्य आणि विरोध शोधताना अनेक मुद्यांचा विचार केला आहे. कथेचा विकासक्रम, लेखनशैली, कुटुंबसंस्थेकडे बघण्याचा दृष्टिकोन, निवेदनशैली, वातावरण निर्मिती, कथेची शीर्षके या व अशा अनेक गोष्टींचा विचार केला आहे.

या दोन्ही लेखिकांचा जीवनविषयक दृष्टिकोन त्यांच्या कथांमधून अनुभवायला मिळाला. त्यामुळे जगण्याच्या जाणीवा समृद्ध झाल्या.

## ब. सारांश

### प्रकरण १

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये कथा या साहित्यप्रकाराचा अभ्यास केला आहे. यासाठी कथा या साहित्य प्रकाराबरोबरच अन्य साहित्याचा अभ्यासदेखील केला आहे. कारण त्याशिवाय कथेचे वेगळेपण लक्षात येत नाही. म्हणूनच कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र यांचा

अभ्यास या प्रकरणात केला आहे. आशा बगे आणि सानिया यांच्या कथांचा अभ्यास करण्यापूर्वी कथेचे घटक, कथेचा इतिहास, कथेचे प्रकार अभ्यासल्याचा फायदा झाला.

कथा सांगणे ही मानवी मूलभूत प्रवृत्ती आहे. जीवनात स्वतःच्या वाट्याला आलेले रोमहर्षक प्रसंग दुसऱ्याला सांगण्यात आणि दुसऱ्याचे अनुभव ऐकण्यात माणसाला मनस्वी सुख वाटते. म्हणूनच भाषेचे ज्ञान अवगत होताच माणसाने गोष्ट सांगण्यास सुरुवात केली असावी.

बालपणापासूनच कथा आपल्यावर संस्कार करीत असते. अगदी लहानपणी ऐकलेल्या काऊचिऊच्या गोष्टी म्हणूनच महत्त्वाच्या वाटतात. कथा आपल्यावर चांगले संस्कार करते. उत्तम पद्धतीने जीवन जगण्याची कला, हजरजबाबीपणा, चातुर्य, माणुसकी, संवेदनशीलता या व अशा अनेक गोष्टी आपल्याला कथांमधून मिळतात. थोडेसे मोठे झाल्यानंतर आजी आजोबांनी सांगितलेल्या पशुपक्षांच्या कथा, पऱ्या, राक्षस आणि देवादिकांच्या कथा आपली मनोभूमिका पक्की करण्यासाठी व मनाची उत्तम मशागत करण्यासाठी उपयुक्त ठरतात. या कथांमुळे आपले कल्पनाविश्व समृद्ध होते. पुढे पुढे या अद्‌भूत कथांमधून बाहेर येऊन वास्तवाच्या थोडे जवळ नेणाऱ्या कथा आवडू लागतात. शूरवीरांच्या साहसकथा, ऐतिहासिक कथा, गूढरम्य कथांमध्ये मन रमू लागते. तारुण्यात प्रेमकथांचे आकर्षण वाढते. मनाची प्रगल्भ अवस्था प्राप्त झाल्यानंतर सामाजिक परिस्थिती, वास्तव, माणसांची सुख-दुःख यांचे दर्शन घडविणाऱ्या कथा आपल्याकडून वाचल्या जातात. एकूणच आयुष्यात प्रत्येक वळणावर कथा आपल्याला साथ देते. आपल्या सर्व अवस्थांमध्ये आपल्या मनोवृत्तीला खाद्य पुरविते.

कथेविषयी दोन गोष्टी अतिशय महत्त्वाच्या आहेत. एक म्हणजे कथा हा सर्वात जुना वाङ्मय प्रकार आहे. दोन म्हणजे कथा हा सर्वात नवीन वाङ्मयप्रकार देखील आहे. एकीकडे कथेचा उगम मानवाच्या आदिस्थितीत काव्याच्या पुढेमागे झालेला आहे. तर दुसरीकडे सर्व वाङ्मयप्रकारात सर्वात शेवटी झालेला आहे. या दोन्ही गोष्टींना विशेष अर्थ आहे.

कथा आदिकाळापासून कुठल्या ना कुठल्या स्वरूपात आढळते. जगातले भिन्नभाषीय वाङ्मय तपासले तर त्याचा पाया कथनात्मक दिसेल. याचा अर्थ कथा हा कृत्रिम वाङ्मय प्रकार नसून मानवाच्या उपजत प्रवृत्तींशी निगडीत आहे.

माणसाला कथनाची आवड उपजतच होती. आपले विचार प्रकट करण्यासाठी भाषेचे साधन प्राप्त झाल्यानंतर मानव गोष्टी सांगू लागला. स्वानुभव व कल्पना सांगण्यासाठी त्याने कथेसारखा सुटसुटीत, लघुआकारी व लवचिक असा साहित्यप्रकार निवडला.

## प्रकरण २

## आशा बगे यांचे कथाविश्व

कथा या साहित्य प्रकाराचा अभ्यास केल्यानंतर आशा बगे यांचे कथाविश्व अभ्यासणे सोपे गेले. आशाताईंच्या सहज सुंदर कथाविश्वाचा अभ्यास या प्रकरणात घेतला आहे. आशाताईंच्या मानवी मनाचा ठाव घेणाऱ्या १३ कथासंग्रहातील कथांचे वाचक, अभ्यासक म्हणून केलेले परीक्षण या प्रकरणात मांडले आहे.

### मारवा

मराठी साहित्यविश्वात स्त्रीच्या भावभावनांचे चित्रण करणाऱ्या सर्व लेखिकांमध्ये आशा बगे आणि सानिया यांचे निश्चितपणे एक वेगळे स्थान आहे. स्त्रियांच्या साहित्यामध्ये आपल्या कसदार लेखनाने या दोघींनीही मोलाची भर घातली आहे. या दोघींपैकी प्रथम आशा बगे यांच्याविषयी आणि त्यांच्या कथाविश्वाविषयी जाणून घेणे हा या प्रकरणाचा उद्देश आहे.

१९८० ते ९० या दशकातील महत्त्वाच्या कथालेखिकांमध्ये आशा बगे हे नाव अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण ठरले आहे. विस्तीर्ण पटावर माणूस म्हणून स्त्रीबरोबरच पुरुषाचाही शोध घेण्याचे काम त्यांची कथा करते. माणसामाणसातील भावबंध पुन्हा पुन्हा तपासून पहाणे, निखळ नात्याचे लेबल न लावता अलवार नात्यांचा शोध घेणे हे त्यांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आहे. स्त्रीची स्वत्वाची व सत्याची ओढ, वात्सल्यदृष्टी, कुटुंबाशी असणारे नाते, त्यातून तिचा होणारा आत्मशोध या बाबी आशा बगे यांच्या कथांमधून दिसून येतात. साधी, सोपी लेखनशैली आणि माणसामाणसामधील भावबंधांविषयी आश्वासक समज हे या लेखिकेचे सामर्थ्य आहे.

मारवा या कथासंग्रहातील १३ कथा मनोविश्लेषणात्मक आहेत. मानवी मनाचा तळ शोधणाऱ्या आहेत. प्रत्येक कथेत मन या घटकाची वेगवेगळी रूपे पहायला मिळतात. आपल्या रोजच्या जगण्याशी निगडीत असणाऱ्या या कथा म्हणूनच खूप जवळच्या वाटतात. मारवा, बेईमान, घरटं, जन्म, पांगळी, नातं, रंग, डोळे, वर्तुळ, कोवळी उन्हं, मैत्रीण, वाळवंट, रुक्मिणी या एकापेक्षा एक सरस कथांनी हा कथासंग्रह सजला आहे.

आशा बगे यांच्या सर्वोत्तम कथासंग्रहांपैकी एक म्हणजे मारवा. या कथासंग्रहात आशाताईंनी मानवी मनाचा तळ शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना त्यांच्या आजुबाजूला घडलेल्या घटनांना वाचकांपर्यंत पोहचवण्यासाठी काही प्रक्रिया करावी लागत असेलही. पण यामुळे त्यांच्या कथा अधिक परिपक्व होतात. कारण त्यांच्या सगळ्याच कथांमधून लेखक म्हणून जीवनाचे झालेले आकलन दिसून येते. त्यांच्या स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोन आधुनिक आहे. पण परंपरेशी असलेले नाते त्यांनी तोडलेले नाही. त्यामुळे त्यांच्या कथांमधून परंपरा आणि नवता यांचा ताण

जाणवत रहातो.  स्त्रियांचे भावविश्व उलगडणाऱ्या आशा बगे यांच्या कथा म्हणूनच सर्वसामान्य स्त्रियांच्या जीवनाशी सुसंगत वाटतात.

**अत्तर**

अत्तर या कथासंग्रहातील ७ कथांचा समावेश या प्रकरणात केला आहे.  'अत्तर' हा कथासंग्रह पिसारा प्रकाशनाचे दुसरे प्रकाशित पुस्तक.  अकोल्यासारख्या आडगावी ग्रंथ प्रकाशनाचा घाट घालणारी ही एक प्रकाशन संस्था.  आशाताईंच्या 'मारवा' या कथासंग्रहाने त्यांना प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली होती.  अशा प्रसिद्ध लेखिकेने या नवोदित प्रकाशन संस्थेसाठी पुस्तक लिहिले.  पुस्तकाच्या सुरुवातीला प्रकाशिका अनघा देव यांचे बोलके मनोगत आशाताईंमधल्या माणूसपणाला सलाम करायला लावते.  त्या म्हणतात, "आशाताईंनी कोणत्याही अटी न घालता आम्हाला आशीर्वाद देऊन कायमचं ऋणी करून ठेवलं आहे.  लेखन हे आनंद देण्यासाठी आणि घेण्यासाठी असते हे आशाताईंच्या कृतीवरून दिसून येते.  वैशिष्ट्य म्हणजे या सगळयाचा कुठेही पुसटसा उल्लेखदेखील त्या करत नाहीत."

कथांची संख्या 'मारवा' पेक्षा कमी आहे.  पण लेखिका म्हणून आशाताईंची उंची अत्तरमध्ये वाढलेली जाणवते.  माणसांमाणसांतील नातेसंबंधाविषयी भाष्य करणाऱ्या या सगळ्या कथा वाचक म्हणून अंतर्मुख करतात.  प्रत्येक कथा लिहिण्यामागे काहीतरी उद्देश आहे हे जाणवते. कथेत संगीताचा धागा आहेच.  परंपरा आणि आधुनिक विचार या कात्रीत सापडलेल्या स्त्रिया, आश्रितांचे दुःख आणि वार्धक्यातले ताणतणाव 'अत्तर' या कथासंग्रहातून आशाताई वाचकांसमोर मांडतात.  या कथा वाचताना आपल्या असे लक्षात येते की, या कथांमध्ये आपणही सामावलेले आहोत.  आपल्या आजुबाजुला चाललेल्या सगळ्या गोष्टी आशाताई लिहित आहेत असे जाणवते. कथेचा शेवट न करता त्या प्रवाहापर्यंत वाचकाला घेऊन जातात.  वाचकाने आपल्या स्वानुभवाने कथेच्या शेवटाची कल्पना करावी असे त्यांना अभिप्रेत असावे.  कारण वाचकावर आपली मते लादण्यापेक्षा कथेचा शेवट वाचकाने आपल्या मताप्रमाणे करावा असे त्यांना अभिप्रेत असावे. दर्जेदार अशा या सात कथांचा सुगंध अत्तराप्रमाणे मनात दरवळतो.

**पूजा**

पूजा या कथासंग्रहातील १० कथांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे.  मध्यमवर्गीय व उच्च-मध्यमवर्गीय कुटुंबातील व्यक्तींचे नातेसंबंध, त्यांचे रीतीरिवाज आणि त्यांचे दैनंदिन जीवन यांचे सुस्पष्ट प्रतिबिंब आशा बगे यांच्या कथांमधून नेहमीच प्रत्ययाला येते.  या कुटुंबातील

वृद्ध, तरुण, मुले यांच्या जीवनातल्या छोट्या-मोठ्या घटनांचे चित्रीकरण 'पूजा' या कथासंग्रहातून प्रत्यकारीरित्या आले आहे.

छोट्या शहरांमधले वातावरण पात्रांची मानसिक आंदोलने, संवादांमधून व वर्णनातून डोळ्यांसमोर उभी राहणारी व्यक्तिचित्रे या सगळ्या गोष्टी वाचकाला एका वेगळ्या वातावरणात घेऊन जातात. आशाताईंचा पूजा हा दीर्घकथांचा पहिला संग्रह आहे.

लघुकथा, दीर्घकथा व कादंबरी या तीनही साहित्य प्रकारात आशाताईंना लघुकथा जवळची वाटते. लघुकथा कठीण परंतु उदात्त साहित्यप्रकार. लघुकथा कितीही जवळची असली तरी दीर्घकथा अपरिहार्य आहे. या विचाराने लिहिलेल्या सगळ्या दीर्घकथा तितक्याच दर्जेदार आहेत. अर्पणपत्रामध्ये आशाताईंनी, "ती. बाबाला, आयुष्यात तू राखलेला समतोल मलाही साधावा म्हणून....." असा मजकूर लिहिला आहे. यावरून वडिलांशी असलेले मैत्रीपूर्ण नाते दिसून येते. तसेच लिखाणातला समतोल त्यांच्या मनाचा समतोलही दर्शवतो.

अशोक कोठावळे यांच्या मॅजेस्टिक प्रकाशनाने नोव्हेंबर १९८९ मध्ये 'पूजा' या कथासंग्रहाचे प्रकाशन केले आहे. मुखपृष्ठ बुवा शेटे यांनी रेखाटले आहे. केसरी, दीपावली, किस्त्रिम, रसिक, तरुण भारत, अक्षर, महाराष्ट्र टाईम्स या दिवाळी अंकांमध्ये या कथा यापूर्वी प्रसिद्ध झाल्या आहेत.

मध्यमवर्गीय कुटुंबातील नातेसंबंध 'पूजा' या कथासंग्रहातून आशाताईंनी दाखवले आहेत. लघुकथा हा आशाताईंचा आवडता लेखनप्रकार. पण काळाच्या ओघात कादंबरीच्या मोठ्या पटापेक्षा दीर्घकथा वाचक अधिक पसंत करतील असे त्यांना वाटते. त्यांचे हे विचार योग्यही आहेत. 'पूजा' या शीर्षककथेत पूजा या पारंपारिक विधीबाबत विचार बदलायला लावण्याचे सामर्थ्य आहे. माणूस महत्त्वाचा की विधी? यामध्ये आशाताई माणूस म्हणून वागण्याला प्राधान्य देतात. 'अरण्य' या कथेतल्या रघुनाथला त्याच्या आयुष्यासंबंधी निर्णय घेताना द्विधा मनःस्थिती होते. असे निर्णय घेणे अवघड असले तरी अशक्य नसते. फक्त तो निर्णय घेण्याची प्रत्येकाची वेळ वेगळी असते असे ही कथा सांगते. 'नवस' या कथेत नवस बोलणे आणि तो पूर्ण करणे ही मानसिक गरज आहे असे 'रेवती' या पात्राच्या माध्यमातून मांडले आहे. 'सायकल' या कथेत सोमनाथ या होतकरू, गरीब मुलाची घालमेल दाखवली आहे. त्याच्या मनातली उलघाल वाचक म्हणून अस्वस्थ करते. 'पूर' या कथेत कुमार वयातल्या चिंतू आणि गौरीची मैत्री दर्शवली आहे. मनामध्ये विचारांचा पूर आल्यानंतर त्या खुणा माणूस म्हणून कशा अनुभवल्या जातात हे या कथेतून दिसते. 'चितारओळ' ही कथा दोन मित्रांच्या प्रेमाची आहे. मूर्ती घडवणारा चितारी सदाशिव आणि श्रीपाद यांची ही कथा. 'देठ' या कथेत आशाताईंचा आवडता पाऊस वेगवेगळ्या

रूपांमध्ये भेटतो. 'जया' या संवेदनशील तरीही निर्विकार नायिकेची ही कथा. आपल्या मनातल्या स्थितीप्रमाणे सभोवतालचे जग बदलते हे सांगणारी. आयुष्यात असणारी अपूर्णताच आपल्या आयुष्याला परिपूर्ण करते हा एक वेगळा विचार 'अपूर्ण' या कथेतून आशाताई देतात. अहंकाराने सद्सद्विवेकबुद्धी हरवलेल्या गुरु-शिष्यांची गोष्ट म्हणजे 'खडक'. मनातल्या भावनांचे विविधरंगी इंद्रधनुष्य आशाताईंच्या 'पूजा' या कथासंग्रहातून अनुभवायला मिळते.

**मांडव**

या कथासंग्रहात ९ कथांचा समावेश करण्यात आला आहे. जीवनानुभवांना लेखनामागची प्रेरणा मानणाऱ्या आशाताईंच्या सगळ्याच साहित्यात हे अनुभव दिसून येतात. त्यांच्या कथाविश्वात त्यांचे अनुभव नेहमी डोकावतात. 'मांडव' या कथासंग्रहाची शीर्षककथाच खूप भावणारी आहे. चौकट मोडणाऱ्या, निर्भयतेने विचार करणाऱ्या नायिका या कथेत आशाताईंनी रंगवली आहेत. लग्न हा संस्कार आपापल्या पद्धतीने नाकारणाऱ्या नायिका या कथेत आहेत. मुलीच्या प्रेमापोटी मुसळधार पावसात पूरात पोहून जाणारा गिरिधर 'मुसळधार' या कथेत आहे. कथेला गूढतेचे अस्तर असल्याने कथा दीर्घकाळ लक्षात रहाते. ज्याच्यावर कर्ज केले असे वाटते त्यानेच कर्ज देणाऱ्यावर ऋण करावे हे सांगणारी कथा 'ऋण'. कौस्तुभ-चारू व नंदिन-शरद या दोन जोडप्यांची ही कथा. कथेतली मनस्वी नंदिनी मनाला भावते. एखादी व्यक्ती आयुष्यात येते आणि संथ, स्थिर आयुष्य ढवळून टाकते. हे सगळे होऊन ती व्यक्ती हद्दपार होते त्याने होणारा त्रास 'हद्दपार' या कथेत आशाताईंनी दाखवला आहे. वृद्ध माणसांची होणारी अडगळ 'प्रस्थान' व 'नैवेद्य' या कथांमध्ये दर्शवली आहे. रेल्वे स्टेशनवर झालेल्या दुर्घटनेचे साक्षीदार पांड्या निष्पाप मणीला आपल्या घरी नेऊन तिची काळजी कशी घेतात हे 'साक्षी' या कथेतून दिसून येते. दोन व्यक्तींच्या नात्यामधला दुवा नसेल तर नात्यांचा पूल तसाच राहू शकत नाही हे 'पूल' या कथेतल्या बाई व नंदिनीच्या नात्यातून समजते. बनारसला गेल्यानंतर फसवले जाण्याची भीती वाटणारे मनोहर व जान्हवी नकळतपणे कल्लूलाच कसे फसवतात हे 'ठग' ही कथा सांगते.

या कथासंग्रहात चौकट उधळून देण्याचा प्रयत्न करणाऱ्या नायिका आहेत हे या कथेचे वैशिष्ट्य आहे. आपल्याला नेमके काय हवे आहे हे समजले की मार्ग सोपा होतो. आपल्या भविष्याबाबत योग्य तो विचार करणाऱ्या आत्मनिर्भर स्त्रिया या कथासंग्रहात भेटतात. वेगळ्या वळणाने आपले ध्येय साध्य करणाऱ्या नायिका या कथासंग्रहात आशाताईंनी रेखाटल्या आहेत.

'मांडव' या कथासंग्रहातील चौकट मोडून स्वतःचे अस्तित्व निर्माण करणाऱ्या नायिका एक वाचक आणि अभ्यासक या नात्याने मला भावल्या. या नायिकांनी मनात त्यांना अपेक्षित

आयुष्याचे चित्र रेखाटले आहे. त्यामुळे विचारांची बैठक पक्की आहे. काय नको हे समजले की हवे असलेले मिळवता येते. चूल आणि मूल हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र नाही. तिला तिच्या मनासारखे जीवन जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. या अधिकाराची जाणीव आशाताई करून देतात. समाजामध्ये स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे आणि तिला तिच्या मनासारखे जगण्याचा अधिकार नाही हे भ्रम मोडणारे विचार प्रेरणादायक आहेत. यामधून स्त्रीला तिच्या अस्तित्वाची जाणीव होईलच तसेच पुरुषांनाही तिच्या स्वतंत्रपणे विचार करण्याच्या वृत्तीचा अंदाज येईल. हा परिणाम नक्कीच सकारात्मक असेल.

### चंदन

'चंदन' हा दीर्घकथासंग्रह आहे. या कथासंग्रहात कथांची संख्या पाच आहे. पण प्रत्येक कथा वाचक म्हणून अंतर्मुख करायला लावते. कथेचा शेवट वाचकांच्या भावनांचा कस बघतो. नातेसंबंधातील ताण, नव्या-जुन्या पिढीतील संघर्ष, स्त्रीजीवनातील समस्या, मनाचा सश्रद्ध वृत्तीशी चाललेला झगडा या आशयाच्या कथा 'चंदन'मध्ये आहेत.

बदलत्या आयुष्यामुळे साहित्य बदलत जाते का? या प्रश्नाचे उत्तर आशाताई खूप छान देतात. "बदलत्या आयुष्यामुळे साहित्य बदलतेच असे नाही. निर्मितीप्रेरक बदलेल, त्याचा कोन बदलेल, परीघ वेगळा होईल. माणसाच्या भावनेचा, जगण्याचा, सुख दुःखाच्या अन्वयाचा निखालस स्पष्ट उच्चारच अभिप्रेत आहे. असे असेल तर बदलत्या आयुष्यामुळे साहित्य बदलते असे कसे म्हणता येईल? ही वाढ बघायची असेल तर लेखनाची खोलीच बघावी."

आशाताईंच्या या विधानाचे प्रत्यंतर त्यांच्या कसदार लिखाणातून येते. प्रत्येक कथासंग्रहात आपल्या बदलत्या, समृद्ध जाणीवा दिसून येतात. प्रत्येक कथा एका वेगळ्या खोलीची, वेगळा अर्थ घेऊन आलेली आहे. कथेचा गर्भितार्थ समजून घेऊन वाचकाने आपल्या आपल्या कुवतीप्रमाणे कथेचा गर्भितार्थ ठरवायचा आहे. या प्रत्येक कथेत वाचक म्हणून आपली भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. कथांची प्रसिद्धी या कथासंग्रहातच सर्वप्रथम झाली आहे.

मुकुंदा आणि त्याच्या वडिलांचे शीतयुद्ध 'चंदन' मध्ये आहे. 'अति तेथे माती' या म्हणीचा प्रत्यय या कथेतून मिळतो. एकमेकांजवळ असतानाच एकमेकांचे महत्त्व समजणे कसे आवश्यक आहे हे या कथेतून लक्षात येते. अन्य कथांमध्ये 'समुद्र' या कथेतील ठाम विचारांची नायिका राधा मनाला भावते. 'एका पावसाळी संध्याकाळी' ही कथा आशाताईंना आवडलेल्या निवडक कथांपैकी आहे. परंपरेतील कर्मकांडाला विशेष स्थान देणारी 'श्राद्ध' ही कथा, संस्कारांचा पगडा व बदलत जाणारी संस्कृती यातील गुंता दाखवते. यश मिळवण्यासाठी अवैध मार्ग स्वीकारणाऱ्या

अभिरामचे वर्तमान ‘वर्तमान’ या कथेतून वाचकांसमोर येते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर माणूस म्हणून कसे वागले पाहिजे याची जाणीव या सगळ्याच कथा करून देतात. या कथांमुळे वाचक म्हणून आपण अधिक समृद्ध होतो.

**अनंत**

या कथासंग्रहात ९ कथा आहेत. माणसामाणसामधील परस्परसंबंध हा आशाताईंच्या कथांचा मूळ विषय आहे. परंपरेने मिळालेले आणि आधुनिकतेच्या स्वीकाराने आलेले विविध आंतरिक ताण, गुंतागुंत, व्यामिश्रता शोधण्याचा प्रयत्न आशाताई नेहमीच करतात. स्त्रीची स्वत्वाची व सत्याची ओढ, वात्सल्याच्या अतूट बंधनांनी कवळू पाहणारी दृष्टी, कुटुंबाशी असणारे नाते यातून तिचा होणारा आत्मशोध या बाबी आशा बगे यांच्या कथांमधून दिसून येतात. लिहिण्याची साधी-सोपी शैली व माणसामाणसामधील नातेसंबंध मांडण्याची हातोटी हे त्यांच्या लिखाणाचे सामर्थ्य आहे. या कथासंग्रहातील कथा वाचतानाही वाचक म्हणून आपण अंतर्मुख होऊन विचार करू शकतो.

‘अनंत’ या कथासंग्रहातील सगळ्या कथा मानवी मनातल्या भाव-भावना मोकळेपणाने मांडतात. माणसांमाणसातील नात्यांमधले ताण, प्रेम, इर्षा या सगळ्याचा प्रत्यय त्यांच्या कथांमधून येतो. ‘अनंत’ या शीर्षककथेतून अलौकिकाचा प्रवास घडतो. ‘घरचा रस्ता’ ही कथा तर मन हेलावून टाकते. या कथेमधला नंदू डोळ्यासमोरून हलतच नाही. केतन आणि अनू या भाव-बहिणीचे अनोखे नाते ‘नातं’ या कथेतून उलगडते. ‘कर्ता’ कथेतला लहानगा पुट्टू त्याच्या निरागसतेमुळे लक्षात राहतो. ‘तुफान’ या कथेतील मिसेस शारंगपाणींवर ओढवलेल्या अत्याचाराने स्त्री म्हणून जरा जास्तच अस्वस्थ वाटते. ‘नाळ’ या कथेत अवनीमध्ये आपली खंबीर, अलिप्त स्वभावाची आई उदयन शोधतो. ‘मोसम’ या कथेत गैरसमजातून अपराजितकडून आपल्या जिवलग मित्राबाबत झालेला अन्याय नकोसा वाटतो. हे असे का? किंवा असे नसते झाले तर..... अशा जर-तरमध्ये आपण अडकतो. सोबतीची गरज असूनही सोबत नाकारणाऱ्या डिसुझा ‘सोबती’ कथेत भेटतात. ‘काही पाने’ ही कथा तर लिखाणाच्या आणि आशयाच्या दृष्टीने अतिशय वेगळी आहे. अण्णा आणि मनोरमा या वृद्ध जोडप्याची ही आगळी वेगळी कथा आहे. या सर्व कथांमधून वाचक म्हणून आपण विचार करू लागतो. नातेसंबंध, मानवी भावना मांडण्याच्या सोप्या शैलीने सगळ्याच कथा दीर्घकाळ स्मरणात राहतात.

**दर्पण**

या कथासंग्रहात आशाताईंनी ७ दर्जेदार कथा लिहिल्या आहेत. गेल्या काही दशकांमध्ये जोमदारपणे लेखन करून ज्यांनी वाचकांचे लक्ष आपल्या लेखनाकडे वेधून घेतले, त्यामध्ये आशा बगे यांची प्रामुख्याने गणना केली जाते. विशेषतः कथात्ममूल्य असलेले, एकमेकांशी संवादी असे वाङ्मयप्रकार त्यांच्या प्रतिभागुणाला मानवतात. त्या त्या वाङ्मयप्रकारातल्या विकासाच्या शक्यता समर्थपणे शोधत त्यांचे लेखन प्रवास करते. 'दर्पण' या दीर्घकथासंग्रहाचा यासाठी आवर्जून उल्लेख करता येईल.

मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र यांच्या सीमेवरले, बहुतांशी तिथल्या मध्यमवर्गाच्या जीवनाचे दर्शन त्यांच्या लेखनातून घडते. त्या परिसरातल्या भाषिक लकबी, रीतीभाती यांचा गोडवा सहजपणे त्यांच्या लेखनात मुरुन राहीलेला असतो.

या सगळ्यामागे माणसाच्या जीवनाला नियंत्रित करणारी एक अतर्क्य शक्ती कुठेतरी वसत असल्याचा विश्वास सूक्ष्मपणे त्यांच्या लेखनातून व्यक्त होत असल्याचा अनुभव येतो. तन्मयतेने लिहिल्या गेलेल्या त्यांच्या या कथातून त्यांच्या लेखनशैक्तीची वैशिष्ट्ये प्रकटताना जाणवतील.

'दर्पण' या दीर्घकथांच्या संग्रहात मध्यमवर्गीयांच्या जीवनाचे दर्शन घडते. माणूस स्वतःच्या जीवनाचे निर्णय घेण्यासाठी कितीही सक्षम असला तरीही कोणतीतरी अतर्क्य शक्ती असते जी या सगळ्याच्या पुढे जाऊन आपले काम करीत असते. एका ठराविक वेळी याची जाणीव माणसाला होते. आपल्या रोजच्या अनुभवांमधला वेगळेपणा या कथांमध्ये दिसून येतो. नेहमीच्या जगण्यातल्या अनुभवापलीकडे जाऊन केलेला विचार या कथांमध्ये आढळतो.

'दर्पण' या शीर्षककथेत सरुबाई आणि सुधाताई या परस्परविरोधी व्यक्तिरेखा भेटतात. सुधाताईंच्या खंबीरपणाचे कौतुक वाटते. सरुबाई विचित्र वागत असूनही त्यांच्या विषयीचा राग दीर्घकाळ टिकत नाही. आपल्या मनाच्या खऱ्या दर्पणात पाहण्याची शिकवण कथेत मिळते. 'अज्ञात' ही कथा पुरुषप्रधान पात्र असणारी आहे. कथेत बापूंना अज्ञात, अनाकलनीय गोष्टींचा प्रवास घडतो. आशाताईंना आवडणारे दोन्ही विषय ज्या कथेत समाविष्ट झाले आहेत ती कथा म्हणजे 'पाऊस'. सुदर्शन आणि दमयंतीची अधुरी प्रेमकहाणी म्हणजे पाऊस ही कथा. पावसाची आणि मनातल्या भावनांची सुरेख गुंफण या कथेत घातली आहे. सुरांचे देणं लागणाऱ्या महादेवकर मास्तरांवर 'देणं' ही कथा आहे. बाबीच्या एकतर्फी प्रेमाला प्रतिसाद न देता केवळ सुरांचं देणं जाणणाऱ्या संगीतप्रेमी शिक्षकाची ही कथा, भावनांच्या एका वेगळ्याच उंचीवर नेते. नोकर आणि मालक यांच्या संघर्षाची कथा 'स्वामी'. आपण मालक आहोत ही स्वामित्वाची भावना काही लोकांना किती आनंद देते हे या कथेत दाखवण्यात आले आहे. 'नाटक' ही कथा दोन मित्रांच्या

खऱ्या प्रेमाची कथा आहे. मतभेद झाले तरी मैत्री तुटत नाही असे मोहनभाई आणि डॉक्टरांच्या नात्यातून स्पष्ट होते. ओळखीचे असे जग अचानक अनोळखी होण्याचा अनुभव श्यामला या पात्रातून 'अनोळखी' या कथेत अनुभवता येतो. नेहमीच्या त्याच त्या अनुभवातला वेगळेपणा 'दर्पण' या कथासंग्रहातील कथांमध्ये आशाताई वाचकाला देतात.

**ऋतूवेगळे**

'ऋतूवेगळे' या कथासंग्रहात पाच दीर्घकथा आहेत. या सगळ्या कथा आशाताईंच्या इतर कथासंग्रहातील कथांपेक्षा वेगळ्या आहेत. आधुनिक आणि भौतिक जगातील मानवी मनातला संघर्ष या कथांमध्ये प्रकर्षाने आढळतो. प्रत्येक कथेत वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावण्याची ताकद आहे. या कथांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आशाताईंच्या अन्य कथांसारख्या त्या समजून घ्यायला सोप्या नाहीत. 'पत्र' ही या कथासंग्रहातील मला आवडलेली कथा. लहान विकूचे भावविश्व त्याच्याच नजरेतून प्रभावीपणे मांडले आहे. आत्याकडे जाण्यासाठी उत्सुक असलेला विकू तिथे गेल्यावर नाराज होतो. पुन्हा त्याच्या घरी जावे असे त्याला वाटते. 'येरझारा' कथेत आपल्याच आईविषयी गैरसमज बाळगणारी अनू पूर्वग्रहदुषित नजरेने वागत असते. पण कथेच्या शेवटी तिचा गैरसमज दूर होतो. जे व्हायचे ते होतेच. ते टाळता येत नाही हा संदेश 'मल्हार' ही कथा देते. देसाई मास्तर पावसाचा आणि निरुच्या लग्नाचा संबंध लावत असतात. पण असा विचार करणे हे तितकेसे योग्य नाही असे त्यांना वाटते. लहान, निरागस 'मिनू' पंख या कथेत भेटते. लहानपणीचे तिचे पंख गळून पडलेत अशी जाणीव तिला होते. शास्त्रीय संगीताचा मनातल्या भावना दाखवण्यासाठी उत्तम वापर केला आहे. मनातल्या विचारांचा आणि कृतीचा संबंध 'शिल्प' या कथेत दाखवला आहे. एका वेगळ्या धाटणीतून या कथा लिहिल्या आहेत. स्त्री म्हणून जगताना येणाऱ्या अनुभवांचे विश्लेषण आशाताईंनी या कथासंग्रहात केले आहे.

विसाव्या शतकाच्या अखेरच्या वर्षातील हा कथासंग्रह स्वातंत्र्योत्तर काळातील एका प्रातिनिधिक वर्गाचे चित्रण करतो. या कथासंग्रहाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आशाताई कोणत्याही आवेशाने किंवा स्त्रीमुक्ती, स्त्रीवादी अशा दृष्टिकोनातून आयुष्याकडे पहात नाहीत. स्त्री म्हणून जगताना येणाऱ्या अनुभवांचे आणि प्रश्नांचे विश्लेषण त्या मोठ्या ताकदीने करतात. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील जगणे आधुनिक आणि भौतिक झाले आहे. तरी माणसांच्या मनातील संघर्ष मात्र तसाच राहिला आहे. म्हणूनच माणूस अंतर्मुख होऊन 'तुझे आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलासी' या प्रचितीशी पुन्हा येऊ पहात आहे. आशाताईंच्या लिखाणाचा एक वेगळा साज घेऊन या कथा वाचकाला खिळवून ठेवतात. कथासंग्रहातल्या नावाप्रमाणेच प्रत्येक

कथेचा वेगळा ऋतू आहे. कधी दुःख, कधी आनंद. सगळा मनाचाच खेळ. पण तरी खरा वाटणारा. मनातला ऋतू बदलला की आजुबाजूचे वातावरण बदलते. असे ऋतू या कथासंग्रहात अनुभवायला मिळतात. या कथासंग्रहाला शीर्षककथा नाही. तरी शीर्षकाप्रमाणे कथा आहेत. लहान मुलांच्या दृष्टिकोनातून लिहिलेल्या दोन कथा या कथासंग्रहात आहेत हे वैशिष्ट्य सांगता येईल.

**निसटलेले**

५ अद्वितीय कथा या कथासंग्रहात आहेत. स्त्री-पुरुष संबंधातली विविध नाती सुन्न करणारी असतात. आयुष्याला वळण देणारी असतात. अशाच काही नात्यांचे बंध 'निसटलेले' या कथासंग्रहात अनुभवायला मिळतात. स्त्री-पुरुष संबंध म्हटले की एक संकुचित विचार मनात येतो. पण हा कथासंग्रह वाचताना आपल्यालाही एक वेगळा दृष्टिकोन मिळतो. या कथासंग्रहातील स्त्री-पुरुष प्रेम, वासना, आकर्षण या भावनांपोटी एकमेकांशी संबंध ठेवत नाहीत. त्या ही पलीकडे माणूस म्हणून असणारे संबंध शोधतात.

नात्यांना समजून घेणे आणि त्याप्रमाणे जगणे ही एक जीवघेणी कसरत असते. ही कसरत करताना मनात असलेले खूप काही जगणे निसटलेले असते. त्या जाणीवेतही जीवन कळते. वर्षानुवर्षे सहवास असूनही जीवनातील अनाकलनीयता, मानसिक गुंतागुंत आणि वर्तनातील अगतिकता यातून निसटलेले जगणे हतबल करत नाही, तर आणखी जगण्याची उमेद देते. जीवनाचे हे सूत्र आशाताईंच्या कथांमधून सहजपणे प्रत्ययाला येते. लोकसत्ता, अक्षर, मौज, दीपावली, श्रीशब्द, गुलमोहोर, सा. सकाळ, मिळून साऱ्याजणी या दिवाळी अंकांमधून या कथांची पूर्वप्रसिद्धी झाली आहे.

'निसटलेले' या कथासंग्रहात आशाताईंनी स्त्री-पुरुषातील नात्यांचा शोध घेतला आहे. हे नाते नवरा-बायको किंवा प्रियकर-प्रेयसीचेच असावे असे नाही. एका वेगळ्या पातळीवरची मैत्री स्त्री-पुरुषांमध्ये होऊ शकते. याचाच वेध आशाताईंनी या कथासंग्रहात घेतला आहे.

लेखनाचा प्रवास चालू असताना लेखकाला नित्य नव्या वाटा खुणावत असतात. लेखनाची सुरूवात होते तिला लेखकाचा आरंभ म्हणून बघता येते. पण लेखकाची प्रत्यक्ष लेखनाआधी पूर्वतयारी म्हणून बरेच काही चालू असते. लेखकाचा हा प्रवास चालू असला तरी नित्य नवे प्रदेश, नव्या वाटा या साऱ्या अनुभवांमधून तो एका विशिष्ट ठिकाणीच येतो. कधी कधी तर वाटते, लेखकाला आयुष्यभर एकच गोष्ट खुणावत असते. त्या एकाच, गोष्टीतून तो एक संपूर्ण आकाश कवेत घेतो.

साहित्यिक आपले आयुष्य जगताना त्यांच्या विशिष्ट समाजात राहूनच जगतात. पण त्यांचा विचार हा त्या समाजमनाचाच असेल असे सांगता येत नाही. तो त्या समाजातील लोकांच्या विचारापेक्षा वेगळाही असू शकतो. जे आपल्यासमोर आहे त्याचेच बोट धरून त्यापलीकडे जाणे हेच निर्मितीचे बळ आहे. आशाताईंच्या कथा स्त्री-केंद्री आहेत. त्यांच्या कथांमध्ये स्त्रीचे भावविश्व उलगडत जाते. त्याचबरोबर पुरुषी मानसिकताही डोकावते. 'घोरपड' मधला दिवाकर विनायक रत्नपारखी कथेच्या नायिकेला अनुभवाने कळतो. सुरुवातीला त्याच्यावर असलेला राग कथेच्या शेवटी नाहिसा होतो. स्त्री-पुरुष नात्यामधली एक वेगळीच मैत्री या कथेत अनुभवायला मिळते. 'कोन ठगवा' या कथेत दद्दांशी आणि कथेतल्या अन्य पुरुषांशी राधाचे असणारे नाते अधोरेखित होते. 'शुद्ध' कथा तर अंगावर शहारे आणते. नवपरिणित जोडप्याचा एका दुर्घटनेने झालेला विसंवाद नकोसा वाटतो. ती दुर्घटना तिच्या आयुष्यात घडलीच नसती तर, असा विचार वाचक म्हणून केला जातो. 'निर्मला' कथेतील निर्मला एक स्पष्टवक्ती तरीही मायाळू गृहिणी म्हणून भावते. श्रीवास्तव या विक्षिप्त लेखकाला ती माणसात आणते. 'मैत्र' मध्ये उदयन आणि कथेच्या नायिकेमधली शुद्ध मैत्री आशाताईंनी दाखवली आहे. उदयनच्या आयुष्यात मधुराच्या आत्महत्येने निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी ती प्रामाणिकपणे प्रयत्न करते.

'निसटलेले' या कथासंग्रहातील दीर्घकथा मनात रेंगाळत रहातात, विचारप्रवृत्त करतात.

**माझ्या कथा माझी निवड**

या कथासंग्रहात ८ कथा आहेत. या कथासंग्रहात आशाताईंच्या आवडत्या कथांचा समावेश करण्यात आला आहे. मराठी कथेच्या क्षेत्रातले आशा बगे हे एक महत्त्वाचे नाव. आपल्या लेखनातील गुणवत्तेच्या बळावर साहित्यक्षेत्रात त्यांनी हे अढळपद मिळविले आहे. विविध पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या आशाताईंच्या सगळ्याच कथा अप्रतिम आहेत. वाचक किंवा अभ्यासक म्हणून या कथांमधल्या आवडत्या कथा निवडायचे म्हटले तर ते खूप मोठे आव्हान ठरेल. वाचक म्हणून जर हे इतके कठीण वाटत असेल तर, आशाताईंना या कथांमध्ये आवडणाऱ्या कथा निवडताना किती जड गेले असेल. लेखक जेव्हा साहित्याची निर्मिती करतो तेव्हा ते साहित्य त्या त्या वेळच्या परिस्थिती व मनःस्थितीप्रमाणे लिहिले जाते. ते त्या प्रत्येक वेळी मनाला भावते. काही काळ गेल्यानंतर आपल्याच लिखाणातला दर्जा लक्षात येऊन त्यात सुधारणा होते. तरीही त्या त्या वेळी भावलेले साहित्य पुन्हा वाचताना पुनःप्रत्ययाचा आनंद देते. कथा लिहायच्या म्हणून आटापिटा न करता अगदी मनापासून लेखन करणाऱ्या लेखिकांमध्ये आशाताई अग्रेसर आहेत.

'माझ्या कथा माझी निवड' हा कथासंग्रह आशाताईंसाठी जितका महत्त्वाचा आहे तितकाच तो वाचकांसाठी आहे. कारण इतक्या महान लेखिकेच्या मोत्यांच्या राशीसारख्या कथांमधून निवडक कथा वाचण्याचा आनंद वाचकाला मिळतो. या कथासंग्रहाच्या मनोगतातून या प्रत्येक कथेमागची आशाताईंची भूमिका समजते. एखादी साहित्यनिर्मिती करताना त्या साहित्यिकाच्या मनाची अवस्था समजली की कथा वाचताना एक वेगळी भावना मनात निर्माण होते. आशाताईंच्या याच कथा स्वतःच्या दृष्टिकोनातून वाचताना आणि त्यांच्या दृष्टिकोनातून वाचताना वेगळेपणा जाणवतो. वाचक किंवा अभ्यासक म्हणून कथेबाबत आपण केलेला विचार जुळला की एक वेगळाच आनंद होतो. आपले विचार पडताळून पहाण्याची संधी मिळते. माझ्या बाबतीत हा आनंद आणखीन जास्त आहे. कारण कथा वाचताना मला मिळालेली अनुभूती आशाताईंच्या मनोगताशी बरीचशी जुळली आहे. कित्येक कथा वाचताना त्या कथेची नायिका आशाताईच आहेत हा अंदाजही बरोबर ठरला. 'नवस' आणि 'पाहुणा' या कथेच्या बाबतीत असे झाले आहे. 'शुद्ध' सारखी एक वेगळी कथा हादरवून टाकते. नवरा-बायको या नात्यातल्या बदललेल्या स्पर्शांची भाषा मन सुन्न करते. असे प्रसंग अनुभवणाऱ्या स्त्रियांचा विचार केला की वेदना होतात. 'एका पावसाळी संध्याकाळी' ही कथा तर एका वेगळ्याच पातळीवरची. 'मुसळधार' या कथेतली गूढता वास्तवाशी नाते सांगणारी नसली तरी मनाला भावते. गिरिधरचे आपल्या मुलीवर असणारे प्रेम त्याला मुसळधार पावसात पूर पार करून जायला भाग पाडते. नंतर त्याच्या अपरूपाने केलेला स्वयंपाक हे अतर्क्य गूढ सुन्न करते. 'मल्हार' या कथेत देसाई मास्तरांनी पावसाचे आणि आपल्या मुलीच्या लग्नाचा लावलेला संबंध मनाला पटतो. कथेच्या सुरुवातीला त्यांच्या मनात असणारी भीती कथेच्या शेवटी आत्मविश्वासात परावर्तित होते. हा आशादायी शेवटही भावतो. 'नाळ' या कथेतील मुलगा आणि आईचे नाते दाखवले आहे. अमेरिकेत राहूनही आपल्या आईच्या विचारांशी त्याची नाळ कशी जोडली गेली आहे हे दाखवण्यात आशाताई यशस्वी झाल्या आहेत. 'मारवा' या त्यांच्या सर्वोत्तम कथेविषयी त्यांना संगीताच्या भूमीने दिलेले सगळे मारवातून जाणवते. या कथांचे वाचक म्हणून महत्त्व त्या कथा आधी वाचताना समजले होतेच. या कथासंग्रहामुळे आशाताईंच्या दृष्टिकोनासह ते पटते, भावते.

**पाणी**

या कथासंग्रहात १२ कथा आहेत. 'पाणी' या कथासंग्रहाच्या अर्पण पत्रिकेत आशाताईंच्या विशाल अंतःकरणाचे दर्शन घडते, समजूतदारपणा दिसून येतो. "मागे पडलेल्या सगळ्या बऱ्या वाईट दिवसांना ज्यातले हीन सारे जळूनच गेले असेल." असा आशावाद त्यांच्या लिखाणात

अनुभवायला मिळतो. लेखकाला लेखनप्रवासात नित्य नव्या गोष्टी खुणावत असतात.

'पाणी' या कथासंग्रहात आशाताईंच्या लेखनप्रवासातल्या आरंभीच्या कथांचा समावेश केला आहे. या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे आशाताईंच्या इतर कोणत्याही कथासंग्रहाला लेखिकेचे मनोगत नाही पण या कथासंग्रहाच्या मनोगतात त्या कृतज्ञतेने प्रकाशकांचे आभार मानतात. या कथासंग्रहातील पाणी, अवेळ, मादी अशा काही कथा कन्नडमधून अनुवादित झाल्या आहेत. 'पाणी' या शीर्षकाच्या दोन कथा या कथासंग्रहात आहेत. कथासंग्रहाची सुरुवात व शेवट 'पाणी' या शीर्षकाच्या कथांनी होतो. 'पाणी' या पहिल्या कथेत आणि शेवटच्या कथेत बिल्डिंगमधले वातावरण, पाण्यावरून होणारी भांडणे याचे हुबेहुब चित्रण आशाताईंनी केले आहे. या दोन्ही कथांमध्ये पाण्याच्या वापराचे महत्त्व नकळतपणे त्या सांगतात. 'कोरडी भूमी' या कथेत निलिमाचा मुलगाच तिला तिच्या कामाचे महत्त्व समजावतो. आंब्याच्या झाडाला जितका मोहर येतो तेवढे आंबे येत नाहीत. शेवटपर्यंत फार थोडा मोहर टिकतो. हळुवार कम्मोच्या मनावर या गोष्टीचा परिणाम होतो. माणसाच्या इच्छा आकांक्षांचेही असेच असते. सगळ्याच इच्छा पूर्ण होत नाहीत. हे सांगणारी कथा 'मोहर'. नलिनीला तारामावशीविषयी वाटणारा राग 'स्पर्श' या कथेतून दिसून येतो. तारामावशी आणि अप्पा यांच्या नात्यामुळे आईवर अन्याय झाला आहे असे तिला वाटत असते. पण प्रत्यक्षात या नात्याने कोणतेही प्रश्न निर्माण झालेले नसतात. वास्तवाचा स्वीकार करून नवऱ्याच्या मृत्यूची टांगती तलवार नाकारणारी खंबीर जान्हवी 'अवेळ' या कथेत भेटते. स्त्री-पुरुष नात्यातला अनोखा बंध 'मादी' या कथेत आहे. विभा आणि तिचा नवरा अविनाश यांच्यामधली भावनिक दरी या कथेत दाखवली आहे. पण कालांतराने अविनाशचे आधी नको असणारे स्पर्श तिला हवेसे वाटतात आणि ती मादी असल्याची जाणीव करुन देतात. स्वाभिमानी सदावर्ते सरांची कहाणी म्हणजे 'पारंब्या' ही कथा. वडाच्या पारंब्या जशा जमिनीत खोलवर असतात तसेच सदावर्ते सरांची तत्व खोलवर रुजलेली आहेत. एका अनोळखी व्यक्तिच्या शेवटच्या क्षणी त्याला आनंद देऊन त्याचा देखणा देहांत बघणारी मनोरमा 'देखणा देहांत तो' या कथेत आहे. राजूच्या आईच्या मृत्यूनंतरच्या दिवसांचा आणि शालीच्या बाळाच्या बारशाचा सोहळा 'सोहळा' या कथेत आहे. एकमेकांशी समांतर नाते असणारे नवरा बायको 'खुर्ची' या कथेत आहेत. अश्विनी या लहानगीचे भावविश्व 'शंखशिंपले' या कथेत आहे.

या सगळ्याच कथांमधून आशाताईंची जीवनवृत्ती, जीवनाकडे बघण्याची दृष्टी पाझरताना दिसते. आशाताई त्यांच्या कथेत सहजपणे जीवनविषयक सत्य-तत्वज्ञान सांगून जातात. साहित्य व समाज यांच्या नात्याचे दर्शन या कथांमधील पात्रांमध्ये, त्यांच्या विचारांमध्ये घडते.

**पाऊलवाटेवरले गाव**

या कथासंग्रहात ७ कथा आहेत. कोणत्याही लेखकाची जीवनाकडे बघण्याची दृष्टी, भान नकळतपणे त्याच्या साहित्यात उतरते. एखाद्या घटनेकडे बघण्याचा प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो. हेच सूत्र त्या त्या लेखकाच्या लेखनातून दिसून येते. हीच आगळीवेगळी जीवनदृष्टी घेऊन 'पाऊलवाटेवरले गाव' या कथासंग्रहातील कथा आशाताईंनी लिहिल्या आहेत. त्यांची जीवनदृष्टी आणि जीवनभान यांचा विलक्षण संबंध या कथांमधून दिसून येतो. या जीवनदृष्टीनेच त्यांच्या कथा वेगळ्या वाटतात. मेहता पब्लिकेशन्सने ऑगस्ट २००५ मध्ये या कथासंग्रहाचे प्रकाशन केले होते.

आशाताईंना त्यांच्या जगण्यातून झालेले आकलन त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. त्यांची जीवनदृष्टी, जीवनभान त्याचे आकलन आणि त्याचे साहित्यातून व्यक्त होणे ही एक प्रक्रिया आहे. ती प्रक्रिया कथा वाचताना आपल्याला अनुभवता येते. या जीवनदृष्टीमुळेच त्यांचे लेखन सजीव वाटते. अर्थातच वाचक म्हणून या जीवनदृष्टीचा आपल्यावर निश्चितपणे परिणाम होतो. आशाताईंच्या विचारांमध्ये आपले विचार कधी समरसून जातात हे समजतच नाही. हे समरसून जाणे हेच त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आणि बलस्थान आहे.

आशाताईंची आगळीवेगळी जीवनदृष्टी, जीवनभान या कथासंग्रहातील कथांमध्ये दिसून येते. 'पाऊलवाटेवरले गाव' या कथासंग्रहातील सगळ्या कथांमध्ये लिखाणातला हा वेगळेपणा वाचक, अभ्यासक म्हणून जाणवतो. घटना फार वेगळ्या नाहीत. अगदी आपल्या आजुबाजूला अशा घटना घडतात. पण त्या घटनेकडे आशाताई एका वेगळ्या नजरेतून बघतात. उदाहरण द्यायचे झाले तर "पुन्हा एकदा जन्म' या कथेचे घेता येईल. या कथेतील कावेरी ट्यूमरच्या दुखण्याने त्रस्त आहे. पण या दुखण्यातच ती पुन्हा एकदा जन्म अनुभवते. हे आजारपणच तिला 'स्व'चा शोध घ्यायला मदत करते. 'लग्न' या कथेच्या लिखाणातच वेगळेपणा आहे. पात्रांच्या माध्यमातून कथा पुढे जाते. समाज रुढी, परंपरा आणि जातीपातीच्या विळख्यात आजही अडकलेला आहे. हे या कथेतून समजते. रेणू आणि चंद्रकांतच्या प्रेमकहाणीतून परंपरेचे हे जोखड आजही समाजमनावर आहे हे समजते. 'केवडा' या कथेत माणसाच्या मनाची ताकद आशाताईंनी दाखवली आहे. आपल्या आयुष्यातल्या गोष्टींचे कारण आपले मनच असते. माणसाचे मन आपल्याला हव्या त्या गोष्टी निर्माण करते आणि नको असणाऱ्या गोष्टी अस्तित्वातच नसल्याचा भास निर्माण करते. मनाचे खेळ 'केवडा' या कथेत अनुभवायला मिळतात. भावना आणि कर्तव्य सांभाळून स्वतःचे स्वतंत्र विचार जपणारी देवकी 'कलश' या कथेची नायिका आहे. स्त्री-पुरुषांमध्ये निखळ नाते असू शकते हे या कथेतून प्रत्ययास येते. स्त्रीकडे पुरुषाची बघण्याची वासनांध, अँटिक

नजर 'अँटिक' या कथेतून ठळकपणे जाणवते. आपल्या मित्रावर आंधळा विश्वास ठेवून शामल भूषणकडे जाते. पण भूषण पुरुषासारखा वागतो. 'कलश' या कथेच्या अगदी विरुद्ध या कथेत घडते. स्त्री-पुरुष संबंधाचे निर्व्याजपण एकीकडे तर दुसरीकडे फक्त वासना. शीर्षककथा 'गाव' चित्रदर्शी लिखाणाचे उत्तम उदाहरण आहे. अपेक्षित मुक्कामाचे ठिकाण येईपर्यंत प्रवास चालू ठेवावाच लागतो. 'अतिथी' या कथेत अनपेक्षित घटना घडते. शुभकार्यासाठी निघालेल्या डॉ. सुदर्शन आणि नलिनी यांना अतिथी म्हणून एका विचित्र घटनेला सामोरे जावे लागते. अतिथी म्हणून ते ज्या घराचा आसरा घेतात तिथे मृत्युचे सत्र चालू असते. त्या दोघांना सहानुभूती वाटत असली तरी रात्र संपताच ते दोघे घराबाहेर पडतात. माणसाची स्वार्थी बुद्धि या कथेतून जाणवते. पण व्यावहारिक विचार केला तर डॉ. सुदर्शनचे वागणे पटते. प्रत्येक कथेतून आत्मपरीक्षण करण्याची संधी आशाताई वाचकांना देतात.

**प्रतिव्द्वंव्दी**

आशाताईंचे सगळे साहित्य हे माणसांमधील परस्परसंबंध शोधते. मनाच्या पातळीवर जाऊन विचार करून वाचकाला विचारप्रवृत्त करणारे लिखाण करण्यात त्यांचा हातखंडा आहे. पण हे सगळे लेखन वाचकासाठी जितके आहे तितकेच ते स्वतःसाठीदेखील आहे असे जाणवते.

'प्रतिद्वंद्वी' मधल्या चारही दीर्घकथा आशाताईंचे चिंतन दर्शवतात. माणसांमाणसांतील संबंधातील गुंतागुंत या कथांमध्ये आहे. माणसाचे मन त्याच्या सुख-दुःखाला कसे कारणीभूत असते हे या कथांमध्ये दिसून येते. माणसाच्या मनात चालणाऱ्या खेळात सहभागी व्हायचे का नाही हे त्याच्या हातात नसते. ते अपरिहार्य असते. ही अपरिहार्यता या कथांमध्ये दिसते. शीर्षककथा नसलेल्या या संग्रहात स्व सोडून केलेल्या विरोधाचे दर्शन घडते. या कथासंग्रहातील 'निर्मोही' ही कथा मला खूप आवडली. प्रपंचात राहूनही कशात न अडकणाऱ्या कृष्णाचा हेवा वाटतो. 'किती दूर' या कथेत मनूताईंसारखी सात्विक स्त्री भेटते. सुजयच्या मनातली वासना त्यांच्या सात्विकतेपुढे नष्ट होते. लहान वयातल्या सुजयला मनूताईंचे वाटणारे आकर्षण आणि त्याच वेळी येणारा राग या परस्परविरोधी भावना कथेत आहेत. 'दुसरा' या कथेतल्या कार्तिकला आपल्यामध्येच लपलेला दुसरा कार्तिक जाणवतो. जे विचार आपल्या मनात येऊच शकत नाहीत ते या दुसऱ्या कार्तिकच्या रूपाने तो अनुभवतो. अनू या फिजिओथेरपिस्टविषयी त्याला वाटणारे आकर्षण हा त्याचाच एक भाग. भोवतालचे सगळे बदलते पण काहीतरी असे असते की जे बदलत नाही. ते कळायचीदेखील प्रत्येकाची एक वेळ असते, पण वेगवेगळी. हे सांगणारी कथा 'सखी'. देवी आणि अंजलीच्या वेगळ्या मैत्रीची ही गोष्ट खूप काही शिकवून जाते. जगण्याच्या

वेगळ्या जाणीवा समृद्ध करणाऱ्या या दीर्घकथा मनाला भावतात. पुन्हा पुन्हा वाचाव्याशा वाटतात. विचारप्रवृत्त करतात.

## प्रकरण ३ रे

कथा या साहित्य प्रकाराचा अभ्यास केल्यानंतर सानिया यांचे कथाविश्व अभ्यासणे सोपे गेले. सानिया यांच्या विचारप्रवृत्त करणाऱ्या कथाविश्वाचा अभ्यास या प्रकरणात घेतला आहे. सानियांच्या मानवी मनाचा ठाव घेणाऱ्या ११ कथासंग्रहातील कथांचे वाचक, अभ्यासक म्हणून केलेले परीक्षण या प्रकरणात मांडले आहे.

केवळ स्त्रियांच्या कथनात्मक साहित्यातच नव्हे तर समग्र मराठी साहित्य परंपरेमध्ये ज्यांचे स्थान लक्षणीय ठरते अशा लेखिकांमध्ये सानिया यांचा समावेश होतो. त्यांचे लेखन संख्यात्मक दृष्टीने मोजके आहे. तरी ते निश्चितपणे गुणवान व कसदार आहे. आपल्याला भावलेला अनुभव त्याच्या सूक्ष्मतेसह प्रतिकात्मक भाषेत सानिया आपल्या कथांमधून मांडतात. बाह्यविश्वातील घडामोडींबरोबरच माणसांच्या अंतर्मनातील हेलकावे शब्दांकित करण्याचे अनोखे सामर्थ्य त्यांच्या लेखणीत आहे.

सानियांचे साहित्य वाचताना मेंदूला जडपणा येतो तर मानवी मनाच्या अंतरंगात शिरून निष्कर्ष काढण्यात मन गुंतून जाते. कथा, दीर्घकथा आणि कादंबरी या तिन्ही साहित्यप्रकारांवर आपल्या आशयघनतेने व प्रयोगशिलतेने सानिया यांनी वाचकांच्या मनावर लखलखीत मोहर उठविली आहे. शिक्षणानंतर विवाह आणि नोकरीच्या निमित्ताने व लग्न झाल्यानंतर सानिया यांचे वास्तव्य महाराष्ट्रापासून आणि पुण्या - मुंबईसारख्या वाङ्मय निर्मितीच्या केंद्रापासून दूर होते. त्यामुळे साहित्यिक कार्यक्रमांमधून व सभांमधून त्या फारशा दिसल्या नाहीत. पण म्हणून मराठी भाषेपासून आणि मराठी माणसाच्या सुखदुःखापासून त्यांनी फारकत घेतली नाही. किंबहुना मराठी मुलखापासून दूर वास्तव्य करण्याचा त्यांना फायदाच झाला. अनेक जागा बदलत गेल्याने बरेच अनुभव वाट्याला आले. एक व्यक्ती म्हणून व्यापक दृष्टीकोन मिळाला. सानिया यांच्या बहुतेक कथा स्त्री केंद्री आहेत. स्त्रियांचे अनुभवविश्व बहुतेक कथांमध्ये केंद्रस्थानी आहे. त्यामुळे कौटुंबिक नातेसंबंधातून उत्पन्न होणारे ताण चित्रित करण्यावर सानिया यांनी आपले लक्ष केंद्रित केलेले दिसते.

**शोध**

सानियांचे कथाविश्व पुरुषप्रधान व्यवस्थेत आव्हान देणारे आहे. त्यांनी निर्मिलेली पात्रे परंपरेच्या चौकटी झुगारून देतात. सानिया यांची बहुतेक पात्रे पर्याय शोधण्यावर स्वतःचे आयुष्य स्वतः प्रयत्नपूर्वक बांधून काढण्यावर विश्वास ठेवतात. 'आयुष्य जगायचे ते स्वतःला हवे तसे' याचा उल्लेख त्यांच्या कथांमधून आढळतो. स्वतःला समजून घेतले तरच आपण जगाला समजून घेऊ शकतो यावर त्यांच्या पात्रांचा विश्वास आहे. अखंडपणे चलणाऱ्या या प्रक्रियेमधून प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे व्यक्तीच्या आत्मशोधाची व परिवर्तनाची दिशा मिळते.

मनात येणारे सगळे विचार एकसंध कुठे असतात एकाच वेळी भावनांचे कल्लोळ उठत असतात. या सगळ्या विचारांना भावनांना विसंगतपणे पण जसेच्या तसे मांडणे तेही कथारूपात हे इतके सोपे नाही. 'शोध' या कथासंग्रहात सानियांनी अशाच कथा लिहिल्या आहेत. कथांचे वेगळे आकृतीबंध या कथासंग्रहात आढळतात. 'शोध' हा त्यांचा पहिला कथासंग्रह. या कथासंग्रहातील अनुभवविश्व पुढील काळातील कथासंग्रहातील अनुभवविश्वापेक्षा कितीतरी पटीने अधिक अमूर्त, धूसर आहे. व्यक्तिचित्रणाच्या रंग रेषाही फिकट व तुटक आहेत. निवेदनाची भाषा एकसुरी वाटते. या कथासंग्रहातील कथांना सत्यकथा, मौज, संदर्भ, हंस या मासिकांमधून पूर्वप्रसिद्धी मिळाली आहे.

'शोध' हा सानियांचा प्रकाशित असा पाहिला कथासंग्रह आहे. त्यांनी १९७५ पासून लेखनाला सुरूवात केली. 'शोध' या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे कथांतर्गत व कथाबाह्य असे दोन्ही प्रकारचे निवेदक या कथासंग्रहात आहे. 'इंप्रेशन', 'आतंक' आणि 'अपरिहार्य' या कथांमध्ये कथांतर्गत निवेदक आहे. तर उरलेल्या १४ कथांमध्ये कथाबाह्य निवेदक आहे. कथांतर्गत निवेदक कथेतील एक पात्र बनून कथा सांगण्याचे काम करतो. कथाबाह्य निवेदक कथेच्या बाहेरून कथेचे निवेदन करतो. सानिया यांच्या बहुसंख्य कथांचा निवेदक कथाबाह्य आहे. जेथे तो कथांतर्गत आहे तेथेही त्याच्या अंतरंगात कथाबाह्य निवेदकाने प्रवेश केला आहे.

सुखाचा निरंतर शोध घेणाऱ्या मानवी मनाचा वेध 'शोध' या शीर्षककथेतून घेतला आहे. मनू या पात्राच्या आधारे हा शोध दाखवला आहे. भावा-बहिणीच्या नात्याची वेगळ्या वळणाची कथा म्हणून 'वळण' या कथेकडे पहाता येईल. एखाद्याचे भले व्हावे म्हणून केलेले प्रयत्न त्या व्यक्तीच्या दुर्दैवाला कारणीभूत व्हावेत आणि त्या व्यक्तीच्या आयुष्याला वेगळे वळण लागावे असे या कथेचे कथानक आहे. आयुष्याला वेगळे वळण लागूनही कांगावा न करणारी कृष्णा कथेची नायिका आहे. मरगळलेल्या निराश मनाला नवी उभारी देण्यासाठी रेषेपलीकडे जाऊन विचार करणारी चारू 'रेषेपलीकडे' या कथेत भेटते. सरिता आणि शंतनूच्या म्हणजे तिच्या

नवऱ्याच्या नात्याकडे ती रेषेपलीकडे जाऊन बघते.  महत्त्वाकांक्षी प्रभाचा वेगळ्या वाटेवरचा प्रवास 'वाट वेगळी' या कथेत आहे.  लग्न या संस्थेत न अडकण्याचा तिचा वेगळ्या वाटेवरचा निर्णय योग्य असतो याचा तिला आनंदच होतो.  रावबददल वाटणारी ओढ कशी तात्पुरती होती  हे या कथेतून समजते.  आपल्या नवऱ्याचे  निखिलचे आजारपण सकारात्मक दृष्टीकोनातून बघणारी शांती 'मार्ग' या कथेची नायिका आहे.  स्वतंत्र विचार जपणारी शांती प्रेरणादायी वाटते.  एका विशिष्ट चौकटीतले जीवन जगणारी कल्याणी 'फ्रेम' या कथेची नायिका आहे.  सुमंत हा तिला वडिलांच्या जागी असतो.  पण तिला प्रेम आणि जिव्हाळा या भावनेच्या फ्रेममध्ये अडकायचे नसते. पूनमीवर निर्व्याज प्रेम करणारा कनू 'क्वचित'या कथेचा नायक आहे.  रॉयवर सूड उगवण्यासाठी समाजातल्या पराभूत व खचलेल्या लोकांना शारीरिक सुख  देणारी पूनमी कथेची नायिका आहे. क्वचितच मिळालेल्या कनूच्या प्रेमाचाही विचार करत नाही ही खंत तिला कायम बोचते.  स्वतंत्र विचारांच्या खंबीर नायिकेची इलाची कथा म्हणजे 'रस्ते काळोखाचे' नात्याचा आदर न ठेवणारी माणसे तिला भेटतात.  पण या सगळ्या कटू अनुभवांमधून ती हा प्रवास एकटीनेच करण्याचा निर्णय घेते.  आत्मविष्कार झाल्याची जाणीव 'जन्म' ही कथा देते.  प्रत्यक्ष ओळख झाल्यापेक्षा पत्रातून रेणूकेला जयवंत आवडतो.  वाचक व लेखकाच्या नात्याची कथा म्हणजे 'इंप्रेशन'.  कथेची वेगळी मांडणी हे कथेचे मुख्य वैशिष्ट्य.  'रिच्युअल' या कथेत आपल्याच मनाशी पत्ररूपाने साधलेला संवाद आहे.  एकमेकांची एकमेकांच्या आयुष्यातली अपरिहार्यता दाखवणारी कथा 'अपरिहार्य'. रघुवीर, ती आणि मिनाक्षी या त्रिकोणाची ही कथा आहे.  आलेल्या संकटावर मात करण्यासाठी केलेला आतंक 'आतंक' या कथेत आहे.  सुटका हवी असणारी आणि सुटकेला घाबरणारी रेवती 'सुटका' या कथेत आहे.  निरूपमा आणि सई या दोन बहिणींची कथा 'दोघी'.  या कथेतून त्यांचे एकमेकींविषयीचे विचार व असूया दाखवली आहे.  माणसाजवळ सगळे असूनही तो हरतो किंवा ते असणेच त्याच्या पराभवाचे कारण ठरते असे सांगणारी ही कथा.  रोहिणी आणि श्रीधरचे नाते कथेतून मांडले आहे.  मनात आहे ते खरेपणाने सांगणारी रोहिणी कथेची नायिका आहे.

१७ वेगवेगळ्या कथांमधून मानवी मनाचा, भावभावनांचा, विचारांचा शोध सानिया यांनी या कथासंग्रहातून घेतला आहे.

**प्रतीती**

या कथासंग्रहात ५ कथा आहेत.  स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून तिच्या अस्तित्वाचा शोध घेणारी सानिया यांची कथा आहे.  सानियांची कथा मराठी कथासाहित्यात स्त्रीवादी-कथा या नावाने आपली ओळख स्थिर करून आहे.  पण सानियांनी स्त्रीवादी लेखिका म्हणून आपली ओळख

व्हावी म्हणून हे लेखन केलेले नाही. त्या कोणत्याही वादाचा पुरस्कार करत नाहीत. त्यांच्या साहित्यात त्यांना स्त्री महत्वाची वाटते. स्त्रीच्या ठायी असणारी शक्ती त्यांना विस्मित करते आणि त्यातूनच त्यांची स्त्रीचा शोध घेण्याची प्रक्रिया त्यांच्या कथेतून सुरू होते.

सानिया यांच्या 'शोध' या कथासंग्रहाच्या तुलनेत 'प्रतीती' हा कथासंग्रह आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने कितीतरी पटीने उजवा आहे. या कथा माणसाचे मन, मानवी नात्यांचे संबंध, सानियांची मानसिकता याविषयी भाष्य करणाऱ्या आहेत.

'प्रतीती' या शीर्षककथेत सानिया यांनी चंदना या नायिकेच्या आधारे माणसाचे मोठे होणे दाखवले आहे. प्रतीती म्हणजे स्वानुभवाने घेता आलेली प्रचिती. चंदनामध्ये झालेले सकारात्मक बदल प्रतीतीतून दिसून येतात. 'प्रवाह' या कथेत आई आणि मुलीच्या नात्याचा गोफ विणला आहे. गौरी आणि विनिता या दोघी कथेच्या नायिका आहेत. वयात येणाऱ्या शुभांगीची मनःस्थिती, तिने पचवलेला प्रेमभंग, शुभांगीत झालेला सकारात्मक बदल 'कोष' या कथेत आहेत. मनातल्या आणि मानवी नात्यांच्या अरण्यात अडकलेले जगदीश, करूणा, जय आणि पद्मा 'अरण्ये' या कथेत भेटतात. भावनांच्या गुंत्यातून एकमेकांना सांधणारा दुवा म्हणजे 'पूल' ही कथा. या कथेतली सगळी पात्र अदृश्य अशा पूलाने जोडली आहेत.

सानियांच्या 'प्रतीती' या कथासंग्रहातील नायिका मनोविश्लेषणात्मक भूमिकेतून विचार करणाऱ्या आहेत. स्वानुभवाने आलेल्या अनुभवावर ठाम राहून निर्णय घेणाऱ्या आहेत. कथा वाचल्यानंतर आपण घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी आपलीच असते हा विचार मनात घोळत राहिला. सानियांच्या या कथा 'स्व'चा शोध घ्यायला शिकवतात.

### खिडक्या

या कथासंग्रहात १२ कथा आहेत. ऐंशीच्या दशकात लिहिलेल्या कथांचा हा संग्रह पुन्हा एकदा नव्या आवृत्तीत वाचकांपुढे आणण्यात आला आहे. लेखनप्रवासाच्या सुरुवातीच्या काळात लिहिलेल्या या कथा आहेत. माणसांमधल्या निरनिराळ्या नातेसंबंधांचा शोध घेण्याचा प्रयत्न या कथा करतात. या कथांना आपल्या भोवतीच्या माणसांना समजून घेण्याची आस आहे. आपोआप गृहित धरली जाणारी आणि आयुष्यात नंतर बांधली गेलेली अशी नाती नक्की काय देतात आणि घेतात हे जाणण्याची उत्कट इच्छा या कथांमध्ये जाणवते. या प्रवासात घडत राहिलेल्या घटना-प्रसंगातूनही माणसे संवादाचे पूल बांधतात. त्याद्वारे समोरचा माणूस अधिक समजून घेण्याचा प्रयत्न करतात. या प्रयत्नात ते पूल अधिक मजबूत होतात. कधी नुसते तगतात तर कधी तुटतात. तरीही असे का होते हे जाणण्याची अनावर ओढ त्यांच्यात आहे. या भावना

या कथांमधून व्यक्त होतात.

सानिया यांच्या कथांमध्ये बाह्य घटनांपेक्षा मनोविश्वातील हेलकाव्यांना अधिक प्राधान्य आहे. कथेतील पात्रांची संख्या मोजकीच आहे. बहुतांश कथांमध्ये तीन, चार किंवा पाच एवढीच पात्रे असतात. त्यांच्या परस्परसंबंधातून कथा आकारत जाते. आई-मुलगी, पती-पत्नी, सासू-सून, मित्र-मैत्रीण यापैकी कोणतेही नाते ताणलेले असले तरी या कथेत घडणाऱ्या बाह्य घटनांपेक्षा पात्रांच्या मनातील आंतरिक खळबळ, विचार महत्त्वाचे ठरतात. किंबहुना सानिया यांच्या कथांमध्ये पात्रांचे विचार हीच एक अर्थपूर्ण कृती बनते. अशाच कथांचा समावेश या कथासंग्रहात केला आहे.

'खिडक्या' हा सानिया यांचा कथासंग्रह त्यांच्या लेखनातील दुर्बोधता जाऊन वेगळे काहीतरी मांडतो. शीर्षककथेत नात्यांमधल्या भिंती सानियांनी दाखविल्या आहेत. 'पावसाळ्यातली गोष्ट' या कथेत एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला मदत करते हे दाखवले आहे. 'वय' या कथेत अश्विनीचे कोवळ्या वयातले प्रेम वाचक म्हणून भावते. योग्य वेळी व्यक्त न झाल्याने माणसाच्या आयुष्यात काहीच शिल्लक राहात नाही. हे 'शिल्लक' ही कथा मांडते. पुढे होणाऱ्या त्रासापेक्षा खेळाच्या प्रारंभीच माघार घेणारी विधवा नंदिनी आणि तिचा निर्णय स्वीकारणारा किरण 'प्रारंभी खेळाच्या' या कथेत भेटतात. आपल्या वडिलांनी दुसरा घरोबा केल्यावर साधनाच्या मनाची अवस्था कशी होते? हे 'दुसरं घर' या कथेत मांडले आहे. अजित या आपल्या नवऱ्याचे व त्याच्याकडे काम करणाऱ्या कालिदासचे दुहेरी रूप 'दुहेरी' या कथेत आहे. आपल्याच अस्तित्वाची नव्याने ओळख करून घेण्याची भावना 'एकदा जाग आली' या कथेत आहे. आयुष्यातल्या प्रत्येक गोष्टीकडून काहीतरी प्रेरणा घेऊन पुढे जाणारी, सकारात्मक विचारांची किशोरी 'स्रोत' या कथेची नायिका आहे. अनिरुद्ध हा समंजस नायक व मिनू ही थोडीशी आततायी नायिका 'वाटा' या कथेतून वाचक म्हणून अंतर्मुख व्हायला लावतात. 'चाफा' आणि 'हिवाळ्यातील पहिला दिवस' या कथेत पुरुषपात्र प्रधान आहेत हेच या कथांचे वैशिष्टय आहे. माणसांमधल्या नातेसंबंधांचा शोध या कथासंग्रहात सानियांनी घेतला आहे. मनाच्या खिडक्या उघड्या करून कथासंग्रहातील अनेक कथा मनात साठवून ठेवण्यासारख्या आहेत.

**भूमिका**

या कथासंग्रहात २ दीर्घकथा आहेत. लेखकाच्या मनातल्या विचारांना मूर्त रूप मिळणे म्हणजे साहित्य निर्मिती. साहित्य निर्माण होताना ते स्वान्तसुखाय असते का? असे लेखन सुरुवातीला फार खरे असते. कारण मनात येईल ते लिहावेसे वाटले की आपल्या आवडत्या

साहित्यप्रकारात लिहिले जाते. काय लिहायचे हे मनात पक्के झाले की लिखाणाला सुरुवात होते. मग हे लिखाण कुणासाठी वा कशासाठी तरी लिहित आहोत याचे भानच नसते. पण हे लिहिलेले वाचकांपर्यंत जावे असे प्रत्येक लेखकाला वाटते. स्वान्तसुखाय लेखन करुन वाचकांच्याही पसंतीस आलेल्या कथालेखिकांपैकी महत्त्वाचे नाव म्हणजे सानिया. 'भूमिका' हा त्यांचा कथासंग्रह स्वान्तसुखाय लेखनाचा रंजक नमुना आहे.

'भूमिका' या कथासंग्रहातील कथा संमिश्र स्वरुपाच्या आहेत. स्त्रियांचे भावविश्व रेखाटताना पुरुषप्रधान कथांचा समावेशदेखील या कथासंग्रहात आहे. दोन मैत्रिणींचे भावविश्वदेखील कथेत आहे. शीर्षककथेमध्ये ठाम भूमिका असलेली वसू आपल्याला भेटते. श्रीरंग हा तिचा मित्र असतो. श्रीरंगची पत्नी बाळंतपणात गेल्यानंतर वसूने त्याच्याशी लग्न करावे असे सगळे सुचवतात. पण मैत्रीच्या नात्यापलीकडे वसूला काहीच नको असते. ती तिच्या भूमिकेवर ठाम राहाते. वेळोवेळी मनात असताना वा नसताना केलेल्या तडजोडी मोकळेपणाने स्वीकारणारी 'प्रतिभा' या कथेत आहे. आपल्या चुकांची कबुली उघडपणे देण्याचे धाडस प्रतिभाकडे आहे. स्वकर्तृत्वाने स्वतःला सिद्ध करणारी रेणुका 'सुकन्या' कथेची नायिका आहे. पहिल्या पत्नीची मुलगी रेणुका हिला पित्याचे प्रेम देऊ शकत नसल्याची खंत तिच्या वडिलांच्या मनात आहे. पुरुषप्रधान कथेचा उत्तम नमूना म्हणून 'मित्राची कथा' या कथेकडे पहाता येईल. माधव आणि ऋषिकेश या दोन मित्रांची ही कथा आहे. आपल्या मित्राला समजून न घेतल्याची खंत माधवला चटका लावते. ज्योत्स्ना आणि शमी या दोन मैत्रिणींची भेट 'भेट' या कथेत सानिया यांनी प्रभावीपणे रेखाटली आहे. दोन भिन्न व्यक्तिमत्त्वाच्या या मैत्रीणी भेटीनंतर आपले स्वत्व शोधताना दिसून येतात. कुटुंब नसतानाही कुटुंबासारखे भासावे असे वैजू आणि मकरंद या मित्र मैत्रीणीचे कुटुंब 'आपापले प्रश्न' या कथेचे वैशिष्ट्य आहे. मनातही नसताना अचानकपणे आलेला मित्र आणि त्याची लहानगी वैजूच्या कुटुंबाचा भाग होऊन जातात. आपापले प्रश्न घेऊन ते एकत्र राहातात. आपल्या प्रश्नांवरचा एक रामबाण उपाय असणारे लिक्विड क्लिनर सानियांच्या कल्पनाशक्तीचा अफाट नमुना आहे. मिलींद, सौरभ आणि मृणाल या संवेदनशील मित्रांची कथा 'वारसा'. वडिलांचा राजकारणाचा वारसा जपण्यासाठी मिलींद त्या रस्त्याची निवड करतो. काही व्यक्तींविषयी आपण उगीचच गैरसमज करून घेतो. अकारण आकसाने वागतो असेच काहीसे घडते 'प्रतिमाची गोष्ट' या कथेत. प्रेमविवाहानंतर आपल्या सुखाचा विचार न करता कुटुंबाचा विचार करणारी तरीही स्वतंत्र विचारांची रोहिणी 'रोहिणीची डायरी' या कथेतून आत्मभान देते. घरातल्या वातावरणाचा परिणाम होऊन मनाने दुरावलेले बहिण-भाऊ वर्तमानात जगण्याच्या विचाराने पुन्हा एकत्र येतात 'वर्तमान' या कथेत. वेगळ्या विचारांचा संदेश 'स्वदेशी' या कथेतून

सानियांनी दिला आहे. आपण आपल्या माणसांना, देशाला विसरलो तरी वेळेला आपली माणसेच आपल्या मागे उभी राहातात हाच तो विचार. स्वान्तसुखाय लेखन करताना वाचकांना 'भूमिका' हा उत्तम असा कथासंग्रह सानिया यांनी दिला आहे.

**परिमाण**

या कथासंग्रहात ९ कथा आहेत. माणसांमाणसातले परस्परसंबंध आणि त्याबद्दलचे चिंतन इथूनच साहित्याचा प्रवास सुरू होतो. याबद्दलच्या चिंतनामुळेच लिहिण्याची उर्मी साहित्यिकाला मिळते. सतत लिहिल्यामुळे लिहिण्याच्या प्रवासात या नातेसंबंधांची परिमाणे आणखी चांगल्या पद्धतीने शोधता येतात.

'परिमाण' या कथासंग्रहातील कथांमध्ये मध्यम किंवा उच्चमध्यमवर्गीयांचे जीवन, त्यातले भोगापभोग, महत्त्वाकांक्षा, त्यांच्या कौटुंबिक आणि वैवाहिक जीवनातले ताणतणाव आणि त्यांची सूक्ष्मचित्रे दिसून येतात. प्रौढ स्त्री-पुरुषांमधले अनुबंध हा विषय त्यांच्या कथांमधून येतो. मात्र व्यक्ती, परिसर व त्यांचे व्यवसाय भिन्न भिन्न राखल्याने कथा रोचक होतात. खूप काही चांगले, अर्थवाही वाचल्याचा प्रत्यय या कथा देतात. रुढार्थाने कथानक नसलेल्या या कथा आंतरिक उर्मीतून आलेल्या आहेत. कथा आकर्षक होण्यासाठी घ्यायचे विषय, लेखनात चलाखी किंवा दिखाऊ कारागिरी या कथांमध्ये दिसत नाही. व्यक्तींमधील मानसिक, भावनिक संबंधांना त्यांच्या कथांमध्ये महत्त्व आहे. समकालीन तरुण पिढीचे दर्शन त्यांच्या या कथांमधून होते.

सानियांच्या 'परिमाण' या कथासंग्रहात वेगळ्या वाटेने विचार करणाऱ्या स्त्रिया आहेत. करिअरला महत्त्व देऊन आपले अस्तित्व टिकवणाऱ्या स्त्रिया या कथांमध्ये दिसून येतात. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीचा मैत्रीण, आई किंवा अन्य नात्यांमधून केलेला विचार हे या कथासंग्रहाचे वैशिष्ट्य सांगता येईल.

'परिमाण' या शीर्षककथेतली देवकी कैलासवर जीवापाड प्रेम करते. म्हणूनच त्याचा प्रत्येक निर्णयाला, कृतीला पाठिंबा देते. त्याच्याशी लग्न होऊ शकत नाही तरी त्याच्या कुटुंबीयांची काळजी घेते. स्वतःचा संसारही उत्तम करते. मनात ती कैलासची जागा अबाधित ठेवते. आपल्या आईच्या प्रियकराला स्वीकारणारी रितू म्हणजेच देवकीची मुलगी हीदेखील वेगळ्या वाटेवरचा विचार करणारी आहे. सुखाचे परिमाण सांगणारी ही कथा आहे. 'स्पर्श' ही कथा आहे सुचित्रा या मध्यमवर्गीय गृहिणीची. संसाराच्या रामरगाड्यात सुचित्राने आपले अस्तित्व गमावले असते. नवऱ्याच्या आजारपणाच्या निमित्ताने डॉ. विक्रमच्या बोलण्याने तिचा आत्मविश्वास वाढतो. तिच्या स्वत्वाचा स्पर्श तिला होतो. परदेशात शिकलेली विद्युत आपल्या विचारांचे

क्षितिज विस्तारू शकत नाही हे 'क्षितिज' या कथेतून दिसून येते. तिचा नवरा केविन तिला मदत करतो. आपले आयुष्य किती क्षणभंगुर असते हे 'काजवे' या कथेत अनुभवायला मिळते. सुख असो वा दुःख ते क्षणिक चमकणाऱ्या काजव्यांसारखेच आहे. अगदी 'उजेडाची फसवी निशाणी अन् काळोखाचेही भासच' असे. करिअर आणि स्त्रीत्वाच्या लढाईत स्त्रीत्व उजवे ठरते असा आशय 'स्व-रूप' या कथेतून प्रतीत होतो. साध्या, भोळ्या सुचेताच्या आयुष्याला रेणू आपल्या पद्धतीने आकार देते. 'आकार' या कथेत ती सुचेताला तिच्यामधल्या कर्तृत्ववान स्त्रीची ओळख करून देते. मत्सर हा स्त्रियांना चिकटलेला एक दुर्गुण आहे. पण 'परिघाबाहेर' या कथेत तो दिसत नाही. एक स्त्री जेव्हा दुसऱ्या स्त्रीला मदत करते तेव्हा किती सकारात्मक बदल घडतो हे समजते. कर्तृत्ववान शशी आपल्यामधला हळवेपणा हरवते. पण कथेच्या शेवटी तिला तिचे मूळ रूप सापडते. 'एक पाऊल पुढे' या कथेत कर्तृत्ववान असलेल्या उर्मिलेला तिची सून प्राची तिच्या कर्तृत्वाची आठवण करून देते व तिला एक पाऊल पुढे टाकायला मदत करते.

सानियांच्या चिंतनातून, खोलवर केलेल्या विचारांमधून लिहिल्या गेलेल्या या कथा समंजसपणे लिहिल्या गेल्या आहेत. कथेचा नायक किंवा नायिका यांचे विचार ठाम आहेत. चांगल्या - वाईट परिणामांचा सामना करायला सज्ज आहेत. आजुबाजूला असलेल्या माणसांची कित्येक नाती मनात घट्ट रुतून बसलेली असतात. लिखाणातून ही नाती उलगडून दाखवण्याचा यशस्वी प्रयत्न या कथांमध्ये सानियांनी केला आहे.

**प्रयाण**

या कथासंग्रहात ८ कथा आहेत. गेल्या काही वर्षातील प्रमुख कथाकारांमध्ये सानिया हे नाव आपल्या अनोख्या शैलीमुळे लक्ष वेधून घेणारे आहे. सानियांच्या कथा स्त्री व्यक्तीरेखांना प्राधान्य देणाऱ्या आहेत. समाजातील विविध स्तरांतील स्त्रियांच्या भावभावनांचे, स्वभाववैशिष्ट्यांचे चित्रण त्या करतात. त्यांच्या कथांमधील नायिका या कोणी असामान्य व्यक्तिमत्व असणाऱ्या नाहीत; परंतु चारचौघींपेक्षा वेगळ्या आहेत. या नायिका मनाने, आचरणाने आणि विचाराने स्वतंत्र आहेत. नेहमीच्या वाटेपेक्षा वेगळ्या वाटेने प्रवास करणाऱ्या आहेत. प्रसंगी समाजाने ठरवलेल्या पारंपारिक व्यवस्थेला धुडकावणाऱ्या आहेत. मानवी नातेसंबंध, भाव-भावना, आंनद-दुःख यांच्या शोधांचे चित्रण सानियांच्या कथांमधून दिसते.

मानवी सुख-दुःख, माणसामाणसातली नाती, जन्म आणि मृत्यू, शरीर, चैतन्य, निसर्ग, सगळी सृष्टी या पलिकडचे अमर्याद विश्व यातल्या सत्याच्या शोधाचा प्रवास म्हणजे 'प्रयाण' हा कथासंग्रह. रोजच्या साध्या, लहानसहान घटना-प्रसंगातून काहीतरी चटकन समजल्यासारखे वाटून

अनपेक्षित उत्तरे मिळणे हा अनुभव या कथासंग्रहातील कथा वाचनाने मिळतो.

साहित्यिकाच्या साहित्यावर त्याच्या आजुबाजूच्या अनेक गोष्टींचा परिणाम होत असतो. कारण लेखन जर लेखकाच्या अनुभवाशी निगडीत आहे असे म्हटले तर अनुभवात हे सगळे घटक येतातच. कारण अनुभव भोवतीच्या वातावरणातूनच आलेले असतात.

सानियांनी अनुभवलेल्या आणि अनुभवांच्याही पलिकडच्या अनुभवांना 'प्रयाण' या कथासंग्रहात त्यांनी शब्दबद्ध केले आहे. 'प्रयाण' या शीर्षककथेतल्या डॉ. चारुच्या विचारांचे प्रयाण या कथेत दाखवले आहे. मनोहरच्या येण्याने तिच्या मानसिकतेचे प्रयाण होते. 'प्रवास' या कथेत नंदिताचा आपली आई सावित्रीवरचा राग दाखवला आहे. जेव्हा नंदिताला तिच्या आईची गरज असते तेव्हा ती तिला सोडून जाते. त्यामुळे नंदिताला सावित्रीबद्दल प्रेम वाटत नसते. स्वामीबरोबर झालेल्या प्रेमभंगाने नंदिता जास्तच एकटी पडते. पण सावित्री आपल्याला सोडून शेवटच्या प्रवासाला जाणार या कल्पनेने अस्वस्थ होते. नंदिताच्या भावनांचा प्रवास सानियांनी उत्कटतेने साकारला आहे. केतकी आणि वसुंधरा या सासू-सुनेची कथा म्हणजे 'चार दिवस'. कर्तबगार सुनेला पाठिंबा देऊन वसुंधरा केतकीला अमेरिकेत पाठवते. तिचा मुलगा दुसरे लग्न करतो. चार दिवसांसाठी केतकी भारतात येते तेव्हा वसुंधरा मात्र अस्वस्थ होते. मुलगा आणि मुलगी एकसमान असे कितीही म्हटले तरी भेद कायम राहातोच. पण मुलींना स्वातंत्र्य देऊन मुलांप्रमाणे वाढवले तर त्यादेखील आई-वडिलांचा आधार बनतात हे 'तिसरी मुलगी आणि आई' या कथेतून सानियांनी सांगितले आहे. एका डायरीच्या माध्यमातून रजूच्या मनातली आंदोलने 'रजू लिहिते...' या कथेत मांडली आहेत. दुसऱ्याचे जग लांबून जितके छान वाटते तितके अनुभवानंतर वाटत नाही. आयुष्यात कितीही विचित्र, अनाकलनीय प्रसंग आले तरी पुढे जावेच लागते हा संदेश या कथेतून कथेची नायिका रजू देते. 'कोपऱ्यावरलं घर' या कथेत एखादी जागा, व्यक्ती, घर वाईट किंवा अपशकुनी नसतात. जे घडयचे ते घडतेच हा संदेश सानियांनी दिला आहे. किरण आणि श्रीवास्तव यांच्या अजब मैत्रीची ही कथा आहे. कितीही पैसा असला तरी प्रेम नसेल तर नात्यांना जोडणारा पूल तयार होऊच शकत नाही हा गभितार्थ 'दाही दिशांचे पूल' या कथेतून व्यक्त होतो. एखाद्याने आपली चूक कबुल केली तर मोठ्या मनाने त्याला माफ करायला हवे हा संदेश या कथेतून मिळतो. मल्हार आणि यशचे लग्न व्हावे अशी मल्हारच्या आईची नीराची इच्छा असते. पण तो डिप्रेशनचा ॲटॅक येणाऱ्या विनीताशी लग्न करतो. मल्हार चूक कबुल करतो तेव्हा यश त्याला माफ करते. त्यांच्यामध्ये वासनेचा स्पर्शही नसलेले नाते तयार होते. 'जाग' या कथेत आपलाच आपल्या मनाशी झालेला संवाद मांडला आहे. एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधताना आपल्याच अस्तित्वाचा शोध लागतो. असेच काहीसे कथेची नायिका यशोदा हिच्या बाबत

होते.  ज्याच्यावर ती जीवापाड प्रेम करते त्या नवऱ्याचे आणि त्याच्या मैत्रिणीच्या संबंधांविषयी कळल्यावर ती कोलमडते.  सगळ्याच पातळ्यांवर आपण कोणाला किती ओळखतो याची जाणीव तिला होते.  श्रीधरचा मित्र आनंद या सगळ्यात तिला समजून घेतो.  यशोदेच्या मृत्यूने कथेचा शेवट होतो.  तिच्या विचारांना आलेली जाग कथेचे शीर्षक अधोरेखित करते.

चारचौघींपेक्षा वेगळ्या अशा नायिका 'प्रयाण' या कथासंग्रहातून भेटतात.  मानवी संबंध व भावभावनांचे चित्रण, आनंद व दुःखाचा शोध सानियांच्या या कथांमधून दिसतो.

**त्यानंतर**

या कथासंग्रहात २ दीर्घकथा आहेत.  'त्यानंतर' हा सानियांचा दीर्घकथासंग्रह आहे.  या कथासंग्रहातील दोन्ही कथा 'दिशा घराच्या' (१९९१) या कथासंग्रहात प्रसिद्ध झाल्या होत्या. सतत प्रश्न उभे करणारी संवेदनशील स्त्री सानियांनी आपल्या लेखनातून मांडली आहे.  त्या स्त्रीचा प्रवास ही बाब सानियांच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.  अंतिम उत्तरे मिळणे महत्त्वाचे नसते.  कारण तशी ती आयुष्याच्या प्रवासात मिळतातच असे नाही असे सानिया यांना वाटते.  पण त्या शोधात वाट्याला येणारे सामर्थ्य, भान, प्रगल्भता यामुळे आयुष्याला अर्थ येतो.  अशा स्त्रीचे, तिच्या आजुबाजूच्या माणसांचे, नात्यांचे, त्या अनुषंगाने पडणाऱ्या प्रश्नांचे चित्रण त्यांच्या लेखनातून त्यांनी केले आहे.

या दीर्घकथा म्हणजे लेखनाकरवी घेतलेला शोध आहे.  रोजचे आयुष्य जगत असताना वेगवेगळे प्रश्न पडतात.  त्या प्रश्नांची उत्तरे शोधाणाऱ्या या दीर्घकथा आहेत.  नवरा, मित्र, प्रियकर, मुलगा अशा नात्यांमधून सामोऱ्या येणाऱ्या पुरुषाची ओळख करून घेत जाणारी संवेदनशील स्त्री कथांमध्ये आहे.  आत्मभान जागृत होत गेलेली स्त्री आणि तिचा प्रवास यांचा आलेख या दीर्घकथांमध्ये मांडला आहे.

व्यक्ती म्हणून जगताना स्वतःमधले काही अंतःप्रवाह जाणवत असतात.  स्वतःमधली उत्कटता आणि तटस्थता किंवा दोन्हींचे मिश्रण जाणवत असते.  व्यक्ती म्हणून जगतानाचे जे आकलन असते ते लेखनातून व्यक्त होताना त्यात काही प्रक्रिया होते.  काही मिश्रणे होतात.  या साऱ्या आकलनाचे एक वेगळेच रसायन होते.  म्हणूनच लेखक म्हणून जीवनाच्या आकलनाची आणि ते मांडण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष जीवन जगण्यापासून वेगळी आहे.  अशीच वेगळी मांडणी या दीर्घकथांमधून अनुभवायला मिळते.

'त्यानंतर' या दीर्घकथासंग्रहातून आपल्याच अनुभवांनी समृद्ध झालेल्या दोन स्त्रियांची ओळख होते.  'त्यानंतर' आणि 'दारं उघडावीत' या दोन दीर्घकथांमध्ये आयुष्याच्या प्रवासात

राधिका आणि करुणा यांच्या वाट्याला येणारे सामर्थ्य, भान, प्रगल्भता दिसून येते. नवरा अचानक निघून गेल्यानंतर ठरीव प्रतिक्रिया न देता जगणारी करुणा 'त्यानंतर' या कथेची नायिका आहे. स्वतःच्या सामान्य आयुष्याकडे ती बारकाईने पाहते, माणसांना नव्याने ओळखते. स्वतःच्याच नवऱ्याची पारख करते आणि त्यातून तिला स्वतःची ओळख होते. त्यामुळे मिळणारी शक्ती आणि सामर्थ्य याने ती चकित होते. कथा वाचताना वाचक म्हणून मनात अनेक प्रश्न उभे राहातात. अगदी अशा व्यक्तिरेखा असतील का? इथपासून राधिका अशी का वागते? इथपर्यंत या कथेमधली इतर सगळी पात्र वाचक म्हणून आपल्याला पडलेले प्रश्न कथेमध्ये विचारतात. 'दारं उघडावीत' या कथेतील करुणा वेगळा विचार करणारी स्त्री आहे. आयुष्याकडे अलिप्ततेने पहाण्याचे कसब तिच्याकडे आहे. सुखवस्तू घरातली तरीही चौकटीत राहून विचार न करणारी आहे. त्याच त्या रुळलेल्या वाटेने जाणे तिला मान्य नाही. विवाहित भरतवर ती एकतर्फी प्रेम करते. भरत प्रोत्साहन देत नाही हे समजताच ती प्रशांतकडे म्हणजे तिच्या वहिनीच्या भावाकडे मुंबईला निघून जाते. भरतवर प्रेम असले तरी त्याच्या मार्गात अडसर बनून राहणे तिला मान्य नसते.

या कथासंग्रहात सानिया यांनीदेखील अनुभवापलीकडे जाऊन कथालेखन केले आहे. विशेषतः शीर्षककथेतील राधिका आपल्या विचारांपेक्षा कितीतरी वेगळे वागते. आत्मभान जागृत होत गेलेली स्त्री 'त्यानंतर' या कथासंग्रहातून अनुभवायला मिळते.

**आपण आपले**

या कथासंग्रहात २ दीर्घकथा आहेत. आयुष्याच्या ज्या टप्प्यावर स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायची क्षमता व संधी उपलब्ध होते त्या टप्प्यावर उभ्या असलेल्या तरुण, संवेदनशील मनाच्या प्रवासाचा आलेख चित्रित करणाऱ्या या दीर्घकथा आहेत. यामध्ये वेगवेगळे प्रश्न विचारणारी, त्यांची उत्तरे शोधणारी, स्वतःवरचा विश्वास बळकट करु पहाणारी आणि त्यातूनच स्वतःला व इतरांना जाणू इच्छिणारी तरुण माणसे आहेत. त्यांच्या प्रगल्भतेच्या शोधाचा हा पट आहे. केवळ स्त्रियाच नाही तर पुरुषही संवेदनशील असतात आणि वेगवेगळ्या संभ्रमातून स्वतःचा आणि जगाचा शोध पुरुषही घेतात. हे त्यांच्या कथांमध्ये दिसते. स्त्रीचा आत्मभानाचा झगडा अधिक तीव्र असतो तो सामाजिक परिस्थितीमुळे. तरीही बुद्धिनिष्ठ मन बधिर होऊ न देता जगायचे असते याचे भान सानियांच्या कथांमधील नायक नायिकांमध्ये असते.

माणूस म्हणून जगताना आपल्याला जे समजते ते आपले आयुष्याचे भान. साहित्यात अभिव्यक्त होताना ते सहाजिक साहित्यात उतरते. विशेषतः गंभीरपणे लेखनाकडे वळलेल्या

कुणाचेही ते होणे अटळ आहे. लेखकाला समजलेले सगळे मांडणे हीच तर साहित्यनिर्मितीची प्रेरणा असेल. या सगळ्याचा अनुभव सानियांच्या 'आपण आपले' या दीर्घकथासंग्रहातून मिळतो. कोणतीही विशिष्ट भूमिका पत्करली की परंपरेने चिकटलेली कर्तव्ये पालन करण्याचे बंधन येते. त्यामुळे भूमिकेच्या मोहक सापळ्यात न अडकण्याची स्वतंत्र जगण्याची पराकाष्ठा त्यांच्या नायिका करतात. भूमिकांचा भार पेलावा लागू नये याची दक्षता घेतात. 'ओळख' आणि 'आपण आपले' या दीर्घकथा पुन्हा एकदा या संग्रहातून वाचकांपुढे मांडण्यात आल्या आहेत. या दोन्ही दीर्घकथांची तरुण भारतच्या दिवाळी अंकात पूर्वप्रसिद्धी झाली आहे.

सानिया यांच्या कथांमधील काळ साठोत्तरी असल्याने वाचकाला त्या आपल्या जीवनाशी साधर्म्य सांगणाऱ्या, जवळच्या वाटतात. आपल्या आजुबाजुला घडणाऱ्या गोष्टींचे प्रतिबिंब त्यांच्या कथेत अनुभवायला मिळते. काही कथा स्त्रीसमस्याप्रधान असल्याने स्त्रीवाचक त्या कथांशी सहजपणे जोडला जातो. मात्र त्यांच्या कथा फक्त स्त्री वाचकांसाठी नक्कीच नाहीत. त्यांच्या कथांमधले अनुभवविश्व मानवी अस्तित्वाचा विचार करणारे व सनातन प्रश्नांना जाब विचारणारे आहे. त्यामुळे कथांमधले स्त्री–पुरुष केवळ सकारात्मक किंवा नकारात्मक नाहीत. किंबहुना सानिया यांच्या कथांचे बलस्थान हे आहे की त्यांच्या कथांमध्ये एकसुरीपणा नाही. अनाकलनीय व अतर्क्य अशा मानवी मनाचा वेध सानिया घेतात.

'आपण आपले' या दीर्घकथासंग्रहात तरुण आणि संवेदनशील मनाचा प्रवास सानियांनी घडवला आहे. या कथासंग्रहात स्वतःच्याच जीवनाचा, व्यक्तिमत्त्वाचा, सुखाचा आणि आंतरमनाचा शोध घेणारी माणसे आहेत. 'आपण आपले' या शीर्षककथेतली विद्युत स्वतंत्र विचारांची, उच्चशिक्षित तरुणी आहे. आपल्या मनाला पटेल तेच करणारी विद्युत सतीश या तिच्या मित्राचे प्रेम ठामपणे नाकारते. तिच्या नकारानंतर सतीशने केलेल्या अत्याचाराने ती मनाने उध्वस्त होते पण मनाच्याच ताकदीने पुन्हा उभी राहाते. तिच्या आईने लग्नासाठी ठरवलेल्या मुलाशी, भास्करशी सगळे मोकळेपणाने बोलते. कथेच्या शेवटी तिला जाणीव होते की, स्वतःचेच रूप इतर कोणात शोधणे व्यर्थ आहे. 'ओळख' या कथेत स्वतःची स्वतःशी झालेली ओळख अनुभवायला मिळते. कित्येक वेळा आपण घेतलेले निर्णय बरोबर आहेत की नाहीत हेच समजत नाही. घेतलेल्या निर्णयामुळे अपेक्षित समाधान मिळत नाही तेव्हा पुन्हा एकदा मागे वळून चाचपणी करावीशी वाटते. होऊन गेलेली गोष्ट बदलता येत नाही पण निदान पुढच्या आयुष्याचा मार्ग स्वच्छ, स्पष्ट दिसतो. स्वतःची ओळख करून घेत असताना झालेली चूक निदान स्वतःशी तरी मान्य करण्याचे धाडस या कथेतील अश्विनी करते. कथेतील भूषण स्वतःची चूक मान्य करत नसला तरी समजुतदारपणा दाखवतो.

प्रत्येकाने आपले बुद्धिनिष्ठ मन बधीर होऊ न देता जगायचे असते हे भान या कथांमधील नायक, नायिका देतात. संवेदनशीलता मरु देऊ नये असा संदेश या कथा देतात. चाकोरीबाहेरचे जीवन स्वीकारल्याचे फायदे व तोटे या कथानायिकांच्या वाट्याला येतात. त्या हे स्वीकारतात देखील. जसा विचार करतात तशाच कृती करतात. त्यामुळे या नायिका खऱ्या वाटतात.

**ओमियागे**

या कथासंग्रहात ६ कथा आहेत. 'ओमियागे' हा सानियांचा दीर्घकथासंग्रह आहे. गावा-देशांची, जाती-धर्माची वेस ओलांडून माणसा-माणसामधल्या नातेसंबंधांचा नेमक्या शब्दात वेध घेणाऱ्या या दीर्घकथा आहेत. साहित्यिकांच्या साहित्यावर भोवतालचा भौगोलिक प्रदेश आणि तिथला प्रदेश याचा परिणाम होतो. या कथासंग्रहात हे जास्त प्रमाणात जाणवते.

बऱ्यापैकी मोठी, सजलेली घरे, मुलांच्या स्वतंत्र खोल्या, अद्ययावत साधने, वस्तू, चारचाकी गाड्या यावरून बहुतेक कथांमधले नायक, नायिका शहरात वा महानगरात वास्तव्य करणाऱ्या मध्यमवर्गीय व उच्चमध्यमवर्गीय आहेत. त्यामुळे बहुजन समाजातील अन्न, वस्त्र, निवारा हे प्रश्न त्यांच्या कथांमधून डोकवत नाहीत. प्रश्न आहेत पण उच्चमध्यमवर्गीयांचे. या घटकाचा त्यांच्या साहित्यमूल्यावर काहीही परिणाम होत नाही. सानियांनी आपल्या आजुबाजूचे, अनुभवलेले लिहिले आहे. मनातल्या विचारांचे, भावनांचे प्रत्ययकारी प्रकटीकरण त्यांच्या या कथांमध्येदेखील जाणवते.

'ओमियागे' या दीर्घकथासंग्रहामध्ये सहा दीर्घकथा आहेत. त्यापैकी ओमियागे १, २, ३ या कथा जोडलेल्या आहेत. अनिता-जेसन आणि रजतच्या मैत्रीच्या या कथा आहेत. स्वतंत्र विचारांची अनिता मनाला भावते. जेसनची आणि तिची निरपेक्ष, निर्भेळ मैत्री वाचक म्हणून भावते. नकळतपणे अशा निर्भेळ मैत्रीची अपेक्षा केली जाते. ओमियागे म्हणजे भेटवस्तू एकमेकांना देतात. सरिता आणि जय यांच्या प्रेमाची कथा 'आमंत्रण'. या कथेत सरिता आणि जय दोघेही दोन पावले पुढे आल्याने तुटलेले त्यांचे नाते सांधण्याच्या मार्गावर येते. आपल्या स्वतःच्या चुका समजणे ही पुढे जाण्याची पहिली पायरी आहे. आमंत्रण कथेत सरिता आणि जय दोघेही आपल्या चुका कबूल करतात व एकमेकांच्या आमंत्रणाला प्रतिसाद देतात. श्यामल आणि तारा या मैत्रिणींची कथा 'सखी'. तारा आणि सुबोधचे लग्न होते. श्यामलला सुबोध आवडत असतो. पण ताराशी तो लग्न करतो. त्यामुळे ताराविषयी तिच्या मनात असूया निर्माण होते. श्यामलचा समशेरबरोबर संसार सुखी होत नाही. सतत स्वतःचे दुःख कुरवाळणाऱ्या श्यामलला तारा खूप समजून घेते. सतत स्वतःमध्ये रमल्याने जगाची पर्वा ती करत नाही हे तारा श्यामलला

सांगते. आयुष्यात भूतकाळ मागे टाकून वर्तमानात जगण्याचा सल्ला ती श्यामलला देते. आपल्या सखीचे खरे स्थान श्यामलला उमगते. जेसी आणि सुजाता या सासरे आणि सूनेची कथा 'निरोप'. जेसी त्यांच्या अंतःकाळी सुजाताकडे स्वतःची चूक कबुल करतात. स्वतःच्या मुलाच्या मृत्यूचे भविष्य माहिती असूनही जेसी राजीव आणि सुजाताचे लग्न लावून देतात. त्यांनी मुलाला इतक्यात जन्म देऊ नये असे सुचवतात. हे सगळे जेसी पूर्वनियोजिताप्रमाणे करतात. त्यामुळे सुजाताच्या आयुष्यावर त्याचा परिणाम होतो. अविनाशशी दुसरे लग्न करून ती संसारसुख अनुभवते. पण आपण केलेल्या चुकीचा सल जेसींच्या मनात असतो. मृत्यू जवळ आलेला असताना, जेसी सुजाताचा निरोप घेताना सगळ्या चुका मान्य करतात.

गावा देशाची, जाती धर्माची वेस ओलांडून माणसामाणसांमधील नातेसंबंधांचा अचूक वेध सानिया यांनी या कथासंग्रहात घेतला आहे. सानियांनी वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या भ्रमंतीतून या कथा लिहिल्या आहेत. त्यामुळे या कथा त्यांच्या अनुभवांनी अधिक जिवंत झाल्या आहेत.

**अशी वेळ**

या कथासंग्रहात १५ कथा आहेत. कथाकार आणि कादंबरीकार अशी स्वतःची ठळक ओळख निर्माण केलेल्या सानिया यांच्या कथांचा संग्रह म्हणजे 'अशी वेळ'. स्त्रीवादी लेखिका म्हणून त्यांच्या लेखनातून अधोरेखित झालेली त्यांची प्रतिमा या संग्रहातूनही प्रत्ययास येते.

कुठलाही अभिनिवेश न ठेवता स्त्रीच्या स्वातंत्र्याचा, तिच्या अस्तित्वाचा अर्थ सांगू पहाणाऱ्या कथांचा समावेश या कथासंग्रहात आहे. आयुष्यातील रोजच्या, साध्या घटनांमधून स्त्रीला गवसत जाणारा स्व मुक्तीचा अर्थही त्या सूचकतेने व्यक्त करतात. स्त्रीला येत जाणारे आत्मभान, तिच्या सहवासातील पुरुष व्यक्तिरेखाही जेव्हा आजमावताना दिसतात तेव्हा स्त्री-पुरुष नात्याचे एक प्रगल्भ परिमाण या कथांमधून दिसून येते. अनुभवांचे रूप आगळ्यावेगळ्या दृष्टीतून न्याहाळणारी सानियांमधली लेखिकेची नजर या कथांच्या माध्यमातून वेगळ्या टप्प्यावर उभी असल्याचे जाणवत राहाते.

आपले जगणे एका तऱ्हेने सामाजिक असतेच. आपला समाज वेगवेगळ्या स्तरांचा, मिश्र, गुंतागुंतीचा बनलेला आहे. समाजाशी साहित्यिक म्हणून आपली बांधिलकी सानिया स्पष्ट करतात. 'अशी वेळ' या कथासंग्रहातील सगळ्याच कथा सानियांच्या स्वतःच्या विचारातून, मूल्यांमधून लिहिल्या गेल्या आहेत. समाजातले प्रश्न, समस्या, सुख-दुःख या कथांमधून सानिया सांगतात. त्यामुळे या कथा त्यांच्या वेगळेपणासह मनाला भावतात.

स्त्रीच्या अस्तित्वाचा अर्थ सांगणाऱ्या कथा 'अशी वेळ' या कथासंग्रहात आहेत. आयुष्यातल्या रोजच्या घटनांमधून स्त्रीला गवसलेला स्त्रीमुक्तीचा अर्थ या कथांमध्ये मांडण्याचा प्रयत्न सानियांनी केला आहे. 'अशी वेळ' या शीर्षककथेत उतारवयातील विसरण्याच्या सवयीवर भाष्य केले आहे. वर्तमानकाळाला महत्त्व दिले पाहिजे असा संदेश या कथेमधून मिळतो. 'फक्त गृहिणी' या कथेत गृहिणी म्हणून निर्माण झालेला न्यूनगंड आणि नंतर तिलाच स्त्रीत्वाची झालेली जाणीव चित्रित केली आहे. 'तह' या कथेत पत्राच्या माध्यमातून मनातल्या भावनांची सुरेख मांडणी केली आहे. प्रेम आणि युद्ध या टोकाच्या गोष्टींमध्ये तहाचे महत्त्व कथेत पटवून दिले आहे. कथालेखनाचा एक वेगळा प्रकार म्हणून 'स्वगत' या कथेकडे बघता येईल. मनूच्या मनोव्यापाराचे दर्शन घडवणारी कथा म्हणजे 'मुली'. मनात निर्माण होणाऱ्या आभासी घटनांची लक्षवेधक कथा म्हणजे 'मुली'. स्त्रीने तिचे स्त्रीत्व ओळखणे आणि दुसऱ्या स्त्रीला समजून घेणे हा विचार 'बाई आणि....' या कथेत मांडला आहे. 'प्रेमाचे जनुक' मधली मुलगी प्रेमाचे जनुक असणाऱ्या मुक्या प्राण्यांच्या सस्थेत काम करण्याचा निर्णय घेते. निमी या स्वतंत्र विचारांच्या मुलीची कथा म्हणजे 'रेषा'. नात्यांमध्ये असणारी पुसटशी रेषाच नात्यांमध्ये ओढ निर्माण करते असा आशय या कथेतून व्यक्त होतो. जीवन कोणासाठी थांबवून चालत नाही हा विचार सांगणारी कथा म्हणजे 'कंगवे'. आपल्या जगासारख्याच पर्यायी जगाची कल्पना 'असण्याचा प्रश्न' या कथेत आहे. खऱ्या जगात व्यक्त व्हायची संधी मिळत नसल्याने अव्यक्त जगात व्यक्त होण्याची भावना या कथेत मांडली आहे. दुष्काळासारखी गंभीर गोष्ट आपल्या स्वार्थासाठी दुर्लक्षित करणारा तो आणि गळणारा नळ पाहून पाण्याचा गैरवापर पाहून व्याकुळ होणारी ती कथेचे नायक-नायिका आहेत. स्त्रीच्या विश्वावर कथा लिहिणाऱ्या एका लेखकाची कथा म्हणजे 'लेखकाची अर्धी गोष्ट' ही कथा. मनाचे खेळ प्रभावीपणे मांडणारी कथा म्हणजे 'सावट'. मनच असहाय्यतेचे सावट उभे करते. आपल्या मनानेच हे सवाट दूर केले जाते. आपल्या मनातल्या प्रश्नांवर आपणच मिळवलेले उत्तर 'सावट' या कथेत मिळते.

साहित्यिक म्हणून समाजात वावरताना आपल्यामधल्या व्यक्तीचे प्रतिबिंब कथांना वेगळा आकार देते हे या कथासंग्रहातील कथांमधून दिसून येते.

**पुन्हा एकदा**

या कथासंग्रहात ११ कथा आहेत. सानिया यांचे 'पुन्हा एकदा' हे पुस्तक वाचत असताना आपल्याला सतत जाणवत राहाते की पुस्तकातली पात्रे विचारी आहेत. त्यांना प्रश्न पडत असतात. ती कसला ना कसला शोध घेत आहेत. मुख्य म्हणजे 'स्व'चा शोध घेत आहेत.

आपल्या विचारांचा, नात्यांचा, भावभावनांचा आणि संपूर्ण सभोवतालचा शोध. हे शोध आपण वाचत जातो तेव्हा आपणही त्यात अडकत जातो. अचानक असे जाणवते की, आपण पुस्तकात खूप गुंतलो आहोत. त्या पात्रांच्या विचारांचे प्रतिबिंब आपल्यावर पडले आहे. नकळतपणे आपणच पात्रांच्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागतो.

गेली तीस, चाळीस वर्षे सातत्याने लिखाण करणाऱ्या काही प्रमुख लेखिकांमध्ये सानियांचे नाव येते. 'पुन्हा एकदा' मध्ये पूर्वी विविध मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या पण असंग्रहित अशा कथा आणि दोन एकांकिका आहेत. या कथा ऐंशीच्या दशकातल्या असल्या तरीही वाचताना त्या कालबाह्य वाटत नाहीत. त्यात कुठेही जुनेपणा नाही, या कथा नातेसंबंधांभोवती फिरताना दिसून येतात. लेखनातून जिवंत होणाऱ्या सगळ्या पात्रांना एका समजुतीपाशी पोहोचण्याची गरज वाटते. त्या पात्रांच्या शोधांना आणि मनात सतत उसळणाऱ्या संभ्रमांना त्याशिवाय पर्याय नसतो.

'पुन्हा एकदा' या कथासंग्रहातील तरल कथा मनाचा ठाव घेणाऱ्या आणि वाचकाला आपल्यासोबत घेऊन जाणाऱ्या आहेत. 'पुन्हा एकदा' या कथासंग्रहात पूर्वी विविध मासिकांमधून प्रसिद्ध झालेल्या पण असंग्रहित राहिलेल्या सानिया यांच्या कथा आणि एकांकिका आहेत. या कथा नातेसंबंधाभोवती फिरतात. कथासंग्रहातील तरुण व मध्यमवयीन पात्रांना सतत काही ना काही प्रश्न पडतात. ही पात्रे नात्यांचा शोध घेतात.

'पुन्हा एकदा' या शीर्षककथेला श्रीधर भारतात परत येणे होणार नाही असे ठरवून परदेशातच स्थायिक होण्याचे ठरवतो. नातेवाईक आणि मित्रमंडळींना शेवटचे भेटून घ्यायचे असे ठरवून यादीतील एक एक नाव कमी करतो. त्या गडबडीत त्याला त्याची जुनी मैत्रीण भेटते आणि त्याचा जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. या कथेतही सानिया श्रीधरच्या विचारप्रक्रियेबद्दल बोलतात. 'लेणी' आणि 'अर्थ-अनर्थ' या दोन एकांकिकामधल्या शंकर-स्वरूप, सतीश-श्यामल या जोड्या भावनिक आंदोलनातून जात आहेत. 'लेणी'मध्ये लेणी बघण्यासाठी पूर्ण डोंगर चढून जायची सतीशची इच्छा असते. त्यात त्याच्या खूप आठवणी असतात. पण श्यामलला त्यात विशेष स्वारस्य वाटत नसते. तिला हे सगळे फोल वाटत असते. 'अर्थ-अनर्थ' मधील शंकर आणि स्वरूपचे आधी एकमेकांकडे खेचले जाणे, लग्नाचा विषय निघाल्यावर उणे-दुणे काढणे, कधी जवळ येणे तर कधी दूर जाणे अनुभवायला मिळते. 'कारण' कथेतल्या सुबोधचे लग्न ठरलेले असते. पण अचानक ओढवलेल्या प्रसंगामुळे त्यांचे नाते संपुष्टात येते. त्याला भेडसावणारे विचार प्रतिभा समजून घेऊ शकत नाही. 'वीण' कथेतल्या नुकतेच लग्न झालेल्या शुभांगीचे सारखे आजारी पडणे आणि तिच्या मनातली द्वंद्व सानियांनी प्रभावीपणे सांगितली आहेत. 'प्रतिसाद'

कथेतल्या तरुण, हुशार आणि होतकरू जयंतीचे तिच्या वरिष्ठ असणाऱ्या अच्युतबद्दलचे विचार अंतर्मुख करतात. पुरुष केंद्रस्थानी असणारी आणखी एक कथा म्हणजे 'सखा'. धनंजय या पात्राच्या सहाय्याने कथा रंगते. त्याचे कुटुंबात असून नसल्यासारखे असणारे रूप अस्वस्थ करते. 'मार्ग' या कथेत नमिता आणि माया या मैत्रीणी भेटतात. नमिताचे नैराश्य, मायाला दिसलेला स्वामींचा मार्ग आणि त्या दोघींनाही भेटलेला राघव यात कथा सुंदर गुंफली आहे. 'समज' कथेत श्रीरंगच्या मृत्यूने बदललेले रेणूचे जग, तिला आलेले आत्मभान दिसून येते. 'धागा' या कथेत प्रतिमाच्या विचार आणि कृतींमध्ये असणारी तफावत आणि कथेच्या शेवटी विचार आणि कृतीचा जुळलेला धागा अनुभवायला मिळतो. 'मुक्ती' या कथेत आपल्यावर आलेली परिस्थिती सकारात्मकतेने स्वीकारणारी वसुधा खूप काही शिकवून जाते.

या कथासंग्रहातील पात्रे कसला ना कसला शोध घेत आहेत. मुख्य म्हणजे ते 'स्व'चा शोध घेत आहेत. त्यांच्या विचार आणि शोधाच्या प्रक्रियेत आपणही नकळत गुंतत जातो.

## प्रकरण ४

आशा बगे व सानिया यांच्या कथाविश्वाचा अभ्यास केल्यानंतर या दोन संवेदनशील लेखिकांच्या कथालेखनातील साम्य व विरोध शोधण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

मराठी साहित्य वैविध्यपूर्ण अशा कथासाहित्याने समृद्ध करणाऱ्या लेखिकांच्या मांदियाळीत आशा बगे आणि सानिया या दोन लेखिकांनी मोलाची भर घातली आहे. विशेषतः स्त्रीच्या भावविश्वाशी निगडीत अशा साहित्याची निर्मिती या दोन्ही लेखिकांनी केली आहे. अन्य वाङ्मय प्रकारांबरोबरच 'कथा' या वाङ्मयप्रकारात त्यांनी आपला ठसा उमटवलेला आहे. या दोन्ही लेखिकांचे लिखाण मोजकेच पण दर्जेदार आहे. प्रबंधांच्या विषय निवडीच्या वेळी असंख्य लोकांशी बोलल्यानंतर हे लक्षात आले की, या दोघीही आत्ताच्या पिढीला फारशा परिचित नाहीत. त्यामुळे त्यांच्या साहित्याचा अभ्यास करावासा वाटला. त्यातही कथा हा साहित्यप्रकार अधिक जवळचा वाटला. त्यांच्या कथा वाचताना अनेकदा वेळ-काळ, तहान-भूक याचेही भान राहिले नाही. हे मी स्वानुभवाने सांगू शकते. दोघींच्या कथालेखनामध्ये 'स्त्री' हा केंद्रबिंदू असल्याने त्या कथा आणखीच जवळच्या वाटल्या. या दोघींच्या कथांमध्ये आपल्या सभोवती घडणाऱ्या घटनांचे चित्रण कित्येकदा येते. त्यामुळे कथांशी, कथेतल्या पात्रांशी जवळीक निर्माण होते. आपल्याच आयुष्यात घडून गेलेले प्रसंग, पात्रे कथांमध्ये दिसून येतात. सहाजिकच कथांविषयी आपुलकी निर्माण होते. सगळे कथासंग्रह वाचनालयातून मिळवून वाचलेले आहेत. कथासंग्रहांच्या मलपृष्ठाआधीच्या पानावर वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया नोंदवलेल्या

आढळल्या.  असे लिहिणे चुकीचे असले तरी त्यातून याची जाणीव झाली की, माझ्याप्रमाणेच अनेकांना या कथा जवळच्या वाटत आहेत.  कथा ऐंशीच्या दशकातल्या असल्या तरी स्त्रीचे, भावविश्व, तिचे प्रश्न, तिची घुसमट आजही  तशीच आहे.  सुसंस्कृत, सुशिक्षित घरांमध्येही ही घुसमट आहे.  यामुळेच आत्ताच्या काळाशी या कथा साधर्म्य सांगतात.  या कथांमधील स्त्रिया चारचौघींसारख्या असल्या तरी स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या आहेत.  आनंद, दुःख,  असूया, द्वेष,  मोह या सगळ्या भावनांचे दर्शन या कथांमधून होते.  सामान्य माणूस म्हणून जगताना जे जे अनुभव येतात तेच सगळे अनुभव या कथांमधून अनुभवायला मिळतात.  या दोघींच्या कथांमधील महत्त्वाचे साम्य म्हणजे जवळपास सगळ्याच कथा नायिकाप्रधान आहेत, नातेसंबंधांचा शोध घेणाऱ्या आहेत, आपल्या सभोवती असणाऱ्या जगाचे प्रतिबिंब या कथांमधून आढळते.  आणखी एक महत्त्वाचे साम्य म्हणजे त्यांच्या कथांमध्ये दलित, ग्रामीण स्त्री फारशी आढळत नाही.  या प्रकरणामध्ये आत्तापर्यंत केलेल्या अभ्यासातून या दोन्ही लेखिकांच्या लिखाणातील साम्य आणि विरोध बघणे गरजेचे आहे.  स्त्री हा केंद्रबिंदू मानून दोघींनी लिखाण केले असले तरी दोघींच्या लिखाणामध्ये विरोधही आहे.  त्या दोघींच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास करून स्त्री म्हणून जाणीवा समृद्ध करणे हे संशोधनाच्या अभ्यासाचे ध्येय या प्रकरणातून साध्य होईल असे वाटते.  या कथालेखिकांचे आणखी एक साम्य म्हणजे स्त्रीने स्त्रीचे भावविश्व रेखाटले आहे.  त्यामुळे अगदी छोट्या प्रसंगातही एखादी स्त्री कशा पद्धतीने विचार करू शकते याचे दर्शन घडते.  चांगली कथा म्हणजे आयुष्याच्या आकलनाचे दर्शन असते.  आशा बगे आणि सानिया यांनीदेखील त्यांच्या स्वानुभवातून त्यांना उमगलेले सारे वाचकांसमोर मांडले आहे.

आशा  बगे  आणि  सानिया यांच्या कथासंग्रहांचा सविस्तर अभ्यास केल्यानंतर त्या दोघींमधल्या लेखनातील साम्य दाखवणारे काही मुद्दे या प्रकरणाच्या एका भागात दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.  या दोन्ही लेखिकांच्या कथांमध्ये 'स्त्री' हा केंद्रबिंदू आहे.  आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटनांचे चित्रण अनेकदा त्यांच्या कथांमध्ये येते.  आपल्याच आयुष्यातील अनेक पात्रे त्यांच्या कथांमध्ये भेटतात.

आशा बगे आणि सानिया यांच्या लेखनातील मुख्य साम्य म्हणजे एका स्त्रीने स्त्रीच्या प्रश्नांचा आढावा घेतला आहे.  कदाचित त्यामुळेच या दोघींच्या कथा तरल आणि वाचनीय आहेत.  या दोन्ही लेखिकांच्या बहुतांश कथा नायिकाप्रधान आहेत.  या दोन्ही लेखिकांनी अतिशय संवेदनशील मनाने स्त्रीचे भावविश्व रेखाटले आहे.  स्त्रीचे भावविश्व,  तिची  घुसमट, तिची व्यथा, तिची वेदना, तिची बंडखोरी या दोघींच्या कथांमधून प्रत्ययाला येते.  नायिकाप्रधान कथा हे या दोन्ही लेखिकांच्या लिखाणातील महत्त्वाचे साम्य आहे.  घरात व बाहेर स्त्रीच्या

वाट्याला येणारी घुसमट हे या दोन्ही लेखिकांच्या लेखनाचे आणखीन एक साम्य आहे. वेगवेगळ्या कथांमधून ही घुसमट त्या दोघींनी दाखवली आहे. ही घुसमट आणि तिची तीव्रता व्यक्तीपरत्वे बदलते. वेदनेचे अनुभव या लेखिकांनी जिवंतपणे उभे केले आहेत. या सगळ्या कथा आपल्या रोजच्या आयुष्याशी निगडीत असल्याने त्या जवळच्या वाटतात. स्त्रीचे भावविश्व समर्थपणे रेखाटणाऱ्या आशा बगे व सानिया यांनी पुरुषाप्रधान कथादेखील तितक्याच ताकदीने लिहिल्या आहेत. स्त्री असूनही वेगवेगळ्या वयाच्या पुरुषांची मनःस्थिती प्रभावीपणे मांडली आहे. मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीय गटातील पुरुष पात्रे या कथांमध्ये आहेत. माणसामाणसातील नातेसंबंधांचा शोध हे तर आशा बगे व सानिया यांच्या कथालेखनाचे बलस्थान आहे. विविध नात्यांनी बांधलेल्या माणसाला बऱ्याचदा या नात्यांमधूनच दुःख भोगावे लागते. कित्येकदा काही नाती जगण्याचे बळ देतात. आई-मुलगी, वडील-मुलगी, भाऊ-बहीण, मैत्रीण-मैत्रीण अशा सर्व नात्यांचा शोध या दोन्ही लेखिकांच्या कथांमध्ये आहे. वेगवेगळ्या वयोगटातील स्त्री-पुरुषांच्या भावविश्वाचे मूर्त रूप मांडत असतानाच वार्धक्यातले प्रश्न, समस्यादेखील आशा बगे आणि सानिया लिहितात. एकटेपणा, आजारपण, दुर्लक्षित केले जाणे, विस्मरण यासारख्या समस्या या कथांमधून प्रकर्षाने जाणवतात. आशा बगे व सानिया यांच्या कथालेखनातील साम्य या मुद्द्यांमधून प्रकर्षाने जाणवते.

आशाताई आणि सानिया यांनी स्त्रीविषयक साहित्याचे लेखन केले आहे असे असले तरी त्यांच्या लेखनात निश्चितपणे फरक आहे. प्रबंधाचा मुख्य विषय तुलना हा आहे त्यामुळे या प्रकरणात आशाताई आणि सानिया यांच्या कथांमध्ये तुलना करून काही मुद्द्यांच्या आधारे हा फरक दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. या दोघींची जीवनविषयक दृष्टी वेगवेगळी आहे. त्यामुळे अर्थातच त्यांच्या लेखनात हीच जीवनविषयक दृष्टी डोकावते. कथेचा विकासक्रम, लेखनशैली, पात्रयोजना, विवाहबाह्य संबंधांकडे बघण्याचा दृष्टिकोन, भौगोलिक प्रदेश, कथेच्या शीर्षकाचा अन्वयार्थ, निवेदनशैली इ. मुद्दे विचारात घेऊन या दोघींच्या कथांमध्ये तुलना करून अभ्यास करण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. व्यक्तिपरत्वे दृष्टिकोन बदलतो. तो चूक की बरोबर असे म्हणणे तितकेसे योग्य नाही. आशा बगे आणि सानिया यांच्या कथा वाचताना वाचक आणि अभ्यासक म्हणून जाणवलेल्या गोष्टी या प्रकरणात समाविष्ट केल्या आहेत. योग्य, अयोग्य ठरवणे अशक्य आहे. कारण प्रत्येक जण आपले अनुभवविश्व आपल्या साहित्यात मांडत असतो. त्यामुळे प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत वेगळी असते. काही स्त्रियांना आशाताईंचा परंपरागत चौकट न मोडण्याचा विचार पटेल तर काहींना सानियांची बंडखोरी भावेल. जो चष्मा लावून कथावाचन करू तसे विचार बदलतात. आपला चष्मा, आपला दृष्टिकोन आपण ठरवायचे

आहे. या कथा वाचून, अभ्यासून एक नमूद करावेसे वाटते ते म्हणजे, एखाद्या व्यक्तिरेखेचे, त्याच्या दृष्टिकोनाचे मूल्यमापन सर्वांगीण विचार केल्यानंतरच केले पाहिजे.

**प्रकरण ५**

आशा बगे व सानिया यांच्या कथांचा अभ्यास करताना त्यांचे वेगळेपण लक्षात आले होते. हा वेगळेपणा अधिक ठळकपणे लक्षात यावा यासाठी त्यांच्या समकालीन लेखिकांच्या कथांचा अभ्यास करणे गरजेचे होते. त्यामुळे कमल देसाई, अंबिका सरकार, गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष, वसुधा पाटील या कथालेखिकांच्या कथांचा साकल्याने अभ्यास या प्रकरणात केला आहे.

आशा बगे व सानिया यांनी साधारणपणे ७० ते ८०च्या दशकात लेखनास प्रारंभ केला. स्त्रियांच्या लेखनामध्ये अग्रणी असणाऱ्या या दोन लेखिका आहेत. आशा बगे व सानिया यांनी स्त्रीवादी भूमिकेतून जास्तीत जास्त कथा लिहिल्या आहेत. स्त्रीच्या जीवनातील समस्या रंगवण्याचा व स्त्रीमनाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न या लेखिकांनी केला आहे.

१९६० नंतरच्या स्त्रियांचे लेखन कथेच्या आघाडीवर स्त्रियाही मागे नाहीत याचा प्रत्यय देणारे आहे. सर्वसाधारणपणे सगळ्यांनाच आपण प्रत्यक्षात जगतो ते वास्तव जीवन जगण्यापेक्षा आदर्श, स्वप्नवत जीवनाचे आकर्षण वाटते. स्त्री-पुरुष भेदामध्ये स्त्रिया त्यागी, सोशिक आणि प्रेमळ असे ठरवले गेले आहे तर पुरुष बलवान, खंबीर व बुद्धिमान. स्त्रीचे स्त्रीत्व त्याग आणि सोशिकपणाशी जोडले गेले आहे. पुरुषांचा पुरुषार्थ कर्तबगारीशी जोडला आहे. लेखकांकडून कळत नकळत या प्रतिमा जपल्या गेल्या. मात्र हे चित्र १९६०नंतर बदलले. या कालखंडातील स्त्रियांनी स्वतःचे व्यक्तित्व प्रकट करण्याचा प्रयत्न केला. या कालखंडातील कथा कोणत्याही एका विषयापुरत्या मर्यादित न राहता स्वानुभवातून व आत्मप्रत्ययातून लिहिल्या गेल्या आहेत.

गेल्या तीस-चाळीस वर्षातील स्त्री साहित्य गतकाळातल्या लेखनाचे पडसाद घेऊन पडले आहेत. मुळूमुळू रडण्यापासून हे लेखन बंडखोरीपर्यंत गेले आहे यात शंकाच नाही. असे असले तरी आजही स्त्री लेखिकांकडून शृंगारिक लेखन झाल्यास त्या लेखनाकडे वेगळ्याच दृष्टीने पाहिले जाते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेला आपल्या लेखनातून आव्हान देताना लेखिका आता महत्त्वपूर्ण भूमिका बजावू लागल्या आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये समाजाचा स्त्रीकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. स्त्रीचीदेखील स्वतःकडे बघण्याची दृष्टी आत्मविश्वासपूर्ण होते आहे. याचे प्रतिबिंब स्त्रियांनी लिहिलेल्या कथांमध्ये उमटते आहे.

या प्रकरणात अशा काही स्त्रीवादी लेखिकांच्या दृष्टिकोनाचा आढावा घेऊन त्यात आशा

बगे आणि सानिया यांचे वेगळेपण सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. समकालीन लेखिकांमध्ये प्रातिनिधिक स्वरूपात पाच लेखिकांच्या साहित्यविषयक दृष्टिकोनाचा विचार केला आहे. यामध्ये कमल देसाई, अंबिका सरकार, गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष व वसुधा पाटील या लेखिकांचा समावेश आहे.

आशा बगे व सानिया यांच्या कथालेखनाचे वेगळेपण समजण्यासाठी त्यांच्या समकालीन पाच लेखिकांच्या कथांचा अभ्यास या प्रकरणात केला आहे. कमल देसाई, अंबिका सरकार, गौरी देशपांडे, विजया राजाध्यक्ष व वसुधा पाटील यांच्या कथांचा अभ्यास केल्यानंतर आशा बगे व सानिया यांच्या कथा वेगळ्या कशा आहेत हे निरीक्षणातून नोंदवण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे. केवळ स्त्रियांच्या कथनात्मक साहित्यातच नव्हे तर समग्र मराठी साहित्य परंपरेमध्ये ज्यांचे स्थान लक्षणीय ठरते अशा लेखिकांमध्ये या दोन्ही लेखिका अग्रणी आहेत. आपल्याला भावलेले अनुभव, सूक्ष्मपणे व वाचकाला भावतील अशा भाषेत मांडण्याचे कसब या दोघींमध्ये आहे. त्यांच्या समकालीन लेखिकांचे लेखनही दर्जेदार आहे. पण आशा बगे व सानिया या दोघी व त्यांच्या कथा मला माझ्या आयुष्याचा भाग वाटतात. आपल्या जीवनाच्या अविभाज्य अशा 'मन' या अनाकलनीय भागाचा त्यांच्या कथांमध्ये खूप विचार केला आहे. आपले मन आपल्या प्रत्येक विचारामध्ये, कृतीमध्ये सामावलेले असते. आशा बगे व सानिया यांनी या मनाच्या तळापर्यंत जाऊन विचार मांडले आहेत. मनोविश्लषणात्मक कथा, भावनांचे योग्य प्रकटीकरण, स्त्रीचे तरल मन, प्रेम या भावनेचा अविष्कार, स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती, आपल्या हातून घडणाऱ्या चुकांचे समर्थन न करता जबाबदारी पेलणाऱ्या कथानायिका ही त्यांच्या कथांची वैशिष्ट्ये आहेत. स्त्री हा केंद्रबिंदू असूनही पुरुषाच्या मनोभूमिकेचा देखील विचार या दोघींच्या कथांमध्ये करण्यात आला आहे. मानवी मनातले हिंदोळे शब्दबद्ध करण्याची हातोटी या दोन्ही लेखिकांना आहे. 'कथा' या वाङ्मय प्रकाराची निवड करून छोट्याशा खिडकीतून भावनांचे आभाळ दाखवण्यात या दोन्ही लेखिका यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या कथा विचारप्रवृत्त करतात. कित्येकदा आपल्या आयुष्याचे प्रतिबिंब त्यांच्या कथांमधून अनुभवायला मिळते. आपल्या आयुष्यातील प्रश्नांची उत्तरे त्यांच्या कथा देतात. आपल्या भरकटलेल्या आयुष्याला दिशा देतात. मनाच्या हिंदोळ्यांना शब्दबद्ध केल्याने आपल्याच मनाच्या खोड्या आणि मनाची ताकद ओळखायला मदत होते. जीवनाकडे बघण्याचा एक वेगळा दृष्टिकोन त्यांच्या कथा देतात. आशा बगे व सानिया यांच्या कथा मनापासून भावतात. या दोन्ही लेखिकांचे आवडते विषय माझेदेखील आवडते आहेत. उदाहरणे द्यायची झाली तर मन, पाऊस, प्रेम, माणसामाणसामधील नातेसंबंध, परंपरा व नवता यांचा संगम, बंडखोरी करण्याची वृत्ती ही देता येतील. साहित्यातून जगण्याची दिशा मिळावी

असे म्हटले जाते. आशा बगे व सानिया यांच्या कथा जगण्याची दिशा देतात. इतकेच नव्हे तर जगण्याचा अर्थ नव्याने समजावून सांगतात. या दोघींचे व्यक्तिमत्व त्यांच्या कथांमधून स्पष्टपणे अनुभवायला येतात. आशा बगे व सानिया यांचे मिश्रण माझा स्वभाव आहे. कदाचित त्यामुळेच या दोन्ही लेखिका माझ्या प्रबंधाचा विषय बनल्या आहेत. कथांची आशयघनता व संवेदनशीलता यामुळे या दोन्ही लेखिकांनी माझ्या मनावर मोहोर उमटवली आहे. त्यांच्यासारखेच लिखाण माझ्याही हातून व्हावे असे वाटते. स्वतःचा दृष्टिकोन व्यापक व विकसित करून लेखन करण्याचा मंत्र या दोन लेखिकांच्या व त्यांच्या कथांच्या सहवासातून मिळाला आहे. मानवी मनाचा अंतरंग शोधून काढणारे लेखन वाचक, अभ्यासक व एक स्त्री म्हणून प्रेरणा देणारे आहे यात शंका नाही. त्यांच्या लेखनाने समृद्ध झालेल्या विचारांची शिदोरी भावी जीवनातही उपयोगी पडणार आहे.

## क. पुढील संशोधनासाठी उपस्थित विषय

- आशा बगे व सानिया यांच्या कथाविश्वाचा अभ्यास केल्यानंतर असे जाणवले की, या दोघींच्याही कथांमध्ये नाट्यमयता आहे. त्यांच्या कथांचे नाट्यरूपांतर होऊ शकते.
- आशा बगे व सानिया यांच्या अन्य साहित्यप्रकारांचा अभ्यास हा पुढील संशोधनाचा विषय असू शकतो.

## ड. प्रबंधाची आधुनिक काळातील उपयुक्तता

'आशा बगे व सानिया यांच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास' या प्रबंधातून स्त्री-केंद्री कथांचा अभ्यास केला आहे. स्त्री केंद्रबिंदू असल्याने या कथांमधून स्त्रीचे भावविश्व समजेल. स्त्रीच्या मनाचा तळ, तिच्या भावना, तिचे प्रश्न त्यांच्या कथांमधून मांडले आहेत. या प्रबंधातून वाचक म्हणून कथांचा आनंद घेता येईल आणि आत्ताच्या पिढीला जीवनविषयक मार्गदर्शन मिळेल. या दोघींच्याही कथा मनाचा वेध घेणाऱ्या आहेत. मनाचे मानवी आयुष्यातील स्थान अबाधित आहे. त्यामुळे मन या विषयावरचे त्यांच्या कथांमधले विवेचन कितीही काळ लोटला तरी ताजेच वाटेल. नातेसंबंध, कुटुंब, प्रेम याविषयीच्या भावना बोथट होत असल्याचे चित्र दिसून येते. अशा वेळी आशा बगे यांच्या, परंपरा जपणाऱ्या व कुटुंबसंस्थेचा विचार करणाऱ्या, कथानायिका प्रेरक ठरतील. तसेच स्त्री म्हणजे तिने सहन केलेच पाहिजे, तिने तिच्या मनासारखे वागायचेच नाही या विचारांना छेद देणाऱ्या सानियांच्या नायिका एक वेगळीच दिशा दाखवतील.

परंपरा आणि आधुनिकता यांचा सुरेख संगम असणाऱ्या या दोघींच्या कथा आधुनिक काळात संयमी, विचारी व आत्मनिर्भर स्त्रियांना दिशादर्शक ठरतील असे वाटते.

| परिशिष्टे | पृष्ठ क्र.<br>४३७ ते ४५० |
|---|---|
| अ. आशा बगे व सानिया यांची शुभेच्छापत्रे<br>ब. आशा बगे व सानिया यांच्या मुलाखती | |

## आशा बगे यांचे शुभेच्छापत्र

प्रिय विनया केसकर,
यांस सप्रेम,

आशा बगे आणि सानिया यांच्या कथांवरचा आपला अभ्यास आपण पूर्ण करून तो आता प्रबंधरूपाने विद्यापीठात सादर करत आहात याबद्दल अभिनन्दन आणि मनःपूर्वक शुभेछा. आपल्याला पी. एच. डी. पदवी प्राप्त होवो.

आचार्य पदवी हे आपल्या अभ्यासाचे एक महत्वाचे तीर असते अथांग प्रवाह पुढेच असतो तिथेही आपण पोहचू शकालच. त्याकरताही शुभेच्छा.

आपली
**आशा बगे**

## सानिया यांचे शुभेच्छापत्र

श्रीमती विनया केसकर,
सप्रेम नमस्कार,

तुम्ही 'आशा बगे आणि सानिया यांच्या कथांचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावर प्रबंधाचे काम करता आहात याचा आनंद होतो आहे. मनापासून लेखन वाचून, समजून घेऊन तुम्ही प्रश्न विचारले यावरून तुमचे काम चांगले झाले असेल असा विश्वास वाटतो.

तुमच्या या प्रकल्पास माझ्या अनेक शुभेच्छा.

**सानिया**
जानेवारी २०१६
Saniya1011gmail.com

## ब. आशा बगे व सानिया यांच्या मुलाखती

आशाताई व सानिया यांच्या कथा अभ्यासताना अभ्यासक म्हणून जे मुद्दे, प्रश्न मनात आले त्यांची उत्तरे कथाविश्वाचा अभ्यास करताना शोधण्याचा प्रयत्न केला. या संशोधनावर प्रकाश टाकण्यासाठी या दोघींच्या मुलाखतींचा उपयोग झाला. दोघींनीही मनमोकळी उत्तरे दिल्याने मनावरचा ताण नाहिसा झाला. आपण योग्य दिशेने चाललो आहोत याची खात्री पटली. या दोघींचाही मोठेपणा त्यांच्याशी बोलताना जाणवला.

### आशा बगे आणि सानिया यांच्या मुलाखती

**आशा बगे यांची मुलाखत**

**प्रश्न : आपल्या वाङ्मयीन जडणघडणीत मोलाचे योगदान कोणाचे आहे? तुमच्या लेखनामागे कोणत्या प्रेरणा आहेत ?**

उत्तर : वाङ्मयीन जडणघडण आणि प्रेरणा यातील सीमारेषा पुसटच असते किंवा माझ्यासारखीच्या लेखनात अनेकदा दोन्हीचे मिश्रणही असते. खरं तर ललित लेखन प्रक्रियाही क्रिएटिव अभिव्यक्तीच्या संदर्भात विलक्षण गुंतागुंतीचीच म्हणावी लागेल. माझा वाङ्मयीन पिंड तसा अनेक बारीक सारीक गोष्टींशी जोडला गेला आहे. माझे बालपण जे एकत्र कुटुंब पद्धतीच्या प्रभावात गेले, जिथे परस्पर विसंगत व सुसंगत स्वभावाच्या विविध वयोगटाच्या माणसांच्या बहूरंगी बहुढंगी आकलनात गेले. त्या वयात ते सगळेच समजले नसेलही पण पुढे ते लिखाणात येत गेले असणार. म्हणजे माणूस कळून घेणे ही महत्वाची प्रेरणा व त्यासाठी माझे, असे बालपण ही कच्ची माती म्हणायची.

माझे आईवडील हे शिक्षणप्रेमी नवीन विचारांचे, संगीत कलेचे भोक्ते. तो वारसा आम्हा भावंडात आला. त्या वेळी एकत्र कुटुंबात दोघांनी आपला सूर परजत ठेवला. सगळेच सोपे नव्हतेही पण वाट अशी काढायचीच असते हे तर कळले.

माझ्यात वारशाने आलेले संगीत हे माझ्या लेखनातून असे काही भिनत गेले की ते त्या अनुभवा वेगळे काढता येणार नाही. संगीतानुभव आणि जीवनानुभव एक

होऊनच व्यक्त झाला आहे त्यामुळे संगीत ही पण एक प्रेरणा असू शकते.

माझे आजोळ एकदम अपारंपारिक, परखड विचारांचे व आमचे एकत्र कुटुंब बरेचसे पारंपारिक. पण आई वडिलांचा समन्वय मिळून एक वेगळा रंग आमच्यात उतरला. माझे मामा डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे हे संस्कृत, फिलॉसफी, सायकोलॉजीचे गाढे संशोधक. मामा, मावशी कवी, कविता प्रेमी. हे मिश्रण माझ्यात अनुभव होऊन येत असणार.

आणि प्रेरणेच्या संदर्भात सर्वात महत्वाचे म्हणजे माझ्या वाचनाने माझ्या समोर उभा केलेला मराठी कथेचा वैभवशाली बहर. नवकथेचा व नवकथेनंतरचा अत्यन्त संकेत मुक्ततेने या कथेने आपली सूक्ष्मता पेलून धरली व आपला सुक्ष्मातिसूक्ष्म अनुभव असाही व्यक्त होऊ शकतो हे सांगितले. या दृष्टीने माझी लेखकाची पिढी ही याआधीच्या पिढीच्या खांद्यावरच उभी होती असे म्हणणे योग्य ठरेल. तर लेखन प्रेरणा अशा अंतर्गत व बाह्य यांचे मिश्रण आहेत. आपला वाचनाचा परिसरही इथे प्रेरणा ठरतो. कृपया संदर्भासाठी वाटा आणि मुक्काम पहा.

**प्रश्न : साहित्यनिर्मिती करताना कोणते प्रश्न समोर असतात?**

उत्तर : साहित्य निर्मिती करताना केवळ आणि केवळ अनुभवच समोर असतो प्रश्न नाही.

तो अनुभव हा कुठला प्रश्न घेऊन येत नाही तर त्या त्या व्यक्ती समोर जाणवतात. त्याही एकदम संपूर्णतः नाहीच समोर येत. हळूहळू त्यांचे इतर व्यक्तीशी नाते, आजूबाजूच्या परिसराशी नाते, स्वतःचे स्वतःशी नाते हे मनाच्या क्षितिजावर प्रथम अंधुक पण नंतर स्पष्टपणे जाणवायला लागते. पण तरीही आपल्याला काय नेमके हवे आहे, काय नको आहे हे कळायला सारा धुरळा खाली बसायला हवे असते. अनेक विसंगतीतून एक सुसंगती शोधताना असही होत की एक विसंगतीच हाती येते आणि तीच असते कथा.

यावर्षी लिहलेली सृजन, ऋतूवेगळेमधील पंख या कथा बघता येतील. या प्रोसेसमध्ये जाणीवपूर्वकता नसतेच. पण परिसर वातावरण आणि त्याचा मूळ सूर एकदा का गवसला की कथा आपल्याला स्पर्शच करायला लागते. तसे होणे हीच माझी गरज व ते कसे होईल ही माझी तगमग असते.

**प्रश्न : आपल्या कथांमधले महत्त्वाचे बलस्थान म्हणजे उत्कृष्ट वातावरणनिर्मिती. हे वर्णन इतके हुबेहुब असते की वाचक थेट त्या स्थळी जाऊन पोहोचतो. यामागचे रहस्य काय?**

उत्तर : माझी कथा, कादंबरीसुद्धा व्यक्तीनुसारी असते. मग तिच्यामागून परिसर मला दिसतो. मग तिला किंवा त्याला येऊन एकेक मिळते. नाहीतर तीच आपला शोध घेत त्यांच्याकडे जाते. व्यक्तींची भूमी सापडली की मग वातावरण, ऋतू, स्थळ सारं सहजच येतं, चाचपडावे नाही लागत.

**प्रश्न : आपण स्त्री केंद्रस्थानी ठेवून लिखाण केले आहे. सर्वसाधारणपणे स्त्रीवादी लेखन म्हणजे पुरुषी मानसिकता दाखवणारे असा समज आहे. मात्र आपल्या कथांमधले पुरुष खलनायक का नाहीत?**

उत्तर : सर्वच लेखन स्त्रीकेंद्री नाही व पुरुष केंद्रीपण नाही. माणूस हाच केंद्रस्थानी आहे. दोघाकडे असे व्यक्तीरूपांनी पाहिले गेले म्हणजे त्यात त्याची मर्यादा, कमजोरी, सामर्थ्य, अहंकार, मोह, राग, अनुराग, जोडणे, तोडणे, मिळवणे, गमावणे हे सगळे आलेच. माझी मल्हार ही कथा पहावी.

माझ्या लेखनात हे सगळे मनाच्या सूक्ष्म पातळीवर प्रथम घडते. ते घटनांचे वळण नसते. मनाच्या वळणांनंतर घटना येतेच पण तो कथेचा भाग नसतो. त्या रिकाम्या जागा वाचकाला भरण्यासाठी लेखक सोडून देतो. माझी लेखन प्रक्रिया माणूस त्याच्या सर्व कळांसकट कळून घेण्याची आहे. तिथे खलनायक वगैरे गडद रंग नसतीलच. आणि स्त्रीवाद म्हणजे आपण कमावलेली आपली निजखूण प्राणपणाने जपणे, तिचा निर्भय उच्चार करणे आणि दुसऱ्याच्यापण सत्वाचा आदर करणे.

**प्रश्न : तुमच्या कथांमध्ये आलेली स्त्री–पात्रे आणि आजची स्त्री यातला नेमका फरक कसा सांगाल?**

उत्तर : माझी स्त्री–पात्रे व आजची स्त्री यात फरक नाहीच. इथून तिथवर तीच संवेदना, तोच अंतर्गत कोलाहल व सत्व शोधाचा तोच सनातन संघर्ष, आपली भूमी राखण्याचा. मागच्या स्त्रीने दिलेला लांब झोका मागच्या काळापासून तो पुढच्या काळापर्यंतचा आणि मधला वर्तमान वेगळा न काढता येणारा वर्तमानाची आव्हानं अधिक गुंतागुंतीची. पद्मा गोळे म्हणतात, आजच्या इतकी आईपणाची कधीच भीती नव्हती वाटली मला. रवींद्रनाथांची 'स्त्रीर पत्र'मधील मृणाल आपणच तर असतो. आपणच असतो नष्टनीडची चारुलता. आणि चोखेरबालीची नायिका. सर्व ओहळ , नद्या यातले पाणी एकच तर आहे. माझ्या दर्पणची डॉ. नायिका, तिला वाटतं की स्त्रीच्या प्राक्तन रेषा तिच्या गर्भाशयावरच कोरल्या गेल्यात. दुसरी ओळखच नाही तिची.

**प्रश्न : लेखन करताना आपल्या डोळ्यासमोर कोणते आदर्श होते?**

उत्तर : मराठी कथेचे जे वैभव पर्व झाले त्यातील सारे लेखक, व त्याच्या कथा. मोकाशी, विद्याधर पुंडलिक, जी. ए., कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, भावे, गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, आजचे मिलिंद बोकील, भारत सासणे अशा कितीतरी लेखकांनी मराठी कथेची उंची पेलून धरली. हिंदीचे मोहन राकेश, प्रेमचंद, मन्नू भंडारी, मृदुला गर्ग असे कितीतरी लेखक माझ्या समोर आहे. मला त्यांच्यासारखं लिहायचं अर्थातच नव्हतं आणि नाहीही. पण तो एक दिवाच होता माझ्या उंबऱ्यातला, मागे पुढे प्रकाश तोलून धरणारा.

**प्रश्न : खरे जे लिहायचे आहे ते लिहिण्याचे स्वातंत्र्य लेखकाला असते का?**

उत्तर : लेखन म्हणजे तीराला बांधलेली नाव एका अथांगात घालणे. पाण्याची खोली व सारा आसमंत न्याहाळत जाणे. दोर बांधलेलेच राहतील तर लेखनाचा प्रयास तरी कशाला? आजच्या पेरुमल मुरुगन वगैरे लेखकांबद्दल जे घडले त्यावरून वाटत

असेल. पण पेरुमलने मार्मिक उत्तर दिले की लेखक मुरुगन मेला आहे. म्हणून लेखन म्हणजे एक अंतर्मुक्तीच. आपल्या अंतरप्रतीती धर्माला जागून पाहिलेली मुक्ती.

**प्रश्न : साहित्यिकाने समाजासमोर आदर्श निर्माण करणारेच लेखन करावे का?**

उत्तर : साहित्यिकाने कुठलाही आदर्श कोणाहीसमोर ठेवण्याकरिता लेखन करण्याचे ओझे बाळगू नये या मताची मी आहे. इतकेच नव्हे तर ज्याला आज सामाजिक जाणिवा किंवा समकालीन वास्तव वगैरेचे लेखन म्हणून तोलले जाते तेही माझ्या परिप्रेक्षात बसत नाही. कुठला झेंडा, कुठल्या घोषणा या ललित लेखनाच्या स्वराला मारक असतात. असे आदर्श जोखायचे ठरवले तर जगातले सर्व चांगले लेखन बादच करावे लागेल. एलकुंचवारांचे मौनराग, कमल देसाईच्या कथा, प्रकाश संतांचा लंपन, मालगुडी डेज, अरेबियन नाईट्सचे सर्वकालीन अंतर्गत वास्तव, कामूचा आऊटसायडर याची प्रत कशी लावणार? प्रतिभेचे अज्ञाताकडे झेप घेणारे पंख हे दुर्लक्षितच करणार का? माणसाच्या मनातली अजून कोणीही न पाहिलेले कोपरे कमाल देसाईंच्या ढंगाची गोष्ट मधल्या छोट्या मुलीची मानसिकता हि कुठल्या categoryत बसवायची? रवींद्रनाथांच्या कथातली स्त्री, तिची वेदना तर सार्वकालिकच म्हणायची. जयशंकर प्रसादची एक सुंदर कविता आहे – 'तुमूल'.

कोलाहल कलहमें मैं हृदयकी बात हूँ।
चेतना थकसी गई जब मैं मलय की वात हूँ।

लेखन, ललित लेखन हा आपल्या मनाचा आंतरिक उद्‌गार असतो. कृपया वाटा आणि मुक्काम पहा.

**प्रश्न : साहित्यनिर्मितीच्या भावी योजना सांगाल का?**

उत्तर : योजना कसल्या? त्या कधी नव्हत्याच. ठरवून आखून कधी लिहलेच नाही. माणूस पूर्णपणे कळला असं वाटत नाही. बरेच राहून गेलेले आहे. काही कळले आहे की माणसाचा सगळा वेग एका सघन भूमीत जिरायला हवा आहे. तरच

त्या वेगाला काही अर्थ येईल. माणसाच्या नकारालाही तेंव्हाच बळ येईल की जेंव्हा त्याचात स्वीकाराचे सामर्थ्य असते असे वाटते. पण बरेच कळायचे राहिले आहे. समोर प्रवाह सुरूच आहे. त्यातला एखादा थेंब माझ्या वाट्याला आला इतकेच. समोर रस्ता आहे, सुचणे, खुणावणे सुरु आहे. जे होईल ते आपले म्हणायचे. वाचयचेही खूप राहिले आहे. योजना असतील तर त्याच.

**सानिया यांची मुलाखत**

**प्रश्न : आपल्या वाङ्मयीन जडणघडणीत मोलाचे योगदान कोणाचे आहे?**

उत्तर : लेखक होण्यामागे अनेक घटक काम करत असतात. मुळात एक मन, एक दृष्टी असते. त्याबरोबरीने कल्पनाशक्ती काम करत असते. आयुष्य जगताना जे अनुभवाला येते ते मनात घर करून राहते. त्यावर विचार सुरु असतात. आपण इतर काय काय वाचतो, समजून घेतो त्याचाही परीणाम होत असतो. मग मनात एक नवीन रचना तयार होते. लेखकाचे म्हणून एक जग निर्माण होते आणि त्यातून साहित्य आकाराला येते. मला पुष्कळ प्रवास करता आला. वेगवेगळ्या ठिकाणी मी राहिले आहे. यामुळे माझी दृष्टी तयार झाली, विस्तारली. एका मोठ्या परिप्रेक्ष्यातून जगाकडे पहायची सवय लागली. शिवाय आपल्या जगातली बरोबरीने राहणारी अनेक माणसे, वेगवेगळ्या नात्यांनी जी आपल्याशी बांधलेली असतात त्यांचाही विचारांवर परिणाम झाला. या साऱ्या घटकांचे योगदान जडणघडण होण्यात आहे असे म्हणता येईल.

**प्रश्न : तुमच्या लेखनामागे कोणत्या प्रेरणा आहेत?**

उत्तर : आपण काहीतरी रचत राहावे, आपले प्रश्न, संवेदना कथेतून शब्दात मांडत राहाव्यात ही ऊर्मी मला लिहायला प्रवृत्त करते. सुदैवाने मला लिहिण्याचे स्वातंत्र्य सतत मिळाले. त्यासाठी झगडावे लागले नाही हे खरेच. एकंदर जगणे, माणसांची नाती, आयुष्याचे ताण, बदलत जाणारे जग अशा घटकांनी मला पडणारे प्रश्न आणि जाणवलेले, समजलेले काही हे शब्दातून, आपण तयार केलेल्या समांतर व्यक्ती द्वारा लिहावे असे वाटत असते. मनातले सतत चाललेले विचार हीच प्रेरणा असावी.

**प्रश्न : साहित्यनिर्मिती करताना कोणते प्रश्न समोर असतात?**

उत्तर : निर्मिती करताना आधी आयुष्यातलेच प्रश्न असतात. कुतूहल असते. अमुक एक असेच का? वा का नाही? इतक्या सध्या प्रश्नापासून या आयुष्याचा अर्थ काय, प्रेम-मृत्यू -जगणे याकडे कसे पाहता येते इथपर्यंत. मग मनात काही माणसे दिसतात, त्यांचे जगणे दिसते, नाती उमगतात, ती माणसे कशी वागतील, त्यांच्या आयुष्यात काय होऊ शकते हे सारे मनात उभे राहते. प्रत्यक्ष लिहिताना अनेक गोष्टी बदलतात व नव्याने देखील दिसतात. पूर्ण लेखन होईपर्यंत कसलीच खात्री वाटत नाही. यानंतर कदाचित व्यावहारिक प्रश्न असू शकतात. आपण लिहिलेले कुठे - कोण छापणार? ते वाचकांपर्यंत कसे जाणार? असे.

**प्रश्न : टोपणनाव घेऊन लेखन करावे असे का वाटले?**

उत्तर : लेखन बाहेर प्रसिद्ध करायला सुरुवात करतानाच मला पूर्ण नाव, विशेषतः आडनाव घेऊन लिहावे असे वाटले नाही. याला कारण व्यक्तीची ओळख करून देण्याची आपली सामाजिक रीत. नावावरूनच धर्म - जात - उपजात अशा कप्पाबंद भेदात माणसांना ढकलून देणाऱ्या रीतीपासून आपण बाहेर जावे असे तीव्रतेने लहान वयातच वाटले. म्हणून यापलीकडे जाणारे नाव मी माझी ओळख म्हणून निवडले. हे नाव खोटे असे मी समजत नाही. तीच माझी ओळख आहे.

**प्रश्न : आपल्या कथांमधले महत्त्वाचे बलस्थान म्हणजे उत्कृष्ट वातावरणनिर्मिती. हे वर्णन इतके हुबेहुब असते की वाचक थेट त्या स्थळी जाऊन पोहोचतो. यामागचे रहस्य काय?**

उत्तर : वातावरणनिर्मिती खरे तर आपोआप होते. मनात जे दिसत असते त्याचे वर्णन करताना जणू मीच तिथे असते. लिहिताना मन पूर्ण गुंतून गेल्याने होत असेल. त्यामुळे मनात आपण जो एक जणू चित्रपट पाहतो आहोत तोच शब्दात उतरवत जावा असे वाटते. मुद्दाम वातावरणनिर्मिती करावी असे होत नाही. पण वाचकही तिथे पोचत असेल तर मला त्याचा आनंदच आहे.

**प्रश्न : आपण स्त्री केंद्रस्थानी ठेवून लिखाण केले आहे. सर्वसाधारणपणे स्त्रीवादी लेखन म्हणजे पुरुषी मानसिकता दाखवणारे असा समज आहे. मात्र आपल्या कथांमधले पुरुष खलनायक का नाहीत?**

उत्तर : स्त्री अनेकदा केंद्रस्थानी असते हे खरे. कारण मला बाईचे जगणे, तिचे मन–विचार याचे कुतूहल आहे. बाईचे गुण, तिचे सामर्थ्य यावर विश्वास आहे. पण तसे कुतूहल पुरुषाचेही आहे. शिवाय स्त्री–वाद म्हणजे बाई – चांगली आणि पुरुष – वाईट इतकी ढोबळ संकल्पना अजिबात नाही. स्त्रीचा माणूस म्हणून समानतेने विचार असा स्त्री–वादाचा साधा अर्थ मला अभिप्रेत आहे. परंपरेने बाईला सतत दुय्यम ठरवून तसे संकेत पाडले व सत्तेच्या मालकी भावाने पुरुषवर्गाने समस्त स्त्री–वर्गाचे शोषण केले असा दुर्दैवाने मानव जातीचाच इतिहास आहे. पण वर्तमानात हे बदलू शकते. समानतेचा विचार शास्त्रानेच मान्य केल्याने तशी चळवळ जगभरच सुरु आहे. राहील. आणि हे विचार काही फक्त स्त्री–वर्गापुरते नाहीत. उलट पुरुषवर्गाची मानसिकता बदलणे हा तर चळवळीचा गाभा आहे. त्यामुळे 'चांगले पुरुष' माझ्या साहित्यात असू शकतात जसे ते प्रत्यक्षातही असतात.

**प्रश्न : तुमच्या कथांमध्ये आलेली स्त्री–पात्रे आणि आजची स्त्री यातला नेमका फरक कसा सांगाल?**

उत्तर : मला वाटते मी सतत 'आजच्या' स्त्री बद्दलच लिहीत आले आहे. अर्थात काळानुसार पिढी बदलत जाते. माझ्या साहित्यातली स्त्री विचार करणारी आणि संवेदनशील आहे. ती चुका करत असेल, तिला सारखे प्रश्न पडत असतील पण नव्याने काही समजून घेणे आणि विचारांनी प्रगल्भ होणे हे तिच्या आयुष्यातले महत्वाचे सूत्र आहे. सगळ्याच बायका अशा असतात असे मला म्हणायचे नाही. तशा कधीच नसतात. तशी सारखी माणसेच कुठे कधीच नसतात. विचारशील, संवेदनशील माणसांचे प्रमाण किती हा महत्वाचा मुद्दा असतो. आजची पिढी, तरुण स्त्री, अधिक हुशार, सजग, प्रगल्भ असू शकेल. तशा संधी तिला उपलब्ध आहेत. म्हणजे सगळ्याच तशा असतील असे नाही. पण आधुनिक नवी पिढी

सगळ्या क्षेत्रात अधिक काम करू शकेल असा माझा विश्वास आहे. त्यामुळे कदाचित माझ्या साहित्यातली स्त्री ही आजचीच असेल.

**प्रश्न : लेखन करताना आपल्या डोळ्यासमोर कोणते आदर्श होते?**

उत्तर : इतर कुणा लेखकांचे 'आदर्श होते' असे म्हणता येणार नाही. मराठी-इंग्रजी साहित्य जमेल तसे वाचत आले आहे. त्यात अभ्यास वा सूत्र नाही. पण इतर लेखकांचे चांगले वाचताना आनंद होतो. कुठेतरी आपणही त्यांच्याशी जोडले जातो. आपल्यालाही नव्याने काही उमजते. नवीन जग कळते. जगात किती तऱ्हेची आयुष्ये लोक जगतात तरीही त्यांच्या विचारात, भावनात केवढी समानता असते हे जाणवते. अशा भावनेतून आपणही आपल्याला उमजलेले लिहावे असे वाटते. मराठी पुरते म्हणायचे तर पूर्वी जी. ए. कुलकर्णींचे लेखन वाचताना असे ताकदवान लिहावे असे वाटलेले आहे. आपण आपल्याला जे वाटते, समजते तेच लिहावे हे खरे असा विश्वास आहे.

**प्रश्न : खरे जे लिहायचे आहे ते लिहिण्याचे स्वातंत्र्य लेखकाला असते का?**

उत्तर : आपण खरे तेच लिहावे असे तर प्रत्येक लेखकाला वाटत असते. पण पुन्हा 'खरे' म्हणजे काय? हा प्रश्न उरतोच. 'सत्याचा शोध' ही मोठीच संकल्पना झाली. तेंव्हा आपल्याला आतून जाणवलेले प्रामाणिकपणे मांडणे म्हणजे खरे लिहिणे होऊ शकेल. तरीही तसे मांडताना इतर मर्यादा येऊ शकतात. लेखन स्वातंत्र्यावर साहित्यबाह्य राजकीय कारणांमुळे निर्बंध येणे हे तर वर्तमानात घडतेच आहे. त्यामुळे अनेक लेखकांची कोंडी होऊ शकते वा त्याची किंमत द्यावी लागते, त्रास सहन करावा लागतो. मग आपण किती-काय लिहायचे हे स्वत:च ठरवावे लागते. निर्भीडपणे लिहिणे हा खरा लेखनाचा पाया आहे. हा एक सतत पडणारा प्रश्न आहे आणि याचे उत्तर प्रत्येक जण स्वत:पुरते शोधू पाहतो.

**प्रश्न : साहित्यिकाने समाजासमोर आदर्श निर्माण करणारेच लेखन करावे का?**

उत्तर : समाजासमोर आदर्श निर्माण करणे असे काही नेमून दिलेले काम नाही. साहित्यिकांचे तर ते मुळीच नाही. साहित्यातून आयुष्याचे, जगाचे दर्शन होते, विचार आणि भावांचा अनुभव येतो. त्यातून आपण समृद्ध होत जाणे अपेक्षित आहे. शिवाय 'आदर्श' ही कल्पना सोयीची आणि भाबडी आहे. ते कुणी ठरवायचे? आणि कसे? त्यापेक्षा 'चांगले साहित्य' म्हणजे काय ते ठरवणे आणि त्यापासून आयुष्य अधिक अर्थपूर्ण करत जाणे महत्वाचे.

**प्रश्न : साहित्यनिर्मितीच्या भावी योजना सांगाल का?**

उत्तर : लिहावेसे वाटते आहे तोपर्यंत जमेल तसे लिहित राहणे एवढेच मनात असते. तशी काही विशिष्ट योजना नाही. कथा लिहावीशी वाटली की सुरुवात होते. लिहून पूर्ण झाली की आनंद होतो. असे लेखन सुरु राहावे एवढीच इच्छा असते.

## संदर्भसूची (आद्याक्षरांनुसार)


### अ

अनोळखी, **दर्पण**, बगे आशा, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. ५६

अनंत, **अनंत**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. १९७

अरण्य, **पूजा**, बगे आशा, मॅजेस्टिक प्रकाशन, १९८९, पृ. ५०

अवेळ, **पाणी**, बगे आशा, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १६१

अज्ञात, **दर्पण**, बगे आशा, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. १२६

### आ

आपण आपले, **आपण आपले**, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, जाने. २००३, पृ. क्र. १२०

**आशा बगे नवे अस्तित्व**, हेर्लेकर सुलभा, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ८३

**आशा बगे नवे अस्तित्व**, हेर्लेकर सुलभा, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर, १९८६, पृ. ८७

### ए

**एका अटीचा संसार**, खान राजन, मनोविकास प्रकाशन, १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ ९

**एका अटीचा संसार**, खान राजन, मनोविकास प्रकाशन, १५ ऑगस्ट २००८, पृष्ठ २२

एकदा जाग आली, **खिडक्या**, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. २२

### ओ

ओमियागे २, **ओमियागे**, सानिया, राजहंस प्रकाशन, जुलै २००४, पृ. क्र. ४८

ओमियागे ३, **ओमियागे**, सानिया, राजहंस प्रकाशन, जुलै २००४, पृ. क्र. ८५

ओळख, **आपण आपले**, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, जाने. २००३, पृ. क्र. ७०

### क

**कथनमीमांसा**, पाटील गंगाधर, अनुष्टुभ, दिवाळी, १९९१, पृ. ९८

**कथाः संकल्पना आणि समीक्षा**, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०००, पृ. ५

कारण, **पुन्हा एकदा**, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. १४०

काही पाने, **अनंत**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. १६९

किती दूर, **प्रतिद्वंद्वी**, बगे आशा, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ६४

कोन ठगवा, **निसटलेले**, बगे आशा, मेहता पब्लिशिंग हाऊस, फेब्रुवारी १९९९, पृ. क्र. १३२

कोपऱ्यावरलं घर, **प्रयाण**, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, पृ. क्र. १४६

कोवळी उन्हं, **मारवा**, बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृष्ठ १२२.

**ख**

खडक, **पूजा**, बगे आशा, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १९८६, पृ. १५४

**खडक आणि पाणी**, गाडगीळ गंगाधर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६६, पृ. ५७

खिडक्या, **खिडक्या**, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. १९१

**ग**

गतजन्म, **अशी वेळ**, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. १२०

**घ**

घरटं, **मारवा**, बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ३८.

घोरपड, **निसटलेले**, बगे आशा, मेहता पब्लिशिंग हाऊस, फेब्रुवारी १९९९, पृ. क्र. १४६

**च**

चितारओळ, **पूजा**, बगे आशा, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १८८६, पृ. २७

चंदन, **चंदन**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जानेवारी १९९३, पृ. ५८

**त**

त्यानंतर, **त्यानंतर**, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. ९२ (प्रकरण ३ आणि ४)

तुफान, **अनंत**, बगे आशा, शारदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. क्र. ३१ (प्रकरण २ आणि ४)

**द**

दारं उघडावीत, **त्यानंतर**, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००२, पृ. क्र. १३९

दर्पण, **दर्पण**, बगे आशा, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. १८०

देठ, **पूजा**, बगे आशा, मॅजेस्टिक प्रकाशन, नोव्हे. १९८६, पृ. १११

### ध

धागा, **पुन्हा एकदा**, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ७८

### न

नर्सिंग होम, **अत्तर**, बगे आशा, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ११३

नातं, **मारवा**, बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ७१ (प्रकरण २ आणि ४)

नातं, **अनंत**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९४, पृ. १३६

नातं, **मारवा**, बगे आशा, मौज प्रकाशन, जून २००२, पृ. क्र. ७५

नाळ, **अनंत**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. ५४

निर्मोही, **प्रतिद्वंद्वी**, बगे आशा, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. १०२

निवडुंग, **अत्तर**, बगे आशा, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ८३ (प्रकरण २ आणि ४)

नैवेद्य, **मांडव**, बगे आशा, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. ९८

### प

पराभूत, **शोध**, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १९८

परिमाण, **परिमाण**, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १२

परिमाण, **परिमाण**, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १३

परिमाण, **परिमाण**, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १५

पत्र, **ऋतूवेगळे**, बगे आशा, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट १९९९ पृ. ७०

पाऊस, **दर्पण**, बगे आशा, मौज प्रकाशन, १० मार्च १९९७, पृ. ७२

पारंब्या, **पाणी**, बगे आशा, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. ९२

पाहुणा, **अत्तर**, बगे आशा, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ८४

पाणी, **पाणी**, बगे आशा, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १९२ (प्रकरण २ आणि ४)

पाणी, **पाणी**, बगे आशा, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. २६

पाहुणा, **अत्तर**, बगे आशा, पिसारा प्रकाशन, जानेवारी १९८६, पृ. क्र. ८४

पुन्हा एकदा जन्म, **पाऊलवाटेवरले गाव**, बगे आशा, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट २००५, पृ. क्र. १२४

प्रतिभा, **भूमिका**, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. ३९ (प्रकरण ३ आणि ४)

प्रतिभा, **भूमिका**, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ४०

प्रतिमाची गोष्ट, **भूमिका**, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन, जाने. १९९४, पृ. क्र. ९७

प्रतिसाद, **पुन्हा एकदा**, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. १००

प्रतिसाद, **पुन्हा एकदा**, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ९७

**प्रदक्षिणा खंड १**, अदवंत म. ना., कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९४१, पृष्ठ २०१

प्रयाण, **प्रयाण**, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, फेब्रुवारी १९९७, पृ. क्र. ७५

प्रवाह, **प्रतीती**, सानिया, मौज प्रकाशन, १९८९, पृ. क्र. १०६

प्रस्तावना, **पुन्हा एकदा**, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५

प्रारंभी खेळाच्या, **खिडक्या**, सानिया, नवचैतन्य प्रकाशन, २००४, पृ. क्र. ११५

**फ**

फक्त गृहिणी, **अशी वेळ**, सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. १५९

**ब**

बंदिशाळा, **अत्तर**, बगे आशा, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. ४९ (प्रकरण २ आणि ४)

**भ**

**भाषा व साहित्यः संशोधन (खंड १)**, संपादकः डॉ. जोशी वसंत, प्रकाशकः म. श्री. दीक्षित, नोव्हें. १९८१, पृष्ठ – १.

**भाषा व साहित्यः संशोधन (खंड १)**, संपादकः डॉ. जोशी वसंत, प्रकाशकः म. श्री. दीक्षित, नोव्हें. १९८१, पृष्ठ – २.

**म**

**मराठी कथेची स्थितीगती**, सोमण अंजली, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – ११५.

**मराठी कथेची स्थितीगती**, सोमण अंजली, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – २९.

**मराठी कथेची स्थितीगती**, सोमण अंजली, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – ४.

**मराठी कथेची स्थितीगती**, सोमण अंजली, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृष्ठ – ६०.

**मराठी लेखिका चिंता आणि चिंतन**, फडके भालचंद्र, श्रीविद्या प्रकाशन, १९८०, पृ. क्र. ९५

**मराठीतील कथाविशेष**, सोमण अंजली, प्रतिमा प्रकाशन, १९९५, पृ. १३५.

महावस्त्र, **अत्तर,** बगे आशा, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृष्ठ १२०

महावस्त्र, **अत्तर,** बगे आशा, पिसारा प्रकाशन, जाने. १९८६, पृ. १२८

**माझे कथालेखन,** बगे आशा, ललित, जुलै १९८८, पृ. ३७.

**माझ्या कथा माझी निवड,** बगे आशा, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. ५

**माझ्या कथा माझी निवड,** बगे आशा, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ४८

**माझ्या कथा माझी निवड,** बगे आशा, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ६

**माझ्या कथा माझी निवड,** बगे आशा, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ७

**माझ्या कथा माझी निवड,** बगे आशा, ज्ञानेश प्रकाशन, १ मे २००१, पृ. क्र. ८

मारवा, **मारवा,** बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ७ (प्रकरण २ आणि ४)

मारवा, **मारवा,** बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ९

मारवा, **मारवा,** बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १०

मारवा, **मारवा,** बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १४

मारवा, **मारवा,** बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, १५

मार्ग, **पुन्हा एकदा,** सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. २८

मांडव, **मांडव,** बगे आशा, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. २४

मांडव, **मांडव,** बगे आशा, सन पब्लिकेशन्स, २२ फेब्रुवारी १९९३, पृ. क्र. ४६

मित्राची कथा, **भूमिका,** सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. ७८ (प्रकरण ३ आणि ४)

मी एक मुंगी - तू एक मुंगी, **रंग,** देसाई कमल, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती, १९६२, पृ. क्र. १५५

मोहर, **पाणी,** बगे आशा, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. ११४

**र**

रुक्मिणी, **मारवा,** बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १५४.

रुक्मिणी, **मारवा,** बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. १६२.

रेषा, **अशी वेळ,** सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. ६३

रेषा, **अशी वेळ,** सानिया, मौज प्रकाशन, १ मार्च २०१०, पृ. क्र. ७०

रोहिणीची डायरी, **भूमिका,** सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १४९

रंग, **रंग २,** देसाई कमल, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. १३०

रंग, **रंग**, देसाई कमल, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९६२, पृ. ५९
**रंग २**, देसाई कमल, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. क्र. १४२
**रंग २**, देसाई कमल, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८८, पृ. क्र. २७
रंग, **मारवा**, बगे आशा, मौज प्रकाशन, जाने. १९८४, पृ. ९०.

**ल**

लग्न, **पाऊलवाटेवरले गाव**, बगे आशा, मेहता पब्लिशिंग हाऊस, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ८७
**लघुकथालेखन तंत्र आणि मंत्र**, फडके ना. सी., अंजली प्रकाशन मुंबई, ऑगस्ट १९५२, पृ. क्र. ३७
**लघुकथालेखन तंत्र आणि मंत्र**, फडके ना. सी., अंजली प्रकाशन मुंबई, ऑगस्ट १९५२, पृ. क्र. ४०

**व**

वाट वेगळी, **शोध**, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १८६
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. १
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. ३
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ८
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. १२
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. १७
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २२
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २३ (प्रकरण २ आणि ३)

**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. २८
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. ३२
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. ३६
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ३७
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ४७
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५७
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ५८, ५९
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ६२
**वाटा आणि मुक्काम**, बगे आशा, सानिया, सासणे भारत सासणे, बोकील मिलींद, मौज प्रकाशन, १ मे २००९, पृ. क्र. ६४
वीण, **पुन्हा एकदा**, सानिया समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ११९

## श

शोध, **शोध**, सानिया, मौज प्रकाशन, मार्च १९८०, पृ. क्र. १३७-१३८
श्राद्ध, **चंदन**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९३, पृ. १२३

## स

सखा, **पुन्हा एकदा**, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ६०
सखी, **प्रतिद्वंद्वी**, बगे आशा, मेहता पब्लिकेशन्स, ऑगस्ट २००५, पृ. क्र. ६४
समज, **पुन्हा एकदा**, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ३५
समज, **पुन्हा एकदा**, सानिया, समकालीन प्रकाशन, १ ऑगस्ट २०१५, पृ. क्र. ३९

समुद्र, **चंदन**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९३, पृ. १०४
‘**संपादित सानिया**’ या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभातील मनोगत
सोबती, **अनंत**, बगे आशा, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जुलै १९९३, पृ. ११४
स्पर्श, **पाणी**, बगे आशा, नवचैतन्य प्रकाशन, ऑगस्ट २००३, पृ. क्र. १४७
स्व-रूप, **परिमाण**, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. १०५, १०६
स्वदेशी, **भूमिका**, सानिया, ज्ञानदा पब्लिकेशन्स, जाने. १९९४, पृ. क्र. १८६

**क्ष**

क्षितिज, **परिमाण**, सानिया, मॅजेस्टिक प्रकाशन, जाने. १९९६, पृ. क्र. ५४

## माहितीजाल (इंटरनेट)

http://www.loksatta.com.pune-new/smpadeet-saniya-book-published by-milind bokil-397209#

## ग्रंथसूची (आद्याक्षरांनुसार)
## अ. मुख्यग्रंथ

**अ**

अत्तर

अनंत

अशी वेळ

**आ**

आपण आपले

**ऋ**

ऋतूवेगळे

**ओ**

ओमियागे

**ख**

खिडक्या

**च**

चंदन

**त**

त्यानंतर

**द**

दर्पण

**न**

निसटलेले

**प**

पाऊलवाटेवरले गाव

परिमाण

पाणी

पुन्हा एकदा

पूजा

प्रतीती

प्रतिद्वंद्वी

प्रयाण

**भ**

भूमिका

**म**

महावस्त्र

माझ्या कथा माझी निवड

मारवा

मांडव

**र**

रंग

रंग २

**श**

शोध

## ब. पूरकग्रंथ

### आ

आशा बगे नवे अस्तित्व

### ए

एका अटीचा संसार

### क

कथनमीमांसा

कथाः संकल्पना आणि समीक्षा

### ख

खडक आणि पाणी

### प

प्रदक्षिणा खंड १

### भ

भाषा व साहित्यः संशोधन (खंड १)

### म

मराठी कथेची स्थितीगती

मराठीतील कथाविशेष

मराठी लेखिका चिंता आणि चिंतन

माझे कथालेखन

### ल

लघुकथालेखन मंत्र व तंत्र

### व

वाटा आणि मुक्काम